# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

बी. ए. भाग–३ इतिहास

सत्र–५ : पेपर–९ DSE-E63

## क्रांत्यांचे युग

**(Age of Revolutions)**

सत्र–६ : पेपर–१४ DSE-E188

## आधुनिक जगाची निर्मिती

**(Making of the Modern World 16th to 19th Century)**

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. भाग - ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-63-5

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ अभ्यासमंडळ : इतिहास ■**

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहादूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भरतभूषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यामार्फत जून २००७ पासून बहिःस्थ विद्यार्थ्यांची गरज ओळखून दूरशिक्षण योजनेचा उपक्रम हाती घेतला आहे. सन २०२०-२०२१ पासून बी. ए. ३ इतिहास विषयाचा अभ्यासक्रम बदललेला आहे. सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. सदरच्या योजनेअंतर्गत बी.ए.भाग-३ इतिहास पेपर क्र. ९ व १४ (सत्र ५ व ६) या विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी सत्र ५ साठी क्रांत्यांचे युग व सत्र ६ साठी आधुनिक जगाची निर्मिती (१६ वे ते १९ वे शतक) या पेपरचे स्वयं अध्ययनासाठी हे पुस्तक लिहिले आहे. अभ्यासक्रमातील वेगवेगळ्या घटकांचे स्पष्टीकरण सुलभ भाषेतून केल्यामुळे विद्यार्थी वर्गाला विषयाची माहिती होण्यास अडचण राहणार नाही असे वाटते. प्रत्येक उपघटकाच्या शेवटी स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे घटकाच्या शेवटी दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, सारांश व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची यादी दिलेली आहे.

या पुस्तकामध्ये क्रांत्यांचे युग व आधुनिक जगाचा निर्मिती या पेपरची माहिति दिलेली आहे. या पेपरमध्ये सत्र ५ व ६ साठी प्रत्येकी ४ घटकांचा समावेश केलेला आहे. सत्र ५ मध्ये सुधारणावादी चळवळ, औद्योगिक क्रांती, अमेरिकन राज्यक्रांती, फ्रेंच राज्यक्रांती १७८९ आणि सत्र ६ मध्ये वैभवशाली राज्यक्रांती, राष्ट्रवाद, साम्राज्यवाद, महत्त्वाची व्यक्तीमत्त्वे इत्यादी घटकांचा समावेश केलेला आहे. मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचा बारकाईने अभ्यास करणे गरजेचे असल्याने सदर पुस्तकाचे लेखन केलेले आहे.

पुस्तकामध्ये विविध घटकांच्या अनुषंगाने विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरीही त्यामध्ये कांही उणिवा राहिल्यास प्राध्यापक व विद्यार्थी यांनी त्या निदर्शनास आणून द्याव्यात. पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित अद्यावत करण्यासाठी याचा उपयोग होईल. हे पुस्तक पदवी व विविध स्पर्धा परीक्षांच्यासाठी महत्त्वाचे ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो. सदरच्या पुस्तकातील विविध घटक लेखनाची जबाबदारी संबंधीत घटक लेखकांवर आहे.

सदर पुस्तकाच्या लिखानाचे काम शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध मान्यवर प्राध्यापकांनी पूर्ण केल्याबद्दल संपादक मंडळ त्यांचे आभारी आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठ आणि दूरशिक्षण विभागातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संपादक मंडळ मनापासून आभार मानत आहे.

**■ संपादक ■**


**डॉ. बी. एस. माळी**
क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय,
वाळवा, ता. वाळवा, जि. सांगली

**प्रा. डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**क्रांत्यांचे युग/आधुनिक जगाची निर्मिती**
**बी. ए. भाग–३ इतिहास सत्र ५ व ६**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. बी. एस. माळी**<br>क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा, जि. सांगली | १ | – |
| **डॉ. सुरेश शिखरे**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | २ | – |
| **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**<br>एन. डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर,<br>ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर | ३ | – |
| **प्रा. डॉ. अभय पाटील**<br>सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड | ४ | – |
| **डॉ. वैशाली अभिजित सारंग**<br>डी.डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर | – | १ |
| **डॉ. मुफीद मुजावर**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | – | २ |
| **प्रा. डॉ. अवनिश पाटील**<br>इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | – | ४ |
| **डॉ. आरती नाडगौंडा**<br>देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर | – | ४ |

### ■ संपादक ■

**डॉ. बी. एस. माळी**
क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय,
वाळवा, ता. वाळवा, जि. सांगली

**प्रा. डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–९**<br>**क्रांत्यांचे युग** | |
| १. | सुधारणावादी चळवळ (१६ वे शतक) | १ |
| २. | औद्योगिक क्रांती (१८ वे शतक) | १६ |
| ३. | अमेरिकन राज्यक्रांती (१७७६) | ४६ |
| ४. | फ्रेंच राज्यक्रांती (१७८९) | ६९ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१४**<br>**आधुनिक जगाची निर्मिती** | |
| १. | वैभवशाली राज्यक्रांती (१६८८) | ९५ |
| २. | राष्ट्रवाद | ११४ |
| ३. | साम्राज्यवाद | १५९ |
| ४. | महत्त्वाची व्यक्तीमत्त्वे | १८४ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरे घटकाच्या शेवटी देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक : १

# सुधारणावादी चळवळ (१६ वे शतक)

## (Reformation 16th Century)

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

- १.२.१ धर्म सुधारणावादी चळवळीची पार्श्वभूमी
- १.२.२ प्रोटेस्टंट चळवळीची कारणे
- १.२.३ प्रोटेस्टंट पंथानी स्वीकारलेली तत्वे
- १.२.४ मार्टीन ल्युथरचे कार्य (१४८३ ते १५४३)
- १.२.५ सुधारणावादी चळवळीचे परिणाम

१.३ समारोप

१.४ पारिभाषिक शब्दार्थ

१.५ स्वयंअध्ययन प्रश्न

१.६ संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यावर विद्यार्थ्यांना खालील गोष्टींचे अध्ययन होईल.

- ख्रिश्चन धर्मातील विविध पंथाची तोंड ओळख होईल.
- प्रोटेस्टंट ही संकल्पना व त्याचा इतिहास समजेल.
- धर्म सुधारणा चळवळीची पार्श्वभूमी समजेल.
- युरोपातमधील चळवळीतील इतर समाजसुधारकांची माहिती होईल.
- मार्टीन ल्युथर या सुधारकाची माहिती होईल.
- प्रोटेस्टंट चळवळीची व तत्वांची माहिती होईल.
- धार्मीक सुधारणा चळवळीतील युरोपातील इतर सुधारकांची माहिती मिळेल.
- ख्रिश्चन धर्मातील सुधारणा आणि सुधारणांचे जागतिक परिणाम समजतील.
- या चळवळीला विरोधी घटक कोणते होते ते समजेल.

## १.१ प्रास्ताविक

धर्म या घटकाने जगाच्या इतिहासात मानवाच्या जीवनात अनेक स्थित्यंतरे घडवली आहेत आणि त्याचे अत्यंत दूरगामी परिणाम पडले आहेत. मानवी उत्क्रांतीच्या प्रवासात धर्म नेमका कधी आला हे सांगणे कठीण असले तरी तो मानवाच्या जीवनातील अत्यंत महत्वाचा आणि अविभाज्य घटक बनलेला आहे. धर्म हा कधी खोलवर रुजतो आणि त्याचे विशिष्ट असे साहित्य निर्माण होते त्याला आपल्या भारतीय भाषेत पोथी असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही. पोथीनिष्ठता आणि त्याचे सर्व उत्तरदायित्व ज्यांनी घेतले त्यांनी पोथीमधील तत्वांचा काटेकोरपणे अंगीकार करून त्याचे धर्मसंस्थेत रुपांतर झाले. त्यामुळे धर्मसंस्था या धर्माच्या प्रमुख बनल्या. हा जगाच्या इतिहासातील दाखला आहे. युरोपीय देश याला कांही अपवाद होते असे नाही. ख्रिश्चन धर्माची संस्थापना कोणी केली असेल तर आपण येशू ख्रिस्त याचे नाव घेतो. ख्रिश्चन धर्माचा पवित्र ग्रंथ बायबलच्या कथेनुसार रोमन सत्तेने येशूची निघृण हत्या केली. त्याच्या हत्येनंतर धर्माची सूत्रे व पुढारीपण रोमन कॅथोलिक या पंथाकडे गेली. या धर्माचे मुख्य केंद्र इटली या देशातील रोम हे शहर प्रमुख केंद्र बनले.रोमन कॅथॉलिक प्रमुखास पोप असे संबोधले जाते. पोपने या धर्माची मूळ शिकवण आणि तत्वे बाजूस काढल्याने कर्मकांड आणि गोंधळ हा या धर्माचा स्थायीभाव निर्माण केला. वास्तविक पाहता येशूने रोमन सत्ताधारी लोकांच्या विरोधात लढा दिला आणि त्यातच त्याला मरण मिळाले. म्हणजे प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात नव्या तत्वाची मांडणी करणारा येशू ख्रिस्ताची शिकवण बाजूला करून पोप मात्र प्रस्थापित बनला. पोपने दिलेले धर्मिक आदेश निमुटपणे स्वीकारणे आणि अंगीकारणे याला पर्याय राहिला नाही. कारण त्यावेळी या धर्मसंस्थेच्या हुकुमशाहीला कोणतेही पर्याय सामान्य लोकांकडे नव्हता. विघातक तत्व आणि तत्वज्ञान जेव्हा सामान्य लोकांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण करते तेव्हा त्याला पर्याय निर्माण होत असतात. असाच पर्याय मार्टिन ल्युथरच्या रूपाने या चळवळीस मिळाला आणि सुधारणावादी चळवळीची सुरुवात झाली.

## १.२ विषय विवेचन व संकल्पनांचा उगम

ख्रिश्चन धर्मातील या गोंधळ आणि अनाचाराला एक पर्याय म्हणून जर्मनी या देशात मार्टीन ल्यूथर याचे नेतृत्व पुढे आल्याचे दिसते. ही धर्मिक सुधारणावादी चळवळ एकदम घडली नाही. तर १६ व्या शतकात युरोप खंडात प्रबोधनाची चळवळ घडली. या चळवळीचा एक भाग म्हणून धार्मीक सुधारणावादी चळवळीचा उगम जर्मनी या देशात झाला. ही सुधारणावादी चळवळ अभ्यास करण्यासाठी कांही संकल्पना अभ्यासणे आवश्यक आहे.

मार्टिन ल्युथर यांनी ख्रिश्चन चाललेल्या कर्मकांडाला विरोध केला. त्या कृतीतून एक संकल्पना पुढे आली ती म्हणजे प्रोटेस्टंट ही होय. पारंपारिक रोमन कॅथोलिक चर्चच्या कर्मकांड प्रथेचा या चळवळीने निषेध केला. निषेध या मराठी शब्दाला इंग्रजीमध्ये प्रोटेस्ट हा शब्द आहे. त्यामुळे या चळवळीला प्रोटेस्ट करणारे ते प्रोटेस्टंट असे नाव मिळाले. आधुनिक काळातील विद्वान यामध्ये एक मोठा फरक करतात. तो म्हणजे जुने प्रोटेस्टंटवादी आणि नवे प्रोटेस्टंटवादी असा होय. प्रोटेस्टंट चळवळ ही पाश्चिमात्य ख्रिश्चन चळवळ होती. यामध्ये विश्वासाकडे परत, जुनी धार्मिक संहिता व येशूने निवडलेल्या संदेष्टे यांच्या शिकवणीवर भर देणे असे मुद्दे यामध्ये होते.ही पश्चिम देशातील चर्चकडे झालेली चळवळ धर्म क्रांती या नावानेही ओळखली जाते.

प्रोटेस्टंट ही संकल्पना प्रथम १५२९ साली पार्लमेंटमध्ये अस्तित्वात आली. १५२३ मध्ये रोमन कॅथोलिक

सत्ताधीश चार्ल्स पाचवा याच्या काळात ल्युथरवादी लोकांनी काही धर्म सुधारणा बाबतीत निदर्शने केली. तेव्हा चार्ल्सच्या काळात मुख्य राज्यकारणी सभेने जर्मनीमधील लोकांना धर्मविषयक निष्ठाबाबत स्वातंत्र दिले. तेव्हा दक्षिण जर्मनीतील काही लोकांनी ल्युथरवादी भूमिका स्वीकारली तर काही लोकांनी कॅथॉलिक भूमिका स्वीकारली. १५२९ साली दुसऱ्या मुख्य राजकारणी सभेत मात्र या आधी स्वीकारलेल्या सहिष्णुता धोरण सभेमध्ये दहशत निर्माण करून रद्द करण्यात आले. या विरोधात जर्मनीतील सहा ल्युथरवादी राज्ये व चौदा शहरात प्रतिक्रिया उमटली. या मतभेदातून १५ एप्रिल १५२९ मध्ये त्यांना प्रोटेस्टंट हे नाव मिळाले. या चळवळीतील प्रमुख नेते म्हणून मार्टीन ल्युथर, जॉन कॅल्व्हीन व झींगली हे होते. या चळवळीने प्रोटेस्टंट धर्म पंथाचा पाया रचला. ही चळवळ म्हणजे बायबल मधील मुलभूत तत्वांचा स्वीकार करणारी चळवळ होती. जी मुलभूत तत्वे तत्कालीन रोमन कॅथोलिक चर्चने स्वीकारलेली नव्हती. ख्रिचन धर्माच्या अंतर्गत ज्या सुधारणावादी चळवळी झालेल्या होत्या त्याचा परामर्श आपण या घटकात घेणार आहोत.

### १.२.१ धर्म सुधारणावादी चळवळीची पार्श्वभूमी

धर्मसुधारणा होण्यासाठी युरोपमध्ये महत्वाची पार्श्वभुमी काही विचारवंतानी निर्माण केली. त्यामध्ये इ.स. १४५५ ते १५२२ या काळातील रुचलीन व १४६६ ते १५३३ या काळातील इरॅस्मस यांनी मांडलेले विचार महत्वाचे ठरले. रुचलीन हा भाषा पंडित होता. त्याने तत्कालीन धर्म पंडितांनी बायबलच्या स्पष्टीकरणातील भाषाशास्त्र विषयक दोष दाखविले. इरॅस्मस हा गाढा विद्वान व मानवतावादी होता. त्याने धर्मोपदेशक यांच्या सुखवादी, लोभी व असभ्य वृत्तीवर कठोर टीका केली. धर्मातील दंतकथा व अंधश्रध्दा यावरही टीका केली. या प्रकाराने धर्म हा मलीन होतो असे त्याचे मत होते. सण, समारंभ आणि उत्सव यापेक्षा त्याने मानवाच्या अंतरात्म्याला हाक दिली.टोकाचा संघर्ष करण्यापेक्षा प्रश्न सोडविण्याकडे त्याचा कल होता. त्यामुळे अतिरेकीपणा टाळला पाहिजे असे त्याचे मत होते. तसेच त्याचे लिखाण हे कोणाचीही भीड राखणारे नव्हते. शेवटच्या काळात त्याने मार्टीन ल्युथर याच्यावरही टीका केली होती. मार्टीन ल्यूथरच्या अतिरेकी भूमिकेमुळे युरोपमध्ये राजकीय व धार्मिक अराजक माजण्याचा संभव असल्याचे त्याचे मत होते.

इंग्लंडमधील जॉन वायल्कीफ याने पोपच्या अनियंत्रित सत्तेविरोधात चळवळ केली. याने बायबलचे इंग्रजी भाषेत भाषांतर केले. त्याच्या या कृत्याने त्याला आक्सफर्ड विद्यापीठात भाषण देण्यास बंदी घातली. त्याच्या मृत्यूनंतर त्याचे शव उकरून उकिरड्यावर टाकण्यात आले. तर फ्लोरेन्स मधील सॅव्हारोलोना याला त्याच्या विचारस्वातंत्र्याच्या विरोध करताना त्याला जिवंत जाळण्यात आले.

जॉन हस हा दक्षिण बोहीमिया या प्रांतातील एक धार्मीक सुधारणावादी विचारवंत होता.इ.स. १४०१ मध्ये तो धार्मीक शिक्षणाचा प्राध्यापक म्हणून पेरुग्वे विद्यापीठात दाखल झाला होता. नंतर तो तत्वज्ञान या शाखेचा अधिष्ठाता झाला. त्याच्यावर कामाचा अधिकच भार म्हणून बेथलेहेम येथील चर्चमध्ये प्रचारक म्हणून काम देण्यात आले.याने बायबलच्या शिकवणीकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले होते. जॉन हस याने काही बुद्धिवादी लोकांसमोर व्याख्यान देताना चर्चमधील धर्मगुरू व त्यांच्या विचारावर टीका केली. हसच्या मते प्रभूभोजन घेण्याचा सर्वांना अधिकार असून समाजाला त्यापासून वंचित ठेवणे ही पद्धत चुकीची आहे. पोपला असे आत्मिक व राष्ट्रीय शोषणाचे अधिकार नाही. त्याच्या या बंडखोर विचारामुळे त्याला इ.स. १४११ मध्ये पोपने त्याला धर्मबहिष्कृत केले. काही काळासाठी तो किल्ल्यात दडला व तेथेच त्याने दि.एक्लीसिया हा ग्रंथ

लिहिला. तो जेव्हा प्रगट झाला त्यावेळी त्याच्या शत्रूंनी त्याला तुरुंगात टाकून त्याची मते सोडून चर्चची पुराणमतवादी मते स्वीकारण्यास त्याच्यावर दबाव टाकला पण त्याला त्याने दाद दिली नाही. शेवटी त्याला जाळून मारण्याची शिक्षा दिली. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या विचाराचा एक गट अस्तित्वात आला. ज्याला आपण हसवादी असे म्हणू शकतो. त्या गटाने पवित्र रोमन सत्ताधीश गटाविरुद्ध हिंसक निदर्शने केली. त्यातून इ.स. १४१९ ते १४२४ या काळात युद्धे झाली. शेवटी हसवादी गट, बोहेमियाचा राजा आणि पवित्र रोमन सत्ताधीश यांच्यात शांतता तह होऊन हे युद्ध संपले. पण हसचे विचार मात्र अबाधित राहिले.

मार्टीन ल्युथर याचा समकालीन एक सुधारक म्हणजे युलरीच इवीलींग हा होय.(१४८४ ते १५३०) युलरीचचा जन्म स्विझर्लंड मधील एका श्रीमंत घराण्यात झाला होता. तो इ.स. १५०२ मध्ये झुरीचमधील एक छोट्या भागात धर्मोपदेशक झाला. त्याने स्पष्टपणे धर्म आणि मानवी वागणूक याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. त्याने उघडपणे एक भूमिका मांडली की, धर्मोपदेशक यांनी बायबलच्या तत्वाचे कठोर पालन केले पाहिजे. पोपने झुरीच येथे सॅमसन याला उपभोगाच्या वस्तू विक्री करण्यासाठी पाठविले पण झुरीचमध्ये पोपच्या या कृतीला तीव्र विरोध झाला. त्यानंतर त्याने पोपच्या विरोधात भूमिका घेतली. धर्मोपदेशकांचे ब्रम्हचर्य आणि उपवास याला त्याने विरोध केला. बिशप मंडळाने युलरीचच्या भूमिकेला विरोध केला पण झुरीच येथील जनतेने मात्र युलरीचच्या मतास पाठींबा दिला. इ.स. १५२३ मध्ये युलरीचला वाळीत टाकण्याची शिक्षा पोपने दिली. पण झुरीचने आपण चर्चशी संबंध तोडत असल्याचे जाहीर केले. शेवटी झुरीच मधील पाच छोट्या विभागांनी युलरीच विरोधात युद्ध पुकारले.त्यामध्ये युलरीच हा इ.स. १५३१ मध्ये मारला गेला.

### १.२.२ प्रोटेस्टंट चळवळीची कारणे

**१) पोपची भ्रष्ट कृत्ये :** पोप हा रोमन कॅथोलिक पंथाचा धर्मगुरू असला तरी त्याने ख्रिचन धर्मातील जी धर्मिक मूल्ये होती ती मात्र स्वीकारली नव्हती. उलटपक्षी तो स्वत:चे असे खास असे राजकीय हक्क उपभोगीत होता. असे असले तरी चर्च या तत्त्वाखाली मात्र त्याला सार्वत्रिक जीवनात सन्मानाचे स्थान होते. त्यामुळे चर्च ही एक सरंजामदारी व्यवस्था बनली होती. याचा परिणाम म्हणून पोपने स्वतःची धार्मिक जबाबदारी सोडली होती. पोप आणि त्याचे धार्मिक साथीदार चैन-विलासी जीवन जगत होते.शिवाय देव आणि सामान्य लोक यातील आपण एक मध्यस्थ असल्याचे सांगून स्वर्गाची दारे ही आपल्या मार्फत लोकांना मिळत असल्याचेही पोप दर्शवू लागला. या त्याच्या भ्रष्ट कृत्याचा काही विद्वानांनी पर्दाफाश केला. पोप अलेक्झांडर सहावा, जुलियस दुसरा व लिओ दहावा हे पोप १५ व्या आणि १६ व्या शतकात झाले. त्यांनी केलेल्या या भ्रष्ट कृत्यांनी चर्च या धर्मिक संस्थांनी लोकांचा विश्वास गमावला या सर्व भूमिकेतून या चळवळीचा उगम झाला.

**२) धर्म आणि राजकारण :** मध्ययुगातील काळात धर्म संस्थेने आपले कार्य बाजूला ठेवून राजकारणात भाग घेण्यास सुरुवात केली. हे पोपचे वर्तन म्हणजे चर्च या कार्याशी विसंगत असे वर्तन होते. पोपने राजकीय भूमिका स्वीकारण्याचे कारण म्हणजे सुरुवातीच्या काळात ज्या राज्यांना पोपची राज्ये असे नाव होते त्याची जबाबदारी धर्म संस्थेकडे आली.नंतर पवित्र रोमन साम्राज्याचा राजकीय वारसा धर्म संस्थेकडे आला. त्यामुळे राज्य-राज्या मधील तंटे मिटविण्यात पोप भाग घेवू लागला. राजकारणातील या सहभागामुळे पोपला अनेक अडचणीना तोंड द्यावे लागले. १३ व्या शतकात पोप बॉनिफेस आठवा याच्या काळात इंग्लंड व फ्रान्समधील राजकीय सत्तांनी चर्चच्या मालमत्तेवर कर आकारण्याचा प्रश्न काढला. तेव्हा पोपने त्याला विरोध केला. पोपने घोषणा पत्राद्वारे

जाहीर केले की, कोणतीही राजसत्ता धर्मिक संस्थेच्या मालमत्तेवर कर आकारू शकत नाही. व असा कर आकारल्यास त्याला धर्म बहिष्कृत केले जाईल. या संघर्षात शेवटी पोपने शरणागती पत्करली.

**३) मध्यम वर्गाचा पाठींबा :** तत्कालीन मध्यम वर्गाने राजकीय व्यवस्थेला पाठीबा दिला. याचे कारण सरळ असे होते की, धर्म संस्था ही भ्रष्ट झाल्याने किवा तिचे बदलते स्वरूप हे धार्मीक कृतीला धरून नव्हते. १४ व्या शतकात पोपच्या सत्तेला आणखी एक हादरा फ्रान्स मधील घटनेने बसला. फ्रेंचांनी धर्म संस्थेचे मुख्य स्थान रोमच्या ऐवजी ॲव्हीनॉन येथे प्रतिष्ठापना केली. इ.स. १३०५ ते १३७८ या काळात ॲव्हीनॉन येथील पोपच्या वैभवात कमतरता पडली नाही. त्यामुळे पोपवर फ्रेच व त्यांची प्रभावळ याचे वर्चस्व निर्माण झाले. या काळात इंग्लंडने पोपला पैसा का पुरवावा असे फ्रेंच विरोधी लोक बोलू लागले. तसेच फ्रेंच पोपचे वर्चस्व इतर राज्यांनी का मान्य करावा असाही प्रश्न निर्माण झाल्यावर पोपच्या सत्तेला युरोपमध्ये मर्यादा घालण्यात आल्या. या राजकीय धोरणाला नव्या मध्यम वर्गाचा पाठीबा मिळाला.

**४) प्रबोधन चळवळ :** मध्ययुगातील युरोपला आधुनिक तात्विक पाया देणारा कालखंड म्हणजे प्रबोधनाचा कालखंड होय. या प्रबोधनाची सुरुवात इटली देशातील उत्तरेकडील फ्लोरेंस हे शहर होय. १३ व्या व १४ व्या शतकात साहित्य, कला, वाङःमय, संगीत, मुद्रण कला, रंगभूमी, नाटके या अभिजात कला नावारूपाला आल्या. तसेच याकाळात नव शास्त्रीय दृष्टिकोनामध्ये भूगोल, खगोल, गणित, वैद्यक, पदार्थ विज्ञान या शास्त्रात ही आघाडी घेतली होती.याचा परिणाम युरोपातील देशांवर झाला. उदाहरणार्थ फ्रान्सच्या पहिल्या फ्रान्सिस या राजाने इटलीतील नव्यविद्या प्रचारकांना आपल्या देशात पाचारण करून फ्रेंच लोकांना या काळाची ओळख करून दिली. त्याचे अनुकरण इतर देशातही होऊ लागले. इंग्लंड, स्पेन, पोलंड, डेन्मार्क येथील सत्ताधिशांनी हे अनुकरण केले. याचाही एक परिणाम युरोपातील लोकांच्या विचारसरणीवर झाला होता.

**५) वैचारिक ज्ञानाचा उगम :** प्रबोधन चळवळीचा एक मोठा परिणाम समाजावर झाला होता ती म्हणजे चौकशी करण्याची प्रवृत्ती समाजात निर्माण झाली. धार्मीक ज्ञान आणि धर्मगुरूंची वर्तने यावर चर्चा होऊ लागली. बायबलच्या तत्वाने धर्म संस्था कार्य करीत नसल्याचे समाजाच्या निदर्शनास आले. प्रबोधनाच्या काळात अनेक लेखनकर्त्यांनी आपली भूमिका योग्य बजावली. विल्यम ओक्हम (१२८५-१३४९) जॉन वायक्लीफ (१३३०-१३८४) इरॅस्मस (१४६६-१५३६) जॉन हस (१३६९-१४१५) या काळात यांनी तत्कालीन धर्मव्यवस्थेवर कठोर टीका करणारे लिखाण केले. त्यामुळे वैचारिक ज्ञानाची चर्चा होऊ लागली. योग्य आणि अयोग्य यातील भेद कसा करावा हे समाजाच्या निदर्शनास आले त्यातून समाजाची मानसिकता चौकस बनली.

**६) धर्म संस्थेतील भ्रष्टाचार :** धर्म सुधारणा ही चळवळ सुरु होण्याचे आणखी एक कारण म्हणजे धर्म संस्थेतील भ्रष्टाचार होय. इ.स. १४९२ ते १५०६ या काळातील पोप अलेक्झांडर सहावा हा नैतिक दृष्ट्या भ्रष्ट बनला होता. इ. स. १५१३ ते १५२१ या काळातील पोप दहावा लुई या अनेक लोकांकडून जबरदस्तीने सेंट पीटरच्या मंदिरासाठी पैसा गोळा केला. धर्म संस्थेत अनेक अधिकारपदे निर्माण करून त्या पदांची विक्री केली. पैसा मिळविण्यासाठी त्याने चर्चकडे असणारे दागिने व येशूच्या दहा शिष्यांचे पुतळे गहाण ठेवले. पोप ते चर्चच्या कनिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचार वाढला होता. तत्कालीन सरदार वर्गासारखे चैन-विलासी जीवन हे लोक जगत होते. चर्चला पैसा हा तत्कालीन मध्यम वर्गाकडून पुरविला जात होता. हे चित्र मध्यम वर्गाच्या लक्षात आले व त्यांनी या कृत्याला विरोध केला. वैचारिक प्रगतीमुळे अनेक रुढी, परंपरा व संकेत नष्ट होत होते. तर रुढी व परंपरा

यावर धर्म संस्थेचे अस्तित्व अवलंबून होते. या सर्वाला एक प्रकारचे आव्हान मिळत गेले. त्यामुळे धर्मिक सुधारणा चळवळीला बळ मिळाले.

### १.२.३ प्रोटेस्टंट पंथानी स्वीकारलेली तत्वे

परंपरागत रोमन कॅथोलिक चर्चने दिलेली शिकवण ही एका विशिष्ट कर्मकांडावर आधारित असल्याने समाजावर याचा एक प्रकारचा पगडा होता. तो महत्वाचा बदल समाजात करण्यासाठी सुधारणावादी चळवळीचे नवे तत्व आणणे गरजेचे होते. त्यामध्ये कांही प्रमाणात बुद्धीप्रामाण्यवादी भूमिका स्वीकारल्या होत्या. या नव्या पंथांची एक धारणा होती कि, रोमन कॅथोलिक चर्चने दिलेली शिकवण बायबल नुसार नव्हती. तसेच ती शिकवण धार्मिक तत्वाच्या विरोधी अशी आहे असा विश्वास होता.

**१) मूर्तीपूजेला नकार :** रोमन कॅथोलिक पंथ हा मूर्तिपूजक होता. हा एकप्रकारे कर्मकांडाचा प्रकार असल्याने प्रोटेस्टंट पंथीयांनी त्यास विरोध करत मूर्तीपूजा ही निषिद्ध ठरवली. त्यामार्गाने मानवाला कोणताही लाभ होत नसून देव आणि सामान्य मानव यातील मध्यस्थ म्हणून अशा धर्मगुरुंचे स्तोम वाढते यावर प्रोटेस्टंट पंथीयांनी उपाय म्हणून मूर्तीपूजा नाकारली.

**२) विश्वास या संकल्पनेचा अर्थ :** रोमन कॅथोलिक चर्चचा अधिपती पोप याच्या सत्तेला आव्हान देण्यासाठी विश्वास या संकल्पनेचा वेगळा अर्थ या सुधारणावादी पंथाने दिलेला होता.

दिलेली शिकवण ही विश्वास या संकल्पनेपेक्षा वेगळी होती. त्यांनी बायबलच्या शिकवणीची मांडणी करताना सत्कृत्य हे मानवी जीवनात महत्वाचे असून त्यामुळेच देव आणि सार्वकालिक जीवन मिळू शकते असे म्हंटले होते. प्रोटेस्टंट चळवळ मात्र याची मांडणी वेगळ्या पद्धतीने करते. त्यांच्या मते विश्वास हा अत्यंत आवश्यक आहे. सर्वकालीक जीवन हे केवळ येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवल्याने मिळते त्यामुळे विश्वास हा धर्माचा पाया आहे. त्याची ही शिकवण म्हणजे रोमन कॅथॉलिक धर्मगुरूंना एकप्रकारचे आव्हान होते.

**३) नव्या मुल्यांची मांडणी :** दया किंवा करुणा या नव्या मुल्यांची मांडणी या तत्वात केली गेली. मानवाच्या जीवनात बायबलच्या वचनानुसार दया व करुणा ही धर्माचा मुख्य गाभा असून ही मुल्ये अथवा महत्वाची तत्वे रोमन कॅथोलिक चर्चने स्वीकारलेले नव्हते. त्यामुळे चर्चने विश्वसनीय चर्च हा विश्वास गमावला आहे. अशी मांडणी केली गेली.

**४) बायबलचे मत हे सर्वश्रेष्ठ :** तत्कालीन काळात रोमन कॅथोलिक पंथाने वेगळी शिकवर दिली असून त्या धर्मग्रंथाचा अन्वयार्थ त्यांच्या सोयीनुसार लावला होता. बायबलची शिकवण प्रोटेस्टंट चळवळच्या मतानुसार बायबल मधील संहिता ही धर्माची खरी ओळख करू देते. बायबल हे त्यामधील सर्व संहितेचा अन्वयार्थ सांगते. त्यामुळे तो धर्मग्रंथ म्हणजे अन्वयार्थाबाबत अंतिम सत्ता आहे. या सर्वांचा स्वीकार असणे आवश्यक असल्याचे मानले गेले.

**५) येशू ख्रिस्ताचे स्थान सर्वश्रेष्ठ :** पोपच्या मतानुसार पापमुक्त होण्यासाठी त्याची मदत अथवा परवानगी घेणे आवश्यक होते. परंतु प्रोटेस्टंट चळवळच्या मतानुसार मात्र मानवाला पापमुक्त होण्यासाठी फक्त देव आणि त्याचा पुत्र येशू याची मदत लागते. या धर्मसुधारकांच्या मते पापमुक्त होण्यासाठी केवळ विश्वास हा आवश्यक

आहे. हा विश्वास कोणत्याही बाह्यशक्ती पासून मिळत नसून तो फक्त येशू ख्रिस्तापासून मिळू शकतो. त्यामुळे या धर्मातील येशू ख्रिस्ताचे स्थान सर्वश्रेष्ठ असे आहे.

**६) मध्यस्थाला नकार :** या व्यवस्थेला नकार देण्यासाठी देव आणि मानव यामधील मध्यस्थ असलेला धर्मगुरू याला मार्टीन लुथर याने नकार दिला.त्याने प्रगटपणे असे जाहीर केले की, आराधना करणे म्हणजे सरळपणे देवाशी संवाद साधने असे आहे. आराधना करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला देव ताबडतोब क्षमा व दया देतो. मार्टीन लुथर याने असे जाहीर केले की, बाप्तिस्मा केलेल्या कोणत्याही ख्रिश्चन व्यक्तीकडे पोप, बिशप व धर्मगुरू यांच्याकडे असणारी ताकद असते. त्यामधून एक गोष्ट त्याने सिद्ध केली ती म्हणजे व्यक्तिगत पातळीवर कोणताही व्यक्ती हा धर्मगुरू असतो. व तो देवाशी कोणत्याही मध्यस्थाशिवाय सरळपणे संवाद साधू शकतो.

**७) धर्मगुरूंच्या एकाधिकारशाहीला विरोध :** रोमन कॅथॉलिक पंथाने ख्रिचन धर्मामध्ये एकूण सात विधीला मान्यता दिली होती. त्याला सुधारणावाद्यांनी विरोध करून त्यातील विधीलाच मान्यता दिली. त्यांनी पुरस्कृत केले दोन विधी म्हणजे बाप्तिस्मा आणि प्रभूभोजन होय. मूळ बायबलमधील या दोन्ही विधीचा अर्थ चुकीचा लावला असून या विधीचा अधिकार फक्त रोमन कॅथोलिक धर्मगुरूला दिला गेला हे चुकीचे असून हे विधी करण्याचा अधिकार सर्वसामान्य लोकांना आहे अशी मांडणी प्रोटेस्टंट पंथाने केली.

**८) बुद्धीप्रामाण्यवादाला आधार :** प्रोटेस्टंट चळवळीच्या मतानुसार शुद्ध धर्म हा बुद्धिप्रामाण्यवादी असला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.ज्या बाबी बुद्धीप्रामाण्याला पटत नाहीत त्या बाबींचा स्वीकार करू नये. असे झाल्यास धर्म ही बाब तत्त्वहीन होण्याची शक्यता असते. प्रभूभोजन, स्वकेंद्रितपणा किंवा साधू संताच्या पूजा अर्चा हे एक प्रकारचे ढोंग असून त्यामुळे आत्म्याला शांती व सार्वकालिक जीवन प्राप्त होऊ शकत नाही.

**९) राष्ट्रीय प्रोटेस्टंट चर्चची स्थापना :** ख्रिश्चन धर्माचा प्रमुख म्हणून पोपचे स्थान सर्वोच्च होते. याची सत्ता सर्व राष्ट्रातील चर्चवर अबाधित होती. त्याच्या या सर्वोच्च स्थानाला प्रोटेस्टंट पंथाने विरोध केला. त्यासाठी जिथे प्रोटेस्टंट पंथाने यश प्राप्त केले आहे त्या भागात राष्ट्रीय चर्च निर्माण करावीत व ते चर्च स्वयंशासीत व रोमपासून मुक्त असावीत असे विचार मांडले.यासाठी पोपला सर्व अधिकारापासून बाजूला करावे अशी मागणी राजाकडे मार्टीन ल्युथरने केली होती.

### १.२.४ मार्टीन ल्युथरचे कार्य (१४८३ ते १५४३)

**पार्श्वभूमी :** जर्मनीमधील धर्मसुधारणा चळवळीचा प्रणेता व प्रोटेस्टंट जन्मपंथाचा संस्थापक म्हणून मार्टीन ल्युथरला ओळखले जाते. एलीस्बनमध्ये १० नोव्हेबर १४८३ मध्ये त्याचा झाला. शिक्षण एरफर्ड विद्यापीठात झाले. प्रारंभीच्या काळात तो इ.स. १५०८ मध्ये धर्मप्रचारक झाला. धर्मप्रचाराच्या निमित्ताने तो रोम येथे नोव्हेबर १५१० मध्ये गेले त्यावेळी तेथील धर्मोपदेशकांचे चैन विलासी जीवन पाहून जोराचा धक्का बसला. इ.स. १५१२ मध्ये त्याने विटेनबर्ग विद्यापीठातून धर्मशास्त्राची पदवी घेतली. त्याच विद्यापीठात त्याने धर्मशास्त्राचा प्राध्यापक म्हणून आपल्या कार्याला सुरुवात केली. त्यानंतर चर्चमधील वाईट प्रथांच्या विरोधात आपले कार्य अगदी पद्धतशीर सुरु केले.

**मार्टिन ल्युथरचे लेखन आणि कार्य :** मार्टिन ल्युथर यांनी आपले कार्य करताना ग्रंथ लेखन ग्रंथ भाषांतर, काही पत्ररूपाने लेखन केले होते. ख्रिश्चन लोकांचे धर्मस्वातंत्र्य, स्मॉल कॅथेसीम, पाप मुक्त दाखले, पंच्यान्नव

प्रश्नांची यादी  अशा लेखनातून प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान दिले होते मार्टीन ल्युथरचे नेतृत्व लेखणी आणि प्रगत वैचारिकता यावर आधारलेले होते. त्याच्या लेखनाचा साधार आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

त्यांनी एकूण तीन ग्रंथ लिहिले. त्यातील पहिला ग्रंथ हा सर्वसामान्य लोकांना उद्देशून होता. त्यामध्ये सर्वसामान्य लोकांनी पुढाकार घेवून धार्मीक संस्थामध्ये सुधारणा केली पाहिजे हे तत्व सांगणारा होता. त्याचा दुसरा ग्रंथ लॅटिन भाषेत असून तो धर्मिक तत्ववेते यांना उद्देशून लिहिला होता.तर तिसरा ग्रंथ हा पोपला उद्देशून लिहिलेल्या पत्र रुपाने होता. तो ग्रंथ म्हणजे ख्रिश्चन लोकांचे धर्मस्वातंत्र्य हे तत्व सांगणारा होता. ख्रिश्चन धर्मातील अनिष्ट प्रथा ज्या पोपने सुरु केल्या होत्या त्यावर त्याने कठोर टीका  केली. मनुष्य आणि देव यामध्ये दलालाची आवशकता नाही. रोम हे अनाचाराचे मूळ आहे. पोप हा ख्रिस्ताचा शत्रू आहे. धर्मगुरूंनी ब्रम्हचारी राहण्याचे ढोंग करू नये.

मार्टीन ल्युथरने इ.स. १५१७ साली पाप मुक्तीच्या दाखल्याबाबतचे म्हणणे प्रसिद्ध केले. व त्याची एक प्रत विटेनबर्ग येथील चर्चच्या दारावर लावली. त्याला सुरुवातीच्या काळात कोणी दाद दिली नाही म्हणून त्याने हे लिखाण जर्मन भाषेत लिहून प्रसिद्ध केले. त्यावेळी मात्र जर्मन मध्ये खळबळ उडाली. धर्मसंस्थेने या आरोपाला उत्तर देण्यासाठी एकनावाच्या एक विद्वान पंडिताला पाठविले. या दोघांचा वादविवाद जाहीररीत्या लायपझिंग येथे झाला. त्यावेळी ल्युथरला स्वतःच्या अपुऱ्या ज्ञानाची जाणीव झाली. त्याने दोन वर्षे धर्मसंस्थेच्या इतिहासाचा व तत्वज्ञानाच्या अभ्यास करून पुन्हा पोपच्या सत्तेला आव्हान दिले.

मार्टीन ल्यूथर यांनी आपल्या कार्याची सुरुवात करताना तत्कालीन पोप लिओ दहावा याला प्रथम विरोध केला. त्या पोपने जॉन टेटझाल याला चर्चची मालमत्ता विकण्यासाठी जर्मनी या देशात पाठविले. कारण त्याला रोममधील सेंट पीटर याच्या मंदिराचे नूतनीकरण करण्यासाठी पैसा आवश्यक होता. मार्टीन ल्युथरने याला विरोध केला.मार्टीन ल्युथरने पंच्यान्नव प्रश्नांची एक यादी चर्चच्या दारावर लावली.त्याबद्दल मार्टीन ल्युथरला पोपने इ.स. १५२१ मध्ये धर्मबहिष्कृततेची शिक्षा दिली. त्या शिक्षेचे फर्मान त्याने जाहीरपणे लोकांसमोर जाळून टाकले.

पोपने चार्ल्स पाचवा या राजाला मार्टीन ल्यूथरला चर्चच्या विरोधातील लिखाणाबद्दल शिक्षा करण्याचे आवाहन केले. परंतु या राजानेमार्टीन ल्युथरला पाठीबा दिला. इ.स.१५२१ मध्ये मुख्य राजकीय सभेने मार्टिनला दोषी ठरविले पण शिक्षा होण्याच्या अगोदरच त्याच्या मित्रांनी त्याला विटेनबर्गच्या किल्ल्यात हलविले.

मार्टीन ल्युथरने बायबलमधील नवीन करार या भागाचे ग्रीक भाषेतून जर्मन भाषेत भाषांतर केले होते.  इ.स. १५२९ मध्ये त्याने लोकप्रिय स्मॉल कॅथेसीम  हे पुस्तक लिहिले. आणि अशा प्रकारे त्याच्या मृत्यूपर्यंत म्हणजे इ.स. १५२९ पर्यंत तो या चळवळीचे नेतृत्व करीत राहिला.ल्युथरचा उल्लेख प्रोटेस्टंट पंथियांचा पोप असाही केला गेला. त्यांनी आपली तत्वज्ञान मांडणी करताना प्रामुख्याने विश्वास, दया आणि बायबल हे अंतिम आहे, या तीन तत्वांचा उल्लेख केला होता. त्यामध्ये एक तत्व आणखी सांगण्यात आले ते म्हणजे येशू ख्रिस्त हा सर्वश्रेष्ठ असल्याचा उल्लेख केला होता.

जर्मनमधील राजे हे मार्टीनला पाठींबा देण्याचे कारण म्हणजे त्यांना यादवी युद्ध हवे होते व सरदारांना धार्मीक संस्थांची बंधने झुगारून द्यायची होती.याचवेळी आर्थिक पिळवणुकीच्या विरोधात शेतकऱ्यांनी सरदार वर्गाविरोधात उठाव केला मार्टीन ल्युथर –हा जरी प्रागतिक विचाराचा असला तरी त्यान इ.स. १५२५ मध्ये शेतकऱ्यांनी

केलेल्या उठावात राजा व सरदार लोकांचा पक्ष घेतला. त्याने शेतकऱ्यांचा नायनाट करा असा सल्ला दिला. त्यामध्ये एक लाख शेतकऱ्यांचा बळी गेला.

इ.स. १५२६ मध्ये मुख्य राजकीय सभा बोलावण्यात आली. त्यावेळी जर्मन संस्थानिकांनी हा धार्मिक प्रश्न चर्चेला घेतला. त्यावेळी या सभेने स्वतःचा धर्म स्वीकारण्याची परवानगी दिली. इ.स. १५२९ मध्ये चार्ल्स पाचवा याने ती नाकारली. त्यामुळे यांना प्रोटेस्टंट या नावाने ओळखले जावू लागले.हा प्रकार ऑक्सबर्ग येथील लहान भागात होता. इ.स. १५५५ मध्ये राजाने संस्थानिकांना त्यांचा पंथ स्वीकारण्याची परवानगी दिली.

**१.२.५ सुधारणावादी चळवळीचे परिणाम**

जर्मनमधील धार्मिक सुधारणावादी चळवळीचा प्रभाव सर्व युरोप खंडावर पडला. त्यामुळे सामाजिक व धार्मिक जीवनमूल्ये बदलण्यास प्रारंभ झाला.राज्यव्यवस्था व धर्मव्यवस्था यात मुलभूत बदल घडले. पोप आणि चर्च याकडे पाहण्याचा लोकांना नवा दृष्टीकोन प्राप्त झाला. युरोपातील प्रमुख देश म्हणजे इंग्लंड, स्विझर्लंड जर्मनी,फ्रान्स या देशात काही धर्मविषयक चळवळी झाल्या.

**१) फ्रान्स :**

फ्रान्समधील प्रोटेस्टंट पंथाचा एक महत्वाचा विचारवंत म्हणून जॉन कॅलव्हीन (१५०९ ते १५६४) याचा उल्लेख करावा लागतो. त्याने मानवता आणि विधी याचे शिक्षण पॅरीस येथील विद्यापीठात घेतले होते. १५३२ मध्ये विधी शाखेतून पी.एच.डी. पदवी संपादन केली होती. त्याची मुख्य शिकवण म्हणजे बायबल हे अंतिम असून विश्वास आणि पाप विमोचन हे बायबलमुळे मिळू शकते. त्याने देवाची शक्ती व खरे ज्ञान या तत्वाचा स्वीकार केला होता. त्याने धर्मिक तत्वाबाबत अधिक विवेचन करणारा ‘दि इन्स्टिटयूट ऑफ ख्रिश्चन रिलीजन’ हा ग्रंथ लिहिला. तो जिनिव्हा येथील चर्चचा प्रमुख झाला. त्याने चर्चा द्वारा शिक्षण प्रसारासाठी अनेक शाळा स्थापन केल्या. तसेच जिनिव्हा येथील विद्यापीठाची स्थापना केली. या तत्वाचा स्वीकार युरोपातील अनेक लोकांनी केला. त्यामुळे या पंथास कॅलव्हीनीझम असे म्हणतात. जॉन कॅलव्हीन याने बायबलचा अभ्यास, त्यातील वचनाप्रमाणे वर्तन, आणि श्रद्धेने मुक्ती या महत्वाच्या तत्वाचा प्रचार केला. कॅलव्हीनीझम पंथियांना उत्सव- समारंभ आणि खेळ-नाच याचे वावडे होते. नैतिक दृष्ट्या ते लोक अत्यंत कर्मठ मताचे होते. त्यांच्या मताचा हॉलंड, बेल्जियम, पोलंड, हंगेरी या देशात प्रभाव होता.

**२) स्विझर्लंड मधील चळवळ :**

मार्टीन ल्युथर -यांच्या चळवळीचा एक परिणाम म्हणून स्विझर्लंडही या चळवळीचे पडसाद पडले होते. झ्विगली याचा कालखंड इ.स. १४८३ ते १५३१ असा होता. त्याने धर्मसंस्थेला केलेला विरोध जरी राजकीय असला तरी धर्मप्रचारकांचे ब्रह्मचर्य, धार्मीक विभूतींचे चालू असलेले पुजन या अनिष्ट प्रथांना विरोध केला. त्याने यासाठी एक प्रचाराची सुरुवात केली त्यामुळे त्याला विरोधही झाला. त्यात झालेल्या यादवी युद्धात तो इ.स. १५३१ मध्ये मारला गेला.

**३) इंग्लंडवरील परिणाम :**

धर्मसुधारणा चळवळ कालखंडात जे विविध पंथ निर्माण झाले त्यातील इंग्लंडमध्ये या पंथाचा उदय झाला. हा पंथ ल्युथर किंवा कॅलव्हीन यांच्यापेक्षा सनातनी होता त्याच्याप्रमाणे तो कडवा राष्ट्रवादी होता. प्रारंभीच्या

काळात हा पंथ रोमचे वर्चस्व मान्य करीत असला तरी सोळाव्या शतकापासून या पंथाने हे वर्चस्व झटकून मुक्तता मिळवली होती. इंग्लंडमध्ये इ.स. १४८५ मध्ये ट्युडर घराणे सत्तेवर आले आणि राष्ट्रवादी भावनेला अधिक चालना मिळाली. इंग्लंडमधील राजघराण्याचा धर्मसंस्थेशी संघर्ष तसा सातव्या हेन्रीच्या काळापासून सुरुवात झाला होता. त्याने या लढ्यात लोकांचा पाठींबा मिळवला होता. पण आठव्या हेन्रीच्या काळात मात्र अधिक संघर्ष झाल्याचे दिसते. हा संघर्ष आठव्या हेन्रीच्या विवाहसंबंधातून झाला होता. त्याच्या घटस्फोटाला धर्मसंस्थेने विरोध करून राणीची बाजू उचलली. त्यावेळी आठव्या हेन्रीने धर्मसंस्था विरोधकांचा पाठींबा मिळविला व शह दिला. या संघर्षात इंग्लंडच्या पार्लमेंटची भूमिका महत्वाची ठरली. त्यांनी पोपला देण्यात येणारी वार्षिक देणगी बंद केली आणि इंग्लंडमध्ये धर्मप्रचारक नेमण्याचे अधिकार आठव्या हेन्रीला दिले.

पार्लमेंटने इ.स. १५३४ मध्ये एक ठराव केला. त्या ठरावानुसार इंग्लंडचा राजा हा जगातील इंग्लंडच्या चर्चचा प्रमुख असेल असे जाहीर केले. धर्मक्षेत्रातील या राजाचे वर्चस्व कोणी नाकारल्यास त्याला देशद्रोही समजण्यात येईल असे जाहीर केले. दुसरा एक ठराव इ.स. १५३९ मध्ये केला या ठरावानुसार त्यांनी रोमन कॅथॉलिक धर्म सूत्रावरून इंग्लंडच्या चर्चची सहा कलमे तयार केलीत. सहाव्या एडवर्डच्या काळात इंग्लंडचे चर्च हे प्रोटेस्टंट झाले. चर्चमध्ये म्हणावयाची स्तोत्रे ही इंग्रजीत भाषांतरित केलीत पण त्यातून रोमन कॅथॉलिक पंथाचे असणारे धर्मिक विधीचा उल्लेख मात्र गाळण्यात आला. इ.स. १५५३ मध्ये सत्तेवर आलेली राणी मेरी किंवा त्यानंतर सत्तेवर आलेली राणी एलिझाबेथ यांच्या काळापर्यंत अँग्लीकन पंथ मजबूत बनला होता. राणी एलिझाबेथ हिने तर स्वतःला सुप्रीम गव्हर्नर हा हुद्दा घेतला. याच काळात अँग्लीकन चर्चची सूत्रे ३९ कलमात केली. त्यामध्ये धार्मीक सत्यासाठी बायबलला प्रमाण मानणे, रोमन कॅथोलिक पंथाचा त्याग करणे व श्रद्धेने मुक्ती या तत्वावर विश्वास ठेवणे अशी कलमे यात घालण्यात आली.

### ३) स्पेनमधील सोसायटी ऑफ जीझसचा उदय

प्रोटेस्टंट पंथाच्या विचारांना युरोपातील अनेक देशात चालना मिळत असताना या चळवळीला धर्मिक आव्हान म्हणून 'सोसायटी ऑफ जीझस' या संघटनाची स्थापना झाली. ही स्थापन होण्यामागची कारणे म्हणजे रोमन कॅथोलिक पंथाला आपल्या अस्तित्वाची भीती वाटू लागली. त्यामुळे प्रोटेस्टंट पंथाच्या विचारांना पायबंद घालण्यासाठी या संस्थेची स्थापन झाली.

इग्नेशीयस लोयालो (इ.स. १४९१ ते १५५६) हा या संस्थेचा संथापक होता. तो स्पेनच्या लष्करात सैनिक होता व युद्धात त्याचे पाय त्याने गमावले होते. त्यानंतर त्याने रोमन कॅथॉलिक चर्चसाठी कार्य करण्याचा निश्चय केला. इ.स. १५३४ मध्ये त्याने 'सोसायटी ऑफ जीझस' या संस्थेची स्थापना केली व त्याने 'स्पिरिच्युअल एक्सरसाइज' हा ग्रंथ लिहिला. त्याचे रोमन कॅथोलिक चर्चचे गेलेले वैभव पुन्हा प्राप्त करणे हे या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. या संस्थेच्या सभासदांना जेसुइट असे म्हंटले जात होते. लोयालोने थोड्या अवधीत चांगले नाव कमावले. या संस्थेने जगातील अनेक भागात शाळा आणि कॉलेज काढलीत. मिशनरी कामात त्यांनी चांगली प्रगती केली. त्याचबरोबर ते पोप आणि रोमन कॅथोलिक चर्च याच्याबरोबर एकनिष्ठ राहिलेत. इटलीमधील ट्रेंट शहरातील या संस्थेच्या परिषदेने चर्चला अनेक उपाय सुचविले होते. अति झगमगाटात राहणाऱ्या धर्मगुरूनां सेवेपासून काढा व त्यांनी ब्रम्हचर्याचे पालन करावे अशी सक्ती करावी, चर्चच्या मालमत्ता व कार्यालये याची विक्रीची प्रथा पूर्णपणे बंद करावीतसेच धर्मगुरूंनी आपले कर्तव्य अत्यंत शिस्तबद्ध करावे, पोपच्या नेतृत्वाखाली

धार्मिक न्यायालये निर्माण करावीत अशी मागणी केली. चर्चने काही आक्षेपार्ह ग्रंथाची यादी करावी व ती वाचण्यास बंदी घालावी. 'धर्मसमीक्षण सभेची' प्रथा पुन्हा सुरु करून चर्चच्या विरोधातील लोकांना अत्यंत क्रूर अशी जिवंत जाळण्याची शिक्षा पुन्हा सुरु करावी.

प्रोटेस्टंट तत्त्वज्ञानाच्या विरोधात निर्माण झालेल्या या संस्थेला आपली भूमिका आणि तत्वे प्रसारित करण्यात यश प्राप्त झाले. दक्षिण जर्मनी, फ्रांस, पोलंड, स्वीस मधील काही भाग या प्रदेशात रोमन कॅथोलिक पंथावर विश्वास निर्माण झाला.

**४) धार्मिक युद्धे आणि छळवाद :**

या चळवळीने काही सुधारणा केल्या असल्या तरी ख्रिश्चन धर्मात मात्र दोन गट निर्माण झाले. त्यातील एक प्रोटेस्टंट तर दुसरा रोमन कॅथोलिक. या दोन पंथामध्ये पुन्हा वाद निर्माण होऊन धार्मीक छळ सुरु झाले. तसेच युरोपातील काही देशात व जर्मनी यामध्ये युद्धे झाली.

**५) मुक्त विचारांना चालना मिळाली :**

प्रोटेस्टंट चळवळीने बायबल वाचण्यासाठी सर्वाना प्रोत्साहन दिले. तसेच बायबलचा मतितार्थ जाणून अन्वयार्थही काढण्याची परवानगी दिली. याचा परिणाम असा झाला की, समाजाच्या मुक्त विचारांना चालना मिळाली. या मुक्त विचारांची निर्मिती होऊन कला,साहित्य व विज्ञान या क्षेत्रात मोठी प्रगती झाली.

**६) राष्ट्रीय चर्चची कामगिरी :**

राष्ट्रीय चर्चने लोकशाही आणि राष्ट्रवाद या दोन घटकामध्ये वाढ झाली. काही राष्ट्रातील चर्चमध्ये ही गोष्ट अनुसरली गेली त्यामुळे पोपची जागा राष्ट्रीय चर्चने घेतली.

**७) नैतिकवादी तत्वांचा स्वीकार :**

प्रोटेस्टंट व कॅथोलिक या दोन्ही पंथांनी चर्चच्या सात्विकपणावर भर दिला. त्यामुळे अत्यंत नैतिकवादी तत्वांचा स्वीकार करून सुधारणा केल्या गेल्या. विशेषतः कॅथोलिक पंथाने सामाजिक बाबतीत आपली भूमिका अधिक सुधारित केली.

## १.३ समारोप :

सुधारणावादी चळवळ हा एक अत्यंत महत्वाचा टप्पा असून युरोपच्या नव्हे तर जागतिक इतिहासात या चळवळीने परिवर्तन घडविले आहे. मानवाच्या जीवनात प्रश्न विचारणे आणि चिकित्सा करणे हे मुलभूत आणि निसर्गतः अधिकार आहेत हे या चळवळीने सिद्ध केले. त्यामुळे मुलभूत हक्कांच्या जाणीवा तयार करण्यास या चळवळीने खूप मोठा हातभार लावलेला होता. युरोपच्या इतिहासात प्रबोधनपूर्व कालखंड हा अंधकार युगाचा कालखंड होता. प्रबोधन चळवळीने मानवाच्या जीवनाची दिशा बदलली आणि एका नवीन युगाचा प्रारंभ झाला. मार्टीन ल्युथरची भूमिका युरोपातील विचारसरणी बदलण्यास कारणीभूत ठरली. प्रबोधनाच्या चळवळीने लोकांची दृष्टी बदलली आणि त्यानंतर काही सुधारकांनी धर्म या घटकातील चुकीच्या बाबी लोकांच्या नजरेस आणून दिल्या. धार्मीक बाबींची समीक्षा करणे आणि त्या बाबीवर  बोलणे व लिहिणे हा अक्षम्य गुन्हा पोपने ठरवली.

त्यासाठी जिवंत जाळणे, धर्म बहिष्कृत करणे अशा शिक्षा दिल्या जात होत्या. त्या शिक्षा तत्कालीन समाजात मान्यही केल्या जात असल्याने असे धाडस धर्मसत्ताही करत होती.

मार्टीन ल्युथर यांनी तत्कालीन धर्मसत्तेविरोधात बंड केले आणि प्रोटेस्टंट पंथाची स्थापना केली. मार्टीन ल्युथर यांनी केलेले सुधारणावादी प्रयत्न त्यांनी मांडलेल्या प्रोटेस्टंट पंथाच्या तत्वात आढळतात. ही चळवळ ज्या तत्वावर आधारित होती ती तत्वे महत्वाची होती. ही चळवळ अनेक कारणातून घडली असली तरी धर्म संस्थेने सामान्य लोकांना खोटी स्वप्ने दाखवून जी लुट केली होती त्याची ही प्रतिक्रिया होती. याचा परिणाम केवळ जर्मनीतच झाला असे नाही तर युरोप खंडातील अनेक देशात प्रोटेस्टंट चळवळ पसरली. या चळवळीने मध्यस्थ नाकारला, त्याचे पडसाद भारतात पडले. मध्यस्थ नको हिच मांडणी महात्मा फुले करत होते. महात्मा फुले हीच मांडणी करीत होते. अर्थात ल्युथर आणि फुले हे समकालीन नव्हते तरीही हे साम्य असलेले दिसते. या चळवळीने ख्रिश्चन धर्मातील तत्वांचे खरे स्वरूप प्रगट होऊन रोमन कॅथोलिक व प्रोटेस्टंट हे दोन भिन्न विचार व त्यावर आधारित दोन पंथ निर्माण झाले व ते जगभर पसरले.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

- **प्रोटेस्टंट :** हा शब्द मुळात लॅटीन भाषेतील असून त्याला प्रोटेस्टंटरी असे म्हंटले आहे. याचा अर्थ साधारण घोषणा असा आहे. इंग्रजीमध्ये त्याचे रुपांतर प्रोटेस्ट असे असून त्याचा अर्थ निषेध करणे असा आहे.
- **पोप:** रोमन कॅथोलिक पंथाचा धर्मगुरू
- **बाप्तिस्मा :** ख्रिश्चन धर्माचे अनुयायी होण्यासाठी केला जाणारा धार्मीक विधी
- **प्रभूभोजन:** येशू ख्रिस्ताने अंतिम समयी आपल्या बारा शिष्यासह भोजन घेतले होते. त्यावेळी त्याने शिष्यांना सांगितले की, माझ्या स्मरणार्थ हे करा. त्यानंतर त्याला वधस्तंभावर खिळले व त्याचा अंत झाला. ख्रिश्चन लोक त्या स्मरणार्थ महिन्याच्या पहिल्या रविवारी चर्चमध्ये पावाचा तुकडा व द्राक्षरस घेतात. ते प्रतीकात्मक दृष्ट्या पाव म्हणजे येशूचे शरीर व द्राक्षरस म्हणजे येशूचे रक्त आहे. हे घेतल्याने पापापासून मुक्ती मिळते अशी एक श्रद्धा आहे. कारण येशू हा आपल्या पापासाठी वधस्तंभावर गेल्याचा विश्वास ख्रिश्चन लोकांना आहे. त्यामुळे या विधीला प्रभूभोजन म्हणतात.
- **प्रबोधन चळवळ :** १३ व्या व १४ व्या शतकात साहित्य, कला, वाङ:मय, संगीत, मुद्रण कला, रंगभूमी, नाटके या अभिजात कला, भूगोल, खगोल, गणित, वैद्यक, पदार्थ विज्ञान या शास्त्रात नवे शोध लागले. या चळवळीची सुरुवात इटली देशातील उत्तरेकडील फ्लोरेंस शहरात झाली होती.

## १.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

अ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) ................ यांनी ख्रिश्चन धर्माची स्थापना केली होती.

अ) मार्टीन ल्यूथर ब) सेंट पीटर क) पोप ड) येशू ख्रिस्त

२) ............. या देशात रोमन कॅथोलिक पंथाचे मुख्य ठिकाण आहे.

अ) इटली ब) जर्मनी क) फ्रांस ड) इंग्लंड

३) ............. साली प्रोटेस्टंट ही संकल्पना अस्तित्वात आली.

अ) १५२९ ब) १५३० क) १५३१ ड) १५३२

४) ............ या चळवळीने विश्वास या तत्वाचे समर्थन केले.

अ) रोमन कॅथोलिक ब) प्रोटेस्टंट क) प्रबोधन ड) कॅलव्हीनीझम

५) ........... या पंथाच्या मताने सर्वप्रथम धर्मातील मध्यस्थाला नकार दिला.

अ) प्रोटेस्टंट ब) कॅलव्हीनीझम क) रोमन कॅथोलिक ड) अँग्लीकन

६) ............ या देशातील जॉन वायल्कीफ हा विचारवंत होता.

अ) जर्मनी ब) इटली क) इंग्लंड ड) फ्रान्स

७) .......... यांनी ख्रिश्चन लोकांचे धर्मस्वातंत्र्य हे तत्व सांगणारा ग्रंथ लिहिला

अ) इरॅस्मस ब) रुचलीन क) जॉन हस ड) मार्टीन ल्युथर –

८) ........... या देशातील, ल्युथरचा समकालीन युलरीच इवीलींग हा होता.

अ) इंग्लंड ब) फ्रान्स क) जर्मनी ड) स्विझर्लंड

९) ........... यांनी दि.एक्लीसिया हा ग्रंथ लिहिला.

अ) इरॅस्मस ब) जॉन हस क) जॉन वायल्कीफ ड) मार्टीन ल्युथर

१०) ........... हे लोकप्रिय पुस्तक मार्टीन ल्युथर यांनी इ.स. मध्ये लिहिले.

अ) स्मॉल कॅथेसीम ब) दि.एक्लीसिया

क) दि. इन्स्टिट्यूट ऑफ ख्रिश्चन रिलीजन ड) स्पिरिच्युअल एक्सरसाइज

११) जॉन कॅलव्हीन हा विचारवंत ------- या देशातील होता.

अ) इंग्लंड ब) फ्रान्स क) इटली ड) रशिया

१२) ............ यांनी दि. इन्स्टिट्यूट ऑफ ख्रिश्चन रिलीजन हा ग्रंथ लिहिला.

अ) इरॅस्मस ब) जॉन हस क) जॉन कॅलव्हीन ड) मार्टीन ल्युथर –

१३) .............या देशात धर्मसंस्थेशी संघर्ष ची सातव्या हेन्रीच्या काळापासून सुरुवात झाली होती.

अ) इंग्लंड ब) फ्रान्स क) इटली ड) रशिया

१४) .............यांनी स्वतःला सुप्रीम गव्हर्नर हा हुद्दा घेतला.

अ)राणी एलिझाबेथ ब) सातवा हेन्री क) इग्नेशीयस लोयालो ड)चार्ल्स पाचवा

१५) ............... हा सोसायटी ऑफ जीझसं या संस्थेचा संस्थापक होता.

अ) मार्टीन ल्युथर ब)जॉन हस क)जॉन कॅलव्हीन ड)इग्नेशीयस लोयालो

**ब) टिपा लिहा**

१) प्रोटेस्टंट संकल्पना व इतिहास

२) प्रोटेस्टंट पंथाची तत्वे

३) प्रोटेस्टंट चळवळीची कारणे

४) प्रबोधन चळवळ

५) जॉन हस

६) मार्टीन ल्युथर

७) प्रोटेस्टंट पंथ

८) युलरीच झ्वीलींग

९) जॉन कॅलव्हीन

१०) इंग्लंडमधील धार्मीक सुधारणा चळवळ

११) इग्नेशीयस लोयालो

१२) धार्मीक सुधारणा चळवळीचे परिणाम

**क) दिर्घोतरी प्रश्न सोडवा**

अ) प्रोटेस्टंट संकल्पना सांगून तत्वे स्पष्ट करा

ब) प्रोटेस्टंट पंथ चळवळीची कारणे स्पष्ट करा.

क) धर्म सुधारणावादी चळवळीची पार्श्वभूमी विशद करा

ड) मार्टीन ल्युथरच्या कार्याची माहिती द्या

इ) मार्टीन ल्यूथरच्या चळवळीचे परिणाम युरोपवर झाले का? चर्चा करा.

ई) धार्मीक सुधारणा चळवळीने कोणती वैचारिक दिशा दिली

## १.६ संदर्भ ग्रंथ :

इंग्रजी

1. Bowker,J,(ed),*The Oxford Dictionary of World Religions*, New York: OxfordUniversity Press, 1997.
2. Barrett, D & Johnson T, 'Annual statistical table on global Mission:2004'. *International Bulletin of Missionary Research*, 28(25) 2004.
3. Barrett, D & Johnson T , 'Global statistics', in Burgess, S.(ed) *New international Dictionary of Pentecostal and Charismatic movements*, Grand Rapids: Zondervan. 2002.
4. Cameron,E. *The European Reformation*. Oxford: Oxford University Press, 1991.
5. Dowley, Tim (Ed.) *Lion handbook, The History of Christianity* Singapore, Lion Publishing Plc. 1996.
6. Gonzalez, J. L. *The Story of the Church, The Reformation to the present*, New York: Harper Collins, 1985.

मराठी

१. मराठे. द. श्री, जगाचा इतिहास, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९५६.

२. सिरसीकर वसंत मंजुनाथ, आधुनिक जगाचा इतिहास, कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे, १९५६.

३. जहागीरदार प्र.ज, काही विचारवंत काही इतिहास, राधेय प्रकाशन नागपूर, १९७८.

❖❖❖

## घटक – २

# औद्योगिक क्रांती (१८ वे शतक)

## (Industrial Revolution 18th Century)

**अनुक्रमणिका :**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ औद्योगिक क्रांतीची कारणे (Causes)

२.२.२ औद्योगिक क्रांतीतील प्रमुख घडामोडी (Major Developments)

२.२.३ औद्योगिक क्रांतीचे परिणाम (Impact)

२.३ पारिभाषिक शब्द,शब्दार्थ

२.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ.

**२.० उद्दिष्ट्ये :**

- औद्योगिक क्रांती म्हणजे काय? अर्थ व स्वरूप सांगता येईल.
- औद्योगिक क्रांतीचा प्रसार व व्याप्ती स्पष्ट करता येईल.
- औद्योगिक क्रांती इंग्लंडमध्येच का झाली ते स्पष्ट करता येईल.
- औद्योगिक क्रांतीची कारणे सांगता येतील.
- औद्योगिक क्रांतीच्या विकासातील विविध टप्पे कोणते होते हे स्पष्ट करता येईल.
- औद्योगिक क्रांतीचे परिणाम स्पष्ट करता येतील.

## २.१ प्रास्तावना :

युरोपच्या इतिहासामधील १८ वे शतक खूपच क्रांतिकारक आणि महत्त्वाचे होते. सन १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ही त्रिसूत्री जगाला दिली. जुलूमशाही, राजेशाही, सामाजिक विषमता, उच्च वर्गीयांकडून होत असलेली पिळवणूक कालबाह्य होत गेली. युरोपमध्ये या घटनांमुळे जुन्या आचार-विचारांना जब्बर धक्का बसला. आधुनिक युगाची चाहूल लागली. युरोपमध्ये याकाळात अतिशय महत्त्वपूर्ण अशा विविध यांत्रिकीशक्तींचा शोध आणि वापर सुरू होऊन औद्योगिक क्रांतीला अनुकूल वातावरण निर्माण झाले. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात व १९ व्या शतकाच्या सुरुवातीपासून पुढे तीन-चार दशके युरोपच्या इतिहासातील विविध वैज्ञानिक शोधांची दशके होती. विविध क्षेत्रातील शोधांच्या परिणाम स्वरूप उत्पादन पद्धतीत जो अमूलाग्र व मूलभूत बदल होत गेला त्यास 'औद्योगिक क्रांती' असे संबोधले जाते. औद्योगिक क्रांतीमुळे युरोपमधील मानवी जीवनात अमूलाग्र स्वरूपाचे बदल घडून आले. मानवी जीवन अधिक सुखकर व गतीमान होण्यास मदत झाली. मध्ययुगीन युरोप ते आधुनिक युरोप यामध्ये औद्योगिक क्रांती हा एक प्रकारचा दुवा होता. औद्योगिक क्रांतीची ही सुरुवात एक निरंतर प्रक्रिया बनली व ती आजही सुरू आहे. औद्योगिक क्षेत्रात झालेली ही क्रांती इंग्लंड व युरोपच्या अर्थव्यवस्थेवर व्यापक, मुलगामी व दीर्घ स्वरूपाचे बदल घडवून आणणारी होती. औद्योगिक क्रांतीच्या अगोदर मालाचे उत्पादन कुटुंबातून केले जात होते. औद्योगिक उत्पादन पद्धतीने ते कारखान्यात होऊ लागले. मानवी शक्तीवर चालणारी यंत्रे यांत्रिक शक्तीवर चालवली जावू लागली. उत्पादन पद्धतीत यामुळे प्रचंड बदल झाला आणि उत्पादनात वाढ झाली. यांत्रिक उत्पादन पद्धतीत मनुष्यबळाची गरज कमी झाली. परिणामी उत्पादन खर्चही कमी झाला. उत्पादनखर्च कमी झाल्याने उत्पादनाचे भावही कमी झाले. वसाहतवादामुळे बाजारपेठांच्या कक्षाही रुंदावत गेल्या व कमी भावाच्या यांत्रिक उत्पादनाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ प्राप्त झाली. व्यापार, शेती, दळणवळण, वाहतुकीची साधने, भांडवल पुरवठा, पतपेढ्या व संदेशवहनाची माध्यमे यांच्यात खूप मोठा बदल झाला. इंग्लंड व युरोपमधील मानवी जीवनात गतिशीलता आणणाऱ्या या औद्योगिक क्रांतीचा कालखंड स्थूल मानाने सन १७६० ते १८५० असा मानला जातो.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ औद्योगिक क्रांतीची कारणे :

### अ) औद्योगिक क्रांती म्हणजे काय?

औद्योगिक क्रांतीची कारणे पाहण्या अगोदर आपण औद्योगिक क्रांती म्हणजे काय? त्याचे स्वरूप काय होते याची चर्चा करणार आहोत. औद्योगिक क्षेत्रात व उत्पादन पद्धतीत सन १७६० ते १८५० या कालखंडात जो बदल घडून आला त्यास 'औद्योगिक क्रांती' असे म्हणतात. युरोपमध्ये झालेल्या या औद्योगिक बदलांना 'क्रांती' म्हणावयाचे का? या संबंधी विचारवंतांच्यामध्ये मतभेद आहेत.'क्रांती' ही संज्ञा किंवा संकल्पना रूढ अर्थाने अल्पावधीत, जलदगतीने व आकस्मिकपणे झालेला बदल या अर्थाने वापरली जाते. की ज्यामध्ये सद्यपरिस्थितीचा संपूर्ण कायापालट किंवा संपूर्ण बदल अपेक्षित/अभिप्रेत असतो. राजकीय क्रांतीच्या परिप्रेक्षातून

जर 'औद्योगिक क्रांती'चा विचार केला तर इंग्लंड अथवा युरोपमधील औद्योगिक बदलाचा कालावधी मोठा व मंदगतीचा असलेला दिसतो. त्यामुळे त्यास 'क्रांती' या अर्थाने संबोधता येणार नाही असे काही विचारवंतांचे मत आहे. परंतु 'क्रांती' या शब्दाचा अर्थ क्रांतीकारक व महत्त्वपूर्ण बदल किंवा परिणाम घडवून आणणारा असा घेतला तर युरोपमधील औद्योगिक क्षेत्रात जो काही बदल घडून आला त्यास 'क्रांती' म्हणता येईल असे काही विचारवंताना वाटते. कारण १८ व्या शतकाच्या मध्यामधील इंग्लंडची आर्थिक परिस्थितीची तुलना करता यामध्ये मूलभूत स्वरूपाचा फरक व बदल झालेला आढळतो. अर्नाल्ड टायन्बी, जेन्हान्स, कार्ल मार्क्स इत्यादी विचारवंतांनी या आर्थिक बदलांना 'क्रांती' असेच संबोधले आहे.

'औद्योगिक क्रांती' म्हणजे भूतकाळाशी असलेले संबंध एकदम नष्ट करून नवीन युगाची सुरवात करणे नसून, दीर्घ काळ चालत आलेली क्रांतीची प्रक्रिया अधिक गतिमान होणे असा आहे. औद्योगिक परिवर्तनाची प्रक्रिया फार जलद होत होती म्हणून 'औद्योगिक क्रांती' ही संज्ञा वापरली जात नसून त्या क्रांतीमुळे निर्माण झालेले बदल हे मूलभूत स्वरूपाचे होते म्हणून त्यास 'क्रांती' ही संज्ञा वापरली जाते असे श्रीमती नौल्स यांचे मत आहे. 'औद्योगिक क्रांती' ही संज्ञा सन १८२० च्या सुमारास लेखकानी वापरण्यास सुरुवात केली. अर्नाल्ड टॉयन्बी यांनी 'औद्योगिक क्रांतीवरील व्याख्याने' यामध्ये ही संज्ञा लोकप्रिय केली. टॉयन्बी यांनी सन १८९४ मध्ये 'दि इंडस्ट्रियल रेव्ह्यूलेशन' हा ग्रंथ लिहिला. १८ व्या शतकात औद्योगिक क्षेत्रात लागलेल्या नवीन शोधांनी मानवी जीवनात जे क्रांतीकारी आणि मूलगामी स्थित्यंतर घडवून आणले ते स्थित्यंतर म्हणजे 'औद्योगिक क्रांती' होय असे मत टॉयन्बी यानी प्रतिपादीत केले. इंग्लंडमध्ये या क्रांतीची सुरुवात सन १७६० पासून झाली असे त्यांनी सांगितले. टॉयन्बी यांचे हे विधान बरीच वर्षे ग्राह्य मानण्यात येत होते. युरोपमधील औद्योगिक क्षेत्रात झालेल्या बदलाना 'क्रांती' म्हणावयाचे किंवा काय? हा जरी वादाचा विषय असला तरी एकूणच क्रांतीमध्ये अतिशय वेगाने होणारा बदल किंवा परिणाम अभिप्रेत असतो. युरोपमधील औद्योगिक क्रांती ही जरी राज्यक्रांतीपेक्षा भिन्न स्वरूपाची असली तरी संपूर्ण जगावर मोठा परिणाम घडवून आणणारी व्यापकता याच्यामध्ये सामावलेली होती. इंग्लंडमध्ये घडून आलेली औद्योगिक क्रांती एखाद्या विशिष्ठ भूभागापूरती मर्यादीत नव्हती. इंग्लंडपासून सुरू झालेली ही क्रांती संपूर्ण जगभर पसरलेली दिसते.

**ब) औद्योगिक क्रांतीचे टप्पे :**

१) पहिला टप्पा: (सन १७५० ते १८५०)

२) दूसरा टप्पा: (सन १८५० ते १९५०)

३) तिसरा टप्पा: (सन १९५० च्यानंतरचा काळ)

**१) पहिला टप्पा: (सन १७५० ते सन १८५०) :**

पहिल्या टप्प्यात औद्योगिक क्रांतीची सुरुवात इंग्लंडमधून झाली. युरोपमधील अनेक देशात या क्रांतीचा प्रसार झाला. इंग्लंड यामध्ये आघाडीवर होते. इंग्लंडबरोबर युरोपमधील इतर देशांनीही इंग्लंडच्या पावलावर पाऊल ठेवत औद्योगिकीकरणाला गती देण्यास हातभार लावला.

**२) दुसरा टप्पा : (सन १८५० ते सन १९५०)**

इंग्लंडने वसाहतवादाच्या माध्यमातून जगातील अनेक भागावर वर्चस्व प्राप्त केले आणि आपल्या वसाहतींची निर्मिती केली. त्याचबरोबर या कालावधीत जगाच्या अनेक कानाकोपऱ्यात युरोपियन देशातील व्यापारी व उद्योजक पोहचले त्यांच्या माध्यमातून औद्योगिक क्रांतीचा जगभरात प्रसार घडून आला.

**३) तिसरा टप्पा: ( सन १९५० च्यानंतरचा काळ)**

औद्योगिकीकरणाची प्रक्रिया आशिया, आफ्रिका व अमेरिकेतील मागासलेल्या देशांमधून सुरु झाली. जगातील अनेक देश पारतंत्र्यातून मुक्त झाले. सर्वांगीण विकास साधण्यासाठी त्यांनी औद्योगिकीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरु केली.

**क) औद्योगिक क्रांतीची कारणे:-**

औद्योगिक क्रांतीचा उदय १८ व्या शतकात इंग्लंडमध्ये झाला. तेथे जे घटक कारणीभूत ठरले, तेच अन्य देशातही कारणीभूत होते. नव नवीन संशोधन, शास्त्रीय व यंत्रसामुग्रीच्या निर्मितीला अनुकूल राजकीय परिस्थिती इंग्लंडमध्ये उपलब्ध होती; त्यामुळे अनेक छोटे-मोठे यांत्रिक शोध इंग्लंडमध्ये लागले. ही अद्यावत यंत्रशक्ती, कामगार, भांडवलदार, कच्चा माल, व्यापारी, बाजारपेठ, दळणवळणाची विकसित साधने इ. प्रमुख घटकांच्या आधारे औद्योगिक क्रांतीची सुरूवात युरोपमध्ये होऊ शकली. औद्योगिक क्रांतीसाठी खालील घटक पूरक ठरलेले दिसतात.

**१) युरोपामधील वैचारिक जागृती :**

युरोपात पंधराव्या शतकापासून अनेक विचारवंतांनी जनतेत वैचारिक जागृतीचे कार्य केले होते. त्यांनी साहित्य, कला, विज्ञान, धर्म अशा सर्व क्षेत्रात प्रबोधन केले. केवळ रूढी प्रथांवर विसंबून न राहता बुद्धिनिष्ठता, विज्ञानाचा व सत्याचा स्विकार करण्याची आवश्यकता सांगितली. अनेक शास्त्रज्ञांनी नवनवीन शोध समाजासमोर आणले. वैज्ञानिक क्षेत्रात घडून आलेल्या शास्त्रीय प्रगतीमुळे औद्योगिक क्रांती काळात तांत्रिक शोध लागणे सुखकर झाले. यातूनच पुढे युरोपमध्ये यंत्रशक्तीचा उदय झाला.

**२) नवीन भौगोलिक शोध :**

सन १४५३ मध्ये तुर्कांनी कॉन्स्टटिनीपोल शहर जिंकले. युरोपियनांच्या व्यापारात मोठा अडथळा निर्माण झाला. नवीन जलमार्गांचा शोध लावणे त्यांना भाग पडले. पोर्तुगीज खलाशी वार्थोलोडायसने इ. स. १४८६ मध्ये आफ्रिकेच्या दक्षिण टोकावरील 'केप ऑफ गूड होप' शोधले. वॉस्को-दी-गामा ह्या दुसऱ्या पोर्तुगीज खलाश्याने सन १४९८ मध्ये भारताचा नवा जलमार्ग शोधला. सन १४९२ मध्ये कोलंबस या स्वित्झर्लंडच्या खलाशाने अमेरिकेचा शोध लावला. पोर्तुगीज खलाशी फर्डिनांड मॅगेलन याने सन १५१९-२२ या काळात 'पृथ्वी प्रदक्षिणा' पूर्ण केली. कॅमन याने होकायंत्राचा शोध लावला. या भौगोलिक शोधामुळे नवीन जलमार्ग कळले, दळणवळणात गतीमानता आली.

**३) व्यापारी व उद्योगपती वर्गाचा उदय :**

युरोपमध्ये १८ व १९ व्या शतकात नवीन औद्योगिक शहरांचा उदय व विकास होत गेला. याच्या माध्यमातून तेथे व्यापारी व उद्योगपतींचा नवीन वर्ग उदयास आला. या नवीन व्यापारी व उद्योगपतींनी त्यांच्याकडील संपत्ती नव्या उद्योगधंद्यात गुंतविली. हा नवीन भांडवलदारवर्ग पुरोगामी होता. यंत्रशक्तीचे स्वागत व स्वीकार करून भांडवलाच्या जोरावर त्यांनी उद्योगधंद्यात प्रगती केली.

**४) नवीन यत्रांचा शोध :**

युरोपातील अनेक संशोधकांनी विभिन्न यंत्रांचे शोध लावले कापड व्यवसायाला उपयुक्त यंत्रे शोधली. बाष्पशक्तीवर चालणारी यंत्रे शोधली. त्या शोधांचा उपयोग रेल्वे इंजिन, जहाज वाहतुकीतील लहान-मोठी साधने तयार करण्यासाठी झाला. मानवी शक्तीची साधने मागे पडली. एक यंत्र अनेक कामगारांचे काम करू लागले.

**औद्योगिक क्रांतीच्या काळातील प्रमुख शोधः**

| **संशोधकाचे नाव** | **लावलेला शोध** | **वर्ष** |
|---|---|---|
| थॉमस सॅव्हरी | बाष्प इंजिन | १६९७ |
| न्यूकॉकॉमेन | अटमॉस केरिफ स्टीम पंप | १७०८ |
| डर्बी | कोळशापासून लोखंड शुद्ध करणे | १७०९ |
| जॉन के | धावता धोटा | १७३३ |
| जॉन स्मिटन | पंप ब्लोअर | १७६० |
| जेम्स हारग्रीव्हज | स्पिनिंग जेनी | १७६७ |
| रिचर्ड आर्कराईट | वॉटर फ्रेम | १७६९ |
| जेम्स वॅट | वाफेचे इंजिन | १७६९ |
| सॅम्युअल क्राम्प्टन | स्पिनिंग म्यूल | १७७६ |
| एडमंड कार्टराईट | पावरलूम | १७८५ |
| एली व्हिटनी | कॉटन जीन | १७९३ |
| व्होल्टा | ओल्टिक मेल | १८०० |
| रॉबर्ट फुल्टन | आगबोट | १८०७ |
| जॉर्ज स्टिफन्सन | रेल्वे इंजिन | १८१४ |
| जॉन मॅकअँडम | पक्या रस्त्याचे तंत्र | १८११ |
| हॅफ्री डेव्ही | कार्बन वायु ओळखणारा दिवा | १८१५ |

| | | |
|---|---|---|
| हेनरी बेसेमोर | शुद्ध पोलाद | १८१६ |
| क्लेंमट | लेथ मशीन | १८२५ |
| ॲम्पीयर | विद्युत चुंबक | १८२० |
| मायकेल फॅरेडे | डायनमा | १८३१ |
| नॅस स्मिथ | स्टीम हॅमर | १८३९ |
| चार्व गुडइयर | रबर व्होल्कनाईज यंत्र | १८३९ |
| मोर्स | टेलिग्राफ | १८३७ |
| रोबक | व्हिट्रिऑईल | १८४६ |
| एलियस हॉव | शिवणयंत्र | १८४६ |

**५) इंग्लंडमधील अनुकूलता :**

औद्योगिक क्रांती प्रथम इंग्लंडमध्ये आली,कारण त्या देशातील खालील घटक अनुकूल ठरले

**१) नैसर्गिक व भौगोलिक अनुकूलता :**

इंग्लंडची नैसर्गिक व भौगोलिक अनुकूलता औद्योगिक क्रांतीस पूरक घटक असलेली दिसते. इंग्लंडच्या तिन्ही बाजूस समुद्र असल्याने जगातील सर्व भुखंडाशी त्यांचा व्यापार चालत होता. इंग्लडमध्ये शेती योग्य व उपजाऊ जमीनीची उपलब्धता नसल्याने तेथील लोक शेतीपेक्षा व्यापारावर अवलंबून होते. इंग्लंडमधील नद्या आकाराने मोठ्या असल्याने अंतर्गत जल वाहतूक सोयीस्कर होती व नद्यांच्या माध्यमातून बंदरापर्यंत कालव्यांचे जाळे तयार करणे सहज शक्य झाले. लिव्हरपूल सारखी नैसर्गिक बंदरे लाभलेली होती. या नैसर्गिक बंदराच्यामुळे परदेशातून येणारा कच्चा माल उद्योगांच्यापर्यंत पोहोचवणे व तयार झालेला पक्का माल बंदराच्यामार्फत विविध देशात पाठविणे सहज शक्य झाले. त्यामुळे पूर्वेकडील देशांशी व्यापारी जाळे निर्माण झाले होते. यातून त्यांचा व्यापार भरभराटीस आलेला होता. शेती योग्य जमीन जरी उपलब्ध नसली तरी हा भूभाग खनिज संपत्तीने परिपूर्ण होता. कोळसा, लोखंड, चूना इत्यादी सारखी खनिज संपत्तीच्या खाणी मोठ्या प्रमाणात होत्या. या खनिज संपत्तीमुळेच औद्योगिक क्रांतीसाठी आवश्यक कच्चा मालाची उपलब्धता असल्याने क्रांतीस पोषक वातावरण मिळाले. इंग्लंडमधील उष्ण व दमट हवामान कापड उद्योगास अनुकूल होते. परिणामी मँचेस्टर व लंकेशायर सारख्या शहरात कापड उद्योगाचा विकास होवू शकला.

**२) राजकीय स्थैर्य :**

औद्योगिक क्रांतीच्या पूर्वीपासून इंग्लंडमधील राजकीय परिस्थिती स्थिर व सुरक्षित होती. मध्ययुगीन युरोपमध्ये जरी संपूर्ण अशांतता पसरलेली असली तरी इंग्लंडमध्ये राजकीय स्थैर्य निर्माण झालेले होते. संसदीय लोकशाहीची वाटचाल चालू असताना इंग्लंडच्या जागृत जनतेमुळे तेथील लोकांना खाजगी मालमत्तेचा हक्क व व्यक्ती स्वातंत्र्याला मान्यता मिळालेली होती.शिवाय उदारमतवादी राजकीय वातावरण असल्याने लोकांच्या

उपक्रमशिलतेला अधिक वाव मिळाला. सन १६८८ च्या रक्तहीन व राज्यक्रांतीनंतर इंग्लंडच्या राजाचे महत्त्व कमी झाले,परिणामी लोकशाहीस पोषक वातवरण निर्माण झाले. युरोपीय राष्ट्रांच्यामध्ये या काळात साम्राज्यवादाची तीव्र स्पर्धा होती. परंतु इंग्लंडने युरोपीय साम्राज्यवादाच्या अंतर्गत स्पर्धेत फारसा भाग घेतला नाही. इंग्लंडचा साम्राज्यवाद युरोपखंडाच्या बाहेर होता. त्यामुळे इंग्लंडमधील राजकीय परिस्थिती स्थिर होती. याशिवाय आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे युरोपमध्ये या काळात जी काही युद्धे किंवा संघर्ष झाले त्यामध्ये इंग्लंडचा प्रत्यक्ष सहभाग होता. परंतु ही युद्धे किंवा संघर्ष इंग्लंडच्या भूमीमध्ये झालेली नव्हती. त्यामुळे या युद्धाच्या झळा इंग्लंडला बसल्या नाहीत. या राजकीय स्थिरतेचा फायदा औद्योगिक विकासास झाला.

**३) उदारमतवादी धोरण :**

१६ व्या शतकापासून इंग्लंडमधील प्रजेला व्यक्ती स्वातंत्र्य मिळालेले होते. पार्लमेंटचे वर्चस्व असल्याने उदारमतवादी राजकीय वातावरण होते. उदारमतवादी धोरणामुळे प्रजेच्या उपक्रमशिलतेला अधिक वाव मिळाला. उद्योगधंदे व व्यापार आदी क्षेत्रात विविध सुधारणा करण्यास जनतेला परवानगी मिळाली. व्यक्ती स्वातंत्र्यवादी धोरणामुळे भूदास व शेतमजूरांना स्थलांतर करण्यास परवानगी होती. आपल्या आवडीप्रमाणे रोजगारांच्या संधी निवडण्याचेही स्वातंत्र्य असल्याने उद्योगधंद्यांना मोठ्या प्रमाणात कुशल कामगार मिळू शकले. इंग्लंडच्या वसाहतवादी धोरणाचा फायदा व्यापार वाढीबरोबर व्यापारी व भांडवलदार वर्गाच्या उदयात झाला. इंग्लंड सरकारचे व्यापारवादी धोरणास संरक्षण असल्याने व्यापा-यांनाही संरक्षण मिळालेले होते.

**४) भांडवलाची उपलब्धता :**

वसाहतवादी धोरणामुळे १७ व १८ व्या शतकात व्यापाराची मोठ्या प्रमाणात वाढ झाली. या व्यापारातून विविध व्यापारी संस्थांनी प्रचंड प्रमाणात नफा मिळवून भांडवल जमा केलेले होते. पूर्वी ठराविक संस्थाच कारागिरांना भांडवल पुरवठा करीत होत्या, परंतु नवीन भांडवली संस्था व व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात नवीन उद्योगधंद्यात गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. परिणामी उद्योगधंद्याचा विस्तार होण्यास मदत झाली, उद्योगधंद्यांच्या विकासाबरोबरच बचतीची संकल्पनाही पुढे आली व नवीन पतपेढ्यांची स्थापना झाली. पतपेढ्या व कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थांनी लोकांच्या बचती जमा करून त्यांचे गुंतवणुकीत रूपातंर केले. सन १६९४ मध्ये 'बँक ऑफ इंग्लंड' ची स्थापना झाली. बँकाबरोबरच नवीन स्थापन झालेल्या पतपेढ्यांमुळे भांडवलाची गतीक्षमता वाढली व नाणे बाजारात एकसूत्रता आली.

**५) आर्थिक स्थैर्य :**

इंग्लंडमध्ये शेती योग्य व उत्पादनक्षम जमीनीची कमतरता असल्याने इंग्लंडच्या सरकारने व राजाने व्यापारास प्रोत्साहन व संरक्षण दिलेले होते. या व्यापारातून इंग्लंडला मोठ्या प्रमाणात संपत्तीची प्राप्ती होत होती. कोलंबसने सन १४९२ मध्ये अमेरिका व वास्को-द-गामाने सन १४९८ मध्ये लावलेला भारताचा शोध. या नवीन वसाहतीच्या शोधाने इंग्लंडला या प्रदेशात आपल्या वसाहती स्थापन करण्याला व या वसाहतीत व्यापारी मक्तेदारी निर्माण करण्यास अधिक वाव मिळाला. अमेरिका व भारत या वसाहती इंग्लंडसाठी कच्चा माल निर्माण

करणाऱ्या व तयार झालेल्या पक्या मालासाठी हक्काच्या बाजारपेठा ठरल्या. या वसाहतीतून कच्चा माल स्वस्तात खरेदी करत व याच मालावर प्रक्रिया करून तयार झालेला पक्का माल कितीतरी पटीने जास्त किंमतीत विकत. यातून त्यांना मोठा नफा प्राप्त होत होता. भारतामध्ये आपली व्यापारी व राजकीय मक्तेदारी (बंगाल,बिहार व ओरिसा प्रांत ताब्यात आल्यानंतर) निर्माण केली व भारतातून प्रचंड आर्थिक लूट करण्यास सुरुवात केली. भारतातील लुटीच्या पैशावरच इंग्लंडची आर्थिक स्थिती भक्कम होण्यास मदत झाली. बुक ॲडम्स भारतातून केलेली आर्थिक लूट व इंग्लंडमधील औद्योगिकरण यांचे विवेचन करताना लिहितात की, 'इंग्लंडच्या औद्योगिक क्रांतीची सुरुवात बंगालमध्ये केलेल्या अमाप लुटीतून झाली आहे,' औद्योगिक क्रांतीचा प्रारंभ सन १७७० च्या सुमारास झाला असे मानण्यात येते; पण केवळ यांत्रिक शोधांनी क्रांती होत नाही. त्यांना गती देण्यासाठी संचित धनाची भांडवलाची गरज असते. भारतीय संपत्तीच्या लुटीशिवाय ही गती मिळू शकली नसती. या लुटीवर इंग्लंडला मिळालेला फायदा कल्पनातीत होता. त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही, कारण सुमारे अर्धशतक' उद्योगप्रधान इंग्लंडला कोणीही प्रतिस्पर्धी नव्हता. लॉर्ड  कॅनिंगहॅम यांनीही या लुटीसंदर्भात लिहिले आहे की, 'सन १७५७ च्या प्लासीच्या युद्धानंतर व्यापाराच्या व राजकीय जबरदस्तीच्या अनेक भल्या-बुऱ्या मार्गानी इंग्लंडने कोट्यावधी रुपयांची लूट हिंदुस्थानातून केली. हे भांडवल इंग्लडला यांत्रिक कारखाने काढण्यात फार उपयोगी पडले.'

**६) कुशल तंत्रज्ञ व कारागिरांची उपलब्धता :**

युरोपमध्ये १८ व्या शतकात इंग्लंड वगळता इतर देशांमध्ये राजकीय, आर्थिक व सामाजिक स्थैर्य नव्हते. इंग्लंडमध्ये अंतर्गत शांतता व सुरक्षितता असल्याने फ्रान्स, जर्मनी, इटली इत्यादी देशातून मोठ्या संख्येने कुशल कारागीर, संशोधक इंग्लंडमध्ये येऊन स्थायिक झाले. फ्रान्स व इतर देशातून जे विणकर व तंत्रज्ञ आले होते त्यांना इंग्लंड सरकारने प्रोत्साहन, उत्तेजन व सवलती देऊ केल्या. या स्थलांतरीत कुशल कारागीरांचा इंग्लंडमधील उद्योगधंद्याना हातभार लागला. इंग्लंडमध्ये मूळातच लोकसंख्येची कमी होती. त्यामुळे शेजारील इतर देशातून जे स्थलांतरीत कारागीर इंग्लंडमध्ये आलेले होते त्यांनी इंग्लंडच्या औद्योगिकरणास व व्यापारास चालना देण्यास व विकासास हातभार लावला.

**७) पेटंटची तरतूद :**

इंग्लंड सरकारने संशोधन वृत्तीला अधिक प्रोत्साहन व चालना मिळावी यासाठी संशोधकांना विविध प्रकारच्या सेवा-सुविधा, सवलती, अधिकार पदे, मानसन्मान देऊ केलेले होते. एखाद्या संशोधनावर किंवा शोधावर त्या संशोधकाचा अधिकार राहावा यासाठी पेटंट कायदा केला. पेटंट कायद्यामुळे एकमेव व अधिकृत मालकी हक्क मिळणार होता. या कायद्यान्वये एखाद्या संशोधकास त्यांच्या शोधाचा पेटंटद्वारे पंचवीस वर्षे फायदा मिळणार होता. पेटंटच्या तरतुदीमुळे आपोआप संशोधनाला प्रोत्साहन व चालना मिळाली. सन १७६९ मध्ये जेम्स वॅटने वाफेच्या इंजिनचा शोध लावला. या शोधाबद्दल त्यास पेंटट मिळाले.

**८) धार्मिक उदारता :**

प्रोटेस्टंट पंथ हा इंग्लंडचा राष्ट्रधर्म होता. प्रगतिशील व्यापक दृष्टीकोणाच्या या पंथामुळे व्यापार, कारखानदारी व संपत्ती जमा करण्यास धार्मिक मान्यता मिळालेली होती. कॅथालिक धर्मामध्ये मुद्दलावर व्याज देण्यास किंवा घेण्यास बंदी होती. परंतु प्रोटेस्टंट पंथामध्ये अशा प्रकारची कोणतीही बंदी नव्हती. परिणामी प्रोटेस्टंट लोकांना भांडवल जमविणे सोपे गेले. शिवाय या पंथानुसार कोणत्याही व्यक्तीला आपल्या मर्जीप्रमाणे व्यवसाय करण्याची परवानगी होती. युरोपमध्ये या काळात धार्मिक कारणावरून अनेक देशामध्ये लोकांचा छळ चालू होता. या धार्मिक छळाला कंटाळून अनक प्रोटेस्टंट पंथीयांनी इंग्लंडचा आश्रय घेतला. उदा. नेदरलँड व फ्रान्समध्ये प्रोटेस्टंट लोकांचा छळ सुरू झाल्यानंतर या लोकांनी इंग्लंडचा आश्रय घेतला, हे लोक रेशीम व्यवसायात वाकबगार होते. इटलीमधून आलेल्या ज्यू लोकांनीही इंग्लंडमध्ये अशाच प्रकारे आश्रय घेतला.

**९) मुक्त व्यापार व व्यापक बाजारपेठा :**

ॲडम स्मिथ या अर्थतज्ज्ञाने सन १७७६ मध्ये 'The Wealth of Nations' या ग्रंथात मुक्त व्यापाराचा (Laisses-Faire) सिद्धांत मांडला. सरकारी हस्तक्षेपाशिवाय व्यापार व उद्योगधंदे वाढविता येतात. या विचाराला चालना मिळाली व व्यापार व्यवस्था चांगल्या प्रकारची झाली. औद्योगिकरणाला आवश्यक असे व्यापारी व्यावसायिकांचे एक जाळे निर्माण झाले. जहाजबांधणी, मोठ्या प्रमाणात वाढ झाली. पतपेढ्या, हुंडीपद्धती, चलन विनिमयाची सोय व मालाची विमा घेण्याची सोय यामुळे व्यापाराची इंग्लंडच्या वाढत्या व्यापाराबरोबरच त्यांना मोठ्या प्रमाणात विपूल बाजारपेठाही उपलब्ध होत गेल्या. इंग्लंडच्या ज्या-ज्या ठिकाणी वसाहती होत्या त्या त्यांच्या बाजारपेठाच होत्या. औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीकोणातून त्यांचा दुहेरी फायदा झाला. इंग्लंडच्या उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल या वसाहतीमधून मिळत होता व तयार झालेला पक्का माल याच वसाहतीच्या बाजारपेठामध्ये विकला जात होता. उदा. भारत.

**१०) मर्यादीत श्रमाला तंत्रज्ञानाची जोड :**

१८ व्या शतकामध्ये इंग्लंडच्या व्यापारात खूप मोठी वाढ झालेली होती. परंतु तुलनेत लोकसंख्या खूप कमी होती. लोकसंख्या कमी असल्याने मजुरांची कमतरता भासत होती व उत्पादनावरही परिणाम होत होता. इंग्लंडमध्ये शास्त्रीय व तंत्रज्ञानाच्या संशोधनाला प्रोत्साहन व चालना मिळत असल्याने सन १६६२ मध्ये स्थापन झालेल्या रॉयल सोसायटीच्या माध्यमातून नवनवीन शोध लागू लागले होते. इंग्लंडमधील या वेगवान उत्पादन तंत्राच्या निर्मितीचे श्रेय संशोधकाबरोबरच संशोधनाला प्रोत्साहन देणाऱ्या सरकारलाही जाते. कारण १८ व्या शतकाच्या अखेरपर्यंत इंग्लंड सरकारचा कुठेही राजकीय अतिरेक नव्हता, धर्मसंस्थेनेही या काळात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही.

**११) व्यापारी व कारागीर संघ नष्ट झाले :**

इंग्लंडमध्ये इतर देशांच्या मानाने मध्ययुगीन संस्था व परंपरांचा फारच लवकर अस्त झाला होता. त्यामुळे मध्ययुगीन परंपरेतील संघ (Merchant Gilds and Craft Gilds) नष्ट झाले. हे व्यापारी संघ मर्यादीत लोकांच्या हाती व्यापार राहावा या उद्देशाने स्थापन झालेले होते. कारागीर संघाचा देखील हाच उद्देश होता.

हे संघ जर इंग्लंडमध्ये अस्तित्वात असते तर व्यापाराचे केंद्रीकरण झाले असते व औद्योगिक क्षेत्रात सुधारणा आणि प्रगती घडून येण्याची शक्यता नव्हती. १८ व्या शतकाच्या सुरुवातीलाच हे संघ नष्ट झालेले असल्यामुळे, उद्योगधंद्याची वाढ होण्यास मदत झाली.

**● औद्योगिक क्रांती इंग्लंडमध्येच का घडून आली?**

१७ व्या शतकामध्ये इंग्लंडसारखीच भौगोलिक व धार्मिक परिस्थिती असलेल्या युरोपमधील इतर देशांमध्ये औद्योगिक क्रांती का झाली नाही? ती इंग्लंडमध्येच का झाली या संबंधी रॉबर्ट डूप्लेसिस यांनी 'ट्रान्झीशन टू कॅपिटॅलिझम इन अर्ली मॉडर्न युरोप'(Transition to capitalism inearly Modern Europe) या ग्रंथात सविस्तर विवेचन केलेले आहे. फ्रान्स, जर्मनी, हॉलंड हे देश १७ व्या शतकात इंग्लंडपेक्षा अधिक प्रगत होते. या देशांच्यामध्ये औद्योगिक क्रांतीस पूरक असे सर्व घटक होते. परंतु इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून आल्यानंतर या राष्ट्रात औद्योगिकरणास सुरुवात झाली. इंग्लंड व्यतीरिक्त इतर देशात औद्योगिक क्रांती का घडून आली नाही याचा अभ्यासही महत्त्वाचा ठरतो.

**१) फ्रान्स :**

इंग्लंडपेक्षा फ्रान्सचा व्यापार या काळात मोठा होता. लोकसंख्याही जास्त होती व इंग्लंडपेक्षा बाजारपेठांची संख्याही फ्रान्सकडे अधिक होती. देशात मोठ्या प्रमाणात भांडवल उपलब्ध होते. परंतु औद्योगिक क्रांती होवू शकली नाही. कारण सन १७८९ च्या राज्यक्रांतीमुळे फ्रान्समधील राजकीय स्थैर्य संपुष्टात आले होते. इंग्लंडमध्ये याच्या उलट परिस्थिती होती. इंग्लंडला राजकीय स्थैर्य लाभलेले होते. लोकसंख्या कमी असल्याने यांत्रिक उत्पादन पद्धतीची गरज वाटत होती. तर फ्रान्सची लोकसंख्या जास्त असल्याने यांत्रिक शोधाची व उत्पादन पद्धतीची आवश्यकता वाटत नव्हती.

**२) हॉलंड :**

हॉलंडकडे मोठ्या प्रमाणात भांडवल उपलब्ध होते. मात्र लोकसंख्या कमी होती. परिणामी त्यांचा व्यापारही कमीच होता. व्यापार कमी असल्याने यंत्राच्या साहाय्याने अधिक उत्पादनाची आवश्यकता वाढत नव्हती. शिवाय यांत्रिकीकरणास कारागीरांच्या संघाचा (Gilds) विरोध होता. या संघाचे अर्थव्यवस्थेवर बरेच प्रभुत्व होते. आंतरराष्ट्रीय स्पर्धेतून हॉलंडला कच्चा मालही मिळवणे कठीण होते. औद्योगिक प्रगतीस हॉलंडमधील राज्यपद्धती अनुकूल नव्हती. उलटपक्षी इंग्लंडमध्ये सरकारचा व्यापार व उद्योगधंद्यांना पाठिंबा होता. कोळसा व लोखंडाच्या खाणी जवळ-जवळ होत्या. इंग्लंडचे आरमार प्रबळ होते. या आरमारांच्या संरक्षणाखाली इतर देशांशी व वसाहतीमध्ये व्यापार करणे किंवा कच्चा माल मिळवणे त्यांना सहज शक्य होते.

**३) स्पेन :**

स्पेनमध्ये या काळात औद्योगिक क्रांतीस अनेक घटक अनुकूल होते. तरी देखील येथे औद्योगिक विकास झाला नाही. कारण स्पेनमधील राजकीय व धार्मिक परिस्थिती बिकट होती. तर इंग्लंडमध्ये राजकीय स्थैर्य होते, इंग्लंडचा राष्ट्रधर्म असलेल्या प्रोटेस्टंट पंथाने व्यापार, कारखानदारी व भांडवलदारीस मान्यता दिलेली होती.

४) जर्मनी :

जर्मनीमध्ये या काळात भांडवलाची कमतरता होती. अंतर्गत जकात पद्धती औद्योगिक विकासात अडथळा निर्माण करित होती. बाजारपेठा लहान होत्या. शिवाय जर्मन लोक रूढीप्रिय होते. जर्मनीची लहान-लहान राज्यात विभागणी झालेली होती. औद्योगिक वाढीस प्रतिकूल परिस्थिती होती. त्यामुळे जर्मनीचा औद्योगिक विकास होवू शकला नाही. उलट इंग्लंडमधील सरकारने उद्योजकांना विनाकारणत्रास दिला नाही. उत्पादनाच्या क्षेत्रात निर्माण होणाऱ्या नवीन तंत्रज्ञांनाचा व बदलाचा इंग्रजांनी स्वीकार केलेला दिसतो. युरोपमध्ये १७ व १८ व्या शतकात असे अनेक अनुकूल व पोषक घटक इंग्लंडमध्ये या काळात एकत्र आले. त्यामुळे इतर युरोपीय राष्ट्रांच्या तुलनेत औद्योगिक क्रांतीची सुरुवात इंग्लंडमध्येच झाली.

● **स्वयं अध्ययन प्रश्न – १**

**अ) रिकाम्या जागा लिहा.**

१. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीच्या काळात ........ व ...... शहरामध्ये कापड उद्योगाचा विकास झाला.

२. सन ..... मध्ये इंग्लंड मधील रक्तहीन राज्यक्रांती घडून आली.

३. बँक ऑफ इंग्लंडची स्थापना ............ मध्ये झाली.

४. इंग्लंड सरकारने संशोधनाला चालना देण्यासाठी ......... कायदा केला.

५. ............. हा इंग्लंडचा राष्ट्रधर्म म्हणून ओळखला जातो.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. ॲडम स्मिथ या अर्थतज्ज्ञाने कोणत्या वर्षी मुक्त व्यापाराचा सिद्धांत मांडला?

२. इंग्लंडमध्ये कोणते नैसर्गिक बंदर प्रसिद्ध आहे?

३. इंग्लंड कोणत्या खनिज संपत्तीमध्ये परिपूर्ण होता?

४. अमेरिकेतून इंग्लंडला कोणत्या प्रकारचा कच्चा माल अधिक मिळत होता?

५. रॉयल सोसायटीची स्थापना कोणत्या वर्षी झाली?


**१.२.२ औद्योगिक क्रांतीतील प्रमुख घडामोडी** (Major Developments) :

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचा सन १७५० ते १८५० हा काळ मानण्यात येतो. औद्योगिक क्रांतीपूर्व काळात उत्पादन पद्धती घरगुती स्वरूपाची होती. हाताने चालवल्या जाणाऱ्या यंत्राचा वापर करून उत्पादन घेतले जाते. परिणामी उत्पादनास खर्च जास्त येत होता व उत्पादनही कमी होते. ही सर्व परिस्थिती औद्योगिक क्षेत्रात झालेल्या बदलाने व यांत्रिक शोधांनी बदलली व औद्योगिक क्रांतीची वाटचाल अधिक गतीमान झाली.

## १) कापड उद्योगातील विविध शोध व सुधारणा :


इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीच्या अगोदर पारंपारिक पद्धतीने कापडाचे उत्पादन केले जात होते. सूत कातणे, पिंजणे व कापड विणण्याचे काम हाताने केले जात. इंग्लंडमध्ये कापूस उत्पादन जास्त नसल्याने कापड व्यावसायाचे स्वरूपही मर्यादित होते. कापडाची गरज वाढत गेल्याने कापसाची गरजही वाढू लागली, त्यामुळे अमेरिकन वसाहतीमधून कापसाची आयात केली जाऊ लागली. कापडाची मागणी वरचेवर वाढत होती परंतु कापड उत्पादनपद्धती जुनाट होती. वाढत्या मागणीबरोबर खुंटलेली कापड उद्योगांची स्थितीही सुधारण्याची गरज होती व त्यासाठी नविन तंत्रज्ञानाची व यांत्रिक उत्पादन पद्धतीची आवश्यकता होती. कापड उद्योगधंद्यात गती आणण्यासाठी विविध शोधावर भर देण्यास सुरुवात झाली. अल्पावधीत कापड उत्पादन पद्धतीत नव-नविन शोध लागत गेले व आमुलाग्र स्वरूपाचा बदल घडून आला. ज्या विविध शोधांनी कापड उद्योगात क्रांतीकारक बदल घडवून आणले ते शोध पुढीलप्रमाणे :-

**१) धावता धोटा :** (The Flying Shuttle)



कापडाच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी सुताची निर्मिती अधिक गतीने करणे आवश्यक होते. कारण कापड विणणाऱ्या विणकऱ्यांना सुताचा पुरवठा आवश्यक तेवढ्या प्रमाणात होऊ शकत नव्हता. विणकामाला गती आणण्यासाठी सूताची निर्मिती अधिक प्रमाणात करणे गरजेचे होते. अशा परिस्थितीत सन १७३३ मध्ये जॉन के (John Key) या घड्याळे तयार करणाऱ्या कारागीराने 'धावता धोटा' (फ्लाईंग शटल) या यंत्राचा शोध लावला. या यंत्रामुळे सुत गुंफण्याची प्रक्रिया सोपी व जलद झाली. धावत्या धोट्यामुळे दोन विणकराचे काम एक विणकर करू लागला. त्यामुळे जादा कापड विणण्याची सोय झाली.


**२) स्पिनिंग जेनी :** (Malm)(Spinning Jenny)



कापड विणण्याची शक्ती वाढल्यामुळे सुताचे उत्पादन वाढविणे गरजेचे होते. सन १७३८ मध्ये लेविस पॉल व जॉन वॅट यांनी रोलस्पिनिंग तंत्राचा शोध लावला. परंतु याचा फारसा फायदा झाला नाही. कारण या तंत्रामध्ये सुताला ताण बसून ते तूटू लागले. यावर मात करण्यासाठी इंग्लंडच्या 'रॉयल सोसायटी फॉल दि एनकरेजमेंट ऑफ आर्टस ॲन्ड मॅन्युफॅक्चर्स' या संस्थेने सूताचे एकापेक्षा जास्त धागे बनविणाऱ्या संशोधकाला बक्षिस देण्याचे जाहीर केले. सन १७६४ मध्ये जेम्स-हार ग्रीव्हज याने'स्पिनिंग जेनी' या यंत्राचा शोध लावला. या चरख्याला आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ 'जेनी' असे नाव दिले. या यंत्रामध्ये 'स्पिंडल' (चकत्या) बसवून एकाच वेळी आठ धागे काढण्याची सोय होती. एक चकती आठ कामगारांचे काम करीत असे. परंतु नंतरच्या काळात हारग्रीव्हज याने याही यंत्रात सुधारणा केली व एकाच वेळी ८० धागे काढता येतील


अशी व्यवस्था केली. सूताचे उत्पादन वेगाने होऊ लागल्याने सुतकताईच्या व्यवसायात फार मोठा बदल झाला.

**३) स्पिनिंग फ्रेमः (जलचौकट)** (Spinning Frame) :




जेम्स हारग्रीव्हज याने शोधलेल्या स्पिनिंग जेनीमधून मोठ्या प्रमाणात सूत तयार होत होते. परंतु त्या धाव्याला पीळ कमी होता. पीळ कमी असल्याने ताणण्यासाठी किंवा उभ्या विणकामासाठी त्याचा उपयोग होत नव्हता. त्या धाव्याचा उपयोग फक्त आठव्या विणीसाठी होत होता. शिवाय स्पिनिंग जेनी हाताने चालवावी लागत होती. यावर मात करत रिचर्ड आर्कराईट या संशोधकाने सन १७६९ मध्ये 'स्पिनिंग फ्रेम' या यंत्राचा शोध लावला. व्यवसायाने न्हावी असलेल्या रिचर्ड आर्कराईट याने पॉल व वॅट यंत्रामध्ये बदल करून या यंत्राचा शोध लावला होता. प्रथम हे यंत्र घोड्याच्या साहाय्याने चालवले जाई. परंतु सन १७७१ मध्ये हेच यंत्र पाण्याच्या शक्तीवर चालवण्याची सोय केली म्हणून त्यास 'जल चौकट' (Water Frame) असे संबोधले जाऊ लागले. या यंत्राच्या द्वारे निघणारे सूत पिळदार असल्याने विणकामात त्याचा उपयोग उभ्या व आडव्या धाव्यासाठी करता येऊ लागला. या शोधामुळे कारखाना-पद्धतीची (Industrial Method) स्थापना होण्यास मदत झाली

**४) क्रॉम्पटन म्यूल-जेनी :** (Crompton Mule-Jeny) :




आर्कराईटच्या स्पिनिंग फ्रेम मधून मजबूत व पिळदार धागा निघत होता. परंतु ईस्ट इंडिजसारख्या देशाबरोबर स्पर्धा करण्यासाठी सुबक व उच्च प्रतीचे तलम कापड तयार करणे गरजेचे होते. मजबूत व तलम कापड तयार करण्यासाठी सॅम्युअल क्रॉम्पटन या संशोधकाने सन १७७६ मध्ये 'स्पिनिंग जेनी' व 'वॉटर फ्रेम' या यंत्रातील तंत्राचा वापर करून एका नवीन यंत्राचा शोध लावला. त्याला 'म्यूल' (Mule) असे म्हणत. या यंत्राच्या माध्यमातून एकाचवेळी शेकडो धागे व तलम सूत काढण्यात यश मिळाले.

**५) यांत्रिक मागः** (Power-loom)



कापड उद्योगात विविध शोधामुळे सुताचे उत्पादन वाढले. परंतु सुताचे वाढते प्रमाण व विणण्याचे काम यात समतोल राहीला नाही. कारण चांगल्या विणकरांची कमतरता भासू लागली, परिणामी विणकराचे पगार वाढले व विणकरही मिळेनासे झाले. यावर मात करण्यासाठी यांत्रिक मागाचा शोध लावणे गरजेचे होते.

### ६) कॉटन जेनी/जीन :



एली व्हिटनी या अमेरिकन संशोधकाने कापूस साफ करण्याच्या म्हणजे सरकी बाजूला करण्याच्या यंत्राचा सन १७९३ मध्ये शोध लावला. त्याला कॉटन जेनी किंवा जीन असे म्हणत. पूर्वी कापसातील सरकी बाजूला करण्याची प्रक्रिया हाताने करावी लागत असे. परंतु या शोधाने ही प्रक्रिया अधिक गतिमान झाली.

### ७) कापड उद्योगातील इतर महत्त्वाचे शोध :

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीच्या दरम्यान वरील शोधाच्या व्यतिरिक्त इतरही काही महत्त्वाचे शोध लागले. जान रोबक या संशोधकाने कापड स्वच्छ करणे, रंगवणे, धुणे, वाळवणे यासाठी रासायनिक प्रक्रिया शोधून काढली. त्यामुळे कापड उत्पादन प्रक्रिया अधिक सुलभ झाली. सन १८०३ मध्ये विल्यम रॅडलिक व थॉमस जॉन्सन यांनी एडमंड कार्टराईटच्या यंत्रमागात बदल करून कापसाचा धागा आपोआप पुढील प्रक्रियेसाठी जाऊन कापड विणण्यासाठीच्या मार्गापर्यंत पोहचेल अशी व्यवस्था केली. सन १८४६ मध्ये 'एलियस हॉव' याने शिवण यंत्राचा शोध लावला तर थॉमस वेल याने सन १८८३ मध्ये सिलेंडर छपाईचा शोध लावला. या शोधामुळे हाताने ठसे उमटविण्याची आवश्यकता राहीली नाही. या छपाई यंत्राच्या शोधाने कापड उद्योगात प्रचंड मोठी क्रांती घडून आली.

### ८) यांत्रिक शोधाचा कापड उद्योगावरील परिणाम :

कापड उद्योगामध्ये जे विविध शोध लागले किंवा जे नविन तंत्रज्ञान निर्माण झाले त्याच्या परिणाम स्वरूप कापड उत्पादन क्षेत्रात अमूलाग्र स्वरूपाचा बदल झाला व उत्पादन क्षमता शेकडो पटीने वाढली. हॉरॉक्स या संशोधकाने बनविलेल्या स्वयंचलित लोखंडी मागांची संख्या सन १८१५ मध्ये ३००० इतकी होती ती संख्या सन १८३४ मध्ये १,००,००० इतकी झाली. त्यामुळे कापड उत्पादनात विक्रमी वाढ झाली. नवीन शोधावर आधारीत बाष्पशक्तीवर चालणारी पहिली कापड गिरणी नॉटिंगहॅम येथील पॅपलविथ येथे सुरू झाली. या सर्वांचा परिणाम म्हणून सन १८५० पर्यंत इंग्लंडमध्ये २,५०,००० इतके यंत्रमाग सुरू झालेले होते.

### १) रसायन उद्योगातील शोध व सुधारणा :

कापड उद्योगातील प्रगतीमुळे रसायनशास्त्रात देखील विविध शोध लागले. पूर्वी कापड स्वच्छ करणे व ते रंगविल्यानंतर सुखविण्यासाठी खूप वेळ लागत होता. त्यामुळे कापडावर जलद प्रक्रिया करणे अशक्य होते. सन १८४६ मध्ये जॉन रोबक याने 'व्हि ट्रिआल' (Oil of Vitriol) शोधून काढले. या शोधामुळे ब्लीचिंगच्या प्रक्रियेत फार मोठा बदल घडून आला. यानंतर फ्रान्समधील बोलेटी कापड स्वच्छ करण्यासाठी 'क्लोरीन' उपयोग करण्याची पद्धती शोधली.

### २) कोळसा उद्योगातील शोध व सुधारणा :

मानवी शक्तीच्या ऐवजी यांत्रिक शक्तीचा वापर हा औद्योगिक क्रांतीच्या टप्प्यातील महत्त्वाचा बदल होता.

वाफेच्या शक्तीवर चालणारी यंत्रे दगडी कोळशावर चालवली जाऊ लागली. लोखंड व पोलाद उद्योगातही कोळशाची मागणी प्रचंड वाढलेली होती. जहाज व रेल्वेच्या विकासाबरोबरच कोळशाची मागणी आणखी वाढत गेली. याशिवाय दगडी कोळशापासून डांबर, रंग, रासायनिक खते देखील तयार केली जावू लागली. अशा विविध कारणामुळे कोळशाची मागणी प्रचंड वाढली. इंग्लंडच्या दक्षिण भागात कोळशाच्या खाणी मोठ्या प्रमाणात सापडल्या. या खाणीतून दगडी कोळशाचे उत्पादन जास्त होऊ लागल्यानंतर लोखंडावर प्रक्रिया करण्यासाठीसुद्धा कोळशाचा वापर करण्यास सुरुवात केली. कोळसा खाणीतून कोळसा बाहेर काढताना खाणीत साठणाऱ्या पाण्याचा खूप मोठा अडथळा येत असे. या अडथळ्यावर मात करण्यासाठी पाणी उपसण्यासाठी लागणाऱ्या पंपाचा शोध थॉमस सॅव्हरी या संशोधकाने सन १६९८ मध्ये लावला. सन १७०८ मध्ये न्यूकॉमेन यांने सॅव्हरीच्या पाणी उपसण्याच्या पंपात सुधारणा केल्या, या सुधारणामुळे खोलवर खाणी खोदणे व त्यातील पाणी उपसा करणे शक्य झाले. या पंपाला' 'ॲटमॉस फेरिक स्टीम पंप' असे म्हणत. यानंतर सर हँफ्री डेव्ही याने सन १८१५ मध्ये सुरक्षित दिव्याचा (सेफ्टी लॅम्प) शोध लावला. त्यामुळे खाणीतील प्रकाशाची अडचण दूर झाली. कोळशाच्या खाणीत कामगारांना काम करताना कार्बन वायूचा स्फोट होण्याचा नेहमी धोका असे.



परंतु डेव्ही यांच्या जाळीचा संरक्षित दिवा विषारी वायू लक्षात आणून देत असे. परिणामी कामगारांना सहज व वेगाने काम करणे शक्य झाले. सन १८३७ मध्ये खाणीतून हवा बाहेर टाकणाऱ्या पंख्याचा (एक्झॉस्ट फॅन) शोध लागला. या पंख्यामुळे खाणीतील अशुद्ध हवा बाहेर काढणे सोपे झाले. खोल खाणीमध्ये हवा उष्ण होत असल्याने कोळसा उत्पादन करणे कठिण जात होते. परंतु या पंख्यांच्या शोधाने यावरही मात केली. खाणीतून कोळसा वरती काढण्याचीही मोठी समस्या होती. हा कोळसा बाहेर काढण्यासाठी मानवी शक्तीचा वापर केला जात असे, हे काम खूप मेहनतीचे होते. सन १८३९ मध्ये खाणीतून कोळसा वरती काढण्यासाठी यांत्रिक पद्धतीचा शोध लावला. तारांच्या दोरखंडावरून हा कोळसा बाहेर काढला जाऊ लागला. त्यामुळे कोळशाची वाहतूक झपाट्याने आणि स्वस्त दराने होऊ लागली. लोखंड निर्मितीमध्ये कोळशाचा वापर लोखंड निर्मिती प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक होता. लोखंड निर्मिती बरोबरच कोळशाचा वापर अनेक लहान-मोठ्या उद्योगधंद्यामध्ये होऊ लागलेला होता. त्यामुळे सन १८१६ मध्ये कोळशाचे उत्पादन १,६०,००० टन इतके झाले होते तर हेच उत्पादन सन १८५६ मध्ये ६,५०,००,००० टन इतक्या मोठ्या प्रमाणात वाढलेले होते. यावरून इंग्लंडमधील कोळसा उद्योग कशा प्रकारे भरभराटीस आलेला होता हे दिसून येते.

**३) लोखंड उत्पादनातील शोध व सुधारणा :**

इंग्लंडमध्ये लोखंड उत्पादन पूर्वीपासून चालू होते. पारंपारिक पद्धतीच्या या लोखंड उत्पादनासाठी लाकडी कोळशाचा वापर लोखंड वितळण्यासाठी केला जात होता. यासाठी मोठ्या प्रमाणात लाकडाचा वापर होत होता. परंतु जहाज बांधणीसाठी लाकूड अपुरे पडू नये म्हणून जंगल तोडीवर कायद्याने बंदी घातली. त्याचा परिणाम लोखंड उत्पादनावर झाला व लोखंड उत्पादन कमालीचे घटले. यावर मात करण्यासाठी सन १७०९

मध्ये डर्बी या संशोधकाने दगडी कोळशापासून लोखंड शुद्ध करण्याची पद्धत शोधून काढली. या पद्धतीमुळे लोखंडाचा उत्पादन खर्च कमी झाला व लोखंडाचे उत्पादन वाढण्यास मदत झाली.

जॉन स्मिटन या संशोधकाने सन १७६० मध्ये लोखंड वितळण्याच्या प्रक्रियेसाठी 'पंप ब्लोअर' हा वायुपंप तयार केला. त्यामुळे लोखंड उत्पादन प्रक्रियेस अधिक वेग आला. यानंतर सन १७८४ मध्ये हेन्री कोर्टने घडीव व ओतीव लोखंड निर्माण करणेची पद्धती शोधून लोखंड उत्पादनात प्रगतीचा मार्ग खुला केला, या पद्धतीला 'पुंडलिंग' असे म्हणत. लोखंड वितळण्यासाठी व शुद्धीकरणासाठी ज्या भट्ट्या वापरल्या जात होत्या, त्यामध्ये उष्ण हवेचा वेगवान प्रवाह पुरवणे आवश्यक होते. या कामासाठी वाफेच्या इंजिनचा उपयोग न्यूकॉमेन व जेम्स वॅट यांनी करून दिला. नेल्सन या संशोधकाने सन १८२८ मध्ये उष्ण हवेचा प्रवाह लोखंडाच्या भट्टीत पोहोचेल अशी सुधारणा केली, त्यामुळे लोखंडाची निर्मिती थोड्या वेळात आणि कमी जळणात (सरपन) करता येणे शक्य झाले. सन १८५६ मध्ये हेनरी बेसेमोर यांने पोलाद बनविण्याच्या नवीन पद्धतीचा शोध लावला. उष्ण वाऱ्याच्या फवाऱ्याने लोखंडातील अशुद्ध घटक नाहीसे करणे व त्यामध्ये थोड्या प्रमाणात कार्बन व मॅगेनीज मिसळून हव्या त्या गुणवत्तेचे पोलाद तयार करण्याचे हे तंत्र होते. या तंत्राने लोखंड उत्पादनात मोठी क्रांती घडून आली. विशिष्ट दर्जाचे पोलाद तयार करण्यासाठी कच्चा लोखंडातील गंधक बाजूला करणे जरूरी होते. ही समस्या थॉमर्स व गिलख्रिस्ट यांनी दूर केली. थॉमस व गिलख्रिस्ट यांच्या तंत्रात थोडाफार बदल करून विल्यम सिमन्थ यांने सन १७७८ मध्ये विजेच्या साहाय्याने धातू शुद्ध करण्याची पद्धत शोधून काढली. जॉन विल्किन्सन याने डी कंपनी बरोबर करार करून लोखंड निर्मिती सुरू केली. याशिवाय या कंपनीने 'कास्ट आयर्न' नावाच्या पाणीपुरवठा करण्यासाठी पाईप तयार करण्यास सुरुवात केली. अशाप्रकारे अनेक शोध व सुधारणा घडून आल्या व इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणात लोखंड व पोलाद निर्माण करण्यात येऊ लागले. याचा वापर करून विविध यंत्रे, वाहतुकीची साधने, आगबोटी, आगगाड्या इ. तयार होऊ लागले. त्यामुळे इंग्लंडची औद्योगिक व आर्थिक प्रगती वेगाने होण्यास मदत झाली.

**४) यंत्रनिर्मितीमधील शोध व सुधारणा :**




औद्योगिक क्रांतीच्या अगोदर लहान-लहान यंत्रांच्या साहाय्याने उत्पादन केले जात होते. उदा. हातोडा, पटाशी, कानस इ. परंतु औद्योगिक क्रांती घडून येण्यासाठी कारखान्याना लागणारी यंत्रे मोठ्या प्रमाणात तयार करणे आवश्यक होते. यंत्रे तयार करण्यासाठी लोखंडाऐवजी लाकडाचा अधिक वापर केला जात असल्याने ती फारशी टिकाऊ नसत. सन १८२० नंतर यंत्रनिर्मिती होऊ लागली व नव-नविन शोध लागू लागले. सन १८२५ मध्ये क्लेमंट या संशोधकाने लेथ मशीन (पंचिंग मशीन) शोधून काढले. सन १८३९ मध्ये नॅस्मीथ याने स्टीम हमर व सन १८४८ मध्ये रॉबर्ट याने भोके पाडण्याचे (ड्रिल मशीन) यंत्र शोधून काढले. या शोधामुळे विविध प्रकारची यंत्रे तयार करण्यास मदत झाली. उद्योगधंदे, वाहतूक, अवजड यंत्रे इ. क्षेत्रात याचा उपयोग होऊन उद्योगधंद्याचा विकास होण्यास मदत झाली.

**५) वाफेवर चालणाऱ्या यंत्राचा शोध :**


औद्योगिक क्रांतीच्या अगोदर यंत्रे चालवण्यासाठी जलशक्ती, पवनशक्ती व प्राण्यांचा वापर केला जात होता. परंतु यांच्या माध्यमातून उत्पादन क्षमता वाढत नव्हती. औद्योगिक क्रांतीला अधिक गती देण्याचे काम वाफेवर चालणाऱ्या यंत्रानी केले. सन १६९८ मध्ये साव्होरी या संशोधकाने पहिले बाष्प इंजिन शोधून काढले. याला बाष्पयंत्र असे म्हणत. साव्होरीच्या या बाष्पयंत्रात काही दोष होते ते सन १७०८ मध्ये थॉमस न्यूकॉमेन याने दूर केले, परंतु याही उपकरणात काही दोष राहीलेले होते.

**६) जेम्स वॅटचा क्रांतीकारी शोध (वाफेवर चालणारे इंजिन)**



थॉमस न्यूकॉमेन यांच्यातील अनेक दोष दूर करून सन १७६९ मध्ये जेम्स वॅट या संशोधकाने बाष्यशक्तीवर चालणारे नवीन इंजिन शोधून काढले. जेम्स वॅट हा अनेक शास्त्रे व कलांची आवड असणारा तंत्रज्ञ होता. वॅट याने जॉन रोबक ह्याच्याशी भागीदारी करून वाफेवर चालणारी यंत्रे तयार करण्यास सुरुवात केली. परंतु ही कंपनी दिवाळखोरीत निघाली. त्यानंतर वॅटने मॅथ्यू बोल्टन या बर्मिंगहॅम मधील उद्योगपतीबरोबर करार करून यंत्र उत्पादनासाठी कारखाना काढला. वाफेवर चालणारी यंत्रे तयार केल्यामुळे उत्पादनाच्या तंत्रात फार मोठी सुधारणा घडून आली.

**७) विद्युत शक्तीच्या क्षेत्रातील शोध :**



जेम्स वॅटच्या बाष्पशक्तीवर चालणाऱ्या इंजिनने औद्योगिकरणाला गती देण्याचे काम केले. याच काळात विद्युतशक्तीचाही शोध लागला. सन १८०० मध्ये व्होल्टा या इटालियन संशोधकाने 'व्होल्टिक सेल'चा शोध लावला. तांबे व जस्ताच्या पट्ट्या ॲसिडमध्ये बुडवून हा सेल बनविण्यात आला होता. यानंतर सन १८२० मध्ये ॲम्पीयर या फ्रेंच संशोधकाने विद्युत चुंबकीय शास्त्राचा पाया घातला. सन १८३१ मध्ये मायकेल फॅरेडे या इंग्रज संशोधकाने 'डायनॅमो'चा (विद्युत जनित्र) शोध लावला. डॉयनॅमोमध्ये निर्माण होणारी विद्युत शक्ती चुंबकीय हालचालीतून निर्माण होत असल्याने ती मोठ्या प्रमाणात व अखंडपणे वीज निर्माण करणे सहज शक्य झाले.


**८) वाहतूक क्षेत्रातील शोध व प्रगती :**

औद्योगिक क्रांतीच्या काळात वाढत्या उत्पादनाबरोबर वाहतुकीचे प्रमाणही वाढत होते. क्रांतीपूर्व काळात घोडा हेच वाहतुकीचे प्रमुख साधन होते. परंतु वाढत्या उत्पादनामुळे वाहतुकीच्या सेवा कमी पडत असल्याने उत्पादीत माल कारखान्यामध्ये पडून राहू लागला. कच्चा माल उद्योगधंद्यापर्यंत पोहचवणे व तयार पक्का माल बाजारपेठापर्यंत पोहचवणे यासाठी नवीन वाहतूक सुविधांची आवश्यकता निर्माण झाली होती. पुढील काळात

दळणवळण आणि वाहतूक क्षेत्रात क्रांतिकारी शोध लागले.

**अ) रस्ते वाहतूक :** १७ व्या शतकाच्या मध्यापासून रस्ते बांधण्यात सुधारणा चालू होत्या, तरी १८ व्या शतकापर्यंत इंग्लंडमधील रस्ते वाहतुकीस योग्य नव्हते. सन १७६० ते १८०४ या काळात इंग्लंडमध्ये रस्ते बांधणीसंबंधी ४५० कायदे करण्यात आले होते. जॉन मेटकॉफ यांने चांगल्या प्रतीचे रस्ते तयार करण्यासंबंधी अनेक सुधारणा सुचवल्या. सन १८११ मध्ये जॉन मॅकडम आणि टेलफोर्ड यांनी रस्त्याचा पाया आणि रस्त्यावरील पाणी बाजूला करण्यासंबंधी सुधारणा केल्या. ह्या नव्या प्रकारच्या रस्त्यामुळे वाहतूक खर्चात होऊ लागली. सन १८३९ मध्ये चार्ल गुडइयर या संशोधकाने रबर व्हल्कनाईज करण्याचे तंत्र शोधून काढले. या तंत्राचा वापर करून रबरी टायर तयार करण्यात येऊ लागले. गुडइयरच्या टायरच्या शोधामुळे रस्ते वाहतूक क्षेत्रात क्रांती घडून आली. सन १८५० च्या मध्यापर्यंत इंग्लंडमध्ये रस्त्यांचे जाळे तयार झालेले होते.

**ब) जलमार्ग वाहतूक :** औद्योगिक क्रांतीच्या सुरुवातीस अंतर्गत जलवाहतूक नद्यांच्या माध्यमातून थोडीफार होत असली तरी कालवे काढणे किंवा जलवाहतूकीच्या सोयी वाढवून सुधारणा कराव्यात यासाठी फारसे प्रयत्न झालेले नव्हते. औद्योगिकरणाच्या बरोबर वाढत्या उत्पादनासाठी स्वस्तातील वाहतुकीची गरज निर्माण झालेली होती. सन १७६१ नंतर कोळसा उत्पादनात प्रचंड वाढ झालेली होती. कोळशाची वाहतूक खर्चीक होती. यामुळे ड्यूक ऑफ ब्रिजवॉटरने सन १७८७ मध्ये स्वतःच्या मालकीच्या कोळशाच्या खाणीपासून (वॉर्सा ते मॅन्चेस्टर) पहिला कालवा खणला. हा कालवा जेम्स ब्रिडले ह्या ब्रिटिश तंत्रज्ञानकडून बांधून घेतला. सन १७७७ मध्ये सुरू झालेल्या 'ट्रेन्ट ॲन्ड मसी कॅनॉल' या कालव्याचे श्रेय ब्रिडलेला जाते. ह्यानंतर ब्रिजवॉटरने मँन्चेस्टर ते लिव्हरपूल ह्या शहरांना जोडणारा कालवा बांधला. ह्या कालव्यामुळे कोळशांच्या किंमती कमी झाल्या व विक्री वाढली. सन १८३० पर्यंत नद्या व कालवे मिळून ३६०० मैलांची अंतर्गत वाहतुकीची सोय झालेली होती. सन १८०७ मध्ये अमेरिकेतील तंत्रज्ञ रॉबर्ट फुल्टन याने आधुनिक आगबोटीचा शोध लावला. या पहिल्या आगबोटीचे 'फ्लेरमाऊट' असे नाव होते. या शोधाचा इंग्लंडलाही मोठा फायदा झाला. या आगबोटीच्या साहाय्याने फुल्टनने हडसन नदीमध्ये न्यूयार्क ते अल्बनी अशी वाहतूक सुरू केलेली होती. सन १८२० मध्ये लंडन ते पॅरिस अशी जलवाहतूक सुरू झाली. तर सन १८३९ मध्ये लिव्हरपूल ते बोस्टन ही जलमार्ग सेवा सुरू झाली. या जलमार्गामुळे इंग्लंड आणि अमेरिका ह्या देशातील व्यापारात फार मोठी वाढ झाली. जलमार्गाचा विकास जस-जसा होत होता त्याच बरोबर आधुनिक स्वरूपाचा जहाजबांधणीचा व्यवसाय सुरू झाला व जहाज बांधणी उद्योगात भांडवलाचे केंद्रिकरण होण्यास सुरुवात झाली. परिणाम मोठ-मोठ्या जहाज कंपन्या स्थापन होण्यास मदत झाली. सन १८३७ मध्ये 'पोनिन्सुलर ॲण्ड ओरिएंटल कंपनी', सन १८३९ मध्ये 'दि कर्नाड कंपनी', सन १८५३ मध्ये 'दि युनियन कंपनी' तर सन १८६९ मध्ये 'दि व्हाईट स्टर कंपनी' स्थापन झाली.



**९) रेल्वे वाहतूक : शोध व सुधारणा :**



इंग्लंडमध्ये कोळसा, लोखंड इत्यादी मालाचा वाहतूक करण्यासाठी काही ठिकाणी 'ट्रॅमवेज' चालू केलेले होते. लाकडी मार्ग तयार करून त्यावरून दगडी कोळशाने भरलेल्या गाड्या घोड्यांच्या मदतीने आढल्या जात. सन १७०० मध्ये लाकडी मार्गाऐवजी लोखंडी रूळ घालण्यात आले. वाफेच्या इंजिनचा शोध लागल्यावर घोड्याऐवजी आगगाड्यांचा वापर होऊ लागला. सन १८०२ मध्ये रिचर्ड ट्रेविथिक याने वाफेच्या साहाय्याने चालणारी छोटी आगगाडी तयार केली. सन १८१३-१४ मध्ये जॉर्ज स्टीफनसन याने लोहमार्ग आणि आगगाडी ह्या दोन्ही साधनांत सुधारणा घडवून जास्त वेगाने जाणारी आगगाडी तयार केली. तर याच वर्षी विलियम हेडले या खाणीत काम करणाऱ्या प्रमुख इंजिनियरने 'पफिंग बिली' (Puffing Billy) नावाचे वाफेवर चालणारे सुधारीत इंजिन तयार केले. तर जॉर्ज स्टीफनसन याने तयार केलेल्या इंजिनला 'आयर्न हॉर्स' असे म्हणत. स्टिफनसनला 'रेल्वेचा जनक' म्हणूनही ओळखले जाते. यानंतर स्टिफनसनच्या मार्गदर्शनाखाली पहिला रेल्वेमार्ग बांधण्यात आला व सन १८२५ मध्ये 'दि स्टॉक्टन अॅन्ड डार्लिंग्टन' ही रेल्वे सेवा सुरू करण्यात आली. प्रथम या रेल्वेचा उपयोग खाणीतील कोळसा बाहेर काढण्यासाठी केला जात होता. अल्पावधीत संपूर्ण इंग्लंडमध्ये रेल्वेचे जाळे तयार झाले. जॉर्ज स्टिफनने 'रॉकेट' नावाचे नवीन व सुधारित इंजिन तयार केले. या नवीन रेल्वे इंजिनचा वापर करून सन १८३० मध्ये लिव्हरपूल ते मॅन्चेस्टर या ठिकाणी प्रवासी व मालवाहतूक सुरू केली. रेल्वेची सेवा आता गरज राहिलेली नव्हती तर ती आता वाहतुकीचा अपरिहार्य घटक बनली. सन १८३० पर्यंत ५०० मैल लांबचे रेल्वेमार्ग तयार झाले तर १८७० पर्यंत ही संख्या १५,५३७ मैल पर्यंत गेली. रेल्वेचा विस्तार ब्रिटिशानी केवळ इंग्लंडमध्येच केला नाही तर त्यांच्या वसाहतीमध्ये सुद्धा केला. रेल्वेच्या सेवेमध्ये आणखी सुधारणा केल्या जाऊ लागल्या. सन १८७३ मध्ये 'स्लीपिंग कार'ची सोय करण्यात आली, तर सन १८९२ मध्ये 'कॉरिडॉर ट्रेन्स' सुरू झाल्या.

**१०) संदेशवहन तंत्रज्ञानातील प्रगती :**



औद्योगिक क्रांतीच्या वेगाला विद्युत शक्तीने अधिक गती व चालना देण्याचे काम केले. विद्युत शक्तीच्या शोधामुळे विविध क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडून आले, त्यामुळे संदेशवहनांच्या साधनातही क्रांती घडण्यास हातभार लागला. सन १८३७ मध्ये मोर्स या संशोधकाने 'टेलिग्राफ'चा शोध लावला. यानंतर सन १८४४ मध्ये जगातील पहिला तारायंत्रावरील संदेश वॉशिंग्टनहून वाल्टिमोर येथे पाठविला गेला. सन १८५० मध्ये इंग्लंड, फ्रान्स या दोन देशामध्ये तारायंत्रावर देवघेव सुरू झाली. संदेशवहन क्षेत्रात आणखी प्रगती झाली व १८४० मध्ये रॉलॅड हिल याने इंग्लंडमध्ये टपाल व्यवस्था अस्तित्वात

आणली. टपाल व्यवस्थेमुळे संदेशांची देवाण-घेवाण अत्यंत कमी वेळेत व कमी खर्चात होण्यास मदत झाली.

चार्ल्स व्हिटस्टोन या इंग्रज संशोधकाने विद्युत बिनतारी तारायंत्रांचा शोध लावला. इंग्लंड व फ्रान्स या दोन देशा दरम्यान सन १८५१ मध्ये समुद्राखालून पहिली केबल टाकण्यात आली. संदेशवहनाच्या क्षेत्रात या केबलने मोठीच क्रांती केली. लवकरच संपूर्ण युरोपखंडामध्ये केबलचे जाळे निर्माण झाले व सन १८६६ मध्ये 'ट्रान्स अटलांटिक' केबल टाकली गेली. यानंतर अलेक्झांडर ग्राहम बेल याने सन १८७६ मध्ये टेलिफोनचा शोध लावला. बेलच्या या शोधाने संदेशवहन क्षेत्राला एका वेगळ्या उचीवर नेले. सन १८८८ मध्ये जर्मन हर्टझ या संशोधकाने रेडिओ तरंगाचा शोध लावला. टेलिफोन व तारायंत्र ही संदेशवहनाची अतिशय उपयुक्त साधने होती, परंतु तारा नादुरुस्त झाल्यास यांच्या वापरामध्ये अडथळा निर्माण होत असे. सन १८९६ मध्ये मार्कोनी या इटालियन संशोधकाने यावर मात करत बिनतारी संदेश यंत्राचा शोध लावला. बिनतारी संदेश यंत्राच्या शोधाने संदेशवहन क्षेत्रात क्रांतीकारी बदल झाला.

**११) शेती क्षेत्रातील शोध व सुधारणा :**

औद्योगिक क्रांतीबरोबरच विज्ञानातील विविध शोधांनी शेती क्षेत्रातही बदल झाले. १८ व्या शतकाच्या सुरुवातीस इंग्लंडमधील प्रमुख धंदा शेती हाच होता. पारंपारीक पद्धतीने ब्रिटिश लोक शेती करीत. जमिनीचा कस कायम राहावा म्हणून दर दोन वर्षानी पीक काढल्यावर एक वर्ष जमीन पडीक ठेवली जाई. परिणामी इंग्लंडमध्ये लागवडीखालील एकूण जमीनीच्या २/३ जमीन दर वर्षी पडीक राहत होती. औद्योगिक क्रांतीबरोबर लोकसंख्येची वाढ झपाट्याने वाढत गेल्याने त्यांच्या अन्नधान्याचा प्रश्न निर्माण झालेला होता. अन्नधान्याचा प्रश्न सोडवण्यासाठी संशोधन चालू असताना लॉर्ड टाऊन्शेड या निवृत्त लष्करी अधिकाऱ्याने पीक बदलून जमीनीचा कस वाढवता येतो यावर संशोधन केले. या पद्धतीला 'नार्कोक पद्धती' म्हणत. लागोपाठ धान्याचे उत्पादन घेण्याऐवजी मध्येच गाजर, सलगम यासारखे कंदवर्गीय पीक काढल्यास जमिनीचा कस कायम राहतो व कंदवर्गीय गुरा-ढोरांना खाद्य म्हणून उपयोग होऊ लागल्याने गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न सुटला. हिवाळ्याच्या आरंभी गुरांचा चाऱ्याअभावी जो संहार होत होता तोही आपोआपच बंद झाला. इंग्लंडमधील शेती पद्धतीतही बदल झाला. कुंपण घालण्याची नवीन पद्धत अवलंबण्यात आली. सन १८३० पर्यंत इंग्लंडमध्ये जवळपास सर्व शेतजमीनीस व कुरणांना कुंपन घालण्यात आले. बहुतांश जमीन जमीनदारांच्या हातात होती. याशिवाय यावर प्रतिबंध घालण्याकरिता सन १८०१ मध्ये इंग्लंड पार्लमेंटने शेती मालकीसंबंधी कायदा पास केला. परिणाम शेतीचे विकेंद्रीकरण झाले व उत्पादन वाढले.

इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून येण्यास १८ व्या शतकात जे अनेक शोध लागले व ज्या प्रकारे उत्पादन तंत्रात बदल व सुधारणा झाल्या त्यामुळे औद्योगिक क्रांती घडून आली. ह्या औद्योगिक क्रांतीचा परिणाम इतर देशावरही झाला व तेथे उत्पादनतंत्र व उत्पादन पद्धतीत बदल घडून आला. ज्या क्रांतीकारक शोधांच्यामुळे औद्योगिक क्रांती घडून आली व जगातील अनेक देशांच्या औद्योगिक प्रगतीला चालना मिळाली, विविध क्षेत्रात लागलेल्या शोधांनी दूरगामी परिणाम घडवून आणले. त्यामुळे शेती, उद्योगधंदे, वाहतूक, व्यापार व सरकारी धोरण या सर्वच क्षेत्रात आमुलाग्र बदल झाला.

● **स्वय अध्ययन प्रश्न – २.**

**अ) रिकाम्या जागा लिहा.**

१. धावता धोटा या यंत्राचा शोध ............ या संशोधकाने लावला.

२. जल चौकट या यंत्राचा शोध ............ या संशोधकाने लावला.

३. न्यूकॉमेन या संशोधकाने ............ यंत्राचा शोध लावला.

४. डर्बी या संशोधकाने ............ मध्ये दगडी कोळशापासून लोखंड शुद्ध करण्याची पद्धत शोधली.

५. मायकेल फ्ररेडे याने ............ या उपकरणाचा शोध लावला.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. इंग्लंडमध्ये आधुनिक पद्धतीचे रस्ते बांधण्याचे तंत्र कोणी शोधले?

२. वॉर्सा ते मँचेस्टर हा पहिला कालवा कोणी खोदला?

३. रॉबर्ट फुल्टन याने आगबोटीचा शोध कोणत्या साली लावला?

४. इंग्लंडमधील शेतीक्षेत्रात कोणत्या व्यक्तीने महत्त्वपूर्ण बदल घडवून आणला?

५. रेल्वे इंजिनचा शोध कोणी लावला?

**१.२.३ औद्योगिक क्रांतीचे परिणाम :**

इंग्लंडमध्ये घडून आलेल्या औद्योगिक क्रांतीचे दूरगामी व मूलभूत स्वरूपाचे अनेक चांगले वाईट परिणाम सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनावर घडून आले. औद्योगिक क्रांतीच्या परिणाम स्वरूप इंग्लंडमधील उद्योगधंदे व व्यापाराला गती व चालना मिळाली. उद्योगधंदे व व्यापारांच्या माध्यमातून इंग्लंड हे आर्थिकदृष्ट्या सधन बनले, आरमारी शक्ती वाढली, वाहतूक क्षेत्रात इंग्लंडचे वर्चस्व निर्माण झाले. युरोपमधील इतर देशांच्या तुलनेत नेपोलियन बरोबर शेवटपर्यंत संघर्ष केला. किंबहूना 'नेपोलियनची साम्राज्य नौका लॅकैशायर व यार्कशायर मधील कारखान्यांच्या धुराड्यावरच आदळून फुटली' असे म्हटले जाते. परंतु औद्योगिक क्रांतीचा हा तत्कालिक परिणाम होता असे म्हटले पाहिजे.

**१) घरगुती उद्योगांचा ऱ्हास झाल्याने बेकारीचा प्रश्न निर्माण झाला :**

औद्योगिक क्रांतीच्या अगोदर घरगुती पारंपारीक उद्योगधंद्याचे प्रमाण अधिक होते. सन १७५० नंतर लागलेल्या शोधामुळे व यांत्रिक सुधारणामुळे उत्पादनाचे तंत्र व स्वरूप ह्यामध्ये आमुलाग्र बदल झाला. परिणामी घरगुती उद्योगधंद्याचा ऱ्हास झाला. पारंपारिक उद्योगांचा ऱ्हास झाल्याने काही काळ इंग्लंडमध्ये बेकारीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला. बेकारीचा हा प्रश्न सरकारला लवकर सोडवता आला नाही. घरगुती उद्योगांचा ऱ्हास व यांत्रिक पद्धतीने उत्पादन सुरू झाल्याने एक यंत्र अनेक माणसाचे काम करत होते त्यातून हा बेकारीचा प्रश्न

निर्माण झालेला होता.

**२) कारखानदारी पद्धतीचा उदय (फॅक्टरी पद्धती) :**

पारंपारीक उद्योगधंद्याची जागा यांत्रिक पद्धतीच्या कारखानदारीने घेतली. नवीन यंत्राच्या शोधाने नविन उत्पादन पद्धती अस्तित्वात आली. या यांत्रिक उत्पादन पद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणे आवश्यक होते. यामध्ये कौटुंबिक व कमी भांडवलावर आधारीत उत्पादन पद्धती टिकून राहिली नाही. भांडवलदारांनी विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवून नवीन यांत्रिक उत्पादन पद्धतीवर अधिक भर दिला. परिणामी कारखानदारी पद्धती अस्तित्वात आली.

**३) भांडवलदारांचा उदय :**

इंग्लंडमध्ये पूर्वीपासून जमीनदार व व्यापारी वर्गाचे वर्चस्व होते. परंतु यांत्रिक उत्पादन पद्धती अस्तित्वात आल्यानंतर उत्पादनात व व्यापारात फार मोठ्या प्रमाणात बदल झाला. वाढत्या व्यापारी मालाची मागणी पूर्ण करण्यासाठी पारंपारीक उत्पादन पद्धती ऐवजी यांत्रिक उत्पादन पद्धती आली व कारखानदारी पद्धतीची सुरुवात झाली. परंतु या यांत्रिक उत्पादन पद्धतीत भांडवलही मोठ्या प्रमाणात गुंतवावे लागत होते. या बदलत्या परिस्थितीत भांडवली गुंतवणूक करणारा भांडवलदारांचा एक वर्ग निर्माण झाला. औद्योगिक क्रांती काळात व्यापार इतका तेजीत होता की, भांडवलदारांना प्रचंड नफा अल्पावधीत मिळू लागला. भांडवलदारांनी मिळालेला नफा पुन्हा नवीन उद्योगधंद्यात गुंतवण्यास सुरुवात केली. परिणामी भांडवलाचे केंद्रीकरण होण्यास सुरुवात झाली. औद्योगिक क्रांतीने संपन्न अशा भांडवलदार वर्गाला जन्म दिला.

**४) शहरीकरण :**

इंग्लंडच्या उत्तरेकडील प्रदेशात दगडी कोळसा, लोखंडाच्या खाणी व कापड उद्योगाची वाढ झाल्याने दक्षिण भागातील लोकसंख्येचे स्थलांतर उत्तरेत होऊ लागले. त्याचबरोबर या काळात लोकसंख्या वाढीचा दरही अधिक होता. उत्तर भागात नविन शहरांचा उदय झाला तर दक्षिणेतील जुन्या शहरांची वाढ झाली. मँचेस्टर, शेफील्ड, लिव्हरपूर, लीडस, ग्लासगो, न्यू कॅसल इत्यादी शहरांची लोकसंख्या सतत वाढत गेली. ग्रामीण भागातील लोकसंख्येचे स्थलांतर शहराकडे झाल्याने शहरीकरणात वाढ झाली. परंतु अनेक समस्या निर्माण झालेल्या होत्या. याशिवाय क्रांतीकाळात इतर देशातूनही मोठ्या प्रमाणात लोकसंख्येचे स्थलांतर झालेले होते.

**५) लोकसंख्येतील वाढ व वाढत्या नागरी समस्या :**

वैद्यक शास्त्रातील नव-नविन शोधामुळे जननदर व मृत्युदर यात फार मोठी तफावत निर्माण झाली. मृत्यूदरातील झालेली प्रचंड घट व वाढती लोकसंख्या यामुळे इंग्लंडमधील लोकसंख्येत लक्षणीय वाढ झाली. सन १७५० मध्ये इंग्लंडची लोकसंख्या ६,७५,००० इतकी होती तर ही संख्या सन १८०० मध्ये १८,६५,००० इतकी झाली, म्हणजे १७५०-१८०० ह्या काळात इंग्लंडची लोकसंख्या ५० पटीने वाढली. वाढत्या लोकसंख्येबरोबर अन्नधान्य, आरोग्य सुविधा, पाण्याच्या सुविधा, प्रदूषण, गलिच्छ वस्त्यांची वाढ इ. नागरी समस्या वाढत गेल्या. याशिवाय अंतर्गत शांतता व सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण झालेला होता.

### ६) अतिरिक्त उत्पादन वाढीमुळे परराष्ट्र व्यापारात वाढ :

औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादन पद्धतीत बदल झाला. यांत्रिक उत्पादन पद्धतीच्या माध्यमातून कारखानदारी पद्धती अस्तित्वात आली व अतिरिक्त उत्पादनात वाढ झाली. सन १७८८-१८५१ या काळात लोखंडाचे उत्पादन ३७ पटीने वाढले तर कोळशाचे उत्पादन १० पट वाढले. कापड उद्योगामध्ये कापसाचा वापर ४० पटीने वाढले. वाढत्या कच्चा मालाच्या प्रमाणात पक्क्या मालाच्या उत्यादनातही प्रचंड वाढ झालेली होती. वाढत्या अतिरिक्त उत्पादनाबरोबर आयात-निर्यातीचे प्रमाणही वाढले. सन १७६० ते १८५० या काळात आयातीचे प्रमाण १२ पट वाढले व निर्यातीचे प्रमाण १३ पट वाढले. यातून इंग्लंडच्या परराष्ट्र व्यापारात झालेली वाढ लक्षात येते. सन १८१५ मध्ये इंग्लंडची आयात ३३ कोटी पौंड व निर्यात ५९ कोटी पौड किंमतीची होती तर ती १८२१ मध्ये ८१० कोटी पौडपर्यंत गेलेली होती. सन १८३० मध्ये इंग्लंडची आयात ४,८९,५२,५३८ पौंड इतकी होती व निर्यात ६,९६,९१,३०० पौड होती. यावरून इंग्लंडचा परराष्ट्र व्यापार किती तरी पटीने वाढलेला दिसतो.

### ७) श्रमविभागणी :

क्रांतीपूर्व काळात उत्पादन व्यवस्थेत कारागिराला स्वतंत्र व महत्त्वाचे होते. क्रांतीकाळात उत्पादन पद्धतीत प्रचंड बदल झाला. यांत्रिकीकरणाबरोबर कामगारांचे महत्त्व कमी झाले. उत्पादन व्यवस्थेत नव्या तंत्राला अनुसरून प्रत्येक कामाचे श्रमविभाजन (Specialization) झाल्याने कारागिरांना ठराविक साच्याचेच काम वाट्याला येऊ लागले. कारागीर यंत्राचा गुलाम बनला. त्यामुळे नवीन व्यवस्थेत एखादी वस्तू पूर्णपणे निर्माण केल्याचा आनंद कारागीरांना मिळेनासा झाला. शिवाय ठराविक पद्धतीच्या साचेबंद कामाचा कारागीरांच्या आयुष्यावरही विपरित परिणाम झाला.

### ८) कामगारवर्गाच्या समस्या व संघटनांचा उदय :

क्रांतीकाळात भांडवलदार व कामगारांचा उदय झाला. भांडवलदार व कामगार वर्गाचे हितसंबंध यामध्ये परस्पर विरोधी असल्याने या दोन वर्गात संघर्ष निर्माण झाला. पुरुष कामगारांना अधिक वेतन द्यावे लागत असल्याने स्त्रिया व लहान मुलांना कारखानदार अधिक पसंती देत. कारण पुरुषांच्या तुलनेत यांचे वेतन फारच कमी होते. हे जरी खरे असले तरी पुरुष किंवा स्त्रिया यांना मिळणारा पगार अत्यंत कमी होता. असुरक्षितता व अस्वच्छ वातावरण अशा स्वरूपाच्या समस्या कामाच्या ठिकाणी होत्या. भांडवलदारांची मक्तेदारी असल्याने पगार कमी, कामाचे तास जास्त व अनेक जाचक अटी असल्याने कामगारांची पिळवणूक होत होती. या कामगार वर्गाच्या दयनीय अवस्थेची नोंद चार्ल्स डिकन्स यांनी आपल्या 'डेव्हिड क्रॉफ्ट फिल्ड' या कादंबरीत घेतलेली आहे. भांडवलदार किंवा कारखानदार अधिक नफ्याच्या अपेक्षेने कामगारांची अधिक पिळवणूक करू लागलेला होता. दारिद्र्य, उपासमार आणि बेकारी यामुळे कामगार व कारखानदार यांच्यात संघर्षाची स्थिती निर्माण झालेली होती. यांत्रिक उत्पादन पद्धतीमुळे कारखानदारी उदयास आलेली होती. कारखानदारी पद्धतीमुळे अनेक कामगार एकत्र काम करत असल्याने एकमेकांच्या सुख दुःखांची जाणीव होऊन त्यांच्यात एकी निर्माण होण्यास मदत झाली. सरकारने यासंदर्भात अलिप्ततेचे धोरण स्विकारल्यामुळे स्वतःच्या हितसंबंधाचे रक्षण

करण्यासाठी संघटना स्थापन करण्याची गरज निर्माण झाली. कामगार संघटना स्थापन करून स्वतःच्या हिताचे रक्षण करणे आवश्यक झाले. यातून कामगार संघटना उदयास आल्या. त्यामुळे कामगार संघटनांना औद्योगिक क्रांतीचे अपत्य मानले जाते.

**९) घटनात्मक परिणाम (पार्लमेंटमधील प्रतिनिधीत्वात बदल) :**

औद्योगिक क्रांतीकाळात खेड्यातील लोकसंख्या मोठ्या प्रमाणात शहरामध्ये स्थलांतरीत झाली. विविध प्रकारचे कारखानेही शहरांच्या सभोवतालीच निर्माण झाल्याने कारखान्यांच्या सभोवताली लोकसंख्येचे केंद्रीकरण झाले. एकाच ठिकाणी मोठ्या संख्येने लोकसंख्येचे केंद्रीकरण होऊ लागल्याने प्रशासनाच्या नागरी समस्या निर्माण झालेल्या होत्या. ह्या समस्या बहुतांशी कामगार वर्गाच्या असल्याने त्या सोडवण्यासाठी कामगार संघटनांचा उदय झाला. यातून कामगार चळवळी उभ्या राहिल्या.'चॉर्टिस्टाची चळवळ' हे याचेच प्रातिनिधीक स्वरूप होते. या चळवळीच्या माध्यमातून कामगारांनी पार्लमेंटमध्ये प्रतिनिधीत्व मिळवण्याचा प्रयत्न केला. क्रांतीपूर्व काळात ब्रिटिश पार्लमेंटमध्ये जमीनदारांचे वर्चस्व होते, परंतु औद्योगिक क्रांतीने भांडवलदार कारखानदार वर्गाचा उदय झालेला होता. आर्थिक पाठबळाच्या जोरावर कामगारांच्या बरोबर हाही वर्ग पार्लमेंटमध्ये प्रतिनिधीत्व मिळवण्यासाठी प्रयत्न करीत होता. परंतु बदललेल्या परिस्थितीत पार्लमेंटच्या निवडणुकीच्या बाबतीत सुधारणा घडवून आणणे आवश्यक झाले व भांडवलदार, कारखानदार व कामगारांना पार्लमेंटमध्ये प्रतिनिधीत्व मिळाले. परिणामी जमीनदारांचे वर्चस्व कमी झाले.

**१०) शेती व्यवसायावर झालेला परिणाम :**

इंग्लंडमध्ये क्रांतीपूर्व काळात शेती हा मुख्य व्यवसाय होता. ७५ % लोकसंख्या शेतीवर अवलंबून होती. परंतु औद्योगिक क्रांतीने उत्पादन पद्धतीत झालेला क्रांतीकारक बदल व्यापाराला चालना देणारा घटक ठरला. औद्योगिक वस्तूची निर्यात करून अन्नधान्याची व कच्चा मालाची आयात करता येते हे लक्षात आल्यानंतर शेतीला दुय्यम स्थान मिळाले. परिणामी शेतकरी व शेतमजूर यांना खेडे गावे सोडून शहराकडे धाव घ्यावी लागली. औद्योगिक क्रांती बरोबर शेती क्रांतीही घडून आली, परंतु यामुळे छोटे-छोटे शेतकरी नष्ट झाले अथवा बाजूला फेकले गेले. कारण भांडवलदार वर्गाने छोट्या-मोठ्या जमीनी खरेदी केल्या, त्यामुळे जमीनीवरसुद्धा भांडवलदारांचेच वर्चस्व निर्माण झाले. शेतकऱ्यांना मात्र कारखान्यामध्ये कामगार म्हणून काम करण्याची वेळ आली.

**११) वैचारिक परिणाम :**

औद्योगिक क्रांतीच्या परिणामस्वरूप आर्थिक क्षेत्रात व्यक्तीचे स्वातंत्र्य (Individualism) मान्य करण्यात आले. आर्थिक क्षेत्रात स्पर्धा असणे ही गोष्ट नैसर्गिक मानण्यात आली व सरकारने त्यात कोणतीही ढवळाढवळ करू नये असा याचा अर्थ होता. मागणी तसा पुरवठा या तत्त्वानुसार आर्थिक क्षेत्रात जे बदल होत होते आणि त्यामध्ये कामगारांची जी परिस्थिती असेल ती त्यांनी मान्य करावी. सरकारने त्यात कोणताही हस्तक्षेप करू नये या अँडम स्मिथच्या (Principle of Laisses Fare) तत्त्वाला सरकारने मान्यता दिली. परिणामी

कामगारांच्या समस्या संदर्भात सरकार काहीही करण्यास तयार नव्हते. भांडवलशाही अर्थरचने विरुद्ध कामगार संघटना असा संघर्ष निर्माण झाला. या संघर्षाची पहिली प्रतिक्रिया म्हणून समाजवादाचे तत्त्वज्ञान समोर आले. समाजवादी तत्त्वज्ञानाने कामगार वर्गाच्या समस्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यामुळे समाजवादी विचारसरणी लवकरच लोकप्रिय झाली.

**१२) साम्राज्यवादी धोरणात वाढ :**

इंग्लंडमध्ये क्रांतीकाळात कारखाने व गिरण्याची सतत वाढ होत गेली. यांत्रिक उत्पादन पद्धतीमुळे कारखान्यातून मोठ्या प्रमाणात उत्पादन घेण्यासाठी कच्चा माल प्राप्त करणे व तयार झालेल्या पक्क्या मालासाठी हक्काची बाजारपेठ असणे गरजेचे होते. ह्या दृष्टीने वसाहती स्थापन करणे,साम्राज्य वाढवण्यासाठी युद्धे चालू ठेवणे व नवीन प्रदेश प्राप्त करणे या धोरणाचा अधिक प्रभावीपणे वापर करण्यास सुरुवात झाली. यामुळे इंग्लंडने वसाहती स्थापण्याचे व साम्राज्य वाढविण्याचे धोरण स्विकारले.

**१३) राजकीय परिणाम :**

औद्योगिक क्रांतीचा महत्त्वाचा परिणाम म्हणजे भांडवलदारांचा उदय. यांत्रिक उत्पादन पद्धतीत अधिक-अधिक भांडवल गुंतवणे गरजेचे असल्याने इंग्लंडच्या आर्थिक क्षेत्रात बदल झाला. पारंपारिक जमीनदारांचे वर्चस्व कमी होऊन भांडवलदारांचे वर्चस्व निर्माण झाले. शेतीप्रधान इंग्लंड उद्योगप्रधान झाला. कारखानदारी पद्धतीमुळे कामगारांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली व त्यांचे केंद्रीकरणही झाले. आपले हक्क व कर्तव्य यासाठी कामगार वर्गात जाणीवजागृती घडून आली व कामगार चळवळी उभ्या राहिल्या. कामगार चळवळीच्या माध्यमातून कामगार संघटना निर्माण झाल्या व त्यांनी राजकारणावर पकड निर्माण करण्याचा प्रयत्न चालवला. नव्याने उदयास आलेल्या भांडलवदार वर्गानेही पार्लमेंटमध्ये वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न चालवलेला होता. औद्योगिक क्रांतीच्या काळात इंग्लंडमध्ये मध्यम वर्गाची संख्या मोठी झालेली होती. या मध्यम वर्गाने राजकारणात उदारमतवादी विचारसरणीस प्रोत्साहन देण्यास महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे इंग्लंडच्या राजकारणात कामगार व मध्यम वर्गाला महत्त्व प्राप्त झाले. यांच्या माध्यमातून राजकारणात उदारमतवादी विचारसरणी अधिक लोकप्रिय झाली.

**१४) औद्योगिक क्रांतीचा इतर देशावर झालेला परिणाम :**

इंग्लंडमध्ये १८ व १९ व्या शतकात घडून आलेल्या औद्योगिक बदलांचा जगातील अनेक देशावर अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम घडून आला. प्रस्तुत उपघटकामध्ये फ्रान्स, जर्मनी, अमेरिका व भारतावर प्रतिनिधीक स्वरूपामध्ये काय परिणाम झाला याचा आढावा घेणार आहोत.

**अ) फ्रान्स :**

इंग्लंडमध्ये घडून आलेली औद्योगिक क्रांती पाहून युरोपमधील इतरही राष्ट्र धडपड करू लागली होती. इंग्लंडमध्ये कामगार वर्गात झालेली जागृती पाहून फ्रान्समधील कामगार व मध्यम वर्गाने सनदशीर मार्गा ऐवजी क्रांतीचा मार्ग अवलंबला. सन १७८९ च्या जगप्रसिद्ध फ्रेंच राज्यक्रांतीनंतर सन १८३०, १८४८ व १८७१ अशा

तीन सलग क्रांत्या फ्रान्समध्ये घडून आल्या. फ्रान्समधील राजेशाहीला बाजूला सारण्यासाठी फ्रान्समधील कामगार व मध्यम वर्गाने केलेला हा प्रयत्न होता. फ्रेंच राज्यक्रांतीमधून फ्रान्समध्ये इंग्लंडच्या धर्तीवर चांगले दिवस येण्यास मदत झाली. आफ्रिकन फ्रेंच वसाहतीत फ्रान्सला अधिक बाजारपेठा मिळाल्याने फ्रान्समधील कामगारांच्या उत्पादनाला अधिक वाव मिळण्यास मदत झाली.

**ब) जर्मनी :**

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीच्या पार्श्वभूमीवर आपण मागे राहू की काय? या भितीने सन १८७० नंतर जर्मन सरकारने आक्रमक व चढाऊ धोरण स्विकारले. जर्मनीमधील विविध उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयकरण केले व शास्त्रीय संशोधनास सरकारने उत्तेजन दिले. उशिराने सुरू झालेली जर्मनीतील औद्योगिक क्रांती सरकारी उत्तेजनामुळे झपाट्याने पुढे गेली. परंतु कारखान्यातून तयार झालेल्या प्रचंड मालाला बाजारपेठा उपलब्ध नव्हत्या. पर्यायाने तो माल जर्मन सरकारने स्वतःच खरेदी करण्यास सुरुवात केली. खासकरून लष्करी साहित्य उत्पादनास अधिक प्रोत्साहन दिले व तेही साहित्य स्वतःच खरेदी केले. इतर युरोपीय राष्ट्राच्या वसाहतवादी राजकारणात स्वतःला सक्रिय केले. उत्पादीत मालास बाजारपेठा मिळवाव्यात व त्यासाठी अधिकाधिक वसाहती ताब्यात घेण्याचा प्रयत्न चालू केला. जर्मनीच्या आक्रमक सम्राज्यवादी धोरणाच्या परिणाम स्वरूप पहिल्या महायुद्धाला तोंड द्यावे लागले.

**क) अमेरिका :**

अमेरिकेमध्ये नवीन आलेल्या लोकशाही संघ सरकारने अलिप्ततेचे (Policy of Isolation) धोरण स्विकारलेले होते. युरोपातील राजकारण, मंदी किंवा बेकारीची अमेरिकेला फारसी झळ बसलेली नव्हती. आपल्या औद्योगिक उत्पादनावर त्यांनी अधिक भर दिला. अविरत अतिरिक्त उत्पादनामुळे १९ व्या शतकाच्या अखेरीस अमेरिका हे अत्यंत सधन व समृद्ध राष्ट्र बनले. औद्योगिक क्रांतीचाच हा परिणाम समजला पाहिजे.

**ड) भारत :**

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचा भारतावर विपरीत परिणाम झालेला दिसतो. क्रांतीपूर्व काळात भारतातून खूप मोठ्या प्रमाणात कापडाची निर्यात होत होती, शिवाय या कापडाला इंग्लंडमध्ये ग्राहक चांगला मिळत होता. परंतु इंग्लंडमधील सरकारने भारतातील कापडावर अधिक आयात कर बसवून भारतातील कापडाच्या आयातीस प्रतिबंध घातला. भारतातील उद्योगधंद्याचा ऱ्हास घडून आणला आणि भारत केवळ एक कच्चा माल उत्पादीत करणारा देश राहील याची खबरदारी घेतली, परिणामी भारतातील ग्रामीण उद्योगधंदे बुडाले. कारागीर बेकार झाले. भारत ही इंग्लंडसाठी कच्चा माल उत्पादीत करणारी व इंग्लंडमध्ये तयार झालेल्या पक्क्या मालासाठी हक्काची बाजारपेठ असलेली केवळ वसाहतच बनून राहिली. सन १७५७ मध्ये प्लासीच्या युद्धाने ब्रिटिश सत्तेची भारतातील मुळे घट्ट झाली तर याच दशकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली. रजनी पाम दत्त म्हणतात की, भारताची लूट हा इंग्लंडच्या भांडवलाचा झरा होता आणि त्यांच्यामूळे इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीला चेतना मिळून ती प्रत्यक्षात अवतीर्ण झाली.

● **स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

**अ) रिकाम्या जागा लिहा.**

१. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीने ............ पद्धतीची सुरुवात झाली.

२. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीच्यापूर्वी ............ हा आर्थिक उत्पादनाचा महत्त्वाचा घटक होता.

३. औद्योगिक क्रांतीने इंग्लंडच्या ............ भागात लोकसंख्येचे स्थलांतर झाले.

४. ............ ना औद्योगिक क्रांतीचे अपत्य मानले जाते.

५. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीने भारतातील ............ चा वापर घटला.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. अमेरिकेने इंग्लंडच्या औद्योगिक क्रांतीच्या काळात कोणते धोरण स्विकारले?

२. औद्योगिक क्रांतीने इंग्लंडमध्ये कोणत्या दोन वर्गाचा उदय झाला?

३. चार्लस डिकन्स यांनी इंग्लंडमधील कामगारवर्गाचे चित्रण करणारी कोणती कादंबरी लिहिली?

४. इंग्लंडमधील चॉर्टिस्टाची चळवळ कोणत्या वर्गाच्या हितासाठी काम करीत होती?

५. इंग्लंडमधील पार्लमेंटवरती औद्योगिक क्रांतीच्या अगोदर कोणत्या वर्गाचे वर्चस्व होते?

## १.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

क्रांति : मानवी जीवनातील मूलभूत फेरबदल, अथवा स्थित्यंतरे, अशा स्थित्यंतराचे स्वरूप भौतिक, वैचारिक असू शकते.

औद्योगिक क्रांती : उत्पादन पद्धतीत झालेला वेगवान व आमुलाग्र बदल म्हणजे औद्योगिक क्रांती.

पेटंट : एखाद्या शोधाबद्दल संशोधकाच्या नावाने दिला जाणारा एकमेव व अधिकृत मालकी हक्क.

वाणिज्यवाद : १५ व्या शतकात युरोपमध्ये या संकल्पनेचा उदय झाला. थॉमस मन यांनी सर्वप्रथम वाणिज्यवाद हा शब्द वापरला, वाणिज्यवादाचा सुरुवातीचा विचार देशाअंतर्गत अर्थ-व्यवस्था एका सुत्रात बांधावी असा होता. नंतरच्या काळात वाणिज्यवादी अर्थव्यवस्थेत आयात-निर्यातीचाही समावेश करण्यात आला. ब्रिटिशांच्या अर्थव्यवस्थेचा वाणिज्यवाद हा महत्त्वाचा घटक होता.

वसाहतवाद : वसाहतवाद म्हणजे दुसऱ्या देशात जाऊन तेथील काही प्रदेश प्राप्त करून तेथे व्यापार, धर्मसुधारणा व धर्माचा प्रसार करणे व त्यांचा माध्यमातून तेथे राजकीय प्रभुत्व निर्माण करणे आणि त्यावर राज्य करणे होय.

भांडवलशाही : आधुनिक युगाची वाटचाल मध्ययुगीन संरजामशाही व्यवस्थेतून भांडवलशाही व्यवस्थेत झाली. वाणिज्यवादी अर्थव्यवस्थेचे दुसरे रूप म्हणजे भांडवलशाही. वाणिज्यवादातून कारखानदारी व त्यामधून आयात-निर्यात करून भांडवल संचय करणे. भांडवल संचयाच्या माध्यमातून पुन्हा कारखानदारी व त्यातून अधिक अधिक नफा कमविणे म्हणजे भांडवलशाही.

मुक्त व्यापार : ॲडम स्मिथ या अर्थ तज्ज्ञाने मुक्त व्यापारांची संकल्पना मांडली. सरकारी हस्तक्षेपाशिवाय व्यापार व उद्योगधंदे वाढविता येतात. असा अर्थ अभिप्रेत आहे.

फॅक्टरी पद्धती : (कारखानदारी) १९ व्या शतकाच्या सुरुवातीस इंग्लंडमध्ये 'फॅक्टरी पद्धती' अस्तित्वात आली. उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी पारंपारिक पद्धती व कारागीरांच्या ऐवजी आधुनिक तंत्र व यंत्राचा वापर केला जातो. एकाच प्रकारचे कारखाने व एकाच प्रकारचे कारागीर एकत्रित आणले जातात त्याला फॅक्टरी पद्धती असे म्हणतात.

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे.

- **स्वयं अध्ययन प्रश्न – १**

अ) १) मँचेस्टर व लॅंकेशायर २) सन १६८८ ३) सन १६९४
४) पेटंट ॲक्ट ५) प्रोटेस्टंट

ब) १) सन १७७६ २) लिव्हरपूल, कापूस ३) लोखंड व कोळसा
४) लाब धाग्याचा ५) सन १६६२

- **स्वयं अध्ययन प्रश्न – २**

अ) १) जॉन के २) रिचर्ड आर्क राईल ३) ॲटमॉसकेरिफ स्टीप पंप
४) सन १७०९ ५) डॉयनॅमो

ब) १) जॉन मॅकडम व टेलफोर्ड २) ड्यूक ऑफ ब्रिजवॉटर ३) १८०७
४) लॉर्ड टाऊन्शेड ५) जॉर्ज स्टिफन्सन

- **स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

अ) १) फॅक्टरी २) शेती ३) उत्तर
४) कामगार संघटना ५) कापड

ब) १) अलिप्तता २) भांडवलदार व कामगार ३) क्राफ्ट फिल्ड जमीनदार
४) कामगार ५) जमीनदार

## १.५ साराश :

इंग्लंडमध्ये घडून आलेल्या औद्योगिक क्रांतीने उत्पादन पद्धतीत आमूलाग्र व मूलभूत स्वरूपाचा बदल घडून आला. इंग्लंडच्या राष्ट्रीय जीवनात एका अर्थाने परिवर्तन घडून आले. यांत्रिक उत्पादन पद्धतीमुळे व यांत्रिक सुधारणामुळे स्थल कालाचे अंतर तुटले व मानवास जागतिक दृष्टी प्राप्त झाली असेच म्हणावे लागेल. इंग्लंडमधील औद्योगिक प्रगतीमुळे १९ व्या शतकात इंग्लंडला सर्व जगाचा कारखाना (Workshop of the world) असे स्वरूप प्राप्त झाले. १९ व्या शतकातील ब्रिटिश आर्थिक विकासाने एका नव्या समाजाला, सामाजिक संबंधांना, नव्या संस्कृतिला जन्म दिला. भांडवलशाही विकासाबरोबरच या क्रांतीमधून सामाजिक विषमता, दारिद्रय, असुरक्षितता आणि कामगार वर्गाची दुरावस्था इ. समस्याही निर्माण झाल्या. कामगार वर्गाने आपले हक्क व होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी चळवळी उभ्या केल्या. यातून कामगार संघटना निर्माण झाल्या. या कामगार संघटनांना औद्योगिक क्रांतीचे अपत्य मानले जाते. औद्योगिक क्रांतीचे इंग्लंड किंवा संपूर्ण मानव जातीवर चांगले किंवा वाईट परिणाम झालेले दिसतात. एकीकडे विविध क्षेत्रातील औद्योगिक उत्पादने मानवी जीवन अधिक गतीमान व सुखी होण्यास मदत झाली. तर दुसरीकडे या क्रांतीने भांडवलशाही वर्गाची निर्मिती केली. या भांडवलदार वर्गाने लवकरच आर्थिक साम्राज्यवादाचा विषारी विळखा निर्माण केला. यांत्रिक उत्पादन पद्धतीबरोबर वाणिज्यवादी अर्थव्यवस्था विकसीत झाली. वाणिज्यवादाने वसाहतवाद व साम्राज्यवादाला खतपाणी घालण्याचे काम केले. परिणामी राष्ट्रा-राष्ट्रात अंतर्गत व वसाहतीक स्पर्धा निर्माण झाली. या सर्वांचा परिणाम म्हणजे अखिल विश्वाला पहिल्या महायुद्धाला सामोरे जावे लागले.

## १.६ सरावासाठी स्वध्याय :

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. औद्योगिक क्रांती म्हणजे काय? औद्योगिक क्रांतीची कारणे स्पष्ट करा?

२. औद्योगिक क्रांतीच्या वाटचालीस कारणीभूत ठरलेल्या विविध शोधाची चर्चा करा?

३. औद्योगिक क्रांतीच्या परिणामांची चर्चा करा?

४. औद्योगिक क्रांतीने नवीन युगाचा प्रारंभ झाला का ? तुम्हास काय वाटते?

**ब) थोडक्यात टिपा लिहा.**

१. कापड उद्योगातील महत्वाचे शोध.

२. कोळसा व लोखंड उत्पादनातील सुधारणा.

३. संदेश आणि दळवळण क्षेत्रातील शोध.

४. औद्योगिक क्रांतीचे इतर देशावरील परिणाम.

**१.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचंनासाठीचे ग्रंथ :**


१. गोखले रा. म., आर्थिक इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७१.

२. सरदेसाई बी. एन., इंग्लंडचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.

३. सुर्यवंशी एम. एच., व वाडकर वाय. जी., आधुनिक आर्थिक विकास, कोल्हापूर, १९७८.

४. देसाई श्री. मु., व महाजन वाय. एस., इंग्लंडचा आर्थिक इतिहास, पुणे, १९७१.

५. कोलारकर श. गो., युरोपचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९७२.

६. शिरगावकर शरावती, आधुनिक युरोप, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

७) Bhattarcharjee Arun, World Revolutions, Ashish Publishing House, New Delhi, 1958.

8) Dunham, Arthur Louis, The Industrial Revolution in France, 1815-1848, New York,Exposition Press,1955

9) Jacob, Margaret C.,Scientific Culture and the Making of the Industrial West, Oxford: Oxford University Press,1997

10) Kisch, Herbert, From Domestic Manufacture to Industrial Revolution the Case of the Rhineland Textile Districts, Oxford University Press, 1989.

11) Mantoux, Paul, The Industrial Revolution in the Eighteenth Century, (First English translation 1928 ed.,1928.


❖ ❖ ❖

## घटक – ३

# अमेरिकन राज्यक्रांती १७७६

## (American Revolution - 1776)

**अनुक्रमणिका :**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ अ कारणे

३.२.२ ब महत्वाच्या घटना

३.२.३ क परिणाम

३.३ पारिभाषिक शब्द , शब्दार्थ

३.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भ ग्रंथ

### ३.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अध्ययनानंतर खालील गोष्टींचे विद्यार्थ्यांना आकलन होईल.

- नवे जलमार्ग शोधण्यासाठी युरोपियन दर्यावर्दीकडून झालेले प्रयत्न व त्यातून अमेरिका या नव्या खंडाचा लागलेला शोध.
- अमेरिकेत ब्रिटिश वसाहतीची स्थापना.
- क्रांतीपूर्व काळातील ब्रिटिशांचे वसाहतींवरील अधिसत्तेचे स्वरूप.
- ब्रिटिशांनी वसाहतींमध्ये राबवलेली आर्थिक धोरणे आणि ब्रिटिशांचा वसाहतींकडे बघण्याचा दृष्टिकोन.
- वसाहतींची झालेली सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय प्रगती, वसाहतींमध्ये झालेला उदारमतवादाचा विकास

- वसाहतींची क्रांतीच्या दिशेने झालेली वाटचाल
- राज्यक्रांतीच्या काळातील महत्त्वाच्या घटनांचे स्वरूप
- ब्रिटीशांच्या पराभवाची आणि वसाहतीच्या विजयाची कारणे
- अमेरिकन राज्यक्रांतीचे विविध परिणाम

All men are created equal, that they are endowed by their Creator with certain unalienable Rights, that among these are Life, Liberty and the pursuit of Happiness.- That to secure these rights, Governments are instituted among Men, deriving their just powers from the consent of the governed,-That whenever any Form of Government becomes destructive of these ends, it is the Right of the People to alter or to abolish it, and to institute new Government.

Thomas Jefferson in the Declaration of Independence, July 4, 1776.

'निसर्गतः मानव स्वतंत्र असून मुक्त आहे. सर्व मानव जन्मतः समान असून प्रत्यक्ष विधात्यानेच सर्वांना स्वातंत्र्य व सुख संपादन करण्याचा हक्क दिला आहे. या हक्काच्या संरक्षणासाठी प्रजा शासनसंस्था निर्माण करत असते. जेंव्हा ही शासन संस्था प्रजेचे मुलभूत हक्क डावलते तेंव्हा ती बदलण्याचा, बरखास्त करण्याचा आणि नवी शासनसंस्था स्थापन करण्याचा पूर्ण हक्क प्रजेस आहे '

थॉमस जेफरसन, स्वातंत्र्याचा जाहीरनामा, ४ जुलै १७७६.

## ३.१ प्रास्ताविक :

आधुनिक जगातील बलशाली राष्ट्र म्हणून आज अमेरिकन संघराज्याचे (United States of America) नाव घेतले जाते. जागतिक राजकारणाची सूत्रे हाती एकवटलेल्या अमेरिकेचा इतिहास सुमारे अडीचशे वर्षाचा आहे. नव्याने शोध लागलेल्या उत्तर अमेरिका खंडात ब्रिटीशांच्या परवानगीने तेरा वसाहती स्थापन झाल्या. ब्रिटीशांचे सार्वभौमत्व मान्य करणाऱ्या या तेरा वसाहती कालांतराने ब्रिटीशांच्या दमन नीतीविरुद्ध एकत्र आल्या आणि त्यांनी लढा उभा केला. त्यांच्या स्वातंत्र्यावर बंधने घालणाऱ्या साम्राज्यवादी – बलाढ्य ब्रिटीशांना त्यांनी जिद्दीच्या जोरावर पराभूत केले. यानंतर वसाहतींच्या एकीकरणाच्या दिशेने पाऊले टाकली गेली. ब्रिटीशांविरुद्ध केलेली ही राजकीय क्रांतीच होती. साम्राज्यवाद्यांच्याविरोधात संघर्ष करण्याची प्रेरणा या क्रांतीने जगाला दिली. फ्रेंच जनतेनेही या क्रांतीपासून प्रेरणा घेत अन्यायी ब्युरबॉन राज्यसत्तेविरुद्ध उठाव केला. अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा तर अनेक राष्ट्रांचे प्रेरणास्थान ठरला. लोकशाही, व्यक्तीस्वातंत्र्याला चालना देतानाच या क्रांतीने धर्मसंस्थांचा राजकीय जीवनावरचा प्रभाव कमी करून सामान्य लोकांचा राजकारणातील सहभाग वाढवला. वैचारिक क्षेत्रातही मोठे बदल होत गेले. आधुनिक जगातील लिखित राज्यघटनेनुसार चालणारे पहिले प्रजासत्ताक राष्ट्र अमेरिकेच्या रूपाने जन्माला आले. थोडक्यात अमेरिकन राज्यक्रांतीचा प्रभाव जागतिक राजकारणावरही

पडला त्यामुळेच जागतिक इतिहासात अमेरिकन राज्यक्रांतीला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे.

### ३.१.१ ख्रिस्तोफर कोलंबस आणि अमेरिकेचा शोध :

युरोपमधील प्रबोधनाचा कालखंड हा अनेक नव्या शोधांना जन्म देणारा ठरला. या कालखंडात युरोपातील धाडसी दर्यावर्दींनी आशिया आणि इतर खंडाकडे जाणारे जलमार्ग शोधून काढले. हे जलमार्ग पुढे व्यापार वृद्धीसाठी उपयुक्त ठरले. ख्रिस्तोफर कोलंबस हा एक धाडसी दर्यावर्दी होता. जन्माने इटालियन असलेल्या ख्रिस्तोफरला स्पेनचा राजा फर्डिनांड आणि राणी इसाबेलाने प्रोत्साहन आणि आर्थिक मदत दिली. पृथ्वी गोल आहे हे मत यावेळी मान्य झाले होते. या गृहीततत्वाच्या आधारे भारताकडे जाणारा जलमार्ग शोधण्याच्या उद्देशाने कोलंबसने ऑगस्ट १४९२ मध्ये युरोपमधून पश्चिम दिशेने जलप्रवास सुरु केला. सोबत नीना, पिंटा आणि सांता ही तीन जहाजे आणि अठ्ठ्याऐंशी खलाशी होते. सत्तर दिवसाच्या खडतर प्रवासानंतर तो अमेरिका खंडानजीकच्या पूर्व दिशेस असलेल्या बहामा बेटावर ऑक्टोबर १४९२ मध्ये पोहोचला. आपण भारताच्या भूमीत पोहोचलो आहोत असे वाटून त्याने तिथल्या ताम्रवर्णीय निवासींना रेड इंडियन्स (Red Indians) असे नाव दिले. हे नाव आजही प्रचलित आहे. अमेरिका खंडाच्या रूपाने नव्या भूमीचा शोध लागला. कोलंबसने आणखी तीन सफरी काढून क्युबा, कॅरेबियन बेटे शोधत दक्षिण अमेरिकेची भूमीही गाठली. याच दरम्यान अमेरिगो वेस्पुची याने स्पेनतर्फे पश्चिमेच्या दिशेने पहिली मोहीम काढली. उत्तर अमेरिका खंडात पोहोचलेल्या अमेरिगोने सध्याचे व्हेनेझुएला हे ठिकाण शोधले. ॲमेझॉन नदीचा उगमही त्याने शोधून काढला. १५०१ मध्ये दुसरी मोहीम काढून त्याने आणखी काही ठिकाणे शोधली. या भूभागाची त्याने आपल्या मित्राला कळवलेली सविस्तर वर्णने युरोपात प्रकाशित झाली. या वर्णनातून अमेरिकेची माहिती युरोपियन लोकांना कळली. युरोपमधील मार्टिन व्हाल्टझेम्युलर याने १५०७ मध्ये आपल्या ग्रंथात या नव्या भूभागास अमेरिगोच्या नावावरून अमेरिका हे नाव दिले. ते प्रचलित झाले. तोपर्यंत त्याला कोलंबसच्या प्रवासाविषयी माहिती नव्हती. अमेरिकेचा प्रथम शोध लावणारा कोलंबस मात्र उपेक्षित राहिला. अमेरिकन खंडाच्या शोधाने युरोपियन राष्ट्रांच्या व्यापारास चालना मिळाली. युरोपियनांनी अमेरिका खंडातील संसाधनांची अक्षरशः लूट केली.

### ३.१.२ अमेरिका खंडात युरोपियन वसाहतींची स्थापना :

या नव्या खंडात वसाहती स्थापन करण्यासाठी स्पेन आणि पोर्तुगाल यांच्यात स्पर्धा सुरू झाली. कोलंबसने सेंटो डोमिंगो येथे वसाहत स्थापन करून तेथे उसाचे उत्पादन घ्यायला सुरवात केली. दक्षिण अमेरिकेत वसाहती स्थापन करण्यासाठी स्पेन आणि पोर्तुगाल यांच्यातील संघर्ष टाळण्यासाठी पोप अलेक्झांडर सहावा याने मध्यस्थी केली आणि प्रदेशांचे वाटप केले. या दोन्ही राष्ट्रांची दक्षिण अमेरिकेत मक्तेदारी निर्माण झाली. या दोन्ही राष्ट्रांनी तेथून अमाप फायदा मिळवायला सुरवात केली. तेथील मुळच्या रहिवासी असलेल्या इन्का, ॲझटेक, माया अशा संस्कृती युरोपियनांचे आक्रमण थोपवू शकल्या नाहीत. या भागात लॅटीन भाषेचा प्रसार झाला त्यामुळे हा भाग लॅटीन अमेरिका नावाने प्रसिद्ध झाला. या भागातून दोन्ही राष्ट्रांनी प्रचंड संपत्ती मिळविली हे पाहून ब्रिटन, फ्रान्स, हॉलंड या राष्ट्रांनाही या भागात आपल्या वसाहती असाव्यात असे वाटू लागले. अखेरीस ब्रिटनचा राजा सातवा हेन्री याने पोपचे आदेश धुडकावून लावत या भूमीकडे आपल्या जॉन कॅबेट या खलाशास

सन १४९६ मध्ये पाठविले. त्याने अमेरिकेपर्यंत प्रवास करून तेथे वसाहती स्थापन करण्याच्या हक्काचा पाया रचला. मात्र त्याच्यानंतर जवळ जवळ शंभर वर्षानंतर अमेरिकन भूमीत वसाहत स्थापन करण्यासाठी ब्रिटीशांनी प्रत्यक्ष प्रयत्न सुरु केले. १५८४ मध्ये सर वॉल्टर रॅले याने राणी एलिझाबेथकडून परवाना मिळवून उत्तर कॅरोलिना शेजारच्या बेटात व्हर्जिनिया ही वसाहत स्थापन करण्याचा प्रयत्न केला मात्र तो अयशस्वी ठरला. यातून धडा घेत ब्रिटीश व्यापारी एकत्र आले आणि उत्तर अमेरिका खंडातील जेम्स नदीच्या काठावर जेम्स टाऊन या नावाने शहर स्थापन केले. पुढे याचेच रुपांतर वसाहतीत झाले आणि या वसाहतीस 'व्हर्जिनिया' हे नाव दिले गेले.

● **ब्रिटिश वसाहतींची स्थापना :**

ब्रिटिश व्यापाऱ्यांना आपला उद्योग – व्यवसाय वाढविण्यासाठी नवा प्रदेश योग्य वाटत होता. तेथून कच्चा माल मुबलक प्रमाणात मिळेल आणि ब्रिटनमध्ये तयार झालेल्या मालाला बाजारपेठ मिळेल असा त्यांचा अंदाज होता. या काळात ब्रिटनमध्ये बेरोजगारी वाढून चोऱ्या, लूटमाऱ्या होऊ लागल्या होत्या. बेरोजगारांचा प्रश्न नव्या वसाहतींमुळे सुटेल आणि वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न सोडविता येईल असे मत काही मंडळींनी व्यक्त केले. कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंट पंथातील मतभेद वाढत चाललेले होते. प्रोटेस्टंट आणि प्युरिटीन्सना धार्मिक छळाला सामोरे जावे लागत होते. अशा अनेकांना देश सोडून दुसरीकडे जावे असे वाटत होते. एकूणच अमेरिका खंडात नव्या वसाहती स्थापन व्हाव्यात असे अनेकांना वाटत होते. अशा वसाहती स्थापन करण्यास ब्रिटनने परवानगी दिली पण त्याचबरोबर त्यावर ब्रिटनच्या राजाचा अधिकार राहिल असेही स्पष्ट केले. ब्रिटिश सरकार बरोबरच व्यापारी आणि इतरांनीही पुढाकार घेऊन वसाहती स्थापन केल्या. या वसाहतींमधील वातावरण युरोपियन लोकांना सहन होण्यासारखे होते यामुळेही युरोपीयन लोक मोठ्या प्रमाणावर आकर्षित झाले.

१६०७ ते १७३२ या कालखंडात उत्तर अमेरिका खंडाच्या पूर्व किनाऱ्यावर तेरा वसाहती स्थापन झाल्या. या वसाहती पुढीलप्रमाणे –

**१) व्हर्जिनिया** (Virginia) : ब्रिटीश व्यापाऱ्यांनी १६०७ मध्ये या वसाहतीची स्थापना केली.

**२) मॅसॅच्युसेट्स** (Massachusetts) : प्युरिटीन्सनी केपकॉन्ड येथे वसाहत स्थापन केली. ती नंतर प्लायमाऊथ या नावाने ओळखली जाऊ लागली. १६३० मध्ये मॅसॅच्युसेट्स बे नावाची कंपनी स्थापन करून आणखी काही प्यूरीटीन्स येथे आले आणि ही वसाहत मॅसॅच्युसेट्स या नावाने ओळखली जाऊ लागली.

**३) मेरिलँड** ( Maryland) **:** पहिल्या चार्लस कडून रीतसर सनद घेऊन ब्रिटीशांनी ही वसाहत १६३२ मध्ये स्थापन केली.

**४) न्यूयॉर्क** (New York) **:** डचांनी १६०९ मध्ये स्थापन केलेली ही वसाहत ब्रिटीशांनी १६६४ मध्ये जिंकून घेतली. या परिसरास न्यूयॉर्क हे नाव दिले.

**५) डेलावेअर** (Delaware) **:** १६४० मध्ये स्वीडिश लोकांनी स्थापन केलेली ही वसाहत प्रथम डचांनी जिंकून घेतली. नंतर डचांकडून ब्रिटीशांनी याचा ताबा मिळविला.

**६) कनेक्टीकट** (Connecticut) **:** १६६२ मध्ये ब्रिटिश राजाकडून सनद घेऊन प्यूरीटीन्सनी अधिकृतरीत्या या वसाहतीचा विकास घडवून आणला.

**७) न्यू जर्सी** (New Jersey) **:** डचांनी स्थापन केलेली ही वसाहत १६६४ मध्ये ब्रिटीशांनी जिंकून घेतली.

**८) न्यू हॅम्पशायर** (New Hampshire) **:** प्युरिटीन्सनी स्थापन केलेल्या न्यू इंग्लंड राज्य संघातील न्यू हॅम्पशायर १६७९ मध्ये स्वतंत्र वसाहत म्हणून विकसित झाले.

**९) पेनसिल्व्हानिया** (Pennsylvania) **:** विचारवंत विल्यम पेन याला ही वसाहत स्थापन करण्यासाठी दूसरा चार्ल्स याने सनद दिली होती. त्याच्या नावावरून १६८२ मध्ये ही वसाहत विकसित झाली .

**१०) ऱ्होड आयलंड** (Rhode Island ) **:** न्यू इंग्लंड संघातील या वसाहतीला ब्रिटिश राजाने १६८५ मध्ये सनद दिली आणि याचे स्वतंत्र वसाहतीत रूपांतर झाले.

**११) दक्षिण कॅरोलिना** (South Carolina) **:** या भागातील स्पॅनिश वर्चस्वाला शह देण्यासाठी दुसऱ्या चार्ल्सने १६७० मध्ये लॉर्ड शॅफ्टबरी आणि इतर ब्रिटिश जमीनदारांना हा भाग विकला. हाच प्रदेश दक्षिण कॅरोलिना वसाहत म्हणून विकसित झाला.

**१२) उत्तर कॅरोलिना** (North Carolina) **:** व्हर्जिनीया वसाहतीत असलेला हा प्रदेश १७२९ साली स्वतंत्र करण्यात आला आणि उत्तर कॅरोलिना या नावाने ओळखला जाऊ लागला.

**१३) जॉर्जिया** (Georgia) **:** जेम्स एडवर्ड ओगलथार्पने १७३२ मध्ये स्वतःच्या मालकीच्या जमिनीवर ही वसाहत स्थापन केली. किंग जॉर्जच्या स्मरणार्थ याला जॉर्जिया असे नाव दिले. ब्रिटीशांनी सनद दिलेली ही शेवटची वसाहत ठरली.

यातील काही वसाहती ब्रिटीश सत्तेने, काही खाजगी व्यापारी कंपन्यांनी, शेतकऱ्यांनी, काही स्थलांतरित व्यक्तींनी पुढाकार घेऊन तर काही वसाहती विशिष्ट गटाच्या लोकांनी एकत्र येऊन स्थापन केल्या होत्या. या वसाहतीवर नंतर ब्रिटनचे प्रशासन प्रस्थापित झाले. या वसाहतीमध्ये ब्रिटन बरोबरच युरोपमधील इतर राष्ट्रातले लोक एकत्र येऊन स्थायिक झाले. येथे ब्रिटिश लोकांचे प्रमाण जास्त होते त्यामुळे वसाहतींवर ब्रिटिश विचारांचा प्रभाव अधिक होता. येथील लोक विविध वर्णाचे आणि वंशाचे होते. युरोपमधून विविध भागातून आलेले खिश्चन धर्मातील क्वेकर (Quakar), इव्हॅनजेलिकल (Evangellical), प्रोटेस्टंट (Protestant), कॅथॉलिक (Catholic), प्युरिटीन्स (Puritans) इ. पंथाचे लोक राहू लागले. आर्थिक हलाखी, धार्मिक छळ याला कंटाळून येथे आलेल्या लोकांना प्रगतीची संधी मिळाली. परस्पर सहकार्य आणि कष्टाच्या जोरावर या लोकांनी प्रगती केली. नव्या विचाराच्या समाजाची यामुळे निर्मिती झाली. उत्तर अमेरिका खंडात स्पेन-फ्रेंच इ. युरोपियन राष्ट्रांच्या वसाहतीही स्थापन झाल्या. मात्र ब्रिटीश वसाहती इतकी त्यांची प्रगती होऊ शकली नाही .

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ अ) अमेरिकन राज्यक्रांतीची कारणे :

ब्रिटीशांच्या परवानगीने स्थापन झालेल्या, ब्रिटीशांचे अधिपत्य मान्य केलेल्या वसाहतींनी हे अधिपत्य झुगारून देण्यासाठी प्रयत्न सुरु केले आणि राज्यक्रांती घडून आली. अर्थात ही अचानक घडून आलेली घटना नव्हती अनेक गोष्टी त्यासाठी कारणीभूत होत्या त्या पुढीलप्रमाणे :

**१) ब्रिटीशांचा वसाहतीकडे बघण्याचा दृष्टीकोन :**

ब्रिटीशांच्या पुढाकाराने तेरा अमेरिकन वसाहतींची स्थापना झाली होती. या वसाहतीबाबत ब्रिटीशांनी एक विशिष्ट धोरण ठरविले ते म्हणजे ब्रिटनची भरभराट घडवून आणण्यासाठी वसाहतींचा पुरेपूर वापर करणे किंबहुना मायभूमीची भरभराट हेच वसाहतींचे एकमेव उद्दीष्ट असले पाहिजे असे ब्रिटीशांचे ठाम मत होते. यातून ब्रिटीशांना फायद्याचे ठरतील अशीच धोरणे आणि कायदे तेथे राबविले गेले. त्यांच्या गरजेच्या वस्तू उत्पादन करण्याचे परवाने दिले. कॅलिफोर्नियाने फक्त तिळाचे उत्पादन घ्यायचे तर व्हर्जिनियाने फक्त तंबाखूचे उत्पादन करावे असे बंधन घातले गेले. ब्रिटिश उद्योगधंद्याशी स्पर्धा करतील असे लोखंडी सामान, कपडे इ. उद्योगांना परवानगी नाकारली. आयात-निर्यातीबाबतसुद्धा अनेक बंधने घातली गेली. थोडक्यात वसाहतीकडे बघण्याचा ब्रिटनचा दृष्टीकोन हा पूर्णपणे साम्राज्यवादी होता. लोकशाही तत्वाचा उदो उदो करणारे ब्रिटन हे वसाहतीबाबत मात्र खूपच भेदभाव करत होते. आर्थिक फायद्यासाठी त्यांनी वसाहतीवर मजबूत पकड बसविली. या सर्व गोष्टीमुळे वसाहतींचे खूपच आर्थिक नुकसान होऊ लागले. यातूनच वसाहतीमध्ये असंतोष निर्माण होत गेला.

**२) अमेरिकन समाजाची जडणघडण :**

वसाहतींवर जरी ब्रिटनची मालकी असली तरी ब्रिटन बरोबरच युरोपातील विविध राष्ट्रातून विभिन्न वंशाचे लोक तेथे येवून कायमस्वरूपी स्थायिक झाले. मूळ निवासी रेड इंडियन, ब्रिटिश, आयरीश, जर्मन, डच, स्पॅनिश, पोर्तुगीज तसेच शेतात राबण्यासाठी आणलेले निग्रो, गुलाम इ. लोकांच्या वर्ण संकरातून नवसमाजाची निर्मिती झाली. सुरुवातीच्या टप्प्यात तेथे आलेल्या लोकांची जन्मभूमी अमेरिका नव्हती पण ती त्यांची कर्मभूमी ठरली. नंतरची पिढी मात्र अमेरिकेत जन्माला आली आणि वाढली ती त्यांची मातृभूमी ठरली. अमेरिकेत स्थलांतरीत झालेले लोक अत्यंत उद्योगी आणि कष्टाळू होते. असंख्य अडचणींना तोंड देत त्यांनी कमी काळात प्रगती केली होती. त्यांच्या प्रगतीत अडथळा ठरणारे राजसत्तेचे किंवा धर्मसत्तेचे वर्चस्व त्यांना नको होते. ब्रिटीशांनी त्यांच्या या भावनेकडे दुर्लक्ष केले होते. वसाहतीतील नवविचारांच्या समाजाला ब्रिटिशांचे अतिरेकी वर्चस्व नको वाटू लागले. त्यांच्या मनातील स्वातंत्र्याची भावना वाढत गेली त्याचेच रुपांतर क्रांतीत झाले.

**३) वसाहतींनी केलेली शैक्षणिक सांस्कृतिक प्रगती :**

आर्थिक प्रगतीबरोबरच वसाहतींनी शैक्षणिक, सांस्कृतिक प्रगती घडवून आणली त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. वसाहतींनी प्राथमिक शिक्षण धोरण राबविताना त्याच्या बरोबर सार्वजनिक वाचनालये, ग्रंथालये

सुरू केली. छापखान्यामूळे वृत्तपत्रांची सुरुवात झाली. दर्जेदार साहित्य – वाङ्मय समाजापर्यंत पोहचू लागले. उच्च शिक्षणासाठी हॉवर्ड, कोलंबिया, पेनसिल्व्हानिया यासारखी विद्यापीठे सुरू करण्यात आली. विद्यापीठातून गणित, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, अर्थशास्त्र यासारखे विषय शिकवले जाऊ लागले. लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य यासारखी मूल्ये तरुणपिढीत रुजविण्यात या शिक्षणव्यवस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली. उत्तम दर्जाचे शिक्षक, वकील, विचारवंत निर्माण झाले. त्यांनी समाजाला बुद्धिवादी बनविण्यात मोठी भूमिका बजावली. नव्या विचारांच्या येथील समाजाला ब्रिटिशांची अतिरेकी बंधने अधिक जाचक वाटू लागली. ही बंधने झुगारून देण्याकडे वाटचाल सुरू झाली. वसाहतींचा सांस्कृतिक आणि नैतिक विकास घडवून आणण्यात येथे स्थलांतरित झालेल्या प्युरीटिन धर्मगुरूंचे योगदान मोठे होते. त्यांनी नव अमेरिकन समाजात नीतिमूल्ये रुजवली.

**४) प्रशासकीय ज्ञान :**

वसाहतींचा विकास होत गेला. त्याचबरोबर तेथील प्रशासन व्यवस्थाही विकसित होत गेली. राज्यकारभार चालविण्यासाठी लोकनियुक्त प्रतिनिधींची कायदेमंडळे स्थापन केली होती. तर ब्रिटिशांमार्फत प्रत्येक वसाहतीमध्ये गव्हर्नरची नियुक्ती केलेली होती. राज्यकारभाराचे उत्तम ज्ञान वसाहतवाल्यांनी यातून मिळवले होते. वसाहतींची लोकनियुक्त सभा वसाहतीसाठी कायदे करणे, कर आकारणे, वसुली करणे, न्यायालय स्थापन करणे इत्यादी कार्ये पार पाडत होती. मॅसॅच्युसेट्स वसाहतीने लोकशाहीचा यशस्वी प्रयोग केला. ब्रिटिश प्रतिनिधी शिवाय आपण राज्यकारभार चालवू शकतो हा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झालेला होता. हा आत्मविश्वास वसाहतकारांना राज्यक्रांतीसाठी प्रेरणा देणारा ठरला. ब्रिटिशांतर्फे नेमलेल्या गव्हर्नरने स्थानिक शासन संस्थेचा आदर करत योग्य कारभार करावा असे अपेक्षित होते. पण प्रत्यक्षात ते साम्राज्यवादी ब्रिटिशांचे प्रतिनिधी बनले. जास्तीत जास्त आर्थिक फायदा मिळविण्यासाठी ब्रिटनने राजकीय सत्तेची पकड घट्ट करत त्यांनी कारभार सुरू केला. जो वसाहतवाल्यांना जाचक वाटू लागला.

**५) सप्तवार्षिक युद्धोत्तर परिस्थिती :**

उत्तर अमेरिका खंडात ब्रिटिश वसाहतींच्या उत्तरेला आणि पश्चिमेला फ्रेंचांनी आपल्या वसाहती स्थापन केल्या होत्या. ब्रिटिश वसाहतींना फ्रेंचाच्या आक्रमणाची सतत भीती वाटत असे. वसाहतींना स्वसंरक्षणासाठी मायदेशाच्या सैन्याची आवश्यकता होती आणि त्यामुळेच वसाहती ब्रिटनने घातलेली अनेक अन्यायी राजकीय, आर्थिक बंधनेही निमूटपणे मान्य करत होती. १७५६–१७६३ या काळात ब्रिटन आणि फ्रान्स यांच्यात सप्तवार्षिक युद्ध झाले. यामध्ये ब्रिटनने फ्रान्सचा पराभव केला. या युद्धानंतर झालेल्या पॅरिस करारान्वये ब्रिटिश वसाहतींना लागून असलेला फ्रेंचांचा प्रदेश ब्रिटिशांना मिळाला. फ्रेंचांना आपल्या वसाहती सोडाव्या लागल्या. ब्रिटीश वसाहतीवरचे फ्रेंचांचे दडपण नाहीसे झाले. फ्रेंच आक्रमणाची सतत वाटणारी भीती कायमची दूर झाली. ब्रिटिशांच्या संरक्षणछत्राची त्यांना आता गरज उरली नाही. सप्तवार्षिक युद्धानंतर वसाहतींच्या पश्चिमेकडील भाग ब्रिटनच्या ताब्यात आला. हा प्रदेश अत्यंत सुपीक होता. वसाहतकारांना येथे विस्तार करण्यास मज्जाव करण्यात आला. यामुळे वसाहतकारांच्यात असंतोष निर्माण झाला. ब्रिटिशांची सर्व धोरणे वसाहतींवर निर्बंध घालणारी होती. या युद्धाच्या वेळी वसाहतीतले तरुण ब्रिटिश सैन्यात भरती झाले होते. त्यांना आधुनिक युद्धतंत्राची

माहिती झाली. त्याचा उपयोग पुढे राज्यक्रांतीच्या वेळी झाला. एकूणच सप्तवार्षिक युद्धाचा वसाहतींना दुहेरी फायदा झाला आणि त्यांच्यातील ब्रिटिश विरोध वाढत गेला.

**६) वसाहतींवर निर्बंध घालणारे धोरण :**

वसाहतींमध्ये आलेले लोक वेगवेगळ्या कारणांमुळे स्थलांतरित झाले होते. याचे महत्वाचे कारण हे आर्थिक होते. त्यांना स्वत:ची आर्थिक भरभराट करून घ्यायची होती. त्यासाठी कष्ट घेण्याची त्यांची तयारी होती. परंतु ब्रिटीशांनी अनेक निर्बंध घातले. त्यामुळे त्यांना ते शक्य झाले नाही. ब्रिटनच्या गरजेच्या वस्तू उत्पादन करणाऱ्यांना सहाय्य करणे, ब्रिटिश उत्पादित मालाशी स्पर्धा करणाऱ्यात अमेरिकन मालावर जबर आयात कर बसविणे, अमेरिकन मालाची ने-आण करण्यासाठी केवळ ब्रिटिश जहाजांचाच वापर करणे, असे अनेक निर्णय वसाहतींवर लादण्यात आले. यामध्ये ब्रिटिश मालाची मक्तेदारी राहील याची पुरेपूर काळजी त्यांनी घेतली. वसाहती या ब्रिटीशांच्या व्यापारी स्पर्धक बनू नयेत तसेच फ्रान्स आणि इतर युरोपियन राष्ट्रांना वसाहतींचा फायदा मिळू नये, या दृष्टीनेही ब्रिटीशांनी पावले उचलली. यातूनच त्यांनी वसाहतींचे नियमन करण्यासाठी विविध कायदे केले. प्रगती करू इच्छिणाऱ्या वसाहतीतील अनेकांसाठी ब्रिटीशांनी घातलेले निर्बंध अडथळा ठरत होते. यामुळे त्यांच्यातील असंतोष वाढत गेला.

**७) लोकशाही विचारांचा वारसा :**

वसाहतीतले बरेच लोक हे मुळचे ब्रिटनचे रहिवासी होते. ब्रिटनला लोकशाहीची जननी मानले जात होते. मॅग्नाकार्टा, पिटिशन ऑफ राईट्स, बिल ऑफ राईट्स इ. लोकशाहीचे मूलभूत हक्क त्यांनी संघर्ष करून मिळविले होते. १६८९ मध्ये हुकूमशहा राजा दुसरा जेम्स याला तेथील जनतेने सत्तेवरून खाली खेचले आणि पार्लमेंटचे महत्व अबाधित ठेवले होते. ब्रिटिश लोकांप्रमाणेच लोकशाही तत्वांबद्दल वसाहतकारांच्यात प्रचंड आदर होता. त्यामुळे त्यांनी लोकशाही प्रशासन व्यवस्था स्वीकारली होती. वसाहतीतले लोक आपल्या हक्काबाबत जागरूक होते. नव्या पिढीने लॉक, रुसो सारख्या अनेक विचारवंतांच्या ग्रंथाचे वाचन केले होते. त्यामुळे ब्रिटनकडून वसाहतींची होणारी गळचेपी त्यांना नको वाटू लागली. पार्लमेंटमध्ये आमचे प्रतिनिधी नाहीत तर त्यांना आमच्यासाठी कायदे करण्याचा अधिकार नाही, असा विचार यातूनच पुढे आला. स्वातंत्र्य मिळविण्याकडे वसाहतींची वाटचाल सुरू झाली.

**८) वसाहतीवर आर्थिक निर्बंध घालणारे कायदे :**

ब्रिटीशांनी वसाहतींचे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी प्रचंड शोषण केले. यासाठी विविध कायदे त्यांनी वसाहतींवर लादले. १६२१ मध्ये वसाहतींना भरपूर आर्थिक फायदा देणाऱ्या व्हर्जिनियातील तंबाखूच्या खाजगी उत्पादनावर बंदी घालणारा कायदा पास केला. १६५१ मध्ये ऑलिव्हर क्रॉमवेलने 'नौकानयनाचे कायदे' (Navigation Act) पास केला. या ॲक्टनुसार वसाहतीतून निर्यात केला जाणारा माल ब्रिटीशांच्या मालकीच्या जहाजातून पाठवणे बंधनकारक केले. यामुळे डचांची या वाहतुकीवर असलेली मक्तेदारी संपुष्टात आली. १६६० मध्ये ब्रिटीश पार्लमेंटने कायदा करून वसाहतीतून निर्यात होणाऱ्या साखर, कापूस, लोकर, नीळ अशा अनेक

वस्तूंवर बंधने घातली. बोर्ड ऑफ ट्रेड ॲन्ड प्लॅन्टेशन् (Board of Trade and Plantation) नावाचे व्यापारी मंडळ स्थापन करून वसाहतीतील व्यापारावर लक्ष ठेवायला सुरवात केली. ब्रिटनने १६७४ मध्ये लॉर्डस ऑफ ट्रेड (Lords of Trade) समिती स्थापन केली. या समिती मार्फत वसाहतींचा राज्यकारभार अधिक कार्यक्षम करणे, वसाहतीच्या आयात-निर्यात व्यवहारावर बंधन ठेवणे, वसाहतीच्या गव्हर्नरला आदेश देणे, अशी कामे केली जाऊ लागली. या समितीचा वसाहतीतल्या कारभारातला हस्तक्षेप तेथील लोकांना त्रासदायक वाटू लागला.

ब्रिटनमध्ये उत्पादित होणाऱ्या लोकरी कापडाच्या उत्पादनास अमेरिकेत उत्पादित होणाऱ्या लोकरी कपड्याशी स्पर्धा करावी लागू नये म्हणून १६९९ मध्ये वुलन गुड्स मॅन्युफक्चरर रिस्ट्रीक्शन ॲक्ट (Woolen Goods Manufacturer Restriction Act) पास केला. वसाहतींवर गरजेपुरतेच लोकरी कापड उत्पादित करण्याचे बंधन घातले गेले. १७३२ मध्ये हॅट्स ॲक्ट (Hats Act) द्वारे वसाहतीतील जनतेने इंग्लंडमध्ये उत्पादित होणाऱ्या हॅटचाच वापर करावा असा आदेश दिला. खरे तर अमेरिकेत बिव्हर या प्राण्याच्या कातड्यापासून हॅट तयार करण्याचा उद्योग विकसित होऊन खूप फायदाही मिळत होता. पण केवळ स्वतःच्या फायद्याचा विचार करणाऱ्या ब्रिटीशांची जास्तीत जास्त लाभ मिळविण्याची वृत्ती वाढत होती. विशेषतः औद्योगिक क्रांतीनंतर यात भरच पडली.

१७६४ च्या शुगर ॲक्टने वसाहतीतील ब्रिटीश विरोधातील भावना अधिकच वाढली. या ॲक्टमुळे वसाहतींना जवळच्याच क्युबा बेटात तयार होणारी साखर थेट विकत घेता येत नव्हती. ब्रिटिशांमार्फतच विकत घ्यावी लागे. त्यामुळे साखर महाग झाली होती. याशिवाय ब्रिटीशांना १७६३ च्या सप्तवार्षिक युद्धात आलेला अफाट खर्च वसूल करण्यासाठी त्यांनी आणखी निर्बंध वाढवले. विदेशी दारू, रेशीम आणि कापडावरचा कर वाढविण्यात आला. कातड्याची निर्यात केवळ ब्रिटीशांनाच करण्याचे बंधन घालण्यात आले. या सर्व गोष्टीमुळे वसाहतींचे खूप आर्थिक नुकसान होत असे.

वसाहतींनी या सर्वाचा निषेध केला मात्र याकडे दुर्लक्ष करत १७६५ मध्ये 'स्टँप ॲक्ट' (Stamp Act) पास केला. या ॲक्टनंतर वसाहती ब्रिटीशांविरोधात प्रत्यक्ष कृती करू लागल्या. स्टँम्प ॲक्टनुसार वसाहतीतील वृतपत्रे, विविध प्रकारची करारपत्रे, परवाने, परीक्षांची गुणपत्रके खरेदी-विक्रीची कागदपत्रे इ. कागदपत्रावर अर्ध्या पेनी पासून दहा पौंडापर्यंतचे स्टँप लावणे बंधनकारक करण्यात आले. सामान्य लोकांनाही याची आर्थिक झळ बसू लागली. वसाहतीतील अर्थव्यवहारांवर याचा वाईट परिणाम झाला. वसाहतीतील लोकांनी याला कडाडून विरोध केला. सर्वच वसाहतीत आंदोलने होऊ लागली. व्यापाऱ्यांनी ब्रिटीश मालावर बहिष्कार टाकला. न्यूयॉर्क येथे सर्व वसाहतींची परिषद बोलावण्यात आली. या परिषदेत हा जाचक स्टँप ॲक्ट न भरण्याचा निर्णय घेण्यात आला. व्हर्जिनिया विधानसभेत पेट्रिक हेन्रीने घोषित केले की वसाहतींनी निवडून दिलेल्या प्रतिनिधी शिवाय इतर कोणालाही कर बसविण्याचा अधिकार नाही. वाढता विरोध पाहून अखेरीस ब्रिटीश पार्लमेंटने हा ॲक्ट रद्द केला. अशाप्रकारे क्रांतीसाठीचे वातावरण यावेळी तयार झाले.

या प्रसंगातून काहीच बोध न घेता १७६६ मध्ये ब्रिटीश पार्लमेंटने 'टाऊनशेंड ॲक्ट' (Townshend Act) पास केला. ब्रिटनचा अर्थमंत्री चार्लस टाऊनशेड याने या कायद्याद्वारे वसाहतीवर अप्रत्यक्ष करांचा बोजा टाकला. वसाहतीत आयात होणाऱ्या अनेक वस्तूवर जबर जकात बसवली. जकातीच्या वसुलीसाठी जकात खात्याची पुनर्रचना करण्यात आली. या विरोधात वसाहतीत उठाव होऊ लागले. पुढे १७६९ मध्ये हा कायदा रद्द करण्यात आला असला तरी वसाहतीतील वातावरण मात्र प्रक्षुब्ध झाले.

**९) अमेरिकन वसाहती आणि ब्रिटनमधील अंतर :**

हे भौगोलिक कारणही क्रांतीस पोषक ठरले. ब्रिटन आणि अमेरिकन वसाहतीमध्ये सुमारे ३००० मैलाचे अंतर होते. या काळात जलवाहतूक हे एकच संपर्काचे माध्यम होते. वसाहतींवर कडक नियंत्रण ठेवणे ब्रिटीशांना शक्य होत नसे. गव्हर्नरला वसाहतींबरोबर मिळते जुळते घ्यावे लागे. या भौगोलिक परिस्थितीचा फायदा हा अमेरिकन वसाहतींना झाला.

**१०) विचारवंतांचे कार्य :**

महत्वाच्या जागतिक क्रांत्यांचा आढावा घेतला तर त्यामागे विचारवंतांनी प्रमुख भूमिका पार पडलेली दिसते. लोकांच्या मनात क्रांतीची बीजे पेरण्याचे कार्य त्यांनी केले. अमेरिकन वसाहतीमध्ये राष्ट्रवादी विचार पेरण्याचे कार्यही विचारवंतांनी केले. थॉमस पेनने लिहीलेल्या 'कॉमन सेन्स' या ग्रंथाच्या लाखो प्रती वसाहतीमध्ये खपल्या. स्वातंत्र्य संकल्पना खूप लोकप्रिय बनली. सॅम्युल ॲड्म्सने प्रक्षोभक लेखन करत वसाहतकारांना चेतवण्याचे काम केले. जेफरसनने अन्यायी सत्तेविरुद्ध सशस्त्र उठावाचे समर्थन केले. ब्रिटिश पार्लमेंटमध्ये आमचे प्रतिनिधी नाहीत तर कर ही नाही 'ना प्रतिनिधी-ना कर' ही घोषणा अत्यंत लोकप्रिय झाली. बेंजामिन फ्रँकलिनने १७५४ मध्ये अमेरिकन राज्याची कल्पना मांडत वसाहतवादी ब्रिटीशांना धक्का दिला होता. एकूणच तत्ववेत्ते-विचारवंतांनी वसाहतीतल्या लोकांच्या मनात क्रांतीची ज्योत प्रज्वलित केली. अमेरिकन वसाहतींची क्रांतीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली .

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : १**

**रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.**

१) ब्रिटिशांनी अमेरिकेत स्थापन केलेली पहिली वसाहत ........ होय.

अ) जॉर्जिया  ब) व्हर्जिनिया  क) न्यूयॉर्क  ड) मॅसॅच्युसेटस

२) कोलंबस सर्वप्रथम ........... या बेटावर पोहोचला.

अ) बहामा  ब) फिलिपाईन्स  क) लक्षद्वीप  ड) ईस्ट इंडिज

३) कोलंबसने ...........येथे वसाहत स्थापना केली.

अ) कोलंबिया  ब) हिसपनिपोलात  क) क्युबा  ड) जॉर्जिया

४) ही ब्रिटिशांची अमेरिकन खंडात स्थापन झालेली शेवटची वसाहत होय.

अ) मॅसॅच्युसेटस ब) व्हर्जिनिया क) जॉर्जिया ड) डेलावेअर

५) सप्तवार्षिक युद्ध ब्रिटन व.......... यांच्यात झाले.

अ) स्पेन ब) पोर्तुगाल क) फ्रान्स ड) रशिया

६) कॉमन सेन्स या ग्रंथाचे लेखन .......... यांनी केले.

अ) थॉमस पेन ब) जॉर्ज वॉशिंग्टन क) जॉन लॉक ड) मिल्टन

७) ........... या कारणामुळे वसाहतींमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला.

अ) स्टॅम्प ॲक्ट ब) रेग्युलेटिंग ॲक्ट क) टी ॲक्ट ड) टाऊन ॲक्ट

८) अमेरिका खंडातील मूळ रहिवाशांना ........... असे म्हटले जाऊ लागले.

अ) मंगोलियन ब) इंडियन क) रेड इंडियन ड) अमेरिकन

### ३.२.२ ब) राज्यक्रांती काळातील महत्वाच्या घटना :

वसाहती या मातृभूमीच्या कल्याणासाठीच असतात हा विचार मानणाऱ्या ब्रिटीशांनी वसाहतींचे विविध मार्गांनी आर्थिक शोषण केले. विशेषतः औद्योगिक क्रांतीनंतर हे प्रमाण वाढतच गेले. ब्रिटनच्या या धोरणाविरुद्धचा वसाहतीतील असंतोष वाढत गेला आणि अखेरीस त्याचे रुपांतर सशस्त्र राज्यक्रांतीत झाले. या क्रांतीतील महत्वाच्या घटना पुढीलप्रमाणे :

**१) स्टँप ॲक्ट विरोधात परिषद :**

१७६५ मध्ये ब्रिटीशांनी पास केलेल्या स्टँप ॲक्ट विरोधात सर्वच वसाहतीत असंतोष उसळला. व्हर्जिनियातील पॅट्रीक हेन्रीने या ॲक्टचा निषेध करत वसाहतीतील लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीशिवाय कोणालाही कर लादण्याचा अधिकार नाही हे जाहीर केले. मॅसॅच्युसेट्स वसाहतीने पुढाकार घेवून या ॲक्ट विरोधात वसाहतीची परिषद १७६५ मध्ये आयोजित केली. ज्याला नऊ वसाहतीचे प्रतिनिधी हजर होते. वसाहती यानिमित्ताने एकत्र आल्या. सर्वजण अमेरिकन आहोत ही भूमिका मान्य झाली. ब्रिटीशांनी वसाहतीच्या संमतीशिवाय कोणतेही कर लादू नयेत हा ठराव पास करण्यात आला. वसाहती आणि ब्रिटीशांच्यातील संघर्ष तीव्र होत गेला. वाढता विरोध पाहून अखेरीस ब्रिटीशांनी हा कर १७६६ मध्ये रद्द केला.

**२) ना प्रतिनिधी ना कर :**

ब्रिटीश पार्लमेंटमध्ये वसाहतींचा एकही प्रतिनिधी नाही तेव्हा त्यांना वसाहतीवर कर लादण्याचा नैसर्गिक किंवा नैतिक अधिकार नाही. 'ना प्रतिनिधी ना कर' ( No Taxation Without Representation) अशी घोषणा वसाहतींनी केली. "Sons of Liberty and Daughters of Liberty' नावाची वसाहतीतील तरूण

तरुणींची लढाऊ पथके स्थापन झाली. त्यांनी ब्रिटीशांना सशस्त्र विरोध सुरु केला.

**३ बोस्टन टी पार्टी :**

मॅसॅच्युसेट्स वसाहतीतील बोस्टन हे बंदर ब्रिटीश विरोधी आंदोलनाचे प्रमुख केंद्र बनले. ब्रिटीशांनी स्टँप ॲक्ट रद्द केला मात्र १७६७ मध्ये टाऊनशेड ॲक्टनुसार वसाहतीत आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर प्रचंड कर बसविला. तर टी ॲक्ट लादून वसाहतींनी ब्रिटिशांकडून चहा खरेदीची सक्ती केली. वातावरण पुन्हा प्रक्षुब्ध बनले. बोस्टन येथे जकात समितीची स्थापना केली. सॅम्युअल ॲडम्ससारख्या कट्टर राष्ट्रवादी नेत्यांनी आंदोलने सुरु केली. त्याच्या प्रक्षोभक भाषणामुळे लोक आणखी चिडले. बहिष्कार आंदोलन सुरु झाले. हे आंदोलन वाढत गेले. ५ मार्च १७७० रोजी बोस्टन येथे आंदोलक आणि ब्रिटीश सैनिक यांच्यात चकमक झाली. यामध्ये चार नागरिक मारले गेले. या घटनेचे वर्णन 'बोस्टनचे हत्याकांड' असे केले जाऊ लागले. ब्रिटीश विरोध खूप वाढला. अखेरीस १७७० मध्ये चहा व्यतिरिक्त इतर पदार्थावरची जकात रद्द केली. मात्र वसाहतकारांचा त्यालाही विरोध होता. १७७० ते १७७२ हा काळ काहीसा शांततेत गेला नंतर पुन्हा संघर्षास सुरूवात झाली.

१७७३ मध्ये ब्रिटीश पार्लमेंटने टी ॲक्टची अंमलबजावणी सुरु केली. ईस्ट इंडिया कंपनीस वसाहतीत चहा विकण्याची मक्तेदारी मिळाली. कट्टर नेत्यांनी चहावर बहिष्काराचे आवाहन केले. ईस्ट इंडिया कंपनीची चहा घेवून आलेली जहाजे बोस्टन बंदरात नांगरली गेली होती. त्याच्यावरचा माल बंदरात उतरवला जाणार आहे अशी बातमी वसाहतवाल्यांना कळली. १९ डिसेंबर १७७३ रोजी सॅम्युअल ॲडम्स आणि त्याचे सहकारी रेड इंडियन्सचा वेश धारण करून या जहाजावर चढले आणि त्यांनी जहाजावरील चहाच्या ३४२ पेट्या समुद्रात फेकल्या. ही घटना अमेरिकेच्या इतिहासात 'बोस्टन टी पार्टी' (बोस्टन चहा पार्टी) या नावाने प्रसिद्ध झाली. या घटनेनंतर ब्रिटीश अधिकच संतापले. ब्रिटीश सत्तेविरुद्ध केलेली ही बंडखोरी आहे असे जाहीर करून वसाहतवाल्यांना वठणीवर आणण्यासाठी आणखी कायदे पास केले. बोस्टन बंदरातील व्यापार बंद करून मॅसॅच्युसेट्स वसाहतीत नवीन कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जनरल गेज याला सैन्यासह पाठविण्यात आले. वसाहती विरुद्ध ब्रिटीश यांच्यातील संघर्षाने उग्र रूप धारण केले.

बोस्टन टी पार्टी प्रकरणातील गुन्हेगारांवरील खटले ब्रिटनमध्ये चालविले जावेत यासाठी ब्रिटीशांनी ठराव केले. कडक धोरणांमुळे वसाहती दबतील असा ब्रिटीशांचा अंदाज पूर्णपणे फोल ठरला. उलट इतर वसाहतींनी मॅसॅच्युसेट्सला पाठिंबा देत एकत्र येऊन परिषदेचे आयोजन केले.

**४) पहिली फिलाडेल्फिया परिषद (५ सप्टेंबर १७७४) :**

निर्माण झालेल्या परिस्थितीवर विचार करण्यासाठी व्हर्जिनिया वसाहतीने पुढाकार घेवून फिलाडेल्फिया येथे परिषदेचे आयोजन केले. जॉर्जिया वगळून इतर बारा वसाहतींचे प्रतिनिधी हजर होते. बेंजामिन फ्रँकलीन हा या परिषदेचा अध्यक्ष होता. या परिषदेस 'कॉन्टिनेन्टल काँग्रेस' (Continental Congress) असे नाव दिले गेले. यावेळी ब्रिटनच्या राजाकडे साम्राज्यातंर्गत स्वायत्ततेची मागणी करण्यात आली. अन्यायी कायदे रद्द करावेत अन्यथा बहिष्कार आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला. वसाहतीच्या आंदोलनास मार्गदर्शन करण्यासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या. वसाहती आणि ब्रिटीश यांच्यात समेट घडवून

आणण्याचा प्रयत्न बेंजामिन फ्रॅकलीन, एडमंड फ्रॅक इ. नी केला मात्र त्यास यश आले नाही. ब्रिटनचा राजा तिसरा जॉर्जने आक्रमक धोरण स्वीकारले. वसाहती या ब्रिटीश अधिसत्तेच्या अंकित आहेत, त्यांची बंडखोरी सहज दडपता येईल असे त्याला वाटत होते. त्याने वसाहतीत ब्रिटीश फौजा पाठविण्याचे आदेश दिले. वसाहतीनीही स्वसंरक्षणासाठी क्रांतीकारकांची सशस्त्र दले उभारायला सुरूवात केली.

**५) लेक्झिंग्टनची चकमक आणि स्वातंत्र्य युद्धाची सुरवात :**

कंकार्ड शहरात क्रांतिकारकांनी लष्करी शस्त्रास्त्राचा साठा केला आहे अशी बातमी ब्रिटीश सेनानी थॉमस गेजला समजली. त्याने लगेचच आपली एक लष्करी तुकडी पाठवली. मात्र वाटेत लेक्झिंग्टन नावाच्या एका खेडेगावाजवळ १९ एप्रिल १७७५ मध्ये ब्रिटीश सैन्य आणि क्रांतीकारकांच्यात चकमक होऊन आठ क्रांतीकारक मारले गेले. हीच राज्यक्रांतीची सुरवात ठरली. क्रांतिकारकांनी याला प्रत्युत्तर देत गेजच्या अडीचशे सैनिकांना ठार मारले.

**६) दुसरी फिलाडेल्फिया परिषद/कॉन्टिनेन्टल काँग्रेस (८ मे १७७५) :**

प्रत्यक्ष चकमकींना सुरवात झाल्यावर पुढचा कार्यक्रम ठरविण्यासाठी दुसरी फिलाडेल्फिया परिषद बोलविण्यात आली. जॉर्ज वॉशिंग्टनकडे वसाहतीच्या सैन्याचे नेतृत्व अधिकृतरित्या सोपविण्यात आले. त्याने पुन्हा एकदा ब्रिटनच्या राजाकडे अर्ज पाठवून शांततेने प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. परंतु राजाने याला प्रतिसाद दिला नाही आणि वसाहती ब्रिटन विरोधात बंडखोरी करताहेत असे २२ डिसेंबर १७७५ रोजी जाहीर करून बंडाळी मोडून काढण्याचे आदेश दिले. या परिषदेच्या वेळी वसाहतीच्यावतीने कामकाज पाहण्याचा अधिकार कॉन्टिनेन्टल काँग्रेसला देण्यात आला. पुढे १७८९ पर्यंत या काँग्रेसने सर्व वसाहतींच्या वतीने कामकाज पाहीले. प्रत्यक्ष युद्धाच्या दृष्टीने अनेक महत्वाचे निर्णय या परिषदेत घेण्यात आले.

**७) अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा :**

फिलाडेल्फिया परिषदेत वसाहतींनी ब्रिटिशांच्या विरोधातील लढ्यास मान्यता दिली. व्हर्जिनीयाच्या रिचर्ड हेन्री ली याने ७ जून १७७६ रोजी वसाहतीच्या स्वातंत्र्याचा प्रस्ताव मांडला. याचवेळी वसाहतींच्या स्वातंत्र्यलढ्यास नैतिक बळ देणाऱ्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार करण्यासाठी थॉमस जेफरसनच्या नेतृत्वाखाली एक समिती नियुक्त करण्यात आली. बेंजामिन फ्रँकलीन, रॉबर्ट लिव्हिंगस्टन, जॉन ॲडम्स आणि रॉजर शेरमन हे या समितीचे सदस्य होते. स्वातंत्र्यप्राप्ती हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून तयार केलेल्या या जाहीरनाम्याच्या अंतिम मसुद्यास कॉन्टिनेन्टल काँग्रेसने मान्यता दिली. हा जाहीरनामा इतिहासात 'अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा' (Declaration of Independence) या नावाने प्रसिद्ध झाला. ४ जुलै १७७६ रोजी थॉमस जेफरसनने तो सादर केला. हा दिवस अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन ठरला. या जाहीरनाम्यामुळेच वसाहतींच्या लढ्यास असलेले बंडाचे स्वरूप नाहीसे करून त्याला स्वातंत्र्य युद्धाचे स्वरूप प्राप्त करून दिले. मानवी स्वातंत्र्याची ही सनद ठरली. यात 'निसर्गतः मानव स्वतंत्र असून मुक्त आहे. सर्व मानव जन्मतः समान असून प्रत्यक्ष विधात्यानेच सर्वांना स्वातंत्र्य व सुख संपादन करण्याचा हक्क दिला आहे. या हक्काच्या संरक्षणासाठी प्रजा शासनसंस्था निर्माण करत

असते. जेव्हा ही शासन संस्था प्रजेचे मुलभूत हक्क डावलते तेव्हा ती बदलण्याचा, बरखास्त करण्याचा आणि नवी शासनसंस्था स्थापन करण्याचा पूर्ण हक्क प्रजेस आहे,' असे प्रतिपादित करण्यात आले.

प्रजेचे सार्वभौमत्व अधोरेखित करणाऱ्या या जाहीरनाम्याच्या पहिल्या भागात मानवाच्या निसर्गदत्त अधिकारांची, दुसऱ्या भागात ब्रिटिशांकडून वसाहतीवर केलेल्या अत्याचाराची तर तिसऱ्या भागात शासन व प्रजा यांच्यातील संबंधाची चर्चा केलेली आहे. थॉमस जेफरसनने यात जनतेलाही सांगितले की देशभक्तांचे आणि हुकुमशहांचे रक्तसिंचन केल्याशिवाय स्वातंत्र्याचा वृक्ष टवटवीत रहात नाही. यासाठी वसाहतीतील सर्व जनतेला लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले. या जाहीरनाम्यावर विचारवंत लॉक, रुसो, थॉमस पेन इ. च्या विचारसरणीचा प्रभाव पडलेला होता. या जाहीरनाम्याच्या स्वीकृतीमुळे ब्रिटनशी तडजोड अशक्य आहे याची सर्वांनाच जाणीव झाली. वसाहतींना अन्य देशाची मदत मिळणे यामुळे शक्य झाले. अन्यायी राजसत्तेविरुद्धच्या संघर्षात सामान्य लोकांच्या प्रयत्नांना या जाहीरनाम्यामुळे तात्त्विक बैठक मिळवून दिली. अमेरिकेबरोबरच अनेक राष्ट्रांच्या संविधानात मानवाच्या मुलभूत अधिकारांची चर्चा केलेली आहे. त्याचा आधार हा स्वातंत्र्याचा जाहीरनामाच आहे. मानवी इतिहासाला वेगळे वळण देण्याचे कार्य या जाहीरनाम्याने केले.

**८) सैन्य बळ :**

वसाहतवाल्यांना युद्ध जिंकणे इतके सोपे नव्हते कारण सैन्यबळ, आर्थिकबळ, लष्करी साधनसामुग्री, युद्ध शास्त्राचे ज्ञान आणि अनुभव, आरमार या सर्व बाबतीत ब्रिटिश हे वरचढ होते. त्याचबरोबर वसाहतीतले काही लोक हे ब्रिटिश सत्तेबरोबर प्रामाणिक होते. त्यांनी स्वत:चे गट तयार केले होते. अनेकजण ब्रिटिश सैन्यात भरती झाले होते. मूळ अमेरिकन निवासींना भविष्यात होणाऱ्या अमेरिकन वसाहतींच्या विस्ताराची भीती वाटत होती. त्यामुळे त्यांच्यातील अनेकांनी ब्रिटिश सैन्यास मदत केली. आफ्रिकेतून गुलाम म्हणून आणल्या गेलेल्या अनेक काळ्या लोकांचीही तीच परिस्थिती होती. युद्धानंतर स्वतंत्र होण्याची लालूच त्यांना दाखवली गेली. त्यामुळे अनेकांनी ब्रिटिशसेनेत प्रवेश केला होता. स्वत: ब्रिटीशांना अनेक युद्धांचा शेकडो वर्षाचा अनुभव होता. तुलनेत वसाहतीचे सैन्य नवखे होते. वसाहतीतील काहीजण सप्तवार्षिक युद्धाच्या वेळी ब्रिटिश सेनेत सहभागी झाले होते. त्यांनी त्यावेळी वसाहतींची सेना निर्माण करण्यात महत्वाची भूमिका बजावली. युद्धाचा कोणताही अनुभव नसलेले सामान्य लोकसुद्धा यामध्ये सहभागी झाले होते.

स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर खऱ्या अर्थाने वसाहतीच्या लढ्यास बळ आले. सुरूवातीच्या काळात ब्रिटिशांचे पारडे जड होते. कारण त्यांचे लष्करी बळ अधिक होते. थॉमस गेज हा त्यांचा प्रमुख सेनानी होता. त्याच्या मदतीला उत्तमोत्तम सहाय्यक होते. तुलनेने वसाहतींचे बळ कमी होते. सर्वसामान्य लोकांनीच शस्त्र हाती घेतले होते. वसाहतीच्या सैन्यास जॉर्ज वॉशिंग्टनच्या रूपाने अत्यंत देशभक्त, चारित्र्यवान आणि समतोलबुद्धीचा नेता मिळाला होता. त्यानी आपल्या सैन्यात शिस्त आणि जिद्द निर्माण केली.

**९) अमेरिकन स्त्रियांचे योगदान :**

अमेरिकन स्त्रिया या प्रत्यक्ष राजकारणात सक्रिय नव्हत्या. मात्र स्वातंत्र्य आंदोलनाच्या एकूण घटनाक्रमात

त्यांचे योगदान मोलाचे राहिले. ज्यावेळी अमेरिकन पुरुष स्वातंत्र्य लढ्यासाठी घराबाहेर पडले. त्यावेळी स्त्रियांनी घर सांभाळण्याबरोबरच शेती कामे व इतर कामे सांभाळत आर्थिक आघाडी सांभाळण्याचे काम केले. ब्रिटिश वस्तूंवर वसाहतींनी टाकलेला बहिष्कार यशस्वी करण्यात त्यांचा हातभार महत्वाचा होता. अनेक स्त्रियांनी स्वतः वस्त्र विणून त्याचा पुरवठा केला. युद्ध भूमीवर जखमी सैनिकांसाठी नर्सिंगचे काम करणे, आवश्यक गोष्टी पोहचविणे, प्रसंगी गुप्त संदेश पोहोचविणे इ. कार्ये पार पाडली. काही स्त्रियांनी सैनिकांसाठी अन्न, पैसा, कपडे इ. गरजेच्या वस्तू गोळा केल्या. थोडक्यात जेव्हा अमेरिकन पुरुष युद्धावर होते तेव्हा घरची आणि समाजाची आघाडी सांभाळण्याचे कार्य त्यांनी केले.

**१०) वसाहतीचे स्वातंत्र्ययुद्ध :**

ब्रिटीश सैनिक आणि वसाहती यांच्यातील चकमकींना १७७५ पासूनच सुरवात झाली होती. जून १७७५ मध्ये बंकर हिल या भागात झालेल्या संघर्षात ब्रिटीशांचा विजय झाला होता. मात्र त्यांना आपले एक हजार चोपन्न सैनिक गमवावे लागले होते. यामुळे ब्रिटीश सेनापती गेजच्या जागेवर जनरल हॉवेची नियुक्ती करण्यात आली होती. इ. स. १७७६ मध्ये वसाहतींच्या सैनिकांना न्यूयॉर्क आणि न्यूजर्सी येथेही माघार घ्यावी लागली. ब्रिटीशांनी प्रसंगी भाडोत्री सैनिक आणले होते. एकूणच सुरुवातीच्या टप्प्यात वसाहतवाल्यांना ठिकठिकाणी मार खावा लागला. मात्र जॉर्ज वॉशिंग्टन आपल्या सैन्याचे मनोधैर्य टिकवून ठेवण्यात यशस्वी झाले.

१७७७ च्या सॅराटोगाच्या लढाईने मात्र युद्धाचे एकूण चित्र पालटले. अमेरिकन सेनानी गेट्स याने जनरल बरगोइनच्या नेतृत्वाखाली ब्रिटीश फौजांचा धुव्वा उडवला. त्याला पूर्ण शरणागती पत्करावी लागली. दरम्यान बेंजामिन फ्रँकलीनने फ्रान्सची मदत मिळविण्याचा बराच प्रयत्न केला होता. सॅराटोगाच्या विजयानंतर फ्रान्सने १७७७ मध्ये वसाहतींना मदत करण्याचे मान्य केले. फ्रान्स आणि वसाहती यांच्यात दोन करार होऊन फ्रान्सने वसाहतींच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली आणि त्यांच्या बाजूने युद्धात प्रवेश केला. युध्द अधिक व्यापक झाले. सप्तवार्षिक युद्धात झालेल्या पराभवाचे उट्टे फ्रान्सने अशाप्रकारे काढले. १७७९ मध्ये स्पेनही वसाहतींच्या बाजूने युद्धात उतरले. विशेषतः स्पेनने दिलेली आरमारी मदत वसाहतींना उपयुक्त ठरली. फ्रान्सच्या लाफायत या सेनानीच्या नेतृत्वाखाली मोठे सैन्य अमेरिकन भूमीत ब्रिटिशांविरोधात लढू लागले तर डेन्मार्क, स्वीडन, रशिया या राष्ट्रांनी सशस्त्र तटस्थतेचे धोरण स्वीकारले. फ्रँकलीनच्या मुत्सद्देगिरीचा हा विजय होता.

युद्धातील निर्णायक लढाया दक्षिणेकडे झाल्या. ब्रिटीश सेनानी क्लिंटन आणि कॉर्नवालीस हे या भागात वसाहती विरुद्ध लढत होते. ऑक्टोबर १७८१ मध्ये यॉर्कटाऊन येथे कॉर्नवालीसला वॉशिग्टनच्या सैन्याने पूर्णपणे घेरले. अखेरीस १९ ऑक्टोबर १७८१ या दिवशी त्याने आपल्या सेनेसह शरणागती पत्करली. ही बातमी ब्रिटनला पोहोचताच नॉर्थ मंत्रिमंडळाने राजीनामा दिला. यानंतर सत्तेवर आलेल्या व्हिग पक्षाच्या मंत्रिमंडळाने १७८३ मध्ये वसाहतींच्या स्वातंत्र्यास मान्यता दिली.

**११) पॅरिस तह ३ सप्टेंबर १७८३ :**

प्रत्यक्ष युद्धाच्या समाप्तीनंतर ब्रिटन आणि वसाहती यांच्यात तह होण्यासाठी जवळपास दोन वर्षाचा

कालावधी गेला. पॅरीस येथे उभय पक्षात वाटाघाटी झाल्या. तहाच्या वाटाघाटीच्या वेळी बेंजामिन फ्रँकलीन आणि जॉन ॲडम्स यांनी अमेरिकन राष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. त्यान्वये युद्धाचा अधिकृतरीत्या शेवट झाला आणि ब्रिटीशांनी तेराही वसाहतींचे स्वातंत्र्य मान्य केले. शिवाय सप्तवार्षिक युद्धानंतर फ्रान्सकडून मिळालेला प्रदेशही वसाहतींच्या ताब्यात दिला. वसाहती फ्रान्सच्या वर्चस्वाखाली जाऊ नयेत तसेच व्यापारासाठी वसाहतीकडून ब्रिटीशांना अधिक सवलती मिळाव्यात या हेतूने ब्रिटीशांनी यावेळी तह स्वीकारला. ब्रिटीशांनी आपल्या फौजा काढून घेण्याचे मान्य केले. वसाहती यानंतर अधिकृतरित्या स्वतंत्र झाल्या. अटलांटिक महासागरापासून ते मिसिसिपीपर्यंतचा तर उत्तरेस सेंट लॉरेन्स नदीपासून ते फ्लोरिडाच्या उत्तर सीमेपर्यंतचा प्रदेश हा वसाहतींकडे आला तर स्पेनने केलेल्या मदतीचा मोबदला म्हणून फ्लोरिडाचा भाग त्यांना दिला गेला. अशा रीतीने अमेरिकन वसाहतींच्या नव्या वाटचालीस सुरवात झाली.

नंतर वसाहती एकत्र येऊन अमेरिकेचे संघराज्य अस्तित्वात आले. नवी लिखित राज्यघटना तयार केली गेली. या नव्याने जन्माला आलेल्या राष्ट्राने अध्यक्षीय लोकशाही पद्धतीचा स्वीकार केला. जॉर्ज वॉशिंग्टन यांच्याकडे संघराज्याचे अध्यक्षपद दिले गेले.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

१) वसाहतींची पहिली परिषद ............ येथे भरली.

अ) न्यूयॉर्क ब) वॉशिंग्टन क) डेलावेअर ड) फिलाडेल्फिया

२) वसाहतींच्या पहिल्या परिषदेचे अध्यक्षपद ............ यांनी भूषविले.

अ) तिसरा जॉर्ज ब) थॉमस पेन क) बेंजामिन फ्रँकलिन ड) जॉर्ज वॉशिंग्टन

३) अमेरिकन क्रांतीच्या वेळी ............ हा ब्रिटनचा राजा होता.

अ) तिसरा जॉर्ज ब) आठवा हेन्नरी क) लुई फिलिप ड) प्रिन्स चार्ल्स

४) ......... या बंदराच्या ठिकाणी अमेरिकन क्रांतिकारकांनी ब्रिटिश जहाजातील चहा समुद्रात ओतला.

अ) न्यूयॉर्क ब) बोस्टन क ) हयुस्ट्न ड) प्लायमाऊथ

५) अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनामा ............ साली घोषित करण्यात आला.

अ) १७७५ ब) १७७६ क) १७७९ ड) १७८९

६) ............ च्या तहाने ब्रिटनने वसाहतींच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली.

अ) न्यूयॉर्क ब) वॉशिंग्टन क) बोस्टन ड) पॅरिस

७) स्वातंत्र्यानंतर अमेरिकेच्या अध्यक्षपदी ............ यांची नियुक्ती झाली.

अ) रिचर्ड ली ब) जॉर्ज वॉशिंग्टन क) थॉमस पेन ड) तिसरा जॉर्ज

८) स्वातंत्र्यानंतर अमेरिकेने ............ शासन पद्धतीचा स्वीकार केला.

अ) लोकशाही ब) नियंत्रित राजेशाही क ) साम्यवादी ड) समाजवादी

● **वसाहतींच्या विजयाची आणि ब्रिटीशांच्या पराभवाची कारणे :**

ब्रिटन हे त्यावेळचे राजकीय आणि लष्करीदृष्ट्या एक बलाढ्य राष्ट्र होते. नवख्या अमेरिकन वसाहतींनी ब्रिटनचा पराभव करणे ही त्या काळातील राजकीयदृष्ट्या सर्वात आश्चर्यकारक गोष्ट ठरली. त्यामागची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) स्वातंत्र्यासाठी वसाहतींची तीव्र आकांक्षा :**

युरोपातून वसाहतीत स्थलांतरीत झालेले लोक स्वस्वातंत्र्यावर प्रेम करणारे होते. ब्रिटीशांची वाढत चाललेली बंधने अधिक काळ सहन करणे त्यांना शक्य नव्हते. त्यामुळेच वसाहतीतील सामान्य लोकही ब्रिटिशांविरोधी लढ्यात सहभागी झाले. वसाहती स्वातंत्र्याच्या उदात्त हेतूने आणि सर्व शक्तीनिशी लढत होत्या तर ब्रिटीश अत्यंत संकुचित भावनेने लढत होते. त्यामुळे वसाहतींना विजय मिळविता आला.

**२) भौगोलिक परिस्थिती :**

ब्रिटन आणि अमेरिकन वसाहतीत जवळपास तीन हजार मैलाचे अंतर आहे. याकाळात दळणवळणासाठी केवळ जलमार्गच उपलब्ध होता. अशा या अधिक अंतरावरून युद्ध साहित्य, अन्नधान्याचा पुरवठा करणे आणि युद्ध नियंत्रण करणे, ही तशी कठीण गोष्ट होती. ब्रिटीशांचे सैन्य हे अनोळखी प्रदेशात जाऊन लढत होते तर वसाहतींचे सैन्य त्यांच्याच प्रदेशात लढत होते. त्यांना स्वतःच्या भौगोलिक परिस्थितीची संपूर्ण माहिती असल्याने सैन्य संख्येने कमी असूनही वेगवान हालचाली करत, प्रसंगी गनिमी युद्धाचा वापर करत त्यांनी ब्रिटीश सैन्यास पराभूत केले.

**३) जॉर्ज वॉशिंग्टनचे खंबीर नेतृत्व :**

जॉर्ज वॉशिंग्टनच्या रूपाने वसाहतीच्या सैन्याला अगदी योग्य आणि खंबीर नेतृत्व मिळाले. निस्वार्थी-समतोल बुद्धीच्या या नेत्याने आपल्या संख्येने अपुऱ्या आणि अप्रशिक्षित सैन्याच्या सहायाने ब्रिटीश सैन्याला तोंड दिले. काही वेळा त्यांचा पराभव झाला मात्र त्याने आपल्या सैन्याचे मनोधैर्य खचू दिले नाही. प्रसंगी माघार घेत अचानक हल्ला करणे, गनिमी काव्याचा वापर करणे, अशा युद्ध तंत्राचा वापर चांगल्या रीतीने केला. याउलट ब्रिटीश सेनापती थॉमस गेज, कॉर्नवालीस इतकी प्रभावी कामगिरी करू शकले नाहीत.

**४) युरोपियन राष्ट्राकडून मिळालेली मदत :**

वसाहतीच्या लढ्यास काही युरोपियन राष्ट्रांनीही मदत केली. त्यामुळे वसाहतींच्या विजयाचा मार्ग सुकर झाला. फ्रान्सने १७७८ मध्ये लष्करी आणि आरमारी मदत केली. स्पेननेही वसाहतींना आरमारी मदत केली. यामुळे ब्रिटीशांच्या आरमाराला रोखणे, त्यांचे युद्ध साहित्य ब्रिटीश सैन्यापर्यंत पोहचू न देणे इ. गोष्टी करता आल्या. डेन्मार्क, स्वीडन, रशिया यांनी तटस्थेचे धोरण स्वीकारत वसाहतींना अप्रत्यक्षपणे मदतच

केली. थोडक्यात वसाहतींना जागतिक पातळीवर स्वातंत्र्य लढ्यासाठी प्रत्यक्ष मदत आणि नैतिक पाठिंबा मिळाला.

**५) विचारवंताचे कार्य :**

थॉमस पेन, थॉमस जेफरसन, बेंजामिन फ्रँकलिन, सॅम्युअल अॅडम्स, जॉर्ज वॉशिंग्टन इ. नेत्यांनी-विचारवंतानी वसाहतीतल्या लोकांना स्वातंत्र्यासाठी प्रेरित केले. वसाहतीतल्या असंतोषाचे रूपांतर त्यांनी क्रांतीमध्ये केले. त्यांच्यामुळे वसाहतीतील व्यापारी, शेतकरी, व्यावसायीक, कामगार अशा सर्व थरातले लोक ब्रिटिशांविरुद्धच्या लढ्यात सहभागी झाले आणि ते स्वातंत्र्याच्या उद्दिष्टाने लढले. त्यामुळे वसाहती विजयापर्यंत पोहोचल्या. याउलट ब्रिटीशांच्या साम्राज्यवादावर खुद्द त्यांच्याच देशातून टीका झाली.

## ३.२.३ क) अमेरिकन राज्यक्रांतीचे परिणाम :

अमेरिकन राज्यक्रांतीने नव्या राष्ट्रास जन्म दिला तर ब्रिटीशांना त्यांच्या साम्राज्याचा मोठा भाग गमवावा लागला. या राज्यक्रांतीचे परिणाम अमेरिकन वसाहती व ब्रिटनबरोबर इतर राष्ट्रांवरही झाले. हे परिणाम केवळ राजकीयच नव्हते तर आर्थिक, सामाजिक आणि तात्विकही होते.

**१) स्वतंत्र राष्ट्र म्हणून अमेरिकेचा (USA) उदय :**

राज्यक्रांतीनंतर सर्व तेरा वसाहती एकत्र आल्या आणि अमेरिकेची संयुक्त संस्थाने (United States of America) या स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्राचा उदय झाला. क्रांतीपूर्व काळातील तेरा वसाहती म्हणजे जणू तेरा स्वतंत्र विचारांची राष्ट्रेच होती. स्वातंत्र्य मिळविण्याच्या उद्देशाने या वसाहती एकत्र आल्या. समान उद्दीष्ट समोर ठेवून त्यांनी लढा दिला आणि विजय मिळविला. प्रगती करावयाची असेल तर एकत्र येण्याशिवाय पर्याय नाही याची जाणीव त्यांना झाली. यातूनच एक राष्ट्र जन्माला आले. लिखित राज्यघटना आणि प्रजासत्ताक पद्धती हे या राष्ट्राचे वैशिष्ट्य होते. अल्पावधीत या राष्ट्राने जागतिक राजकारणात आपला प्रभाव निर्माण केला. राज्यक्रांतीमुळे हे होऊ शकले.

**२) जगातल्या पहिल्या लिखित राज्यघटनेची निर्मिती आणि लोकशाहीचा प्रत्यक्ष आविष्कार :**

स्वतंत्रराष्ट्र म्हणून अस्तित्वात येत असताना सर्व राज्यांना एकत्र बांधणारी लिखित राज्यघटना १७८९ मध्ये अमेरिकेतील विचारवंतानी निर्माण केली. घटनेद्वारे लोकशाही पद्धतीचा अंगीकार अमेरिकेने केला. जगाच्या इतिहासात हे पहिल्यांदाच घडले होते. अध्यक्षीय लोकशाही, द्विगृही कायदेमंडळ, सर्वोच्च न्यायालय, सत्तेचे विकेंद्रीकरण अशा अनेक लोकशाही पूरक गोष्टींची निर्मिती या राज्यघटनेद्वारे अमेरिकेत केली गेली. या राज्य घटनेचा आदर्श जगातील अनेक राष्ट्रांनीही ठेवला आणि लोकशाही राज्यपद्धतीचा स्वीकार करत आपल्या राज्य घटना याप्रमाणे तयार केल्या. भारताच्या राज्यघटनेवर ही राज्यघटनेचा प्रभाव पडला आहे .

**३) जगभरात अनेक राष्ट्रांच्या स्वातंत्र्य चळवळींना प्रेरणा :**

मानवी स्वातंत्र्यासाठी अन्यायी राजसत्तेविरुद्ध लढा दिलेल्या अमेरिकन राज्यक्रांतीने जगभरातल्या अनेक

राष्ट्रांच्या स्वातंत्र्य चळवळींना प्रेरणा दिली. विशेषतः १७८९ मध्ये झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीवर या राज्यक्रांतीचा खूप प्रभाव पडला. अमेरिकन स्वातंत्र्य सैनिकांना मदत करणाऱ्या लाफाएत या फ्रेंच सेनानीने नंतर अमेरिकन स्वातंत्र्य चळवळीने प्रेरित होऊन फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी खूप महत्वाची भूमिका बजावली. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात सहभागी झालेले फ्रेंच सैनिक 'स्वातंत्र्याचा' विचार घेवूनच फ्रान्समध्ये परतले. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वांचा प्रसार करणा-या फ्रेंच राज्यक्रांतीसमोर अमेरिकन राज्यक्रांतीचाच आदर्श होता. दोन्ही राष्ट्रातील मैत्रीचे प्रतिक म्हणून फ्रान्सने अमेरिकेला स्वातंत्र्य देवतेचा पुतळा (Statue of Liberty) भेट दिला. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकात झालेल्या जगभरातील अनेक क्रांत्यावरही या राज्यक्रांतीचा प्रभाव पडला होता.

**४) ब्रिटनवर झालेला आर्थिक परिणाम :**

ब्रिटीशांना वसाहती बरोबरच्या लढ्यासाठी प्रचंड खर्च करावा लागला. त्यांच्या राष्ट्रीय कर्जाचे प्रमाण त्यामुळे खूपच वाढले. आर्थिक मंदीचा त्यांना सामना करावा लागला. ब्रिटनच्या युरोपमधील शत्रूंनी परिस्थितीचा फायदा घेत त्यांच्या नाविक दलावर त्याचप्रमाणे व्यापारी जहाजावरही हल्ले केले. अनेक व्यापारी जहाजे शत्रूंच्या ताब्यात गेली यामुळे ब्रिटीशांच्या व्यापारावर अनिष्ट परिणाम झाला.

**५) अमेरिकेची आर्थिक प्रगती :**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अमेरिकेची वेगाने आर्थिक प्रगती झाली. पश्चिमेकडे विस्तार होऊन सुपीक भूमी, संसाधन मुबलक प्रमाणात मिळाली. ब्रिटीशांच्या जाचक आर्थिक निर्बंधनातून सुटका झाल्यामुळे व्यापार आणि उद्योगधंदा विस्तारत गेला. आर्थिक महासत्ता बनण्याकडे अमेरिकेची वाटचाल सुरू झाली.

**६) ब्रिटनच्या वसाहतविषयक धोरणात बदल :**

अमेरिकन वसाहतीतून ब्रिटिशांना खूप आर्थिक फायदा मिळत होता जो या क्रांतीनंतर पूर्ण बंद झाला. या वसाहतीबाबतचे त्यांचे अन्यायी आर्थिक धोरण हे राज्यक्रांतीचे प्रमुख कारण ठरले होते. यामुळे क्रांतीनंतर ब्रिटिशांनी आपल्या धोरणात बदल केला. ऑस्ट्रेलिया-कॅनडा इत्यादी ठिकाणच्या वसाहतीतील कडक व्यापारी बंधने त्यांनी दूर केली. वसाहतींना अंतर्गत कारभाराच्या बाबतीत काही प्रमाणात स्वायत्तता द्यायला सुरूवात केली. यानंतरच्या काळात वसाहती स्थापन करण्यासाठी त्यांचे लक्ष हे आशिया-आफ्रिका खंडावर केंद्रित झाले. येथील अनेक राष्ट्रे नंतर ब्रिटीश साम्राज्यवादास बळी पडली.

**७) राष्ट्रवाद व लोकशाहीचा प्रसार :**

अमेरिकन राज्यक्रांतीने राष्ट्रवाद व लोकशाही या दोन महत्वाच्या तत्वांचा जगभरात प्रसार केला. ब्रिटनच्या साम्राज्यवादाला जोरदार धक्का देत अमेरिकेच्या रूपाने लोकांचे राज्य अस्तित्वात आले. अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याने जगाला मार्गदर्शन करण्याचे काम केले. मानवी स्वातंत्र्याची जाणीव यामुळे लोकांना झाली. राजेशाही-सरंजामशाहीला धक्का देणाऱ्या या राज्यक्रांतीने आधुनिक युगाला चालना दिली.

### ८) अमेरिका खंडाचे नेतृत्व अमेरिकेकडे :

स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्वात आल्यावर अमेरिकेने अत्यंत वेगाने प्रगती केली. उत्तर अमेरिका खंड आणि दक्षिण अमेरिका खंडातील सर्व राष्ट्रांचे नेतृत्व आपसूकच अमेरिकेच्या हातात आले. युरोपियन साम्राज्यवाद्यांना अमेरिकन भूमीवरुन घालवून देण्यात अमेरिकन संघराज्याची भूमिका महत्वाची ठरली. या क्रांतीने यूरोपियन वसाहत वादाला धक्का देण्याचे कार्य केले. यामुळेच नंतर ब्रिटनने आशिया-आफ्रिकेत वसाहती स्थापन करण्याकडे लक्ष दिले.

स्वातंत्र्य मिळविण्यासाठी तेरा वसाहती एकत्र आल्या आणि बलाढ्य ब्रिटिशांविरुद्ध त्यांनी मोठा संघर्ष केला. त्यात त्यांना यश आले. हा संघर्ष साम्राज्यवादाला बळी पडलेल्या इतरांसाठीही प्रेरणादायी ठरला. त्यांनीही स्वस्वातंत्र्यासाठी प्रयत्न केले.

- **अमेरिकन राज्यक्रांतीचे महत्व :**

आधुनिक जगाच्या इतिहासाला वळण लावणारी घटना, साम्राज्यवादाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देणारी घटना म्हणून या राज्यक्रांतीचे वर्णन करावे लागते. ही घटना अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध म्हणूनही ओळखली जाते. या राज्यक्रांतीचे अमेरिकन इतिहासावर परिणाम झालेच त्याच बरोबर जागतिक इतिहासावर ही परिणाम झाले. वसाहतींवरचा ब्रिटीशांच्या वसाहती हा शिक्का पुसला गेला. त्यांचे अमेरिकीकरण झाले. स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्वात येण्याकडे त्यांची वाटचाल सुरु झाली. एका बलाढ्य राष्ट्राची पायाभरणी या क्रांतीने झाली. राज्यक्रांती दरम्यान वसाहतींनी प्रसिद्ध केलेला मानवी हक्काचा जाहीरनामा हा आजही संपूर्ण जगाचा मार्गदर्शक ठरतो आहे. राजसत्ता-सरंजामीसत्ता-धार्मिक सत्तेस जोरदार धक्का देत लोकशाहीची प्रस्थापना या क्रांतीने केली. वसाहतवादाखाली दबलेल्या जगभरातील जनतेला स्व-स्वातंत्र्यासाठी लढण्याची प्रेरणा आणि बळ यामुळे मिळाले. म्हणजेच असे म्हणता येईल की विविध देशांच्या स्वातंत्र्य लढ्यामागे अमेरिकन राज्यक्रांती कारणीभूत ठरली आहे. मानवाच्या मूलभूत हक्कांची जोपासना केली पाहीजे, राजसत्तेकडून अन्याय झाल्यास त्याविरुद्ध आवाज उठवला पाहीजे ही प्रेरणा या क्रांतीने सगळ्यांना दिली.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३**

१) अमेरिकन स्वातंत्र्य युद्धाच्या काळात ब्रिटन आणि अमेरिका यांच्यात दळणवळणासाठी केवळ ............ चा उपलब्ध होता.

अ) भूमार्ग ब) जलमार्ग क) लोहमार्ग ड) हवाईमार्ग

२) अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात वसाहतींना ............ रुपात खंबीर नेतृत्व मिळाले.

अ) जॉर्ज वॉशिंग्टन ब) आब्राहम लिंकन क) थिओडोर रूझवेल्ट क) रोनाल्ड रेगन

३) अमेरिकन स्वातंत्र्य युद्धात अमेरिकन वसाहतींना ............ या युरोपियन राष्ट्राने लष्करी आणि नाविक सहाय्य केले.

अ) रशिया ब) डेन्मार्क क) स्वीडन ड) फ्रान्स

४) अमेरिकन राज्य क्रांतीनंतर तेरा वसाहतींनी एकत्र येऊन ............ स्थापन केले.

अ) अमेरिकेची संयुक्त संस्थाने ब) अमेरिकेचा राज्यसंघ

क) अमेरिकेचा वसाहतिक संघ ड) अमेरिकेचा राष्ट्रसंघ

५) फ्रान्स आणि अमेरिकेच्या मैत्रीचे प्रतिक म्हणून फ्रान्सने अमेरिकेला ............ पुतळा भेट दिला.

अ) युद्धदेवतेचा ब) स्वातंत्र्यदेवतेचा क) राष्ट्रदेवतेचा ड) मातृदेवतेचा

६) अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात पराभव पत्कल्यानंतर ब्रिटनने आपल्या ............ येथील वसाहतींवर कडक निर्बंध दूर केले.

अ) ब्राझील-चिली ब) भारत-श्रीलंका क) इंडोनेशिया-ब्रह्मदेश ड) कॅनडा-ऑस्टेलिया

७) अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यामुळे ............ ची जाणीव जगभरातील लोकांमध्ये निर्माण झाली.

अ) व्यापारी हक्कांची ब) सांस्कृतिक हक्कांची

क) मानवी हक्कांची ड) भाषिक हक्कांची

८) अमेरिकन राज्यक्रांतीने ............ राज्यक्रांतीस प्रेरणा दिली.

अ) फ्रेंच ब) रशियन क) जर्मन ड) ब्रिटीश

## ३.३ पारिभाषिक शब्द :

१) रेड इंडियन - अमेरिका खंडातील मूळ निवासी, कोलंबसने यांचा उल्लेख रेड इंडियन असा केला.

२) पेनी, पौंड - ब्रिटिश चलन

३) कॉन्टिनेन्टल काँग्रेस - फिलाडेल्फिया परिषदेच्यावेळी अमेरिकन वसाहतींच्या प्रतिनिधींची तयार केलेली समिती, ही समिती वसाहतींच्या वतीने सर्व निर्णय घेणार होती.

४) वसाहतवाद - नव्या जलमार्गाच्या शोधांनंतर वसाहतवादाला चालना मिळाली. वसाहतवाद म्हणजे बलिष्ठ किंवा शक्तीशाली सत्तेने दुसऱ्या कमकुवत राष्ट्रावर राजकीय वर्चस्व स्थापन करत त्या राष्ट्राचा वापर स्वत:च्या आर्थिक भरभराटीसाठी करणे. हाच वसाहतवाद साम्राज्यवादाला जन्म देणारा ठरला. अमेरिका, आशिया आणि आफ्रिकेतील अनेक राष्ट्रे युरोपियन वसाहतवादाला बळी पडली.

## ३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे :

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १**

१) ब) व्हर्जिनिया २) अ) बहामा

| | |
|---|---|
| ३) ब) हिसपनिपोलात | ४) क) जॉर्जिया |
| ५) क) फ्रान्स | ६) अ) थॉमस पेन |
| ७) अ) स्टॅम्प ॲक्ट | ८) क) रेड इंडियन |

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

| | |
|---|---|
| १) ड) फिलाडेल्फिया | २) क) बेंजामिन फ्रँकलिन |
| ३) अ) तिसरा जॉर्ज | ४) ब) बोस्टन |
| ५) ब) १७७६ | ६) ड) पॅरिस |
| ७) ब) जॉर्ज वॉशिंग्टन | ८) अ) लोकशाही |

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

| | |
|---|---|
| १) ब) जलमार्ग | २) अ) जॉर्ज वॉशिंग्टन |
| ३) ड) फ्रान्स | ४) अ) अमेरिकेची संयुक्त संस्थाने |
| ५) ब) स्वातंत्र्यदेवतेचा | ६) ड) कॅनडा-ऑस्ट्रेलिया |
| ७) क) मानवी हक्कांची | ८) अ) फ्रेंच |

## ३.५ सारांश :

विज्ञान, तंत्रज्ञान, आर्थिक प्रगती, लष्करी बळ या सर्व बाबतीत आज आघाडीवर असलेल्या अमेरिका (USA) या राष्ट्राचा जन्म ज्या क्रांतीमुळे झाला ती अमेरिकन राज्यक्रांती ही जगाच्या इतिहासातील मैलाचा दगड मानली जाते. अठराव्या शतकात झालेल्या या क्रांतीचे परिणाम फक्त अमेरिका किंवा ब्रिटनपुरते मर्यादित राहिले नाहीत तर ते जागतिक होते. अन्याय करणारी शासन संस्था बदलण्याचा अधिकार सामान्य जनतेला आहे. हे सांगणाऱ्या या क्रांतीने लोकशाही, व्यक्ती स्वातंत्र्य या अत्यंत महत्त्वाच्या तत्वांची पायाभरणी केली. सतराव्या शतकात ब्रिटीशांच्या परवानगीने स्थापन झालेल्या उत्तर अमेरिका खंडातील तेरा वसाहतींनी ब्रिटिश साम्राज्यवादा विरोधात एकत्र येऊन लढा दिला आणि बलाढ्य ब्रिटीशसत्तेला पराभूत करून स्वातंत्र्य मिळवले. मानवाचे मुलभूत हक्क नाकारणाऱ्या सरकार विरोधात लढण्याची प्रेरणा या क्रांतीने जगाला दिली. मानवाच्या मूलभूत हक्कांचा जाहीरनामा, लिखित राज्यघटना या अमेरिकन लोकांद्वारे निर्मित दोन्ही गोष्टी जगाच्या इतिहासातील मैलाच्या दगड ठरल्या आहेत. जगातील अनेक राष्ट्रांना स्वातंत्र्यलढ्यासाठी नैतिक बळ देण्याचे काम या क्रांतीने केले. वसाहतवादाच्या विरोधातील पहिली क्रांती त्याचबरोबर राजेशाही नाकारून लोकशाही राज्य आणि जनतेचे सार्वभौमत्व ही संकल्पना रुजविण्याचे कार्य करणारी क्रांती म्हणून या क्रांतीचे इतिहासात खूपच महत्त्व आहे.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) सविस्तर उत्तरे लिहा**

१) अमेरिकन राज्यक्रांतीच्या कारणांची चर्चा करा.

२) अमेरिकन राज्यक्रांतीचे परिणाम स्पष्ट करा.

३) अमेरिकन राज्यक्रांतीत वसाहतींच्या विजयाची तसेच ब्रिटिशांच्या पराभवाची कारणे स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा**

१) बोस्टन टी पार्टी

२) अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनामा

३) जॉर्ज वॉशिंग्टन

४) अमेरिकन क्रांतीचे महत्व

## ३.७ संदर्भ ग्रंथ :


१) कोठेकर शांता, अमेरिकेच्या संघराज्याचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, १९९९.

२) मोरवंचीकर रा. श्री., अमेरिकेन संघराज्याचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद .

३) के. सागर, आधुनिक जगाचा इतिहास, के. सागर पब्लिकेशन, पुणे, २०१७.

४) कदम य. ना., आधुनिक जग, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जून २०१०.

५) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोशनिर्मिती मंडळ, मुंबई, विश्वकोश खंड-१.

६) गर्गे स. मा. (संपा.) समाजविज्ञान कोश भाग १.

७) https://vpmthane.org/jbcapp/upload/m6/123.pdf.


❖❖❖

# घटक – ४

# फ्रेंच राज्यक्रांती (१७८९)

## (Fresh Revolution 1789)

अनुक्रमणिका :

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

 ४.२.१ कारणे

 ४.२.२ महत्त्वाच्या घटना आणि नेते

 ४.२.३ जगावरील परिणाम

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

४.५ स्वंय-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी प्रश्न.

४.६ संदर्भ ग्रंथ यादी

**४.० उद्दिष्ट्ये :**

या प्रकरणाच्या अभ्यासानंतर विद्यार्थी मित्रांनो आपणास.....

- फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे अभ्यासता येतील.
- बुरबाँ घराण्यातील लुई राज्यकर्त्याविषयी माहिती घेता येईल.
- फ्रेंच राज्यक्रांतीसाठी वैचारीक जागृती विचारवंतानी कशी केली याची माहिती देता येईल.
- फ्रेंच राज्यक्रांती काळातील घटनांची सविस्तर माहिती घेता येईल.
- राष्ट्रीय सभेच्या कार्याचा सविस्तर आढावा घेता येईल.
- पहिल्या फ्रेंच विधीमंडळाची माहिती घेता येईल.

- दहशतवादी कालखंडाचा  आढावा घेता येईल.
- संचालक मंडळाचे कार्य स्पष्ट करता येईल.
- फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम सांगता येतील.

**४.१ प्रास्ताविक :**

सन १६८८ च्या इंग्लडमधील गौरवशाली राज्यक्रांतीनंतर जागतिक इतिहासामध्ये १७८९ च्या फ्रेंच राजक्रांतीचे अतिशय मोठे महत्व आहे. फ्रेंच राज्यक्रांती ही जगाच्या इतिहासातील मोठी परिवर्तनवादी घटना होय. फ्रान्समध्ये परंपरागत चालत आलेली बुरबाँ राजघराण्याची जुनी राजवट, शासनातील गोंधळ, तत्कालीन राजा सोळावा लुई याची अकार्यक्षमता व त्याची पत्नी राणी मेरी ॲटोईनेट हिचा उद्दामपणा यामुळे फ्रान्सची राजकीय स्थिती बिघडली अशामध्येच फ्रान्समधील सामाजिक विषमता, दिवाळखोरीवर आलेले राष्ट्र, सर्व सामान्य लोकांची गरिबी, प्रचंड हलाकी या सर्व घटकांनी राज्यक्रांतीस वातावरण निर्माण केले. अशामध्येच युरोपात वैचारिक प्रबोधनाचे वारे जोरात वाहू लागले. रूसो, मॉटेस्क्यू, व्हॉल्टेअर, फ्रॅने, डिडेराँ इत्यादी विचारवंतानी फ्रेंच लोकामध्ये क्रांतीप्रवण विचार रूजवले. या सर्वांचा परिणाम म्हणून सन १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांती घडून आली.

फ्रान्समध्ये लोकांनी राष्ट्रीय सभेच्या माध्यमातून क्रांतीच्या वाटचालीस सुरूवात केली. अनेक शतके जुलमी राजेशाहीचे प्रतिक असणारे बॅस्टील या छोटया किल्ल्याचा पाडाव करून त्या ठिकाणी कैदेत असणाऱ्या लोकांना मुक्त करून पुढे मानवी हक्काचा जाहीरनामा प्रसिध्द करून स्वातंत्र्य, समता, बंधुता या महान तीन तत्वाचा जयघोष केला. ऐनभरात चालु असणाऱ्या क्रांतीला राजा, राणी व त्यांच्या पाठीराख्यानी चिरडण्याचा प्रयत्न केला. क्रांतीकारकांनी राजा-राणीला पकडून गिलोटिनवर चढवून त्यांचा शिरच्छेद केला. पुढे फ्रांन्समध्ये दहशतीचा कालखंड निर्माण करणाऱ्या रॉबेस्पीअर ला लोकांनीच गिलोटिनवर चढविले आणि दहशतीचा कालखंड संपवला.

फ्रेंच लोकांनी क्रांती करून परंपरागत चालत आलेली जुलूमी व भ्रष्ट राजेशाही शासन व्यवस्था उलटून टाकली. फ्रेंच लोकांनी राजकीय, धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील सनातनी विचार गाढून टाकले. आणि फ्रेंच समाज पुरोगामी प्रगत लोकशाही विचारांकडे वळला. अनियंत्रित राजेशाही, वर्ग कलह, सरंजामशाही पध्दत, श्रेष्ठ -कनिष्ट विचार व्यवस्थेला मुठमाती दिली.

फ्रेंच लोकांनी केलेल्या या क्रांतीचे दुरगामी परिणाम फ्रांन्सबरोबर संपूर्ण जगावर झाले. परंपरागत चालत आलेला राजवंश हा ईश्वराचा अंश नसून तो जनतेचा सेवक आहे, आपले कर्तव्य पार पाडण्यात राजा अपयशी ठरत असेल तर त्यास सिंहासनांवरून खाली खेचण्याचा अधिकार जनतेचा आहे हे सिध्द करून दाखविले. म्हणून फ्रेंच राज्यक्रांतीचे फार मोठे महत्व आहे. जनता प्रतिनिधींच्या माध्यमातून राज्य चालवू शकते हा नवीन संदेश जगाला दिला.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ कारणे

**अ) फ्रान्सची भैगोलिक स्थिती :**

युरोप खंडातील फ्रान्स हा देश अगदी प्राचीन कालखंडापासून आपले अस्तित्व टिकवून आहे. हे राष्ट्र व तेथील लोक अत्यंत प्रामाणिक, कष्टाळू आहेत. या देशामध्ये पश्चिम बाजूस अटलांटिक महासागर, इंग्लंडची खाडी ही महत्वाची ठिकाणी आहेत. फ्रान्सच्या भूभागात सेंट, लुआर, गॅरोन, आणि ऱ्होन या महत्वाच्या नद्या आहेत. फ्रांन्समध्ये दोन विशाल पठारे आढळतात. दक्षिणेस आल्प्स् आणि पिरनिज या मोठया डोंगर रांगा आढळतात. उत्तरेकडून फ्रांन्सचा भूभाग सपाट आढळतो येथील हवामान सौम्य अत्यंत उत्साहवर्धक आहे. त्यावेळी येथील लोंकाचा मुख्य व्यवसाय शेती हाच होता. या देशामध्ये विपूल प्रमाणात फळ बागा आढळतात. शेतीमुळे हा देश पूर्वी स्वयंपूर्ण होता. असे असलेतरी या देशात परंपरागत चालत आलेल्या बुरबाँ घराण्याच्या राजे लोकांनी येथे अनियंत्रित राजसत्ता चालविली व फ्रांन्सची मोठया प्रमाणात अर्थिक दिवाळखोरी केली. परिणामी फ्रेंच जनतेने क्रांती करून बुरबाँ राजघराण्याची सत्ता नष्ट केली.

**ब) राजकीय कारणे :**

कोणतीही क्रांती एकाएक होत नसते. तिची कारण परंपरा ही कित्येक वर्ष चालत राहते. लोकांना अनियंत्रित राजसत्तेविरोधात शासन निर्णय असहय ठरू लागल्यास स्थिती स्फोटक बनते. त्यातुनच क्रांती होते. फ्रेंच राजक्रांतीबाबत हीच स्थिती दिसून येते. राज्यक्रांतीची विविध कारणे आहेत. ती याप्रमाणे–

- **अनियंत्रित राजेशाही :**

फ्रांन्समध्ये वंशपरंपरागत बुरबाँ राजघराण्याची सत्ता चालत आलेली होती. ही सत्ता अनियंत्रित होती. या राजेशाहीवर कोणाचेच निर्बंध अथवा अंकूश नव्हता. राजाने प्रजेच्या कल्याणकरिता राज्य करणे हे कर्तव्य. परंतू बुरबाँ वंशज फ्रेंच जनतेसाठी लोककल्याणार्थ राज्यकारभार करीत नव्हते. ते सर्व बुरबाँ वंशज जुलमी, अत्याचारी, पक्षपात करणारे, अन्यायी स्वरूपाचे कायदे करणारे, वर्ग भेद करणारे राजे होते. फ्रांन्समधील वरिष्ठ वर्ग सुखविलासात दंग होता तर सर्व सामान्य प्रजा अत्यंत हलाखीत जीवन जगत होती. त्यांना कोणत्याही सोयीसुविधा नव्हत्या, त्यांना कर भरावे लागत. या जनतेला भाषण स्वातंत्र्य नव्हते. ही जनता अन्यायाखाली पिचली होती. त्यामुळे फ्रेंच लोकांत बुरबाँ घराण्याविषयी असंतोष पसरला होता.

- **सोळावा लुई :– (१७७४ ते १७९३)**

सोळावा लुई हा १७७४ ते १७९३ या काळात फ्रांन्सचा राजा होता. त्याची सर्व शासन व्यवस्था विस्कळीत व लाचलुचपतीने बरबटलेली होती. हा राजा प्रजेवर जुलूम करणारा होता. या राजाच्या अंगी धडाडीचे नेतृत्व नव्हते. तो भित्रा आणि आळशी होता. राज्यकारभार करण्याचे सखोल ज्ञान त्याच्या जवळ नव्हते. हा सोळावा लुई आपल्या राणीच्या वर्चस्वाखाली होता. राणी आणि तिच्या सल्लागारांनी सोळावा लुईस

चुकीचे सल्ले दिले त्यामुळे त्याला राज्यकारभारात कोणत्याही नवीन सुधारणा करता आल्या नाहीत. हा राजा नको त्या गोष्टीत अडकून पडला. या राजाने फ्रेंच जनतेची सहानुभूती गमावली.

- **राणी मेरी अॅटोईनेट :**

सोळाव्या लुईची पत्नी राणी मेरी अॅटोईनेट ही होती. ही ऑस्ट्रियाची होती. ही अत्यंत सुंदर असून, ती उधळया स्वभावाची होती. ती आपल्या पतीवर प्रभुत्व गाजवत असे कोणत्याही गोष्टीची खात्री न करता योग्य अयोग्य न पहाता, ती राजाकडून आपणांस हवी असणारी बाब साध्य करून घेत असे. राज्यकारभारात तिने अत्यंत गोंधळ घातला होता. तसेच ती उधळया स्वभावाची असल्यामुळे राजतिजोरीवर मोठा खर्च पडला जाई. फ्रान्स राष्ट्र दिवाळखोरीच्या उंबरठयावर असतानाही तिने आपला उधळेपणा कमी केला नाही. ही राणी फ्रान्सच्या लोकांमध्ये समरस झाली नाही. त्यामुळे फ्रेंच जनता तिचा तिरस्कार करू लागली.

- **सत्तेचे केंद्रीकरण :**

राज्यामध्ये सर्व सत्ता केंद्राच्या ठिकाणी केद्रिंत असेल. आणि जनतेला स्थानिक स्वराज्याचे अधिकार नसतील तर राज्यकारभाराची कार्यक्षमता कमी होते. सतराव्या आणि अठराव्या शतकात फ्रांन्समध्ये फार मोठे सत्तेचे केंद्रीकरण झाले. व्हर्सांय येथील राजवाडयातून अनेक चुकीचे निर्णय घेतले जात असत. एखाद्या गोष्टीचा निर्णय लागेपर्यंत त्या निर्णयातील हवा निघून जात असे. फ्रेंच जनतेची कोणतिही कामे यामुळे होत नसत.

- **सदोष राज्यकारभार :**

बुरबाँ वंशज सोळाव्या लुईची राज्यव्यवस्था विस्कळीत व सदोष होती. प्रशासनातील महत्वाच्या जागा सरदार, उमराव, व त्यांचे वारसदार यांना परंपरागतरित्या मिळत असत. चुकीचे सल्ले देणारी मंडळी राज्यकारभारात हस्तक्षेप करीत. लोकशाही मार्गाने कोणतीही निर्णय प्रक्रिया होत नसे. फ्रांन्समधील विविध प्रांतात वेगवेगळया प्रकारचे कायदे असत. राजाची न्यायदान प्रक्रियासुध्दा अत्यंत वाईट व अन्यायी स्वरूपाची होती. त्यामुळे प्रशासनात कमालीचा गोंधळ निर्माण झाला होता. चौदाव्या लुई नंतर फ्रांन्समध्ये कर्तबगार राजा निर्माण झाला नाही. पंधरावा लुई सुध्दा अकार्यक्षम होता. पंधराव्या लुईच्या काळात फ्रांन्सला आपल्या अनेक वसाहती गमवाव्या लागल्या. १७५६ ते १७६३ या काळात इंग्लंड आणि फ्रांन्स या देशात 'सप्तवार्षिक युध्द' झाले या युध्दात इंग्लंडकडून फ्रांन्सचा मोठा पराभव झाला.

फ्रांन्समधील प्रशासनाने आपल्या अधिकाऱ्यांचे अधिकार स्पष्ट केलेले नव्हते. त्यामुळे हे प्रशासकिय अधिकारी एकमेकांमध्ये विविध स्तरावर निर्णय प्रक्रियेत हस्तक्षेप करीत परिणामी सर्व सामान्य जनतेवर जुलूम, अन्याय व अत्याचार होत असे. या अत्यांचारापासून सरकारी अधिकाऱ्यांना कोणीही परावृत्त करीत नव्हते.

क्रांतीपूर्व काळात फ्रांन्समध्ये अनेक न्यायालये होती. परंतू या न्यायालयामध्ये लिखित कायदयाची पुस्तके नव्हती. राजा, उमराव, संरजामदार, सरदार, धर्मगुरू देतील तो न्याय अशी अवस्था प्रत्येक प्रांतात होती. न्यायाधिशाच्या जागा राजाच्या मर्जीनुसार भरल्या जात. एवढेच नव्हे, तर प्रत्येक वर्गाची वेगवेगळी न्यायालये,

तुरूंग असत त्यामुळे सर्वसामान्य फ्रेंच जनतेला न्याय मिळणे अत्यंत अवघड होवून बसले होते.

- **फ्रांन्समध्ये लोकशाही शासन संस्थांचा अभाव :**

फ्रांन्समध्ये अनियत्रिंत राजेशाही कार्यान्वींत असल्याने इंग्लंडच्या पार्लमेंटसारखी लोकशाही शासन संस्था फ्रांन्समध्ये कार्यरत नव्हती. त्यामुळे फ्रांन्सच्या राजकर्त्यांना गरीब फ्रेंच जनतेच्या वेदना कळल्या नाहीत.फ्रांन्समध्ये मध्ययुगापासून 'स्टेटस् जनरल' नावाची संस्था होती. पण या संस्थेची शेवटची सभा १६१४ मध्ये झाली होती. त्यांनतर या सभेला राजाने कधीच बोलविले नव्हते. या सभेला कोणतेही अधिकार नव्हते. परकिय आक्रमणाच्यावेळी राजा कधीतरी या सभेचा सल्ला घेई. ही सभा राजाला विरोध करीत नसे. स्टेटस् जनरलची तीन प्रमुख सभागृहे होती. त्यामध्ये 'सरदारसभागृह', 'धर्मगुरूसभागृह' व 'सामान्य प्रजेचे सभागृह' हे तिन्ही वर्गातील प्रतिनिधी आपआपल्या सभा वेगवेगळया घेत असत. धर्मगुरू व सरदार सभागृहे एकत्र येत असत. त्यामुळे 'सामान्य सभागृहाचे' चालत नसे. धर्मगुरू आणि सरदार सभागृहाच्या वर्चस्वामुळे फ्रांन्ससमोर असणारे विविध प्रश्न सोडविण्यासाठी 'स्टेटस् जनरल' सभा काहीही करू शकत नव्हती.

**क) सामाजिक कारणे :**

फ्रेंच लोकांचे राज्यक्रांतीपूर्व सामाजिक जीवन अन्याय, विषमता, वर्ग कलहांने भरून गेलेले होते. फ्रेंच समाजात प्रमुख तीन वर्ग होते पहिला वर्ग - उमराव, दुसरा वर्ग- धर्मगुरू, तिसरा वर्ग- सामान्य जनता (थर्ड इस्ट्रेट) या शिवाय यामध्ये भूदास व गुलांमाचा वर्ग वेगळा होता.

पहिल्या दोन वर्गाना समाजात विशेष अधिकार, सवलती होत्या. हा वर्ग कोणताही कर भरत नव्हता. सामान्य जनतेवर (थर्ड इस्ट्रेट) करांचे सर्व ओझे लादले जाई. या लोकांची एकूण लोकसंख्या ९९ टक्के होती. उमराव, संरजामदार सरदार, धर्मगुरू यांची मिळून लोकसंख्या ही १ टक्के होती. असे असून सुध्दा १ टक्के लोक, ९९ टक्के असणाऱ्या बहुसंख्य जनतेवर अन्याय अत्याचार व जुलूम करीत.

फ्रांन्सची समाजरचना ही त्यावेळी पूर्णपणे शोषणावर आधारेलेली होती. फ्रांन्सच्या समाजातील अनेक लोकांचे मृत्यू अजीर्णामुळे, उपासमारीने होत असत. क्रांतीपूर्व फ्रांन्समध्ये ही विषमता अत्यंत पराकोटीला गेली होती.

- **सरंजामदार वर्ग :**

हा फ्रंान्समधील प्रस्थापित वर्ग होता. राजनिष्ठा ठेवणे, सामान्य लोकांचे शोषण करणे, हा यांचा जन्मसिद्ध हक्क होता. या वर्गाला राजाने खास अधिकार दिले होते. या अधिकाराचा वापर करून हा वर्ग अत्यंत चैनीत व विलासात राहत असे. 'राजाशी बोलणारा राजाच्या मंत्र्याची मैत्री करणारा, कर्ज काढणारा पगार घेणारा, पेन्शन घेणारा, वारसाहक्क मिळवणारा हा सरंजामदार वर्ग होता.' या वर्गाकडे संपूर्ण फ्रांन्समधील ६०: हून अधिक जमीन होती. खंड वसूल करणे, बळजबरीने धान्य घरी आणणे. लोकांकडून नजराणा घेणे तसेच भूदास, वेठबिगार व गुलामांना आपल्या शेतावर सक्तीने राबवून घेणे इ. कामे करून घेत असत. राज्यप्रशासन

व्यवस्थेमधील वरिष्ठ जागा, सैन्यातील जागा, न्यायदान क्षेत्रातील जागा यांना मिळत असत. या परंपरागत अधिकारामुळे सरंजामदार वर्ग फ्रेंच लोकावर प्रभुत्व ठेवून होता.

- **धर्मगुरू वर्ग :**

सरंजामदार वर्गा प्रमाणे धर्मगुरू वर्गसुध्दा प्रस्थापित होता. या वर्गाकडे सुध्दा वंशपरंपरागत अधिकार होते. फ्रेंच लोकांची अध्यात्मिक उन्नती करणे, त्यांना सद्मार्ग दाखविणे, हे यांचे काम होते. समाजात यांना अत्यंत मानाचे स्थान होते. असे असले तरी सरंजामदार वर्गाप्रमाणे हा वर्ग श्रीमंती, चैन, विलास याबाबतीत मागे नव्हता. या वर्गाकडे वंशपरंपरागत अधिकार होते. हा वर्ग सुध्दा फ्रांन्समधील एकूण जमीनीच्या हिस्स्यापैकी पाचव्या हिस्स्यावर अधिकार मिळवून बसला होता. या वर्गाचे चर्चचे राज्य, 'राज्यांतंर्गत राज्य' होते. विविध धर्मसंस्था अधिकारात असल्यामुळे प्रचंड पैसा या वर्गाकडे उपलब्ध होत असे.

फ्रांन्समधील चर्च ही धर्मसंस्था कॅथॉलिक होती. त्यामूळे जुने बुरसटलेले विचार, भोंदूगिरी, वाममार्ग, अनैतिकता यामध्ये हे सर्व धर्मगुरू गुंतलेले होते. यामुळे सर्वसामान्य फ्रेंच जनतेचा 'चर्च' या धर्म संस्थेवरील विश्वास उडून गेलेला होता. या धर्मगुरूंना धार्मिक कर, इतर उत्सव कर वसूल करणेचा अधिकार होता. हे कर गोळा करताना सर्वसामान्य लोकांवर सक्ती केली जाई. या वर्गाचा हा अत्याचार फ्रेंच राज्यक्रांतीसाठी कारणीभूत ठरला.

- **सर्व सामान्यवर्ग (थर्ड इस्ट्रेट):-**

संरजामदार व धर्मगुरू व्यतिरिक्त राहीलेले बहुसंख्याक लोक तिसऱ्या वर्गाचे लोक (थर्ड इस्ट्रेट) म्हणून ओळखले जात. यामध्ये ही अनेक पोटभेद होते तिसऱ्या वर्गामध्ये सुध्दा श्रींमत, गरीब, सामान्य, अतिसामान्य, शेतकरी, बुध्दीनिष्ठ व भिकारी यांचा समावेश होता. या सर्वाचे अर्थिक दृष्टिकोनातून तीन प्रकार समजले जात.

१. श्रीमंत जमीनदार (बुर्जवा)

२. मजूर व कारागीर

३. सामान्य / गरीब/ शेतकरी

पहिल्या वर्गामध्ये वकील, डॉक्टर, शिक्षक, लेखक, शेती कसणारे शेतकरी येत असत. यांची आर्थिक स्थिती बऱ्यापैकी असे. हे बुध्दीवादी व वैचारिक असत. हा वर्गच अनियंत्रित राजसत्तेचा खरा विरोधक होता. म्हणून धर्मगुरू, सरदार व उमराव हे या वर्गाचा द्वेष करीत असत. क्रांतीपूर्व व क्रांती काळात जो असंतोष निर्माण झाला त्यास योग्य वळण देण्याचे काम या वर्गाने केले. प्रचलित राजसत्ता, सामाजिक विषमता खऱ्या अर्थाने या वर्गाने नष्ट केली असे म्हणता येईल.

या वर्गातील लोक दुय्यम दर्जाचे असत. यामध्ये हमाल, मजूर, किरकोळ काम करणारे, छोटे मोठे कारागिर येत असत. त्या काळात फ्रांन्स उद्योग प्रधान देश नसल्याने यांची संख्या फ्रेंच समाजात कमी होती.

तिसऱ्या वर्गातील लोक म्हणजेच बहुसंख्य शेतकरी होत. हे लोक म्हणजेच फ्रेंच राष्ट्र होय. या वर्गाने

क्रांतीमध्ये महत्वपूर्ण कामगिरी केली. या वर्गावर प्रस्थापितांनी अनन्वीत अत्याचार केले. हा वर्ग सर्व कर भरत असे. अतिशय मोठा हिस्सा कर रूपाने हा वर्ग राजाकडे भरत असे. कर भरण्यासाठी सक्ती केली जाई. करांच्या ओझ्याखाली हा संपूर्ण वर्ग पिचला गेलेला होता. मात्र राजसत्तेकडून यांना कोणत्याही सोई व सुविधा उपलब्ध होत नसत.

फ्रेंच शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती यामुळे अतिशय वाईट झाली होती. या वर्गाला फ्रांन्समध्ये कोणतेही अधिकार अथवा स्थान नव्हते. अन्याय, अत्याचार, जुलूम यास हा वर्ग बळी पडला होता. माणूस म्हणून असणारे निसर्गदत्त अधिकार या वर्गाला उपभोगता येत नव्हते. या लोकांची व्यक्तिगत स्वायत्ता पायदळी तुडवली गेली होती. परिणामी या वर्गात बुरबाँ राजसत्ते विरोधात प्रचंड चिड, असंतोष, निर्माण झालेला होता. त्याचे पर्यावसन फ्रेंच क्रांतीत झाले.

### ड) आर्थिक कारणे :

सन १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीचे प्रमुख कारण म्हणजे फ्रांन्सची ढासळत चाललेली आर्थिक परिस्थिती होय. या देशामध्ये आर्थिक विषमता, उत्पादनाची साधने राजा-राणी, उमराव, सरदार, संरजामदार व धर्मगुरू यांच्या हाती होती. या लोकांनी केलेल्या भष्टाचारामुळे फ्रांन्समध्ये विषमतेने थैमान घातले. ढासळती अर्थव्यवस्था सावरता आली नाही. परिणामी राज्यक्रांती अटळ ठरली.

- **चौदाव्या लुईची दिवाळखोरी :**

चौदाव्या लुईच्या कारर्किदीमध्ये फ्रांन्सने अनेक लढाया केल्या. युध्दावर प्रचंड खर्च केला. तिजोरीची उधळपट्टी झाली. चौदाव्या लुईचे डोळे उघडले तेव्हा वेळ निघून गेलेली होती. या काळात राष्ट्रीय कर्जाने उच्चांक केला. चौदाव्या लुईला फ्रांन्सला आर्थिक दृष्टिकोनातून सावरता आले नाही.

- **पंधरावा लुई :**

पंधराव्या लुईने आपल्या काळात फ्रांन्समध्ये विविध ठिकाणी मोठ मोठी बांधकामे केली. या बांधकामावर अमाप पैसा उधळला तसेच त्याने ही युध्दांवर प्रचंड पैसा खर्च केला. पोलंड बरोबरील 'वारसाहक्क युध्द' आणि इंग्लंड बरोबरील 'सप्तवार्षिक युध्दे' यावर प्रचंड पैसा खर्च झाला. या युध्दातील पराभवामुळे फ्रांन्सची प्रतिष्ठा लयास गेली.

- **सोळावा लुई आणि अमेरिकन स्वातंष्य युध्द :**

सोळावा लुई फ्रांन्सचा राजा झाला तेंव्हा फ्रांन्सची आर्थिक परिस्थितीत अतिशय बिकट वळणावर होती. असे असताना ही सोळाव्या लुईने अमेरिकन वसाहतींना प्रचंड मोठी लष्करी मदत केली. या घटनेमुळे फ्रांन्सचे आर्थिक कंबरडे मोडले. मात्र अमेरिकेत गेलेल्या फ्रेंच सैनिकांना त्याठिकाणी स्वातंत्र्याचा नवीन अविष्कार पहावयास मिळाला. वसाहतींचे स्वातंत्र्य तेथील लोकांचे देशप्रेम, उद्योगीपणा, विविध अधिकाराचा उपभोग, याचा प्रभाव फ्रेंच सैनिकावर पडला. याचा उपयोग क्रांतीसाठी झाला.

- **असमाधानकारक महसूल करपध्दती :**

या काळात दिवाळखोरीमुळे फ्रांन्सवरील कर्जाचा बोजा वाढत गेला. हा बोजा कमी करणेसाठी सोळाव्या लुईने प्रजेवर कर बसविण्यास सुरूवात केली. उमराव, सरदार, धर्मगुरू वर्ग करमुक्त होता तर फ्रेंच गरीब जनतेवर विविध प्रकारचे असंख्य कर लादण्यात आले. या आर्थिक पिळवणूकीमुळे फ्रेंच जनता उपाशी राहीली. या कर पध्दतीतून गरीब, भूमीहीन, मजूर, कारागिर सुटले नाहीत. मीठ कर, धार्मिक कर, मिरासदारी कर, दळणवळण कर, पाणीपट्टी, दिवाबत्ती, शेतसारा कर, इत्यादी करामुळे आणि वेठबिगारीमुळे फ्रेंच सामान्य जनतेला जीव नकोसा झाला. राज्यकर्ता या नात्याने सोळाव्या लुईने गरीब जनतेकडे दुर्लक्ष केले. परिणामी क्रांती अटळ ठरली.

## इ) धार्मिक कारणे :

फ्रांन्समध्ये 'कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंट्' असे दोन पंथ होते. फ्रांन्समध्ये कॅथॉलिक पंथांचे वर्चस्व होते. कॅथॉलिक व प्रोटेस्टंट् पंथात संघर्ष होते. चर्च या धर्मसत्तेवर प्रभाव राखणेसाठी हे दोन्ही पंथ धडपडत असत. राजसत्ता ही धर्मसत्तेच्या वर्चस्वाखाली असल्याने धर्म सत्तेला हक्क, सवलती, मिळत असत. त्यामुळे चर्चला सुबत्ता प्राप्त झाली होती. धर्म सत्तेकडून राजाला मान्यता घ्यावी लागे. त्यामुळेच धर्म सत्ता राजावर आपला प्रभाव पाडत असे. विविध संस्कार, धर्मअनुष्ठाने, केली नाही. तर नरक यातना भोगाव्या लागतात. असा समज धर्म सत्तेने निर्माण केलेला होता. या अंधश्रध्देपायी सर्व सामान्य जनता अर्थिक दृष्टीकोनातून नागविली जाई. सर्व सामान्य जनतेवर धर्म संस्थेकडून 'टाईथ' नावाचा धार्मिक कर सक्तीने वसुल केला जाई. धर्म संस्थेच्या या अन्यायामुळेच फ्रेंच जनतेत प्रचंड असंतोष निर्माण झाला. व यातून क्रांतीसाठी वातावरण निर्माण झाले.

## ई) वैचारिक कारणे :

शस्त्रापेक्षा अनेक वेळा लेखणी प्रभावी ठरलेली आढळते. याचे सर्वात श्रेष्ठ उदाहरण म्हणजे फ्रेंच तत्ववेत्यांनी लोकांची मने क्रांतीसाठी तयार केली. प्रत्यक्ष फ्रेंच क्रांती या तत्वज्ञांनी घडविली नसेल परंतू फ्रेंच लोकांची दु:खे अत्यंत प्रभावीपणे मांडणेचे काम यांनी केले. गलितगात्र झालेल्या फ्रेंच लोकांचा स्वाभीमान जागृत करण्याचे व नेतृत्व निर्माण करणेचे आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचे अत्यंत भरीव कार्य या विचारवंतांनी केले. संपूर्ण फ्रान्स देशामधील मध्य युगापासून चालत आलेल्या संस्था कशा सडलेल्या आहेत. त्यांना अधोगती प्राप्त झाली आहे. हे आपल्या लिखाणाद्वारे त्यांनी मांडले. हे मांडत असताना उपरोध, तुलना, शास्त्रीय मांडणी, दृष्टांत, युक्तीवाद, दोषनिरूपण आणि प्रखर टिकेच्या माध्यमातून फ्रांन्सच्या सार्वजनीक जीवनातील दोष स्पष्ट केले. या लोकांच्या लिखाणामुळे फ्रेंच जनतेत जागृतीची भावना निर्माण झाली.

भ्रष्टाचारी राजव्यवस्थेला उलथून टाकण्याची पार्श्वभूमी तयार केली. फ्रेंच राज्यक्रांतीला आवश्यक असणाऱ्या सर्व घोषणा या लोकांनीच तयार केल्या होत्या. फ्रांन्समध्ये क्रांती होण्यापूर्वी माँटेस्क्यू ( १६८९ ते १७५५), व्हॉल्टेअर ( १६९४ ते १७७८), फ्रेने ( १६९४ ते १७७४),रूसो ( १८१२ ते १७७८) व डिडेराँ ( १७१३ ते १७८४) या सारख्या विचारवंतानी समाज जागृतीचे कार्य केले. या समाज जागृतीमुळे फ्रांन्सच्या जनतेत वैचारिक क्रांती घडून आली.

- **मॉंटेस्क्यू ( १६८९ ते १७५५) :**

मॉटेस्क्यू तज्ञ कायदेपंडित होता. याने जगातील अनेक राज्य घटनांचा व विविध शासन संस्थाचा मोठा अभ्यास केला होता. स्पिरीट ऑफ लॉज या आपल्या राज्यशास्त्रावरील प्रसिध्द ग्रंथात त्याने राजेशाहीच्या गुणदोषांचे स्वरूप स्पष्ट केले आहे. ब्रिटनची घटनात्मक शासन पध्दती त्यास योग्य वाटे. कारण राजेशाही, लोकशाही व हूकुमशाही या तिन्हीचे गुण एकत्र आलेले आहेत. असे त्याला वाटत असे. मॉन्टेंस्क्यूला फ्रांन्समध्ये राजसत्ता हवी होती पण निरंकुष, अनियंत्रित राजसत्तेचा तो विरोधक होता.

राजसत्तेकडून लोककल्याण होण्यासाठी राजाच्या शासन पध्दतीवर निर्बंध असायला पाहीजेत हे निर्बंध आणण्यासाठी त्याने सत्ताविभाजनाचा सिध्दांत मांडला कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ, न्यायमंडळ या तीन सत्ता त्याला वेगळया हव्या होत्या. एकाच व्यक्तीच्या हाती सत्ता राहील्यास ती व्यक्ती व्यभिचारी, भ्रष्ट बनते या त्याच्या विचारामुळे फ्रांन्समधील दैवी राजसत्तेच्या सिध्दांतावर मोठा प्रहार झाला. फ्रेंच लोकांना त्याच्या या विचारामुळे फ्रांन्समधील प्रचलित अनियंत्रित राजव्यवस्था हीच फ्रान्समधील भष्टाचाराचे, जुलूम अन्यायाचे प्रतीक आहे ते समजून आले. मॉटेस्क्यूने 'सत्ता विभाजनाचा' पुरस्कार केला. मॉटेस्क्यूने फ्रेंच राज्यक्रांती पूर्व काळात जागृतीची भावना निर्माण करून लोकांना क्रांती करण्यास प्रेरित केले.

- **व्हॉल्टेअर ( १६९४ ते १७७८) :**

हा नाटककार, इतिहासकार, कवी, शास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध होता. त्याने आपल्या लिखानात विनोद व उपहास या माध्यमातून फ्रेंच सार्वजनिक जीवनातील सदोष शासन व्यवस्था, बुरबॉं घराण्याची अनियंत्रित राजेशाही, चर्च, धर्मगुरू यांची लबाडी फ्रेंच समाज जीवनातील वर्ग, दांभिकता इ. दोषांवर टिका केली. तो श्रध्दाळू होता. तरीसुध्दा त्याने चर्च, धर्मगुरू, त्यांचे धर्मपीठ त्यातील अनाचार, अनैतिकता, सकुंचीत विचार यावर जोरदार हल्ले केले. व्हॉल्टेअरने प्रचलीत राजव्यवस्थेवर फार मोठी टिका केली. याला लोककल्याणकारी राजसत्ता अभिप्रेत होती. त्याने व्यक्ती स्वातंत्र्यांचा पुरस्कार केला. लोकमताप्रमाणे राज्य चालावे, तसे चालत नसेल तर लोकांनी ते चालवावे, लोकमत सार्वभौम आहे, लोकच सर्वश्रेष्ठ आहेत. राज्य नव्हे, सर्वांचे कल्याण व हित थोड्यांच्या हाती न देता सर्वाच्या हाती द्यावे या मताचा त्याने पुरस्कार केला. त्याने आपल्या लिखाण्याचा माध्यमातून राजसत्तेचे वाभाडे काढले. धर्मसत्ता व राजसत्ता मिळून सामान्यं लोकांवर कसा अन्याय करता हे आपल्या लिखाणाद्वारे दाखविले. व्हॉल्टेअरने 'कॅडिड' नावाचा अत्यंत महत्वपूर्ण ग्रंथ लिहिला.

- **फ्रेने (१६९४ ते १७७४) :**

हा डॉक्टर होता त्याने फ्रांन्समध्ये वैद्यकीय व्यवसाय केला होता. त्यामुळे त्याचा गोरगरीब जनतेशी संबंध आलेला होता. या लोकांची दु:खे त्याला समजली होती. याने फ्रांन्समधील आर्थिक परिस्थितीचा मोठा अभ्यास केला होता. फ्रांन्सची अर्थव्यवस्था सुधरायची असेल तर उद्योग, व्यापार, शेती याकडे लक्ष दिले पाहीजे. फ्रांन्सला आर्थिक दृष्टया सबल करणारी ही क्षेत्रे स्वायत ठेवली पाहिजेत. असे फ्रेनेने अर्थविषयक मोठे विचार मांडले. फ्रांन्स आर्थिकदृष्ट्या बलवान असला पाहीजे असे प्रतिपादन केले. क्रांतीनंतरच्या काळात फ्रेंच नेत्यानी

फ्रेंनेचे विचार प्रत्यक्षात उतरविले.

- **रूसो ( १७१२ ते १७७८) :**

'रूसो झाला नसता तर फ्रेंच राज्यक्रांती झाली नसती' असे म्हणतात याने फ्रेंच जनतेमध्ये क्रांतीची ज्योत पेटविण्याचे महान काम केले त्याने 'द सोशल कॉन्ट्रॅक्ट' म्हणजे 'सामाजीक करार' हा सुप्रसिध्द ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ म्हणजे फ्रेंच राज्यक्रांतीचे बायबल समजतात. या ग्रंथाच्याद्वारे त्याने आपले विचार मांडून क्रांतीला जोरदार चालना दिली. याशिवाय 'माय कन्फेशन्स' नावाचे आत्मचरित्र लिहीले. तसेच एमिल नावाचा दुसरा ग्रंथ ही लिहिला. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या उदात्त तत्वांचा पाठपुरावा केला. रूसोने राजसत्तेच्या दैवीसिंध्दातांला प्रचंड मोठा विरोध केला. जनता अथवा लोकांच्या इच्छेवरच किंवा संमतीवरच राजाचे स्थान अवलंबून आहे. राजा सार्वभौम नसून फ्रेंच लोकमत सार्वभौम आहे. लोककल्याण करण्याच्या अटीवर राजाचे स्थान अवलंबून आहे लोक कल्याण जर राजाकडून होत नसेल किंबहूना हे कर्तव्य त्याच्याकडून जर पार पाडले जात नसेल तर त्या राजास सिंहासनावरून खाली खेचण्याचा नैतिक अधिकार फ्रेंच जनतेला आहे.

पण कोणतीही व्यक्ती सिंहासनावर बसली व तिला एकदा अधिकार प्राप्त झाले की ती प्रजेचे कल्याण करू शकणार नाही ती व्यक्ती सत्तेचा गैरवापर करणार हे इतिहासाने सिध्द केले असून फ्रांन्समध्ये लोकशाहीच असली पाहीजे असे परखड विचार रूसोने मांडले. सामाजिक समता आणणे आर्थिक विषमता नष्ट करणे यावर त्याने मोठा भर दिला. देशामध्ये लोकशाही पद्धतीची शासन व्यवस्था असली पाहीजे, लोक कल्याणासाठी स्वातंष्य पाहीजे सर्वाना समतेची वागणूक मिळाली पाहीजे, कोणीही उच्च, निच नाही. हे त्याचे विचार अत्यंत प्रभावी ठरले. सार्वभौमत्व आणि राजकीय समता या त्याच्या दोन तत्वाचा फ्रेंच जनतेत फार मोठा प्रसार झाला. त्यामूळे लोकशाहीची भावना फ्रेंचांच्या मनात रूजली व ते क्रांतीसाठी तयार झाले.

- **डिडेरॉं ( १७१३ ते १७८४) :**

याने लिहिलेल्या विश्वकोषांच्या माध्यमातून फ्रांन्सचा राजकिय, सामाजिक व धार्मिक जीवनपट लोकांपूढे मांडला. व याच माध्यमातून सामाजीक गुलमगिरी, आर्थिक गुलामगिरी, विषमता, धार्मीकता चर्चमधील अनागोंदी यावर प्रखर टिका केली. राष्ट्राच्या प्रगतीसाठी कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत हे स्पष्ट केले. डिडेरॉने लेखनी व वाणीच्या माध्यमातून आपली विचार-सरणी फ्रेंच समाजात रूजविण्याचा प्रयत्न केला. डिडेरॉच्या विचाराचा प्रभाव फ्रेंच मध्यवर्गावर पडला व या वर्गानेच क्रांतीचे नेतृत्व केले.

वरील विचारवंताशिवाय अर्थशास्त्रज्ञ, इतिहासकार यांनीही याच काळात जहाल लिखाण केले. हेलेवेटियस, हॉलबाँच, क्स्नि, व कॅने यांनी आपल्या लिखाणात कर पद्धतीतील दोष, युध्दांवर होणारे खर्च, गरीब वर्गाचे चाललेले शोषण, गुलामगिरी, वेठबिगारी, चर्च मधील अनैतिकता इत्यादी विषयावर जहाल लिखाण केले. त्यांच्या लिखाणामूळे फ्रेंच गरीब व पिचलेल्या वर्गात मोठी जागृती झाली. या सर्व बुध्दीवादी मंडळीचा प्रभाव फ्रेंच राज्यक्रांतीवर पडलेला दिसतो.

- **स्वयं-अध्यायनासाठी प्रश्न क्र. १**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. फ्रांन्समध्ये ................ या घराण्याची सत्ता होती.

अ) बुरबाँ ब) ऑरेंज क) व्हॅनेवर ड) जेम्स्

२. फ्रान्समधील सर्वसामान्य जनतेला ............. असे म्हणतात.

अ) थर्ड ईस्टेट ब) सेकंड क्लास क) प्रोटेस्टंट ड) रॉईस टॅग

३. सामाजिक करार हा ग्रंथ ................. याने लिहला.

अ) व्हाल्टेअर ब) रूसो क) मिराबो ड) रॉबेस्पिअर

४. स्पिरीट ऑफ लॉज हा ग्रंथ ........... याने लिहिला.

अ) माँन्टेस्क्यू ब) रूसो क) व्हाल्टेअर ड) कॅने

५. फ्रांन्समध्ये ............ व्या शतकात मोठी सामाजिक विषमता होती.

अ) १६ ब) १७ क) १८ ड) १९

## ४.२.२ महत्त्वाच्या घटना आणि नेते :

### अ) राज्यक्रांतीतील महत्त्वाच्या घटना :

- **फ्रान्सची ढासळती अर्थव्यवस्था :**

१४ व १५ व्या लुईपासून फ्रांन्सवरील कर्जाचा बोजा वाढत गेला. आणि १६ व्या लुईच्या काळापर्यंत फ्रांन्स आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यांवर येऊन पोहचला. संरजामदार, उमराव धर्मगुरू, करमुक्त होते. तर गरीब फ्रेंच जनता करदाती होती त्यामुळे सामाजिक जीवनात प्रचंड कटूता निर्माण झाली. फ्रांन्स जेव्हां दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आला १६ व्या लुईने दिवाळखोरीतून फ्रांन्सला वाचविणेसाठी 'टरगॉट' या अर्थमंत्र्याची नेमणूक केली. टरगॉटने अर्थमंत्रीपद स्विकारलेनंतर त्याला अंदाजपत्रका मध्ये तुट जाणवू लागली. प्रत्येक वर्षी अशीच तुट राहीली तर फ्रांन्सचे नक्की दिवाळे वाजेल, याची खात्री टरगॉटला झाली. म्हणून त्याने दिवाळखोरपणा नको, कर वाढ नको, असे धोरण जाहीर केले. आणि राजा-राणी, संरजामदार व सरदार यांची उधळपट्टी कमी करणेचा प्रयत्न केला परिणामी उमराव, सरदार भडकले. त्यानी राणीच्या माध्यमातून टरगॉटला अर्थ मंत्रीपदावरून हाकलले.

टरगॉटच्या हाकालपट्टी नंतर 'नेकर' हा नवा अर्थमंत्री झाला. त्याच्या काळात विविध युध्दावरील खर्च वाढत गेल्याने फ्रांन्सवरील कर्ज वाढत गेले. अशा परस्थितीमध्ये नेकरने खर्च व उत्पन्न दाखविणारा एक अहवाल प्रसिध्द केला. या अहवालात दरबारातील लोक, वरिष्ठ 'प्रस्थापित वर्ग, राष्ट्राची कोणतीही सेवा न

करता तिजोरी कशी रिकामी करतात याचे स्पष्ट चित्र दाखविण्यात आले. या अहवालामूळे नेकरवर दरबारी मंडळीचा रोष वाढत गेला. व त्यामुळे त्यालाही आपले अर्थमंत्रीपद गमवावे लागले. त्यानंतर 'क्लोन' अर्थमंत्री झाला याच्या काळात तिन वर्षामध्ये फ्रांन्सवर ३०० कोटी फॅक्स् डॉलरचे कर्ज झाले. त्याने कर्ज काढण्यास प्रतिबंध केला नाही. पुढे त्याने सर्वसाधारण कर बसविणेचा प्रयत्न केला. यास मोठा विरोध होवून त्यासही आपले मंत्रीपद गमवावे लागले.

- **स्टेटस् जनरलची सभा :**

फ्रांन्सचे अर्थव्यवस्था सावरण्याचे प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर राजाला मृतप्राय झालेली स्टेटस् जनरल सभा बोलवावी लागली. उमराव, धर्मगुरू, व सामान्य प्रजा अशी तीन गृहे होती. ही तिन्हीं सभागृहे स्वतंत्र असत. उमराव व धर्मगुरू यांचे बहुमत होई व सामान्य प्रजेचे एक मत होत असे. त्यामुळे स्टेटस् जनरलमध्ये सामान्य प्रजेच्या मताला त्याज्य ठरविले जाई.

- **स्टेटस् जनरलचे तीन वर्ग :**

फ्रांन्सची आर्थिक दिवाळखोरी लक्षात घेवून राजाने पुन्हा एकदा नेकरला अर्थमंत्रीपद दिले. व स्टेटस् जनरलची सभा मे १७८९ ला 'व्हसार्य' येथे बोलविण्यात आली. फ्रांन्समधील सामान्य जनतेला विश्वासात घेतल्या शिवाय आपणाला कांही करता येणार नाही याची खात्री सोळाव्या लुईला झाली होती. या सभेला एकूण बाराशे हून अधिक प्रतिनिधी हजर होते. यामध्ये ६२१ प्रतिनिधी थर्ड इंस्टेट, २८५ उमरावांचे प्रतिनिधी आणि ३०८ धर्मगुरूंचे प्रतिनिधी एकत्र येवून बैठक झाली. ही बैठक फ्रांन्सच्या इतिहासात अविस्मरणीय मानली जाते.

- **फ्रेंच जनतेची गाऱ्हाणी :**

स्टेटस् जनरलेच्या सभेस आलेल्या प्रतिनिधीनी जनतेची गाऱ्हाणी, जनतेची दु:खे, अडचणी, नविन सुधारणा याबाबतीत राजाकडे आपल्या मागण्या सादर केल्या. त्या याप्रमाणे होत्या.

- केवळ लहरीवर जे शासन चालू आहे ते बंद करण्यात यावे.
- प्रत्येकास स्वातंत्र्य देणारी राजघटना तयार करण्यात यावी.
- स्टेटस् जनरलची सभा नियमित बोलविण्यात यावी.
- स्टेटस् जनरलला कायदे करण्याचे अधिकार असावेत.
- प्रजेवर कर बसविताना स्टेटस् जनरलची परवानगी घ्यावी.
- शेतकऱ्यावर बसविलेले कर रद्द करण्यात यावे. स्टेटस् जनरलच्या कोणत्याही प्रतिनिधीने क्रांतीचा उल्लेख केला नव्हता. या उलट राजाने आम्हांला बोलविले या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कारण नवीन सुधारणाबाबत त्यांना अशा निर्माण झाली होती.

● **स्टेटस् जनरलचे राष्ट्रीय सभेमध्ये रूपांतर :**

अर्थमंत्री नेकरने स्टेटस् जनरल सभा बोलविली खरी परंतू महत्वाचा प्रश्न लोंबकळत ठेवला. स्टेटस् जनरलचे प्रतिनिधी एकाच सभागृहात बसले नाहीत. ते आपआपल्या सभागृहात बसले. हे तिन्ही सभागृहाचे प्रतिनिधी एकत्र बसले असते तर या सभेस पार्लेमेंटचे स्वरूप मिळाले असते परंतू तसे घडले नाही. परिणामी तिसऱ्या वर्गाने १७ जुन १७८९ ला आमचे सभागृह म्हणजेच 'राष्ट्रीय सभा' आहे. असे जाहीर केले.

● **टेनिस कोर्टावरील शपथ :**

२० जुन १७८९ ला थर्ड इस्टेटचे प्रतिनिधी सभेसाठी आपल्या सभागृहाच्या जागी गेले तेव्हां सभागृह राजाच्या सैनिकांनी ताब्यात घेतल्याचे आढळले. यामुळे राष्ट्रीय सभेची गळचेपी करण्याचा उद्देश आहे. असा समज सामान्य वर्गाचा झाला. यामुळे राजा, उमराव, धर्मगुरू हे एका बाजूला व थर्ड इस्टेट दुसऱ्या बाजूला अशी स्थिती निर्माण झाली. अशा गोंधळाच्या वातावरणात सामान्य जनतेने सभागृहाजवळच असलेल्या टेनिस कोर्टाकडे मोर्चा वळविला व त्या मैदानवर राष्ट्रीय सभेचे अधिवेशन घेण्यात आले. त्या ठिकाणीच राज्यघटना तयार करण्याची शपथ घेण्यात आली. यास फ्रांन्सच्या इतिहासात 'टेनिस कोर्टवरील शपथ' असे म्हणतात.

● **संयुक्त बैठक :**

उमराव, धर्मगुरू, संरजामदार वर्गाने राजावर दडपण आणले. व राष्ट्रीय सभेला मोडून काढण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्यांनी राजाचा पाठिंबा मिळवून २३ जुन १७८९ ला तिंन्ही सभागृहाची बैठक भरविली या बैठकीमध्ये थर्ड इस्टेटनें केलेली कृती अवैध आहे असे जाहीर केले, आणि उमराव, धर्मगुरू वर्गासह राजा सभागृहातून निघून गेला. मात्र थर्ड इस्टेटचे सभासद त्याच ठिकाणी बसून राहीले. हे पाहताच राजाचा अधिकारी थर्ड इस्टेटच्या सभासदाना म्हणाला राजाचा हूकूम तुम्ही ऐकला नाही का? आपण येथून निघून जावे अशी माझी विनंती आहे. त्याच वेळी सभागृहाच्या बाहेर राजाचे सैनिक दिसू लागले. थर्ड इस्टेटच्या सभासदाना आपण येथून निघून गेल्यास आतापर्यंत केलेल्या कामावर पाणी फिरेल. आणि बाहेर पडल्यास राजाचे सैनिक मारतील. असे वाटू लागले दरम्यान थर्ड इस्टेट सभागृहाचा नेता 'मिरँबो' याने उभे राहून आम्ही येथून हलणार नाही असे स्पष्ट सांगितले व जो कोणी उपस्थितीत सदस्यांवर शस्त्र उगारेल त्यास देशद्रोही समजण्यात येईल. असे सांगून तसा ठराव राष्ट्रीय सभेने पास केला. सभागृहामध्ये झालेला हा गोंधळ सेवकाने राजास सांगितला. थर्ड इस्टेटच्या लोकांचा हा उघड राजांज्ञा भंगाचाच प्रकार होता. सोळाव्या लुईला काय करावे हे सूचेना झाले दोन दिवसानंतर अनेक धर्मगुरू उमराव, राष्ट्रीय सभेस येवून मिळाले. २७ जुन १७८९ ला सोळाव्या लुईने खास वटहूकुम काढून तिंन्ही सभागृहाने या पुढील काळात एकत्रच बैठकी घ्याव्यात असे जाहीर केले.

● **अर्थमंत्री नेकरची पुन्हा एकदा हाकलपट्टी :**

सोळावा लुई आणि सामान्य वर्ग यांच्यात संघर्ष चालुच राहीला. राजा आणि त्याच्या दरबाराच्या लोकांनी राष्ट्रीय सभेला चिरडण्याचे प्रयत्न केले. अर्थमंत्री नेकरने राज्यकारभार सुधारणा सुचविल्या होत्या. पण त्या मान्य झाल्या नाहीत. उलट नेकरची पुन्हा हाकलपट्टी करण्यात आली. राजाने व्हसार्य आणि पॅरीस जवळ

लष्कर जमा केले व राष्ट्रीय सभा व फ्रेंच जनतेच्या चळवळीवर प्रहार करण्याचे ठरविले. हे कळताच राष्ट्रीय सभेने लोकांना सैन्य स्थापन करण्याचे आदेश दिले या घटनेला फ्रान्सच्या इतिहासात 'सिव्हीक्स् गार्डस्' असे नाव मिळाले. पुढे हीच संघटना फ्रान्सची 'नॅशनल गार्डस्' बनली. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतलेला फ्रेंच लष्कराचा सेनापती लाफायत हा या संघटनेचा प्रमुख बनला.

● **बॅस्टिलचा पाडाव :**

नेकरच्या हकालपट्टीमुळे राजाच्या प्रतिगामी धोरणाबाबत फ्रेंच जनतेला खात्री झाली. त्यामुळे पॅरीस, व्हसार्यसह अनेक शहरात असंतोष उसळला. जनतेनेच राष्ट्रीय सभेला मोठे संरक्षण दिले. लोकांनी हाती सापडतील ती शस्त्रे घेवून बॅस्टिल या गढीवजा किल्ल्यावर हल्ला चढविला. बॅस्टिलचा किल्ला जुलूम व अन्यायाचे प्रतिक होता या ठिकाणी हजारो निरपराध लोकांना डांबून ठेवले होते. या ठिकाणी जो संघर्ष झाला त्यामध्ये २०० लोक मारले गेले, शेकडो लोक जखमी झाले. बॅस्टिल येथील तुरूंग प्रमुख डी. लुने मारला गेल्यानंतर लोकांनी कैदी असणाऱ्या लोकांना मुक्त केले विजयी मिरवणूक काढली. १४ जुलै १७८९ हा दिवस 'राष्ट्रीय दिन' म्हणून जाहीर करण्यात आला. म्हणून हा दिवस फ्रान्समध्ये स्वातंत्र्याचा विजय दिवस म्हणून ओळखला जातो. बॅस्टिलवरील हल्ला फ्रान्सच्या क्रांती घटनांची नांदी ठरला.

● **चार ऑगस्टची सामाजिक क्रांती :**

फ्रान्सच्या क्रांतीकाळात राजाच्या विरोधात सामान्य जनता विजयी होत गेली. हे लोन संपूर्ण फ्रान्समध्ये सुरू झाले. अत्याचारी लोकांवर सुड घेण्यात आले. फ्रान्समधील उमराव, धर्मगुरू, राजनिष्ठ लोक यांच्यावर मोठे हल्ले करण्यात आले. जमिनदारांचे वाडे लुटण्यात आले. त्यांच्याकडे असणारी जमीन, गहाण खतपत्रे जाळण्यात आली. अनेक ठिकाणी जमीनदाराचे खून पाडण्यात आले. धान्यसाठे लुटण्यात आले. या घटनेने फ्रान्समध्ये संरजामशाही मोडकळीस आली.

४ ऑगस्ट १७८९ या दिवशी 'नोआलिस्' या उमरावाने आपले परंपरागत सर्व अधिकार त्याग करून सर्वसामान्य प्रजेबरोबर आहोत हे दाखवून दिले. या घटनेमुळे अनेक उमरावांनी आपले वंशपरागत अधिकार त्यागले. या ठिकाणी झालेल्या सभेत अत्यंत महत्वपूर्ण ठराव पास करण्यात आले. या ठरावांना ४ ऑगस्टचे वटहूकूम म्हणून ओळखले जातात ते या प्रमाणे :

१) फ्रान्समध्ये वेठबिगारी पद्धत रद्द करण्यात आली.

२) उमरावांचे वंशपरंपरागत अधिकार रद्द करण्यात आले.

३) या पुढे कोणताही भेदभाव करण्यात येवू नये.

४) निष्पक्षपातीपणे न्याय देण्यात यावा.

५) सर्व फ्रेंच लोक समान मानले जातील.

६) सामाजिक भेद व विषमता नष्ट करण्यात येईल.

स्वातंत्र्य, समता, बंधुता ही आधारभूत तत्वे राहतील असे जाहीर करण्यात आले. म्हणून ४ ऑगस्ट हा दिवस फ्रेंच राज्यक्रांतीत मोठा मानला जातो. या घटनेने फ्रान्समध्ये परंपरागत चालत आलेली सामाजिक विषमता मोडून पडली.

- **व्हर्सायच्या राजवाड्यावर फ्रेंच स्त्रियांचा मोर्चा :**

राजा सोळावा लुई हा धरसोड वृत्तीचा होता. राणी आपल्या राजनिष्ठ सेवकांच्या व आपल्या भावाच्या पाठिंब्याच्या मदतीने क्रांती दडपण्याचा प्रयत्न करीत होती. ऑगस्टच्या सामाजीक क्रांतीच्या ठरावांना संमती-दर्शक सही नाकारून राजाने राष्ट्रीय सभेच्या ध्वजाचा अपमान केला. ही बातमी कळताच हजारो स्त्रियांनी पुढाकार घेवू पॅरिसहून व्हर्सायच्या राजवाडयावर मोर्चा काढला. हा मोर्चा संप्तत व भुकेल्या स्त्री-पुरूषांचा होता. राजाच्या सैनिकानी या लोकांना विरोध केला नाही. खवळलेल्या लोकांनी राजा-राणी यांना पकडून अत्यंत अपमानास्पद रितीने पॅरीस येथे आणले. मिरवणूकीतील स्त्रीयांनी 'आम्ही बेकरीवाला आणि त्यांची पत्नी पकडून आणली आहे हे आता आम्हांस भरपूर ब्रेड खावयास देणार आहेत.' अशा प्रकारच्या घोषणा दिल्या. 'भाकरी मिळत नसेल तर ब्रेड खा' म्हणणाऱ्या राणीला लोकांनी चांगलीच अद्दल घडवली. राजा व राणीला पॅरिस जवळ कैदत ठेवण्यात आले. या घटनेने व्हर्सायच्या राजवाड्याचे महत्व लोप पावून फ्रान्सचा राजकारभार पॅरिस या ठिकाणाहून सुरू झाला व राष्ट्रीय सभेचे कार्य सुरू झाले.

- **राष्ट्रीय सभेचे कार्य :**

**अ) विषमता व जमीनदारी पध्दत नष्ट :**

फ्रान्सच्या क्रांतीकाळात उदयास आलेल्या राष्ट्रीय सभेने १७८९ ते १७९१ या काळात महत्वपूर्ण कार्य केले. राष्ट्रीय सभेने फ्रान्समध्ये राज्यघटना करण्याचे मोठे काम केले. या राष्ट्रीय सभेने उमरावशाही, संरजामशाही व विषमता नष्ट करून मोठे कार्य केले

**ब) मानवी हक्काचा जाहीरनामा :**

राष्ट्रीय सभेने फ्रान्समध्ये मानवी हक्काचा जाहीरनामा घोषीत केला. अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याच्या धर्तीवर तो आधारीत होता. त्यात सतरा महत्वपूर्ण कलमे होती. यामधील अधिकारी हे कोणत्याही शासनाच्या मर्जीवर अवलंबून नव्हते, म्हणून मानवी हक्काचा जाहीरनामा फ्रेंच राजक्रांतीचा पाया मानला जातो. ही कलमे या-प्रमाणे होती.

१) मानव हा जन्मतः स्वतंत्र आहे. तो स्वंतत्रच राहतो. त्याला समान हक्कप्राप्त होतात.

२) सामाजिक जीवनात व्यक्ती, व्यक्तींमध्ये भेदभाव करता येणार नाही.

३) मानवाच्या नैसर्गिक अविनाशी हक्काचे रक्षण करणे हे प्रत्येक राजकीय संस्थेचे ध्येय असले पाहिजे ते म्हणजे स्वातंत्र्य, मालमत्ता संपादन, सुरक्षितता, अन्यायांचा प्रतिकार ही होत.

४) दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या हितसंबंधाला न दुखवणे. स्वइच्छेनुसार वागण्याचे स्वांतत्र्य हे प्रत्येक

व्यक्तीला असलेच पाहिजे.

५) आचार, विचार, उच्चार मतप्रदर्शन करणे इत्यादी हक्क असतील .

६) कायद्याचे विहीत राहून आरोप निश्चित करणे.

७) विना चौकशी कोणासही तुरूंगात ठेवता येणार नाही.

८) आरोप सिध्द झालेशिवाय शिक्षा देण्यात येवू नये. कायद्याद्वारे सामाजिक समता प्रस्थापित करणे.

९) सार्वभौमत्व हा राष्ट्राचा अधिकार आहे. तो व्यक्ती अथवा संस्थेला घेता येणार नाही.

१०) फ्रेंच लोकच अर्थव्यवस्थेवर नियंत्रण ठेवतील.

११) सर्व देशात जनकल्याणकारी कायदे निर्माण केले जातील.

राष्ट्रीय सभेने केलेल्या या मानवी हक्काच्या जाहीरनाम्यामध्ये व्यक्तीस्वांतत्र्य, नागरीहक्क, नागरी मताधिकार, कायदा व न्याय, शिक्षा पध्दती, खाजगी मालमत्तेचा अधिकार स्पष्ट केलेला आढळतो. या जाहीरनाम्यामुळे स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या तीन तत्वांचा जोरदार प्रसार झाला.

**क) एकसमान राज्य व्यवस्था स्थापन :**

राष्ट्रीय सभेने फ्रान्समध्ये एकसमान राज्यव्यवस्था निर्माण केली. ८३ प्रांत, विभाग, कॅटंन्स, कम्युन्स निर्माण केली व ग्रामीण भागात स्थानिक कौन्सिलची तरतुद केली. न्यायाधिशांची निवड लोकामार्फत सुरू केली. कायदे जास्तीजास्त सुटसुटीत केले.

**ड) अर्थव्यवस्थेची पुर्नरचना :**

फ्रान्स आर्थिकदृष्ट्या दुबळा होता. तो सशक्त बनविणेसाठी राष्ट्रीय सभेने प्रयत्न केले. चर्च या धर्मसत्तेची सर्व मालमत्ता जप्त केली व फ्रान्समध्ये कागदी चलन सुरू केले. चर्च संबंधी अत्यंत कडक उपाय करून फ्रान्समध्ये धार्मिक संहिष्णुता जाहीर केली. जुलै १७९० मध्ये चर्चला मुलकी राजघटना लागू केली. बिशप, आर्चबिशप यांची नियुक्ती अधिकार लोकांना दिले. त्यांना रोख पगार सुरू केला. यामुळे पोपची धार्मिक सत्ता नाराज झाली.

**इ) नवीन राज्यघटना निर्माण :**

सन १७८९ ते १७९१ पर्यंत राष्ट्रीय सभेने जे वेळोवेळी हूकूम, जाहीरनामे, कायदे केले होते ते एकत्र करून राष्ट्रीय सभेने फ्रेंच लोकांना घटना दिली. व राजाने त्यास संमती दिली. ही फ्रांन्सची लिखीत राजघटना होय. नविन राज्यघटनेनुसार फ्रांन्समध्ये मर्यादीत घटनात्मक राजेशाही अस्तित्वात आली. राजाच्या अमर्याद सत्तेवर अंकूश लावण्यात आला. मर्यादित राजेशाही व सत्ताविभाजन ही दोन्ही वैशिष्ट्ये या राज्यघटनेमध्ये होती. या राज्यघटनेमध्ये कायदेमंडळ निर्माण करण्यात आले. या कायदे मंडळाचे सदस्य निवडणूकीने निवडून घेण्यात आले. लोकांना मतदानाचे अधिकार दिले. न्याय शाखा पुर्नजिवीत करण्यात आली. न्यायाधिशांची

निवड निवडणूका घेवून करण्यात आली.यांचा कार्यकाळ चार वर्ष ठेवण्यात आला. पंच पध्दती सुरू करण्यात आली. फ्रांन्समधील राज्यकारभार विक्रेंद्रित केला अधिकारी, कारकून, यांची योग्य पध्दतीने निवड केली. प्रशासनातील गोंधळ कमी केला. राष्ट्रीय सभेने आपल्या काळात असे भरीव कामकाज केले. राष्ट्रीय सभेने जे कार्य केले त्यामुळे फ्रांन्सच्या राजकारणाला विशिष्ट अशी दिशा मिळाली. अनियंत्रित राजेशाहीचे जोखड फेकून देवून जनतेला राज्यकारभारात सहभाग मिळून देणेसाठी राष्ट्रीय सभेने केलेले कार्य महत्वाचे मानले जाते.

**● राष्ट्रीय सभेच्या कार्याचे मुल्यमापन :**

राष्ट्रीय सभेने १७८९ ते १७९१ या काळात महत्वपूर्ण कार्य केले. जुनी राज्यव्यवस्था, सरंजामदार वर्ग, जुनी अर्थव्यवस्था, बदलून टाकून चर्चच्या संस्थेत बदल घडविले. प्रशासन सोपे करण्याचा प्रयत्न केला. कांही इतिहासकारांच्या मतानुसार राष्ट्रीय सभेने घेतलेल्या निर्णयामुळे फ्रांन्समध्ये झुंडशाहीस प्रारंभ झाला. धार्मिक प्रश्नामुळे फ्रांन्सच्या समाजात दरी निर्माण झाली. कायदे मंडळ आणि कार्यकारी मंडळ वेगळे झाल्याने त्यांची कार्यक्षमता नष्ट झाली. जुन्या जाणकार लोकांना डावलले गेले. नवीन तरूणांना वाव दिला. या गोष्टींचा फायदा होण्या ऐवजी नुकसान झाले असे म्हणतात. तरी राष्ट्रीय सभेने केलेले कार्य पुढे टिकले फ्रेंच जनतेला प्रेरणा व स्फूर्ती मिळाली. ही गोष्ट कमी महत्वाची नाही.

**ब) राज्यक्रांतीतील महत्त्वाचे नेते :**

**● माक्सीमील्यँ फ्रांस्वा रोब्झपिअर (१७५८–१७९४) :**

फ्रान्समधील एक जहाल क्रांतिकारक आणि तत्कालीन जॅकबिन्झ गटाचा एक पुढारी. त्याचा जन्म ॲरास येथे मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्याचे वडील वकील होते. आईच्या मृत्यूनंतर वडील घर सोडून गेले; म्हणून आजोबांनी त्याचा सांभाळ केला. त्याचे प्रारंभीचे शिक्षण जन्मगावीच झाल. पुढे त्याने पॅरिसच्या लूई ले–ग्रां या जेझुइट कॉलेजमधून वकिलीची पदवी घेतली. या काळात त्याच्या मनावर रूसो व व्हॉल्तेअर यांच्या विचारांचा प्रभाव पडला. त्याने ॲरास येथे वकिली व्यवसायास प्रारंभ केला (१७८१); तथापि त्याची साहित्यविषयक उर्मी जाज्वल्य होती. 'रोझाती' या वाङ्मय मंडळाचा तो सभासद झाला. रूसोच्या आदर्शन समाजाविषयी त्याला आकर्षण होते. क्रांतीनंतर तो लोकसत्ताक गणराज्याच्या पुरस्कनर्ता आणि प्रभावी वक्ता म्हणून पुढे आला. तो गरीबांचा कैवारी होता. राष्ट्रीय सभेत तो ॲरासचा उदारमतवादी प्रतिनिधी म्हणून निवडून गेला. त्याने राष्ट्रीय सभेत एका याचिकेद्वारे सोळाव्या लूईला पदच्युत करण्याची मागणी केली (१७९१). पुढे नॅशनल कन्व्हेन्शन निवडणकीत पॅरिसमधून तो सर्वात जास्त मते मिळवून निवडून आला. जानेवारी १७९३ मध्ये सोळाव्या लूईचा शिरच्छेद करण्यात आला व जहालांचे वर्चस्व वाढू लागले. ३१ मे १७९३ रोजी मवाळ जिराँडिस्टांचा प्रभाव झाला व राजसत्तेवर जहाल जॅकबिन्झांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. ४ जून १७९३ रोजी तो सुरक्षासमितीचा सभासद झाला. सत्ता हातात आल्यानंतर रोब्झपिअरने आपल्या विरोधकांचा अतिशय क्रूरपणे नि:पात करावयास सुरूवात केली. त्यात अनेक क्रांतिकारकांचा बळी गेला.

तत्कालीन राजकारणात त्याने गरीबी निवारण यांसारखे प्रयोग केले; कायद्यात बदल घडवून आणले. त्याने

प्रज्ञादेवीची उपासना रद्द करून स्वतःच्या अशा धर्मपंथाचे प्रवर्तन केले. परमेश्वराचे अस्तित्व व आत्म्याचे अमरत्व हे मानवजातीचे स्वप्न आहे, असे त्याचे मत होते. त्याने मानवी अधिकारांचा व स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्याला फ्रान्समध्ये सद्‌गुणांचे स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्त्वत्रयींवर आधारीत राज्य स्थापन करावयाचे होते; कारण विश्वात्मक मानवी बंधुभावावर त्याचा विश्वास होता; तथापि त्याच्या दहशतवादामुळे राष्ट्रीय समितीतील सदस्य त्याच्या विरोधात जाऊ लागले. देशसंरक्षण समितीत रोब्झापिअर विरुद्ध बहुमत सिद्ध झाले. त्याच्यावर अनेक आरोप लादण्यात आले. त्यामुळे त्याच्याविरुद्ध उठाव झाला व त्याला पकडण्यात आले. २६ जुलै १७९४ रोजी त्याच्यावर खटला भरून फाशीची शिक्षा फर्माविण्यात आली व त्याला ठार मारण्यात आले.

रोब्झपिअर हा यूरोपातील सतराव्या व अठराव्या शतकांतील वैचारिक चळवळींनी प्रभावित झालेला एक मानवतावादी विचारवंत होता. अविवाहित राहून त्याने विवेकनिष्ठ नागरी सद्‌गुणांची जोपासना केली. प्रजासत्ताक लोकशाही, मानवी अधिकार व स्वातंत्र्य या तत्त्वांवर त्याचा विश्वास होता. गरिबांविषयी त्यास कणव होती; पण या उच्च मूल्यांना प्रस्तापित करण्याच्या प्रयत्नात त्याने दहशतवादी हुकूमशाही शासनाचा अवलंब केला.

● **झॉर्झ झाक दांताँ (१७५९ – १७९४) :**

फ्रेंच राज्यक्रांतीतील एक प्रभावी वक्ता व मुत्सद्दी. त्याचा जन्म आर्सीस्यूरोब ऑबे (शँपेन) येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्याचे वडील एक झाक व सामान्य वकील होते. त्यांच्या मारी मादलेन काम्यू या दुसऱ्या पत्नीचा झॉर्झ हा मुलगा. रीम्झ या विद्यापीठातून कायद्याची पदवी घेऊन (१७८५) तो नोकरीसाठी पॅरिस येथे आला आणि अल्पावधीतच त्याने अर्थसंचय करून अधिवक्त्याचे कार्यालय विकत घेतले. हळूहळू तो फ्रेंच राज्यक्रांतीत सहभागी झाला.

१७८९ मध्ये प्रत्यक्ष क्रांतीस सुरूवात होताच कॉर्दल्येच्या नागरी फौजेत तो सामील झाला आणि लवकरच जिल्हयाचा अध्यक्ष झाला. त्याने 'कॉर्दल्ये क्लब' या राजकीय संस्थेची स्थापना केली. यामुळे त्याची लोकप्रियता वाढली. त्याची पॅरिस येथे विभागशासक म्हणून निवड झाली (१७९१). या वेळी जॉकबिन्झ आणि जिराँदिस्त या दुसऱ्या दोन राजकीय संस्थाही फ्रान्समध्ये राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या खटपटीत होत्या. संविधानात्मक राजेशाही नष्ट करण्यात व १७९२ मध्ये झालेल्या राजघराण्यातील व्यक्ती व सरदार यांच्या कत्तलीस (सप्टेंबर कत्तल) त्याला इच्छा असूनही विरोध करता आला नाही, म्हणून लोकमतासाठी त्याने संमती दर्शविली, यानंतर फ्रान्सवर ऑस्ट्रिया व प्रशिया यांनी स्वारी केली, त्यावेळी त्याने जे भाषण केले ते संस्मरणीय ठरले. त्याचे म्हणणे असे होते की, क्रांतिकारकांनी प्रथम फ्रान्सच्या नैसर्गिक सीमा ठरवून राष्ट्राची उभारणी करावी. साहजिकच क्रांतीनंतरच्या हंगामी सरकारात त्याची मंत्री म्हणून निवड झाली आणि कार्यकारी समितीचा तो सर्वाधिकारी झाला. सुमारे एक वर्ष दांताँ हा जवळजवळ हुकूमशाह होता. १७९३ मध्ये त्याने त्याची संरक्षण समिती आणि क्रांतिकारी लवाद यांचा अध्यक्ष म्हणून निवड झाली; पण त्याच वर्षी झाक रने एबेअरचे वर्चस्व कॉर्दल्ये क्लबमध्ये वाढले. अंतर्गत कलह कमी करण्यासाठी त्याने प्रयत्न केले. लोक जॅकबिन्झकडे नव्या नेतृत्वासाठी आशेने पाहू लागले. यावेळी रोब्झपीअर व त्याचे अनुयायी यांचे महत्त्व वाढले होते. यामुळे १० जुलै १७९३ रोजी त्याची फेरनिवड झाली नाही. क्रांतीची सर्व सूत्रे ओघानेच रोब्झपीअरच्या हातात गेली. दांताँने

राजकारणातून निवृत्त होण्याचा मार्गही हाताळऊन पाहिला; पण मित्रांच्या आग्रहाने तो पुन्हा राजकारणात खेचला गेला. रोब्झपीअरने प्रथम एबेअरच्या अनुभागांचे खच्चीकरण केले आणि रोब्झपीअरच्या धोरणास दांताँ पाठिंबा देऊनही अखेर रोब्झपीअरने त्याच्या अनुयायांसह त्याला पकडले आणि पॅरिस येथे फाशी दिले.

दांताँच्या चरित्र आणि चारित्र्य यांबद्दल मतभेद आहेत. काहींच्या मते तो एक संधिसाधू राजकारणी होता आणि धनसंचयासाठी त्याने खऱ्याखोट्याची कधीही तमा बाळगली नाही, तर इतर त्याच निष्ठावान देशभक्त मानतात. कसेही असले, तरी फ्रेंच राज्यक्रांतीनंतर काही वर्षे तो फ्रान्सचा अनभिषिक्त राजा होता.

- **स्वयं-अध्यायनासाठी प्रश्न क्र.२**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. दिवाळखोरपणा नको, कर वाढ नको,.......... असे धोरण कोणत्या अर्थमंत्र्याने जाहीर केले.

अ) नेकर ब) कॅलोन क) टरगॉट ड) ब्रियान

२. ................ या अर्थमंत्र्याच्या काळात फ्रांन्सवर तीनशे कोटी डॉलरचे कर्ज झाले.

अ) नेकर ब) कॅलोन क) टरगॉट ड) ब्रियान

३. ............ या वर्गाने आम्हींच राष्ट्रीय सभा आहोत असे जाहीर केले.

अ) संरजामदार ब) धर्मगुरू क) थर्ड इस्टेट ड) बुर्ज्वा

४. .............. हा थर्ड इस्टेटचा नेता होता.

अ) डिलुने ब) कॅने क) फॅने ड) मिरॅबो

५. .......... हे ठिकाण फ्रेंच जनतेच्या जुलमाचे प्रतिक होते.

अ) पॅरिस ब) व्हर्साय क) बॅस्टिल ड) सेंट

### ४.२.३ फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम :

- **पहिले फ्रेंच विधिमंडळ :**

राजा व राणी नजर कैदेत होते. फ्रान्समध्ये राष्ट्रीय सभा कार्य करीत होती. तेंव्हा राजा व राणीने फ्रान्समधून पळून गेलेले राजनिष्ठ लोक, स्वत:चा बंधू व इतरांच्या मदतीने क्रांती दडपण्याचा विचार केला व २० जुन १७९१ रोजी पळून जाण्याचा प्रयत्न केला. परंतू त्यांचा प्रयत्न असफल ठरला. त्यांना पकडून आणून परत नजर कैदेत ठेवण्यात आले. यांनतर राष्ट्रीय सभेत राजाच्या अधिकाराबाबत सखोल चर्चा झाली. परंतू शेवटी राजालाच घटना प्रमुख म्हणून ठेवण्यात आले. त्यावर राजाच्या सही घेवून घटना मंजूर होवून नविन कायदे मंडळ अस्तित्वात येण्यापूर्वी राष्ट्रीय सभा बरखास्त करण्यात आली. पुढे कायदे मंडळाच्या निवडणूका घेण्यात येवून ७४५ जणांचे एक कायदेमंडळ तयार झाले. यात जुने अनुभवी सभासद नव्हते. त्यामुळे पुन्हा फ्रान्स संकटाच्या

गर्तेत अडकला. या काळात फ्रान्समध्ये अनेक पक्ष निर्माण झाले. फ्रान्सच्या जिरॉंड या भागातून आलेल्या सदस्यांना जिरॉंडिन्स् म्हणून ओळखले जाई. तर पॅरिस परिसरातील प्रतिनिधीच्या गटास जॅंकोबिन्स् म्हणत असत. या जहाल गटाचे नेतृत्व मिरॅबो व लाफायते यांच्याकडे होते. यामधील कॉर्डेलियर हा गट अति जहाल होता. डॉंटन हा या गटाचा प्रमुख होता. ग्रामीण भागातून आलेल्या प्रतिनिधींना नियंत्रित राजेशाही मान्य होती. जिरॉंडिन्स हे संयमी व मवाळवादी होते. त्यांना फ्रांन्समध्ये प्रजाकसत्ताक राजवट हवी होती. तर जॅंकोबिन्स् प्रतीनिधींना राजेशाही पूर्णपणे नष्ट करावयाचे होती. नवीन कायदे मंडळाने धर्मगुरूवर पहिल्यांदा निर्बंध लादले व क्रांतीकाळात पळून गेलेल्यांची मालमत्ता जप्त करण्याचे निर्णय घेतले. सोळाव्या लुईने याला विरोध केला. त्यामुळे या नव्या विधीमंडळाने सोळाव्या लुईचे राजपद नष्ट करून हंगामी सरकार स्थापन केले.

फ्रेंच राजक्रांतीमुळे युरोपातील राजेशाहीला धोका निर्माण झाला अनेक देश फ्रान्सचे शत्रू बनले. अशा परिस्थितीत कायदे मंडळाने २० एप्रिल १७९२ रोजी ऑस्ट्रिया-विरूद्ध युद्ध पुकारले. परंतू युध्द आघाड्यावर फ्रान्सचा पराभव होवू लागला. या काळात सोळावा लुई आणि राणीने क्रांती विरोधी मदत करण्याचे आव्हान युरोपीयन देशांना केले. ऑस्ट्रिया व प्रशिया या देशानी राजेशाही संरक्षणासाठी लुईला पाठींबा दिला. व फ्रान्समध्ये पुन्हा बुरबॉं राजघराण्यांची सत्ता निर्माण केली जाईल अशी घोषणा केली. त्यामुळे लोकांनी राज्यघटना रद्द करून कायदेमंडळ ( विधिमंडळ) बरखास्त केले नवीन निवडणूका घेतल्या. आणि २० सप्टेंबर १७९२ रोजी नॅशनल कन्व्हेन्शन सरकार सत्तेवर आले.

- **नॅशनल कन्व्हेंन्शन सरकारचे - कार्य :**

२१ सप्टेंबर १७९२ ते २६ ऑक्टोंबर १७९५ या काळात फ्रान्समध्ये नॅशनल कन्व्हेंन्शन कार्य केले. या नॅशनल कन्व्हेंन्शन सकारला अनेक गुंतागुतीचे प्रश्न व समस्या सोडवाव्या लागल्या उदा. सोळाव्या लुईच्या बाबतचा प्रश्न, राजेशाही समर्थन करणाऱ्या देशांबाबत संघर्षचे प्रश्न, अंतर्गत उठाव व बंडाळाचे प्रश्न, फ्रांन्समध्ये समाजसुधारण्याचा प्रश्न व फ्रांन्सची अर्थिक प्रगती करणे इ. गुंतागुतीच्या समस्या या सरकारपुढे होत्या.

राष्ट्रीय सभेच्या बरखास्तनंतर फ्रान्सची नवीन असेब्ली अस्तीत्वात आली यामध्ये विविध पक्षांचे सदस्य होते. या सरकारात जॅंकोबिन्स् लोकांचा मोठा प्रभाव होता.

**१) सोळाव्या लुईस फासावर चढविले :**

या सरकारने राजपद नष्ट केले. सोळाव्या लुईवर देशद्रोहाचा आरोप ठेवून खटला चालविला या मध्ये राजा सोळावा लुई याला फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. २१ जानेवारी १७९३ रोजी त्याला फाशी देण्यात आली. पुढे १६ ऑक्टोंबर १७९३ रोजी राणी मेरी अॅटोईनेट हीला सुद्धा फाशावर लटकवले. नॅशनल कन्व्हेंन्शन सरकारने राजेशाही सर्व जुने अवशेष नष्ट केले.

**२) विदेश निती :**

नॅशनल कन्व्हेंन्शन सरकार सत्तेवर आल्यानंतर राजा सोळावा लुईस जो कोणी मदत करील तो फ्रांन्सचा

शत्रू राहील असे जाहीर केले. पुढे सोळावा लुईस फासावर लटकविल्यानंतर युरोपातील राजेशाही राष्ट्रे फ्रान्सची शत्रू राष्ट्रे झाली. या मध्ये ऑस्ट्रिया, रशिया, इंग्लंड, हॉलंड, स्पेन, सार्डीनिया या राष्ट्रानी फ्रान्सवर आक्रमण केले.

नॅशनल कन्व्हेंन्शन सरकारने कॅरनाट या सेनापतीच्या नेतृत्वाखाली युद्धाची तयारी केली. नविन सैन्य उभे करण्यात आले. राज्यक्रांतीचे रक्षण करणे या ध्येयाने लष्कराने मोठा पराक्रम केला. रशियाने फ्रान्स बरोबर तह केला. तर हॉलडने मैत्री केली. मात्र ऑस्ट्रिया, इंग्लंड व सारर्डानिया या देशाबरोबरच फ्रान्स संघर्ष करीत राहीला.

**३) अंतर्गत धोरण :**

नॅशनल कन्व्हेन्शन सरकारला अंतर्गत धोरण राबविताना कठिण परस्थितीला तोंड दयावे लागले. या सरकारने या परस्थितीला तोंड देण्यासाठी 'सार्वजनिक सुरक्षा समिती' व 'सर्वसाधारण सुरक्षा समिती' या दोन कमिट्या स्थापन करून देशात दहशतीचे वातावरण निर्माण केले. या समित्याबरोबरच क्रांतीकारी न्यायालये स्थापन करून अंतर्गत बंडाळया मोडून काढण्यासाठी उपाय योजना करण्यात आली.

राष्ट्रविरोधी चळवळी करणाऱ्यावर दहशत बसविण्यात आली. संशयावरून हजारो लोकांना ठार मारण्यात आले. हजारोंना तुरूंगात डांबण्यात आले व अंतर्गत शांतता प्रस्तापीत करण्याचा प्रयत्न केला.

**● दहशतीचे राज्य :– १७९३ ते १७९४ :**

फ्रान्समध्ये दहशतीचे राज्य १ वर्ष ४ महिने चालले. क्रांतीकारी न्यायालये स्थापन करण्यात आली. त्याच दिवसापासून फ्रान्समध्ये दहशतीच्या राज्यास प्रारंभ झाला. २९ जुलै १७९४ रॉबेस्पिअर या जहाल नेत्याच्या फाशीनंतर दहशतीच्या राज्याचा शेवट झाला. जिराँडिन्सच्या अकार्यक्षम प्रशासनामुळे देशात गोंधळ निर्माण झाला अशा मध्येच परकिय राष्ट्राचे आक्रमण चालूच होते. क्रांती वाचविणे आवश्यक होते. म्हणून जँकोबिन्स् पक्षांच्या जहाल नेत्यांनी फ्रान्समध्ये दहशत निर्माण केली. यामध्ये रॉबेस्पिअर, डॉन्टन, कॅरनॉट, सेंटजॅस्ट इत्यादी नेते आघाडीवर होते.

या सरकारने सार्वजनिक सुरक्षा समितीला पोलिसी अधिकार दिले. क्रांतीकारी न्यायालयाने कायदा आणि सुव्यवस्थेबाबत लोकांच्या मनात दहशत निर्माण केली. राष्ट्रद्रोह करणाऱ्यांना फासावर लटकविण्यात आले. या लोकांना फाशी देणेसाठी 'गिलोटीन' नावाचे यंत्र निर्माण केले. या यंत्राने अनेक मवाळ कार्यकर्ते, क्रांतीविरोधक आणि क्रांतीसमर्थक याना फाशी दिले. दहशतीच्या राज्यांचा पुरस्कर्ता रॉबेस्पिअरने या काळात अमर्याद हुकूमशाही चालविली. भयानक अत्याचार पाहून डॉन्टन याने हा रक्तपात व अत्याचार न्यायोचित नाही असे विचार बोलून दाखविल्यानंतर त्यालाही फाशी देण्यात आले. डॉन्टनच्या फाशीनंतर कन्व्हेन्शन सरकारमधील सदस्य अस्वस्थ झाले, उदया ही वेळ आपल्यावर येईल या भितीने त्यांचा थरकाप उडाला रॉबेस्पिअर हाच फ्रेंच स्वातंत्र्य पायदळी तुडवीत आहे. यावर कन्व्हेन्शन सरकारची बैठक होवून सरकारनेच रॉबेस्पिअरलाच पकडण्याची आज्ञा केली. २८जुलै १७९४ ला रॉबेस्पिअरला पकडण्यात आले व त्याला गिलोटीनवर चढविण्यात आले. त्याच्या मृत्यूबरोबरच फ्रान्समधील मानवी हत्यांकांडाची शृखंला थांबली. ही दहशहतीची कारकिर्द

फ्रान्सच्या इतिहासाला काळींमा लावलाणारी ठरली. यामध्ये अंदाजे चाळीस हजार लोकांचा गिलोटीनवर शिरच्छेद करण्यात आला. दोन लाख लोकांना तुरूंगात डांबण्यात आले. दहशतीच्या राज्यानंतर नॅशनल कन्व्हेंन्शन सरकारने फ्रांन्समध्ये खालील महत्वपूर्ण कार्य केले.

त्यामध्ये – शिक्षणाचे माध्यम म्हणून फ्रेंच भाषेचा वापर सुरू केला. कायद्यांचे एकसूत्रीकरण केले. शेती संदर्भात समाजवादी प्रयोग सुरू केले.जमिनीचे समान वाटप केले.धर्मविषयक क्षेत्रात विज्ञानावर विश्वास दाखविला. राष्ट्रीयत्वाला उत्तेजन दिले.कालगणनामध्ये बदल केले.राष्ट्रीय ग्रंथालयाची स्थापना केली.नॉर्मल स्कूल व तंत्रमहाविद्यालये सुरू केली. फ्रान्समध्ये वस्तूसंग्रहालयाची निर्मिती केली. फ्रान्समध्ये नवीन घटना निर्माण करून द्विगृही कायदे मंडळ तयार केले.

● **नॅशनल कन्व्हेंन्शनचे मुल्यमापन :**

नॅशनल कन्व्हेन्शन सरकारचे फ्रान्समधील कार्य 'मेट्रीक पध्दती' सारखे होते कन्व्हेन्शन सरकारने फ्रान्सला वजनामापाची पध्दती दिली. देशप्रेम, राष्ट्रीयत्व याला महत्व देवून कायदयाचे सुसूत्रीकरणे केले. भाकरी इतकेच शिक्षणाला महत्व दिले. मुले ही आई–बापा पेक्षा राष्ट्राची संपत्ती असतात हे दाखवून दिले. दहशतीच्या राज्यामुळे बदनाम झालेल्या काळात अत्यंत प्रतिकूल परस्थितीत या सरकारने कामकाज केले. मिरॉबो, मॅरट, रॉबेस्पिअर, कॅरनॉट, सेन्टजंस्ट, डॉन्टन यांनी फ्रान्सच्या याकाळात कार्य केले. त्यांनी फ्रेंच राज्यक्रांती यशस्वी करणे तसेच फ्रान्सचे संरक्षण करून लोकाशाही स्थिर करणेसाठी फार मोठे योगदान दिले. पुढे १७९५ च्या नवीन राजघटनेनुसार संचालक मंडळ अधिकारावर आले. या मंडळाने १७९५ ते १७९९ या काळात फ्रान्सचा कारभार चार वर्ष केला. या काळात मात्र फ्रान्समध्ये गोंधळ, भ्रष्ट्राचार झालेने नेपोलियन बोनापार्टने योग्य संधीचा फायदा घेवून कॅन्सुलेटची सत्ता आपल्या हातात घेतली.

● **फ्रेंच राज्यक्रांतीचे फ्रांन्सवरील परिणाम :**

१७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम सर्वात प्रथम फ्रांन्स राष्ट्रावर झाले. ते याप्रमाणे –

**१) अनियंत्रित सत्ता संपली :**

फ्रांन्समध्ये कित्येक शतके चालू असणारी बुरबाँ वंशाची अनियंत्रित व जुलमी राजसत्तेचा शेवट क्रांतीमुळे झाला. या क्रांतीनंतर फ्रंान्समध्ये नेपोलियन बोनापार्ट, अठरावा लुई, लुई फिलीपी आणि तिसरा नेपालियन यांनी राजसत्ता भोगली. परंतू त्यांच्या राजसत्तेवर मर्यादा होत्या. जुने राजसत्तेचे वैभव नाहीसे झाले. फ्रांन्समध्ये कांही अंशी घटनात्मक राजेशाही आणि नंतर लोकसत्ताक राज्यपद्धती वापरली गेली.

**२) सामाजिक विषमतेचा अंत :**

या क्रांतीने फ्रान्समधील सामाजिक विषमतेचा अंत केला. क्रांतीपूर्व कालखंडामध्ये तेथे सरदार, उमराव, संरजामदार, धर्मगुरू, राजाचे नातेवाईक, इ. विषेश अधिकार होते. फ्रांन्समध्ये उच्च, निच भेदभाव होते. गरीब, मध्यम वर्गाचे प्रचंड हाल होते. या क्रांतीने देशात वरिष्ठ वर्गाचे विशेष अधिकार मोडून पडले. सामाजिक समता प्रस्थापित करण्यात आली. लायक लोकामधूनच प्रशासनातील सर्व पदे भरली जावू लागली.

**३) गुलामगिरी संपली :**

फ्रांन्समध्ये चालत आलेली वेटबिगारी, भुदास पद्धत आणि गुलामगिरी या पद्धती विषमतेचे प्रतीक होत्या. या क्रांतीमुळे या सर्व पद्धती नष्ट झाल्या. क्रांतीमुळे सर्व लोक स्वतंत्र व समान झाले. अन्याय, पिळवणूक बंद झाली. स्वातंत्र, समता, बंधुत्व यावर आधारित नवसमाज निर्मिती होवू लागली.

**४) प्रशासनात सुधारणा :**

या क्रांतीमुळे देशातील राज्यकारभार सुधारला. विविध ठिकाणीच चालणारी बेशिस्त, वशिलेबाजी, पक्षपात, विविध पातळीवर लोकांवर होणारा अन्याय या क्रांतीने गाढून टाकला. सर्व देशात समान कायदेपद्धत अंमलात आली. कायद्याचे सुसूत्रीकरण झाले क्षेत्रात सुधारणा झाली. कायद्यापुढे सर्व फ्रेंच समान ठरले.

**ब) फ्रेंच राज्यक्रांतीचे जगावरील परिणाम :**

१७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीचे दूरगामी परिणाम जगावर झाले ते या प्रमाणे -

**१) जागतिक राजसत्तेवर प्रहार झाला :**

१७८९ च्या फ्रेंच राजक्रांतीने युरोपातील व जगातील अनियंत्रित राजेशाहीवर मर्यादा आणल्या. राजा हा ईश्वराचा अंश आहे हा सिद्धांत मोडून पडला. राजा आपल्या लहरी प्रमाणे अथवा मर्जीप्रमाणे राज्य करू शकत नाही. यामध्ये लोकांची अंतिम सार्वभौम इच्छा महत्वाची असते. हा विचार फ्रेंच राज्यक्रांतीने जागतिक स्तरावर नेला.

**२) वर्ग पद्धती नष्ट झाली :**

जागतिक अनेक देशामध्ये चालत आलेली पंरपरागत वर्ग पद्धती संपुष्ठात आली. सर्व लोक समान आहेत, ही कल्पना या क्रांतीने जोरात प्रसारीत केली. यातुनच पुढील काळात गुलामगिरी, वेठबिगारी, भूदास यांच्या विरोधी चळवळी जागतिक स्तरावर सुरू झाल्या. हा या क्रांतीचा मोठा जागतिक परिणाम होय.

**३) जनता- लोक सार्वभौम :**

फ्रांन्समधील विविध बुद्धीवादी लोकांनी मांडलेले सिद्धांत हे राजेशाहीविरोधी होत. प्रजा ही सार्वभौम असून राजा सार्वभौम नाही, राजा हा प्रजेचा सेवक आहे, त्यामुळे जनता अथवा लोकच आपल्या इच्छेनुसार राज्यकर्ते व शासन पद्धत ठरवू शकतात. अन्यायी राजसत्ते विरोधात उठाव अथवा बंड करण्याचा अधिकार जनतेस आहे. हे या क्रांतीने सिद्ध केले.

**४) स्वातंत्र, समता आणि विश्वबंधूत्व :**

फ्रेंच राजक्रांतीने जागतिक स्तरावर स्वांतत्र्य, समता, विश्वबंधूत्व या तीन अमूल्य तत्वांचा जगामध्ये जोरदार प्रसार केला. या तत्वासाठीच फ्रेंच लोकांनी आपली प्राणांची आहूती दिली. व त्यामध्ये ते यशस्वी झाले. पारतंत्र्यांत असणाऱ्या राष्ट्रामध्ये ही तीन तत्वे वेगाने प्रसारित झाली. या राष्ट्रामध्ये स्वांतंत्र्यचळवळी सुरू झाल्या.

**५) राष्ट्रीयत्व भावना वाढीस लागली :**

लोकांनी आपल्या देशावर निसीम्म प्रेम, भक्ती केली पाहीजे. हे तत्व या क्रांतीने दिले. एकजूट असल्यास शत्रूचा पराभव होवू शकतो. हे फ्रान्सने जगाला दाखविले. त्यामुळे जागतिक स्तरावर राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली. या घटनेचे परिणाम पुढील काळात दिसून आले. युरोप खंड, आशिया खंड आणि मध्य पूर्वेत राष्ट्रीयत्वाच्या चळवळीने जोर धरला. थोडक्यात फ्रेंच राज्यक्रांती ही दुरगामी परिणाम करणारी घटना मानली जाते.

## ४.३ सारांश :

१७८९ च्या फ्रेंच राजक्रांतीने जागतिक इतिहासावर दूरगामी परिणाम केले. बूरबाँ घराण्याची जुलमी राजवट, फ्रान्समधील सामाजिक विषमता, अनैतिक वागणारे धर्मगुरू, राजा सोळाव्या लुईचा नाकर्तेपणा, राणीचा उधळा स्वाभाव, बदसल्ला देणारे अधिकारी, संपूर्ण देशाची डगमगणारी अर्थव्यवस्था चुकीचे अर्थमंत्री व त्यांचे निर्णय, या सर्व परिस्थितीमुळे क्रांती स्थिती निर्माण झाली. अशा मध्येच राजाने बोलविलेले जाणकार लोकांचे मंडळ इंस्टेट जनरल चे अधिवेशन, त्यामध्ये झालेला गोंधळ त्यामुळे निर्माण झालेली राष्ट्रीय सभा, आणि राजा व जनता यांच्यातील कटुता, राजाने राष्ट्रीय सभेला दडपण्याचा केलेला प्रकार त्यातुन निर्माण झालेले बॅस्टिल प्रकरण, मानवी हक्काचा जाहिरनामा, नवीन राज्यघटना, राजा-राणीने पळून जाणेचा केलेला प्रयत्न, परकिय राष्ट्राच्या मदतीने क्रांती दडपण्याचा झालेला प्रयत्न या सर्वाचा परिणाम म्हणजे दहशतीची राजवट, या मधून राजा-राणीस दिलेली फाशी नॅशनल कन्व्हेन्शन सरकारने केलेले कामकाज, संचालक मंडळाचे अपयश आणि नेपोलियन बोनापार्टचा उदय या अत्यंत महत्वपूर्ण घटना आहेत.

फ्रेंच राज्यक्रांतीचे युरोप आणि जगावर दुरगामी परिणाम झाले. युरोपातील अनियंत्रीत सत्ता नष्ट झाली. सामाजिक विषमतेचा शेवट झाला, गुलामगिरी संपली. फ्रांन्सच्या प्रशासनास सुधारणा झाल्या युरोप आणि जगातील असणाऱ्या राजसत्तेवर या क्रांतीने मर्यादा पडल्या. जागतिक स्तरावर वर्ग पद्धती हळूहळू नष्ट झाली. प्रजा सार्वभौम आहे, राजा नव्हे. हे सिद्ध केले. जागतिक स्तरावर राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली. 'स्वांतत्र्य, समता आणि विश्वबधूत्व' ही तीन सर्वश्रेष्ठ तत्वे जगाला दिली. म्हणून फ्रेंच राज्यक्रांती अतिशय महत्वाची घटना आहे.

● **स्वयं-अध्यायनासाठी प्रश्न क्र. - ३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ............... च्या धरसोड वृत्तीने फ्रान्समध्ये आर्थिक परस्थितीत बिकट झाली.

अ) चौदावा लुई ब) पंधरावा लुई क) सोळावा लुई ड) राणी मेरी अॅटोईनेट

२. .............. या अर्थमंत्र्याने अंदाजपत्रक सादर केल्याने त्यास बडतर्फ व्हावे लागले.

अ) कॅलोन ब) नेकर क) ब्रियन ड) टरगॉट

३. फ्रांन्समधील ................. ही संस्था इंग्लंडच्या पार्लमेंटसारखी लोक प्रतिनिधींची सभा होती.

अ) स्टेटस् जनरल ब) इंस्टेट जनरल क) लायन डी कोर्ट ड) नॅशनल गार्डस्

४. ............... या संघटनेचा मिरॉबो हा प्रमुख होता.

अ) नॅशनल गार्डस् ब) स्टेटस् गार्डस् क) कोर्ट गार्डस् ड) इंस्टेट गार्डस्

५. ................. या दिवशी सामाजिक क्रांती झाली.

अ) १ ऑगस्ट ब) २ ऑगस्ट क) ३ ऑगस्ट ड) ४ ऑगस्ट

## ४.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ :

१. दैवी अधिकाराचा सिद्धांत : राजा म्हणजे साक्षात परमेश्वराचा अंश होय. परमेश्वरानेच राज्यकारभारासाठी राजांस निर्माण केले आहे. हा परांपरागत चालत आलेला सिद्धांत होय.

२. टाईट : धार्मिक कर

३. टॅली : सामान्य जनतेवरील मालमत्तेचा कर

४. सामाजिक करार : रूसोचा ग्रंथ

५. राष्ट्रीय सभा : सामान्य लोकांच्या प्रतिनिधींची झालेली एकजूट

६. राष्ट्रीय दिवस : १४ जुलै १७८९ रोजी राजेशाहीच्या अन्यायाचे प्रतिक बॅस्टिलचा पाडाव घटनेचा दिवस.

७. गिलोटीन : फाशी देण्याचे यंत्र.

## ४.५ : स्वंय-अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

● **स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. १**

१) अ) बुरबाँ २) अ) थर्ड ईस्टेट ३) ब) रूसो

४) अ) माँन्टेस्क्यू ५) क) १८

● **स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. २**

१) क) टरगॉट २) ब) कॅलोन ३) क) थर्ड इस्टेट

४) ड) मिरॅबो ५) क) बॅस्टिल

● **स्वयं-अध्यायनासाठी प्रश्न क्र.३**

१) क) सोळावा लुई २) ब) नेकर ३) अ) स्टेटस् जनरल

४) अ) नॅशनल गार्डस् ५) ड) ४ ऑगस्ट

### ४.६ सरावासाठी प्रश्न :

**अ) दिर्घोत्तरी प्रश्न :**

१. सन १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या कारणांची सविस्तर चर्चा करा.

२. राष्ट्रीय सभेने केलेल्या कामाचा आढावा घ्या.

३. फ्रांन्सच्या क्रांतीकाळातील महत्वपूर्ण घटनांचा आढावा दया.

४. युरोप आणि जगावर फ्रेंच राज्यक्रांतीचे कोणते परिणाम झाले ते सांगा.

५. नॅशनल कन्व्हेंन्शन सरकारचे कार्य लिहा.

**ब) टिपा लिहा.**

१. १६ वा लुई

२. राष्ट्रीयसभा.

३. रूसो

४. पहिले विधीमंडळ

५. नॅशनल कन्व्हेंन्शन

६. दहशतीची राजवट

### ४.७ संदर्भ ग्रंथ यादी :


१, केळकर न.ची. 'फ्रेंच क्रांती' व्हीनस बुक स्टॉल पुणे.

२. वैद्य सूमन 'आधुनिक जग' मंगेश प्रकाशन, नागपुर १९७५.

३. कुलकर्णी अ.रा. / फडके श्री. रा. 'आधुनिक युरोप' देशमुख आणि कंपनी पुणे. १९७६.

४. Ketelbey, C.D.M. A short History of Modern Eueope, Surjeet Publication, Delhi 1978.

5. Gooh G. P. History of Modern Europe.1878-1919.

6. Mahajan V.D. History of Modern Europe Since 1789.

7. Hazew C.D. Modern Europe up to 1945.

8. Hayes Cariton J.H Contemporary EuropeSine 1870, Macmillion Co'Newyork 1958.

9. Rao B.V. History of Modern Europe Since 1789. S. Chand & Co.New Delhi. 1963.


❖❖❖

# घटक – १

# वैभवशाली राज्यक्रांती

## (Glorious Revolution)

**अनुक्रमणिका :**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२ विषय विवेचन

१.२.१ इंग्लंडची राजकीय पार्श्वभूमी.

१.२.२ वैभवशाली राज्यक्रांतीची कारणे

१.२.३ वैभवशाली राज्यक्रांतीमधील प्रमुख घटना.

१.२.४ वैभवशाली राज्यक्रांतीचे परिणाम.

१.३ शब्दार्थ.

१.४ स्वयं अध्ययन, स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे.

१.५ सारांश.

१.६ सरावासाठी प्रश्न.

१.७ संदर्भ प्रश्न.

## १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर विद्यार्थ्यांना –

- इंग्लंडमधील राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थितीचे आकलन होईल.
- इंग्लंडमधील वैभवशाली राज्यक्रांतीची कारणे समजून घेता येतील.
- वैभवशाली राज्यक्रांतीमधील विविध महत्वाच्या घटनांवर प्रकाश टाकता येईल.
- वैभवशाली राज्यक्रांतीचे स्वरूप व व्याप्ती जाणून घेता येईल.
- वैभवशाली राज्यक्रांतीच्या परिणामांची चर्चा करता येईल.

## १.१ प्रस्तावना [Introduction] :

प्रस्तुत प्रकरणामध्ये/घटकांमध्ये आपण इ.स. १६८८ साली इंग्लंडमध्ये घडलेल्या वैभवशाली (रक्तहीन) राज्यक्रांतीचा अभ्यास करणार आहोत. प्रारंभीच्या काळात म्हणजेच पहिल्या शतकात आपणास इंग्लंडवर रोमन लोकांचे वर्चस्व असलेले दिसते. त्यानंतर पाचशे वर्षांनी त्यांची सत्ता संपुष्टात येवून (६०० ते १०६६) अँग्लो-सॅक्सन ते स्टुअर्ट काळापर्यंत (१६६३ ते १७१३) अनेक राजघराण्यांनी इंग्लंडवर आपले वर्चस्व प्रस्थापित केलेले दिसते.

इंग्लंडमध्ये स्टुअर्ट काळापर्यंत अनियंत्रित राजेशाही दिसून येत नाही. पण स्टुअर्ट काळात ही परिस्थिती बदललेली दिसते. इ.स. १६०३ मध्ये राणी एलिझाबेथ यांचा विनाअपत्य मृत्यू झाला. ह्यामुळे स्कॉटलंडमधील स्टुअर्ट घराण्यातील जेम्स पहिला यांना इंग्लंडचे राजेपद मिळाले. जेम्स पहिला हे दैवी सिद्धातांचे पुरस्कर्ते होते. त्यामुळे त्यांना राजेपद हे दैवी कृपेने मिळाले असून राजा हा देव आणि जनता यामधील मध्यस्थ आहे, राजाची नेमणूक ही देवानेच केली आहे, असा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या मते राजा हा जनतेला जबाबदार नसून तो देव/परमेश्वराला जबाबदार असतो. म्हणूनच राजाच्या दृष्यकृत्याबद्दल कोणत्याही प्रकारचा जाब विचारण्याचा अधिकार जनतेला नाही यावर त्यांचा ठाम विश्वास होता. परिणामी दिवसेंदिवस राजा व जनता यांच्यातील दुरावा, मतभेद वाढत गेले आणि इंग्लंडमधील जनतेने राजाविरूद्ध आवाज उठवून तेथे रक्तहीन राज्यक्रांती घडवून आणली.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ इंग्लंडमधील वैभवशाली राज्यक्रांतीचा इतिहास/राजकीय पार्श्वभूमी :

### १) अँग्लो सॅक्सन कालखंड :

इंग्लंडमध्ये इ.स. ६००-१०६६ हा अँग्लो-सॅक्सन काळ समजला जातो. इ.स. ४१० च्या सुमारास रोमन लोकांनी ब्रिटन देश सोडला. त्यानंतर युरोपच्या वायव्य भागातील अँगल्स, सॅक्सन्स, ज्यूट या जमाती ब्रिटनमध्ये आल्या. त्यांनी ब्रिटन देश व्यापून तेथे आपल्या वसाहती व राज्ये स्थापन केली. या लोकांपैकी ॲगल्स या नावावरून ब्रिटन या देशास अँगल-लँड किंवा इंग्लंड असे म्हणण्यात येवू लागले. या ॲगल्स व सॅक्सन्स लोकांची इंग्लंडमध्ये अनेक राज्ये स्थापन झाली व पुढे त्या सर्वांचे एक राज्य स्थापन झाले. पुढील काळात युरोपच्या वायव्य भागातील डेन्स लोकांनी इंग्लंडवर स्वाऱ्या करून त्यापैकी काही इंग्लंडच्या राज्यात विलीन झाले.

**● अँग्लो सॅक्सन काळातील राजकीय संस्था :**

**※ मध्यवर्ती संस्था – (राजा व राज्यकारभार) :**

अँग्लो सॅक्सन जमातीमध्ये पहिल्यांदा राजा ही संज्ञा नव्हती. जमातीच्या प्रमुख अधिकाऱ्यास 'प्रिन्सिप्स' [Principes] म्हणजे 'प्रमुख' असे म्हणत. इंग्लंडमध्ये आल्यावर वारंवार युद्धप्रसंग करावे लागून त्यांच्या वसाहती स्थापन झाल्यामुळे प्रिन्सिप्स हा त्या जमातीचा व ज्या प्रदेशात ती जमात स्थायिक झाली त्या प्रदेशाचाही राजा झाला. ह्यामुळे पूर्वापार चालीरितीनुसार राज्यकारभार करणे, नवीन नियम करणे, आपापसातील तंट्यांचा न्यायनिवाडा

करणे ही कामे राजाकडे आली. ही कामे करताना तो आपल्या राज्यातील काही सूज्ञ लोकांचा सल्ला घेई. त्यांच्या सभेस 'विटेनजीमॉट' असे म्हणण्यात येवू लागले.

राजा प्रबल व कर्तृत्ववान असेल तर तो आपल्या विचाराप्रमाणे सर्व गोष्टी करीत असे. पण तो दुर्बल व कमकुवत असेल तर त्यास विटेनजीमॉटच्या तंत्राने राज्यकारभार करावा लागे. राजा हे पद वंशपरंपरागत वारसा हक्काने दिले जात नसे. राजाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र अल्पवयी असेल तर राजघराण्यातील त्याच्या कर्तृत्ववान भावास, पुतण्यास किंवा इतर पुरूषास हे पद दिले जाई. राजाची निवड करणे किंवा त्याला पदच्युत करणे हे अधिकार विटेनजीमॉटकडे होते.

इंग्लंडमध्ये इ.स. ५९५ च्या सुमारास ख्रिस्ती धर्माची स्थापना झाल्यावर कँटरबरी हे धार्मिक बाबतीत प्रमुख ठिकाण झाले होते. तेथील बिशपला प्रमुख बिशप म्हणजे अतीविशेष म्हणण्यात येवून त्याच्याकडून राजास राज्याभिषेक करण्यात येई. हा विधी धार्मिक असल्यामुळे राजसत्तेत धर्मसंस्थेचा पाठिंबा आहे असे मानण्यात येवू लागले.

**● स्थानिक संस्था :**

अग्लो-सॅक्सन काळातील स्थानिक संस्थांचा विचार करता, असे दिसून येते की, या काळात देशाची शायर(जिल्हा), हंड्रेड (तालुका) व खेडेगाव अशी विभागणी केली होती.

अँग्लो-सॅक्सन काळाच्या शेवटी असे दिसून येते की, इंग्लंडमध्ये आर्थिक व सामाजिक स्वरूपाची जहागिरदारी पद्धत अस्तित्वात येत होती.

अँग्लो-सॅक्सन काळापासूनच इंग्लंडमध्ये लोकशाहीचा विकास होत गेला. या स्थित्यंतरा दरम्यानच इंग्लंडमध्ये अनेक राजघराण्यांचा उदय झालेला दिसतो. त्यामध्ये नॉर्मन घराणे (१०६६-११५४), अँजो घराणे (११५४-१३९९), लँकेस्टर व यार्क घराणे (१३९९-१४८५), ट्यूडर कालखंड (१४८५-१६०३) आणि स्टुअर्ट घराणे (१६०३-१७०७) इ. चा समावेश होतो.

इंग्लंडमधील वैभवशाली राज्यक्रांतीचा विचार करता वरील उल्लेखिलेल्या राजघराण्यांपैकी ट्युडर व स्टुअर्ट राजघराण्यांच्या काळातील राजकीय परिस्थितीचा सविस्तर आढावा होणे संयुक्तिक ठरते.

**२) ट्युडर घराणे (१४८५-१६०३) :**

इंग्लंडच्या इतिहास पाहता ट्युडर घराण्याची कारकीर्द सुमारे १२० वर्षे झाली. हा काळ म्हणजे अनियंत्रित राजसत्तेचा काळ होय. जागतिक इतिहासात या काळात भौगोलिक शोध, प्रबोधन/पुनरूजीवन चळवळ आणि धर्मसुधारणा चळवळ ही वैशिष्ट्ये स्पष्ट दिसत होती.

पोपच्या दांभिकतेला धर्मसुधारणेमुळे तडे गेले. परिणामी लोकांमध्ये अभिजात वाड्मयाची आवड निर्माण झाली. युरोपात अनियंत्रित राजसत्ता बळकट होत चालली होती, याचे महत्वाचे कारण म्हणजे 'खडे सैन्य' होय. युद्धकलेतही महत्वपूर्ण बदल झाल्यामुळे राजेलोकांना पूर्वीप्रमाणे सशस्त्र जमावाची भीती वाटत नव्हती. त्यामुळे

काही ठिकाणी राष्ट्रीय सभांचे उच्चाटन झाले तर काही ठिकाणी त्या नामधारी बनल्या. याला अपवाद म्हणजे इंग्लंड होय. ट्युडर काळात इंग्लंडमध्ये पार्लमेंटच्या अधिकारात वाढ झाली नाही, पण त्यास स्थैर्य येण्यास मदत झाली. धार्मिक स्वातंत्र्याबरोबर राजकीय स्वातंत्र्याचा उदय होवू लागला. या घराण्यातील राजे वंशपरंपरागत वारसा हक्काने सत्तेवर आले.

**● ट्युडर राज्यकर्त्यांची अनियंत्रित पण लोकप्रिय सत्ता :**

ट्युडर घराण्यातील राज्यकर्त्यांपैकी सातवा हेन्री, आठवा हेन्री व एलिझाबेथ हे दृढनिश्चयी, धोरणी व कर्तबगार होते, या काळातील राजसत्ता प्रबळ व अरेरावीची असूनही लोकप्रिय हाती. त्याला काही कहत्वपूर्ण गोष्टी कारणीभूत होत्या. त्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) सातव्या हेन्रीने उत्मत्त सरंजामी जहागिरदारांची सत्ता नाहीशी केली आणि दर्यावर्दी लोकांना उत्तेजन दिले.

२) आठव्या हेन्रीने धर्मसुधारणेच्या चळवळीस सर्वप्रथम विरोध केल्यामुळे पोपकडून त्यांना 'धर्मरक्षक' ही पदवी मिळाली. पुढे काही कारणांमुळे पोप व आठवा हेन्री यांच्यात वितुष्ट निर्माण झाले. पोपचे इंग्लंडवरील धार्मिक वर्चस्व झुगारून देण्यात आले. परिणामी आठव्या हेन्रीस लोकांचे पाठबळ मिळाले.

३) एलिझाबेथ यांच्या काळात राणी एलिझाबेथ यांना स्पेनकडून होणाऱ्या आरमारी स्वारीस तोंड द्यावे लागले. त्या प्रयत्नांत राणी एलिझाबेथ यांना लोकांचा पाठिंबा व साहाय्य मिळाले.

ट्युडर काळात राजाजवळ खडे सैन्य नव्हते. गरज पडल्यास राजा लोकांचे सैन्य उभा करीत असे. राज्यकारभाराचा खर्च कमी व उत्पन्न जास्त अशी परिस्थिती होती. त्यामुळे राजा हा पैशासाठी पार्लमेंटवर अवलंबून नव्हता. तरी गरज पडल्यास राजा इतर मार्गाने पैसा वसूल करीत असे. पार्लमेंटच्या संमतीशिवाय राजाला कायदे करता येत नसत, पण तातडीच्या प्रसंगी वटहुकूम व जाहीरनामे काढून राजाला तात्पुरत्या स्वरूपाचे कायदे करता येत असत. न्यायनिवाडा करण्यासाठी एक्सचेकर कोर्ट, कॉमन प्लीज कोर्ट व किंग्ज बेंच ही कॉमन लॉ कार्टे व ठिकठिकाणची स्थानिक कोर्टे होती, तरीही न्याय निवाड्याच्या बाबतीत राजाकडे अंतिम अधिकार आहे असे मानले जात असे. थोडक्यात, राजाची पत व दर्जा यांना साजेसे काही खास अधिकार राजाला आहेत, अशी लोकांची धारणा होती.

**● स्टुअर्ट घराणे (१६०३-१७१४) :**

ट्युडर घराण्यातील राणी एलिझाबेथ ही इ.स. १६०३ साली मरण पावली. तिला वारस नव्हता. त्यामुळे स्कॉटलंडवर राज्य करणारा स्टुअर्ट घराण्यातील जेम्स हा पहिला जेम्स म्हणून इंग्लंडचा राजा झाला. या घराण्याची कारकीर्द सुमारे ११० वर्षे झाली. या काळात एकूण सात राजांनी राज्यकारभार केला. या काळात राजा व पार्लमेंट यांच्यांत अनेक कारणांवरूण वितुष्ट निर्माण झाले. ती कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) राजाचा ईश्वरदत्त वंशपरंपरा वारसाहक्क.

२) राजाचे खास अधिकार.

३) पार्लमेंटचे हक्क

४) राज्यातील सार्वभौम व अंतिम सत्ता राजाकडे असावी की पार्लमेंटकडे इ.

**१. जेम्स पहिला (१६०३–१६२५) :**

जेम्सचा काळ हा इंग्लंडच्या इतिहासातील संघर्षाचा काळ होय. जेम्स हा एक वर्षाचा असताना वंशपरंपरा वारसाहक्काने त्यास स्कॉटलंडची गादी मिळाली होती. एलिझाबेथच्या वेळचा प्रधान रॉबर्ट सेसिल याच्या प्रयत्नाने वंशपरंपरा वारस हक्क विचारात घेवून त्यास इंग्लंडची गादी देण्यात आली होती. त्यामुळे 'राजाचा ईश्वरदत्त वंशपरंपरा वारस हक्क' या तत्वाप्रमाणे आपणास इंग्लंडची गादी मिळाली या मताचा पहिला जेम्स होता.

ईश्वरदत्त वंशपरंपरा वारसहक्क या तत्वाप्रमाणे राजाला राज्य करण्याचा जो अधिकार प्राप्त होतो, तो लोकांच्या इच्छेने किंवा पार्लमेंटच्या कायद्याने मिळत नसून ईश्वरी योजनेने व वंशपरंपरा वारसहक्कानेच मिळतो यावर जेम्सचा विश्वास होता, त्यामुळे त्याला असे वाटे की, राजा आपल्या कृत्याबद्दल लोकांना जबाबदार नसून फक्त ईश्वरालाच जबाबदार आहे. म्हणून लोकांनी त्यास विरोध करू नये. तर राजाची आज्ञा निमुटपणे पाळावी. राजाने प्रजेला काही सवलती दिल्या असल्या तरी त्या केंव्हाहि कमी करण्याचा राजास अधिकार आहे.

या तत्वावर त्याचा पूर्ण विश्वास होता. त्यामुळे या विषयावर त्याने स्कॉटलंडमध्ये असताना 'बंधनरहित राजसत्तेसंबंधी खरा नियम' [The true law of free monarchy] या नावाने एक पुस्तक लिहिले होते. युरोपच्या इतिहासात तो अतिशहाणा [wisest fool] म्हणून प्रसिद्ध आहे.

**२) पहिला चार्लस व दुसरा चार्लस :**

जेम्सप्रमाणे स्टुअर्ट घराण्यातील पहिला चार्लस (१६२५–१६४९), दुसरा चार्लस (१६६०–१६८५) आणि दुसरा जेम्स (१६८५–१६८८) यांचाही राजाचा ईश्वरदत्त वंशपरंपरा वारसहक्क या तत्वावर विश्वास होता. पार्लमेंटने लँकेस्टर काळात बरेच अधिकार प्राप्त करून घेतले होते. पुढे ते कमी होत गेले तरी पार्लमेंटचा या तत्वावर विश्वास नव्हता. त्यामुळे राजा व पार्लमेंट यांच्यामध्ये या प्रश्नावर संघर्ष होतच राहीला.

दुसऱ्या चार्लसला आपल्या आयुष्याची काही वर्षे युरोपमध्ये काढावी लागली होती, पण पुन्हा देशत्याग करण्याची पाळी येवू नये असे त्याला वाटत होते. फ्रान्समध्ये असताना त्याचा कल रोमन कॅथॉलिक पंथाकडे होता; तरी चार्लसने उघडपणे त्या पंथाकडे आपला कल असल्याचे दाखविले नाही. त्यामुळे वारा येईल तशी पाठ फिरविण्यास व प्रसंग आल्यास कोणतेही निर्णय झुगारून देण्याचे त्याचे धोरण होते.

**३) दुसरा जेम्स (१६८५–१६८८) :**

दुसरा चार्लस याला अपत्य नव्हते. त्यामुळे त्याच्यानंतर वारस कोण याबद्दल चर्चा सुरू झाली. चार्लसनंतर त्याचा भाऊ जेम्स दुसरा हा वंशपरंपरा वारसहक्काने वारस होता. तो आरमारी खात्याचा प्रमुख अधिकारी होता. पण तो रामन कॅथॉनिक पंथाचा असल्यामुळे टेस्ट अॅक्ट मंजूर झाल्यावर त्याला ती जागा सोडावी लागली होती.

इंग्लंडचा राजा हा धार्मिक बाबतीतही मुख्य अधिकारी असे, म्हणूनच तो रोमन कॅथॉलिक पंथाचा नसावा असे शाफ्टस बरी व पार्लमेंटमधील इतर अनेक सभासदांना वाटत होते. तेंव्हा त्यांनी जेम्सला गादी मिळू नये यासाठी 'एक्सक्ल्यूजन बिल' पार्लमेंटपुढे आणले. ते बिल कॉमन्स सभेने मंजूर तर लॉर्ड सभेने नामंजूर केले. पण दुसरा चार्लस याला आपली गादी दुसरा जेम्स यालाच मिळावी असे वाटत होते. त्यामुळे त्याने वेगवेगळी कारणे दाखवून आपल्या मृत्यूपर्यंत (१६८५) पार्लमेंट सभा न बोलावताच राज्यकारभार केला.

**● विग व टोरी पक्षाचा उदय :**

पार्लमेंटमध्ये 'एक्सक्ल्यूजन' बिलाची चर्चा सुरू असताना विग व टोरी या नावाने दोन राजकीय पक्ष निर्माण झाले. यावेळी जेम्सच्या विरूद्ध असणारा पक्ष 'एक्सक्ल्यूजन' बिलाची चर्चा करण्यासाठी राजाने पार्लमेंट सभा बोलवावी या मताचा होता. त्यासाठी तो राजाकडे विनंती अर्ज करीत असे. म्हणून त्याला 'पिटीशनर्स' (विग) असे म्हणण्यात आले. दुसऱ्या पक्ष्याच्या मतानुसार राजाकडे असा आग्रह धरले म्हणजे त्याच्या अधिकारांत हस्तक्षेप केल्यासारखे आहे. म्हणून या कृत्याबद्दल त्यांस तिटकारा वाटे त्यास 'ॲबोहरर्स' (टोरी) असे म्हणण्यात आले.

दुसरा चार्लस मरण पावल्यावर त्याचा भाऊ दुसरा जेम्स हा रोमन कॅथॉलिक असुनही वंशपरंपरा वारस हक्काने इंग्लंडच्या गादीवर आला. टोरी पक्षाचे बहुसंख्य लोक एपिस्कोपोलियन पंथाचे होते. पण जेम्सचा वंशपरंपरा वारसहक्क व राजसत्तेबद्दल त्यांस वाटणारी सहानुभूती यामुळे त्यांनी त्याला पाठिंबा दिला. तर विग पक्षाच्या काही लोकांनी व अरगाईला [Argyle] या सरदाराने दुसऱ्या चार्लसचा दासीपुत्र मन्मथ [Monmouth] याला पुढे करून गादी मिळविण्यासाठी बंड केले. पण दुसऱ्या जेम्सने ते यशस्वीपणे मोडून काढले.

## १.२.२ वैभवशाली राज्यक्रांतीची कारणे :

इ.स. १६८५ मध्ये दुसरा जेम्स इंग्लंडच्या गादीवर आला. त्यानंतर राजा व पार्लमेंट यांच्यामध्ये सतत वाद होत राहिले. परिणामी इंग्लंडमध्ये जनतेच्या रोषाचे रूपांतर क्रांतीमध्ये झाले. परिणामी बहुसंख्य प्रजा राजाला पदच्युत करण्यात यशस्वी झाली. या क्रांतीला इंग्लंडच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्व आहे. या क्रांतीची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

### १) दुसऱ्या जेम्सचा अनियंत्रित राज्यकारभार :

इंग्लंडच्या गादीवर येताच दुसऱ्या जेम्सने मनमानी कारभार करण्यास प्रारंभ केला. राजा कायद्यापेक्षा सर्वश्रेष्ठ आहे अशी त्याची समजूत होती. आपल्या ईश्वरदत्त अधिकारावर तो ठाम होता. त्यामुळेच मन्मथच्या बंडाचा बिमोड करताच आपणास अनियंत्रित राज्यकारभार करता येईल असे त्याला वाटत होते. त्याच्या अनियंत्रित राज्यकारभारात खालील गोष्टींचा समावेश होता.

१. १६७३ च्या टेस्ट ॲक्टनुसार रोमन कॅथॅलिक पंथियास राज्यकारभार व धर्मसंस्था यातील हुद्याच्या जागा मिळत नसत. ती अडचण दूर करण्यासाठी जेम्सने आपल्या स्वतःच्या अधिकाराने माफीपत्रके [Indulgenues] दिली. त्यानुसार रोमन कॅथॉलिक लोकांना राज्यकारभारात महत्त्वाच्या हुद्यावर जागा दिल्या.

२. चर्च, विश्वविद्यालये व इतर खाती यातील हुद्याच्या जागावर रोमन कॅथलिक पंथीय व्यक्ती नेमल्या.

३. पुष्कळ रोमन कॅथॉलिक लोकांना अधिकाराच्या जागा दिल्या.

४. लाँग पार्लमेंटने धार्मिक बाबीसंबंधीच्या राजाच्या खास अधिकारातील 'हाय कमिशन कोर्ट' रद्द केले; तरी त्याने 'धार्मिक बाबींसबंधाचे एक खास कोर्ट' स्थापन केले, एवढेच करून तो थांबला नाही तर त्याने त्यामध्ये स्वतःला अनुकूल अशा व्यक्तिंच्याच नेमणूका केल्या.

जेम्सने सूचना करूनही केंब्रिज विद्यापिठाच्या व्हाइस चॅन्सेलरने एका जोग्यास पदवी देण्याचे नाकारले. परिणामी धार्मिक कोर्टाने त्याला त्याच्या पदावरून काढून टाकले. तसेच ऑक्सफर्ड येथील मॅगडलेन कॉलेजच्या सभासदाने जेम्सच्या मर्जीतील एका व्यक्तीस आपला अध्यक्ष म्हणून निवडण्याचे नाकारले म्हणून या कोर्टाने त्याला त्याच्या जागेवरून काढून टाकले.

अशा प्रकारे जेम्स दुसरा याच्या अनियंत्रित राज्यकारभारास जनता कंटाळली होती. दिवसेंदिवस जनता व राजा संघर्ष वाढत होता.

**२) इंग्लंडच्या जनतेमध्ये जेम्सबद्दलचा असंतोष :**

जेम्स दुसरा हा बेकायदेशीर व अरेरावीच्या धोरणाने इंग्लंडच्या गादीवर आला. प्रारंभी त्याला पाठिंबा देणाऱ्या टोरी पक्षातील लोकांनाही नंतर त्याच्याबद्दल तिरस्कार वाढू लागला. विश्वविद्यालये, धर्मसंस्था इ. मधील लोक त्याच्याविरूद्ध गेले. सैन्यातही मोठ्या प्रभागात असंतोष पसरला होता. सामान्य जनतेच्या मनात त्याच्याबद्दल तिरस्कार भरला होता. अशातच त्यांना समजले की, फ्रान्सचा राजा चौदावा लुई याने १५९८ सालचा 'एडिक्ट ऑफ नाँटिज' हा जाहीरनामा रद्द केला आहे. या जाहीरनाम्याप्रमाणे फ्रान्समधील ह्युगेनाट [Protaut] लोकांना दिलेल्या सवलती नुकत्याच रद्द केलेल्या होत्या. आता इंग्लंडमधील जनतेला अशी भीती होती की, चौदाव्या लुईच्या सांगण्यावरून जेम्स इंग्लंडमध्ये रोमन कॅथॉलिक पंथ स्थापन करेल, पण जेम्सला पुत्र नव्हता आणि त्याची प्रोटेस्टंट पंथीय कन्या मेरी हिलाच इंग्लंडचे राजपद मिळणार म्हणून तेथील जनता जेम्सचा जुलूम सहन करूनही स्वस्थ होती.

**३) दुसरा जेम्स व बेकायदेशीर सैन्यभरतीचे धोरण :**

इंग्लंडमध्ये जेंव्हा राजा विरूद्ध जनता असा संघर्ष तीव्र बनत गेला तेंव्हा जेम्सने आक्रमक भूमिका घेतली. सैन्यात नवीन लोकांची भरती केली गेली. त्यामध्ये कॅथँलिकांना प्राधान्य दिले. वरिष्ठ पदाच्या व मानाच्या जागाही त्याच लोकांना दिल्या. सैन्याचा वापर जनतेविरुद्ध करण्यास सुरूवात केली. तसेच जेंव्हा पार्लमेंटने हे सर्व बेकायदेशीर ठरवले तेंव्हा राजाने पार्लमेंट बरखास्त केली. परिणामी सर्वत्र राजाविरूद्ध वातावरण तयार झाले व लोकांच्या व सैन्यांच्या असंतोषात भर पडली.

**४) दुसरा जेम्स याचे प्रोटेस्टंट लोकांबद्दलचे धोरण :**

दुसरा जेम्स हा अतिशय कट्टर रोमन कॅथॉलिक पंथीय होता. त्यामुळे त्याने अविचाराने आपल्या प्रशासनातील

सर्व चांगल्या हुद्यावर असलेल्या प्रोटेस्टंट लोकांना त्यांच्या हुद्यावरून हटवले. त्यांच्या जागी रोमन कॅथॉलिकांची नेमणूक केली. तसेच केंब्रिज विद्यापीठातील अनेक प्रोटेस्टंट प्राध्यापकांना पदच्युत करून त्यांच्या जागीही रोमन कॅथॉलिक लोकांना नोकऱ्या दिल्या. अशा प्रकारे दुसऱ्या जेम्सने प्रोटेस्टंट लोकांचा कोणताही विचार न करता त्यांच्यावर अन्याय व अत्याचार केले. परिणामी जनता जेम्सच्या विरोधात गेली.

**५) इंग्लंड–फ्रान्स मैत्रीचे संबंध :**

इंग्लंडचा राजा दुसरा जेम्स व फ्रान्सचा राजा चौदावा लुई हे दोघेही रोमन कॅथॉलिक पंथाचे कट्टर पुरस्कर्ते व प्रोटस्टंट पंथाचे विरोधक होते. त्यांना काहीही करून रोमन कॅथॉलिक पंथाचे महत्व वाढवायचे होते. त्यामुळेच चौदावा लुई याने फ्रान्समध्ये हुकूमशाही पद्धतीने लोकांचे धार्मिक स्वातंत्र्य हिरावून घेतले, रोमन कॅथॉलिक पंथीयांना अनेक सवलती दिल्या. जेम्सलाही इंग्लंडमध्ये असेच करावयाचे होते. त्यासाठी बऱ्याचदा तो चौदावा लुईची मदत घेत होता. परिणामी हळूहळू चौदावा लुई इंग्लंडच्या व्यापार व उद्योगामध्येही हस्तक्षेप करू लागला. हे पार्लमेंटला रूचले नाही. त्यामुळे इंग्लंडमध्ये राजा विरूद्ध पार्लमेंट असे वातावरण तयार होवून त्यांच्यातील संघर्ष वाढतच गेला.

**६) कायदा तहकूब करण्याचा अधिकार [Declaration of Indulgence] :**

राजा जेम्सचा ईश्वरदत्त अधिकारावर ठाम विश्वास होता. त्यामुळे पार्लमेंटने पास केलेला कायदा तहकूब करण्याचा [suspending] त्याला खास अधिकार आहे, असे त्याला वाटे. याप्रमाणे त्याने आपल्या स्वतःच्या अधिकाराने 'डिक्लेरेशन आर्फ इंडल्जन्स' हे फर्मान काढले (१६८७). त्यानुसार पार्लमेंटने केलेले 'धार्मिक निर्बंध' असलेले कायदे रद्द केले. हे फर्मान काढण्यामागील मुख्य हेतू म्हणजे रोमन कॅथॉलिक पंथीय लोकांना धार्मिक स्वातंत्र्य मिळावी हा होय. शिवाय हे फर्मान पार्लमेंटच्या विरोधात जावून काढले होते. त्यामुळे जेम्सचे हे कृत्य ट्युरिटन पंथीयास आवडले नाही. यातच आणखी भर म्हणजे पुढच्याच वर्षी (१६८८) डिक्लेरेशन ऑफ इंडलजन्स हे फर्मान पुन्हा प्रसिद्ध करून ते लागोपाठ दोन रविवारी सर्व चर्चमध्ये वाचून दाखवण्यात यावे, असा त्याने हुकूम केला (एप्रिल १६८८)

**७) सात बिशप यांच्यावर राजद्रोहाचा खटला व सुटका (१६८८) :**

राजा जेम्सने प्रसिद्ध केलेले फर्मान वाचून दाखविण्याचा हुकूम आल्यावर कँटरबरीचा आर्चबिशप सॅनक्रॉफ्ट [Sancroft] व इतर सहा बिशप यांनी जेम्सकडे एक विनंती अर्ज केला. त्यानुसार डिक्लेरेशन ऑफ इंडलजन्स हे पत्रक चर्चमध्ये वाचून दाखविण्याची आपणावर सक्ती होवू नये, अशी विनंती केली होती, पण जेम्सला त्यांचे हे वर्तन आवडले नाही. त्याने त्यांची हे कृत्ये म्हणजे राजद्रोहच आहे, असा आरोप करून त्या सर्वांना अटक केली. त्यांच्यावर खटला सुरू ठेवला. जरी जेम्सने नेमलेल्या न्यायाधिशांपुढे हा खटला सुरू झाला, तरी ज्यूरीतील लोकांनी 'ते निर्दोष आहेत,' असा निकाल दिला (३० जून १६८८), त्यानंतर त्यांची सुटका झाली. या घटनेनंतर जनता आनंदी झाली पण जेम्सचा राग वाढला होता.

**८) वैभवशाली राज्यक्रांतीचे तात्कालिक कारण :**

राजा दुसरा जेम्स हा प्रोटेस्टंटविरोधी आणि रोमन कॅथॅलिक पंथीयांचा पुरस्कर्ता होता. त्याला वारस म्हणून मुलगा नसून दोन मुलीच होत्या. पण त्या रोमन कॅथॉलिक पंथाच्या समर्थक नव्हत्या तर प्रोटेस्टंट पंथाच्या पुरस्कर्त्या होत्या. त्यापैकी मेरी नावाच्या मुलीचा विवाह हॉलंडचा राजा विल्म आर्फ ऑरेंज यांच्याशी झाला होता. विल्यम हा प्रोटेस्टंट पंथांचा समर्थक होता. अशा स्थितीत इंग्लंडच्या पार्लमेंटला व जनतेला असे वाटत होते की, जेम्सच्या मृत्यूनंतर आपण पाहिजे त्या व्यक्तीला इंग्लंडच्या गादीवर बसवू शकतो. पण घडले असे की, जेम्स दुसरा याला १० जून १६८८ मध्ये मुलगा झाला. या घटनेमुळे राजा जेम्स आनंदी झाला पण जनता व पार्लमेंट दुःखी झाले. कारण जेम्सच्या मृत्यूनंतर इंग्लंडची गादी त्याच्या मुलाकडे जाणार होती. तो जर वडिलांप्रमाणे रोमन कॅथॉलिक समर्थक निघाला तर पूर्वीप्रमाणेच जनतेला अन्याय, अत्याचार सहन करावा लागेल अशी पार्लमेंट व जनतेला भिती होती. म्हणून रोमन कॅथॉलिक पंथीयाचे वर्चस्व निर्माण होण्यापूर्वीच इंग्लंडची जनता एकत्रित आली आणि त्यांनी राजाविरूद्ध क्रांती करण्याची तयारी दर्शविली.

## १.२.३ वैभवशाली राज्यक्रांतीमधील प्रमुख घटना/राज्यक्रांतीचे स्वरूप :

राजा जेम्स दुसरा इंग्लंडच्या सत्तेत आल्यापासून तेथील जनतेवर जुलूम करीत होता त्यातच तो दैवी अधिकाराचा [Devine Rights] कट्टर पुरस्कर्ता होता. त्यामुळे तो पार्लमेंट आणि जनता दोन्हींनाही जुमानत नसे. परिणामी त्याच्या हुकूमशाही वृत्तीस आणि जुलूम, जबरदस्तीस जनता वैतागली होती. शेवटी त्यांची सहनशीलता संपली आणि त्यांच्या रागाचे रूपांतर वैभवशाली क्रांतीमध्ये झालेले दिसून येते. या राज्यक्रांतीमधील काही महत्वपूर्ण घटनांची चर्चा करणे आवश्यक आहे. त्या घटना खालीलप्रमाणे आहेत.

**१) इंग्लंडच्या जनतेकडून हॉलंडचा राजा विल्यमला निमंत्रण :**

१० जून १६८८ रोजी राजा जेम्सला मुलगा झाला. त्याचे नाव जेम्स एडबर्ड असे ठेवण्यात आले. यापूर्वी इंग्लंडच्या जनतेला असे वाटत होते की, जेम्सच्या मृत्यूनंतर त्याची मुलगी मेरी, जी प्रोटेस्टंट पंथाची समर्थक होती, ती सत्तेवर येईल, त्यानंतर जेम्सची जुलूमशाही संपून सर्व सुरळीत होईल; पण जेम्स एडवर्डच्या जन्माने ती शक्यता संपुष्टात आली. जनता दुःखी झाली. इंग्लंडच्या जनतेला आणि पार्लमेंटला पुन्हा इंग्लंडमध्ये रोमन कॅथॉलिक पंथीयांचे वर्चस्व, अन्याय, अत्याचार, जुलूम आणि प्रोटेस्टंट पंथीयांची मानहानी नको होती. म्हणूनच भविष्यात उद्‌भवणारी परिस्थिती टाळण्यासाठी तेथील पार्लमेंट व जनतेने अतिशय विचारपूर्वक सर्व परिस्थिती हाताळण्यास सुरूवात केली.

इंग्लंडच्या जनतेला इंग्लंडमध्ये प्रोटेस्टंट पंथीयांची सत्ता आणावयाची होती. म्हणून तेथे प्रोटेस्टंट पंथ कायमचा रूजण्यासाइी लॉर्ड डॅन्बी व बिशप कॉम्पटन [Compton] हे टोरी पक्षीय आणि हेन्री सिडने व एडवर्ड रसेल हे विग पक्षातील प्रमुख या सर्वांनी गुप्तपणे विचारविनिमय आणि चर्चा केली. इंग्लंडच्या सुरक्षेसाठी विल्यमला पाचारण करावे असे सर्वानुमते ठरले. त्यानुसार 'इंग्लंडच्या प्रोटेस्टंट पंथ व लोकांचे हक्क यांचे रक्षण करण्यास ससैन्य यावे,' असे विल्यम व मेरी यांना निमंत्रण पाठविले. त्यांनी हे निमंत्रण स्विकारले व त्याप्रमाणे इंग्लंडला येवून मदत देण्याचे कबूल केले.

**२) राजा विल्यम व मेरी यांचे इंग्लंडमध्ये आगमन :**

इंग्लंडमच्या पार्लमेंटचे व जनतेचे निमंत्रण स्विकारून काही दिवसातच हॉलंडचा राजा विल्यम-जेम्स दुसरा याचा जावई व राणी मेरी-जेम्स दुसरा याची मुलगी हे १५,००० सैन्यासह इंग्लंडच्या किनाऱ्यावरील ऑरबी येथे दाखल झाले. त्यावेळी जेम्स दुसरा हा सुद्धा आपले ३०,००० सैन्य घेवून जावयाविरूद्ध लढण्यासाइी ऑरबी येथे पोहोचला. विल्यमच्या येण्याची बातमी समजताच जेम्सचा सेनापती चर्चिल (मार्नबरो) आपल्या हाताखालील सैन्यासह राजा विल्यमला जावून मिळाला. इंग्लंडची जनताही राजाविरूद्धच होती. अशा वेळी केवळ आपल्या अनियंत्रित राजेशाही व हुकूमशाही वृत्तीमुळे आज जनता आपल्या बाजूने नाही हे जेम्स दुसरा याला समजले. तेव्हा तो खुप दुःखी झाला.

**३) वैभवशाली रक्तहीन राज्यक्रांती आणि जेम्स दुसरा यांचे पलायन :-**

प्रोटेस्टंट पंथाचे समर्थक हॉलंडचा राजा विल्यम आणि राणी मेरी हे इंग्लंडच्या जनतेच्या मदतीला येताच त्यांची ताकद वाढली शिवाय इंग्लंडच्या सैन्यानेही राजा विल्यमला मदत देवून त्याचे पाठबळ व मनोबल वाढविले. तर दुसरीकडे राजा जेम्स दुसरा याच्या अन्यायी धोरणामुळे जनता त्याच्या विरोधात गेली. त्यांचे मानसिक खच्चीकरण झाले. ऐनवेळी युद्ध प्रसंगी त्याने जनतेचा पाठिंबा गमावला. त्यामुळे आता त्याने युद्धाचा निर्णय रद्द केला. आपला लहान मुलगा जेम्स एडवर्ड व राणीसह इंग्लंडमधून पलपयन केले. जेम्स दुसरा याने यापूर्वीच फ्रान्सचा राजा चौदावा लुई यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले होते. त्यामुळे जेम्स दुसरा चौदावा लुईच्या आश्रयास गेले.

फ्रान्सला जात असताना राजा जेम्स दुसरा यांनी त्यांची राजमुद्रा व राजमुकूट थेम्स नदीमध्ये फेकून दिले. राजाच्या या कृत्यामुळे इंग्लंडची गादी/राजेपद रिकामे झाले. अशा रितीने कोणतीही जिवीत किंवा वित्त हानी झाली नाही. रक्ताचा एक थेंबही न सांडता इंग्लंडमध्ये वैभवशाली रक्तहीन राज्यक्रांती घडून आली. त्यामुळेच डिसेंबर १६८८ मध्ये इंग्लंडमध्ये झालेल्या या क्रांतीस जागतिक इतिहासात 'वैभवशाली रक्तहीन राज्यक्रांती' म्हणून ओळखले जाते.

**४) रक्तहीन राज्यक्रांती आणि कन्व्हेन्शन पार्लमेंट :**

डिसेंबर १६८८ च्या राज्यक्रांतीनंतर जेम्स दुसरा याने इंग्लंडमधून पलायन केल्यानंतर तेथील राजेपद रिकामे झाले. त्यामुळे नेहमीच्या पद्धतीप्रमाणे १६८९ मध्ये एक कन्व्हेन्शन भरविण्यात आली. राजाच्या आज्ञापत्रकाशिवाय ही सभा भरली असल्याने त्यास 'कन्व्हेन्शन पार्लमेंट' असे म्हणण्यात आले. या सभेने खालील महत्वपूर्ण गोष्टींचा उल्लेख करून एक पत्रक तयार केले.

१. जेम्स दुसरा यांनी त्याच्या काळात केलेल्या बेकायदेशीर गोष्टींचा निषेध केला.

२. जेम्सने राज्यत्याग केल्याचा उल्लेख केला.

३. जनतेच्या स्वातंत्र्यावर गदा येवू नये आणि तेथील जनतेचे पूर्वापार चालत आलेले हक्क स्पष्ट व्हावेत यासाठी जनतेच्या हक्कांचे पत्रक [Declaration of Rights] हे जानेवारी १६८९ मध्ये तयार केले.

वरील पत्रकास राजा विल्यम व मेरी यांनी मान्यता देण्याचे कबूल केले. त्यामुळे १३ फेब्रुवारी १६८९ रोजी त्यांना इंग्लंडचे राजेपद देण्यात आले.

वास्तविक पाहता राजा दुसरा जेम्स यांनी राज्यत्याग केला असला तरी वंशपरंपरा वारसहक्काने त्यांच्यानंतर त्यांचा पुत्र जेम्स एडवर्ड स्टुअर्ट याचाच इंग्लंडच्या राजेपदावर हक्क होता. पण तो नाकारून कन्व्हेन्शन पार्लमेंटने जनतेचे प्रतिनिधी म्हणून स्वतःच्या अधिकाराने विल्यम व मेरी या दोघांना इंग्लंडचे राजपद दिले. म्हणूनच या घटनेला राज्यक्रांती असे म्हटले जाते.

## १.२.४ इंग्लंडमधील वैभवशाली राज्यक्रांतीचे परिणाम :

कन्व्हेन्शन पार्लमेंटने राजा विल्यम व मेरी यांना इंग्लंडचे राजपद दिल्यानंतर त्यांच्या आज्ञेखाली आणि पार्लमेंटच्या नियंत्रणाखाली तेथील राज्यकारभार सुरू झाला. जनतेच्या भावनांचा, समस्यांचा आणि त्यांच्या पाठिंब्याचा विचार करण्यास सुरूवात केली. राजाच्या दैवी अधिकाराची संकल्पना मागे पडत गेली. इंग्लंडच्या क्रांतीपासून प्रेरणा घेवून इतर देशातील राजांनीही जनता ही राजापेक्षा श्रेष्ठ असल्याचे मान्य केले. म्हणजेच या क्रांतीचे दूरगामी परिणाम पहावयास मिळतात. जनतेचे कल्याण डोळ्यासमोर ठेवून राज्यकारभार करणे ही भावना पुढे आली. म्हणूनच या राज्यक्रांतीच्या परिणामांवर चर्चा करणे व ते अभ्यासणे महत्वपूर्ण आहे. ते पुढीलप्रमाणे आहेत.

### १) बिल ऑफ राईटचे महत्व (१६८९) :

कन्व्हेन्शन पार्लमेंट हे पार्लमेंट झाल्यावर तिने लोकांच्या हक्कांच्या पत्रकात काही किरकोळ बदल करून 'बिल ऑफ राईटस' [Bill of Rights] हा कायदा केला. यामध्ये तेथील जनतेचे पूर्वापार चालत आलेले हक्क स्पष्ट केल्यामुळे इंग्लंडच्या राज्यघटनेच्या इतिहासात या कायद्याच्या मॅग्नाचार्टा, पिटीशन ऑफ राईट याप्रमाणेच महत्व आहे. यातील काही महत्वाची कलमे खालीलप्रमाणे आहेत.

१. इंग्लंडच्या राजाने व राणीने प्रोटेस्टंट पंथाचेच असले पाहिजे.

२. पार्लमेंट सभा वरचेवर बोलावून राज्यकारभाराच्या कामी व लोकांच्या तक्रारी दूर करण्यासासाठी लोकांचा सल्ला घेणे राजाचे कर्तव्य आहे.

३. पार्लमेंटच्या संमतीशिवाय कायदे तहकूब करण्याचा अथवा ते काही व्यक्तींना लागू होवू नयेत. म्हणून ह्याबद्दल त्यांना माफीपत्रके देण्याचा अधिकार राजाला नाही.

४. राजाला पार्लमेंटच्या संमतीशिवाय आपल्या स्वथ:च्या अधिकाराने खास न्यायकोर्ट स्थापन करण्याचा अधिकार नाही.

५. पार्लमेंटच्या संमतीशिवाय राजाला जनतेवर कर बसविण्याचा अधिकार नाही.

६. पार्लमेंटच्या संमतीशिवाय राजाने शांततेच्या वेळी खडे सैन्य ठेवू नये.

७. न्यायदानाच्या कामी जामीन म्हणून मोठी रक्कम घेण्यात येवू नये.

८. पार्लमेंटमधील सभासदांच्या भाषणस्वातंत्र्यावर कोणीही बंदी घालू नये.

९. लोकांना विनंती-अर्जाद्वारे आपल्या तक्रारी राजाकडे कळविण्याचा हक्क आहे.

१०. लोकांना त्यांना योग्य वाटतील अशा सभासदांस निवडून देण्याचा अधिकार आहे.

यावरून असे दिसते की, कायद्यामध्ये राज्यकारभारातील वेगवेगळ्या संस्थाचे अधिकार कोणते हे नमूद केले नाही हा कायदा इतर कायद्याप्रमाणेच होता, पार्लमेंटच्या कोणत्याही कायद्याने तो रद्द करता येत होत. थोडक्यात राजा व पार्लमेंट यांच्यामधील कराराप्रमाणे तो काम करीत होता.

**२) पार्लमेंट सार्वभौमसत्ता बनली :**

बिल ऑफ राईटस या कायद्यामळे इंग्लंडमध्ये मागील ६० वर्षापासून राजा व पार्लमेंट यांच्यात राष्ट्रातील 'सार्वभौम/अंतिमसत्ता' कोणाकडे असावी? हा वाद संपुष्टात आला. सार्वभौम सत्ता पार्लमेंटकडे हे स्पष्ट होवून पार्लमेंटचे श्रेष्ठत्व स्थापन झाले.आता इंग्लंडच्या राजास आपले राज्यपद वंशपरंपरा वारस हक्कावर अवलंबून नसून ते पार्लमेंटच्या कायद्यावर अवलंबून आहे, हे कळाले त्यामुळे राजाचा ईश्वरदत्त वंशपरंपरा व वारसाहक्क हे तत्वही नाहीसे झाले.

**३) अनियंत्रित राजेशाही संपुष्टात आली :**

इंग्लंडमधील राजांचा दैवी अधिकारावर [Devine Right] कट्टर विश्वास होता. त्याच्या मते राजा कोणत्याच कृत्यासाठी जनतेला जबाबदार नसून परमेश्वराला जबाबदार असतो. त्यांना मिळालेले राजेपद म्हणजे परमेश्वराची देणगी आहे, असे ते समजत. पण वैभवशाली राज्यक्रांतीनंतर हे चित्र बदलले. त्यांना कळून चुकले की, पार्लमेंट व जनतेच्या सहकार्याशिवाय राजाला राज्यकारभार करणे कठीण आहे. त्यामुळेच या क्रांतीने इंग्लंडमधील अनियंत्रित राजेशाहीचा शेवट केला; आणि राजा जनतेचा विश्वास मिळवून त्यांच्या सहकार्याने राज्यकारभार करू लागला.

**४) विग व टोरी पक्षात समेट घडून आला :**

वैभवशाली राज्यक्रांतीपूर्वीचा विचार केल्यास असे दिसते की; तेंव्हा या दोन्ही पक्षांच्या वेगळ्या होत्या. त्यामुळे त्यांच्यात मतभेद होते. राज्यक्रांतीवेळी आणि त्यानंतर अंतर्गत बंडाळी व परकीय आक्रमणे यांच्या भितीने हे दोन्ही पक्ष एकत्र आले. त्यांनी एकमताने इंग्लंडच्या विकासाचे व हिताचे निर्णय घेतले. परिणामी इंग्लंडच्या विकासास गती मिळाली.

**५) मंत्रीमंडळ व राज्यकारभार/लोकशाही पद्धतीचा उदय :**

इंग्लंडमध्ये राज्यक्रांतीनंतर 'बिल ऑफ राईट्स' मंजूर करून पार्लमेंटने राजाचे अधिकार कमी केले. त्यामुळे आता राज्याच्या दैनंदिन कारभारात कोणते धोरण अंमलात आणावे हा प्रश्न महत्वाचा होता. तसेच त्यासाठी कोणत्या धोरणास लोकमताचा पाठिंबा आहे/कोणत्या राजकीय पक्षास लोकमताचा पाठिंबा आहे हे पाहणे आवश्यक झाले. कारण मंत्रिमंडळातील मंत्री निवडण्याचा अधिकार अजूनही राजाकडेच होता. विल्यमने आपल्या

मंत्रीमंडळात एकजूट असावी व त्याला पार्लमेंटचे पाठबळ मिळावे म्हणून १६९६ च्या सुमारास लॉर्ड संडरलंड याच्या सूचनेवरून कॉमन्स सभेत ज्या पक्षाचे बहुमत असे त्या पक्षाच्या प्रमुख लोकांना आपल्या मंत्रीमंडळात नेमण्याचा प्रघात सुरू केला. त्यामुळे इंग्लंडमध्ये मंत्रीमंडळ पद्धती सुरू झाली, आणि त्यातुनच लोकशाही पद्धतीचा उदय झालेला दिसतो.

**६) सैन्याच्या बाबतीत लष्करी कायदा [Mutiny Act-1689] :**

बिल ऑफ राईटस् नुसार पार्लमेंटच्या संमतीशिवाय राजाला शांततेच्या वेळी खडे सैन्य ठेवता येत नसे. पण देशात बंड होवू नये आणि परराष्ट्राशी युद्ध झाल्यास त्याचा उपयोग व्हावा यासाठी खडे सैन्य गरजेचे होते. अशा वेळी सैन्यात शिस्त राखण्यासाठी व ती मोडल्यास त्याबाबतीत न्यायनिवाडा करण्यासाठी वेगळी कोर्ट स्थापन करणे आवश्यक होते. ह्यासाठी 'म्युटिनी ॲक्ट' हा कायदा करण्यात आला. या कायद्याने सैन्यात शिस्त रहावी म्हणून सैन्याच्या बाबतीत लष्करी कायदा [Martial Law] अंमलात आणण्याचा व लष्करी कोर्टे स्थापन करण्याचा अधिकार सरकारास-शासनसंस्थेस मिळाला.

**७) पार्लमेंटचा सैन्यावर ताबा :**

पार्लमेंटच्या संमतीने राजा खडे सैन्य ठेवू शकत होता. तरी राजाकडून व शासनसंस्थेकडून त्याचा दूरूपयोग होवू नये यासाठी 'म्युटिनी ॲक्ट' या कायद्यास एका वर्षासाठीच मंजूरी देण्यात येवू लागली. त्यामुळे खडे सैन्य ठेवण्यासाठी व त्यामध्ये शिस्त राखण्यासाइी अधिकार मिळावा म्हणून दरवर्षी पार्लमेंटची बैठक भरविणे आवश्यक झाले. त्यामुळे अप्रत्यक्षपणे इंग्लंडच्या सैन्यावर पार्लमेंटचा ताबा राहू लागला.

**८) इंग्लंडच्या तिजोरीवर पार्लमेंटची सत्ता स्थापन :**

राज्यक्रांतीनंतर पार्लमेंटच्या संमतीने जनतेवर कर बसवून राजास पैसा मिळाला तर तो खर्च कसा व कोणत्या कामासाठी करावा हे राजा आपल्या मंत्र्यांच्या सल्ल्याने ठरवीत असे. पण काही काळाणे या गोष्टीस आळा बसविण्यासाठी कोणत्या कामासाठी काय खर्च करावा हे पार्लमेंटच्या संमतीने ठरविण्याची प्रथा सुरू केली. राजाचा स्वतःचा व कुटूंबाचा खर्च, दरबारचा खर्च, मंत्र्यांचा पगार, पेन्शने, गुप्त कामासाठी होणारा खर्च 'सिव्हील लिस्ट' म्हणून त्याच्या हयातीभर मंजूर केला.

सैन्य, आरमार व इतर राज्यकारभारासाठीचा खर्च कोणत्या कामासाठी किती करावयाचा हे निश्चित ठरवले गेले. शिवाय तो खर्च योग्य कामासाठी एकच वर्ष मंजुरी देण्याची प्रथा सुरू केली. जेणेकरून खर्चाच्या मंजुरीसाठी राजाला दरवर्षी एकदा तरी बैठक बोलावणे सक्तीचे झाले.

**९) टॉलरेशन ॲक्ट [Toleration Act-1689] पार्लमेंटचे धार्मिक धोरण :**

पार्लमेंटने १६८९ मध्ये 'टॉलरेशन ॲक्ट' हा कायदा मंजूर केला. या कायद्याने सर्व पंथाच्या लोकांना धार्मिक बाबतीत आपल्या पंथाप्रमाणे सार्वजनिक प्रार्थना करण्याची परवानगी मिळाली, पण त्यांना पार्लमेंटचे सभासद होण्यास व राज्यकारभारातील हुद्याची जागा मिळण्यास बंदी होती. रोमन कॅथॉलिक पंथाच्या लोकांना मात्र इतरांप्रमाणे परवाणगी मिळाली नाही. त्यामुळे धार्मिक कायदे मोडल्यास त्यांना पूर्वीप्रमाणे दंड द्यावा लागे.

**१०) राष्ट्रीय कर्ज (१६९३) :**

इंग्लंडमध्ये युद्धासाठी जादा खर्च लागल्यास राजा आपल्या कुवतीप्रमाणे धनाढ्य लोकांकडून घेई देशात अस्वस्थता असल्यास ते मिळणे कठीण होई. तेव्हा हे कर्जे राजाने पार्लमेंटच्या संमतीने राष्ट्रासाठी काढावे, असे माँटेन्यू या चिटणीसाने सुचविले व त्याप्रमाणे सुरूवात झाली. हे कर्ज फेडण्यासाठी सर्व राष्ट्र जबाबादार असे म्हणून खास 'राष्ट्रीय कर्ज' असे महणत.

**११) बँक ऑफ इंग्लंडची स्थापना (१६९४) :**

इंग्लंडमध्ये राष्ट्रीय कर्ज योजना अंमलात आल्यानंतर सरकारला बऱ्याच लोकांकडून कर्ज मिळू लागले. १६९४ मध्ये इंग्लंडमध्ये लंडनमधील पॅटरसन व काही व्यापारी यांनी एकजूट करून 'बँक ऑफ इंग्लंड' नावाची बँक काढली, आणि सरकारला १२ लक्ष पौंड कर्ज दिले. तेव्हा सरकारने या पेढीस(बँक) मान्यता दिली. नंतर तिची वाढ होवून ती जगातील प्रमुख बँकापैकी एक झाली.

**१२) पार्लमेंट निवडणूक कायदा/ट्राएनिएल ॲक्ट (१६९४) :**

पार्लमेंटने १६९४ साली मंजूर केलेल्या या कायद्यानुसार पार्लमेंटची निवडणूक तीन वर्षांनी व्हावी, व तीन वर्षात एकदा तरी पार्लमेंटची बैठक भरविण्यात याची, असे ठरविण्यात आले. त्यामुळे वेळोवेळी बदललेल्या लोकमताचा प्रभाव पार्लमेंटवर व राज्यकारभारावर पडू लागला. हा कायदा येण्यापूर्वी राजा कित्येक वर्षे पार्लमेंटची सभा न बोलावताच राज्यकारभार करीत असे. या पद्धतीमुळे लोकांचे अनेक प्रश्न सोडविण्यास मदत झाली.

**१३) मुद्रणस्वातंत्र्य :**

ट्युडर काळापासून सरकारकडून मुद्रणावर नियंत्रण घालण्यात आलेले होते. दुसऱ्या जेम्सच्या काळात मुद्रण करण्याबद्दल परवाना देणारा 'लयसेन्सिंग कायदा' (१६८५) मध्ये पास करण्यात आला. प्रथम त्याची मुदत सात वर्षे ठेवून नंतर वाढविण्यात आली.

१७९९ मध्ये या कायद्याची मुदत संपण्यावर पुन्हा हा कायदा करण्यात आला नाही. त्यामुळे मुद्रणस्वातंत्र्य मिळाले. वृत्तपत्रांना स्वातंत्र्य मिळाले, चोपडी, पुस्तके प्रकाशित होवू लागली. लेखक, प्रकाशक किंवा सरकारवर टीका करण्याचा अधिकार मिळाला.

**१४) गुन्हेगारी चौकशी कायदा (१६९६) :**

या कायद्यापूर्वी इंग्लंडमध्ये संशयावरून कोणासही अटक केली जात असे. हे निरपराध लोकांसाठी अन्यायकारक होते. त्यामुळे १६९६ मध्ये 'ॲक्ट ऑफ ट्रिसन' पास केला गेला. ह्यानुसार गुन्हेगारास वकिल देण्याची व आपली बाजू कौन्सिलपुढे मांडण्याची परवानगी मिळाली. तर न्यायालयातील खटल्यांसाठी दोन साक्षीदारांची आवश्यकता असणे बंधनकारक केले.

**१५) न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य :**

वैभवशाली राज्यक्रांतीनंतर न्यायदानाचा विभाग स्वतंत्र करण्यात आल. त्यामुळे लोकांना निःपक्षपातीपणे

न्याय मिळू लागला. यापूर्वी न्यायाधिशांच्या नेमणूका व न्यायालयाचा निकाल दोन्हीवर राजाचा प्रभाव होता. यापुढे तो राहीला नाही.

**१६) ॲक्ट ऑफ सेटलमेंटचे महत्व (१७०१) :**

पार्लमेंटने १६८९ मध्ये विल्यम व मेरी यांना इंग्लंडचे राजपद दिले. ही निपुत्रिक वारल्यास मेरीची बहीण ॲन हिला इंग्लंडचे राज्यपद मिळावे अशी व्यवस्था केली होती. १६९४ मध्ये राणी मेरी निपुत्रिक मरण पावली. तर १७०० मध्ये ॲन हीचा मुलगा ड्युक ऑफ ग्लौसेस्टर हा मरण पावला. त्यामुळे ॲन नंतर इंग्लंडच्या गादीवर कोण? हा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे या बाबतीत पार्लमेंटने १७०१ मध्ये 'ॲक्ट ऑफ सेटलमेंट' हा कायदा केला.

या कायद्यानुसार पहिल्या जेम्सची नात जर्मनीमधील व्हॅनोव्हर संस्थानची राणी सोफिया हिला व हिच्या प्रोटेस्टंटपंथी वारसांना इंग्लंडची गादी मिळावी असे ठरले. सोफिया ही पहिल्या जेम्सच्या इलिझाबेथ या मुलीची मुलगी होती. सोफियापेक्षाही जवळचे नातेवाईक होते पण ते रोमन कॅथॉलिक पंथीय होते, त्यामुळे त्यांना इंग्लंडची गादी देण्यात आली नाही.

हा कायदा म्हणजे बिल ऑफ राइटस् या कायद्यास पुरक असा होता. बिल ऑफ राइटस् मधील उणीवा या कायद्याने दूर करण्यात आल्या. इंग्लंडचे राज्यकर्ते प्रोटेस्टंट पंथाचेच असले पाहिजेत हे पुन्हा एकदा स्पष्ट करण्यात आले. हा कायदा मॅग्नाकार्टा, पिटीशन ऑफ राइटस्, बिल ऑफ राइटस या कायद्याप्रमाणेच महत्वाचा मानण्यात येतो.

इ.स. १७०२ मध्ये एके दिवशी शिकार करताना राजा विल्यमचा घोड्यावरून पडून मृत्यू झाला. त्यानंतर ॲन ही राणी झाली (१७०२-१७१४), तिच्या मंत्रीमंडळात विग व टोरी दोन्ही पक्षातील लोक होते. या दोन्ही पक्षांच्या पुढाऱ्यांनी इंग्लंड व स्कॉटलंड या दोन्ही पार्लमेंटचे एकीकरण घडवून आणले.

## १.३. शब्दार्थ :

१) विटेनजीमॉट - सूज्ञ लोकांचे मंडळ.

२) टेस्ट ॲक्ट - लॉर्ड शाफ्टसबरी [shaftesbury] यांच्या प्रेरणेने 'टेस्ट ॲक्ट' नावाचा कायदा १६७३ साली पास केला. या कायद्यानुसार इंग्लंडच्या एपिस्कोपेलियन पंथाव्यतिरिक्त असलेल्या कोणत्याही गृहस्थास राज्यकारभारातील कोणतीही हुद्याची जागा देऊ नये आणि तशी दिलेली असल्यास त्या जागेवरून त्या व्यक्तीस कमी करावे, असे ठरविण्यात आले.

३) शाफ्टसबरी - १६६७ मध्ये क्लॅरेंडन हद्दपार झाल्यावर चार्लसने राज्यकारभाराची सुत्रे एका मंडळाकडे सोपवली, त्यास केबल (गुप्त मंडळ) असे म्हणत. यामध्ये क्लिफोर्ड [clifford] ॲशले [Ashlay] बकिंगहॅम [Bakingham], आर्लिंगटन [Arlington], व लॉडरडेल हे पाच सभासद होते. यापैकी ॲशले हाच पुढे शाफ्टरबरी म्हणून प्रसिद्धीस आला.

४) एक्सक्लूजन बिल [Exclusion Bill] : जेम्स दुसरा याला वगळण्यासाठी शाफ्टसबरीने १६७९ साली हे बिल पार्लमेंट सभेपुढे आणले होते.

५) पिटीशनर्स – अर्ज करणारे.

६) अॅबोहरर्स – राजाकडे एक्सक्ल्यूजन बिलाबाबत चर्चा करण्यासाठी अर्ज केलेल्या कृतीचा तिटकारा करणारे.

७) कन्व्हेन्शन पार्लमेंट – इंग्लंडच्या राजाच्या आज्ञापत्रकाशिवाय भरविण्यात आलेल्या परिषदेस किंवा सभेस कन्व्हेन्शन पार्लमेंट असे म्हटले गेले आहे.

८) सिव्हिल लिस्ट – मुलकी कामासाठी करीत असलेल्या खर्चास सिव्हिल लिस्ट असे म्हणत.

## १.४. स्वयं अध्ययन प्रश्न

**अ) स्वयं अध्ययन प्रश्न – १**

**खालील पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. .......... या देशास लोकशाहीची जननी म्हणून ओळखले जाते.

अ) इंग्लंड ब) फ्रान्स क) जर्मनी ड) रशिया.

२. अँग्लो सॅक्सन जमातीमध्ये जमातीच्या प्रमुख अधिकाऱ्यास .......... असे म्हणतात.

अ) राजा ब) प्रधान क) प्रिन्स ड) सेनापती.

३. इंग्लंडच्या इतिहासात ट्युडर घराण्याची कारकीर्द सुमारे .......... वर्षे चालली.

अ) ८० ब) ९० क) १०० ड) १२०

४. इंग्लंडमध्ये ट्युडर घराण्यानंतर .......... घराणे सत्तेत आले.

अ) लँककेस्टर ब) स्टुअर्ट क) अँग्लो-सॅक्सन ड) ट्युडर.

५. राजा जेम्स दुसरा हा .......... घराण्यातील होता.

अ) स्टुअर्ट ब) ट्युडर क) अँनो ड) यार्क.

**ब) स्वयं-अध्ययन प्रश्न – २**

**खालील दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. दुसरा चार्ल्स यांच्या मुत्यूनंतर .......... हे इंग्लंडच्या गादीवर आले.

अ) तिसरा चार्ल्स ब) जेम्स दुसरा क) जेम्स पहिला ड) विल्यम.

२. इंग्लंडची राज्यसत्ता मिळविण्यासाठी दुसऱ्या चार्ल्सचा दासीपूत्र .......... याने उठाव/बंड केले.

अ) अॅनी ब) एलिझाबेथ क) मन्मथ ड) मेरी.

३. इंग्लंडमध्ये .......... साली टेस्ट ॲक्ट पास झाला.

अ) १६८०  ब) १६६०  क) १६६२  ड)१६७३.

४. इंग्लंडचा राजा जेम्स दुसरा हा .......... पंथाचा समर्थक होता.

अ) रोमन कॅथलिक  ब) प्रोटेस्टंट  क) ट्युरीटन  ड) अँग्लीकन.

५. जेम्स दुसरा याने त्याच्या कारकिर्दीत .......... देशाबरोबर मैत्री प्रस्थापित केली.

अ) जर्मनी  ब) जपान  क) फ्रान्स  ड) रशिया.

**क) स्वयं–अध्ययन प्रश्न – ३.**

१. इंग्लंडच्या जनतेने दुसऱ्या जेम्सच्या जुलूमशाहीपासून वाचण्यासाठी .......... ची मदत घेतली.

अ) जेम्स पहिला  ब) विल्यम व मेरी  क) मॉर्नबरो  ड) एलिझाबेथ.

२. जेम्स एडवर्ड हे .......... यांच्या मुलाचे नाव होते.

अ) जेम्स पहिला  ब) चाल्स पहिला  क) चार्लस दुसरा  ड) जेम्स दुसरा.

३. इंग्लंडच्या जनतेला इंग्लंडमध्ये .......... पंथियांची सत्ता आणावयाची होती.

अ) प्रोटेस्टंट  ब) रोमन कॅथॉलिक  क) प्युरीटन  ड) अँग्लीकन.

४. इ.स. .......... मध्ये इंग्लंडची रक्तहीन राज्यक्रांती घडून आली.

अ) १६८५  ब) १६८०  क)१६८४  ड) १६८८.

५. .......... या राजाने राज्यक्रांतीनंतर आपला राजमुकूट व राजमुद्रा थेम्स नदीत फेकून दिली.

अ) जेम्स दुसरा  ब) एलिझाबेथ  क) जेम्स पहिला  ड) जेम्स एडवर्ड.

● **स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

**अ) स्वयं–अध्ययन प्रश्न –१**

१. अ – इंग्लंड  २. क – प्रिन्सिप्स  ३. क – १२०

४. ब – स्टुअर्ट  ५. अ – स्टुअर्ट

**ब) स्वयं–अध्ययन प्रश्न –२**

१. ब –जेम्स दुसरा  २. क – मन्मथ  ३. ड – १६७३

४. अ – रोमन कॅथॉलिक  ५. क – फ्रान्स

**क) स्वयं–अध्ययन प्रश्न –३**

१. ब – विल्यम व मेरी　　२. ड – जेम्स दुसरा　　३. अ – प्रोटेस्टंट

४. ड – १६८८　　५. अ – जेम्स दुसरा

## १.५ सारांश :

या प्रकरणामध्ये आपण इंग्लंडची रक्तहीन राज्यक्रांती– कारणे स्वरूप व परिणाम यांची विस्तृतपणे चर्चा केली.

इंग्लंडमधे डिसेंबर १६८८ मध्ये घडून आलेल्या वैभवशाली रक्तहीन राज्यक्रांतीस इंग्लंडच्या तसेच जागतिक इतिहासाच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्व आहे. प्रारंभी इंग्लंडमध्ये रोमन लोकांनी राज्य केले. त्यांच्या सत्तेच्या ऱ्हासानंतर इंग्लंडमध्ये अनेक राजघराण्यांनी राज्य केले. त्यापैकी स्टुअर्ट घराणे खूप महत्वपूर्ण आहे. कारण त्यांच्याच काळात जेम्स दुसरा याच्या कारकिर्दीत इंग्लंडमध्ये रक्तहीन राज्यक्रांती घडून आली. त्याला जेम्स दुसरा याचा अनियंत्रित राज्यकारभार, त्याची जुलूमशाही, त्याचा दैवी अधिकारावरील विश्वास, पार्लमेंट व जनतेला दुय्यम लेखण्याचे धोरण इ. कारणे महत्वपूर्ण होती.

त्याच्या हुकूमशाहीला कंटाळून इंग्लंडची पार्लमेंट व जनता यांनी जेम्स दुसरा याची मुलगी व जावई (मेरी व विल्यम) यांना मदतीसाठी बोलावले आणि त्यांच्या मदतीने जेम्स दुसरा याची अनियंत्रित राजेशाही संपुष्टात आणली. शिवाय इंग्लंडमधून रोमन कॅथॉलिक पंथीयांचे वर्चस्व कायमस्वरूपी झुगारून लावले. इंग्लंडची गादी प्रोटेस्टंट पंथीय वारसालाच मिळावी अशी तरतूद करून ठेवली.

इंग्लंडच्या रक्तहीन राज्यक्रांतीकडून जगातील इतर अनेक देशांनी प्रेरणा घेतली. कारण या राज्यक्रांतीचे इंग्लंडवर आणि जगावर दूरगामी परिणाम झालेले दिसतात. त्यामुळेच या वैभवशाली रक्तहीन राज्यक्रांतीचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

## १.६. सरावासाठी प्रश्न :

**प्र. १) खाली दिलेल्या प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. १६८८ साली इंग्लंडमध्ये झालेल्या 'वैभवशाली राज्यक्रांती'ची कारणे सांगा.

२. इंग्लंडमध्ये झालेल्या 'वैभवशाली राज्यक्रांती'चे स्वरूप स्पष्ट करा.

३. इंग्लंडमध्ये झालेल्या 'वैभवशाली राज्यक्रांती'च्या परिणामांची चर्चा करा.

**प्र. २) टीपा लिहा –**

१. राजा जेम्स द्वितीय. [James II]

२. राजा विल्यम व राणी मेरी.

३. ॲक्ट ऑफ सेटलमेंट.

४. वैभवशाली राज्यक्रांती (१६८८).

५. वैभवशाली राज्यक्रांतीचे परिणाम.

## १.७ संदर्भ ग्रंथ :

१) Arun Bhattacharjee, World Revolutions, Ashish Publishing House, New Delhi, 1988.

२) मदन मार्डीकर, आधुनिक युरोपचा इतिहास इ.स. १७८१ ते १९८५, विद्या बुक्स, २००५.

३) Trevelyan, G..M., The English Revolution, (1688-1689), 1939.

४) बर्वे हरि परशुराम व कुलकर्णी अ.रा., इंग्लंडच्या राज्यघटनेचा इतिहास (६००-१९५०), देशमुख प्रकाशन, पुणे, १९६३.

५) Buckyley B. Arabella, History of England, Macmillan and Co.,

६) सिरसीकर व.मं., आधुनिक जगाचा इतिहास, १९६१.

❖❖❖

# घटक – २

# राष्ट्रवाद

## (Nationalism)

**अनुक्रमणिका :**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ राष्ट्रवादाच्या उदयाची आणि प्रसाराची कारणे

२.२.२ इटली आणि जर्मनीचे एकीकरण

२.२.३ राष्ट्रवादाचा परिणाम

२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

- राष्ट्रवादाची संकल्पना समजून घेता येईल.
- राष्ट्रवादाचा उदय आणि प्रसार याची कारणमीमांसा करता येईल.
- इटलीचे एकीकरण आणि राष्ट्रवाद यांचा सहसंबध लक्षात येईल.
- जर्मनीच्या एकीकरणामधील राष्ट्रवादाची भूमिका समजून घेता येईल.
- युरोप आणि जगावर राष्ट्रवादाच्या झालेल्या परिणामांची चर्चा करता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

बी.ए. भाग ३, सत्र ६ मध्ये आपण १६ व्या ते १९ व्या शतकामध्ये आधुनिक जगाच्या जडणघडणीचा

अभ्यास करत आहोत. याकाळात जगात विशेषतः युरोपची जी जडणघडण झाली त्यामागे युरोपात उदयाला आलेल्या आधुनिकतेच्या संकल्पनेचा मोठा वाटा आहे. 'आधुनिकता' या संकल्पनेचे महत्त्वाचे तत्व स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मुल्ये मानली जातात. युरोपमध्ये सन १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांती पासून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मुल्ये आधुनिकतेची मुल्ये म्हणून समोर आली हे आपण मागील सत्रात अभ्यासले आहे. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे युरोपात जी मोठी घुसळण झाली त्यामध्ये 'राष्ट्रवाद' आणि त्याच्याशी संलग्न 'राष्ट्र-राज्य' यांचा विकास ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण प्रक्रिया घडून आली. 'राष्ट्रवाद' ही एक आधुनिक संकल्पना आहे. आधुनिक युरोपात 'राष्ट्रवादाच्या उदय आणि विकासामुळे जगावर दूरगामी परिणाम झाले. राष्ट्रवादामुळे झालेले हे परिणाम जसे आपल्या आजच्या वर्तमानावर आहेत तसेच ते येणाऱ्या भविष्यकाळातील आणखी काही दशके तरी कायम राहतील असे खात्रीलायकरित्या म्हणता येते. सबब, आधुनिक जगाच्या जडणघडणीचे आकलन करून घेण्यासाठी राष्ट्रवादाचा उदय आणि प्रसार याचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर घटकाच्या माध्यमातून आपण त्यादृष्टीने प्रयत्न करणार आहोत.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ राष्ट्रवादाच्या उदयाची आणि प्रसाराची कारणे :

'धर्म, जात, कुटुंब, नातेसंबंध यांच्यापेक्षा राष्ट्र महत्त्वाचे', 'राष्ट्रासाठी सर्वस्व अर्पण करायला हवे', 'राष्ट्रासाठी केलेले बलिदान सर्वोच्च असते', 'राष्ट्राइतके महत्त्वाचे काहीच नाही', 'आपले महान राष्ट्र अगदी प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे', 'राष्ट्राचा अपमान सहन केला जाणार नाही' इत्यादी प्रकारची वाक्ये आपण राजरोसपणे वेळोवेळी ऐकत असतो-उच्चारत असतो. आपल्या मनामध्ये देखील आपल्या देशाबद्दल-राष्ट्राबद्दल अशाच प्रकारच्या भावना असतात. 'राष्ट्राचे अस्तित्व ही एक नैसर्गिक बाब आहे' असे मानण्या इतका राष्ट्रवादाचा आपल्यावर प्रभाव असतो. पण खरचं 'राष्ट्र' आणि 'राष्ट्रवाद' या संकल्पना पुरातन आणि नैसर्गिक आहेत का? प्राचीन काळी एखाद्या विशिष्ट समूहासाठी राष्ट्र ही संकल्पना वापरली जायची उदा. बायबल आणि तत्सम प्राचिन ग्रंथामध्ये ज्यू किंवा इतर समुदायांसाठी राष्ट्र (Nation) या अर्थाच्या शब्दांचा उपयोग करण्यात आल्याचे आढळते. मात्र, इतिहासकारांच्या मते राष्ट्रवाद ही एक आधुनिक संकल्पना/विचारसरणी आहे.

राष्ट्र आणि राष्ट्रवादाच्या संबधित विचार किंवा त्यासारखे उल्लेख पूर्वीच्या काळी जरी आपल्याला आढळून येत असले तरी आधुनिक राष्ट्रवादाचा उदय हा अठराव्या शतकात पश्चिम युरोपात झाला. पश्चिम युरोपातून १९ व्या आणि २० व्या शतकात त्याचा प्रसार जगभर झाला. आधुनिक राज्यव्यवस्थेसोबत राष्ट्रवादाची संकल्पना जोडल्यामुळे राष्ट्र राज्यांचा उदय झाला. काहीवेळा आधुनिक राज्यांनी आपल्या जनतेच्या मनात राष्ट्रवादी भावना चेतवून आपल्या राज्याच्या सीमांतर्गत राहणाऱ्या लोकांमध्ये राष्ट्रवादी विचारांचा प्रसार केला. तर काहीवेळा बहुभाषिक, बहुवांशिक साम्राज्याविरोधात समान वांशिक अथवा भाषिकदृष्ट्या एक असणाऱ्या लोकांच्या समूहामध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली. अशा विविध प्रक्रियांच्या माध्यमातून पश्चिम युरोपात राष्ट्रवादाने मुळे धरण्यास सुरवात केली. कोणत्या कारणामुळे आणि कशारीतीने युरोपात राष्ट्रवादाचा उदय आणि विकास झाला हे जाणून घेण्याआधी 'राष्ट्रवाद' ही संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे.

● **राष्ट्रवाद म्हणजे काय ?**

फ्रेंच इतिहासकार **अर्नेस्ट रेनन** यांनी सन १८८२ मध्ये "What is Nation?' (राष्ट्र म्हणजे काय?) या विषयावर व्याख्यान देताना राष्ट्राची व्याख्या केली. अर्नेस्ट रेनन यांच्या मते, 'राष्ट्र' हा एक आध्यात्मिक समुदाय आहे. जो आपल्या दैनंदिन जीवनातील विश्वासाच्या आधारे स्वत:मध्ये ऐक्य प्रस्थापित करतो. राष्ट्रीय ऐक्याचा मुख्य आधार उज्ज्वल भूतकाळाच्या सामुदायिक स्मृती आणि भविष्यकाळा संदर्भात समान महत्त्वाकांक्षा हे असतात.

रशियन मार्क्सवादी नेता **जोसेफ स्टॅलिन** यांनी आपल्या "Marxism and the National Question' (मार्क्सवाद आणि राष्ट्रीय प्रश्न) या सन १९१३ मधील गाजलेल्या लेखात राष्ट्रीयतेच्या स्वरूपाबद्दल भाष्य केले आहे. जोसेफ स्टॅलिन यांच्या मते, एखादे 'राष्ट्र' हे ऐतिहासिक दृष्ट्या निर्माण होते. यामध्ये एक कायमचा निवासी समुदाय असतो आणि त्याची निर्मिती समान भाषा, प्रदेश, आर्थिक जीवन आणि मानसिकता इत्यादी मिळून म्हणजे एका समान संस्कृतीच्या आधारावर होते.

आपल्या लक्षात आले असेलच की **अर्नेस्ट रेनन** यांची राष्ट्राची व्याख्या ही आदर्शवादी आहे तर जोसेफ स्टॅलिन यांची व्याख्या ही भौतिकवादी आहे. मात्र, या दोन्ही व्याख्यांमधून एक गोष्ट अत्यंत स्पष्टपणे आपल्या लक्षात येतेकी, 'राष्ट्र' हे कधीही अनादि (ज्याची सुरवातच नाही) किंवा अनंत (ज्याला अंत नाही) असे नसते यावर अर्नेस्ट रेनन आणि जोसेफ स्टॅलिन या दोघांचे ही एकमत आहे. म्हणजेच राष्ट्रांचा आरंभ आणि अंत देखील असतो. थोडक्यात, 'राष्ट्र' हे नैसर्गिक नसून मानवी समुदायांच्या द्वारे निर्मित असते.

सुप्रसिद्ध अमेरिकन अभ्यासक **हॅन्स कोहन** यांना राष्ट्रवादाचे सर्वात प्रभावी भाष्यकार म्हणून गौरवले जाते. हॅन्स कोहन यांच्या मते, राष्ट्रीयता अथवा राष्ट्रीय भावना ही सजीव शक्तींची उपज आहे. त्यामुळे ती अटळ नसते आणि त्यामध्ये नेहमी चढउतार होत असतो. राष्ट्रीयतेची अथवा राष्ट्रीय भावनेची ओळख ही फक्त कुळ, वंश, जनजाती या लोकसमूहामुळे बनत नाही. तसेच फक्त समान भूतकाळ किंवा समान वस्तीस्थान याचा देखील राष्ट्रीय ओळखीशी संबंध नसतो. पुरातन जनजातींजवळ प्राचीन काळापासूनचा इतिहास उपलब्ध आहे. मात्र, त्यांच्यामध्ये अजूनही राष्ट्रीयतेची किंवा राष्ट्रीय भावनेची निर्मिती होऊ शकलेली नाही. हे जनजातीय समुदाय बाकी काही नसून एक मानवी सामग्री आहे, ज्यांच्यामध्ये काही विशिष्ट परिस्थितीमध्ये एका राष्ट्रीयतेचा/एका राष्ट्रीय भावनेचा उदय होऊ शकतो. एका राष्ट्रीयतेचा / राष्ट्रीय भावनेचा जन्म होऊ शकतो किंवा मृत्यू होऊ शकतो किंवा एखाद्या मोठ्या राष्ट्रीयतेमध्ये / राष्ट्रीय भावनेमध्ये त्याचे विलीनीकरण होऊ शकते. हॅन्स कोहन यांचे असेही मत आहे की, राष्ट्रवादाचा विचार आणि स्वरूप हा खूप पूर्वीच विकसित झाला होता. प्राचीन हिब्रू आणि ग्रीक काळापासून राष्ट्रवादाचा विचार अस्तित्वात होता. **प्राचीन काळामध्ये ज्यू लोकांमध्ये 'निवडलेले लोक' अशी संकल्पना, राष्ट्रीय इतिहासाची भावना आणि 'राष्ट्रीय प्रेषित'ची संकल्पना यांच्या माध्यमातून राष्ट्रवादाची तीन लक्षणे उपस्थित होती.** ग्रीकांमध्ये राष्ट्रीय विचारधारेचे अस्तित्व असून देखील त्यांच्यामध्ये राजकीय राष्ट्रवाद अस्तित्वात नव्हता. फारसी साम्राज्यांच्या विरोधात झालेल्या युद्धांमध्ये फार थोड्या काळासाठी ग्रीकांमध्ये देशभक्तीचा उदय झाला होता, असे मत हॅन्स कोहन यांनी मांडले आहे.

प्राचीन काळापासून राष्ट्राचा विचार अस्तित्वात होता आणि सोळाव्या शतकात तर त्याचे काही पुरावे देखील मिळतात. उदाहरणार्थ, जर्मन भाषेतील शब्द "Volks' (English- "Folks') (फोक्स) हा विशिष्ट लोकांच्या समुदायासाठी किंवा जनतेसाठी वापरला जायचा. प्राचीन काळापासून राष्ट्राचा विचार अथवा संकल्पना अस्तित्वात होते अशी मांडणी होत असली तरी देखील 'राष्ट्रवाद' ही एक आधुनिक संकल्पना आहे यावर बहुतांश इतिहासकारांचे एकमत आहे. राष्ट्रवादासंबधी इतर अनेक मुद्यांवर असहमती असून देखील **बेनेडीक्ट ॲन्डरसन, अर्नेस्ट गेलनेर** आणि **एरिक हॉब्सबॉम** हे अलीकडच्या काळातील इतिहासकार एकमताने मानतात की, राष्ट्रवादाचा उदय १८ व्या शतकात पश्चिम युरोपात झाला आणि त्यानंतर १९ व्या आणि २० व्या शतकांमध्ये जगाच्या इतर भागात राष्ट्रवादाचा प्रसार झाला. बहुतांश विद्वानांचे मत आहे की, आधुनिक राष्ट्रवादाचा उदय औद्योगिक भांडवलवाद आणि छपाई भांडवलवाद याच्या सोबत झाला. भाषा, वंश किंवा धर्म यांच्यावर आधारित समुदाय इत्यादी तसेच राज्यामधील किंवा कल्पित समुदायामधील परस्पर प्रतिस्पर्धा, चढाओढ, परस्पर शत्रुत्व इत्यादी अनेक गोष्टींनी आधुनिक राष्ट्रवादाच्या उदय आणि विकासाच्या या प्रक्रियेत हातभार लावला असे इतिहासकार मानतात.

मार्क्सवादी परंपरेतील राष्ट्रवादाची मीमांसा ही कार्ल मार्क्स, फेडरिक एंजेल्स, लेनिन आणि स्टॅलिन यांच्या पासून एरिक हॉब्सबॉम पर्यंत पोहचते. मार्क्सवादी परंपरेमध्ये राष्ट्राला एक ऐतिहासिक स्वरूपात निर्मित घटक मानले जाते, ज्याचा उदय सामंतवादाचे पतन आणि भांडवलवादाच्या उदया सोबत झाला. जनजाती, कुळ, वंश आणि लोक हे भांडवलवादाच्या उदयाच्या पूर्वीपासून अस्तित्वात होते. पण भांडवलशाही उत्पादन पद्धतीमुळे नवीन आर्थिक संबंध विकसित झाले आणि त्याच्या परिणाम स्वरूप राष्ट्राचा जन्म झाला. राष्ट्रवादाला एका अशा वैचारिक आधाराच्या स्वरुपात पहिले जाते की ज्याने संपूर्ण समाजाच्या हिताच्या परीपेक्ष्यात 'बुर्जूवा' वर्गाला एक 'वर्ग' म्हणून आपल्या हितसंबधाला ओळखण्यास मदत केली. एरिक हॉब्सबॉम यांनी जोर देऊन म्हटले की, औद्योगिक आणि आर्थिक विकास यांच्या विशिष्ट टप्प्याच्या संदर्भात राष्ट्र आणि राष्ट्रवादी आकांक्षा यांचे मुल्यांकन करावयास हवे. ते पुढे असे ही म्हणतात की, जरी राष्ट्रवाद वरून खाली प्रक्षेपित केला गेला असला तरी जनतेच्या भावना, आकांक्षा, आशा, विचार, आवश्यकता आणि हितसंबधांचे विश्लेषण केल्याशिवाय राष्ट्रवादाला समजून घेता येत नाही. या उल्लेखित बाबी अनिवार्य स्वरूपात राष्ट्रीय नसतात आणि अजूनदेखील कमी राष्ट्रवादी आहेत.

राष्ट्रवादासंबधी उपरोक्त मीमांसा समजून घेतल्यानंतर राष्ट्रवादाची एक ढोबळ व्याख्या पुढीलप्रमाणे करता येते –

'राष्ट्रवाद' म्हणजे एक विचारसरणी आहे. या विचारसरणीचा दावा असतो की, 'समान ओळख, भाषा, इतिहास आणि परंपरा असलेल्या लोकांच्या समूहाद्वारे राष्ट्राची निर्मिती होते. राष्ट्रवाद्यांचा असा आग्रह असतो की, राष्ट्रावरील निष्ठा ही अत्यंत महत्त्वाची असते. आपल्या राष्ट्राच्या हितासाठी, त्याच्या संरक्षणासाठी, त्याच्या सीमांच्या आणि संस्कृतीच्या विस्तारासाठी व राष्ट्राला सर्वोच्च स्थानी नेण्यासाठी त्या राष्ट्राच्या जनतेने एकत्रित येऊन कटीबद्ध होणे आवश्यक असते. राष्ट्रवाद्यांच्यामते, 'राष्ट्र' हे स्वतंत्रच असले पाहिजे आणि राष्ट्रावर त्याच्या

नागरिकांचीच सत्ता असायला हवी. राष्ट्राचे नागरिक आपल्या राष्ट्रा प्रति आपली राष्ट्रनिष्ठा/ देशभक्ती जाहीर करण्यासाठी आणि राष्ट्रहितासाठी राष्ट्रध्वज आणि इतर राष्ट्रीय प्रतीकांच्या आधारे संघटीत व्हायला हवेत, अशी राष्ट्रवाद्यांची अपेक्षा असते.

राष्ट्रवादाची संकल्पना समजून घेतल्यानंतर एकोणिसाव्या शतकात युरोपमध्ये राष्ट्रवादाचा उदय आणि प्रसार होण्यामागे कोणती कारणे होती हे जाणून घेणे आवश्यक आहे.

- **राष्ट्र-राज्य आणि राष्ट्रवादाचा विचार :**

मध्ययुगीन युरोपमध्ये सामंतवादी (Feudalism) व्यवस्था अस्तित्वात होती. सामंतवादी व्यवस्थेमध्ये जमिनीचा ताबा हा छोट्या छोट्या प्रदेशाचे वंशपरंपरागत अधिकाऱ्यांच्या म्हणजेच सामंतांचा असे. सामंतशाही व्यवस्था ही उतरंडीची व्यवस्था असे ज्याचे अनेक स्तर असत. राजा हा सर्वोच्च स्थानी असे आणि राज्यातील सर्व जमीन ही राजाच्या मालकीची असे. राजाच्या नंतर अनेक स्तरात श्रेष्ठतेनुसार सामंतांची विभागणी असे. सामंती व्यवस्थेच्या तळाशी शेती कसणारी कुळे असत. सामंत आपल्या राजाशी एकनिष्ठ राहत, राजाला युद्धात सैन्याच्या स्वरुपात मदत करत. सामंतांच्या या सेवेच्या बदल्यात सामंतांना जमीन मिळे. सामंताला मिळालेल्या जमिनीवर शेतकऱ्यांची कुळे राबत असत. मध्ययुगीन युरोपात धर्मसंस्थेचा देखील मोठा वरचष्मा होता. ख्रिस्ती धर्माच्या चर्च या संस्थेचा मोठा प्रभाव या छोट्या छोट्या राज्यांवर आणि जनतेवर होता. मध्ययुगीन युरोपात अशी सामंतवादी व्यवस्था असलेली अनेक राजांची छोटी छोटी राज्ये अस्तित्वात होती. इ.स. सोळाव्या शतकापासून इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल, स्पेन इत्यादी राज्ये शक्तिशाली बनली आणि त्यांचा प्रादेशिक विस्तार झाला. या शक्तिशाली राज्यांनी आपल्या प्रदेशातील भाषा आणि साहित्य विकासाला हातभार लावला. परिणामी या राज्यांच्या सीमारेषांच्या आत राहणाऱ्या लोकांमध्ये आपण एकाच राज्याचे रहिवासी असल्याची भावना निर्माण झाली. सरंजामशाही व्यवस्थेचा ऱ्हास, प्रबोधन काळातील वैचारिक प्रगती, औद्योगिक क्रांती, भांडवलशाही व्यवस्थेचा उदय, मध्यम वर्गाचा उदय अशा विविध कारणांनी राष्ट्र-राज्यांच्या निर्मितीस हातभार लावला.

युरोपात पहिल्यांदा इंग्लंड आणि फ्रान्स ही पहिली राष्ट्र-राज्ये म्हणून उदयाला आली आणि पुढे स्पेन, रशिया आणि प्रशिया यांचा देखील राष्ट्र राज्याच्या स्वरूपात विकास झाला. विशिष्ट राष्ट्र आणि त्यातील राज्यसत्ता यांच्यात एकसंघपणा आल्यामुळे तयार झालेली राजकीय संस्था म्हणजे 'राष्ट्र-राज्य' मानले जाते. राष्ट्र राज्यांच्या उदयामुळे सामंतवादी व्यवस्थेचा ऱ्हास सुरु झाला. सामंतांचे महत्त्व कमी होऊन राजा आणि प्रजा हे राज्याचे मुख्य अंग बनले. सामंतांचे महत्त्व कमी झाल्याने मध्यवर्ती शासन शक्तिशाली झाले. मध्यवर्ती शासनाने व्यावसायिक, व्यापारी यांना संरक्षण दिले. राष्ट्र-राज्यांच्या उदयामुळे जनतेमध्ये एकोप्याची भावना निर्माण झाली. एका राष्ट्र-राज्यात राहणाऱ्या जनतेचे आर्थिक हितसंबध आणि सांस्कृतिक परंपरा एकसारखी असल्याने हा एकोपा वाढीस लागला.

**युरोपातील राष्ट्र –** राज्यांमध्ये अनेक कारणांमुळे सतत युद्ध होत असे. इंग्लंड विरुद्ध फ्रान्स, इंग्लंड विरुद्ध स्पेन, फ्रान्स विरुद्ध स्पेन , स्पेन विरुद्ध पोर्तुगाल इत्यादी राष्ट्र-राज्यांत सतत लढाया होत. इंग्लंड आणि फ्रान्स

मध्ये तर अनेक वर्ष चालणारी युद्धे झाली. युरोपातील राष्ट्र-राज्यांच्या शासकांनी या विध्वंसक युद्धांना अधिष्ठान देण्याकरता लोकांमध्ये राष्ट्रीय भावना जागृत करून तिची वाढ होण्यास हातभार लावला. जेथे राष्ट्रीय भावना नव्हती तिथे ती निर्माण केली गेली तर जिथे ती अस्तित्वात होती तिथे तिची प्रखरता वाढवली गेली. राष्ट्र-राज्यातील युद्धांनी राजकीय शक्तीचे केंद्रीकरण केले. राजाला अनियंत्रित अधिकार प्राप्त झाले. राष्ट्र-राज्यात होणाऱ्या युद्धात जिंकणाऱ्या राज्याची आर्थिक शक्ती वाढत असे. अनियंत्रित राजा साम्राज्य विस्तारासाठी आणि व्यापारी हितसंबंधासाठी सतत युद्ध करत असत. सतराव्या शतकात युद्धांवर होणाऱ्या सततच्या खर्चामुळे युरोपातील बहुतांश देशात आर्थिक ताण निर्माण झाला. **आर्थिक टंचाईवर मात करण्यासाठी राज्यसंस्थांनी करांमध्ये भरमसाठ वाढ केली.** या करवाढीला जनतेतून, व्यापाऱ्यांतून, मध्यमवर्गातून प्रचंड विरोध सुरु झाला. अनियंत्रित राजेशाहीला अंकुश लावण्यासाठी, जनतेच्या आर्थिक आणि राजकीय हितसंबधांच्या रक्षणासाठी युरोपातील विविध राष्ट्र-राज्यातील जनतेत राष्ट्रीय जागृती निर्माण झाली. राष्ट्र-राज्यातील जनतेने राजकीय अधिकारांसाठी आंदोलने, जनतेतून उदयाला आलेले नेते, जनतेत झालेली वैचारिक घुसळण, जनतेतील एकत्वाची भावना आणि राष्ट्रीय जागृती यांच्यामुळे युरोपात राष्ट्रवादाचा प्रसार झपाट्याने झाला. त्यामुळे राष्ट्र-राज्यांचा उदय हा युरोपमध्ये राष्ट्रवादाच्या उदयामागील एक महत्त्वाचे कारण आहे.

● **फ्रेंच राज्यक्रांती आणि राष्ट्रवाद :**

इतिहासात आधुनिक राष्ट्रवादाची पहिली अभिव्यक्ती ही इ.सन. १७८९ मधील फ्रेंच राज्यक्रांतीच्या स्वरूपात दिसून येते. फ्रेंच राज्यक्रांती पूर्वी फ्रान्स हे एक निरंकुश राजेशाहीची सत्ता असलेले राष्ट्र-राज्य होते. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे झालेल्या राजकीय आणि घटनात्मक बदलांमुळे फ्रान्सची सत्ता ही अनियंत्रित राजाच्या हातून निघून फ्रेंच नागरिकांच्या हाती आली. पूर्वी राज्याचा मूलाधार हा राजा असायचा. मात्र, फ्रेंच राज्यक्रांतीने घोषणा केली की आता जनतेद्वारे राष्ट्राची स्थापना होईल आणि राष्ट्राचे भविष्य हे जनताच निश्चित करेल.

फ्रेंच राज्यक्रांतीच्या आरंभापासूनच फ्रेंच जनतेत एक सामुहिक ओळख (Common Identity) निर्माण होण्याची प्रक्रिया सुरु होती. पितृभूमी (Fatherland) आणि नागरिक (Citizen) यांच्या सारख्या विचारांनी एकत्व असलेल्या जनसमुदायाच्या संकल्पनेवर भर दिला. या जनसमुदायातील प्रत्येक व्यक्तीला एका घटनात्मक चौकटीत समान अधिकार असतील असा विचार देखील पुढे आला. फ्रान्स या राष्ट्राच्या प्रतीकाच्या स्वरूपात राष्ट्रीय ध्वज म्हणून निळा, पांढरा आणि लाल असे तीन रंग असलेला ध्वज निवडला गेला. फ्रान्स राष्ट्राची 'मेरीॲन' या स्त्रीरूपात कल्पना केली गेली. 'स्वातंत्र्य' आणि 'लोकशाही'ची चिन्हे धारण करणारी 'मेरीॲन' हे फ्रान्सच्या जन-राष्ट्राचे (French Republic) प्रतिक म्हणून अत्यंत लोकप्रिय झाली आणि फ्रान्सच्या जनतेत राष्ट्रीय भावना निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरली. (आपल्या भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात अशाच प्रकारे भारताचे 'भारत माता' च्या स्वरूपात प्रस्तुतीकरण करण्यात आले. हे प्रस्तुतीकरण खूप लोकप्रिय झाले आणि लोकांमध्ये राष्ट्रीय भावना निर्माण होण्यास उपयुक्त ठरले.) पूर्वीच्या 'इस्टेट जनरल' चे नामांतर 'नॅशनल असेंब्ली' म्हणजे 'राष्ट्रीय सभा' असे करण्यात आले व त्यातील प्रतिनिधी हेथेट लोकांद्वारे निवडले जाऊ लागले. नवीन प्रतिज्ञा, नवीन राष्ट्रगीत, नवीन देशभक्तीवरील गाणी रचली गेली. एक केंद्रीय प्रशासन व्यवस्था स्थापित करून

फ्रान्सच्या सर्व नागरिकांसाठी एक समान कायद्यांची रचना करण्यात आली. फ्रान्समधील अंतर्गत व्यापारावरील आयात-निर्यात कर रद्दबातल करण्यात आला. एक समान वजन आणि मापे यांची व्यवस्था संपूर्ण फ्रान्स मध्ये लागू केली. संपूर्ण फ्रान्समध्ये पॅरीस येथे बोलल्या जाणाऱ्या फ्रेंच भाषेलाच प्रमाण भाषा मानले जाऊ लागले आणि तिला संपूर्ण फ्रान्स राष्ट्रासाठी समान भाषेचा दर्जा प्राप्त झाला. फ्रान्स मधील हे सर्व बदल हे 'राष्ट्र' या संकल्पनेला अनुलक्षून झाले होते आणि म्हणुनच इतिहासातील राष्ट्रवादाची पहिली स्पष्ट अभिव्यक्ती म्हणून फ्रेंच राज्यक्रांतीला ओळखले जाते.

युरोपातील सर्व जनतेला अनियंत्रित सत्ताधाऱ्यांच्या जोखडातून मुक्त करणे हे 'फ्रान्स' या राष्ट्राचे लक्ष्य असल्याची घोषणा फ्रेंच राज्यक्रांतीतील क्रांतीकारींनी केली. अर्थात, युरोपातील इतर जनतेला त्यांचे राष्ट्र स्थापन करण्याच्या कार्यात फ्रान्स मदत करेल. फ्रेंच राज्यक्रांतीची माहिती युरोपात पसरताच युरोपच्या विविध शहरांत विद्यार्थी आणि सुशिक्षित मध्यम वर्गातील व्यक्तींनी जॅकोबीन क्लब स्थापन करण्यास सुरवात केली. जॅकोबीन क्लब मधील सदस्यांनी केलेल्या कार्यामुळे इ.स. १७९० च्या दशकात हॉलंड, बेल्जियम, स्वित्झर्लंड आणि इटली मध्ये विजय प्राप्त करण्याचा फ्रेंच सैन्याचा मार्ग प्रशस्त झाला.

फ्रेंच राज्यक्रांतीतील फ्रान्स राष्ट्राची अभिव्यक्ती, फ्रेंच राज्यक्रांतीतील विचार आणि फ्रेंच सैन्याचा युरोपातील विजय यांच्या परिणाम स्वरूप युरोपात मोठ्या प्रमाणात राष्ट्रवादाचा प्रसार झाला.

- **नेपोलियनची विधी संहिता आणि जनतेचे ऐक्य :**

फ्रेंच राज्यक्रांती नंतर फ्रान्समध्ये घडून आलेल्या घडामोडींनंतर फ्रान्सच्या शासकाच्या रुपात नेपोलियनचा उदय झाला. नेपोलियनने फ्रेंच सैन्याच्या सहाय्याने फ्रान्सचा साम्राज्य विस्तार करून हॉलंड, बेल्जियम, स्वित्झर्लंड आणि इटली इत्यादी प्रदेशांवर वर्चस्व प्रस्थापित केले. नेपोलियनच्या या साम्राज्य विस्तारामुळे त्याच्या नियंत्रणात खूप मोठा भूप्रदेश आला. या प्रदेशांमध्ये नेपोलियनने अनेक सुधारणा घडवून आणल्या ज्या त्याने पूर्वी फ्रान्समध्ये घडवून आणल्या होत्या.

फ्रेंच राज्यक्रांती नंतर स्थापन झालेली लोकशाही व्यवस्था नष्ट करून नेपोलियनने फ्रान्स मध्ये स्वत:ची राजेशाही व्यवस्था स्थापन केली. मात्र, प्रशासनात मात्र नेपोलियनने क्रांतिकारी मुल्यांचा समावेश करून संपूर्ण व्यवस्था ही अधिक सुयोग्य आणि कुशल होईल अशा सुधारणा केल्या. नेपोलियनने सन १८०४ मध्ये फ्रेंच नागरी संहितेत (French Civil Code) सुधारणा केल्या ज्याला 'नेपोलियनची विधीसंहिता' (Napoleon Code) म्हणून ओळखले जाते. नेपोलियनच्या विधीसंहितेने जन्माच्या आधारे मिळणाऱ्या विशेषाधिकारांना नष्ट केले. म्हणजेच उमराव वर्ग आणि सर्वसामान्य यांच्यातील भेदभाव नष्ट केला. नेपोलियनने कायद्यासमोर सर्वांना समान वागणूक, समान न्याय आणि सर्वांना संपत्तीचा अधिकार मिळेल याची तरतूद केली. मुळात क्रांतिकारी मुल्यांवर आधारित असलेल्या नेपोलियन विधीसंहितेस फ्रान्स सोबतच फ्रान्सच्या आधिपत्याखालील प्रदेशात देखील लागू करण्यात आले. डच प्रजासत्ताक, स्वित्झर्लंड, इटली आणि जर्मनी मध्ये नेपोलियनने प्रशासनाची योग्य, सुटसुटीत आणि कार्यक्षम विभागणी लागू केली. नेपोलियनने या प्रदेशातील सामंतवादी व्यवस्था नष्ट करून शेतकऱ्यांना (सामंतांच्या शेतावर कसणाऱ्या कुळांना) भूदासत्वातून आणि सामंतशाही करातून मुक्ती

मिळवून दिली. शहरांमधील कारागिरांवर असणाऱ्या कारागिरांच्या श्रेणी अथवा संघाचे नियंत्रण काढून टाकले. दळण वळण आणि संपर्क साधनात खूप सुधारणा करण्यात आल्या.

नेपोलियनद्वारे केल्या गेलेल्या या सुधारणांमुळे शेतकरी, कारागीर, कामगार आणि नव उद्योजकांना मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्य मिळाले. उद्योगपती विशेषतः विविध प्रकारचे सामान बनवणारे लघुउद्योजक यांना वाटू लागले की एकच प्रकारचे कायदे, एकच वजन व मापे आणि एकच राष्ट्रीय चलन यांच्यामुळे एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात वस्तूंचे आणि भांडवलाचे आदान-प्रदान सोपे होऊन जाईल. नेपोलियनच्या या सुधारणांची माहिती युरोपात सर्वदूर पसरली होती. त्यामुळे युरोपमधील हॉलंड आणि स्वित्झर्लंड इत्यादी प्रदेशात आणि ब्रसेल्स, मेंज, मिलान आणि वार्सा इत्यादी शहरांमध्ये फ्रेंच सैन्याचे आणि शासनाचे स्वातंत्र्याची भेट देणाऱ्यांप्रमाणे स्वागत करण्यात आले. मात्र, हा सुरूवातीचा उत्साह फार काळ टिकला नाही. फ्रेंच वर्चस्वाखालील प्रदेशातील लोकांच्या हे लक्षात येऊ लागले की या नवीन प्रशासकीय सुधारणा काहीबाबतीत चांगल्या वाटत असल्या तरी राजकीय स्वातंत्र्यांवर मर्यादाच आणणाऱ्या होत्या. फ्रान्सचे इतर राष्ट्रांशी सतत होत असलेली युद्धे, त्यासाठी फ्रेंच वर्चस्वाखालील युरोपच्या इतर प्रदेशातून केली जाणारी सक्तीची सैन्य भरती, वाढता करांचा बोजा आणि अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर घातल्या जाणाऱ्या मर्यादा इत्यादी कारणांमुळे होणारे नुकसान लोकांना मोठे वाटू लागले. परिणामी, फ्रान्स पासून मुक्ती मिळवण्यासाठी तेथील जनता फ्रान्सच्या विरोधात गेली. मात्र, राजकीय स्वातंत्र्यचा मुद्दा अधोरेखित झाल्याने युरोपातील जनतेने आपल्या निरंकुश राजेशाही विरोधात वारंवार उठाव केले.'जनतेचे स्वातंत्र्य' हेच 'राष्ट्राचे स्वातंत्र्य' हा मुद्दा यानिमित्ताने महत्त्वपूर्ण बनला.

- **औद्योगिक क्रांती आणि नवीनवर्गांचा उदय :**

युरोपमधील उमराव (Nobility) वर्ग हा सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या जमिनीचा मालकी असलेला सर्वात शक्तिशाली वर्ग होता.संपूर्ण युरोपच्या उमराव वर्गातील सदस्य हे जवळपास एकाच पद्धतीचे उच्चकुलीन राहणीमान आणि जीवनशैली जोपासणारे होते. उमराव वर्गातील लोकांची मालमत्ता, वाडे हे ग्रामीण भागात आणि शहरात देखील असत. युरोपमधील हे सर्व राजे-राजवाडे, उमराव एकमेकांशी वैवाहिक संबधांमुळे जोडलेले होते. हा शक्तिशाली उमराव वर्ग संख्यात्मक दृष्ट्या अत्यंत छोटा समूह होता. युरोपच्या लोकसंख्येचा अधिकांश भाग हा शेतकऱ्यांचा होता. पश्चिम युरोपात अधिकांश जमीन ही खंडकरी कसत किंवा भाडेतत्त्वावर कसली जात असे. तर पूर्व आणि मध्य युरोपातील जमिनी या मोठ्या मोठ्या जहागिरीच्या स्वरुपात असत ज्यावर 'भुदास' राबत होते. युरोपात झालेल्या औद्योगिक क्रांतीनेही वर्ग रचना बदलून टाकली आणि त्याचा परिणाम राष्ट्रवादाचा उदय आणि प्रसार यांच्यावर झाला.

पश्चिम आणि मध्य युरोपच्या काही भागात औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादनात वाढ होऊन व्यापारात वृद्धी झाली. परिणामी, या भागात शहरांचा आणि बाजारपेठांचा विकास झाला. शहरांच्या आणि बाजारपेठांच्या विकासाबरोबर त्यावर अवलंबून असलेल्या व्यापारी, सावकार इत्यादींच्या वर्गाचा देखील उदय झाला. इंग्लंड मध्ये औद्योगिकीकरण अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात झाले. मात्र, फ्रान्स आणि जर्मनीच्या काही भागात हे औद्योगिकीकरण एकोणिसाव्या शतकात झाले. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेच्या परिणाम स्वरूप नवीन

सामाजिक वर्ग अस्तित्वात आले. औद्योगिक क्षेत्रात काम करणारा 'कामगार वर्ग' आणि जो उद्योजक, व्यापारी व सेवा पुरवणारे व्यावसायिक यांचा 'मध्यम वर्ग' असे दोन नवीन सामाजिक वर्ग अस्तित्वात आले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत मध्य आणि पूर्व युरोपात हे नवीन सामाजिक वर्ग संख्येने मर्यादित होते. मात्र, नंतर त्यांची संख्या वाढत गेली. उमराव वर्गाचे विशेषाधिकार नष्ट झाल्यानंतर सुशिक्षित आणि उदारमतवादी मध्यमवर्गातच राष्ट्रीय एकतेचा विचार लोकप्रिय झाला. युरोपात राष्ट्रवादाच्या विचाराने प्रेरित होऊन जी आंदोलने झाली त्यात मध्यमवर्गाचा मोठ्याप्रमाणात सहभाग होता आणि मध्यमवर्गानेच या आंदोलनांचे नेतृत्व केले.

- **उदारमतवादी राष्ट्रवाद :**

युरोपात एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीच्या दशकात राष्ट्रीय एकतेशी संबधित विचार हे उदारमतवादी विचारप्रणालीशी जोडलेले होते. "Liberalism' (लिबरलीजम) म्हणजे 'उदारमतवाद' हा शब्द "Liber' (लिबर) या मूळ लॅटिन शब्दापासून बनलेला आहे, ज्याचा अर्थ 'स्वातंत्र्य' असा होतो. युरोपात उदयाला आलेल्या मध्यमवर्गासाठी 'उदारमतवाद' म्हणजे 'व्यक्तीला मिळणारे स्वातंत्र्य' आणि 'कायद्यासमोर सर्वांना समान दर्जा' असा होता. राजकीयदृष्ट्या उदारमतवाद हा सर्व सहमतीच्या सरकारवर भर देत होता. म्हणजेच लोकांद्वारे निवडून आलेल्या सरकारचा आग्रह उदारमतवाद धरत असतो. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर उदारमतवाद हा निरंकुश शासकांचे आणि धर्मगुरूंचे विशेषाधिकार नष्ट करावेत व याबरोबरच घटनात्मक संसदीय प्रतिनिधित्व असलेले सरकार असावे अशी उदारमतवाद्यांची मागणी असायची. उच्च किंवा नीच कुळातील असा भेदभाव न करता उदारमतवाद्यांनी संपत्तीधारण करणाऱ्या सर्व प्रौढ पुरुषांना मताधिकार द्यावा अशी मागणी लावून धरली. उदारमतवाद्यांनी जरी संपत्तीविहीन पुरुष आणि स्त्रियांसहित सर्वांना मताधिकार म्हणजेच 'सार्वत्रिक मताधिकार' (Universal-dult Suffrage) पुरस्कार केला नसला, तरी उदारमतवाद्यांनी केलेल्या मताधिकाराच्या मागणीचा पुढचा टप्प्याच्या स्वरूपात क्रांतिवादींनी आणि स्त्रीवाद्यांनी पुढील काळात 'सार्वत्रिक मताधिकर' ची मागणी जोरदारपणे मांडली. 'व्यक्तीचे स्वातंत्र्य-अधिकार' हेच 'राष्ट्राचे स्वातंत्र्य' असा विचार उदारमतवादी विचारांद्वारे युरोप आणि जगभर पसरला, जो अंतिमत: अनेक देशांत आणि युरोपियन वसाहतींमध्ये राष्ट्रवादाच्या उदयास आणि प्रसारास कारणीभूत ठरला.

- **आर्थिक राष्ट्रवाद :**

इतिहासकार एरिक हॉब्सबॉम यांनी,'आर्थिक विकासाच्या आणि लोकांच्या आर्थिक हितसंबंधांच्या परीपेक्ष्यात राष्ट्रवादाला समजून घ्यायला हवे', असे मत मांडल्याचा उल्लेख याच घटकात आधी येऊन गेला आहे. उदारमतवादींनी बाजारपेठांना नियंत्रणापासून मुक्त करण्याची मागणी केली. वस्तू आणि भांडवल यांच्यावर राज्यव्यवस्थेचे नियंत्रण नष्ट करून त्यांचे आवागमन मोकळेपणाने व्हावे अशी भूमिका उदारमतवादींची होती. एकोणिसाव्या शतकात उदयाला आलेल्या मध्यमवर्गानेही मागणी जोरदारपणे केली. छोट्या छोट्या राज्यातून व्यापार करताना एकाच मालावर अनेक ठिकाणी जकात, सीमाशुल्क अथवा कर द्यावा लागे. त्यामुळे व्यापाऱ्यांचा नफा कमी होई आणि लोकांना वस्तू महागड्या किंमतीने खरेदी कराव्या लागत. एक प्रकारचे

चलन, वजन आणि मापे नसल्याने व्यवहार करताना विनाकारण जास्त वेळ खर्ची पडत असे. नव्याने उदयाला आलेला व्यापारी, दुकानदार यांच्या वर्गाला ही परिस्थिती आर्थिक व्यवहार, व्यापार आणि विकासाला खुंटीत करणारी वाटत होती. या वर्गामध्ये एकच कर, एकसारखीच वजन, मापे, चलन इत्यादी असलेल्या आणि लोक, वस्तू व भांडवलाचे अवरोधरहित आवागमन शक्य असलेल्या एकीकृत आर्थिक क्षेत्राची निर्मिती करण्याची मागणी जोर धरू लागली. एकीकृत आर्थिक क्षेत्राच्या मागणीच्या आणि आवश्यकतेच्या परिणाम स्वरूप इ.स. १८३४ मध्ये प्रशियाच्या पुढाकाराने पहिल्यांदा "Zollverein' (जॉलवेराईन) ची स्थापना झाली. जर्मनशब्द 'जॉलवेराईन' म्हणजे "Customs Union' (कस्टमसयुनियन) म्हणजेच 'सीमाशुल्क संघ' अथवा 'जकातसंघ' होय. प्रशियाने पुढाकार घेऊन जॉलवेराईन स्थापन केला. ज्यातील अधिकांश राज्ये ही जर्मन होती. जॉलवेराईनने विभिन्न कर प्रणाली असल्यामुळे येणाऱ्या अडचणींची सोडवणूक केली. जॉलवेराईन मध्ये सामील झालेल्या राज्यांमध्ये पूर्वी जवळपास तीस वेगवेगळ्या चलनव्यवस्था अस्तित्वात होत्या, त्यांची संख्या दोन केली गेली. त्यामुळे चलन विनिमयात सुसुत्रता आली. अशा प्रकारे एकीकृत आर्थिक क्षेत्राची गरज आणि उपयुक्तता सिद्ध झाली ज्याने राष्ट्रीय एकीकरणाला खतपाणी घातले. रेल्वेचे जाळे जसजसे विस्तारत गेले तसतसे मालाच्या आवागमनात, लोकांचे येण्या-जाण्यात गतिशीलता आली आणि त्यामुळे राष्ट्रीय एकीकरणास हातभार लागला. लोकांमध्ये उदयाला येत असलेल्या राष्ट्रवादी भावनेला आर्थिक राष्ट्रवादाच्या लाटेने आणखी मजबूत केले.

- **नवीन रूढीवादी प्रतिक्रिया :**

फ्रेंच राज्यक्रांती आणि नेपोलियनच्या राज्यविस्तारामुळे युरोपमधील जुन्या रूढीवादीशक्तींना मोठा हादरा बसला होता. फ्रेंच राज्यक्रांतीने प्रस्थापित समाज आणि राज्य व्यवस्था उलथून टाकली. त्यामुळे रूढीवादी शक्ती फ्रान्सच्या आणि क्रांतीच्या तत्वांचा युरोपात प्रसार करणाऱ्या नेपोलियनच्या विरोधात होत्या. "Conservative' (कॉन्जर्व्हेटीव्ह) म्हणजे 'रूढीवादी' ही एक विचारसरणी होती ज्यात परंपरा, रूढी, प्रस्थापित संस्था इत्यादींना महत्त्व दिले जाते. तातडीने केल्या जाणाऱ्या बदलांच्या ऐवजी क्रमाक्रमाने आणि हळूहळू होणाऱ्या बदलांना/ विकासाला रूढीवादी विचारसरणी प्राथमिकता देते.

इ.स. १८१५ च्या जून महिन्यात वॉटर्लूच्या लढाईत फ्रान्स विरुद्ध एकवटलेल्या ब्रिटन, रशिया, प्रशिया आणि ऑस्ट्रिया या युरोपीय शक्तींनी नेपोलियनचा पराभव करून त्याची सेंट हेलेना बेटावर विजनवासात रवानगी केली. इ. स. १८१५ मध्ये नेपोलियन युगाच्या समाप्तीनंतर युरोपातील बहुतांश सत्ता या रूढीवादी विचारसरणीच्या होत्या. रूढीवादी सत्ताधारीवर्ग मानत होता की, राज्याच्या आणि समाजाच्या प्रस्थापित पारंपारिक संस्था उदा. राज्यव्यवस्था (राजतंत्र), चर्च (धर्मसंस्था), सामाजिक उच्च-नीचतेची व्यवस्था (सामाजिक भेदभाव), संपत्तीचा अधिकार आणि कुटुंबाचे स्वरूप हे जसे होते तसेच राहायला हवेत. नेपोलियनद्वारे सुरु केल्या गेलेल्या बदलांच्या अनुभवातून युरोपातील रूढीवादी सत्ताधारींच्या लक्षात आले की, 'आधुनिकीकरण' हे पारंपारिक राजतंत्राला (निरंकुश राज्यसत्ता) आणखी मजबूत बनवू शकते. राज्यव्यवस्थेच्या शक्तीस अधिक कार्यक्षम आणि मजबूत बनवण्यासाठी 'आधुनिकीकरण' करण्याचा सपाटा युरोपातील रूढीवादी सत्ताधाऱ्यांनी सुरु केला. सैन्याचे,

नोकरशाहीचे, अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्यास सुरवात झाली. सामंतवाद आणि भुदासत्व समाप्त केल्यास जनतेचा पाठींबा मिळवून निरंकुश राजेशाही मजबुतीने टिकवून ठेवण्याचा प्रयत्न युरोपातील नव्या रूढीवादींनी केला.

इ. स. १८१५ मध्ये ब्रिटन, रशिया, प्रशिया आणि ऑस्ट्रिया सारख्या नेपोलियनला पराभूत करणाऱ्या युरोपियन शक्तींचे प्रतिनिधी युरोपचे भवितव्य निश्चित करण्यासाठी ऑस्ट्रियातील व्हिएन्ना येथील संमेलनात जमले. या संमेलनास 'Vienna Congress' (व्हिएन्ना काँग्रेस) म्हणजेच 'व्हिएन्ना परिषद' म्हणून ओळखले जाते. **ऑस्ट्रियाचा चॅन्सलर ड्युक मेटरनिक हा रूढीवादी नेता आणि मुत्सद्दी होता. मेटरनिकने व्हिएन्ना परिषद आयोजित करण्यात पुढाकार घेतला होता.** व्हिएन्ना परिषदेमध्ये सहभागी युरोपियन शक्तींमध्ये समझोता झाला ज्याला "Treaty of Vienna" (ट्रीटी ऑफ व्हिएन्ना) म्हणजेच 'व्हिएन्ना करार' म्हणून ओळखले जाते. व्हिएन्ना कराराद्वारे युरोपमधील रूढीवादी शक्तींनी नेपोलियनच्या काळात झालेले युरोपातील अनेक बदल नष्ट करण्याचा प्रयत्न केला. फ्रेंच राज्यक्रांती दरम्यान सत्तेतून दूर करण्यात आलेल्या बुर्बॉन घराण्याला पुन्हा फ्रान्सचे राजपद देण्यात आले. त्याचबरोबर नेपोलियनद्वारा फ्रान्सने जिंकलेला प्रदेश फ्रान्सकडून काढून घेण्यात आला. फ्रान्सद्वारे पुन्हा साम्राज्य विस्ताराचा प्रयत्न होऊ नये म्हणून फ्रान्सच्या सीमेवर काही नवी राज्ये निर्माण केली गेली. एकमेकांच्या हितसंबंधाना केंद्रस्थानी ठेऊन नवरूढीवादी शक्तींनी जिंकलेल्या भूभागाची वाटणी करून टाकली. नेपोलियनने नष्ट केलेल्या राजेशाहींना पुनर्प्रस्थापित करणे आणि संपूर्ण युरोपात नवरूढीवादी व्यवस्था प्रस्थापित करणे हे व्हिएन्ना परिषदेचे प्रमुख उद्देश होते. इ. स. १८१५ नंतर युरोपात स्थापन झालेल्या सत्ता या निरंकुश होत्या. आपली सत्ता टिकवण्यासाठी त्यांनी दमन तंत्राचा वापर केला. नव रूढीवादी निरंकुश सत्तांच्या विरोधात जनमत एकवटले गेले ज्याचा परिणाम क्रांतिकारी राष्ट्रवादाच्या वाढीच्या स्वरूपात झाला.

- **क्रांतिकारी राष्ट्रवाद आणि क्रांत्यांचे युग :**

इ. स. १८१५ नंतर स्थापित झालेल्या नव रूढीवादी सत्ता या कोणत्याही प्रकारची असहमती, विरोध अथवा टीका सहन करणाऱ्या नव्हत्या. सत्ता विरोधी असणाऱ्या सर्वप्रकारच्या हालचालींवर नजर ठेवणे आणि त्यांना पायबंद घालण्यासाठी दमन तंत्राचा वापर करण्यास या सत्ता मागेपुढे पाहत नसत. नवरूढीवादी निरंकुश सत्ताधाऱ्यांचे दमन जसे वाढत गेले तसे उदारवादी राष्ट्रवादाच्या प्रतिकाराचे स्वरूप देखील तीव्र होत गेले. इ. स. १८१५ नंतर निरंकुश सत्ताधाऱ्यांद्वारे होणाऱ्या दमनाचा रेटा जसा वाढत गेला, तसे उदारमतवादी-राष्ट्रवादी भूमिगत झाले. अनेक युरोपियन राज्यात क्रांतिकारींना प्रशिक्षण देण्यासाठी आणि विचारांचा प्रसार करण्यासाठी गुप्त संघटनांची स्थापना झाली. त्याकाळी व्हिएन्ना परिषदेनंतर स्थापना झालेल्या राजेशाही व्यवस्थांना विरोध करणे हीच 'क्रांतिकारी' असण्याचे लक्षण मानले जायचे. त्यासोबतच स्वातंत्र्य आणि मुक्ती मिळवण्यासठी प्रतिबद्ध होऊन संघर्ष करणे हे क्रांतिकारी होण्यासाठी आवश्यक होते. बहुतांश क्रांतिकारी राष्ट्र-राज्यांची स्थापना होण्यास स्वातंत्र्याच्या संघर्षाची पूर्वअट मानत होते. युरोपातील क्रांतिकारींनी अनेक भूमिगत अथवा गुप्त संघटनांची स्थापना केली. यंग इटली, यंग युरोप, कार्बोनारी इत्यादी गुप्त संघटनांमध्ये पोलंड, फ्रान्स, इटली आणि जर्मनी इत्यादी प्रदेशातील समविचारी युवक एकत्र येत असत. क्रांतीकारींच्या गतीविधींमुळे आणि त्यांनी केलेल्या विचारांच्या प्रसारामुळे राष्ट्रवादाचा प्रसार युरोपभर होत गेला.

रूढीवादी सरकारांनी दमनतंत्र जसं जसं वाढत नेले तस तसे बहुतांश युरोपात उदारमतवाद आणि राष्ट्रवाद यांना क्रांतीशी जोडून पहिले जाऊ लागले. इटली आणि जर्मनीचा प्रदेश, ऑटोमन साम्राज्यातील काही प्रदेश, आयर्लंड, पोलंड इत्यादी क्षेत्रात हा विचार बळावू लागला. सदर प्रदेशातील क्रांतींचे नेतृत्त्व उदारमतवादी-राष्ट्रवादी विचारांनी प्रेरित शिक्षित मध्यमवर्गीय लोकांमधील काही विशिष्ट लोकांनी केला. यामध्ये प्राध्यापक, शाळेतील शिक्षक, कारकून आणि व्यापारात गुंतलेले मध्यमवर्गीय लोक प्रामुख्याने सहभागी होते. परिणामी सन १८३० ते १८४८ या काळात युरोपात अनेक प्रदेशात क्रांती आणि क्रांतीचे प्रयत्न घडून आले म्हणून या काळाला 'क्रांत्यांचे युग' म्हणून ओळखले जाते.

पहिल्यांदा जुलै, १८३०मध्ये फ्रान्स मध्ये उठाव होऊन सन १८१५ मध्ये रूढीवादी शक्तींनी पुर्नस्थापित केलेली बुर्बॉन घराण्याची राजेशाही उलथून टाकण्यात आली. राजेशाही उलथून टाकणाऱ्या उदारमतवादी क्रांतिकारींनी घटनात्मक राजेशाहीची स्थापना करून लुई फिलीप याला फ्रान्सच्या राजपदावर बसवले. फ्रान्समधील या घडामोडींनी प्रेरणा घेऊन ऑगस्ट १८३० ते जुलै १८३१ याकाळात घडलेल्या घटनाक्रमाने ब्रुसेल्स मध्ये 'बेल्जियनक्रांती' झाली. युनायटेड किंगडम ऑफ नेदरलँड्स मधून दक्षिणेकडील भागवेगळा होऊन स्वतंत्र 'बेल्जियम' राष्ट्राची स्थापना झाली. सन १८२१ पासून ग्रीसच्या स्वातंत्र्यासाठी ऑटोमन साम्राज्याविरुद्ध चाललेल्या ग्रीक राष्ट्रवादींच्या संघर्षाला यश येऊन सन १८३१ मध्ये झालेल्या कॉन्स्टेटीनोपलच्या कराराने 'ग्रीस' ला 'स्वतंत्र राष्ट्र' म्हणून मान्यता मिळाली. ग्रीसच्या संघर्षाने संपूर्ण युरोपातील शिक्षित अभिजन वर्गात राष्ट्रीय भावनेचा मोठ्याप्रमाणात प्रसार झाला.

१८३० चे दशक हे युरोपसाठी मोठी संकटे घेऊन आले होते. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीच्या दशकात संपूर्ण युरोपच्या लोकसंख्येत मोठी वाढ झाली. उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संख्येपेक्षाही अधिकलोक कामाच्या शोधात भटकत होते. ग्रामीण भागातील लोक रोजगाराच्या शोधात शहरात येऊन झोपडपट्टी सारख्या भागात राहू लागले. शहरातील लघु उत्पादकांना औद्योगिकक्रांती झालेल्या इंग्लंडमधील उत्पादकांशी विषम पातळीवरील स्पर्धा करावी लागत होती. उमराव वर्ग अथवा सामंतांच्या ताब्यात असलेल्या प्रदेशात शेतकरी हे जमीनदारी कर आणि कामाच्या ओझ्याखाली दबलेले होते. अन्नधान्यांचे भाव वाढणे किंवा एखाद्या वर्षी पिकांचे नुकसान झाल्यास शहरे आणि गावांमध्ये व्यापक स्वरूपात दारिद्र्य फैलावत असे.

सन १८४८ मध्ये देखील अन्नधान्याची टंचाई आणि व्यापक स्वरूपात पसरलेली बेरोजगारीने त्रस्त झालेले लोक फ्रान्सची राजधानी असलेल्या पॅरीस शहरात रस्त्यावर आले. या लोकांनी रस्त्यावर ठीकठिकाणी अडथळे उभे करून सरकार विरुद्ध आंदोलन केले. सन १८४८ च्या या फ्रेंच क्रांतीमुळे फ्रान्सचा राजा लुई फिलीपला राजपदावरून पायउतार व्हावे लागले आणि फ्रान्समध्ये प्रजासत्ताक सरकारची स्थापना झाली. फ्रान्सच्या राष्ट्रीय सभेने प्रजासत्ताकाच्या घोषणेबरोबरच २१ वर्ष पेक्षा जास्त वय असणाऱ्या सर्व पुरुषांना मताधिकार आणि रोजगाराची गॅरंटी देण्यात आली. लोकांना रोजगार उपलब्ध करून देता यावा म्हणून राष्ट्रीय कारखान्यांची स्थापना करण्यात आली. सन १८४८ मध्ये फ्रान्समध्ये झालेल्या घटनांप्रमाणे युरोपात अनेक ठिकाणी उठाव झाले. एकीकडे दारिद्र्य, बेरोजगारी आणि भुकेने व्याकूळ शेतकरी-कामगार उठाव करत होते तेंव्हा त्याच्या समांतर

पातळीवर मध्यमवर्गीय लोक देखील क्रांती करत होते. युरोपातील त्या भागात जिथे अजून स्वतंत्र राष्ट्र-राज्य अस्तित्वात आले नव्हते तिथे म्हणजेच जर्मनी, इटली, पोलंड, ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्य इत्यादीमधील उदारमतवादी मध्यम वर्गातील स्त्री-पुरुषांनी घटनात्मक व्यवस्थेच्या मागणीला राष्ट्रीय एकीकरणाच्या मागणीशी जोडून दिले. जनतेमध्ये वाढत्या असंतोषाचा फायदा उचलून एका राष्ट्र-राज्याच्या मागणीवर जोर दिला. राष्ट्र-राज्य हे घटना/संविधान, वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य आणि संघटना उभारणीचे स्वातंत्र्य यासारख्या संसदीय सिद्धांतावर आधारलेले असावे असा उदारमतवादी विचार होता.

- **छपाई कलेचा विकास आणि राष्ट्राची अभिव्यक्ती :**

बहुतांश नव रूढीवादी निरंकुश सत्तांनी फ्रेंच राज्यक्रांतीच्या स्वातंत्र्य आणि मुक्तीच्या विचारांचा प्रसार करणाऱ्या वृत्तपत्रांवर, पुस्तकावर, नाटकांवर आणि गीतांवर सेन्सोरशीप लागू केली. सरकारी दमन सुरु असून देखील फ्रेंच राज्यक्रांतीचे विचार युरोपमधील उदारमतवादींना प्रेरणा देत राहिले. नव रूढीवादी व्यवस्थेच्या टीकाकार असलेल्या उदारवादी राष्ट्रवादींनी प्रेसच्या स्वातंत्र्याचा मुद्दा देखील उचलून धरला. युरोपात छपाई कलेचा विकास झाला होता आणि मोठ्या प्रमाणात वृत्तपत्रे, नियतकालिके, ग्रंथ, पत्रके छापणे आणि प्रसारित करणे सोपे झाले होते. ख्यातनाम इतिहासकार बेनेडीक्ट ॲन्डरसन यांनी आपल्या "Imagined Communities' (१९८३) (इमॅजीन्ड कम्युनिटीज) म्हणजे (१९८३) 'परिकल्पित समुदाय' या सुप्रसिद्ध ग्रंथात राष्ट्रवाद आणि छपाई कलेचा विकास यांसंबंधी मुलभूत मांडणी केली आहे. बेनेडीक्ट ॲन्डरसन यांच्या मते, छपाई कलेचा वापर करून प्रादेशिक/स्थानिक भाषेतून वृत्तपत्रे, नियतकालिके, ग्रंथ, पत्रके इत्यादी प्रकाशित होऊ लागल्याने राष्ट्रीय जागृतीस खतपाणी घातले गेले. व्यावसायिक पद्धतीने होणाऱ्या छपाई तंत्राने मानवी इतिहासात प्रथमच लोकांना असे माध्यम पुरवले की, ज्या आधारे स्वत: एकमेकांस कधीही प्रत्यक्षात न भेटलेले किंवा भेटणार नाहीत असे वाचक हे एकमेकांशी राष्ट्रीयत्वाच्या नात्याने जोडले गेले. छपाई तंत्राचा वापर करून मुख्यत: अगदी भिन्न-भिन्न प्रदेशातील लोकांना देखील एखाद्या घटनेचा अनुभव प्रामुख्याने वृत्तपत्रांच्या माध्यमातून पोहचत होता. वृत्तपत्रांच्या माध्यमातून मिळणारा घटनेचा अनुभव प्रत्यक्ष घटना कितीही दूर घटली असली तरी वाचकाला अनुभवता येत होती. घटनांबद्दल, त्यात भाग घेणाऱ्या अथवा संबधित व्यक्तींबद्दल वृत्तपत्रेही वाचकांना अवगत करत असत. सतत अशा घटनांविषयी, व्यक्तींविषयी वाचत असताना या बाबी वाचकाच्या सामाजिक अवकाशाचा भाग बनत आणि वाचक स्वत:ला घटनेशी संबधित समुदायाशी जोडून घेत असे. बेनेडीक्ट ॲन्डरसन आपण एकाद्या समुदायाचा भाग आहोत ही भावना प्रत्यक्ष एकमेकांस कधी ही न भेटलेल्या लोकांच्या मनात हळूहळू निर्माण झाली. एकाच समुदायाचा भाग असल्याची भावना राष्ट्रवादाच्या प्रसारामागील महत्त्वपूर्ण शक्ती होती आणि छपाई तंत्राचा मोठ्याप्रमाणात झालेला वापर हे त्यामागील महत्त्वपूर्ण कारण होते.

राष्ट्रवादाचा प्रसार फक्त युद्धे, वैचारिक चर्चा किंवा कुटनीती एवढ्यामुळेच झाला नाही. राष्ट्र म्हणून विचार निर्माण होण्यामागे सांस्कृतिक घटकांनी देखील महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. चित्रकला, मूर्तीकला, कविता, साहित्य, नाटक, कथा आणि संगीत इत्यादींनी राष्ट्रवादी भावनांना रुजविण्यात व अभिव्यक्त करण्यात महत्त्वाची भूमिका निभावली. एक सामुहिक ऐतिहासिक वारशाची जाणीव आणि एक सांस्कृतिक भूतकाळ असल्याची

भावना हेच राष्ट्राचा आधार बनतील अशी तत्कालीन राष्ट्रवादी विचारकांची भावना होती. जर्मन विचारवंत योहान गॉटफ्रीड यांच्या मते, राष्ट्राचा मूळ आत्मा हा लोकगीते, लोक साहित्य आणि लोकनृत्यात प्रकट होत असल्याने लोकसंस्कृतीच्या या रूपांना एकत्रित करणे आणि ठासवणे हे राष्ट्र निर्मितीच्या उद्देशपूर्तीसाठी अत्यंत आवश्यक आहे. लोकसंस्कृतीच्या माध्यमातून शिक्षित तसेच अशिक्षित जनतेपर्यंत आधुनिक राष्ट्राचा संदेश पोहोचवता येणे शक्य होते. भाषेने राष्ट्रवादाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. एक भाषीय म्हणून एकत्र येण्याची प्रक्रिया गतिमान होत असे. आपल्यावर  दुसरी एखादी परकीय भाषा लादली जात आहे म्हणून होणाऱ्या जनआक्रोशातून देखील राष्ट्रवादी भावनेच्या उदयाला हातभार लागला.

युरोपातील तत्कालीन चित्रकारांनी राष्ट्राला अभिव्यक्त करण्याकरिता स्त्रीच्या रूपकाचा वापर केला. राष्ट्राच्या मुळात अमूर्त असलेल्या विचाराला ठोस आधार देण्याच्या हेतूने विविध प्रतीकांचा आणि स्त्रीच्या रूपकांचा वापर केला. ज्याप्रमाणे स्वातंत्र्यपूर्व काळातील 'भारत माता' ही साखळदंडांनी जखडलेली दाखवली जात होती त्याप्रकारची राष्ट्राला प्रस्तुत करण्यासाठी स्त्रीच्या रूपकांचा वापर युरोपात करण्यात आला. फ्रेंच राज्यक्रांती दरम्यान स्वातंत्र्य, न्याय आणि प्रजासत्ताक या विचारांना स्त्री रुपात दाखवण्यात आले. उदा. डोळ्यावर पट्टी बांधलेली आणि हातात तराजू घेतलेल्या स्त्रीचे रूपक हे 'न्याय' या विचारला अभिव्यक्त करते. फ्रेंच प्रजासत्ताकाला अभिव्यक्त करण्यासाठी 'मेरीॲन' नावाने स्त्री रूपकाचा वापर करण्यात आला. अशा प्रकारे जर्मन राष्ट्राचे प्रतिक म्हणून 'जर्मेनिया', पोलंड राष्ट्राचे प्रतिक म्हणून 'पोलोनिया' अशा स्त्रीरुपकांचा वापर युरोपात राष्ट्रवादाचा प्रसार होत असताना केला गेला जो लोकांवर राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव पडण्यास सहाय्यभूत ठरला. उपरोक्तप्रमाणे चर्चिले गेलेल्या अनेक कारणांच्या आणि ऐतिहासिक प्रक्रियांच्या परिणाम स्वरूप एकोणिसाव्या शतकात युरोपात राष्ट्रवादाचा उदय आणि प्रसार झाला. राष्ट्रवादाच्या प्रसारामुळे काही राज्यांमध्ये ही निरंकुश राजेशाही कडून राष्ट्राच्या स्वरूपात  घटनात्मक प्रजासत्ताक व्यवस्थेकडे होणारे स्थित्यंतर झाले. तर काही राज्ये ही परकीय सत्तेपासून वेगळी होऊन स्वतंत्र राष्ट्र बनली. विविध राज्यात विभागलेले प्रदेशांचे एकीकरण होऊन इटली आणि जर्मनी ही राष्ट्र उदयाला आली.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) 'आधुनिकता' या  संकल्पनेचे महत्त्वाचे तत्व म्हणून मानली जाणारी मुल्ये कोणती आहेत?

(२) युरोपात पहिल्यांदा कोणती राष्ट्र-राज्ये उदयाला आली ?

(३) १९व्या शतकाच्या आरंभीच्या दशकात राष्ट्रीय एकतेशी संबधित विचार हे कोणत्या विचार प्रणालीशी जोडलेले होते ?

(४) कोणत्या विचारसरणीमध्ये परंपरा, रूढी, प्रस्थापित संस्था इत्यादींना महत्त्व दिले जाते?

(५) राष्ट्रवाद आणि छपाई कलेचा विकास यांसंबंधी मुलभूत मांडणी कोणी केली आहे ?

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) आधुनिक राष्ट्रवादाचा उदय हा अठराव्या शतकात .................... येथे झाला.

(२) फ्रेंच इतिहासकार ........................ याने सन १८८२ मध्ये 'राष्ट्र म्हणजे काय ?'या विषयावर व्याख्यान दिले.

(३) 'राष्ट्रवाद' ही एक ................... संकल्पना आहे यावर बहुतांश इतिहासकारांचे एकमत आहे.

(४) इतिहासात आधुनिक राष्ट्रवादाची पहिली अभिव्यक्ती ही सन १७८९ मधील.......................च्या स्वरूपात दिसून येते.

(५) नेपोलियनने फ्रेंच नागरी संहितेत सुधारणा केल्या ज्याला .........................म्हणून ओळखले जाते.

**२.२.२ इटली आणि जर्मनीचे एकीकरण :**

युरोपात राष्ट्रवादाच्या उदयाचा आणि प्रसाराच्या कारणांचा आढावा आपण घेतला. राष्ट्रवादाच्या प्रसारामुळे विविध छोट्या-छोट्या राज्यात विभागलेल्या किंवा परकीय सत्तेच्या वर्चस्वाखाली असलेल्या विशिष्ट भूप्रदेशातील समान भाषा, समान संस्कृती असलेल्या लोकांत राष्ट्रीय एकात्मतेची आणि राजकीय स्वातंत्र्याची भावना निर्माण झाली. आज आपण ज्या राष्ट्रांना इटली आणि जर्मनी म्हणून ओळखतो ती राष्ट्रे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अस्तित्वात आली. इटली आणि जर्मनी हे विविध छोट्या छोट्या राज्यांमध्ये विभागलेले होते. जनमताच्या रेट्यामुळे आणि राजकारणाच्या गरजेमुळे अनेक वर्षे चाललेल्या सततच्या संघर्षांनंतर छोट्या छोट्या राज्यांचे एकीकरण होऊन इटली आणि जर्मनी ही दोन राष्ट्रे उदयाला आली. इटली आणि जर्मनीचे एकीकरण ही जागतिक इतिहासातील अत्यंत दूरगामी परिणाम करणारी घटना होती. त्यामुळे इटली आणि जर्मनी यांच्या एकीकरणाची प्रक्रिया समजून घेण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत.

**(अ) इटलीचे एकीकरण :**

आज ज्या राष्ट्राला इटली म्हणून ओळखतो ते राष्ट्र अनेक शतकांपासून अनेक छोट्या छोट्या राज्यांच्या स्वरूपात विखुरलेले होते. काही प्रदेशावर हॉब्सबर्ग साम्राज्याचे शासन होते तर काही राज्यांवर वंशपरंपरेने शासन करणारी राजघराणी होती. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात इटली हे सात राज्यांमध्ये विभाजित होते. टस्कनी राज्य, मोडेना राज्य , पेपल राज्य, पर्माराज्य, सिसिली राज्य, नेपल्सराज्य, सार्डिनीया-पीडमॉऊंट ही ती सात राज्ये होती. यांपैकी फक्त सार्डिनीया-पीडमॉऊंट राज्यात एक इटालियन राजघराण्याचे शासन होते. बाकी राज्यांवर पोप, हॉब्सबर्ग घराणे आणि स्पॅनिश बुर्र बॉन घराण्याचीसत्ता होती. इटालियन भाषेत देखील अजून एकसारखेपणा नव्हता. इटालियन भाषेचे अनेक प्रादेशिक आणि स्थानिक स्वरूप अस्तित्वात होते.अनेक राज्यांचे अस्तित्व असल्याने इटलीच्या प्रदेशात ऐक्य निर्माण होऊ शकले नाही. ही राज्ये सतत एकमेकांशी संघर्ष करत राहिली. त्यामुळे इटालियन जनतेत राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली नव्हती. इटलीतील लहान

लहान राज्यांवर फ्रान्स, ऑस्ट्रिया, स्पेन, प्रशिया इत्यादी शक्तीशाली युरोपियन राज्यांचे वर्चस्व होते. आपले वर्चस्व आणि प्रभाव कायम राखण्यासाठी या शक्तींनी इटलीच्या एकीकरणास विरोध केला.

**● फ्रेंच राज्यक्रांती आणि इटालियन जनतेत एकीकरणाची भावना :**

सन १७८९ मध्ये झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीमधील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मुल्यांचा संपूर्ण युरोपात प्रसार झाला. यामूल्यांच्या प्रभावापासून इटलीचा प्रदेश देखील अलिप्त राहिला नाही. फ्रेंच राज्यक्रांतीची माहिती आणि मूल्यांच्या प्रसारामुळे इटालियन लोकांत एकीकरणाची भावना उत्पन्न झाली. नेपोलियनच्या नेतृत्वातील फ्रेंच सैन्याने इटलीतील छोट्या छोट्या राज्यांवर सत्ता स्थापित केली. नेपोलियनने इटलीमधील छोट्या छोट्या राज्यांचे उत्तर इटली, मध्य इटली आणि दक्षिण इटली असे तीन भौगोलिक भाग केले. उत्तर इटली आणि मध्य इटलीवर नेपोलियन ने आपले थेट नियंत्रण आणले आणि दक्षिण इटलीवर अप्रत्यक्ष नियंत्रण प्रस्थापित केले. उत्तर इटलीमध्ये आधी सन १८०२ मध्ये इटालियन प्रजासत्ताकची स्थापना करून नेपोलियन तेथील अध्यक्ष बनला आणि नंतर याच प्रजासत्ताकचे सन १८०५ मध्ये 'किंगडम ऑफ इटली' (इटलीचे राज्य) असे रुपांतर करून नेपोलियनने 'इटलीचे राजपद' देखील धारण केले. नेपोलियनच्या शासन काळात इटलीमध्ये नेपोलियनची संहिता लागू केली गेली. नेपोलियन संहिते अंतर्गत इटलीमधील सामंतवादी व्यवस्थेतील विशेषाधिकार नष्ट करण्यात आले, संपूर्ण इटलीमध्ये चालणाऱ्या अंतर्गत व्यापारावरील बंधने रद्द केली आणि कायद्यापुढे सर्वांना समानतेचे तत्त्व लागू केले. नेपोलियनच्या या सुधारणांमुळे इटालियन जनतेत राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागली. फ्रेंच राज्यक्रांतीच्या मूल्यांच्या आणि इटालियन राष्ट्रवादाच्या वाढीस या घटनाक्रमाद्वारे खतपाणी मिळाले.

**● व्हिएन्ना परिषद आणि इटलीची विभागणी :**

सन १८१५ मध्ये नेपोलियनचा पराभव केल्यानंतर युरोपचे भवितव्य ठरवण्यासाठी युरोपमधील जेत्या शक्तींची व्हिएन्ना येथे परिषद झाली. जेत्या शक्तींनी आपल्या आपल्या राज्यांचे हितसंबंध लक्षात घेऊन युरोपचे विभाजन केले. हे विभाजन करत असताना त्या त्या प्रदेशातील लोकांच्या इच्छा-आकांक्षा यांच्याकडे साफ दुर्लक्ष करून तेथील उदारमतवादी चळवळी दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. नेपोलियनद्वारे इटलीमध्ये घडवून आणलेल्या सुधारणा रद्द करण्यात आल्या. नेपोलियनने इटलीचे जे तीन गट केले होते त्यांचे देखील छोट्या छोट्या राज्यात विभाजन केले गेले आणि तेथे नवरूढीवादी राजघराण्यांची सत्ता स्थापन केली. व्हिएन्ना परिषदेने इटलीमधील व्हेनेशिया आणि लोंबार्डीचा प्रदेश ऑस्ट्रियास दिला. टस्किनी, ल्युका, मोडेना, पार्मा, इत्यादी ठिकाणी ऑस्ट्रियाच्या राजघराण्यातील म्हणजे हॉब्सबर्ग घराण्यातील व्यक्तींना राजपदावर बसवण्यात आले. रोममध्ये पोपच्यासत्तेची पुर्नस्थापना करण्यात आली. सिसिली आणि नेपल्स या राज्यात स्पॅनिशबुर्बॉन घराण्याला पुन्हा सत्तास्थानी आणण्यात आले. सॅव्हाय आणि पीडमॉऊंट-सार्डेनिया येथे व्हिक्टर इमॅन्युएल याला राजपदावर बसवण्यात आले. इटलीमधील उदारमतवादी चळवळी हरप्रकारे दडपून टाकण्याचा प्रयत्न ऑस्ट्रियाचा चॅन्सलर असलेल्या मेटरनिकने केला. इटलीतील नव रूढीवादी सत्ताधाऱ्यांनी उदारमतवादी आणि राष्ट्रवादी चळवळींना दडपून टाकण्यासाठी दमनाचे धोरण अवलंबिले. परिणामी, अन्याय, अत्याचारग्रस्त जनतेच्या मनात इटलीतील

नवरूढीवादी राजवटींच्या विरुद्ध असंतोष निर्माण झाला. इटलीच्या विविध राज्यातील अत्याचारी नवरूढीवादी राजवटींना प्रतिरोध करून इटालियन राष्ट्राची उभारणी करण्याच्या विचाराने इटलीच्या जनमानसात जोर धरला.

**● 'कोळसे जाळणाऱ्यांची' कार्बोनरी संघटना :**

मेटरनिक आणि युरोपातील नवरूढीवादी सत्ताधीशांच्या दडपशाही विरोधात युरोपातील जनतेच्या मनात असंतोष निर्माण झाला होता. इटलीतील राष्ट्रवादी जनता देखील यास अपवाद नव्हती. इटलीच्या दक्षिण भागातील नेपल्स राज्यात राष्ट्रवादी लोक एकत्रित आले आणि त्यांनी 'कार्बोनरी' नावाची संघटना स्थापन केली. 'कार्बोनरी' म्हणजे 'कोळसा जाळणारे' असे या संघटनेच्या सभासदांना टोपण नाव देण्यात आले होते म्हणून ही संघटना 'कार्बोनरी' म्हणजे 'कोळसा जाळणाऱ्यांची संघटना' म्हणून ओळखली जाते. सन१८०० ते १८३१ याकाळात कार्यरत असणारी कार्बोनरी संघटना ही सत्ताधाऱ्यांच्या दडपशाहीच्या धोरणामुळे गुप्तपणे काम करत असे. सदर संघटना ही उदारमतवादी विचारांच्या लोकांची होती ज्यातील बरेचजण हे राष्ट्रवादाने देखील प्रेरित होते.त्यांचा मुख्य उद्देश हा अनियंत्रित सत्तेला पराजित करून घटनात्मक सरकार स्थापन करण्याचा होता. उदारमतवादी आणि राष्ट्रवादी असून देखील कार्बोनरी संघटनेकडे आपल्या उद्देशाच्या पुर्ती करिता कोणताही स्पष्ट असा तात्कालिक राजकीय कार्यक्रम नव्हता. सन १८१५ नंतरच्या राजकीयदृष्ट्या दडपशाहीच्या वातावरणातील वाढत्या असंतोषावर विशेषत: दक्षिण इटलीमध्ये त्यांनी लक्ष केंद्रित केले होते. कार्बोनरी संघटनेच्या सदस्यांनी इटलीच्या एकीकरणाच्या चळवळीत भाग घेतला होता. सन १८२० ची अयशस्वी क्रांती आणि इटलीच्या राष्ट्रवादाच्या विकासात कार्बोनरी संघटनेच्या सभासदांची मोठी भूमिका होती. इटलीच्या एकीकरणात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या इटालियन क्रांतिकारी राष्ट्रवादी नेत्यांमधील जोसेफ मॅझिनी आणि जोसेफ गॅरिबाल्डी हे दोघे या कार्बोनरी संघटनेचे सभासद होते.

**● सन १८२० च्या नेपल्स आणि पीडमॉऊंट मधील अयशस्वी क्रांत्या :**

सन १८२० मध्ये युरोपातील इंग्लंड, स्पेन, पोर्तुगाल आणि रशिया या विविध देशातील जनतेने अनियंत्रित राजेशाही ऐवजी घटनात्मक राजेशाही स्थापित करण्यासाठी उठाव केला. त्याचवेळी ग्रीस मधील जनतेने ऑटोमन साम्राज्याविरोधात स्वातंत्र्य मिळवण्यासाठी उठाव केला. उदारमतवादी विचारांच्या विरोधातील दडपशाही धोरणा विरोधातील असंतोषातून झालेल्या सन १८२० च्या दशकातील विविध देशातील उदारमतवादी-राष्ट्रवादी जनतेने उठाव केले, याला '१८२० च्या क्रांत्या' असे म्हटले जाते. इटली मधील जनता देखील १८२० च्या क्रांत्यांपासून अलिप्त नव्हती.

**● स्पेनच्या उदारमतवादी :**

राष्ट्रवादी क्रांतिकारकांनी उठाव करून घटनात्मक राजेशाही प्रस्थापित केली. स्पेनमधील या घटनाक्रमापासून प्रेरणा घेऊन इटलीच्या काही भागात देखील उठाव झाले. इटलीच्या दक्षिण भागातील नेपल्स आणि उत्तर भागातील पीडमॉऊंट येथे हे उठाव झाले. नेपोलियनने इटलीवर कब्जा केल्यानंतर नेपल्समध्ये त्याने उदारमतवादी घटनात्मक राजेशाही प्रस्थापित केली होती. मात्र, नेपोलियनच्या पाडावानंतर आलेल्या राजसत्तेने उदारमतवादी घटनात्मक व्यवस्था रद्दबातल केली. राजाच्याया कृतीमुळे नेपल्सच्या जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष

निर्माण झाला.परिणामी १८२० मध्ये नेपल्स मध्ये उठाव झाला. जनतेच्या उठावाची तीव्रता लक्षात घेऊन राजाने उदारमतवादी घटनेस मंजुरी दिली.

नेपल्सच्या क्रांती पासून प्रेरणा घेऊन पीडमॉऊंटमध्ये देखील उठाव झाला. व्हिक्टर इमॅन्युअल हापीडमॉऊंट–सार्डेनियाचा राजा होता.पीडमॉऊंटच्या जनतेने उठावाद्वारे उदारमतवादी घटनात्मक व्यवस्थेची मागणी केली. उठावास जनतेचा असलेला पाठींबा पाहून त्याने आपल्या चुलतभावाकडे म्हणजे चार्ल्स अल्बर्टकडे सत्तेची सूत्रे देऊन राजत्याग केला. पीडमॉऊंट मध्ये घटनात्मक राजेशाही स्थापन करण्यात आली. इटलीच्या नेपल्स आणि पीडमॉऊंट या भागात झालेले या क्रांतिकारी घटना युरोपातील अनियंत्रित आणि नवरूढीवादी राजसत्तांच्या हितसंबधांना बाधा पोचविणाऱ्या होत्या. त्यामुळे ऑस्ट्रियाच्या चॅन्सलर असलेल्या मेटरनीकने युरोपातील राजसत्तांशी संधान साधून नेपल्स आणि पीडमॉऊंटमध्ये आपले सैन्य पाठविले. ऑस्ट्रियन सैन्याने नेपल्स आणि पीडमॉऊंटचा उठाव मोडून काढला. मेटरनीकच्या या कारवाईमुळे नेपल्स आणि पीडमॉऊंटमध्ये नव्याने प्रस्थापित झालेली घटनात्मक व्यवस्था नष्ट करून तेथे पुन्हा अनियंत्रित राजेशाही स्थापन करण्यात आली. अशा रीतीने इटलीमधील १८२०ची क्रांतीही अयशस्वी ठरली.

- **१८३० ची फ्रेंच राज्यक्रांती आणि इटली :**

सन १८३० मध्ये युरोपात क्रांतीकारी उठावांची एक लाट आली. सन १८३०च्या क्रांत्यांच्यामागे युरोपातील स्वच्छंदतावादी राष्ट्रवादाचा (Romantics Nationalism) प्रभावकारणीभूत होता. स्वच्छंदतावादी राष्ट्रवादानुसार, कोणत्याही राजघराण्याच्या किंवा राजकीय व्यवस्थेच्या आधारे एकता किंवा एकनिष्ठता निर्माण होत नाही. राष्ट्रीय एकता ही समान भाषा, समानवंश, समान राहणीमान, समान संस्कृती, समान धर्म आणि समान चालीरीती इत्यादींच्या आधारे निर्माण होते, असे स्वच्छंदतावादी राष्ट्रवाद्यांचे मत होते. सन १८३० च्या या क्रांतिकारी लाटेत नेदरलँड्स, फ्रान्स, पोलंड, इटली, पोर्तुगाल आणि स्वित्झर्लंड इत्यादी राष्ट्रांत क्रांतिकारी उठाव झाले. युनायटेड किंगडम ऑफ नेदरलँड्समध्ये क्रांती होऊन त्याचा भाग असलेला बेल्जियम स्वतंत्र झाला आणि स्वतंत्र किंगडम ऑफ बेल्जियमची स्थापना झाली. फ्रान्समध्ये नेपोलियनचा पाडाव झाल्यानंतर पुनर्स्थापित करण्यात आलेल्या पारंपारिक 'बुर्बॉन' राजघराण्यातील चार्ल्सला राजपदावर बसविण्यात आले होते. सन १८३० च्या क्रांतीद्वारे चार्ल्सला राजपदावरून दूर करून त्याच्या जागी 'बुर्बॉन' राजघराण्याची दुय्यम शाखेतील आणि चार्ल्सचा चुलत भाऊ तसेच ऑर्लिन्सचा ड्युक असलेल्या लुई फिलीप याला 'फ्रान्सचा राजा 'म्हणून घोषित करण्यात आले. पोलंडमध्ये देखील रशियाच्या वर्चस्वाविरुद्ध उठाव झाला. युरोपात घडणाऱ्या या १८३० च्या क्रांत्यांच्या लाटेपासून इटली देखील अलिप्त राहिला नाही. १८३० च्या फ्रेंच राज्यक्रांतीचे पडसाद इटलीमध्ये देखील उमटले. मोडेना, टस्किनी, पार्मा आणि रोम येथील लोकांनी तेथील नवरूढीवादी सत्तांच्या विरोधात उठाव केले. इटलीतील नवरूढीवादी राजवटींनी स्वत:च्या जनतेविरुद्ध ऑस्ट्रियन सैन्याचा वापर करून हे उठाव मोडून काढले. इटलीतील अनियंत्रित सत्ताधाऱ्यांनी ही क्रांती दडपून टाकण्यासाठी क्रांतीकारींना पकडून त्यांना मृत्युदंड दिला. अशाप्रकारे १८३० चे क्रांतिकारी उठाव इटलीतील नवरूढीवादी राज्यसत्तांनी दडपून टाकले तरी राष्ट्रवादी भावनेच्या प्रसाराला रोखण्यात त्यांना अपयश आले.

● **१८४८ ची क्रांती आणि इटली :**

सन १८४८ मध्ये युरोपातील अनेक देशात प्रजासत्ताक राजवटी प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने उठाव झाले. रशिया, स्पेन इत्यादी देश वगळता इतर सर्व देशात कमी-अधिक तीव्रतेचे उठाव झाले. सन १८४८ च्या क्रांत्यांची सुरवात ही इटलीच्या सिसिली या प्रदेशातील स्थानिक क्रांतीने झाली आणि क्रांतीचे लोण अतिशय वेगाने फ्रान्स, जर्मनी, इटली आणि ऑस्ट्रिया इत्यादी प्रदेशात पसरले. हे सर्व उठाव युरोपातील रूढीवादी राजतंत्रांविरोधात होते आणि जनतेचा त्यामध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग होता. फ्रान्सच्या जनतेने बुर्बॉन राजघराण्याच्या लुईफिलीपला राजपदावरून दूर करून नवीन राजघटना बनवून प्रजासत्ताकाची स्थापना केली. ऑस्ट्रियन साम्राज्यात देखील क्रांती होऊन ऑस्ट्रियाचा नवरूढीवादी चॅन्सलर असलेल्या मेटरनिक याला आपल्या पदाचा त्याग करून परागंदा व्हावे लागले. सन १८४८ च्या क्रांतीची सुरवात जरी इटलीच्या सिसिली मध्ये झाली असली तरी १८४८ च्या फ्रेंच राज्यक्रांती आणि १८४८ च्या ऑस्ट्रियन साम्राज्यातील क्रांतीद्वारे मेटरनिकचा पाडाव झाल्यानंतर इटलीमध्ये क्रांतीची तीव्रता वाढली. व्हेनेशिया आणि लोंबार्डी या ऑस्ट्रियन साम्राज्याच्या थेट वर्चस्वाखाली असलेल्या इटालियन प्रदेशात उठाव झाले. या प्रदेशातील जनतेने ऑस्ट्रियन वर्चस्वा विरोधात उठावात मोठ्या प्रमाणात भाग घेतला. उठावाचे क्रांतीमध्ये रुपांतर होऊन ऑस्ट्रियाचे वर्चस्व झुगारून देऊन प्रजासत्ताकाची स्थापना करण्यात आली. पीडमॉऊंट-सार्डेनियाचा राजा अल्बर्ट याने राष्ट्रवादी भूमिका घेऊन व्हेनेशिया आणि लोंबार्डी येथील उठावाला सहाय्य आणि समर्थन दिले होते. व्हेनेशिया आणि लोंबार्डी येथील क्रांतीचे लोण सिसिली, टस्कीनी, नेपल्स आणि पार्मा या इटालियन राज्यांत देखील पसरले. या राज्यातील जनतेने तेथील प्रस्थापित प्रतिगामी राजवटींच्या विरोधात उठाव केला आणि उदारमतवादी घटना मंजूर करून घेतल्या. इटलीमधील प्राचीन शहर असलेल्या रोममध्ये देखील जनतेने उठाव केला. इटलीच्या एकीकरणाचा समर्थक आणि प्रखर राष्ट्रवादी जोसेफ मॅझिनीयाने रोममधील उठावाचे नेतृत्व केले. रोममध्ये झालेल्या यशस्वी उठावानंतर तेथील पोपची सत्ता उलथून टाकून प्रजासत्ताकाची स्थापना करण्यात आली. रोममध्ये प्रजासत्ताक स्थापन करण्यात इटालियन राष्ट्रवादी जोसेफ गॅरिबाल्डी याची महत्त्वाची भूमिका होती. रोममध्ये स्थापन झालेले प्रजासत्ताक हे तिसऱ्या नेपोलियनने सैन्य पाठवून नष्ट केले व पोपच्या सत्तेची पुनर्स्थापना केली. इटलीमधील इतर ठिकाणी झालेले उठाव देखील प्रस्थापित सत्ताधाऱ्यांनी मोडून काढले.

● **इटलीच्या एकीकरणाच्या दिशेने :**

इटलीच्या विविध प्रदेशातील जनता विविध ठिकाणी वेगवेगळ्या काळात उठाव करत होती. प्रस्थापित प्रतिगामी सत्ता या आपापल्या राज्यातील उठाव स्वत:च्या सैन्याच्या आधारे दडपून टाकत असत. बऱ्याचवेळा जेंव्हा उठावकऱ्यांनी प्रस्थापित राजवटी उलथून टाकल्या त्यावेळी परकीय राजवटींनी आपले सैन्य पाठवून यशस्वी झालेली क्रांती मोडून काढली होती. मात्र, संपूर्ण इटली मधील जनता एकाच वेळी एकत्रित आणि संघटीतरित्या उठावात सामील झाली तरच जनतेच्या लोकशाहीसाठीच्या उठावास यश येईल ही बाब इटलीच्या विविध भागातील उदारवादी इटालियन राष्ट्रवाद्यांच्या लक्षात आली. इटलीच्या विविध राज्यात विभागलेल्या क्रांतिकारकांना उदारवादी लोकशाही व्यवस्था प्रस्थापित करायची असल्यास सर्व राज्यांतील क्रांतिकारकांनी

संघटीत होणे आवश्यक होते. विविध राज्यांतील क्रांतिकारी संघटीत झाले तरच प्रतिगामी राजवटी टिकवून ठेवण्यासाठी होणारे परकीय सत्तांचे लष्करी हस्तक्षेप उधळून लावता येतील ही बाब देखील स्पष्ट झाली होती. परिणामी, संघटीतपणे आणि परस्पर समन्वय साधत इटलीच्या एकीकरणासाठीचे प्रयत्न सुरु झाले. इटलीच्या एकीकरणाच्या लढ्यात अनेक क्रांतिकारकांनी महत्त्वाची भूमिका निभावली. त्यांच्यापैकी इटालियन एकीकरणाचा प्रणेता आणि प्रखर राष्ट्रवादी जोसेफ मॅझिनी, प्रखर राष्ट्रवादी योद्धा जोसेफ गॅरिबाल्डी, इटलीच्या एकीकरणाला प्रत्यक्षात साकारणारा मुत्सद्दी काऊंटकॅमिलो डी काव्हूर आणि ज्याच्या नेतृत्वाखाली इटलीचे एकीकरण घडून आले तो पीडमॉऊंट-सार्डेनियाचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय हे प्रमुख नेते होते.

**● जोसेफ मॅझिनी- वैचारिक आधाराचा रचनाकार :**

जोसेफ मॅझिनी हा अत्यंत प्रखर राष्ट्रवादी आणि तितकाच प्रखर उदारवादी नेता म्हणून ओळखला जातो.जोसेफ मॅझिनी इटालियन राष्ट्रवादी चळवळीचा आणि इटलीच्या एकीकरणाच्या चळवळीचा प्रणेता मानला जातो. इटालियन लोकांमध्ये राष्ट्रीय जागृती निर्माण करण्यात जोसेफ मॅझिनीचा मोठा वाटा होता. मॅझिनीने इटलीच्या एकीकरणाचा पाया रचला आणि इटालियन लोकांमध्ये देशभक्ती, कर्तव्य आणि त्यागाचे विचार रुजविले. प्रत्यक्षात तो स्वत: एक कवी, आदर्शवादी विचारवंत आणि राज्यक्रांतीचा उद्गाता होता. इटलीतील गरीब लोकांची स्थिती पाहून जोसेफ मॅझिनीला प्रचंड दुःख होई. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी जोसेफ मॅझिनीने प्रथम कर्बोनरी चळवळीत भाग घेतला. सन १८३० च्या उठावाच्या वेळी मॅझिनीला अटक करून तुरुंगात डांबण्यात आले. आपल्या तुरुंगवासाच्या काळात केलेल्या चिंतनानंतर कर्बोनरी संघटने पुढे कोणताही निश्चित कार्यक्रम नाही याची स्पष्ट जाणीव जोसेफ मॅझिनीला झाली. सन १८३१ मध्ये मॅक्झिनीला तुरुंगातून मुक्त करून हद्दपार करण्यात आले. इटलीतून झालेल्या हद्दपारीमुळे जोसेफ मॅझिनीने फ्रान्समध्ये आश्रय घेतला. फ्रान्समध्येच सन १८३१ मध्ये जोसेफ मॅझिनी याने 'यंग इटली' ही संघटना स्थापन केली. जोसेफ मॅझिनीच्या विचारांनी प्रेरित होऊन हजारो इटालियन तरुण 'यंग इटली' या संघटनेत सामील झाले. दोन वर्षातच 'यंग इटली' संघटनेची सभासद संख्या ६०,०००च्या वर गेली. 'देशावर आणि जनतेवर श्रद्धा' हे या संघटनेचे ब्रीद वाक्य होते. जोसेफ मॅझिनीने आत्तापर्यंत झालेल्या उठावांच्या अनुभवातून निश्चित केलेली उद्दिष्ट्ये 'यंग इटली' संघटनेसमोर अत्यंत स्पष्टपणे मांडली. स्वातंत्र्य, समता आणि लोककल्याणाच्या मुल्यांवर आधारलेले 'इटली' हे सुसंघटीत राष्ट्र निर्माण करणे हे 'यंग इटली' संघटने समोरील सर्वोच्च उद्दिष्ट होते. या सोबतच यंग इटली समोर पुढील उद्दिष्ट्ये होती जी इटलीच्या एकीकरणाला पूरक होती.

१. इटलीचे एकीकरण करण्यासाठी इटलीतील ऑस्ट्रियाचे वर्चस्व नष्ट करणे आवश्यक होते.

२. इटलीतील अनियंत्रित राजसत्ता संपुष्टात आणून इटलीमध्ये प्रजासत्ताकाची स्थापना करणे.

३. पोपच्या कारभारात सुधारणा घडवून आणणे.

४. परकीयांच्या मदतीशिवाय इटलीचे ही एकीकरण घडवून आणणे.

वरील उद्दिष्टे लक्षात घेऊन जोसेफ मॅझिनी आणि त्याच्या 'यंग इटली' संघटनेद्वारे इटालियन लोकांमध्ये

मोठ्या प्रमाणात जागृती होऊन राष्ट्रवादाची भावना वाढीस लागली. इटलीतील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचून त्यांच्यात क्रांतीचा विचार रुजवून राष्ट्रासाठी सर्वस्व त्याग करण्यासाठी तयार करण्याचे कार्य 'यंग इटली' आणि जोसेफ मॅझिनी यांनी केले.

सन १८४८ साली फ्रान्समध्ये झालेल्या क्रांतीचे पडसाद युरोपभर उमटले. ऑस्ट्रियामध्ये क्रांती होऊन अनियंत्रित राजवटीला हादरे बसले आणि तेथील चॅन्सलर मेटरनिक यास ऑस्ट्रियातून पलायन करावे लागले. ऑस्ट्रियाचा इटलीमध्ये मोठ्या प्रमाणात प्रभाव आणि हस्तक्षेप असल्यामुळे वरील घडामोडींचे परिणाम इटलीवर होणे साहजिक होते. सन १८४८ च्या क्रांती आणि इतर घडामोडींच्या पार्श्वभूमीवर इटली मधील लोंबार्डी, व्हेनेशिया आणि रोम येथे उठाव झाले. रोममधील उठावानंतर पोपच्या सत्तेचा पाडाव होऊन जोसेफ मॅझिनी याच्या नेतृत्वाखाली प्रजासत्ताकाची स्थापना झाली. सन १८४८ च्या या घडामोडीत जोसेफ मॅझिनी याला जोसेफ गॅरिबाल्डी याची साथ मिळाली. मात्र, इटली मधील सन १८४८ सालातील क्रांतीचे प्रयत्न अपयशी ठरले. फ्रान्सच्या तिसऱ्या नेपोलियनने फ्रेंच सैन्य पाठवून रोममधील प्रजासत्ताकाचा पाडाव केला आणि पोपची सत्ता पुन्हा बहाल केली. क्रांती अपयशी ठरल्यामुळे मॅझिनी आणि गॅरिबाल्डी यांना इटलीतून पलायन करावे लागले. जोसेफ मॅझिनीने सिसिलीमध्ये आश्रय घेतला आणि तेथील लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाचा आणि राष्ट्रवादी भावनेचा प्रसार केला.जोसेफ मॅझिनीच्या या कार्यामुळे सन १८६० साली सिसिलीमध्ये उठाव होऊन बुरबॉन घराण्यातील राजा फ्रान्सिस द्वितीय याचा पाडाव होऊन सिसिली स्वतंत्र झाला.

जोसेफ मॅझिनी हा प्रखर राष्ट्रवादी असण्यासोबतच प्रखर प्रजासत्ताकवादी होता. मात्र, इटलीतील राजकीय परिस्थिती ही पूर्ण प्रजासत्ताक व्यवस्था स्थापित होण्यासारखी नव्हती. परिणामी नंतरच्या काळात इटलीच्या एकीकरणाचे नेतृत्व काऊंट कॅमिलो डी काव्हूर या पीडमॉऊंट-सार्डेनियाच्या मुत्सद्दी पंतप्रधानाकडे गेले. जोसेफ मॅझिनीचा प्रत्यक्ष राजकीय प्रभाव कमी होऊन त्याला आपल्या उर्वरित आयुष्यातील मोठा काळ इटली बाहेर काढावा लागला. सन १८७२ साली इटलीमधील पिसा येथे फुफुसाच्या आजाराने जोसेफ मॅझिनीचा मृत्यू झाला. जरी इटलीच्या एकीकरणाच्या प्रक्रियेत जोसेफ मॅझिनी नंतरच्या काळात निष्प्रभ ठरला असला तरी पूर्वीच्या कार्यामुळे जोसेफ मॅझिनीने इटलीच्या एकीकरणाचा पाया रचला असे मानले जाते.

● **जोसेफ गॅरिबाल्डी- क्रांतिकारी नायक :**

इटलीच्या एकीकरणाच्या लढ्यातील योद्धा म्हणून जोसेफ गॅरिबाल्डी हा सुप्रसिद्ध आहे. जोसेफ गॅरिबाल्डीचे कुटुंब हे समुद्र किनारी प्रदेशातील व्यापारी वर्गाचे होते. परिणामी, नौकानयन आणि परदेश प्रवासाची संधी गॅरिबाल्डीला लवकरच लाभली. सन १८३२ मध्ये गॅरिबाल्डी हा व्यापारी जहाजाचा कॅप्टन म्हणून नियुक्त झाला. रशिया, डेन्मार्क अशा देशात प्रवास करताना जोसेफ मॅझिनीच्या 'यंग इटली' या गुप्त संघटनेतील सदस्यांशी गॅरिबाल्डीची ओळख झाली. सन १८३३ च्या नोव्हेंबर महिन्यात जीनेव्हा या शहरात जोसेफ मॅझिनी आणि जोसेफ गॅरिबाल्डी या दोन कट्टर इटालियन राष्ट्रवादींची भेट झाली. या काळातच जोसेफ गॅरिबाल्डी हा कार्बोनरी संघटनेचा सदस्य झाला. सन १८३४ च्या फेब्रुवारी महिन्यात पीडमॉऊंटमध्ये झालेल्या उठावात गॅरिबाल्डीने भाग घेतला. पीडमॉऊंट मध्ये झालेल्या उठावात भाग घेतल्याबद्दल गॅरिबाल्डीवर खटला

दाखल होऊन जिनीव्हा न्यायालयाने त्याला मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली. गॅरिबाल्डी फरार असल्यामुळे सुनावणीस हजर नव्हता आणि त्यामुळे मृत्युदंडाची शिक्षा त्याच्या गैरहजेरीमध्ये सुनावण्यात आली. पीडमॉऊंटचा उठाव अपयशी ठरल्यानंतर लगेचच गॅरिबाल्डी फ्रान्समध्ये पळून गेला. जोसेफ गॅरिबाल्डी फ्रान्समधून समुद्रमार्गे आफ्रिकेतील ट्युनिसला पोहचला. ट्युनिसमधून निघून समुद्रमार्गे दक्षिण अमेरिकेतील ब्राझील पर्यंतचा प्रवास जोसेफ गॅरिबाल्डी याने केला. ब्राझील देशामधील क्रांतिकारी राष्ट्रवादी संघर्षात भाग घेऊन गॅरिबाल्डीने महत्त्वाची भूमिका निभावली. ब्राझीलमधून उरुग्वे या देशात जाऊन तेथील गृहयुद्धात गॅरिबाल्डीने मोठे शौर्य गाजविले.

सन १८४८ मध्ये फ्रान्स मध्ये झालेल्या क्रांतीचे पडसाद संपूर्ण युरोपात उमटले. इटलीवर वर्चस्व गाजवणाऱ्या ऑस्ट्रियामध्ये उठाव होऊन मेटरनिकला पलायन करावे लागले. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर इटलीमध्ये ठिकठिकाणी उठाव झाले. याच काळात गॅरिबाल्डी हा जवळपास चौदा वर्षे अमेरिकेत राहून इटलीच्या एकीकरणाच्या उद्देशाने इटलीला परत आला आणि त्याने इटली मधील उठावात भाग घेतला. इटलीचे एकीकरण करण्याच्या उद्देशाने गॅरिबाल्डी याने क्रांतिकारी सैन्य उभे केले. गॅरिबाल्डीच्या या सैन्यातील सैनिक हे लाल रंगाचा सदरा (शर्ट) वापरत असत म्हणून गॅरिबाल्डीच्या या सैन्याला 'लाल डगलेवाल्यांचे सैन्य' म्हणून ओळखले जाते. गॅरिबाल्डी आणि त्याच्या लाल डगलेवाल्यांच्या सैन्याने उत्तर इटलीमधील लोंबार्डी आणि व्हेनेशिया या ठिकाणी झालेल्या उठावात भाग घेतला. ऑस्ट्रियन सैन्याने लोंबार्डी आणि व्हेनेशिया येथील उठाव मोडून काढल्यानंतर गॅरिबाल्डी आणि त्याच्या सैन्याने दक्षिणेला रोमच्या दिशेला आपला मोर्चा वळवला. जोसेफ मॅझिनीच्या नेतृत्वाखाली झालेल्या क्रांतीत गॅरिबाल्डीने भाग घेतला. रोम मधील पोपची सत्ता जाऊन जोसेफ मॅझिनीच्या नेतृत्त्वाखाली प्रजासत्ताक राज्याची स्थापना झाली. जोसेफ गॅरिबाल्डीला या प्रजासत्ताकच्या सैन्याचे सेनापती पद प्रदान करण्यात आले. जोसेफ मॅझिनीच्या नेतृत्त्वाखाली रोममधील प्रजासत्ताक राज्य अल्पजीवी ठरले. फ्रान्सच्या तिसऱ्या नेपोलियन याने फ्रेंच सैन्य पाठवून रोममधील प्रजासत्ताक नष्ट करून पोपच्या राज्याची पुनर्स्थापना केली. पोपची सत्ता पुन्हा प्रस्थापित झाल्याने आणि क्रांती अयशस्वी झाल्याने गॅरिबाल्डीला इटलीमधून पलायन करावे लागले. इटलीमध्ये घडलेल्या या अयशस्वी क्रांती संघर्षात गॅरिबाल्डीची पत्नी अनिता हिचा देखील मृत्यू झाला. आपल्या शौर्य, राष्ट्रभक्ती आणि त्यागामुळे जोसेफ गॅरिबाल्डी हा इटालियन राष्ट्रभक्तांचा आराध्य दैवत बनला.

इटलीतून पलायन केल्यानंतर जोसेफ गॅरिबाल्डीने अमेरिकेत आश्रय घेतला. व्यापाराच्या निमित्ताने गॅरिबाल्डीने जगभर नाविक सफरी केल्या. सन १८५४ मध्ये गॅरिबाल्डी इटलीस परत आला. फेलिक्स या आपल्या मृत भावाकडून मिळालेल्या संपत्तीच्या आधारे इटलीतील कॅप्रेराबेटाचा अर्धा भाग विकत घेऊन गॅरिबाल्डी तेथे शेती करू लागला. दरम्यानच्या काळात इटलीच्या एकीकरणाच्या चळवळीचे नेतृत्व जोसेफ मॅझिनीकडून काऊंट कॅमिलो डी काव्हूरकडे गेले. बलाढ्य परकीय सत्ता आणि इटलीतील राजकीय परिस्थिती पाहता पीडमॉऊंट-सार्डेनियाच्या राजेशाहीच्या नेतृत्त्वाखालीच इटलीचे एकीकरण होऊ शकते हे वास्तव लक्षात आल्याने जोसेफ गॅरिबाल्डीने काऊंट कॅमिलो डी काव्हूरचे नेतृत्त्व स्विकारले.

सन १८६० साली सिसिली बेटावर उठाव झाल्यानंतर गॅरिबाल्डीने आपल्यालाल डगलेवाल्यांच्या सैन्यासह जिनीव्हा येथून समुद्रमार्गे सिसिली गाठले आणि सिसिली बेट जिंकून घेतले. इटलीच्या मुख्य भूमीच्या दक्षिणेकडील सिसिली हे बेट जिंकल्यानंतर इटलीच्या मुख्य भूमीवरील नेपल्सचा प्रदेश देखील गॅरिबाल्डीच्या ताब्यात आला. जोसेफ मॅझिनी, काऊंट कॅमिलो डी काव्हूर आणि राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय यांचा गॅरिबाल्डीला पाठींबा होता. सिसिली बेट आणि नेपल्सचा भूभाग ताब्यात आल्यानंतर गॅरिबाल्डीने राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याच्या नावाने तेथील सत्ता हाती घेतली. इटलीच्या दक्षिणेकडील मुख्यभूमीचा काही भागावर वर्चस्व मिळवल्यानंतर गॅरिबाल्डीने पोपची सत्ता असलेल्या रोमवर आक्रमण करण्याचे ठरवून कूच केले. पोप हे पद जगभरातील कॅथलिक पंथीयांच्या धर्मप्रमुखाचे पद असल्याने पोपच्या राज्यावरील आक्रमणामुळे कॅथोलिक राष्ट्रे संतप्त होण्याची शक्यता होती. तसेच फ्रान्सचा सम्राट तिसरा नेपोलियन याने देखील पोपच्या राज्याला संरक्षण दिले असल्याने तो देखील नाराज होण्याची शक्यता होती. त्यामुळे काऊंट कॅमिलो डी काव्हूर याने गॅरिबाल्डी याला पोपच्या राज्यावरील आक्रमणाची योजना स्थगित करण्यास सांगितले. मात्र, गॅरिबाल्डीने त्यास नकार दिला आणि आपल्या सैन्याची रोमच्या दिशेने कूच सुरु ठेवली.या घटनाक्रमामुळे इटलीच्या एकीकरणासमोर मोठा राजकीय पेचप्रसंग निर्माण झाला. गॅरिबाल्डीने जर रोमवर हल्ला केला तर कॅथलिक राष्ट्रे संतप्त होऊन त्यांच्याकडून इटलीच्या एकीकरणास विरोध सुरु होणार होता. पोपच्या राज्यावरील हल्ल्यामुळे फ्रान्सचा सम्राट तिसरा नेपोलियन हा नाराज झाला असता. इटलीच्या एकीकरणाच्या विरोधी असलेल्या ऑस्ट्रियाशी युद्ध झाल्यास तिसरा नेपोलियन आणि फ्रान्सच्या मदतीची आवश्यकता भासणार आहे. असे काऊंट कॅमिलो डी काव्हूर याला वाटत होते. पोपच्या राज्यावर कब्जा झाल्यानंतर गॅरिबाल्डीच्या ताब्यात संपूर्ण दक्षिण इटलीचा प्रदेश येणार होता. तसे झाल्यास गॅरिबाल्डी स्वत:ला दक्षिण इटलीचा राजा घोषित करेल किंवा दक्षिण इटलीमध्ये प्रजासत्ताकाची स्थापना करेल, अशी भीती काव्हूर याला वाटत होती. त्यामुळे गॅरिबाल्डीचे पोपच्या राज्यावरील आक्रमण रोखण्याची आवश्यकता आहे असे काव्हूर याला वाटत होते. काऊंट कॅमिलो डी काव्हूर फ्रान्सच्या तिसऱ्या नेपोलियनकडून गुप्त मान्यता घेऊन पीडमॉऊंट-सार्डेनियाचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याच्या नेतृत्त्वाखाली पोपच्या राज्यावर सौम्य हल्ले करून त्याचे काही भाग जिंकून गॅरिबाल्डीचा मार्ग अडवण्याची योजना बनवली. सदर योजनेनुसार पीडमॉऊंट-सार्डेनियाचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय यांच्या नेतृत्वाखालील पीडमॉऊंट-सार्डेनियाच्या सैन्याने उम्ब्रिया आणि मार्चेज हे दोन पोपच्या राज्यातील प्रदेश जिंकून घेतले. यानंतर व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीयच्या सैन्याने गॅरिबाल्डीची पोपवरील स्वारी रोखण्याच्या दृष्टीने चाल केली. व्हिक्टर इमॅन्युएलचे आणि गॅरिबाल्डीचे सैन्य समोरासमोर आले. व्हिक्टर इमॅन्युएलच्या सैन्यातील अनेक सैनिक गॅरिबाल्डीला इटलीचा क्रांतिकारी नायक मानणारे होते. दोन्ही बाजूंना रक्तपात नको होता. त्यामुळे इटलीच्या एकीकरणाला प्राधान्य देत जोसेफ गॅरिबाल्डीने आपली फक्त पोप वरील स्वारी रद्द केली नाही तर आतापर्यंत जिंकलेला सिसिली आणि नेपल्ससहित दक्षिण इटलीचा सर्व प्रदेश पीडमॉऊंट-सार्डेनियाचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याला देऊ केला. यानंतर व्हिक्टर इमॅन्युएलने देऊ केलेले पारितोषिक आणि पद नाकारून जोसेफ गॅरिबाल्डी हा कॅप्रेरा बेटावर वास्तव्यास निघून गेला. कॅप्रेरा बेटावरील वास्तव्यात सन १८८२ मध्ये इटलीच्या एकीकरणाचा नायक जोसेफ गॅरिबाल्डी मरण पावला. जोसेफ मॅझिनी, काऊंट कॅमिलो डी काव्हूर

आणि व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय यांनी जरी इटलीच्या एकीकरणात महत्त्वाची भूमिका निभावली असली तरी आपले शौर्य, राष्ट्रप्रेम आणि सर्वस्वाचा केलेला त्याग यामुळे जोसेफ गॅरिबाल्डी हा जगभर प्रसिद्धीस पावला.

**● काऊंट कॅमिलो डी काव्हूर–वास्तववादी मुत्सद्दी :**

सन१८१० मध्ये एका उमराव घराण्यात जन्मास आलेला काऊंट कॅमिलो डी काव्हूर  हा इटलीचे एकीकरण प्रत्यक्षात साध्य करणारा मुत्सद्दी म्हणून ओळखला जातो. इटलीच्या जनमानसात वैचारिक जागृती करणारा म्हणून जोसेफ मॅझिनी आणि आपल्या शौर्याने इटलीच्या राष्ट्रभक्तांसाठी प्रेरणादायी ठरलेला जोसेफ गॅरिबाल्डी या दोहों इतकीच महत्त्वाची भूमिका काऊंट कॅमिलो डी काव्हूर याने इटलीच्या एकीकरण साकार करण्यात बजावली. लष्करी शिक्षण घेऊन लष्करात इंजिनियरच्या नोकरी पासून काव्हूर याने आपल्या कारकिर्दीची सुरवात केली. मात्र, मुळचा क्रांतिकारी विचारांचा असल्याने काव्हूर हा नोकरीत फार काळ रमला नाही. सन १८३१ मध्ये आपल्या लष्करातील नोकरीचा राजीनामा देऊन काव्हूरने इंग्लंड आणि फ्रान्सचे दौरे केले. इंग्लंड आणि फ्रान्सच्या वारंवार केलेल्या आपल्या दौऱ्यात काऊंट कॅमिलो डी काव्हूर याने या दोन्ही देशातील शासन पद्धतींचा अभ्यास केला. इंग्लडमधील संसदीय शासनपद्धतीचा काव्हूरवर मोठा प्रभाव पडला. छोट्या छोट्या राज्यात विभागलेल्या इटलीच्या प्रगतीसाठी इंग्लंडसारखी शासन पद्धती उपयोगी पडेल असे काव्हूरचे ठाम मत बनले होते.

सन १८४८ सालच्या फ्रान्समधील क्रांतीचे पडसाद इटलीमध्ये उमटून इटलीमध्ये ठिकठिकाणी उठाव झाले. इटलीमधील पीडमॉऊंट–सार्डेनिया राज्यातील जनतेने देखील उठाव करून तेथील राजाकडे उदारमतवादी घटनेची मागणी केली. उदारमतवादी घटनेच्या लोकमागणीस काऊंट कॅमिलो डीकाव्हूरचा पाठींबा होता. पीडमॉऊंट–सार्डेनियाच्या राजाने आपल्या जनतेची मागणी मान्य करून पीडमॉऊंट–सार्डेनियाच्या जनतेस उदारमतवादी घटना दिली. सदर घटनेनुसार प्रातिनिधिक सरकार स्थापन करण्याकरिता निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकीत काव्हूर हा निवडून आला. निवडणुकीनंतर सन १८५०मध्ये स्थापन झालेल्या प्रातिनिधिक सरकारच्या मंत्रिमंडळात काव्हूरला देखील स्थान मिळाले. आपल्या कुशल मुत्सद्देगिरी आणि कामाच्या जोरावर दोन वर्षातच काव्हूर हा पीडमॉऊंट–सार्डेनिया राज्याच्या पंतप्रधान पदावर विराजमान झाला.

काव्हूर हा राष्ट्रवादी विचारांचा होता. इटलीचे एकीकरण व्हावे आणि परकीय शक्तींच्या वर्चस्वातून इटली मुक्त व्हावा असे त्याला वाटत असे. मात्र, वास्तववादी दृष्टिकोनाचा असल्यामुळे राष्ट्रवादी भावनेच्या प्रवाहात वाहत जाण्याऐवजी परिस्थितीचे योग्य आकलन करून पाऊले टाकावीत असे काव्हूरचे मत होते. ऑस्ट्रिया साम्राज्य हे इटलीच्या एकीकरणातील सर्वात मोठा अडथळा आहे याचे भानकाव्हूरला होते. सर्वांगानी युरोपातील बलाढ्य साम्राज्य असणाऱ्या ऑस्ट्रियाचा पराभव करून त्याचा इटलीतील राजकारणातील हस्तक्षेप नष्ट करणे हे इटलीच्या एकीकरणासाठी आवश्यक होते. इटालियन राष्ट्रवादाचा प्रणेता जोसेफ मॅझिनी याला देखील ही बाब स्पष्टपणे लक्षात आली होती. आदर्शवादी कल्पना विश्वात रमणाऱ्या मॅझिनीला वाटत होते की निव्वळ जनतेच्या उठावाद्वारे ऑस्ट्रियाचे इटलीवरील वर्चस्व नष्ट करता येईल. इटालियन जनतेने देखील ऑस्ट्रियाच्या वर्चस्वा विरोधात वेळोवेळी उठाव केले. पण, हे सर्व उठाव सैन्यशक्तीच्या बळावर अल्पावधीत दडपून टाकण्यात

आले. त्यामुळे फक्त जनतेच्या उठावाद्वारे ऑस्ट्रियाचे वर्चस्व नष्ट करता येणार नाही याची काव्हूरला पक्की खात्री पटली होती. उदारमतवादी विचारांच्या पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याच्या नेतृत्त्वाखाली इटलीचे एकीकरण करून तेथे इंग्लंडप्रमाणे राजा नामधारी प्रमुख असलेली संसदीय लोकशाही व्यवस्था स्थापना करायला हवी असे काव्हूरला वाटत होते. इटलीचा एकीकरणाचा आणि ऑस्ट्रियापासून इटलीच्या स्वातंत्र्याचा लढा पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याच्या पुढाकाराने लढला जावा आणि आवश्यकता भासल्यास परकीय शक्तींची देखील या कामी मदत घेण्यात यावी असे काव्हूरचे स्पष्ट मत होते.

पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याचा पंतप्रधान झाल्यानंतर लगेचच आपल्या उद्दीष्ट्यांच्या पुर्ती करण्याच्या दृष्टीकोनाने काऊंट कॅमिलो डीकाव्हूर याने पाऊले उचलण्यास सुरवात केली. पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याच्या नेतृत्त्वात इटलीचे एकीकरण करायचे असल्यास पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याला सामर्थ्यशाली बनवणे आवश्यक होते. काव्हूरने उद्योगधंदे, कारखाने, व्यापार, आधुनिक शेती, चांगल्या प्रतीचे रस्ते, रेल्वेमार्गांचे जाळे, पाण्याचे कालवे इत्यादी पायाभूत गोष्टी पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्यात विकसित केल्या. परिणामी, लवकरच पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्य हे समृद्ध राज्य म्हणून ओळखले जाऊ लागले. पीडमॉऊंट-सार्डेनियामध्ये शैक्षणिक संस्था उभारून काव्हूरने शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात प्रसार केला. स्वत: लष्करी शिक्षण घेतलेल्या काव्हूरने पीडमॉऊंट-सार्डेनिया मध्ये लष्करी शिक्षणाचा प्रसार वाढवून पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याच्या लष्करात मोठी वाढ केली. राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय आणि पंतप्रधान काऊंट कॅमिलो डीकाव्हूर यांच्या नेतृत्त्वाखालील पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याच्या सर्वांगीण देदीप्यमान प्रगतीमुळे इटलीच्या एकीकरणाचे नेतृत्त्व आपोआप पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याकडे आले.

पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याला सामर्थ्यशाली बनवल्यानंतर काव्हूरने इटलीच्या एकीकरणाच्या दिशेने पाऊले टाकण्यास सुरवात केली. ऑस्ट्रिया हा इटलीच्या एकीकरणातील प्रमुख अडथळा असल्यामुळे ऑस्ट्रिया विरोधात फ्रान्स आणि इंग्लंड यांचे सहाय्य प्राप्त करणे आवश्यक आहे हे काव्हूर जाणून होता. फ्रान्स आणि इंग्लंड यांच्या पैकी फ्रान्सची मदत इटलीच्या एकीकरणास प्राप्त होईल याची काव्हूरला खात्री होती. फ्रान्सचे ऑस्ट्रियाशी पूर्वीपासूनच शत्रुत्व होते. त्याच बरोबर फ्रान्सच्या तिसऱ्या नेपोलियनला आपले आसन बळकट करण्यासाठी आक्रमक परराष्ट्र धोरण राबविण्याची आवश्यकता होती. त्यामुळे काव्हूरने इटलीच्या एकीकरणासाठी फ्रान्सची मदत मिळावी या दृष्टीने प्रयत्न करण्यास सुरवात केली. क्रिमियन युद्धाच्या निमित्ताने फ्रान्स आणि इंग्लंडची इटलीच्या एकीकरणासाठी सहानभूती मिळवण्याची संधी काव्हूरला लवकरच प्राप्त झाली. सन १८५३ मध्ये तुर्कस्थान आणि रशिया यांच्यात युद्ध सुरु झाले ज्याला क्रिमियन युद्ध म्हणून ओळखले जाते. या युद्धात फ्रान्स आणि इंग्लंड यांनी तुर्कस्थानच्या बाजूने युद्धात भाग घेतला. काव्हूरच्या पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याचा या युद्धाच्या कारणांशी काही संबंध नसताना देखील काव्हूरच्या धोरणानुसार पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याने फ्रान्स आणि इंग्लंडच्या बाजूने क्रिमियन युद्धात भाग घेतला. क्रिमियन युद्धात तुर्कस्थान, इंग्लंड, फ्रान्स आणि पीडमॉऊंट-सार्डेनिया यांना जय मिळाला. सन १८५६ साली युद्धात सहभागी झालेल्या राष्ट्रात फ्रान्सच्या पॅरीस शहरात वाटाघाटी झाल्या. वाटाघाटीनंतर पॅरीसचा तह होऊन शांतता स्थापित झाली. क्रिमियन युद्धातील पीडमॉऊंट-सार्डेनियाच्या सहभागामुळे पॅरीसमधील वाटाघाटीसाठी काव्हुरला निमंत्रित करण्यात आले होते.

शांततेसाठी पॅरीस येथे भरलेल्या परिषदेत काव्हूरने इटलीच्या एकीकरणाची बाजू युरोपातील बलाढ्य राष्ट्रांसमोर मांडली. काव्हूरच्या मुत्सद्दीपणामुळे फ्रान्स आणि इंग्लंड या राष्ट्रांना इटलीच्या एकीकरणाबद्दल सहानभूती वाटू लागली.

क्रिमियन युद्धाच्या समाप्ती आणि पॅरीस परिषदेनंतर काव्हूरने फ्रान्सच्या तिसऱ्या नेपोलियनशी मैत्री संबंध वाढवत नेऊन संबंध आणखी घनिष्ठ केले. सन १८५८ मध्ये फ्रान्समधील प्लॉबिअर्स येथे काव्हूर आणि तिसरा नेपोलियन यांच्यात वाटाघाटी होऊन फ्रान्स आणि पीडमॉऊंट-सार्डेनिया यांच्यात ऑस्ट्रियाशीयुद्ध आणि इटलीचे एकीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून एक गुप्त करार अस्तित्वात आला जो प्लॉबिअर्सचा तह म्हणून ओळखला जातो. या तहानुसार ऑस्ट्रियाला पीडमॉऊंट-सार्डेनिया विरोधात युद्ध पुकारण्यासाठी उचकावण्यात यावे, ऑस्ट्रियाने पीडमॉऊंट-सार्डेनिया विरुद्ध युद्ध सुरु करताच फ्रान्सने पीडमॉऊंट-सार्डेनियाच्या बाजूने ऑस्ट्रियाच्या विरोधात युद्धात सामील व्हावे, ऑस्ट्रिया विरुद्धच्या युद्धाद्वारे पीडमॉऊंट-सार्डेनिया आणि फ्रान्स हे मिळून ऑस्ट्रियाला लोंबार्डी आणि व्हेनेशियाया राज्यातून हुसकावून लावतील आणि लोंबार्डी आणि व्हेनेशिया ही राज्ये पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्यात समाविष्ट करण्यात येतील. ऑस्ट्रिया विरुद्धच्या या युद्धातील मदतीच्या बदल्यात सॅव्हॉय आणि नाईस हे फ्रेंच बहुभाषिक असलेले प्रदेश फ्रान्सला देण्यात यावे असे ठरले.

प्लॉबिअर्सचा तह अस्तित्वात आल्यानंतर काव्हूरने लगेचच पीडमॉऊंट-सार्डेनियाचे लष्करी सामर्थ्य वाढवण्यास सुरवात केली. ऑस्ट्रियाने पीडमॉऊंच्या वाढत्या लष्करीकरणास हरकत घेतली तरी देखील काव्हूरने लष्करीकरण सुरूच ठेवले. परिणामी, ऑस्ट्रियाने पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याविरुद्ध युद्धाची घोषणा केली. ऑस्ट्रियाने पीडमॉऊंट-सार्डेनिया विरोधात युद्ध पुकारताच पीडमॉऊंट-सार्डेनियाच्या बाजूने फ्रान्स युद्धात सामील झाला. सदर युद्धातील अनेक लढायांमध्ये ऑस्ट्रियाचा मोठा पराभव झाला. लोंबार्डीच्या प्रदेशावर पीडमॉऊंट-सार्डेनियाचे वर्चस्व स्थापन झाले आणि व्हेनेशिया देखील जिंकण्याच्या टप्प्यात आला होता. तथापि, सन १८५९ साली तिसऱ्या नेपोलियन याने अचानकपणे युद्धबंदीची घोषणा करून ऑस्ट्रियाशी शांततेचा तह केला. तिसऱ्या नेपोलियनच्या या निर्णयामुळे पीडमॉऊंट-सार्डेनियाला देखील युद्धबंदीची घोषणा करावी लागली. सदर युद्धाद्वारे पीडमॉऊंट-सार्डेनियाला फक्त लोंबार्डीचा प्रदेश आपल्या राज्याला जोडता आला आणि व्हेनेशियाचा प्रदेश ऑस्ट्रियाच्या वर्चस्वाखालीच राहिला.

ऑस्ट्रियाशी युद्ध सुरु असतानाच्या काळात मोडेना, पार्मा आणि टस्कनी राज्यातील जनतेने उठाव करून तेथील रूढीवादी राजेशाह्या उलथून टाकल्या होत्या. ऑस्ट्रिया आणि फ्रान्समध्ये शांतता करार झाल्यानंतर या राज्यातील जनतेने पुन्हा राजेशाही स्थापन करण्यास नकार दिला. सदर राज्यातील जनतेला काव्हूरने गुप्तपणे सहाय्य आणि पाठींबा दिला होता. पुढे जोसेफ गॅरिबाल्डी याच्या नेतृत्त्वाखाली दक्षिण इटलीमधून क्रांतीची सुरवात झाल्यावर काव्हूरने त्याला देखील गुप्तपणे पाठींबा दिला. जोसेफ गॅरिबाल्डीने स्वत: जिंकलेला नेपल्स आणि सिसिलीचा प्रदेश पीडमॉऊंट-सार्डेनियाचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय यास देऊ केला. अशा प्रकारे काव्हूरने आपल्या मुत्सद्दीगिरीद्वारे इटलीच्या एकीकरणात महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. सन १८६१ मध्ये मलेरियामुळे काऊंट कॅमिलो डी काव्हूर याचा मृत्यू झाला.

● **राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय–इटलीच्या एकीकरणाचे प्रतीक :**

व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय हा सन १८४९ ते १८६१ या काळात पीडमॉऊंट–सार्डेनियाचा राजा होता. तो उदारमतवादी विचारांचा असून धोरणी राज्यकर्ता–प्रशासक होता. ऑस्ट्रियाला इटलीतून हद्दपार करून पीडमॉऊंट–सार्डेनिया राज्याच्या नेतृत्त्वात इटलीचे एकीकरण घडवून आणण्याच्या काव्हूरच्या धोरणाला व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याने संपूर्ण पाठींबा दिला. पीडमॉऊंट–सार्डेनियाचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याच्याच नेतृत्त्वाखाली सन १८६१ साली इटलीचे एकीकरण होऊन एकीकृत प्रदेशाला 'इटलीचे राज्य' (Kingdomof Italy) म्हणून घोषित करण्यात आले. व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याला 'इटलीचा राजा' (King of Italy) म्हणून घोषित करण्यात आले.

सन १८६६ मध्ये प्रशिया आणि ऑस्ट्रिया यांच्यातील युद्धामुळे बदलेल्या राजकीय परिस्थितीचा फायदा घेऊन व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याने ऑस्ट्रिया विरुद्ध युद्ध घोषित केले. ऑस्ट्रिया–प्रशिया युद्ध आणि युद्धोपरांत तहामुळे व्हेनेशियाचा प्रांत इटलीच्या राज्याला जोडण्यात आला. व्हेनेशियाचा प्रदेश इटलीच्या राज्याला जोडल्यानंतर फक्त फ्रान्सचा पाठींबा असलेले पोपचे राज्य हे शिल्लक होते.सन १८७० मध्ये फ्रान्स विरुद्ध प्रशिया असे युद्ध सुरु झाले. या युद्धात फ्रान्सचा मोठा पराभव होऊन फ्रान्सचा सम्राट नेपोलियन तिसरा याला राजपदाचा त्याग करून निर्वासित व्हावे लागले. फ्रान्समध्ये राजेशाही संपून प्रजासत्ताक अस्तित्वात आले. दरम्यानच्या काळात पोपच्या राज्याच्या संरक्षणासाठी ठेवलेले फ्रेंच सैन्य काढून घेण्यात आले होते. परिणामी, फ्रान्सचा इटली मधील राजकारणावरचा प्रभाव आणि हस्तक्षेप कमी झाला होता. हीच संधी साधून व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याने पोपशी वाटाघाटी आणि सैन्यबळाचा उपयोग करून पोपचे राज्य इटलीच्या राज्याला जोडले आणि इटलीचे एकीकरण परिपूर्ण केले.

सन १८७० मध्ये रोम मध्ये प्रवेश करून पुढील वर्षी म्हणजे १८७१ साली रोम शहराला इटलीची नवी राजधानी म्हणून घोषित केले. सन १८७८ मध्ये रोम शहरात इटलीच्या राज्याचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याचा मृत्यू झाला. इटलीच्या एकीकरणात व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याने व्यक्तीश: तर महत्त्वाची भूमिका निभावलीच पण इटलीच्या एकीकरणासाठी प्रतिकात्मकरित्या देखील उपयुक्त ठरला.

**(ब) जर्मनीचे एकीकरण :**

सन १८०६ मध्ये फ्रेंच सम्राट नेपोलियन बोनापार्ट याने 'पवित्र रोमन राज्यसंघ' नष्ट करून ऱ्हाईन नदीजवळील प्रदेशांचा वेगळा राज्यसंघ तयार केला. परिणामी, ऱ्हाईन नदी जवळील प्रदेशातील जर्मन भाषिक लोकांमध्ये एकतेची भावना वाढीस लागली. युरोपातील जर्मन भाषिकांची एकता हीच जर्मनी या राष्ट्राच्या एकीकरणाचा मूलाधार होती.

● **व्हिएन्ना काँग्रेस आणि जर्मन राज्यसंघ:**

सन १८१५ मध्ये नेपोलियन बोनापार्टचा पराभव झाल्यानंतर त्याच्या राज्यसंघाचे देखील पतन झाले. सन १८१५ साली युरोपची पुनर्रचना करण्यासाठी फ्रान्स विरोधातील युद्धात विजय मिळवणारे युरोपीय देश युरोपचे

भवितव्य ठरवण्यासाठी व्हिएन्ना येथे जमले. व्हिएन्ना काँग्रेस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या परिषदेत जर्मन भाषिक जनतेची राष्ट्रीय भावना विचारात घेऊन एक संघटित जर्मन राष्ट्र बनवावे असे जनतेस अपेक्षित होते. मात्र, व्हिएन्ना परिषदेने एक सुसंघटीत जर्मन राष्ट्र बनवण्याऐवजी ऑस्ट्रियाच्या नियंत्रणाखाली राहतील अशी ३९ छोटी-मोठी जर्मनराज्ये बनवली. सदर ३९ जर्मन राज्ये ही ऑस्ट्रियाच्या प्रभावाखाली एका राज्यसंघात राहतील अशी व्यवस्था केली. ऑस्ट्रिया, ब्रिटन आणि युद्धात पराजित झालेल्या फ्रान्स यांनी गुप्तपणे समझोता करून या योजनेस व्हिएन्ना परिषदेत मान्यता मिळवली. सदर योजनेमागे जर्मन राज्यांतील प्रशिया या सामर्थ्यशाली राज्याच्या मध्य-युरोपात वाढत्या प्रभावाला चाप बसवण्याचा ऑस्ट्रिया, ब्रिटन आणि फ्रान्स या शक्तींचा हेतू होता.

संपूर्ण जर्मन राज्यसंघाचे म्हणून एक कार्यकारी मंडळ तयार करण्यात आले. एक भाषा, एक राज्यसंघ, एक कार्यकारी मंडळ असले तरी प्रत्येक राज्य स्वतंत्र होते. प्रत्येक राज्याचा शासक हा आपल्या मर्जीप्रमाणे वागू शकत होता. परिणामी, जर्मन राज्यकर्त्यांच्या मनात जर्मनीच्या एकीकरणाची भावना रुजणे कठीण होते.

- **विद्यार्थ्यांचे आंदोलन व जर्मन एकीकरणाची घोषणा :**

संपूर्ण युरोपात उदारमतवाद आणि राष्ट्रवादाचे वारे वाहत असताना जर्मन भाषिक प्रदेशात त्याचे पडसाद उमटणे स्वाभाविक होते. नेपोलियनचा पराभव केल्यानंतर जर्मन राज्यांमध्ये उदारमतवादी लोकशाहीची स्थापना होण्याऐवजी रूढीवादी अनियंत्रित राजेशाहीलाच पुनर्प्रस्थापित करण्यात आले. जर्मन राज्यांतील विचारवंत आणि विद्यार्थी हे उदारमतवादी लोकशाहीचे समर्थक आणि रूढीवादी अनियंत्रित राजेशाहीचे विरोधक होते. ऑस्ट्रियाचा पंतप्रधान मेटरनिकच्या मुत्सद्दीगिरीतून अस्तित्वात आलेल्या रूढीवादी अनियंत्रित राजेशाही असलेल्या जर्मन राज्यसंघाची उभारणी झाली होती. ऑस्ट्रियाच्या नियंत्रणात राहतील अशा ३९ जर्मन राज्यांचा राज्यसंघ स्थापन झाल्याने जर्मनीतील विचारवंत आणि विद्यार्थी यांच्यामध्ये असंतोष निर्माण झाला. ऑस्ट्रियाचे जर्मन राज्यांवरील प्रभाव कमी करून रूढीवादी अनियंत्रित राजेशाही उलथून टाकणे त्यांना आवश्यक वाटत होते. विस्कळीत आणि दुर्बळ जर्मन राज्यसंघाऐवजी सर्व जर्मन राज्यांचे एकीकरण करून सामर्थ्यशाली जर्मन राष्ट्र अस्तिवात यावे अशाप्रकारची राष्ट्रीय भावना विद्यार्थ्यांमध्ये वाढीस लागली होती. सदर परिस्थितीमध्ये जर्मनीतल्या विद्यार्थ्यांनी जर्मन राष्ट्र अस्तित्वात यावे या उद्देशाने सर्व जर्मन राज्यांत चळवळ उभी केली. विद्यार्थी हा जर्मन समाजामधील महत्त्वाचा आणि प्रभावशाली घटक होता. जेना विद्यापीठातील विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी जर्मनीच्या एकीकरणाचा समस्येचा सर्वांगाने विचार करून करून जर्मन समाजासमोर उच्च विचार, चरित्रसंपन्नता आणि जर्मनीचे एकीकरण हे ध्येय ठेवावेत असे जाहीर आवाहन केले. परिणामी, जेना विद्यापीठ हे जर्मनीच्या एकीकरण चळवळीचे प्रमुख केंद्र बनले. जर्मनीच्या सर्व विद्यापीठातील उदारमतवादी आणि राष्ट्रवादी विचारांनी प्रेरित विद्यार्थ्यांनी १२ जून १८१५ रोजी जेना शहरात बर्शेनशॅफ्ट (Burschenschaft) ही विद्यार्थी संघटना स्थापन केली. जर्मन राष्ट्रासाठीची राष्ट्रीय भावना वाढीस लावणे आणि स्वातंत्र्य, नागरी अधिकार आणि लोकशाहीसाठी प्रयत्न करणे ही बर्शेनशॅफ्ट संघटनेची मुख्य उद्दिष्ट्ये होती. बर्शेनशॅफ्ट संघटनेचे विद्यार्थी हे जर्मनीच्या एकीकरणाच्या चळवळीत भारावून जाऊन सहभागी होत आणि वेगवेगळ्या कृती-

कार्यक्रमांचे आयोजन करत असत. जर्मनीच्या धर्मसुधारणा चळवळमधील नेता मार्टिन ल्युथर यांची जयंती साजरी करण्याचा निर्णय वारबर्ग येथील बर्शेनशॅफ्ट या संघटनेच्या विद्यार्थ्यांनी घेतला. सन १८१७ मध्ये वारबर्ग येथील विद्यापीठात मार्टिन ल्युथर यांची जयंती साजरी करण्यात येऊन त्या निमित्ताने झालेल्या सभेत जर्मनीच्या एकीकरणाचे समर्थन करणारे विचार मांडण्यात आले. सदर घटनाक्रमाच्या परिणाम स्वरूप जर्मनीच्या एकीकरणासाठीचे जनसमर्थन मोठ्या प्रमाणात वाढले. क्रांतिकारी चळवळींचा आरंभ झाला आणि दहशतवादी घटनांचे प्रमाण वाढले.

● **कार्लसबाड डिक्रीज प्रकरण – विद्यार्थी, विचारवंत आणि पत्रकारितेविरुद्ध दडपशाही :**

क्रांतिकारी चळवळींना आणि दहशतवादी घटनांना तोंड फुटल्यामुळे जर्मन राज्यसंघातील प्रस्थापित राजेशाह्या आणि त्यातील उमराव वर्ग अस्वस्थ झाला आणि या चळवळी दडपण्याचा प्रयत्न करू लागला. प्रस्थापित राजेशाह्या, त्यांचा उमराव वर्ग आणि ऑस्ट्रियाचा मुत्सद्दी पंतप्रधान मेटरनिक हे विद्यार्थी आणि मध्यमवर्गाचे समर्थन लाभत असलेल्या जर्मनीच्या एकीकरणाच्या चळवळी दडपण्यासाठी निमित्त शोधत होते. मार्च १८१९ मध्ये ऑगस्ट वॉन कोट झेब्बू नावाच्या जर्मन नाटककार-पत्रकाराचा कार्ललुडविग सँड या जर्मन राष्ट्रवादी विद्यार्थ्याने खून केला. नवरूढीवादी अनियंत्रित राजसत्तांनी ऑगस्ट वॉन कोट झेब्बू खून प्रकरण हे उदारमतवादी-राष्ट्रवादी विचारवंत आणि विद्यार्थी यांच्या विरोधात दडपशाही धोरण राबवण्यासाठी निमित्त म्हणून वापरले.  सन १८१९ च्या ऑगस्ट महिन्यात मेटरनिकने जर्मन राज्यसंघाच्या प्रतिनिधींची परिषद बोहेमिया प्रांतातील कार्लसबड येथे आयोजित केली. सदर परिषदेत क्रांतिकारी चळवळी आणि दहशतवादी कृत्यांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने चर्चा होऊन जर्मनीच्या एकीकरणासाठी वाढत्या राष्ट्रवादी भावनेला दडपण्यासाठी कायदे संमत करण्यात आले. या कायद्यांना कार्लस बाडडिक्रीज म्हणून ओळखले जाते. 'कार्लसबडडिक्रीज' द्वारे विद्यापीठांची स्वायत्ता नष्ट करण्यात येऊन त्यावर राज्यसत्तांच्या अधिकाऱ्यांचे नियंत्रण स्थापित करण्यात आले. विद्यापीठातील प्राध्यापकांच्या भाषण स्वातंत्र्यावर गदा आणण्यात आली. उदारमतवादी-राष्ट्रवादी विचारांच्या प्राध्यापकांना पदावरून हटविण्यात आले. बर्शेनशॅफ्ट या विद्यार्थी संघटनेवर आणि त्यांच्या हालचालींवर बंदी घालण्यात आली आणि ही संघटना मोडून काढण्यासाठीचे शक्य ते सर्व प्रयत्न करण्यात आले. पत्रकार आणि पत्रकारीतेवर बंधने घालण्यात आली. वृत्तपत्रे आणि नियतकालिके यांच्यात छापल्या जाणाऱ्या मजकुरावर करडी नजर ठेवून त्यावर सेन्सॉरशीप लादण्यात आली. पोलीस आणि गुप्त पहारे यांच्या सहाय्याने दडपशाही राबवून उदारमतवादी आणि राष्ट्रवादी विचारांना दडपून टाकण्याचा प्रयत्न संपूर्ण जर्मन राज्य संघात सुरु झाला. पुढची काही दशके ही दडपशाही अशाच पद्धतीने सुरु राहिली आणि त्यामुळे उदारमतवादी-राष्ट्रवादी राजकीय हालचाली पूर्णपणे थांबल्या. मात्र, जर्मन राष्ट्रभावनेला थोपविण्यात नवरूढीवादी राज्यसत्तांना यश आले नाही. सन १८३० मध्ये फ्रान्समध्ये झालेल्या क्रांतिकारी उठावाच्या परिणाम स्वरूप जर्मन राज्य संघात उठावाचा झालेला प्रयत्न मेटरनिकने मोडून काढला. तरी देखील युरोपमधील उदारमतवादी-राष्ट्रवादी क्रांत्यांचे पडसाद जर्मनीत उमटत राहिले. जर्मन विचारवंत, लेखक, कवी इत्यादींनी आपल्या लिखाणातून जर्मन जनतेच्या मनात राष्ट्रीय भावना तेवत ठेवली. इमॅन्यूअलकान्ट, जॉनहेरडेर, जॉनफित्शे, जॉनगटे इत्यादी जर्मन विचारवंताच्या उदारमतवादी-राष्ट्रवादाचा प्रभाव जर्मनीमधील मध्यम वर्ग आणि विद्यार्थ्यांवर पडत होता.

● **जर्मनीच्या एकीकरणाचा पहिली पायरी – जकात संघ (Custom Union) ते जॉल्वेरीन (Zollverein):**

जर्मन राज्यसंघातील ३९ राज्ये ही स्वतंत्र आणि सार्वभौम असल्यामुळे प्रत्येक राज्याची स्वत:ची जकात व्यवस्था, जकातीचे दर आणि जकाती विषयक कायदे होते. परिणामी, व्यापार विषयक आर्थिक व्यवहारात प्रचंड अडचणी निर्माण होत होत्या. प्रत्येक राज्यासाठी स्वतंत्र कर द्यावा लागत असल्याने व्यापारी वर्गावर अतिरिक्त भार पडत असे आणि मालाचे दर देखील वाढत असत. व्यापारात जकातीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी चोरटी आयात-निर्यात वाढीस लागली आणि त्यामुळे राज्यसत्तेच्या महसूलामध्ये घट होऊन नुकसान होऊ लागले. जकात व्यवस्थेतील सुधारणांच्या आभावी जर्मनीतील अंतर्गत आणि बहिर्गत व्यापार खूपच मागासलेला राहिला होता.

जर्मन राज्यसंघातील एक मोठे राज्य असलेल्या प्रशियामध्ये तर राज्यांतर्गत अनेक भागात वेगवेगळी जकात व्यवस्था होती. अशा परिस्थितीमुळे चोरटी आयात-निर्यात मोठ्या प्रमाणात होत असल्याने प्रशियाचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचे प्रशियातील राज्यसत्तेच्या लक्षात आले. प्रशियाच्या महसुलाच्या उत्पन्नाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी सन १८१८ साली प्रशियाने आपल्या संपूर्ण राज्यात अंतर्गत व्यापारासाठी एकच जकात व्यवस्था लागू केली. तसेच आयात आणि निर्यात यांच्यावरील निर्बंध कमी करून अंतर्गत आणि बहिर्गत व्यापाराला प्रोत्साहन दिले.सदर उपाय योजनांमुळे प्रशियाच्या अर्थव्यवस्थेला चांगलीच गती मिळून प्रशियाची भरभराट झाली. इतर अनेक जर्मन राज्यांनी देखील प्रशियाचे अनुकरण करून अशाच प्रकारच्या सुधारणा स्वत:च्या राज्यात केल्या. खुल्या व्यापाराचे तत्त्व स्वीकारून आणि जकात व्यवस्थेत सुधारणा करून संपूर्ण जर्मन राज्य संघासाठी एकच जकात व्यवस्था उभारूनच जर्मन राज्य संघाची आर्थिक प्रगती साध्य होऊ शकते असा विचार मूळ धरू लागला. जर्मनीतील व्यापारी आणि मध्यमवर्ग यांना देखील संपूर्ण जर्मन राज्य संघात एकच जकात व्यवस्था असावी असे वाटत होते. परिणामी, प्रशियाच्या पुढाकाराने जर्मन राज्य संघातील उत्तरेकडील भागातील राज्यांचा एक जकात संघ (Custom Union) स्थापन केला. प्रशियाप्रणित उत्तरेतील जर्मन राज्यांचा जकात संघ स्थापन झाल्यानंतर सन १८२८ मध्ये बव्हेरियाच्या पुढाकाराने दक्षिणेतील राज्यांचा जकात संघ स्थापन झाला. त्याचवर्षी सॅक्सनीच्या पुढाकाराने मध्य जर्मनीतील राज्यांचा जकात संघ स्थापन झाला. पुढे सन १८३३ मध्ये प्रशिया प्रणित जकात संघ, बव्हेरिया प्रणित जकात संघ आणि सॅक्सनी प्रणित जकात संघ यांना एकत्रित करून जर्मन जकात संघ स्थापन करण्याचा करार झाला. जर्मन जकात संघाला जर्मन भाषेत जॉल्वेरीन (Zollverein) म्हणून ओळखले जाते. सन १८३३ मध्ये जॉल्वेरीन करार होऊन पुढच्या वर्षी म्हणजे १८३४ मध्ये जॉल्वेरीन म्हणजेच जर्मन जकात संघ प्रत्यक्ष अस्तित्त्वात आले. पुढच्या काळात अनेक जर्मन राज्ये ही जॉल्वेरीन मध्ये सहभागी होत गेली. जॉल्वेरीन ही १९ व्या शतकाच्या मध्यात जर्मनीच्या आर्थिक एकीकरणाच्या दृष्टीकोनातून सर्वात महत्त्वाची संस्था ठरली. त्याकाळात जर्मन राज्य संघात झालेला प्रादेशिक विकास आणि भरभराट यामध्ये जॉल्वेरीनचा मोठावाटा आहे. जर्मनीच्या राजकीय एकीकरणासाठी आवश्यक असणारी मानसिकता निर्माण करण्यात देखील जॉल्वेरीनचा काही अंशी प्रभाव पडला असे मानले जाते.

जॉल्वेरीन (Zollverein) मध्ये जर्मन राज्यसंघातील बलाढ्य राज्य ऑस्ट्रिया हे सहभागी झाले नव्हते

किंवा ऑस्ट्रियाला सहभागी करून घेण्याचा कोणताही प्रयत्न प्रशिया कडून केला गेला नाही. परिणामी, जॉल्वेरीनद्वारे प्रशियाचा जर्मन राज्यसंघावरील प्रभाव वाढत गेला आणि ऑस्ट्रिया हा जर्मन राज्यसंघापासून दुरावत गेला.

● **१८४८ ची क्रांतीचे पडसाद – फ्रँकफुर्ट पार्लमेंट :**

सन १८४८ साली फ्रान्स मध्ये झालेल्या क्रांतीचे पडसाद युरोपात सर्वत्र उमटले होते. ऑस्ट्रियामध्ये जनतेने तेथील पंतप्रधान मेटरनिक विरोधात उठाव केला आणि मेटरनिकला ऑस्ट्रियातून पलायन करावे लागले. युरोपातील या घडामोडींचा प्रभाव जर्मनीमध्ये पडणे साहजिक होते. जर्मन राज्य संघातील अनेक राज्यात उठाव झाले. मार्च १८४८ मध्ये प्रशियामध्ये झालेल्या उठावाच्या परिणाम स्वरूप प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याने आपल्या जनतेस उदारमतवादी घटना देण्याचे मान्य करून जर्मनीच्या एकीकरणासाठी प्रयत्न करण्याचे वचन दिले. जर्मनीच्या एकीकरणावर विचार करण्यासाठी जर्मन लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधींची सभा म्हणजेच पार्लमेंट स्थापन करण्यात आली. जर्मन लोकांच्या या प्रतिनिधी सभेला 'जर्मन नॅशनल असेंब्ली' म्हणून ओळखले जाते. 'जर्मन नॅशनल असेंब्ली' मध्ये कायदेतज्ञ, न्यायाधीश, वकील, धर्मोपदेशक आणि मध्यम वर्गातील इतर उदारमतवादी घटकांचा समावेश होता.

जर्मन नॅशनल असेंब्लीची बैठक सन १८४८ च्या मे महिन्यात जर्मनीतील फ्रँकफुर्ट शहरात आयोजित करण्यात आली, याला फ्रँकफुर्ट पार्लमेंट म्हणून देखील ओळखले जाते. सदर बैठकीत जर्मन जनतेच्या प्रतिनिधींमध्ये चर्चा होऊन सर्व जर्मन राज्यांचे मिळून एक जर्मन संघराज्य बनविण्यात यावे आणि या संघराज्यात मर्यादित लोकशाही व्यवस्था स्थापन केली जावी असा ठराव मांडला. या प्रक्रीयेद्वारे जर्मनीचे एकीकरण होऊन मर्यादित लोकशाही व्यवस्था स्थापन होणार होती. हे ध्येय साध्य करण्यासाठी ऑस्ट्रिया आणि प्रशिया या बलाढ्य राज्यांकडे सनदशीर मार्गाने विनंती-अर्ज करून जर्मनीचे एकीकरण घडवून आणावे असे ठरले. जर्मन नॅशनल असेंब्लीमध्ये विविध विचारांचे प्रतिनिधी होते. त्यामधील जहाल लोकशाहीवादी प्रतिनिधींना उपरोक्त ठराव अत्यंत सौम्य स्वरूपाचा वाटल्याने त्यांनी पार्लमेंटमध्ये गोंधळ माजवून कामकाज बंद पाडण्याचा प्रयत्न केला. अशांतता निर्माण होण्याचा धोका लक्षात घेऊन प्रशियाच्या लष्कराने ही बंडाळी मोडून काढली. त्यानंतर पार्लमेंटने जर्मन नागरिकांच्या हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. सोबतच जर्मनसंघराज्य निर्माण करून त्याचे सम्राटपद हे प्रशियाच्या राजा कडे देण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला. **जेंव्हा प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याच्या समोर हा प्रस्ताव मांडण्यात आला.** जर्मन राज्यसंघातील दुसरे बलाढ्य राज्य ऑस्ट्रियाशी वितुष्ट येण्याची शक्यता असल्याने प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याने जर्मन संघराज्याच्या सम्राट पदाचा स्वीकार करण्यास नकार दिला. राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याला राजा पेक्षा कमी दर्जाच्या असलेल्या पार्लमेंटकडून दिले जाणारे 'सम्राट पद' स्वीकारणे कमीपणाचे वाटत होते. प्रशियाच्या राजाने दिलेल्या नकारानंतर इतर जर्मन राज्यांनी फ्रँकफुर्ट पार्लमेंटच्या ठरावांना विरोध केला. परिणामी, सन १८४९ च्या जून महिन्यात पार्लमेंट बरखास्त करण्यात आली. फ्रँकफुर्ट पार्लमेंट हा जर्मन राज्यांतील उदारमतवादी-राष्ट्रवादी विचारांच्या लोकांद्वारे जर्मनीचे एकीकरण करून तेथे इंग्लंडप्रमाणे मर्यादित अधिकार असलेल्या सम्राट पदाच्या

अंतर्गत लोकशाही व्यवस्था आणण्याचा एक प्रयत्न होता. हा प्रयत्न पूर्णपणे अयशस्वी झाला. जर्मन राज्यसंघातील राजघराणी, उमराव वर्ग आणि लष्करी अधिकारी यांनी आपल्या विशेषाधिकारांचे रक्षण करण्यासाठी हा प्रयत्न जाणीवपूर्वक हाणून पडला. मात्र, जर्मनीच्या एकीकरणाचा मुद्दा हा पार्लमेंटच्या ठरावाच्या निमित्ताने ठळकपणाने पुढे येऊन जर्मन राज्य संघातील राज्यकर्त्या वर्गाला याबाबत ठोस उपाययोजना करणे आवश्यक बनले.

**● एरफुर्ट अधिवेशन आणि प्रशिया प्रणित जर्मन राज्यसंघ :**

प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याने फ्रँकफुर्ट पार्लमेंटच्या ठरवांना नाकारले असले तरी जर्मनीच्या एकीकरणास त्याचा विरोध नव्हता. इतकेच नव्हे तर प्रशियाच्या नेतृत्त्वाखाली जर्मनीचे एकीकरण साकार व्हावे असे त्याला वाटत होते. प्रशियाच्या नेतृत्त्वाखाली जर्मनीचे एकीकरण प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीकोनातून विचार विनिमय करण्यासाठी सन १८५० च्या मार्च महिन्यात जर्मनीतील एरफुर्ट शहरात अधिवेशन बोलाविले ज्याला एरफुर्ट अधिवेशन म्हणून ओळखले जाते. ऑस्ट्रियाला जर्मन राज्यसंघातून हाकलून लावून प्रशियाच्या नेतृत्त्वाखाली बळकट जर्मन राज्यसंघाची म्हणजेच प्रशिया प्रणित जर्मन राज्यसंघाची (CloserGerman Union under PurssianLeadership) स्थापना करण्यात यावी अशी कल्पना प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याने एरफुर्ट अधिवेशनात मांडली. मात्र, इतर काही बलाढ्य जर्मन राज्यांनी आणि ऑस्ट्रियाने अशा प्रकारच्या राज्य संघाच्या स्थापनेस कडाडून विरोध केल्यामुळे अल्पकाळातच हे अधिवेशन बारगळले.

**● सनदशीर मार्गाचा अंत आणि आक्रमक धोरणाच्या दिशेने :**

फ्रँकफुर्ट पार्लमेंटच्या निमित्ताने जर्मनीतील उदारमतवाद्यांनी आणि एरफुर्ट अधिवेशनाच्या निमित्ताने प्रशियातील राज्यकर्त्यांनी जर्मनीच्या एकीकरणासाठी सनदशीर मार्गाचा अवलंब केला. मात्र, हे दोन्ही प्रयत्न विफल ठरले. जर्मनीचे एकीकरण करायचे असल्यास ऑस्ट्रिया साम्राज्यातील जर्मन भाषिक प्रदेश हा जर्मनीमध्ये समाविष्ट होणार होता. परिणामी, ऑस्ट्रियाच्या साम्राज्यात फुट पडण्याची शक्यता होती. तसेच इतर काही जर्मन राज्यांना जर्मनीच्या एकीकरणामुळे आपले सार्वभौमत्व नष्ट होईल, आपले स्वतंत्र अस्तित्त्व नष्ट होईल याची भीती वाटत होती. त्यामुळे ऑस्ट्रिया साम्राज्य आणि काही जर्मन राज्ये यांचा जर्मनीच्या एकीकरणाला विरोध होता. सबब, जर्मनीचे एकीकरण साध्य करण्यासाठी एकीकरणास विरोध करणाऱ्या ऑस्ट्रिया साम्राज्य आणि इतर जर्मन राज्ये यांचा विरोध मुत्सद्देगिरी आणि बळाच्या सहाय्याने मोडून काढणे आवश्यक आहे असे प्रशियाच्या राज्यकर्त्या वर्गाच्या लक्षात आले. मात्र, प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा हा आक्रमण धोरण स्वीकारण्यास तयार होत नसल्यामुळे जर्मनीच्या एकीकरणासाठीचे प्रयत्न फ्रेडरिक विल्यम याच्या मृत्यू (सन १८६१) पर्यंत रेंगाळत राहिले. सन १८६१ मध्ये राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याचा भाऊ विल्यम पहिला हा प्रशियाच्या गादीवर आला. विल्यम पहिला याने कार्यभार स्वीकारल्यानंतर लगेच बिस्मार्क याची प्रशियाच्या पंतप्रधानपदी नेमणूक केली. विल्यम पहिला आणि बिस्मार्क यांच्यात उत्कृष्ट ताळमेळ जमल्यामुळे जर्मनीच्या एकीकरणाच्या दिशेने आक्रमक वाटचाल सुरु झाली.

● **विल्यम पाहिला – प्रशियाचा राजा ते जर्मनीचा सम्राट :**

सन १८५७ मध्ये प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याला अर्धांगवायूचा झटका आल्यामुळे प्रशियाचा काळजीवाहू कारभार त्याचा धाकटा भाऊ विल्यम याच्याकडे आला. दि. २ जानेवारी १८६१ रोजी फ्रेडरिक विल्यम चौथा याच्या मृत्युनंतर विल्यम पहिला हा प्रशियाच्या गादीवर आला. विल्यम पहिला हा अत्यंत सभ्य, दृढनिश्चयी आणि धोरणी राज्यकर्ता होता. विल्यम पहिला याने स्वत: अनेक युद्धात प्रत्यक्ष भाग घेतला असल्याने लष्करी योद्धा आणि लष्करी व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून तो अत्यंत अनुभव संपन्न आणि कुशल होता. विल्यम पहिला हा प्रशियाच्या गादीवर आल्याने प्रशियात एक प्रकारचे नवे युग अवतरल्या प्रमाणे वातावरण जनमानसात निर्माण झाले.

जर्मनीचे एकीकरण प्रत्यक्षात आणायचे असेल तर बळाचा म्हणजेच लष्करी शक्तीचा वापर करणे अपरिहार्य आहे याची जाणीव विल्यम पहिला यास झालेली होती. त्यामुळे गादीवर येताच विल्यमने प्रशियाचे लष्करीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून पावले उचलली. प्रशियाचा लष्कर प्रमुख लमूथ वॉन मोल्टेक याने शांतता काळात प्रशियाचे लष्कर १,५०,००० वरून २,००,००० इतके वाढवणे, वार्षिक नवीन सैन्य भरती ही ४०,००० वरून ६३,००० इतकी करणे, लष्करी नोकरीचा कालावधी वाढवणे इत्यादी लष्करी सुधारणा आवश्यक असल्याचे विल्यम पहिला यास सुचविले. या लष्करी सुधारणांसाठी येणाऱ्या खर्चाची मंजुरी प्रशिया राज्याच्या लँडट्याग (Landtag) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पार्लमेंट कडून घेणे आवश्यक होते. अल्बर्ट वॉन रून हा प्रशियाचा राजा विल्यम पहिला याचा युद्धमंत्री होता. युद्धमंत्री रूनयाच्या माध्यमातून पार्लमेंटकडे लष्करी सुधारणांच्या खर्चाच्या मंजुरीचा प्रस्ताव पाठविण्यात आला. पार्लमेंटने खर्चाला मंजुरी देण्याचे नाकारले. त्यामुळे प्रशियाचे पार्लमेंट आणि प्रशियाचा राजा विल्यम पहिला यांच्यात खटके उडू लागले. पार्लमेंटच्या लष्करीकरण विरोधातील भुमिकेमुळे वैतागून प्रशियाचा राजा विल्यम पहिला याने राजपदाचा त्याग करण्याचे ठरविले. मात्र, राजपुत्र फ्रेडरिक याने आपल्या वडिलांना म्हणजे विल्यम पहिला याला राजत्याग करण्यापासून परावृत्त केले. राजपुत्र फ्रेडरिक आणि युद्धमंत्री रून यांच्या सल्ल्यानुसार विल्यम पहिला याने ऑटो वॉन बिस्मार्क याची प्रशियाच्या पंतप्रधानपदी नेमणूक केली. विल्यम पहिला याच्या कार्यकाळात गृहनीती, संरक्षणनीती, विदेशनीती, अर्थनीती इत्यादी सर्व आघाड्यांवर बिस्मार्कने प्रचंड योगदान दिले. विल्यम पहिला याच्या धोरणीपणामुळे आणि बिस्मार्कच्या मुत्सद्दीगिरीमुळे टप्प्याटप्प्याने जर्मनीचे एकीकरण प्रत्यक्षात येऊन प्रशियाचा राजा विल्यम पहिला हा एकीकृत जर्मनीचा सम्राट पदी विराजमान झाला.

● **ऑटो वॉन बिस्मार्क– जर्मनीचे एकीकरण साधणारा मुत्सद्दी :**

प्रशिया राज्याच्या सॅक्सनी प्रांतातील जमीनदारी आणि लष्करी पार्श्वभूमी असलेल्या घराण्यात एप्रिल १८१५ मध्ये ऑटोवॉन बिस्मार्क याचा जन्म झाला. बर्लिन आणि गॅटिंगन या सुप्रसिद्ध विद्यापीठात शिक्षणपूर्ण केलेल्या बिस्मार्कने फ्रान्स आणि इंग्लंड इत्यादी देशांत भ्रमंती केली होती. फ्रान्स आणि इंग्लंडमधील राजकारणाचा बारकाईने अभ्यास केलेला बिस्मार्क हा कुटनीतीत पारंगत राजकीय नेता म्हणून नावारूपास आला. लँडट्यागशी म्हणजे प्रशियाच्या पार्लमेंटशी खटके उडू लागल्यानंतर सन १८६२ च्या सप्टेंबर महिन्यात प्रशियाचा

राजा विल्यम पहिला याने बिस्मार्कला प्रशियाचा पंतप्रधान म्हणून नियुक्त केले. सन १८६२ ते १८९० इतक्या दीर्घकाळ पदावर राहून बिस्मार्कने १८७१ साली जर्मनीचे एकीकरण पूर्ण केले आणि सन १८९० पर्यंत जर्मनीला सर्वार्थाने शक्तिशाली राष्ट्र बनवले.

**● जर्मनीच्या एकीकरणाच्या दिशेने घोडदौड :**

बिस्मार्क आणि विल्यम पहिला यांचे बहुतांश विचार मिळते जुळते होते. बिस्मार्क हा प्रशियन जंकर्स (Prussian Junkers) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमीनदारांच्या वर्गातील होता. त्यामुळे बिस्मार्क हा लोकशाही ऐवजी राजावर निष्ठा ठेवणारा व्यक्ती होता. परिणामी, विल्यम पहिला आणि बिस्मार्क यांच्यात दीर्घकाळ व्यवस्थित समन्वय साधला गेला. बिस्मार्कने आखलेल्या धोरणांना विल्यम पहिला याने पूर्ण पाठींबा आणि मंजुरी दिली. परिणामी, बिस्मार्कला फक्त दहा वर्षातच जर्मनीचे एकीकरण पूर्ण करता आले.

**● प्रशियाचे लष्करीकरण :**

जर्मनीचे एकीकरण करण्यासाठी बळाचा वापर करणे हाच एकमेव पर्याय असल्याचे एव्हाना बिस्मार्कच्या देखील लक्षात आले. जर्मनीच्या एकीकरणाच्या मार्गात ऑस्ट्रिया हा एक बलाढ्य अडथळा आहे. सनदशीर मार्गाने जर्मनीचे एकीकरण शक्य नसून युद्ध आणि रक्तपात याच मार्गाने प्रशियाच्या नेतृत्वाखाली जर्मनीचे एकीकरण सध्या होईल असे धोरण बिस्मार्कने आखले यालाच रक्त आणि लोहधोरण (Blood and Iron Policy) म्हणून ओळखले जाते. पंतप्रधान बनताच बिस्मार्कने पार्लमेंटच्या मंजुरीशिवाय सैन्य भरती सुरु केली. सैन्य भरतीसाठी लागणारा अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी पार्लमेंटची मंजुरी न घेताच अनेक नवीन कर लावले. परिणामी, प्रशियाचे महसुली उत्पन्न वाढले आणि प्रशियाचे लष्कर अत्यंत सामर्थ्यशाली बनले.

**● डेन्मार्कशी युद्ध (१८६४) :**

जर्मनीच्या एकीकरणात ऑस्ट्रियाचा अडसर असला तरी लगेचच ऑस्ट्रियाशी युद्ध करण्याची प्रशियाची लष्कर आणि लष्करी संसाधनांची तयारी नव्हती. तसेच ऑस्ट्रिया विरोधात युद्ध घोषित करण्यासाठी काहीतरी निमित्त आवश्यक होते. बिस्मार्कला ऑस्ट्रियाविरुद्ध युद्ध घोषित करण्याआधी जी पार्श्वभूमी आवश्यक होती ती डेन्मार्कच्या माध्यमातून प्राप्त झाली. प्रशियाच्या उत्तरेस असलेल्या श्लेस्विग आणि होलेस्टेन या दोन परगण्यांतील बहुतांश लोक हे जर्मन भाषिक असल्याने त्यांचा ओढा जर्मनी कडे होता. मात्र, या दोन्ही परगण्यामध्ये डेन्मार्कच्या राजाच्या नावाने कारभार चालत असे. सन १८५२ साली झालेल्या लंडनच्या तहानुसार डेन्मार्कच्या राजाच्या नावाने श्लेस्विग आणि होलेस्टेन या परगण्यातील कारभार चालविला जात असला तरी डेन्मार्कने या परगण्याला आपल्या राज्यात समाविष्ट करून घेऊ नये असे ठरले होते. दोन्ही परगण्यातील जर्मन जनतेने हे परगणे जर्मनीला जोडण्यात यावेत अशी चळवळ सुरु ठेवली होती. हे दोन्ही परगणे प्रशियाला जोडून घेण्याचा निश्चय करून बिस्मार्क संधीची वाट पाहत होता.

सन १८६३ साली ख्रिश्चन नववा हा डेन्मार्कच्या राजपदावर आला. गादीवर येताच ख्रिश्चन नववा याने श्लेस्विग आणि होलेस्टेन हे दोन्ही परगणे डेन्मार्कला जोडून घेतले. डेन्मार्कशी युद्ध पुकारून हे दोन्ही परगणे

प्रशियाला जोडून घेण्याची संधी बिस्मार्कला आपोआप मिळाली. मात्र, अत्यंत मुत्सद्दी असलेल्या बिस्मार्कने डेन्मार्कशी युद्ध करताना ऑस्ट्रियाचा प्रशियाला विरोध होऊ नये म्हणून ऑस्ट्रियाला देखील आपल्या बाजूने युद्धात सामिल करून घेतले. सन १८६४ मध्ये फेब्रुवारी ते ऑक्टोबर असे जवळपास नऊ महिने चालेल्या डेन्मार्क विरुद्ध प्रशिया-ऑस्ट्रिया युद्धात प्रशिया-ऑस्ट्रिया आघाडीचा विजय झाला. डेन्मार्कच्या पराभवानंतर होलेस्टेनचा परगणा ऑस्ट्रियाला आणि श्लेस्विगचा परगणा प्रशियाला अशी वाटणी करण्यात आली. ऑस्ट्रियाला होलेस्टेनचा परगणा दिल्यामुळे भविष्यात हेच निमित्त घेऊन ऑस्ट्रिया विरुद्ध युद्ध पुकारण्याची संधी बिस्मार्क साधणार हे निश्चित होते.

**● ऑस्ट्रियाशी युद्ध (१८६६) :**

जर्मनीचे एकीकरण हे ऑस्ट्रियाचा पराभव केल्याशिवाय शक्य नसल्याने डेन्मार्कशी युद्ध संपल्यानंतर बिस्मार्क ऑस्ट्रियाशी होणाऱ्या भावी युद्धाच्या तयारीला लागला. प्रशियाचे लष्करी बळ आणखी वाढवून आंतरराष्ट्रीय पातळीवर ऑस्ट्रियाला एकटे पडण्याची तजवीज बिस्मार्कने सुरु केली.

बिस्मार्क हा रशियामध्ये प्रशियाचा वकील म्हणून नियुक्त असताना त्याचे आणि रशियाचा सम्राट झार अलेक्झांडर दुसरा याचे अत्यंत मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले होते. सन १८६३ मध्ये रशियाचे वर्चस्व असलेल्या पोलंड मधील पोलिश जनतेने रशिया विरुद्ध उठाव केला. पोलिश जनतेला प्रशियामधील जर्मन जनतेची सहानभूती होती. मात्र, बिस्मार्कने जनतेच्या सहानभूतीचा विचार न करता पोलंड मधील जनतेचा उठाव मोडून काढण्यात रशियाला सर्वोपरी मदत केली. बिस्मार्कने केलेल्या मदतीमुळे रशिया आणि प्रशिया यांचे संबंध दृढ झाले. प्रशियाच्या जनमताचा विचार न करता जर्मनीच्या एकीकरणासाठी आवश्यक सामरिक (Strategic) निर्णयमुत्सद्दीपणा बिस्मार्कने दाखवला.

प्रशियाचा पंतप्रधान बनण्यापूर्वी बिस्मार्क हा काहीकाळ फ्रान्समध्ये प्रशियाचा वकील म्हणून नियुक्त होता. या काळात फ्रान्सचा सम्राट तिसरा नेपोलियन याच्यावर आपला प्रभाव पाडून बिस्मार्कने त्याची मैत्री संपादली होती. सन १८६५ साली बिस्मार्कने नेपोलियन तिसरा याची बियारित्झ येथे भेट घेतली. सदर भेटीत ऑस्ट्रियाशी युद्धानंतर फ्रान्सला ऱ्हाईनच्या प्रांतातील काही भाग किंवा बेल्जियम देणार असल्याचा आभास निर्माण केला. त्याद्वारे बिस्मार्कने ऑस्ट्रियाशी होणाऱ्या युद्धप्रसंगी फ्रान्स तटस्थ राहील अशी हमी फ्रेंच सम्राट नेपोलियन तिसरा याच्याकडून मिळवली.

राष्ट्र म्हणून एकत्र येण्यासाठी ऑस्ट्रियाच्या दक्षिणेस असलेल्या इटलीचा ऑस्ट्रियाशी सतत संघर्ष सुरु होता. ऑस्ट्रियाच्या उत्तरेस असणाऱ्या प्रशियाच्या पंतप्रधान बिस्मार्कने ऑस्ट्रियाच्या दक्षिणेस असणाऱ्या इटलीची मदत ऑस्ट्रिया विरुद्धच्या युद्धासाठी घेण्याचे ठरवले. इटली जर ऑस्ट्रिया विरुद्धच्या युद्धात प्रशियाच्या बाजूने सामिल झाल्यास ऑस्ट्रियाला दोन आघाड्यांवर लढावे लागेल आणि त्याचे लष्करी बळ विभागले जाईल आणि ऑस्ट्रियाचा पराभव करणे सोपे होईल अशी बिस्मार्कची योजना होती. प्रशियाच्या बाजूने युद्धात सहभागी होण्याच्या बदल्यात इटलीला ऑस्ट्रियाच्या ताब्यातील व्हेनेशियाचा प्रदेश देण्याचे बिस्मार्कने कबूल केले.

उपरोक्त प्रमाणे ऑस्ट्रिया विरुद्ध प्रशिया युद्ध सुरु झाल्यानंतर इटली हा प्रशियाच्या बाजूने युद्धात उतरेल आणि रशिया व फ्रान्स हे युद्धामध्ये तटस्थ राहतील अशी पूर्वतयारी करून बिस्मार्क ऑस्ट्रिया विरुद्ध युद्ध पेटवण्याच्या कामी लागला. डेन्मार्कवरील विजयानंतर ऑस्ट्रियाला दिलेल्या होलेस्टेनचा परगण्याने बिस्मार्कला ऑस्ट्रियाशी युद्ध करण्याचे निमित्त मिळवून दिले. होलेस्टेनचा परगण्यातील ऑस्ट्रियाचा कारभार हा अत्यंत अयोग्य पद्धतीने चालवला जात असल्याचा आरोप बिस्मार्कने केला. होलेस्टेनमधील ऑस्ट्रियाच्या गैरकारभारामुळे ऑस्ट्रियाला जर्मन राज्य संघातून हाकलून देण्यात यावे अशी मागणी बिस्मार्कने केली. परिणामी, ऑस्ट्रिया विरुद्ध प्रशिया अशा युद्धाला तोंड फुटले. प्रशियाचा युद्धमंत्री अल्बर्ट वॉन रून आणि प्रशियाचा लष्कर प्रमुख हेलमूथ वॉन मोल्टेक यांच्या नेतृत्त्वाखालील प्रशियाच्या लष्कराने संपूर्ण युरोपला अचंबित करणारा पराक्रम केला. १४ जून ते २२ जुलै १८६६ या काळात एकूण सात आठवडे चाललेल्या या युद्धात ऑस्ट्रियाचा दारूण पराभव झाला. ऑस्ट्रिया आणि प्रशिया यांच्यात प्राग येथे युद्ध विराम आणि शांततेचा तह झाला.

● **प्रागचा तह – उत्तर जर्मन राज्यसंघाची निर्मिती :**

प्राग येथे ऑस्ट्रिया आणि प्रशिया यांच्यात २३ ऑगस्ट १८६६ रोजी शांततेचा तह होऊन युद्ध संपुष्टात आले. युद्धात प्रशिया आणि इटली यांच्या आघाडीला ऑस्ट्रिया विरुद्ध विजय मिळाल्यामुळे त्यांनी ऑस्ट्रियाला तहासाठीच्या अटी मान्य करण्यास भाग पाडले. व्हेनेशियाचा प्रांत इटलीला देण्याचे ऑस्ट्रियाने मान्य केले. जर्मन प्रदेशातून ऑस्ट्रियाचे वर्चस्व संपुष्टात आणण्यात आले. श्लेस्विग आणि होलेस्टेन हे दोन्ही परगणे प्रशियाला जोडण्यात आले. त्याचप्रमाणे ऑस्ट्रियाच्या बाजूने युद्धात सामिल झालेल्या हॅनोव्हर, हेसे–नसाऊ इत्यादी राज्ये प्रशियाला जोडण्यात आली. ऑस्ट्रियाला वगळून प्रशियाच्या नेतृत्वाखाली उत्तरेकडील जवळपास २२ जर्मन राज्यांचा ‘उत्तर जर्मन राज्यसंघ’ निर्माण करण्यात आला. व्हिएन्ना परिषदेद्वारे निर्माण करण्यात आलेला जर्मन राज्यसंघ आणि त्याद्वारे जर्मन प्रदेशावरील ऑस्ट्रियाचे वर्चस्व अशा रीतीने संपुष्टात आले. ‘उत्तर जर्मन राज्यसंघ’चा प्रमुख म्हणून प्रशियाच्या राजाला सर्वानुमते मान्यता देण्यात आली. प्रागच्या तहात मिळालेल्या विजयामुळे प्रशियाची प्रतिष्ठा वाढली, नव्याने प्रशियाला जोडलेल्या प्रदेशामुळे प्रशियाचे समर्थ वाढले. तसेच उत्तर जर्मन राज्यसंघाच्या रूपाने जर्मनीच्या एकीकरणाचा अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा पार पडला.

● **फ्रान्सशी युद्ध आणि जर्मन साम्राज्याची स्थापना :**

प्रशियाने ऑस्ट्रियाचा पराभव करून उत्तर जर्मन राज्यसंघाची स्थापना केली. ऑस्ट्रिया विरुद्धच्या युद्धात फ्रान्स तटस्थ राहिला ही प्रशियाच्या विजयामागील एक महत्त्वाचे कारण ठरले. या तटस्थतेच्या बदल्यात बिस्मार्कने फ्रेंच सम्राट नेपोलियन तिसरा याला ऱ्हाईनच्या प्रांतातील काही भाग किंवा बेल्जियम देणार असल्याचा आभास निर्माण केला होता. युद्ध संपल्यानंतर प्रत्यक्षात मात्र बिस्मार्कने फ्रान्सला काही ही दिले नाही. उलट ऑस्ट्रियावरील विजयामुळे प्रशिया अत्यंत बलाढ्य होऊन युरोपातील सत्ता समतोल बिघडला. बलाढ्य झालेल्या प्रशियाचा आता फ्रान्सला देखील त्याचा धोका निर्माण झाला. परिणामी, ऑस्ट्रिया–प्रशिया युद्धाविषयक फसलेल्या परराष्ट्रीय धोरणामुळे फ्रेंच सम्राट नेपोलियन तिसरा याची प्रचंड नाचक्की झाली.

ऑस्ट्रिया विरूद्धचे युद्ध जिंकल्यानंतर दक्षिणेकडील जर्मन राज्यांना जिंकून जर्मनीचे एकीकरण करता येणे

प्रशियाला  शक्य होते. मात्र, युरोपातील आपल्या हितसंबंधाला बाधा पोहचण्याचा धोका असल्याने फ्रान्सद्वारे प्रशिया विरुद्ध युद्ध घोषित करण्याची शक्यता होती. तसेच युद्धखोरीचा आरोप प्रशियाच्या माथी  फुटला असता. जर्मनीचे एकीकरण पूर्ण करण्यासाठी दक्षिणकडील जर्मन राज्ये जोडून घेणे आवश्यक होते. तसेच ही गोष्ट प्रत्यक्षात आणण्यासाठी फ्रान्सशी युद्ध करून त्याचा पराभव करणे आवश्यक होते. प्रशियाद्वारे युद्ध घोषित न करता फ्रान्सला प्रशिया विरुद्ध युद्ध घोषित करण्यास भाग पाडल्यास युरोपातील इतर बलाढ्य शक्तींची सहानभूती प्रशियाला मिळणार होती. बिस्मार्कने आपल्या मुत्सद्देगिरीने इंग्लंड, रशिया, इटली यांच्याकडून फ्रान्स विरुद्ध युद्ध झाल्यास तटस्थ राहण्याचे अभिवचन घेतले. अशाप्रकारे युरोपात फ्रान्सला एकटे पडल्यानंतर फ्रान्स विरुद्ध युद्ध पेटवण्यासाठी बिस्मार्क संधीची वाट पाहत होता. स्पेनच्या गादीच्या प्रश्नामुळे ही संधी बिस्मार्कला मिळाली आणि त्याने त्याचा पुरेपूर उपयोग केला.

स्पेनमध्ये क्रांती होऊन प्रशियाच्या राजाच्या नातेवाईकास स्पेनच्या राजपदावर बसवण्यात आले. फ्रान्सचा याला प्रचंड विरोध होता. त्यामुळे प्रशिया आणि फ्रान्स या दोन्ही देशातील वातावरण संतप्त झाले. नंतर प्रशियाच्या राजाच्या नातेवाईकाने स्पेनच्या राजपदाचा त्याग केला. मात्र, याच घडामोडी दरम्यान १३ जुलै १८७० रोजी फ्रान्सचा वकील आणि प्रशियाचा राजा यांच्यात प्रशियाच्या एम्स शहरात संतप्त वातावरणात वाटाघाटी करण्याचा प्रयत्न फिस्कटला. या फिसकटलेल्या वाटाघाटीचा वृत्तांत प्रशियाचा राजा विल्यम पहिला याने टेलिग्रामद्वारे म्हणजे तारेने बिस्मार्कला कळवला याला 'एम्स टेलिग्राम' म्हणून ओळखले जाते. बिस्मार्कने या वृत्तांतामध्ये फ्रान्स आणि प्रशिया दोन्हींना अपमानास्पद वाटेल असा बदल करून वृत्तपत्रांकडे प्रसिद्धीस दिला. वृत्तांत प्रसिद्ध झाल्यानंतर त्याचा अर्थ लावण्यात आणि त्याच्या फ्रेंच भाषांतरात अनेक गफलती होऊन फ्रान्सच्या वकिलाचा पर्यायाने फ्रान्सचा अपमान झाल्याची भावना होऊन फ्रान्स मधील जनमानस संतप्त झाले. प्रशियामध्ये देखील प्रशियाच्या राजाचा अपमान झाला म्हणून फ्रान्सविरोधी वातावरण निर्माण झाले. फ्रेंच नागरिकांच्या भावनेच्या दबावामुळे तिसऱ्या नेपोलियनला प्रशिया विरुद्ध युद्ध घोषित करावे लागले.

फ्रान्सने १५ जुलै १८७० रोजी प्रशिया विरुद्ध युद्ध घोषित केले. युद्धाची घोषणा फ्रान्सकडून झाल्याने फ्रान्स हा जर्मन लोकांविरुद्धचा आक्रमणकारी आणि युद्धखोर ठरला. त्यामुळे दक्षिण जर्मन राज्यसंघातील राज्ये ही प्रशियाच्या नेतृत्त्वाखालील उत्तर जर्मन राज्य संघात समाविष्ट झाली तसेच फ्रान्स विरोधातील युद्धात प्रशियाच्या बाजूने सामिल झाली. उत्तर जर्मन राज्य संघ आणि दक्षिण जर्मन राज्य संघ एकत्रित झाल्याने प्रशियाची शक्ती मोठ्या प्रमाणात वाढली. प्रशियाच्या बलाढ्य लष्कराने फ्रान्सच्या सैन्याचा अनेक लढायांमध्ये दारूण पराभव केला. फ्रान्समधील सेडेन येथे १ सप्टेंबर आणि २ सप्टेंबर १८७० ला झालेल्या लढाईत फ्रेंच सैन्याचा मोठा पराभव होऊन खुद्द फ्रेंच सम्राट नेपोलियन तिसरा हा शरण येऊन प्रशियाच्या कैदेत सापडला. नेपोलियन तिसरा याच्या कैदेची बातमी पॅरीसमध्ये पोहचल्यानंतर तेथील जनतेने उठाव करून नेपोलियन तिसरा याला फ्रान्सच्या सम्राट पदावरून पदच्युत केले आणि फ्रान्समध्ये 'दुसरे प्रजासत्ताक' स्थापन केले. 'दुसऱ्या प्रजासत्ताक' सरकारने प्रशियाविरूद्धचे युद्ध सुरु ठेवले. मात्र, प्रशियाने फ्रान्सचा मोठा भूप्रदेश काबीज करून पॅरीस जिंकून घेऊन जून १८७१ मध्ये फ्रान्सचा संपूर्ण पराभव केला. फ्रँकफुर्ट येथे १० मे १८७१ मध्ये फ्रान्स आणि प्रशियामध्ये तह होऊन फ्रान्सचे अल्सेस आणि लॉरेन हे समृद्ध प्रदेश प्रशियाला जोडण्यात आले आणि फ्रान्सवर मोठी युद्ध खंडणी

लादण्यात आली. तत्पूर्वी जानेवारी १८७१ मध्ये जेंव्हा फ्रान्स विरूद्धचे युद्ध अंतिम टप्प्यात आले होते आणि प्रशियाचा विजय निश्चित दिसत होता तेंव्हा बिस्मार्कने उत्तर आणि दक्षिण जर्मनराज्य संघातील एकूण २५ राज्यांच्या राजांशी बोलणी करून सर्व जर्मन राज्यांचे मिळून 'जर्मन साम्राज्य' स्थापन करण्यास मंजुरी मिळवली. दि. १८ जानेवारी १८७१ रोजी फ्रान्समधील व्हार्यायच्या राजवाड्यातील 'हॉल ऑफ मिरर' मध्ये प्रशियाचा राजा विल्यम पहिला याला 'जर्मन सम्राट' म्हणून जाहीर करण्यात येऊन 'जर्मन साम्राज्य' स्थापन झाल्याची घोषणा करण्यात आली. जर्मन साम्राज्याच्या रूपाने सर्व जर्मन राज्ये एकत्र आली आणि जर्मन राष्ट्रवादाने प्रेरित जर्मनीचे एकीकण होऊन 'जर्मनी' हे राष्ट्र प्रत्यक्षात आले.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -२**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) 'यंग इटली' या गुप्त संघटनेची स्थापना कोणी केली ?

(२) इटलीच्या एकीकरणाला विरोध करणारा ऑस्ट्रियाचा पंतप्रधान कोण होता?

(३) इटलीच्या एकीकरणाच्या लढ्यातील योद्धा म्हणून कोण सुप्रसिद्ध आहे ?

(४) सन १८४८ मध्ये कोणत्या पार्लमेंट मध्ये सर्व जर्मन राज्यांचे मिळून एक जर्मन संघराज्य बनविण्यात यावे असे ठरले?

(५) जर्मन जकात संघाला जर्मन भाषेत काय म्हणून ओळखले जाते?

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) ...................हा इटलीचे एकीकरण प्रत्यक्षात साध्य करणारा मुत्सद्दी म्हणून ओळखला जातो.

(२) ...................हा सन १८४९ ते १८६१ या काळात पीडमॉऊंट-सार्डेनियाचा राजा होता.

(३) ...................याने जर्मनीच्या एकीकरणामध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका बजावली.

(४) सन १८७१ मध्ये ...................यास जर्मनीचा सम्राट घोषित करण्यात आले.

(५) डेन्मार्कच्या पराभवानंतर होलेस्टेनचा परगणा ...................ला मिळाला.

## २.२.३ राष्ट्रवादाचा परिणाम :

अठराव्या शतकात युरोपमध्ये राष्ट्रवादाचा उदय झाला. राष्ट्रवादाशी संलग्न राष्ट्र-राज्याची संकल्पना देखील याच काळात विकसित होत होती. युरोपात झालेला प्रबोधनकाळ, औद्योगीक क्रांती, भांडवलशाहीचा विकास, छपाई कलेचा प्रसार आणि आधुनिक विचारसरणी इत्यादी विविध घटक हे राष्ट्रवादाच्या उदयाला आणि झपाट्याने झालेल्या त्याच्या प्रसाराला कारणीभूत ठरले. राष्ट्रवादामुळे पहिल्यांदा पश्चिम युरोपातील इंग्लड आणि फ्रान्स हे राष्ट्र म्हणून विकसित झाले. राष्ट्रवादाचा प्रसार पश्चिम युरोप कडून पूर्व युरोपच्या दिशेने झाला. युरोपात

क्रांत्यांची लाट येऊन जनतेने प्रस्थापित राज्यकर्त्यांच्या विरोधात सातत्याने उठाव केले. इटली आणि जर्मनी ही दोन राष्ट्रे ही याच काळात कशी अस्तित्वात आली हे आपण समजून घेतले आहे. युरोप आणि जगावर राष्ट्रवादाचा नेमका काय परिणाम झाला हे मुद्देसूद पद्धतीने जाणून घेणे आवश्यक आहे.

- **राष्ट्रीय जागृती :**

राष्ट्रवादाच्या प्रसारामुळे युरोपातील अनेक नव रूढीवादी साम्राज्यांमध्ये आणि राज्यांमध्ये राष्ट्रीय जागृती निर्माण झाली. भाषा, संस्कृती, वंश, भूप्रदेश इत्यादी लक्षणांच्या आधारवर लोकांमध्ये एकतेची भावना निर्माण झाली. राष्ट्रवादाने लोकांना आपण एका राष्ट्राचा सामुहिकरित्या भाग आहोत (Sense of Collective Belonging) याची जाणीव दिली. आपण राष्ट्राचा भाग असल्याने त्या राष्ट्राशी, त्याच्या संस्कृतीशी, परंपरेशी आणि त्याच्या ऐतिहासिक वारसा सोबत जोडलेलो आहोत आणि त्या राष्ट्राचा भाग असणे म्हणजे राष्ट्रीयत्व (Nationality) हीच आपली खरी ओळख (Identity) असल्याची भावना लोकांमध्ये तयार झाली. राष्ट्रवादाने लोकांना संघटीत (Mobilization) करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका निभावली. राष्ट्रवादाच्या नावाखाली लोक राष्ट्राच्या रक्षणासाठी, युद्धासाठी, दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करण्यासाठी किंवा आपल्याच राष्ट्रातील विशिष्ट समुदायां विरोधात एकत्र येत या गोष्टीचा म्हणजेच पर्यायाने  राष्ट्रवादाचा फायदा युरोपातील राज्यकर्त्यांनी बऱ्याचदा आपले आसन स्थिर ठेवण्यासाठी उचलला.

- **लोकशाहीचा प्रसार :**

राष्ट्रीय जागृती ही जरी सांस्कृतिक घटकांच्या आधारे झाली असली तरी लोकांना एकत्र आणण्यात त्यांचे सामुहिक हितसंबध महत्त्वाचे ठरले होते. नव्याने उदयाला आलेल्या मध्यमवर्गाने, उदारमतवादी विचारवंत आणि विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय जागृतीच्या माध्यमातून लोकशाहीचा आग्रह धरला. रूढीवादी अनियंत्रित राजतंत्राऐवजी घटनेला आणि पार्लमेंटला बांधील असणारे व लोकांनी निवडून दिलेले सरकार असावे अशी मागणी लोकांनी लावून धरली. युरोपातील अनेक राज्यात क्रांती यशस्वी होऊन अनेक ठिकाणी संविधानावर आधारलेली लोकशाही तर काही ठिकाणी घटनात्मक राजेशाही असलेली लोकशाही व्यवस्था स्थापन झाली.

- **क्रांतीच्या लाटा :**

राष्ट्रवादामुळे झालेल्या राष्ट्रीय जागृती आणि लोकशाहीच्या मागणीमुळे युरोपात सातत्याने क्रांतिकारी घटना घडत राहिल्या. अनेक क्रांतिकारी संघटना आणि त्यांचे नेते उदयाला आले. एखाद्या राज्यात झालेल्या क्रांतीचे परिणाम इतर राज्यांत-प्रदेशात होत असत. परिणामी, अस्वस्थता, अशांतता, असंतोष निर्माण होऊन क्रांतीसाठी सातत्याने प्रयत्न होत. युरोपातील नव-रूढीवादी राज्यसत्तांनी या राष्ट्रवादाला आणि क्रांत्याना दडपून टाकण्याचा सर्वोपरी प्रयत्न केला. मात्र, क्रांत्याच्या सततच्या लाटांनी युरोपातील राजतंत्रांना जोरदार हादरे दिले.

- **जुन्या साम्राज्यांचा ऱ्हास :**

राष्ट्रवादामुळे झालेल्या राष्ट्रीय जागृतीमुळे अनेक भाषिक, अनेक संस्कृती असलेल्या ऑस्ट्रिया साम्राज्यातील अनेक समूहांत राष्ट्रीय भावना निर्माण झाल्या. एका मोठ्या साम्राज्यात अनेक राष्ट्रांच्या जनतेचे शोषण होत आहे,

अशी भावना निर्माण होऊन ऑस्ट्रिया साम्राज्यातील जर्मन, इटालियन, सर्ब इत्यादी राष्ट्रवादांचा उदय झाला. अठराव्या शतकात ऑस्ट्रिया साम्राज्यात निर्माण झालेल्या 'राष्ट्रवादाच्या प्रश्ना'वर तोडगा काढण्यास ऑस्ट्रिया साम्राज्याच्या राज्यकर्त्यांस अपयश आले. परिणामी, ऑस्ट्रिया साम्राज्यात असंतोष माजून अनेक उठाव झाले. अंतिमत: इटलीचे एकीकरण, जर्मनीचे एकीकरण होऊन ऑस्ट्रियाचे साम्राज्य लयास गेले. पहिल्या महायुद्धाची ठिणगी ही ऑस्ट्रिया साम्राज्यात दडपणूक होत असलेल्या सर्ब राष्ट्रवादाच्या परिणामे स्वरूप पडली.

ऑटोमन साम्राज्याला देखील राष्ट्रवादाच्या उदयाचा फटका बसला. पूर्व युरोपातील ऑटोमन साम्राज्यांतर्गत येणाऱ्या बोस्नियामधील विविध समुदायांनी स्वत: चे स्वत्रंत राष्ट्र असावे म्हणून चळवळी आरंभल्या. राष्ट्रवादी चळवळींमुळे वारंवार अशांतता निर्माण होऊन दुबळ्या झालेल्या ऑटोमन साम्राज्याला 'युरोपचा आजारी माणूस' (Sick man of Europe) म्हणून ओळखले जाऊ लागले. राष्ट्रवादी चळवळीच्या परिणाम स्वरूप २० व्या शतकाचा आरंभ होता होता ऑटोमन साम्राज्याचे अनेक तुकडे झाले.

**● अल्पसंख्याकांचा प्रश्न :**

राष्ट्रवादी भावना ही मुलत: आपण विशिष्ट समुदायाचा भाग आहोत यावर आधारित असते. मात्र, त्याचवेळी आपण इतर समुदायांपेक्षा वेगळे आहोत अशी जाणीव राष्ट्रवादातून निर्माण होऊन 'आपण' विरुद्ध 'ते' असा संघर्ष उभा राहतो. राष्ट्र हे विशिष्ट भाषा, वंश, धर्म असणाऱ्या लोकांचाच आहे अशी जर राष्ट्रवादामागील प्रेरणा असल्यास अशा राष्ट्रात भाषिक / वांशिक / धार्मिक अल्पसंख्याकांचा प्रश्न निर्माण होतो. अल्पसंख्याकांच्या प्रश्नामुळे एकतर अल्पसंख्याकांवर अन्याय होतो किंवा त्यांना राष्ट्रात दुय्यम वागणूक दिली जाते. तसेच अल्पसंख्याकांमध्ये त्यांच्या राष्ट्रवादाचा उदय होऊन संघर्ष विकोपाला जातो. एखाद्या देशातील अल्पसंख्याकांचा मुद्दा उचलून दुसरे राष्ट्र त्या देशावर युद्ध घोषित करते. १९ व्या शतकातील अनेक युद्धांचे आणि २० व्या शतकातील दोन्ही महायुद्धांच्या कारणांमध्ये अल्पसंख्याकांचा प्रश्न एक महत्त्वाचे कारण ठरले. उदा. आत्यंतिक जर्मन राष्ट्रवादाच्या प्रभावामुळे अल्पसंख्याक जर्मन ज्यु समाजावरील हल्ले वाढत जाऊन हिटलरच्या काळात युरोपातील ज्यूंचे सामुदायिक हत्याकांड (हॉलोकॉस्ट) (Holocaust) घडून आले.

**● वसाहतवाद आणि साम्राज्यवाद :**

राष्ट्रवादाच्या उदयापूर्वी साम्राज्ये ही त्या-त्या राज्यकर्त्यांची असत. त्यामुळे साम्राज्य विस्तार हा राज्यकर्त्यांशीच निगडीत होता. औद्योगिक क्रांतीमुळे निर्माण झालेला माल खपविण्यासाठी दुसऱ्या देशात वसाहती स्थापन करून किंवा साम्राज्य विस्तार करून हक्काच्या बाजारपेठा मिळवण्याचे धोरण विविध राष्ट्रातील राज्यकर्त्यांनी अवलंबिले. राष्ट्राच्या या वसाहतवादाद्वारे आणि साम्राज्यवादाद्वारे होणाऱ्या आर्थिक लाभात राष्ट्रातील उद्योजक-मध्यमवर्ग-व्यापारी इत्यादींचे हितसंबंध जोडलेले असल्याने त्यांचा देखील वसाहतवादाला आणि साम्राज्यवादाला पाठींबा मिळाला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या आरंभापर्यंत युरोपातील राष्ट्रांनी आशिया आणि आफ्रिका खंडात आपल्या वसाहती स्थापन करून साम्राज्य विस्तार केला.

**● दोन महायुद्धे :**

जगाच्या इतिहास सर्वोच्च मानवी हानि झालेली पहिले आणि दुसरे महायुद्ध हे राष्ट्रवादाची एक फलनिष्पती

होती. युरोपातील बलाढ्य राष्ट्रात साम्राज्य विस्तारामुळे तीव्र स्पर्धा आणि शत्रुत्वनिर्माण झाले. राष्ट्रां-राष्ट्रातील शत्रुत्व हे त्या-त्या राष्ट्रातील जनतेमधील राष्ट्रवादी भावनेमुळे टोकाला पोहचून शांततामय तोडगा निघण्या पलीकडे गेले. परिणामी, युरोपात युद्धाला तोंड फुटून युरोपीय राष्ट्रांच्या साम्राज्य विस्तारामुळेही दोन महायुद्धे आशिया आणि आफ्रिका खंडामध्ये देखील लढली गेली. युरोपीय राष्ट्रांच्या वर्चस्वाखालील असलेल्या राष्ट्रांमध्ये देखील प्रचंड मनुष्य आणि संपत्तीची हानि झाली.

- **आशिया आणि आफ्रिका खंडात वसाहतविरोधी संघर्ष :**

युरोपमधील राष्ट्रवादी विचार हा युरोपीय देशांच्या साम्राज्याचा भाग असलेल्या आशिया आणि आफ्रिकेतील वसाहतींमध्ये देखील पोहचला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून आणि २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत युरोपीय राष्ट्रांच्या अनेक वसाहतींमध्ये राष्ट्रवादी भावनेचा विकास होऊन राष्ट्रीय जागृती झाली. वसाहतीतील जनतेने स्वातंत्र्य आणि लोकशाहीची मागणी करत हिंसक आणि अहिंसक आंदोलने उभारली. दोन महायुद्धात युरोपीय राष्ट्रांची झालेली हानि आणि तीव्र झालेल्या स्वातंत्र्य आंदोलनांमुळे युरोपच्या अनेक वसाहती या स्वातंत्र्य मिळवून स्वतंत्र 'राष्ट्र' म्हणून उदयाला आल्या.

१९ व्या आणि २० व्या शतकात राष्ट्रवादाच्या परिणामांची आपण चर्चा केली आहे. २१ व्या शतकात जरी जागतिकीकरण झाले असे मानले जात असले तरी देखील राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्ष-स्पर्धा, अल्पसंख्य-बहुसंख्यवाद, राजकारणासाठी राष्ट्रवादाचा वापर, राष्ट्रवादाच्या नावाने पसरविला जाणारा उन्माद, विविधराष्ट्रातील जनतेमध्ये विद्यमान असलेली राष्ट्रीय भावना यावरून 'राष्ट्रवाद' ही एक प्रभावी विचार प्रणाली म्हणून अस्तित्त्वात आहे हे निदर्शनास येते आणि यावरूनच राष्ट्रवादाच्या मानवी इतिहासावरील परिणामांची प्रचीती येते.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -३**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) राष्ट्रवादाने लोकांना कशाची जाणीव दिली ?

(२) नव्याने उदयाला आलेल्या मध्यमवर्गाने, उदारमतवादी विचारवंत आणि विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय जागृतीच्या माध्यमातून कशाचा आग्रह धरला ?

(३) १८ व्या शतकात ऑस्ट्रिया साम्राज्यात निर्माण झालेल्या कोणत्या प्रश्नावर तोडगा काढण्यास ऑस्ट्रिया साम्राज्याच्या राज्यकर्त्यांस अपयश आले.

(४) युरोपमधील राष्ट्रवादी विचार हा युरोपीय देशांच्या साम्राज्याचा भाग असलेल्या कोणत्या खंडातील वसाहतींमध्ये देखील पोहचला ?

(५) आपण इतर समुदायांपेक्षा वेगळे आहोत अशी जाणीव राष्ट्रवादातून निर्माण होऊन कोणता संघर्ष उभा राहतो ?

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) राष्ट्राचा भाग असणे म्हणजे ............... होय.

(२) राष्ट्रवादाचा फायदा बऱ्याचदा युरोपातील .............. आपले आसन स्थिर ठेवण्यासाठी उचलला.

(३) राष्ट्रवादामुळे झालेल्या राष्ट्रीय जागृती आणि लोकशाहीच्या मागणीमुळे युरोपात सातत्याने ............... घटना घडत राहिल्या.

(४) राष्ट्रवादी चळवळींमुळे वारंवार अशांतता निर्माण होऊन दुबळ्या झालेल्या ऑटोमन साम्राज्याला ............... म्हणून ओळखले जाऊ लागले.

(५) युरोपातील अनेक राज्यात क्रांती यशस्वी होऊन अनेक ठिकाणी संविधानावर आधारलेली लोकशाही तर काही ठिकाणी ............... असलेली लोकशाही व्यवस्था स्थापन झाली.

## २.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**राष्ट्रवाद :** आपण एका समान भाषा, वंश, संस्कृती आणि समान इतिहास असलेल्या विशिष्ट समुदायाचे भाग असून त्याचे राष्ट्र-राज्य निर्माण असावे असे मानणारा विचार अथवा चळवळ

**राष्ट्र-राज्य :** विशिष्ट राष्ट्र आणि त्यातील राज्यसत्ता यांच्यात एकसंघपणा आल्यामुळे तयार झालेली राजकीय संस्था.

**उदारमतवाद :** स्वातंत्र्य, समता आणि लोकशाहीचा आग्रह धरणारी विचारप्रणाली.

**सामंतवादी व्यवस्था :** जमीन मालकीच्या आधारे राजा ते सामंत अशी उतरंडीची व्यवस्था.

## २.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) स्वातंत्र्य, समता आणि बंधुता

(२) इंग्लंड आणि फ्रान्स

(३) उदारमतवादाशी

(४) रूढीवादी

(५) बेनेडीक्ट ॲन्डरसन

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) पश्चिम युरोप

(२) अर्नेस्ट रेनन

(३) आधुनिक

(४) फ्रेंच राज्यक्रांती

(५) नेपोलियनची विधीसंहिता

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –२**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) जोसेफ मॅझिनी

(२) मेटरनिक

(३) जोसेफ गॅरिबाल्डी

(४) फ्रँकफुर्ट

(५) जॉल्वेरीन

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) काऊंट कॅमिलो डी काव्हूर

(२) व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय

(३) बिस्मार्क

(४) विल्यम पहिला

(५) ऑस्ट्रिया

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –३**

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) आपण एका राष्ट्राचा सामुहिकरित्या भाग आहोत

(२) लोकशाहीचा

(३) राष्ट्रवादाच्या प्रश्नावर

(४) आशिया आणि आफ्रिका

(५) 'आपण' विरुद्ध 'ते' असा

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) राष्ट्रीयत्व

(२) राज्यकर्त्यांनी

(३) क्रांतिकारी

(४) युरोपचा आजारी माणूस

(५) घटनात्मक राजेशाही

## २.५ सारांश :

युरोपात राष्ट्रवादाचा झालेला उदय ही जगाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दीर्घकालीन परिणाम करणारी घटना आहे. फ्रेंच राज्यक्रांतीतील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही आधुनिक मुल्ये राष्ट्रवादामागील सुरवातीच्या प्रेरणा होत्या. राष्ट्रवादाच्या उदयामुळे युरोपात उदारमतवादी क्रांत्यांची मोठी लाट येऊन रूढीवादी राज्यसत्तांना हादरे बसून ते छिन्न विच्छिन्न झाले. मोठ्या साम्राज्यांमध्ये स्वातंत्र्यासाठी आणि लोकशाहीसाठी आंदोलने झाली. युरोपातील इटली आणि जर्मनी या राष्ट्रांमध्ये राष्ट्रवादी चळवळी उभ्या राहिल्या. ऑस्ट्रिया आणि इटलीतील इतर राज्ये यांच्याशी संघर्ष होऊन इटलीचे एकीकरण पूर्ण झाले. डेन्मार्क, ऑस्ट्रिया आणि फ्रान्स यांच्याशी प्रशियाने युद्ध करून स्वत:च्या नेतृत्वाखाली जर्मनीचे एकीकरण पूर्ण केले. राष्ट्रवादामुळे राष्ट्रा-राष्ट्रातील स्पर्धा-शत्रुत्व, साम्राज्यवाद वाढीस लागून जगास भयंकर युद्धांना सामोरे जावे लागले. राष्ट्रवादाचा प्रसार युरोप बाहेर होऊन वसाहतींमध्ये राष्ट्रवादी आंदोलन झाले आणि वसाहती स्वतंत्र होऊन स्वतंत्र राष्ट्र बनल्या.राष्ट्रवादाचे आकलन केल्याशिवाय आधुनिक जगाच्या इतिहासाचे आकलन अपूर्ण ठरते.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)**

(१) राष्ट्रवादाच्या उदयाची प्रक्रिया स्पष्ट करा.

(२) काऊंट कॅमिलो डी काव्हूर याने इटलीच्या एकीकरणात दिलेल्या योगदानाची चर्चा करा.

(३) जर्मनीच्या एकीकरणाच्या घटनाक्रमांचे वर्णन करा.

(४) जर्मनीच्या एकीकरणातील बिस्मार्कचे योगदान स्पष्ट करा.

(५) राष्ट्रवादाच्या मानवी इतिहासावरील परिणामांची विस्तृत चर्चा करा.

**(ब) टिपा लिहा.(लघुत्तरी प्रश्न)**

(१) राष्ट्रवाद

(२) जोसेफ मॅझिनी

(३) जोसेफ गॅरिबाल्डी

(४) विल्यम पहिला

(५) महायुद्धामधील राष्ट्रवादाची भूमिका

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) कटारे अनिल,आधुनिक जगाचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१८.

२) जैन आणि माथुर, आधुनिक जगाचा इतिहास, के'सागर प्रकाशन, पुणे, २०१९.

३) वानखेडे आणि अमृतकर, आधुनिक युरोपचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०२०.

४) Anderson Benedict, Imagined Communities: Reflections on The Origin and Spread of Nationalism, London, Verso, 1991.

५) Blanning T.C.W., The Oxford History of Modern Europe, OUP, 2000.

६) Mukherjee L., - Study of Modern Europe and the World, Calcutta, 2011.


❖❖❖

## घटक – ३

# साम्राज्यवाद

## (Imperialism)

**अनुक्रमणिका :**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ साम्राज्यवादाच्या उदय आणि विस्ताराची कारणे

३.२.२ आफ्रिकेची फाळणी

३.२.३ साम्राज्यवादाचे जगावरील परिणाम

३.३ पारिभाषिक शब्द/ शब्दार्थ

३.४ स्वयं- अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ विषय विवेचनात संदर्भ आलेल्या प्रमुख घटनांचा तक्ता

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ संदर्भ ग्रंथ

### ३.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

- साम्राज्यवादाची संकल्पना कळण्यास मदत होईल.
- साम्राज्यवादाच्या उदयाची पार्श्वभूमी काय होती याचे आकलन होईल.
- साम्राज्यवादच्या तीन टप्प्यांबद्दल माहिती मिळेल.
- साम्राज्यवादाचा उदय आणि विस्तारासाठी जबाबदार असलेली कारणे स्पष्ट करता येतील.
- आफ्रिका खंडातील प्रदेशाची साम्राज्यवादी सत्तांनी कशी वाटणी करून घेतली हे विशद करता येईल.
- साम्राज्यवादाच्या परिणामांची चिकित्सा करता येईल.

## ३.१ प्रास्ताविक :

साम्राज्यवाद "Imperialism' हा मूळ शब्द लॅटिनमधील 'इम्पेरेटर' (Imperator) या शब्दापासून निर्माण झाला आहे. मूळ शब्दाचा अर्थ सेनाधिपती आणि अधिक्षेत्र (राज्य) असा होतो. साम्राज्यवाद एक राजनैतिक धोरण अथवा कृती किंवा तंत्र आहे. यानुसार एक देश किंवा लोकसमूह दुसऱ्या देशावर अथवा भूप्रदेशावर आपले अधिपत्य स्थापन करतो. थोडक्यात, एखाद्या सामर्थ्यशाली/बलवान देशाने लष्करी अथवा आर्थिक सामर्थ्याच्या बळावर दुसऱ्या देशाच्या भूप्रदेशावर अधिपत्य अथवा नियंत्रण प्रस्थापित करण्याच्या प्रक्रियेस 'साम्राज्यवाद' असे म्हंटले जाते. इतिहासकार चार्ल्स ए. बेयर्ड यांच्या मतानुसार साम्राज्यवाद म्हणजे 'सभ्य राष्ट्रांची कमकुवत व मागासलेल्या राष्ट्रांवर शासन करण्याची इच्छा व नीती' होय.

मानवी इतिहासातील साम्राज्यवादाचे दोन कालखंड मानले जातात: १) प्राचीन व मध्ययुगीन साम्राज्यवाद आणि २) अर्वाचिन/आधुनिक साम्राज्यवाद. इ.स.पू. तिसऱ्या शतकापासून इ.स. सहाव्या- सातव्या शतकापर्यंत इजिप्त, बॅबिलोनिया, सीरिया, भारत, इराण, ग्रीस, रोम (इटली) आदी प्रदेशात अनेक वैभवशाली सभ्यता अस्तित्वात होत्या. त्यापैकी इजिप्शियन, सिरियन व बॅबिलोनियन राजांनी साम्राज्यविस्तार करण्याचे प्रयत्न केले. मध्ययुगीन काळात युरोप मध्ये शार्लमेन (इ.स. ७४२ ते ८१४) या पराक्रमी राजाने पवित्र रोमन साम्राज्याची निर्मिती केली होती.

साम्राज्यवादाचे काळानुरूप स्वरूप बदलत गेले. प्राचीन काळी एखादा सम्राट दुसऱ्या प्रदेशावर स्वारी करून तो जिंकून घेत असे व तेथे आपली सत्ता प्रस्थापित करीत असे. हा एक प्रकारचा साम्राज्यवाद होता. मध्ययुगीन काळात धार्मिक साम्राज्यवाद अस्तित्वात आला. इस्लामी राज्यकर्त्यांची मोठमोठी साम्राज्य निर्माण झाली. मात्र आधुनिक काळातील साम्राज्यावादाचे स्वरूप वेगळे होते. युरोपियन देशांमध्ये व्यापारवाद व वसाहतवादाच्या प्रभावातून साम्राज्यवादाचा उदय झाला.

- **साम्राज्यवादाच्या उदयाची पार्श्वभूमी :**

युरोपमध्ये मध्ययुगाच्या शेवटी आमूलाग्र बदल घडून आले. आर्थिक, सामाजिक आणि राजकीय बदलांनी आधुनिक युरोपच्या उदयाला आकार दिला. इ.स. १३४७ पासून युरोपमध्ये प्लेग रोगाची भयानक महामारी आली होती. तीन वर्षांमध्ये सर्व युरोपमधून ही महामारी पसरली होती. प्लेगच्या रोगामुळे प्रचंड प्रमाणात लोक मृत्युमुखी पडले. १५ व्या आणि १६ व्या शतकात परिस्थिती सुधारली. शेती उद्योगाला चालना मिळाली. बंजर जमीन लागवडीखाली आणली गेली. शेतकी उत्पादन हळुवार वाढायला लागले. मध्ययुगात युरोप मध्ये व्यापाराला आणि उत्पादनाला चालना मिळाली होती. ११ व्या व १२ व्या शतकापासून युरोपियन व्यापारी जमिन आणि सागरी मार्गाने व्यापार करू लागले होते. त्यांची जहाजे भूमध्य सागराच्या किनारपट्टीवर असलेल्या देशांबरोबर व्यापार करत होती. व्यापार वृद्धि बरोबर 'पैशाची अर्थव्यवस्था' अस्तित्वात आली. रोकड पैशांचा वापर वाढला असला तरी विषेशतः शेतकरीवर्गामध्ये वस्तुविनिमय महत्त्वाचा होता. मध्ययुगाच्या शेवटी युरोपमध्ये 'सार्वभौम राज्यांचा' उदय झाला. पण ह्या राज्यांचे स्वरूप आधुनिक 'राष्ट्र -राष्ट्रराजांप्रमाणे नव्हते, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. या राज्यातील

लोकांमध्ये आपण 'स्पॅनिश, फ्रेंच किंवा इटालियन' असलेली भावना अजून जागृत झाली नव्हती. आधुनिक राष्ट्र-राज्यांमध्ये लोकांना वांशिक- सांस्कृतिक आणि भाषिक परंपरांनी एकत्र बांधलेले असतात. अशा प्रकारची राज्य मध्य- १८व्या शतकानंतरच अस्तित्वात आली.

● **साम्राज्यवादाचे टप्पे :**

आधुनिक काळातील साम्राज्यवादाचे तीन टप्पे होते;

१) पहिला टप्पा : १५ व्या शतकाच्या शेवटच्या दशकांपासून ते इ. स. १८०० पर्यंत

२) दुसरा टप्पा : इ. स. १८०० ते १८७० पर्यंत

३) तिसरा टप्पा : इ. स. १८७० ते १९१४ पर्यंत

**१) पहिल्या टप्पा :**

१५ व्या शतकात नौकानयन, जलप्रवास, दारूगोळा इत्यादी साधनांचा शोध लागला. नवनव्या देशांचा शोध युरोपीय सुधारलेल्या राष्ट्रांनी लावला. जागतिक व्यापारामध्ये प्रचंड वाढ झाली. व्यापार करून देशाला सामर्थ्यशाली करता येते, असा प्रकारची तत्त्वप्रणाली प्रभावी होती. नवीन शोधलेल्या प्रदेशांमध्ये वसाहती स्थापन करून आर्थिक लाभ पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न ही राष्ट्रे करू लागली. आधुनिक साम्राज्यवादाची ही सुरुवात होती. या टप्प्यात पोर्तुगाल आणि स्पेन ह्या देशांची साम्राज्ये अस्तित्वात आली.

इ.स. १५०० ते १८०० ह्या कालखंडात युरोपियन देशांनी अमेरिका, भारत, दक्षिण आफ्रिका आणि जावा-सुमात्रा (भारताच्या पूर्वेकडील देश) या प्रदेशांमध्ये आपल्या वसाहती स्थापन केल्या. या कालखंडातील साम्राज्यवादाचा सर्वात जास्त फायदा इंग्लंडला झाला. हॉलंड, स्पेन आणि फ्रान्स यांच्याबरोबर युद्ध करून इ.स. १८०० पर्यंत इंग्लंडने कॅनडा, भारत, सिलोन, दक्षिण आफ्रिकेतील केप कॉलनी आणि ऑस्ट्रेलीया येथे वसाहती निर्माण केल्या होत्या. स्पेनने मध्य आणि दक्षिण अमेरिकन खंडात आपल्या वसाहती स्थापन केल्या होत्या. फ्रान्सने अमेरिकेतील लौईसियाना आणि फ्रेंच गयाना प्रदेशावर ताबा जमवला. हॉलंडने जावा-सुमात्रा ह्या प्रदेशावर नियंत्रण प्राप्त केले.

**२) दुसरा टप्पा :**

१८ व्या शतकाच्या शेवटी इंग्लंड आणि नंतर फ्रान्समध्ये औद्योगिक क्रांती घडून आली. औद्योगिक क्रांतीचे हे पहिले पर्व होते. औद्योगिक क्रांतीने साम्राज्यवादाचा अर्थ आणि स्वरूप बदलून टाकले. वसाहतींकडे बाजारपेठ म्हणून पाहिले जाऊ लागले. या टप्प्यात ब्रिटन, फ्रान्स आणि हॉलंड यांची साम्राज्य अस्तित्वात होती. मात्र वसाहतींची लोकप्रियता कमी झाली होती. इंग्लंड आणि स्पेनने उत्तर आणि दक्षिण अमेरिकेतील आपल्या वसाहतींच्या मोठा भाग गमावला. याच काळात एक अशी भावना सर्वत्र निर्माण झाली की, वसाहतींमुळे होणाऱ्या फायद्याच्या तुलनेत नुकसान जास्त होते. याशिवाय युरोपातील बहुतेक देश फ्रान्सचा राज्यकर्ता नेपोलियन बोनापार्ट याच्याबरोबर युद्ध करण्यात गुंतले होते. याचबोरोबर काही युरोपियन

देशांमध्ये क्रांत्या आणि राजकीय उलाढाल झाली होती. थोडक्यात, दुसऱ्या टप्प्यात साम्राज्यवादाला काही प्रमाणात अटकाव झाला.

**३) तिसरा टप्पा :**

१९ व्या शतकाच्या उत्तराधात जर्मनी, फ्रांस, बेल्जियन यासारख्या इतर युरोपियन देशांमध्ये औधोगिक क्रांतीचा विस्तार झाला. हे औद्योगिक क्रांतीचे दुसरे पर्व होते. नवीन शास्त्रीय शोध लागले. आधुनिक कारखान्यात तयार झालेल्या उत्पादनाला बाजारपेठ मिळवण्याची गरज या देशांना जाणवू लागली. देशातील अतिरिक्त उत्पादन विकण्यासाठी त्यांनी वसाहती स्थापन करायला प्रयत्न सुरु केले. इंग्लंड, फ्रान्स या देशांबरोबर जर्मनी, पोर्तुगाल, हॉलंड, स्पेन या राष्ट्रांनी आपली व्यापारी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वसाहती मिळवण्याच्या स्पर्धेत भाग घेतला. १८७०च्या सुमारास युरोपातील इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल, जर्मनी, हॉलंड या राष्ट्रांनी आशिया-आफ्रिका खंडात वसाहती मिळविण्यासाठी जोरदार स्पर्धा आरंभली व त्यातून छोटी-मोठी युद्धे देखील उद्भवली. आधुनिक साम्राज्यवादाच्या या टप्प्याला 'नव साम्राज्यवाद' म्हणून ओळखले जाते. तिसऱ्या टप्प्यात युरोपियन देशांनी आफ्रिका खंडाची एकमेकांमध्ये वाटणी करण्यासाठी फाळणी केली.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ साम्राज्यवादाच्या उदयाची आणि वृद्धीची कारणे :

**अ) साम्राज्यवादाच्या उदयाची कारणे :**

साम्राज्यवादाच्या उदयाची कारणे आपल्याला १५ व्या व १६ व्या शतकामधील युरोपियन देशांच्या परिस्थितीमध्ये शोधावी लागतात.

**१) भौगोलिक शोध :**

१५ व्या शतकाच्या मध्यपासून युरोपियन देशांनी भौगोलिक शोध मोहिमा हाती घेण्यास सुरुवात केली. युरोपमधील वस्तू उत्पादन वाढीस लागले होते. याशिवाय सोने, चांदी, मसाल्याचे पदार्थ, हत्तीदंत यासारख्या मौल्यवान वस्तूंची कमतरता जाणवू लागली. नवीन प्रदेश शोधल्यावर देशात तयार झालेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळेल आणि मौल्यवान वस्तूंची कमी भरून निघेल अशी युरोपियन राजकर्त्यांना आशा होती. पोर्तुगालच्या प्रिन्स हेनरी आणि स्पेनच्या फर्डिनंड व इसाबेला हे या शोध मोहिमांचे प्रमुख प्रायोजक होते. इ. स. १४९२ मध्ये स्पेनच्या शोध मोहिमेने कोलंबसच्या नेतृत्त्वाखाली अमेरिकन खंडाच्या शोध लावला. ह्या समुद्री मार्गांच्या शोधामुळे पुढील काळात व्यापाराला आणि नंतर साम्राज्यवादाला चालना दिली. इ.स. १४९८ मध्ये पोर्तुगीज शोध मोहीम वास्को द गामाच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेतील केप ऑफ गुड होपला वळसा मारून भारताकडे येणारा समुद्री मार्ग शोधून काढला. हॅर्नांडो कोर्टेज यांनी इ.स. १५१९ मेक्सिको शोधला आणि तेथील ॲझटेक लोकांचे राज्य काबीज केले. फ्रान्सिस्को पिजारियो याने पेरू देशातील इंका लोकांच्या राज्यावर विजय मिळवला.

**२) आर्थिक लाभ :**

१६ व्या शतकात युरोपियन देशांमध्ये व्यापारवादाची (Mercantilism) विचारप्रणाली प्रभावशाली झाली होती. व्यापारवाद हे युरोपियन राज्यांनी अवलंबलेले आर्थिक धोरण होते, ज्यामध्ये राष्ट्राचा व्यापार, वस्तू उत्पादन व उद्योगाचे नियंत्रण हे लष्करी सामर्थ्य प्राप्त करण्यासाठी व राज्याची राजकीय सत्ता वाढवण्यासाठी वापरले जात होते. धातुवाद (bullionism) व्यापारवादाचे एक वैशिष्ट्य होते. धातूवादाचा समज हा होता की राष्ट्राची सुबत्ता राष्ट्रांमध्ये असलेल्या मौल्यवान धातूच्या प्रमाणावर अवलंबून असते. यामुळे व्यापार वाढवण्यासाठी आणि मौल्यवान धातू मिळवण्यासाठी युरोपियन राष्ट्रांनी वसाहतींचा शोध सुरु केला.

**३) धर्मप्रसारासाठी नवे क्षेत्र :**

ख्रिस्ती धर्मामध्ये धर्मप्रसार केला की पुण्य मिळते असा समज प्रचलित होता. त्यामुळे राजे-राजवाडे ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठी नवीन प्रदेशांच्या शोधात होते. इ.स. १४९३ मध्ये ख्रिस्ती लोकांचा सर्वउच्च धर्मगुरू पोप अलेक्झांडर चौथ्याने गैर ख्रिस्ती जगाचे विभाजन स्पेन आणि पोर्तुगाल यांच्या मध्ये केले. वाटून दिलेल्या प्रदेशामध्ये स्पेन आणि पोर्तुगालने शोध मोहीमा हाती घेऊन आणि वसाहती स्थापन करायच्या होत्या. याबरोबर नवीन प्रदेशातील लोकांमध्ये ख्रिस्ती धर्माचा प्रसार करायचा होता.

**४) सुसंस्कृतीकरणाची मोहीम :**

युरोपियन लोकांमध्ये एक अशी समजूत होती की, नवीन भौगोलिक शोधामुळे सापडलेल्या प्रदेशावरील देशी लोकांचे संस्कृतीकरण करण्याची जबाबदारी परमेश्वराने त्यांना दिली होती. ह्या मागासलेल्या लोकांपर्यंत आधुनिक पाश्चात्य संस्कृती पोहचवण्याचे कारण सांगून युरोपियन लोकांनी त्यांच्या वर लष्करी स्वाऱ्या केल्या आणि त्यांच्या प्रदेशावर आपल्या वसाहती स्थापन केल्या. १५ व्या शतकानंतर विविध प्रदेशातील मूळ लोकांवरील हल्यांचे समर्थन करण्यासाठी या विचारांचा युरोपियन लोकांनी उपयोग केला. पोर्तुगीज, फ्रेंच, ब्रिटिश आणि जर्मनीने आपल्या साम्राज्याचे समर्थन करण्यासाठी 'सुसंस्कृत करण्याची मोहिम' (Civilizing Mission) या संकल्पनेचा उपयोग केला. अंकित देशांमधील मूळ लोकांवर पाश्चिमात्य संस्कृती चा प्रभाव निर्माण करणे हा या सुसंस्कृतीकरण मोहिमेचा उद्देश होता. जिथे अज्ञानी व दरिद्री लोक आहेत, तेथे आपण गेले पाहिजे व तेथील लोकांना सुधारले पाहिजे, अशी भूमिका युरोपियन लोकांनी स्वीकारली होती. भारतातील 'रानटी' लोकांना सुधारण्याचा अनेक ब्रिटिश अधिकाऱ्यांनी व पोर्तुगीज धर्मगुरूंनी प्रयत्न केला. अशा प्रकारची ब्रिटिशांची भूमिका आपमतलबी होती, हे लक्षात ठेवले पाहिजे. आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी युरोपियन लोकांनी केलेले हे एक लंगडे समर्थन होते.

**ब) साम्राज्यवादाच्या वृद्धीची कारणे :**

साम्राज्यवाद सुरु होण्यासाठी जवाबदार असलेले घटक पुढे देखील कार्यरत राहिले. पण काही नवीन घडामोडींमुळे साम्राज्यावादाला १८व्या व १९व्या शतकात चालना मिळाली. ह्या नवीन घटकांमुळे साम्राज्यवादाचे स्वरूप बदले आणि त्याचा विस्तार वाढला.

१८ व्या व १९ व्या शतकात साम्राज्यवादाचे चार महत्त्वाचे वैशिष्ट्ये होती.

१) वस्तू, लोक आणि भांडवल यांच्या आंतरराष्ट्रीय प्रवाहात तीक्ष्ण वाढ

२) औद्योगिक विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर असेल्या देशांना परस्परांवर अवलंबून करणारे संबंध

३) साम्राज्यवादी देशांमध्ये प्रगत आणि उच्च दर्जाचे तंत्रज्ञान

४) प्रगत भांडवली देशांची एकमेकांशी स्पर्धा

**१) औद्योगिक क्रांती :**

युरोपियन देशांमध्ये साम्राज्यवादाला औद्योगिक क्रांतीने चालना दिली. १८ व्या शतकाच्या शेवटच्या दशकांमध्ये इंग्लंडमध्ये मोठमोठे आधुनिक उद्योग अस्तित्वात आले. हे उद्योग ऊर्जेचा वापर करत होते आणि त्यांची उत्पादन करण्याची क्षमता देखील प्रचंड होती. इंग्लंड नंतर फ्रान्सने 'आद्योगिक क्रांती' मध्ये आघाडी घेतली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपयोगाने इंग्लंड आणि फ्रान्स मध्ये वस्तूंचे उत्पादन होऊ लागले. या वस्तूंची विक्री करण्यासाठी इंग्लंड आणि फ्रान्सला बाजारपेठांची गरज होती. त्यासाठी त्यांनी आशिया आणि आफ्रिकन खंडातील वसाहतींचा वापर करायला सुरुवात केली. साधारणतः इ.स. १८५० च्या सुमारास औद्योगिक क्रांती जर्मनी, बेल्जियम, जपान आणि अमेरिका ह्या इतर देशांमध्ये पसरली. हे औद्योगिक क्रांतीचे दुसरे पर्व होते. वाढीव उत्पादनाला हक्काची बाजारपेठ मिळवण्यासाठी या देशांमध्ये स्पर्धा लागली. नवीन वसाहती मिळवल्यानंतर आपल्या उत्पादनाला शाश्वत बाजारपेठ मिळेल यांची त्यांना खात्री झाली. याशिवाय त्यांना वस्तू उत्पादनासाठी कच्च्या मालाची आवश्यकता होती. नवीन वसाहतीमध्ये त्यांना कच्चा माल मिळण्याची आशा होती. पोर्तुगाल, स्पेन, इंग्लंड आणि फ्रान्स यांनी पूर्वीपासून वसाहती मिळवल्या होत्या. मात्र नवीन औद्योगिकीरण झालेले जर्मनी, अमेरिका, बेल्जियम आणि जपान सारख्या देशांकडे वसाहती नव्हत्या. त्यामुळे त्यांनी वसाहती मिळवण्यासाठी स्पर्धा सुरु केली. ह्या स्पर्धेतूनच युरोपियन देशांनी आफ्रिका खंडाच्या प्रदेशाला एकमेकांमध्ये वाटून घेण्याची प्रक्रिया अवलंबली.

**२) अतिरिक्त भांडवलाची सोय :**

औद्योगिक क्रांतीच्या काळात युरोपमध्ये काही महत्त्वाचे तांत्रिक व आर्थिक बदल घडून आले. औद्योगिक क्रांतीने निर्माण केलेले बदल खालीलप्रमाणे होते

१) उत्पादन पद्धतीमध्ये पाणी, वाफ आणि नंतर विद्युत शक्तीचा वापर

२) मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरण असलेल्या कारखान्यात उत्पादनावर दिला गेलेला भर.

३) देशी-विदेशी बाजारपेठा आणि त्यातील व्यापाराच्या स्वरूपात मूलभूत बदल.

४) निर्वाह शेतीचा (subsistence farming) प्रकार जवळजवळ नाहीसा झाला.

युरोपमधील ह्या प्रचंड परिवर्तनामुळे मानवी जीवनात आर्थिक व सामाजिक क्षेत्रात औद्योगिक भांडवलाचे

वर्चस्व स्थापन झाले. औद्योगिक भांडवलदारी कारखान्यांचा प्रमुख हेतू हा गुंतवणुकीवर जास्तीत जास्त नफा मिळवणे हा होता. औद्योगिक भांडवलशाही ही वाणिज्य भांडवलशाहीपेक्षा वेगळी होती. वाणिज्य भांडवलशाहीच्या केंद्रस्थानी व्यापारी विनिमय होता. औद्योगिक भांडवलशाहीत आर्थिक व्यवहारांच्या अनेक पैलूंवर 'भांडवलाचे' वर्चस्व निर्माण झाले. औद्योगिक भांडवलशाही अर्थव्यवस्थेत नफा मिळवणे हाच प्रमुख हेतू होता. कालांतराने युरोपियन देशातील उद्योगपतींकडे नफ्याच्या स्वरूपात भांडवलाचा मोठा संचय झाला. जमा झालेले अतिरिक्त भांडवल गुंतवण्यासाठी वसाहती हा एक उत्तम मार्ग होता. उद्योगपतींनी आपल्या देशांच्या वसाहतींमध्ये कच्चा माल निर्माण करण्याऱ्या छोट्या-मोठ्या उद्योगामध्ये आपले अतिरिक्त भांडवल गुंतवले. त्यांना आपले अतिरिक्त भांडवल गुंतवणूक करण्याचा किफायतशीर मार्ग मिळाला.

**३) अतिरिक्त लोकसंख्येची सोय :**

युरोपमध्ये मध्ययुगीन काळाच्या शेवटी लोकसंख्येची वाढ घडून आली. १४ व्या शतकात युरोपमध्ये प्लेगची महामारी आली होती. इ. स. १३४७ मध्ये प्लेगची साथ आली. पुढील तीन वर्षे सर्व युरोपभर हाहाकार मजला. प्लेगच्या साथीनंतर युरोपची लोकसंख्या खूप कमी झाली होती. मात्र १५ व्या शतकापासून युरोपच्या परिस्थितीमध्ये सुधारणा होऊ लागली. युरोपची लोकसंख्या पूर्वपदाला आली. वैद्यकीय शास्त्राच्या क्षेत्रात महत्त्वाचे शोध लागले. मनुष्याचे आयुर्मान वाढले. याचा एक परिणाम असा झाला की, युरोपच्या लोकसंख्येमध्ये वृद्धी झाली. वाढत्या लोकसंख्येच्या हाताला काम आणि उपजीविकेचे साधन देणे आवश्यक होते. युरोपियन राजकर्त्यांनी वसाहतींवर आपल्या लोकांची सोय लावण्याचा सोपा मार्ग स्वीकारला. युरोपियन राजकर्त्यांना कळाले की, वसाहतीच्या प्रशासनात व अर्थकारणात आपल्या देशातील अतिरिक्त लोकसंख्येला रोजगार देऊन आपण त्यांची सोय लावू शकतो. युरोपियन देशांमध्ये जास्तीत जास्त वसाहती मिळवण्यासाठी स्पर्धा होण्याचे हे एक महत्त्वाचे कारण मानले जाते.

**४) दळणवळण व संपर्क यंत्रणेत सुधारणा :**

जॉन के (John Kay) च्या धावता घोटा (flying shuttle) पासून ते राईट बंधूंच्या विमानापर्यंत संशोधकांनी लावलेल्या अद्भुत शोधांमुळे मानवी जीवन गतिमान झाले. बाष्पशक्ती, विद्युतशक्ती, कोळसा, आणि लोखंड यांच्या शोधांमुळे वाहतूक व दळणवळण क्षेत्रात प्रचंड वेग आला. टेलिग्राफ, रेल्वे आणि आगबोटीचा शोध यासाठी कारणीभूत होते. पूर्वी मानवाला घोड्याच्या वेगापेक्षा लवकर प्रवास करता येत नव्हता. मात्र आगगाडी आणि आगबोटीमुळे त्याला लवकर प्रवास करणे शक्य झाले. विज्ञानाच्या विकासामुळे आधुनिक शस्त्रांची निर्मिती शक्य झाली. यामुळे मानवातील अतिमहत्त्वाकांक्षा जागी झाली आणि अनेक राष्ट्रांमध्ये साम्राज्यवाद वाढीस लागला. आधुनिक शस्त्रे आणि लोखंडी सांगाडा असलेल्या आगबोटींमुळे देशांतर्गत नद्यांवर प्रवास करणे सोयीस्कर झाले. त्यांचा उपयोग करून अंतर्गत प्रदेशाचा शोध घेण्याचा मार्ग मोकळा झाला. १९व्या शतकात युरोपियन लोकांनी आगबोटीच्या माध्यमातून आपली सत्ता अनेक देशात प्रस्तापित केली. ब्रिटिशांनी गंगा नदीवर,रशियन लोकांनी सायबेरिया प्रदेशातील नद्यांवर, अमेरिकेतील श्वेतवर्णीय  लोकांनी मिसूरी नदीवर आगबोटीचा वापर केला. पूर्वीच्या काळात दळणवळणाची

साधने नसल्यामुळे राजवट प्रस्थापित करणे आणि टिकवणे अवघड होते. मात्र १९व्या शतकाच्या उत्तरार्धात दळणवळणाचे नवीन तंत्रज्ञान विकसित झाल्यामुळे मोठी साम्राज्ये स्थापन करणे शक्य झाले. इ. स. १८६९ मध्ये सुएज कालवा सुरू झाल्यामुळे भारत आणि इंग्लंड मधील अंतर चार हजार मैलांनी कमी झाले. रेल्वे सुरू झाल्यामुळे आशिया, आफ्रिका, उत्तर आणि दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया च्या प्रदेशात आयात आणि निर्यात करण्यासाठी नवीन बाजार पेठा खुल्या झाल्या. एकंदरीत पाहता टेलिग्राफ, रेल्वे आणि आगबोटीचा शोधाने साम्राज्यवादाला चालना दिली.

**५) युरोपियन श्रेष्टत्वामध्ये विश्वास :**

युरोपियन देशांमध्ये साम्राज्य निर्माण करण्याची स्पर्धा होण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांच्यात जागृत झालेला टोकाचा राष्ट्रीय अभिमान होय. युरोपियन लोक साम्राज्याकडे राष्ट्रीय प्रतिष्ठेचे प्रतीक म्हणून पाहत असत. अनेक युरोपियन लोक स्वतःला इतर लोकांपेक्षा श्रेष्ठ समजत. त्यांना प्रचंड जात्याभिमान होता. त्याकाळात चार्ल्स डार्विनचे विचार समाजाला लागू केल्यामुळे survival of the fittest (जो लायक असेल तोच टिकेल) हा विचार युरोप मध्ये लोकप्रिय होता. ज्या लोकांना यश आणि संपत्ती मिळाली असे अशा लोक इतरांपेक्षा श्रेष्ठ मानले जात असे. गैर युरोपियन लोकांना सांस्कृतिक आणि शारीरिक विकासाच्या मापदंडावर खालचा दर्जा दिला जात असे कारण त्यांनी वैज्ञानिक किंवा तांत्रिक प्रगती केली नव्हती. या श्रेष्ठत्वाच्या भावनेतूनच युरोपियन लोकांना इतर देशांमधील मागासलेल्या गैर युरोपियन कृष्णवर्णीय लोकांना संस्कृती, कायदा व सुव्यवस्था बहाल करून मदत करण्याचा विचार निर्माण झाला होता. The White Man's Burden (श्वेतवर्णीय व्यक्तीचे ओझे) असे ह्या विचाराला म्हटले जात होते. मागासलेल्या गैर युरोपियन लोक किंवा कृष्णवर्णीय लोकांना आधुनिक सभ्यतेचे फायदे देण्यासाठी साम्राज्य निर्माण करणे युरोपियन लोकांना आवश्यक वाटत होते. थोडक्यात मागास जातींच्या लोकांना सुसंस्कृत करण्याची जबाबदारी श्रेष्ठ जातीच्या लोकांची आहे असा समज युरोपियन लोकांमध्ये रूढ होता. या विचाराने साम्राज्य निर्मितीला गती दिली.

**६) टोकाचा राष्ट्रवाद :**

१९ व्या शतकाच्या उत्तरार्ध हा तीव्र राष्ट्रवादाचा काळ होता. जर्मनी आणि इटली हे नुकतेच राष्ट्र म्हणून उभारले होते. या काळातील राष्ट्रवाद हा प्रतिष्ठा व जात्याभिमानाच्या अतिरेकाशी जोडला गेला होता. अनेक राष्ट्रांनी आपण इतर राष्ट्रापेक्षा कसे श्रेष्ठ आहोत, हे सांगण्यासाठी मिथके विकसित केली होती. प्रत्येक युरोपियन राष्ट्राला असे वाटू लागले की, आपल्याकडे साम्राज्य असल्याशिवाय आपली प्रतिष्ठा व सत्ता वाढणार नाही. साम्राज्यवादाची संकल्पना काही युरोपियन राष्ट्रांमध्ये इतकी लोकप्रिय झाली की, इंग्लंड, फ्रांस व जर्मनी देशातील काही लेखक आणि वक्त्यांनी साम्राजवादाचा प्रचार करण्यासाठी संस्था सुरू केल्या. आपल्या राष्ट्राच्या वसाहतींना संबोधण्यासाठी 'साम्राज्य' शब्द वापरण्यामध्ये त्यांना गर्व वाटत असे.

**७) आफ्रिका आणि आशिया मध्ये साम्राज्यवादाला अनुकूल परिस्थिती :**

आफ्रिका आणि आशिया खंडातील देशामध्ये १९ व्या शतकापर्यंत औद्योगिक क्रांती पोहोचली नव्हती.

या देशांमधील कारागीर उत्तम वस्तूंचे उत्पादन करत होते. पण वस्तू उत्पादनाचे स्वरूप हस्तकला उद्योगाचे होते. त्याच्या तुलनेत पाश्चिमात्य युरोपियन देशांमधील यंत्रांच्या साहाय्याने वस्तूंचे केलेले उत्पादन जास्त टिकाऊ होते. हस्तकला उद्योगांना आधुनिक कारखानदारी उत्पादनाशी स्पर्धा करणे शक्य नव्हते. दुसरे असे की, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे युरोपियन राष्ट्रांनी आधुनिक शस्त्रांची निर्मिती सुरु केली होती. त्यामुळे आफ्रिकी आणि आशियाई देशांना त्यांची लष्करी क्षेत्रात बरोबरी करणे शक्य नव्हते. याचबरोबर, यांचे शासनकर्ते देखील खूप कमकुवत झाले होते. या देशांमध्ये जुनाट मध्ययुगीन शासन परंपरा अस्तित्वात होत्या. आधुनिक राष्ट्र-राज्य आफ्रिकेत आणि आशिया खंडातील देशांमध्ये अजून विकसित झाले नव्हते. बहुतेक देशांमध्ये सरंजामदारी व्यवस्था अस्तित्वात होती. लोक राजे-रजवाड्यांना पाठिंबा देत होते. राजे-रजवाडे मात्र त्यांचे कल्याण करत नसत. ह्या परिस्थितीमुळे संख्येने अत्यंत कमी असलेले युरोपियन लोक आफ्रिका आणि आशिया खंडातील संपूर्ण देशांवर कब्जा करून साम्राज्य स्थापन करू शकले.

**८) शोधक प्रवासींचे कार्य :**

युरोपमधील शोधक प्रवासी व साहसप्रिय व्यक्तींनी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात लावलेल्या भौगोलिक शोधांमुळे साम्राज्यवादाला चालना मिळाली. शोधक प्रवाशांनी माहित नसलेल्या प्रदेशांचा शोध घेतला आणि त्यांच्या बद्दल मिळालेल्या माहितीचा प्रसार केला. ह्या अज्ञात प्रदेशांमध्ये व्यापार आणि विकासासाठी असलेल्या संधींची माहिती युरोपियन लोकांना दिली. सर्वसाधारणपणे शोधक प्रवाशांकडून अशा प्रकारची माहिती मिळाल्यावर त्या प्रदेशात एक 'व्यापारी चौकी' निर्माण केली जात असे. कालांतरानी युरोपियन देशाचे सरकार त्या सर्व इलाख्याला स्वतःच्या संरक्षणाखाली घेत असे. यानंतर काही काळाने युरोपियन देश सर्व प्रदेशावर आपला दावा सांगत असे. ही प्रक्रिया वापरून युरोपियन देशांनी सर्व आफ्रिका खंडावर आपले नियंत्रण निर्माण केले.

**● स्वयं अध्ययन प्रश्न - १**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) .............. देशाने इ.स. १५०० ते १८०० या पहिल्या टप्प्यात साम्राज्ये निर्माण केली होती.

अ) इंग्लंड ब) पोर्तुगाल आणि स्पेन क) जर्मनी ड) फ्रान्स

२) .............. मध्ये पहिल्यांदा औद्योगिक क्रांती घडून आली.

अ) जर्मनी ब) फ्रान्स क) इंग्लंड ड) पोर्तुगाल

३) इ. स. १४९२ मध्ये कोलंबसने .............. चा शोध लावला.

अ) भारत ब) आफ्रिका क) अमेरिका ड) वेस्ट इंडिज

४) औद्योगिक क्रांतीचे दुसरे पर्व इ.स. .............. च्या सुमारास सुरू झाले.

अ) १७५० ब) १८५० क) १९०० ड) १९१४

५) ............. च्या वापरामुळे आफ्रिकेच्या अंतर्गत भागामध्ये प्रवास सुखर झाला.

अ) आगगाडी ब) आगबोट क) मोटरगाडी ड) टेलिग्राफ

### ३.२.२ आफ्रिकेची फाळणी :

आफ्रिका खंडाला अज्ञात खंड किंवा काळे खंड (Dark Continent) म्हणून ओळखले जात असे. ह्या खंडामध्ये घनदाट जगले, प्रचंड आकाराची सरोवरे व नद्या, वाळवंटे असल्यामुळे आफ्रिकेच्या अंतर्गत भागाबद्दल फारशी माहिती युरोपियन लोकांना नव्हती. पोर्तुगीज खलाशी वास्को- दा-गामा १४९८ साली आफ्रिकेच्या टोकाला (केप ऑफ गुड होप) वळसा मारून भारताला समुद्री मार्गाने पोहचला. ह्या मोहिमेमुळे आफ्रिकेबद्दल युरोपियन लोकांना माहिती मिळाली. आफ्रिका खंडाच्या इतिहासाला कलाटणी देणारी ही घटना होती. आफ्रिकेतील मुबलक नैसर्गिक साधन संपत्तीमुळे युरोपियन लोक आकर्षित झाले. युरोपियन लोकांनी आफ्रिकेच्या काही भागातील लोकांबरोबर व्यापारी संबंध प्रस्तापित केले. पुढे त्यांनी आफ्रिकेतील लोकांना गुलाम करून त्यांचा व्यापार करण्यास सुरुवात केली. इ.स. १८७५ पर्यंत आफ्रिकेचा फक्त १/५ भाग युरोपियन लोकांच्या नियंत्रणाखाली होता. मात्र नंतर काहीच वर्षांमध्ये सर्व आफ्रिका खंडातील प्रदेशाची फाळणी करून विविध साम्राज्यवादी युरोपियन देशांमध्ये वाटणी करण्यात आली. यानंतर साम्राज्यवादी युरोपियन देशांनी नियंत्रणाखाली असलेल्या प्रदेशावर आपला जम पक्का केला.

#### अ) आफ्रिकी गुलामांचा व्यापार :

युरोपियन लोकांचे आफ्रिकेबरोबर सुरू झालेले व्यापारी संबंध १५ व्या शतकाच्या शेवटीपर्यन्त फक्त आफ्रिकेच्या समुद्र किनाऱ्याच्या इलाख्यापुरतेच मर्यादित होते. तरी देखील ह्या संबंधांचा आफ्रिकेतील एतद्देशीय लोकांवर खूप गंभीर परिणाम झाला. युरोपियन लोक आफ्रिकन गावांवर हल्ले करून स्थानिक लोकांना गुलाम करत असत आणि नंतर त्यांची वाहतूक करत असत. अमेरिकेतून जेव्हा गुलामांची मागणी वाढली तेव्हा गुलामांचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांनी आफ्रिकेतून थेट अमेरिकेला गुलाम पाठवायला सुरुवात केली.

आफ्रिकन गुलामांचा व्यापार पोर्तुगीज लोकांनी सुरु केला होता. नंतर इंग्रजी व्यापाऱ्यांनी गुलामांच्या व्यापारावर आपला प्रभाव जमवला. इ.स. १५६२ मध्ये सर जॉन हॉकिन्स नावाच्या एक श्रीमंत इंग्रजी व्यापाऱ्याने पहिल्यांदा आपले जहाज वापरून आफ्रिकेतील गुलाम इंग्लंडला आणले होते. इ.स. १८५० पर्यंत हा गुलामांचा व्यापार चालला. लाखो आफ्रिकी लोकांना बेघर करण्यात आले. व्यापाऱ्यांना विरोध करणाऱ्यांना मारले गेले. गुलामांची वाहतूक जहाजातून केली जात असे. त्यांना वस्तू असल्यासारखी वागणूक दिली जात असे. हजारो गुलाम प्रवास करतांनाच जहाजावर मृत्युमुखी पडले.

१९ व्या शतकाच्या प्रारंभी गुलामांच्या व्यापाराचे महत्त्व कमी झाले. युरोपियन राष्ट्रांनी आफ्रिकेचे शोषण करण्यासाठी दुसरा मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न सुरू केला. गुलामांच्या व्यापारावर बंदी आणण्याचे सबब सांगून काही युरोपियन देशांनी आफ्रिकन समूहांच्या प्रमुखांवर किंवा राज्यांवर युद्ध छेडले व त्यांचा प्रदेश काबीज केला. याच दरम्यान काही शोधक प्रवाशांनी आफ्रिका खंडाच्या अंतर्गत प्रदेशाची माहिती मिळवायला सुरूवात

केली होती. स्पेके, पार्क, लिविंगस्टोन आणि स्टॅन्ली यांच्या प्रयत्नांमुळे नाईल, नायजर आणि काँगो नद्यांच्या प्रदेशाबद्दल माहिती मिळाली. त्यांनी आफ्रिकन प्रदेशाचे अचूक नकाशे तयार केले. पूर्वी युरोपियन लोकांना मलेरिया आणि पिवळा तापाच्या (yellow fever) रोगामुळे आफ्रिकेच्या वातावरणात जिवंत राहणे अवघड वाटत असे. मात्र ह्या रोगांवरील औषधाचा शोध लागल्यामुळे युरोपियन लोकांना आफ्रिकेच्या प्रदेशात स्थायिक होणे शक्य झाले. इ.स. १८२९ मध्ये क्यूनाईन औषधाचा शोध लागल्यामुळे युरोपियन लोक मलेरिया रोगापासून बचावले. दळणवळणाच्या साधनांमुळे युरोपियन लोकांना आफ्रिकन जंगलातून मोठमोठी सैन्यांची हालचाल करणे सोपे झाले. या सैन्याचा उपयोग करून त्यानी स्थानिक लोकांवर वर्चस्व निर्माण केले. साम्राज्यवादी युरोपियन राष्ट्रांना आफ्रिकेतील प्रदेशावर आपली थेट राजवट स्थापन करायची होती. इ.स. १८७० पर्यंत इंग्लंडने केप कॉलोनी, नाताळ, लागोस, गोल्ड कोस्ट, झांबिया, फ्रान्सने अल्जेरिया, फ्रेंच गिनी, आयव्हरी कोस्ट, तर पोर्तुगीजांनी मोझांबिक, अँगोला या किनारी प्रदेशात आपल्या वसाहती स्थापन केल्या.

**ब) आफ्रिकी प्रदेशासाठी झटापट :** (Scramble for Africa)

१९ व्या शतकाच्या उत्तार्धात आफ्रिकेत वसाहत निर्माण करण्याचा पहिला मान बेल्जियमने पटकावला. बेल्जियमचा राजा दुसरा लिओपोल्डच्या प्रयत्नातून कांगो नदीच्या खोऱ्यात बेल्जियमचे राज्य निर्माण झाले. इ.स. १८७६ मध्ये त्याच्या पुढाकाराने भूगोलतज्ज्ञ आणि संशोधकांची एक आंतरराष्ट्रीय परिषद बेल्जियमची राजधानी ब्रुसेल्स येथे आयोजित केली होती. ह्या परिषदेमध्ये आफ्रिकेत ज्ञानाचा प्रसार व्हावा म्हणून इंटरनॅशनल असोसिएशन फॉर द एक्सप्लोरेशन अँड सिव्हिलिझशन ऑफ सेंट्रल आफ्रिका (International -ssociation for the Exploration and Civilization of Central Africa) ह्या नावाची संघटना स्थापन केली. लिओपोल्ड ह्या संघटनेचा स्वतः अध्यक्ष झाला. त्याचे आफ्रिकेच्या काँगो प्रदेशाकडे विशेष लक्ष होते. १८६० च्या दशकामध्ये स्कॉटलंड मधील डेविड लिविंगस्टोन नावाचा ख्रिस्ती मिशनरी मध्य आफ्रिकेचा शोध घेण्यासाठी गेला होता. त्याला आफ्रिकेच्या एतद्देशीय लोकांमध्ये ख्रिस्ती धर्माचा प्रसार करायचा होता. मात्र अनेक वर्ष त्याची कोणतीही बातमी आली नाही. अनेकांना त्याचा मृत्यू झाला असे वाटू लागले. लिविंगस्टोनचा शोध घेण्यासाठी एका अमेरिकी वृत्तपत्रांनी हेन्री स्टॅन्ले ह्या पत्रकाराला पाठवले. इ.स. १८७१ मध्ये हेन्री स्टॅन्लेने डेव्हिड लिविंगस्टोनला शोधून काढले. तो आफ्रिकेतील प्रसिद्ध तलाव ‘लेक टांगानिकाच्या’ काठी राहत होता. या घटनेच्या बातमीमुळे सर्व युरोपभर खळबळ माजली होती. लिविंगस्टोनच्या दैनंदिनी प्रसिद्ध झाल्यानंतर युरोपियन लोकांची आफ्रिकेतील रुची वाढली. लिविंगस्टनला इंग्लंडमध्ये ‘राष्ट्रीय नायकाचा’ (National Hero) दर्जा दिला गेला.

त्यानंतर काही दिवसांनी स्टॅन्लेने काँगो नदीचा उगम शोधला. स्टॅन्लेच्या कृतीने बेल्जियमचा राजा दुसरा लिओपोल्डचे लक्ष वेधले. लिओपोल्ड अत्यंत महत्त्वाकांक्षी स्वभावाचा होता. त्याने स्टॅन्लेची काँगो खोऱ्यामधील प्रदेश मिळवण्यासाठी मदत घेतली. इ.स. १८७९ ते १८८२ ह्या दरम्यान स्टॅन्लेने काँगो नदीच्या खोऱ्यातील अनेक समूहांच्या प्रमुखांशी करार केले. स्टॅन्लेने केलेल्या करारांनी ह्या सर्व प्रदेशावर बेल्जियमच्या दुसऱ्या लिओपोल्डचे नियंत्रण निर्माण झाले.

लिओपोल्डने दावा केला की, त्याने गुलामांचा व्यापार बंद करण्यासाठी आणि ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठी काँगो खोऱ्यात प्रदेश मिळवला होता. मात्र वास्तवात त्याने हा प्रदेश काही खाजगी कंपन्यांना वाटून दिला. खाजगी कंपन्यांनी आफ्रिकी लोकांचे शोषण केले. त्यांना सक्तीने  रब्बरच्या झाडाचा चीक गोळा करायला लावला. असे म्हटले जाते की, लिओपोल्डच्या जुलमी राजवटीमध्ये दहा दशलक्ष आफ्रिकी लोकांचा मृत्यू झाला होता.

बेल्जियमनंतर इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, इटली, पोर्तुगाल, हॉलंड या युरोपीय राष्ट्रांनी सुद्धा आफ्रिकेतील वेगवेगळ्या प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. दक्षिण आफ्रिकेमध्ये इ.स. १८६७ मध्ये हिरे आणि इ.स. १८८६ मध्ये सोन्याचा शोध लागला. यामुळे आफ्रिकन खंडामध्ये आपल्या वसाहती स्थापन करण्याची युरोपियन देशांची इच्छा आणखीनच तीव्र झाली. आफ्रिकेतील नैसर्गिक आणि खनिज संपत्तीचे शोषण करण्याच्या स्पर्धेत कोणत्याही युरोपियन देशाला मागे राहायचे नव्हते.

युरोपियन देशांमध्ये आफ्रिकी प्रदेश मिळवण्यासाठी इ.स. १८८० पासून झटापट सुरू झाली. ह्या दरम्यान फ्रेंचांनी आफ्रिकेच्या पश्चिम किनारपट्टीवरुन पश्चिम सुदानच्या दिशेने प्रदेश विस्तार करण्यास सुरूवात केली. लिओपोल्डने आपले वर्चस्व निर्माण केलेल्या प्रदेशाला 'बेल्जियम काँगो' असे नाव दिले होते. हा बेल्जियम काँगोचा प्रदेश बेल्जियमच्या आकारापेक्षा अनेकपटीने मोठा होता. ह्या प्रदेशाचा वापर करून बेल्जियमने झपाट्याने प्रगती केली. बेल्जियमची प्रगती पाहून इतर युरोपियन देशांचे लक्ष देखील आफ्रिकन खंडाकडे वळाले. फ्रान्सने देखील काँगो प्रदेशाचा शोध घेतला. काँगो खोऱ्यात फ्रान्स आणि बेल्जियम यांच्या संघर्ष सुरू होण्याची चिन्ह दिसू लागली. मात्र तसे झाले नाही. दोन्ही देशांनी तडजोड केली आणि  समन्वयाने काँगो खोऱ्यावर दोन्ही देशांनी आपले वर्चस्व निर्माण केले.

**क) बर्लिन परिषद (इ. स. १८८४-८५)  आणि आफ्रिकेची फाळणी :**

बेल्जियम आणि फ्रान्सचा काँगो खोऱ्यात झालेला साम्राज्यविस्तार इतर युरोपियन देशांना रुचला नाही. त्यांच्यामध्ये बेल्जियम व फ्रान्स बद्दल कटुता निर्माण झाली. इतर युरोपियन राष्ट्रांना देखील आफ्रिकेत साम्राज्य विस्तार करायचा होता. त्याच्यामधील स्पर्धा इतकी तीव्र झाली की, त्यांच्या मध्ये युद्ध सुरू होण्याची भीती निर्माण झाली. एकमेकांमध्ये संघर्ष टाळण्यासाठी १४ युरोपियन राष्ट्रांची जर्मनीची राजधानी बर्लिन येथे एक परिषद इ.स. १८८४-१८८५ मध्ये आयोजित केली. जर्मनीचा चॅन्सलर बिस्मार्कने ही परिषद आयोजित करण्यामध्ये पुढाकार घेतला होता. जर्मनीला ही परिषद आयोजित करण्याची विनंती पोर्तुगालने केली होती. या परिषदेनंतर एका तहावर स्वाक्षरी करण्यात आल्या. ह्या तहाला बेर्लिनचा तह म्हणून ओळखले जाते. ह्या तहामध्ये काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले, ते असे:

१) युरोपीय राष्ट्रांनी बेल्जियमचे काँगोवरील वर्चस्व मान्य केले.

२) बेल्जियमच्या ताब्यातील प्रदेश हा लिओपोल्डच्या व्यक्तिगत मालकीचा होता, हे मान्य करण्यात आले.

३) काँगो व नायगर नद्यांवर जलवाहतुकीचे स्वातंत्र्य जाहीर करण्यात आले.

४) आफ्रिकेतील नवीन प्रदेश कोणत्याही युरोपीय राष्ट्राने आपल्या अंकित करून घेतल्यास, त्या संबधीची माहिति इतर युरोपीय राष्ट्रांना द्यावी, असे ठरविण्यात आले.

५) गुलामगिरी व गुलामांचा व्यापार ह्याचा निषेध करण्यात आला.

बर्लिन परिषदेचा प्रमुख हेतू आफ्रिकेची फाळणी करणे हा होता. परिषदेत सहमती झाली की, कुठल्याही युरोपियन देशाला आफ्रिकेतील प्रदेशावर दावा करता येईल. मात्र त्याला दाव्याबद्दल इतर राष्ट्रांना सूचना द्याव्या लागतील व दावा केलेला प्रदेश आपल्या नियंत्रणाखाली आहे हे दाखवावे लागेल. थोडक्यात, युरोपियन राष्ट्रांना 'प्रभावाची क्षेत्रे' (spheres of influence) तयार करावी लागतील. बर्लिनच्या तहामध्ये पहिल्यांदा 'प्रभाव क्षेत्रांच्या संकल्पनेचा उल्लेख केला गेला. ह्यामुळे आफ्रिकेच्या फाळणीला चालना मिळाली आणि साम्राज्यवादाचे एक नवीन पर्व सुरू झाले. बर्लिनच्या तह युरोपियन राष्ट्रांमधील एक करार होता ज्याच्या माध्यमातून आफ्रिकेची फाळणी जास्तीतजास्त सौहार्दपूर्ण वातावरणात करण्याचा प्रयत्न केला गेला. याशिवाय युरोपमधील संघर्षांना वसाहती मिळवण्याच्या स्पर्धेपासून वेगळे ठेवण्याचा प्रयत्न ह्या तहाने केला.

युरोपियन राष्ट्रांनी आफ्रिका खंडाची विभागणी करतांना आफ्रिकेतील लोकांची भाषा, संस्कृती व जमातींचा कोणताही विचार केला नाही. परिषदेच्या बैठकीत कोणत्याही आफ्रिकी राज्याला निमंत्रित केले गेले नाही. पुढील काळात युरोपियन राष्टांनी आफ्रिकी खंडाची विभागणी आपापसात करून घेतली. ती खालील प्रमाणे होती:

**१) इंग्लंड :**

इंग्लंडने आफ्रिकेच्या नायजर नदीच्या खोऱ्यात आपल्या वसाहती स्थापन केल्या. केप कॉलनी, सुदान, युगांडा, ऱ्होडेशिया, ब्रिटिश पूर्व आफ्रिका, झाम्बिया, नायजेरिया हा प्रदेश अंकित केला. तसेच सुवेझ कालव्याच्या सुरक्षेच्या मुद्यांवरून इंग्लंडने इजिप्तचा ताबा घेतला. सेलील ऱ्होड्स नावाच्या एका इंग्रजी व्यापाऱ्याने दक्षिण आफ्रिकेतील केप कॉलनी ते इजिप्त मधील कैरो शहरापर्यंत रेल्वे सुरू करण्याचा प्रयन्त केला. यात तो यशस्वी झाला नसला तरी त्याच्या प्रयत्नांनी दक्षिण आफ्रिका इंग्लंडच्या ताब्यात आला. इंग्लंड ही आफ्रिकन खंडातील सर्वात प्रभावी साम्राज्यवादी सत्ता होती. आपल्या आफ्रिकेतील वसाहतींचा वापर करून इंग्लंड भारताकडे जाणाऱ्या समुद्री व्यापारी मार्गांचे संरक्षण करत असे.

**२) बेल्जियम :**

बेल्जियम हा आफ्रिकेतील प्रदेशावर कब्जा मिळवणारा पहिला देश होता. आफ्रिका खंडाच्या मध्यभागी असलेला प्रदेश त्याच्या ताब्यात होता. याप्रदेशाला बेल्जियम काँगो असे म्हंटले जात असे. याप्रदेशातून बेल्जियमला मोठ्या प्रमाणात रबर व खनिज संपत्ती मिळाली.

**३) हॉलंड :**

डचांनी दक्षिण आफ्रिकेतील केप कॉलोनी, नाताल, ऑरेंज फ्री स्टेट, ट्रान्सव्हाल ह्या भागात आपल्या

वसाहती स्थापन केल्या.

**५) फ्रान्स :**

फ्रान्सने सेनेगल नदीच्या वरच्या दिशेने पुढे सरकण्यास सुरुवात केली. त्यांनी आपल्या ताब्यात सहारा वाळवंटाचा प्रदेश, अल्जेरिया, कांगो, मादागास्कर बेटे तसेच मोरोक्को इत्यादी प्रदेश घेतला. फ्रान्सला आफ्रिकी वसाहतींमधून मोठ्या प्रमाणात गहू, फळे, लोकर, कापूस, चामड्याच्या वस्तू इत्यादी गोष्टी मिळत असत.

**६) जर्मनी :**

जर्मनीने नेर्ऋत्य (South-West) आफ्रिका, केमेरून, पूर्व आफ्रिका या प्रदेशावर आपल्या वसाहती स्थापन केल्या.

**७) स्पेन :**

स्पेनने रियो-डी-ओरो या प्रदेशावर तसेच मोरोक्कोच्या उत्तर भागावर व गिनी कोस्ट मधील काही बेटांवर आपले वर्चस्व स्थापन केले.

**८) पोर्तुगीज :**

पोर्तुगीज लोकांनी पश्चिम किनाऱ्यावरील प्रदेश, अंगोला प्रांत, मोझांबिक येथे वर्चस्व प्रस्तापित केले.

**९) इटली :**

इतर युरोपियन देशांप्रमाणे इटली या देशाने सुद्धा आफ्रिकेच्या काही प्रदेशावर आपली सत्ता स्थापन केली होती. इटलीने इरिट्रिया व सोमालिया तसेच ट्रिपोली व सायरेनिका या प्रदेशावर आपला ताबा जमवला होता. इ.स. १९१४ पर्यंत आफ्रिकेतील फक्त लायबेरिया आणि इथिओपिया हेच प्रदेश युरोपियन नियंत्रणाबाहेर राहिले होते.

● **स्वयं अध्ययन प्रश्न:-२**

**अ) योग्य पर्याय निवडा**

१) .............. ला 'काळे खंड' म्हणून ओळखले जात होते.

अ) अमेरिका ब) आशिया क) युरोप ड) आफ्रिका

२) आफ्रिकेतील गुलाम इंग्लंडला पहिल्यांदा .............. यांनी आणले होते.

अ) विलियम हॉकिन्स ब) जॉन हॉकिन्स क) दुसरा लिओपोल्ड ड) सेलील ऱ्होड्स

३) रियो-डी-ओरो ही .............. देशाची वसाहत होती.

अ) इंग्लंड ब) फ्रान्स क) स्पेन ड) पोर्तुगाल

४) दुसरा लिओपोल्ड हा ............. देशाचा राजा होता.

अ) इंग्लंड ब) पोर्तुगाल क) बेल्जियम ड) फ्रान्स

५) बर्लिन परिषदेमध्ये ............. युरोपियन देशांनी हजेरी लावली होती.

अ) १० ब) १२ क) १४ ड) १६

### ३.२.३ साम्राज्यवादाचे जगावरील परिणाम :

इ. स. १५०० मध्ये युरोपियन देशांच्या ताब्यात पृथ्वीवरील ७ टक्के जमीन होती. इ. स. १८०० मध्ये त्यांचे नियंत्रण ३५ टक्के जमिनीवर होते. इ. स. १९१४ मध्ये त्यांचे नियंत्रण ८४ टक्के जमिनीवर होते. इ.स. १८७१ ते १९०० ह्या काळात ब्रिटिश साम्राज्यामध्ये पृथ्वीवरील जमिनीचा एक चर्तुथांश भाग होता, ६६ दशलक्ष लोक आणि ४.५ दशलक्ष चौरस मैल जमीन होती. फ्रेंच साम्राज्यात ३.५ दशलक्ष चौरस मैल जमीन होती आणि जर्मनी, बेल्जियम, इटली यांच्या कडे प्रत्येकी १ दशलक्ष चौरस मैल जमीन होती. ह्या सर्व साम्राज्यवादी राजवटींचे वसाहतींवर आमूलाग्र परिणाम झाले. साम्राज्यवादी देशामध्ये देखील परिवर्तन घडून आले.

### अ) साम्राज्यवादाचे दुष्परिणाम :

#### १) वसाहतींना आपले स्वातंत्र्य गमवावे लागले :

साम्राज्यवादाच्या सर्वात मोठा राजकीय परिणाम हा होता की, वसाहतींना आपले स्वातंत्र्य गमवावे लागले. तांत्रिक दृष्ट्या प्रगत असलेल्या युरोपियन देशांसमोर आशिया आणि आफ्रिका खंडातील देश टिकू शकले नाही. आधुनिक शास्त्र, दळणवळणाची साधने यांचा वापर करून युरोपियन देशांनी आपले अधिपत्य निर्माण केले. वसाहतीतील मूळ लोकांना युद्धात पराभूत करून त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. त्यांना अंकित केले. युरोपियन राजकर्त्यांनी आफ्रिका आणि आशिया खंडातील लोकांच्या जमिनी काढून घेतल्या.

#### २) वसाहतींमध्ये एकछत्री राजवट :

साम्राज्यवादी देशांनी वसाहतींवर वर्चस्व कायम केल्यावर त्यांना सत्तेचे केंद्रीकरण करणे भाग पडले. त्यामुळे वसाहतींमध्ये एकछत्री राजवट निर्माण झाली. वेगवेगळ्या वसाहतींमध्ये राजकीय नियंत्रणाची तीव्रता वेगळी होती. ब्रिटिश पूर्व काळात हिंदुस्थानात अनेक राज्य होती पण ब्रिटिशांनी त्या सर्वांना हरवून आपला एकछत्री अमल निर्माण केला. आफ्रिकेत देखील युरोपियन राष्ट्रांनी अनेक आफ्रिकन जाती जमातींवर कब्जा निर्माण करून विस्तारित प्रदेशावर आपली राजवट स्थापन केली.

#### ३) एतद्देशीय लोकांमध्ये फूट :

साम्राज्यवादी देशांनी वसाहतींमध्ये 'फोडा व राज्य करा' (Divide and Rule) धोरण अवलंबल्यामुळे एतद्देशीय लोकांमध्ये दुफळी निर्माण झाली. साम्राज्यवादी देशांनी आपला स्वार्थ व हितसंबंध सांभाळण्यासाठी

वसाहतींमधील काही जाती जमातींना उत्तेजन दिले व इतरांना ते नाकारून त्यांच्या मध्ये दुही निर्माण केली. उदाहरणार्थ, भारतामध्ये ब्रिटिशांनी काही जातींना 'लष्करी जाती' म्हणून घोषित केले आणि त्यांची ब्रिटिश सैन्यामध्ये मोठ्या प्रमाणात भरती केली. इतर जातीच्या सदस्यांची लष्करातील भरती प्रक्रिया खूप कठीण केली होती. याशिवाय धर्म आणि जातीच्या आधारे सैनिकांना वेगळे ठेवले जात असे. हिंदू आणि मुस्लिम लोकांमध्ये फूट पाडण्याचे धोरण ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अवलंबलेले होते.

**४) वसाहतींची आर्थिक पिळवणूक :**

साम्राज्यवादी देशांच्या राजवटीचा वसाहतीच्या आर्थिक क्षेत्रावर मूलभूत परिणाम झाला.

अ) युरोपियन देशांनी आपल्या देशातील कारखानदारी करिता कच्चा माल मिळवण्याकरिता आणि तयार वस्तूंसाठी बाजारपेठ म्हणून वसाहतींचा उपयोग केला. त्यामुळे एके काळी समृद्ध असलेली राष्टे दरिद्री बनली. युरोपवरून आधुनिक कारखान्यात तयार झालेल्या वस्तूंशी वसाहतीमधील हस्तकला उद्योग स्पर्धा करू शकले नाही. वसाहतींमधील कारागीर आणि हस्तकला उद्योगांचा ऱ्हास झाला.

ब) साम्राज्यवादी देशांनी वसाहतींमधून मोठ्या प्रमाणात संपत्तीचा अपहार केला. याला संपत्तीचे निःसारण (Drain of Wealth) म्हणून संबोधले जाते. काही इतिहासकरांच्या मते भारतातून इंग्लंडने नेलेल्या संपत्तीमुळेच इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती होऊ शकली. भारतातून झालेल्या संपत्तीच्या निसरणाने इंग्लंडमध्ये मोठमोठे कारखाने बांधायला अतिरिक्त भांडवल पुरवले. भारत मात्र एक दरिद्री देश बनला. त्यांच्या शोषणकारी धोरणांमुळे वसाहतींमध्ये मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडू लागले.

क) साम्राज्यवादी देशांच्या जाचक आणि जुलमी जमीन महसूल पद्धतीमुळे वसाहतींमधील शेतकरी वर्ग भिकेस लागला.

ड) युरोपियन देशांनी आपल्या वसाहतींमधून प्रचंड प्रमाणात नैसर्गिक आणि खनिज संपत्तीची लूट केली.

**४) ख्रिस्ती धर्माचा प्रसार :**

युरोपियन देशांच्या वसाहतींमध्ये मिशनऱ्यांनी ख्रिस्ती धर्माचा प्रसार केला. आशिया, आफ्रिका आणि अमेरिका खंडामध्ये ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाला. आफ्रिका खंडातील प्रदेशाची माहिती मिळाल्यावर मिशनऱ्यांना धर्मप्रसाराचे संधी उपलब्ध झाली. आफ्रिकेतील रानटी जाती जमातींना ख्रिस्ती धर्माची शिकवण देऊन त्यांच्यावर प्रभाव निर्माण केला. ख्रिस्ती धर्मगुरूंनी वेगवेगळ्या भाषांमध्ये बायबलचे भाषांतर करून एतद्देशीय लोकांचे धर्मांतर करण्याचे प्रयत्न केले. अनेक धर्मगुरूंनी देशी भाषा शिकल्या व त्यांना एक लिपी प्राप्त करून दिली. ख्रिस्ती धर्मगुरूंनी स्थानिक भाषांची केलेली सेवा मौल्यवान होती.

**४) एतद्देशीय लोकांचे स्थलांतर :**

साम्राज्यवादी देशांनी सुरुवातीला गुलामांच्या व्यापाराला चालना दिली. आफ्रिकेतील एतद्देशीय लोकांना पकडून गुलाम करून त्यांना अमेरिकेत विकले. त्यामुळे आफ्रिकेतील कृष्णवर्णीय लोकांचे अमेरिकेला स्थलांतर

झाले. उसाची शेती असलेल्या वेस्ट इंडिज येथे देखील आफ्रिकन गुलामांना मोठ्या प्रमाणात विकले होते. सन १८३३ साली ब्रिटीश साम्राज्यात गुलामगिरीवर बंदी घालण्यात आली. त्यामुळे जगातील युरोपियन वसाहतींमधील ऊस मळ्यांवर आणि कोळसा खाणींमध्ये काम करण्यासाठी स्वस्त मजुरांचा तुटवडा निर्माण झाला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात पूर्वी आणि दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज, फिजी आणि मॉरिशस या नवीन युरोपियन वसाहतींमध्ये मजुरांचा तुटवडा भरून काढण्यासाठी भारतातील गरीब मजुरांच्याबरोबर करार करून त्यांना स्थलांतरित करण्याची पद्धत निर्माण झाली. ह्या पद्धतीला करारबद्ध मजुरीची पद्धत (Indenture System) म्हणून ओळखले जाते. गुलामगिरी सदृश असलेल्या या पद्धतीमुळे दक्षिण आफ्रिकेत स्थलांतरित झालेल्या भारतीय लोकांना हीन व दुय्यमपणाची वागणूक मिळत असे.

**५) लष्करवाद व शस्त्रास्त्र स्पर्धा :**

आपल्या साम्राज्याचे आणि राष्ट्राच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी युरोपियन देशांना मोठमोठे सैन्य व नौदल तयार करावे लागली. यामुळे त्यांच्या मध्ये शस्त्रास्त्रांची स्पर्धा निर्माण झाली. एकमेकांमध्ये संशयाचे व तणावाचे वातावरण निर्माण झाले.

अ) जर्मनीने युद्ध सुरू नसतांना देखील मोठ्या प्रमाणात सैन्यात नाव नोंदणी करण्याची सुरुवात केली. नंतर सर्व युरोपियन देशांनी देखील जर्मनीचे अनुकरण केले.

ब) जर्मनीचे कार्यक्षम सैन्य होते. मात्र त्याने एक प्रचंड नौकादल तयार कारण्यास सुरुवात केली. यामुळे इंग्लंडच्या नौकादलाच्या वर्चस्वाला स्पर्धा होण्याची शक्यता निर्माण झाली. इंग्लंडने देखील आपले नौकादल अद्यावत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

क) सशस्त्रांचा उपयोग वाढल्यामुळे युरोपियन देशांमधील खर्चाचे अंदाजपत्रक सुद्धा वाढले. वाढलेला खर्च भागवण्यासाठी करामध्ये वाढ करण्यात आली. १८८० ते १९१४ या काळात युरोपियन देशातील लोकांमध्ये टोकाच्या राष्ट्रवाद निर्माण झाला होता. या राष्ट्रवादाने साम्राज्यवादाला आकार दिला. यामुळे प्रमुख युरोपियन राष्ट्रांमध्ये संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली.

**६) पहिल्या महायुद्धाचे एक प्रमुख कारण–साम्राज्यवाद :**

आफ्रिका, आशिया आणि पूर्वीकडील देशांमध्ये वसाहती मिळवण्यासाठी आणि तेथील साधन सामग्री व व्यापारावर नियंत्रण मिळवण्यासाठी युरोपियन देशांमध्ये टोकाची स्पर्धा सुरू झाली. ह्यातूनच ह्या देशांमध्ये टकराव आणि तणावाचे वातारण निर्माण झाले. पुढील काळात हेच तणाव पहिल्या महायुद्धाचे प्रमुख कारण बनले.

१) इंग्लंडने दक्षिण आफ्रिकेतील त्यांची वसाहत केप कॉलोनी वरून इजिप्त मधील कैरो शहरापर्यंत रेल्वे तयार करण्याचा प्रकल्पाची योजना बनवली होती. जर्मनीने प्रकल्पाला विरोध केला. त्यामुळे जर्मनीने पूर्वी आफ्रिकेतील प्रदेशावर केलेला कब्जा इंग्लंडला रुचला नाही.

२) फ्रेंचांनी उत्तर आफ्रिकेवर मिळवलेला ताबा जर्मनीला रुचला नाही म्हणून त्यांनी फ्रेंचांना मोरक्कोवर नियंत्रण स्थापन करू दिले नाही.

३) आधी ब्रिटन आणि नंतर जर्मनीने तुर्कीमधील दार्दानेल्लेस खाडीवर रशियाने नियंत्रण मिळवण्याचे केलेल्या प्रयत्नांना विरोध केला.

४) चीनवर नियंत्रण मिळवण्याच्या स्पर्धेमुळे जर्मनी, इंग्लंड आणि जपानचा विरोधक बनला. पुढील काळात हेच टकराव पहिल्या महायुद्धासाठी कारणीभूत ठरले.

**ब) साम्राज्यवादाचा वसाहतींना फायदा :**

युरोपियन देशांनी साम्राज्ये वसाहतींचे शोषण करण्यासाठी जरी तयार केली असली तरी कळत ना कळत त्याचे काही चांगले परिणाम देखील झालेले आढळतात.

१) साम्राज्यवादाच्या काळात सत्ता गाजवणाऱ्या देशांनी वासाहतिक देशांत दळणवळण, संदेशवहन व परिवहन यांच्या सेवा सुविधा निर्माण केल्या. त्यांचा हेतू लष्कराच्या हालचालींना त्या उपयुक्त व्हाव्यात असा असला, तरी सामान्य जनतेला त्याचा लाभ मिळाला.

२) साम्राज्यवादी देशांनी वसाहतींमध्ये पाश्चिमात्य शिक्षणाच्या सोई-सुविधा केल्या. साम्राज्यवादी राष्ट्रांनी आपल्या व्यापाराच्या भरभराटीसाठी व धर्मप्रसारासाठी काही ठिकाणी मानवतावादी दृष्टीने शिक्षणाला चालना दिली. पाश्चात्य शिक्षण वसाहतीत देखील दिले जाऊ लागले. असे करण्यामागे साम्राज्यवादी राष्ट्राचा उदात्त हेतू नसून अत्यंत स्वार्थी हेतू होता. त्यांना वसाहतीच्या कारभारात मदत करणारे कारकून तयार करायचे होते. आपल्या देशातून कारकून आणण्यापेक्षा स्थानिक लोकांना शिकवून त्यांच्या कडून किरकोळ कामे करून घेणे जास्त किफायतशीर होते. ह्या स्वार्थी हेतूने वसाहतीत शिक्षणाचा प्रसार होत गेला. पण तरी देखील यामुळे काही प्रमाणात पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार झाला आणि वसाहतीतील लोकांना पाश्चिमात्य विचार आणि संस्कृतीची ओळख झाली.

३) साम्राज्य अंतर्गत देशातील प्राचीन अवशेष आणि इतिहास यांच्या संशोधनात रस घेतला. साम्राज्य टिकवायचे असेल तर वसाहतीतील एतद्देशीय लोकांचा इतिहास, समाज आणि संस्कृती माहित असणे आवश्यक होते. ह्या स्वार्थी हेतूने युरोपीयांनीं वसाहतीतील लोकांचा अभ्यास केला. पण यामुळे ह्या अंकित लोकांचा इतिहास आणि संस्कृतीचा अभ्यास झाला.

४) युरोपियन देशांनी आपल्या वसाहतींमध्ये पाश्चिमात्य शासन पद्धत रुजविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे काही प्रमाणात वसाहतीतील लोकांना शासन करण्यात प्रशिक्षण मिळाले. हे बदल काही अंशी लोकशाहीच्या भावी वृद्धीस निश्चितच कारणीभूत ठरले.

५) युरोपियन लोकांनी वसाहतींमध्ये प्रचलित असलेल्या अनेक अमानवी व रानटी चालीरीती नष्ट केल्या. उदाहरणार्थ भारतामधील सतीची प्रथा किंवा आफ्रिकेमधील नरमांसभक्षण आणि गुलामगिरीची प्रथा युरोपियन राजकर्त्यांनी बंद केली.

६) काही प्रमाणात साम्राज्यवादी देशांनी वसाहतींमध्ये आधुनिक उद्योगांना प्रोत्साहन दिले. भारतामध्ये ब्रिटिशांनी ताग उद्योगाला चालना दिली होती.

**क) साम्राज्यवादी देशांवरील चांगले परिणाम :**

युरोपियन देशांची साम्राज्ये होती. त्याना साहजिकच वसाहतींपासून खूप फायदा मिळत होता.

१) साम्राज्यवादी देशांनी आपल्या वसाहतींचा वापर कारखान्यात तयार केलेल्या वस्तूंसाठी बाजारपेठ म्हणून केला. त्यांनी आपल्या देशातील जास्तीचे भांडवल (surplus capital) वसाहतींमध्ये गुंतवले आणि त्याच्यावर प्रचंड नफा कमावला. भारतातील रेल्वेचे जाळे अशा प्रकारच्या गुंतवणुकीमुळे शक्य झाले होते.

२) साम्राज्यवादी देशांनी वसाहतीतून मोठ्या प्रमाणात संपत्तीचा अपहार केला. याशिवाय वसाहतीतून त्यांना अन्नधान्य, खनिज पदार्थ इत्यादी गोष्टी मिळाल्या. यामुळे युरोपियन देशातील लोकांचे राहणीमान वाढले.

३) युरोपियन देशातील उद्योगांना वसाहतींमधून कच्चा माल मिळाला.

४) साम्राज्यवादी देशातील लोकांना वसाहतींमध्ये प्रशासनात, व्यापारात आणि लष्करात नोकऱ्या मिळाल्या.

५) साम्राज्यवादी देशांनी आपल्या वसाहतींवर लष्करी आणि नौकादलाची तळे बनवली होती. याशिवाय युद्धांमध्ये वसाहतीतील सैनिकांचा त्यांनी वापर केला.

६) साम्राज्यवादामुळे आशिया आणि आफ्रिका खंडातील देश पाश्चिमात्य संस्कृतीच्या संपर्कात आले. वसाहतींमधील लोकांवर पाश्चिमात्य देशातील विचार आणि आचारांचा प्रभाव पडला. कालांतराने त्यांचे राहणीमान बदलले. खाण्यापिण्याचे पदार्थ, पेहराव, चालीरीती यांची मोठ्या प्रमाणात देवाणघेवाण झाली. युरोपियन देशांनी निर्माण केलेल्या साम्राज्यांमुळे विविध देशातील लोक एकमेकांच्या संपर्कात आले.

७) युरोपियन देशांच्या राजवटीला सुरुवातीला वसाहतीमधील जुन्या राजे-रजवाड्यांनी आणि नंतर लोकांनी विरोध केला. सुरूवातीला झालेला विरोध हा संरक्षणात्मक पद्धतीचा होता. विरोधकांना युरोपियन लोकांना देशाच्या बाहेर ठेवायचे होते. भारतामधील १८५७ चे बंड, चीन मधील बॉक्सर उठाव आणि आफ्रिकेमधील जाती जमातींचे उठाव हे सर्व जुनी राजवट परत आणण्यासाठी केले गेले होते. मात्र नंतरच्या काळात वसाहतींमध्ये एक शिक्षित मध्यमवर्ग अस्तित्वात आला. राष्ट्रवादी वृत्ती आणि विचारांचा प्रचंड प्रसार झाला. लोकांमध्ये राष्ट्राभिमान जागृत झाला. त्यांनी आपल्या देशाचे शोषण थांबविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. इ.स. १८८५ मध्ये भारतामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ह्या अखिल भारतीय संघटनेची स्थापना झाली होती. इजिप्त आणि उत्तर आफ्रिकेत देखील राष्ट्रवादी चळवळी सुरू झाल्या होत्या.

● **स्वयं अध्ययन प्रश्न:-३**

**अ) योग्य पर्याय निवडा :**

१) इ.स. १८३३ मध्ये ब्रिटिश साम्राज्यात ............. वर बंदी घालण्यात आली.

अ) सती प्रथा ब) केशवपन प्रथा क) गुलामगिरी ड) वेट बेगार

२) ............. देशाने युद्ध सुरु नसतांना मोठ्या प्रमाणात सैन्यामध्ये नाव नोंदणी करायला सुरुवात केली.

अ) जर्मनी ब) फ्रान्स क) इंग्लंड ड) पोर्तुगाल

३) केप कॉलनी ते कैरो यामार्गावर रेल्वे मार्ग तयार करण्याच्या इंग्लंडच्या प्रकल्पाला ............. ने विरोध केला.

अ) फ्रान्स ब) स्पेन क) बेल्जियम ड) जर्मनी

४) जर्मनी आणि ............. मध्ये नौकादल अद्ययावत करण्यासाठी स्पर्धा लागली होती.

अ) फ्रान्स ब) इंग्लंड क) बेल्जियम ड) रशिया

५) ब्रिटिशांनी भारतमध्ये ............. लोकांच्यात फूट पाडण्याचे धोरण अवलंबले.

अ) हिंदू आणि पारशी ब) हिंदू आणि मुस्लिम क) हिंदू -जैन ड) जैन -बौद्ध

## ३.३. पारिभाषिक शब्द व शब्दार्थ:

Imperator : मूळ शब्दार्थ सेनाधिपती आणि अधिक्षेत्र (राज्य) असा आहे

Mercantalism : व्यापारवाद -युरोपियन राज्यांनी अवलंबलेले आर्थिक धोरण होते ज्यामध्ये राष्ट्राचा व्यापार, वस्तू उत्पादन व उद्योगाचे नियंत्रण हे लष्करी सामर्थ्य प्राप्त करण्यासाठी व राज्याची राजकीय सत्ता वाढवण्यासाठी वापरले जात होते.

Bullionism : धातुवाद. धातूवादाचा समज हा होता की राष्ट्राची सुबत्ता राष्ट्रांमध्ये असलेल्या मौल्यवान धातूच्या प्रमाणावर अवलंबून असते

Civilizing Mission : सुसंस्कृत करण्याचा मोहिम. अंकित देशांमधील मूळ लोकांवर पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव निर्माण करणे हा या सुसंस्कृतीकरण मोहिमेचा उद्देश होता.

Survival of the fittest : (जो लायक असेल तोच टिकेल). ज्या लोकांना यश आणि संपत्ती मिळाली आहे असे लोक इतरांपेक्षा श्रेष्ठ मानले जात, हा विचार.

Spheres of influence : प्रभावाचे क्षेत्र

Divide and Rule : 'फोडा व राज्य करा' साम्राज्यवादी राजवटीचे एतद्देशीय लोकांमध्ये फूट पडायचे धोरण.

Drain of Wealth (संपत्तीचे निःसारण): साम्राज्यवादी देशाने विविध मार्गाने वसाहतींमधून केलेला संपत्तीचा अपहार

Indenture System : करारबद्ध मजुरीची पद्धत. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात पूर्वी आणि दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज, फिजी आणि मॉरिशस या नवीन युरोपियन वसाहतींमध्ये मजुरांचा तुटवडा भरून काढण्यासाठी भारतातील गरीब मजुरांच्याबरोबर करार करून त्यांना स्थलांतरित करण्याची पद्धती

Surplus Capital : जास्तीचे किंवा अतिरिक्त भांडवल.

## ३.४ स्वयं- अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

- **स्वयं अध्ययन प्रश्न -१**

  १) ब), २) क), ३) क), ४) ब), ५) ब)

- **स्वयं अध्ययन प्रश्न-२**

  १) ड), २) ब), ३) क), ४) क), ५) क)

- **स्वयं अध्ययन प्रश्न-३**

  १) क), २) अ), ३) ड), ४) ब), ५) ब)

## ३.५ सारांश :

साम्राज्यवादाने जगाच्या इतिहासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. प्राचीन काळापासून मानवाने साम्राज्य निर्माण करण्याच्या प्रयत्न केले असले तरी आधुनिक काळातील साम्राज्यवादाचे वेगळे स्वरूप आहे. आधुनिक काळातील साम्राजवादाचे तीन टप्पे आहेत. पहिला टप्पा : १५ व्या शतकाच्या शेवटच्या दशकांपासून ते इ.स. १८०० पर्यंत; दुसरा टप्पा: इ.स. १८०० ते १८७० पर्यंत आणि तिसरा टप्पा: इ.स. १८७० ते १९१४ पर्यंत समजला जातो. पहिल्या टप्प्यातील साम्राज्यवाद नवीन भौगोलिक शोध, आर्थिक लाभ, धर्मप्रसार आणि एतद्देशीय लोकांचे संस्कृतीकरण करण्याची इच्छा या कारणांमुळे उदयास आला. मात्र नंतरच्या काळात त्याची वृद्धी औद्योगिक क्रांती, अतिरिक्त भांडवलाची सोय, अतिरिक्त लोकसंख्येची सोय, दळणवळण यंत्रणेत सुधारणा, युरोपियन श्रेष्टत्वा मध्ये विश्वास, टोकाचा राष्ट्रवाद आणि आफ्रिका व आशिया मध्ये साम्राज्यवादाला अनुकूल परिस्थिती ह्या कारणांमुळे झाली.

साम्राज्यवादामुळे युरोपियन देशांमध्ये वसाहतींसाठी स्पर्धा सुरू झाली. परिणामी युरोपियन देशांनी

आफ्रिका खंडातील प्रदेशाची आपापसात वाटणी करून घेतली. प्रारंभीच्या काळात युरोपियन लोकांनी आफ्रिकेतील एतद्देशीय लोकांना गुलाम केले. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात गुलामगिरीची प्रथा नष्ट होत चालल्यामुळे युरोपियन देशांनी आफ्रिकेतील प्रदेशावर थेट राजवट स्थापन करण्याला प्रारंभ केला. सुरुवातीला मध्य अफ्रिकेमध्ये बेल्जियम देशाने आपली वसाहत स्थापन केली. यानंतर इतर युरोपियन देशांनी वसाहती स्थापन करण्याचे प्रयत्न सुरू केले. इ.स. १८८४-८५ मध्ये आयोजित केलेल्या बर्लिन परिषदेमध्ये युरोपियन देशांनी आफ्रिकेतील प्रदेशाची विभागणी करण्यासाठी नियमावली केली.

साम्राज्यवादाचे जगावर वाईट आणि चांगले असे दोन्ही प्रकारचे परिणाम झाले. वसाहतींना आपले स्वातंत्र्य गमवावे लागले आणि त्यांची प्रचंड आर्थिक पिळवणूक झाली. मात्र याबरोबर साम्राजवादी राजवटींनी वसाहतींमध्ये काही चांगले बदल देखील केले. साम्राजवादी देशांनी वसाहतींचे शोषण करून स्वतःचा खूप फायदा करून घेतला. साम्राज्यवादामुळे निर्माण झालेली वसाहतींसाठी आणि शास्त्रांसाठीची स्पर्धा पहिल्या महायुद्धाचे एक महत्त्वाचे कारण मानले जाते.

## ३.६ विषय विवेचनात संदर्भ आलेल्या प्रमुख घटनांचा तक्ता :

| काळ/वर्ष/दशक | घटनेचा तपशील |
|---|---|
| इ.स.पू. तिसऱ्या सहस्त्रकापासून इ.स. सहाव्या-सातव्या शतकापर्यंतच्या | इजिप्त, बॅबिलोनिया, सीरिया, भारत, इराण, ग्रीस, रोम (इटली) आदी प्रदेशात अनेक वैभवशाली संस्कृती अस्तित्वात होत्या. त्यापैकी इजिप्त, सीरिया व बॅबिलोनिया राजांनी साम्राज्यविस्तार करण्याचे प्रयत्न केले |
| इ.स. ७४२ ते ८१४ | मध्ययुगीन काळात युरोप मध्ये शार्लमेन या पराक्रमी राजाने ‘पवित्र रोमन साम्राज्याची निर्मिती केली होती. |
| इ.स. १३४७ | युरोपमध्ये प्लेग रोगाची भयानक महामारी आली होती. तीन वर्षांमध्ये सर्व युरोपमधून ही महामारी पसरली होती. |
| ११ व्या-१२ व्या शतकापासून | युरोपियन व्यापारी जमिन आणि सागरी मार्गाने व्यापार करू लागले होते. |
| इ.स. १४९२ | स्पेनच्या शोधमोहीमेने कोलंबसच्या नेतृत्वाखाली अमेरिका खंडाचा शोध लावला |
| इ.स. १४९८ | पोर्तुगीज शोधमोहीमेने वास्को द गामाच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेतील केप ऑफ गुड होपला वळसामारून भारताकडे येणारा समुद्री मार्ग शोधून काढला |

| | |
|---|---|
| इ.स. १५००– १८०० | साम्राज्यवादाचा पहिला टप्पा |
| १६ वे शतक | युरोपियन देशांमध्ये व्यापारवाद आणि धातुवाद विचारप्रणाली प्रभावी |
| इ.स. १५६२ | इ.स. १५६२ मध्ये सर जॉन हॉकिन्स नावाच्या एक श्रीमंत इंग्रजी व्यापाऱ्याने पहिल्यांदा आपले जहाज वापरून आफ्रिकेतील गुलाम इंग्लंडला आणले होते. इ.स. १८५० पर्यंत हा गुलामांचा व्यापार चालला. |
| १८ व्या शतकातील शेवटची दशके | इंग्लंडमध्ये मोठमोठे आधुनिक उद्योग अस्तित्वात आले. हे उद्योग ऊर्जेचा वापर करत होते आणि त्यांची उत्पादन करण्याची क्षमता देखील प्रचंड होती. इंग्लंड नंतर फ्रान्सने 'आद्योगिक क्रांती' मध्ये आघाडी घेतली. |
| इ.स. १८००– १८७० | साम्राज्यवादाचा दुसरा टप्पा |
| इ.स. १८२९ | क्यूनाईन औषधाचा शोध लागल्यामुळे आफ्रिकेला गेलेले युरोपियन लोक मलेरिया रोगापासून बचावले. |
| इ.स १८३३ | ब्रिटिश साम्राज्यांतर्गत गुलामगिरीवर बंदी |
| इ.स. १८५०च्या सुमारास | औद्योगिक क्रांती जर्मनी, बेल्जियम, जपान आणि अमेरिका ह्या देशांमध्ये पसरली. हे औद्योगिक क्रांतीचे दुसरे पर्व होते. वाढीव उत्पादनाला हक्काची बाजारपेठ मिळवण्यासाठी या देशांमध्ये स्पर्धा लागली |
| १९व्या शतकाच्या उत्तरार्धात | दळणवळणाचे नवीन तंत्रज्ञान विकसित झाल्यामुळे मोठी साम्राज्ये स्थापन करणे शक्य झाले. |
| इ.स. १८६० चे दशक | स्कॉटलंड मधील डेविड लिविंगस्टोन नावाचा ख्रिस्ती मिशनरी मध्य आफ्रिकेचा शोध घेण्यासाठी गेला |
| इ.स. १८६७ | दक्षिण आफ्रिकेत हिऱ्यांचा शोध लागला |
| इ.स. १८६९ | सुएज कालवा सुरू झाल्यामुळे भारत आणि इंग्लंड मधील अंतर चार हजार मैलांनी कमी झाले. |
| इ.स. १८७० ते १९१४ | साम्राज्यवादाचा तिसरा टप्पा |
| इ.स. १८७१ | हेन्री स्टॅन्लेने डेव्हिड लिविंगस्टोनला शोधून काढले. तो आफ्रिकेतील प्रसिद्ध तलाव 'लेक टांगानिकाच्या' काठी राहत होता. |

| | |
|---|---|
| इ.स. १८७६ | बेल्जियमचा राजा दुसरा लिओपोल्डच्या पुढाकाराने भूगोलतज्ज्ञ आणि संशोधकांची एक आंतरराष्ट्रीय परिषद बेल्जियमची राजधानी ब्रुसेल्स येथे आयोजित केली होती. ह्या परिषदेमध्ये आफ्रिकेत ज्ञानाचा प्रसार व्हावा म्हणून इंटरनॅशनल असोसिएशन फॉर द एक्सप्लोरेशन अँड सिव्हिलिझशन ऑफ सेंट्रल आफ्रिका (International Association for the Exploration and Civilization of Central Africa) ह्या नावाची संघटना स्थापन. |
| इ.स. १८८० पासून | युरोपियन देशांमध्ये आफ्रिकी प्रदेश मिळवण्यासाठी झटापट सुरू झाली. |
| इ.स. १८८४-८५ | बर्लिनची परिषद |
| इ.स. १८८५ | भारतामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ह्या अखिल भारतीय संघटनेची स्थापना |
| इ.स. १८८६ | दक्षिण आफ्रिकेत सोन्याचा शोध लागला |

## ३.६. सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टिपा लिहा.**

१) साम्राज्यवादाच्या उदयाची पार्श्वभूमी

२) साम्राज्यवादाचे टप्पे

३) आफ्रिकेतील गुलामांचा व्यापार

४) करारबद्ध मजुरांची पद्धती

५) टोकाचा राष्ट्रवाद

**ब) खालील प्रश्नांची विस्तृत उत्तरे लिहा.**

१) साम्राज्यवादाची संकल्पना स्पष्ट करा.

२) साम्राज्यवादाच्या उदयाच्या कारणांचे वर्णन करा.

३) साम्राज्यवादाच्या विस्तारासाठी जबाबदार असलेली कारणे सांगा.

४) आफ्रिकन खंडाच्या फाळणीची प्रक्रिया विशद करा.

५) साम्राज्यवादाचे बरे वाईट परिणाम सांगा.

### ३.७ संदर्भ ग्रंथ :

1) Jurgen Osterhammel, The Transformation of the World, Princeton University Press, 2014

2) John Merriman, - History of Modern Europe, W.W. Nordon and Company, New York, 1996

3) David Thompson, Europe since Napoleon, Penguin Books, 1966

4) Arjun Dev and Indira -rjun Dev, History of the World, Orient Black Swan, 2009

5) Bipan Chandra, History of Modern India, Orient Black Swan, Hyderabad.

❖ ❖ ❖

## घटक – ४

# महत्त्वाची व्यक्तिमत्वे

## (Important Personalities)

**अनुक्रमणिका :**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

    ४.२.१ मेटरनिक

    ४.२.२ कार्ल मार्क्स

    ४.२.३ अब्राहम लिंकन

४.३ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.४ सारांश

४.५ सरावासाठी स्वाध्याय

४.६ संदर्भ ग्रथ

### ४.० उदिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- मेटरनिक, कार्ल मार्क्स व अब्राहम लिंकनच्या जीवनाविषयी परिचय होईल.
- मेटरनिकच्या कामगिरी बद्दल माहिती मिळेल.
- कार्ल मार्क्सच्या दास कॅपिटल ग्रंथातून कार्ल मार्क्सच्या विचाराबद्दल माहिती मिळेल.
- कार्ल मार्क्सची साम्यवादाची संकल्पना कळेल.
- लिंकनची दासमुक्ती संबंधी नीति समजेल.
- लिंकनच्या परराष्ट्र धोरण व अंतर्गत धोरणाची माहिती मिळेल

### ४.१ प्रस्तावना :

या प्रकरणामध्ये आपण युरोपमधील अशा काही व्यक्तीमत्वाचा आभ्यास करणार आहोत की ज्यांनी यूरोपमध्ये आपल्या विचारांनी व कार्याने छाप पाडली की ज्यामुळे युरोपचा चेहरामोहरा बदलला. त्यांच्या कार्याचा विचारांचा पगडा पूर्ण युरोपमध्ये पसरला.

ऑस्ट्रियामध्ये मेटरनिकने जुनी विचारसरणी व व्यवस्था मजबूत केली तर सरदार, धर्मगुरूंना त्याने वर्चस्व मिळवून देण्याचा प्रयत्न केला व लोकशाहीचा द्वेष केला. एवढेच नव्हे तर सनातनी व्यवस्था जैसे थे ठेवण्याचा प्रयत्न केला. त्याच्या या विचारानेच त्याने राष्ट्रवादी विचाराना थोपवण्याचा पुरेपूर प्रयत्न करून ४० वर्षे ऑस्ट्रियावर राज्य केले.

कार्ल मार्क्स ज्याने साम्यवादी विचारसरणी संपूर्ण जगात पसरवण्याचा प्रयत्न केला त्याला रशिया व चीनमध्ये झालेल्या क्रांतिचा प्रणेता म्हणून ओळखतात. १८६७ मध्ये प्रसिद्ध झालेला 'दास कॅपिटल' हा ग्रंथ म्हणजे सामाजिक मुल्यांच्या विचारांचे भांडार म्हणता येईल. जगातील कामगारांना त्यांच्या शोषणाविरुद्ध लढण्याची ताकद या ग्रंथाने दिली. हा ग्रंथ म्हणजे समाजवादाचे बायबल मानले जाते. मानव जातीचा इतिहास दोन विभागात विभागला आहे. एक 'आहे रे' व 'दुसरा नाहे रे' हे त्याने प्रतिपादन करून वर्ग कलहाचा सिद्धांत मांडला.

अब्राहम लिंकन याने अमेरिकेतील गुलामगिरीला विरोध केला. इतकेच नव्हे तर गुलामीची प्रथा संपवण्यासाठी प्रयत्न केले. समाजाला काळीमा फासणारी गुलामगिरी नष्ट केली व त्यांना सामाजिक प्रवाहामध्ये बरोबरीचे स्थान दिले.

### ४.२ विषय विवेचन :

#### ४.२.१ मेटरनिक (१७७३ – १८५९)

- **मेटरनिकचे पूर्वायुष्य**

मेटरनिकचा जन्म १७७३ मध्ये ऑस्ट्रियातील कांब्लेज शहरात एका सधन सरदार घराण्यात झाला. लहानपणापासून त्याच्यावर झालेल्या संस्कारामुळे व शिक्षणामुळे त्याला जुन्या गोष्टींची, जुन्या तत्त्वांची आवड होती. जुनी विचारसरणी व व्यवस्था त्याला अतिशय आवडत असे म्हणूनच तत्कालीन युरोपमध्ये असलेल्या वर्गपद्धतीनुसार त्याला सरदार व धर्मगुरूंचे वर्चस्व व मोठेपण आवडत असे. लोकशाहीबद्दल त्याला तिरस्कार असल्यामुळेच फ्रेंच राज्यक्रांती त्याला आवडत नव्हती. ही क्रांती म्हणजे युरोपचा असाध्य रोग होय, असे तो म्हणे. मेटरनिक लोकशाहीस 'अंधाराचे राज्य' असे म्हणत असे, म्हणूनच तो प्रतिगामी व सनातनी बनलेला होता. यासाठी 'जैसे थे' धोरण कायम ठेवण्याकडे त्याचा कल होता. मेटरनिक कडे असलेल्या हुशारीमुळे व गुणांमुळेच ऑस्ट्रियाच्या राजाने १८०४ मध्ये त्याची नेमणूक फ्रान्समध्ये ऑस्ट्रियाचा राजदूत म्हणून केली. ही जबाबदारी त्याने १८०९ पर्यंत उत्कृष्टपणे सांभाळली. त्यानंतर १८०९ मध्ये त्याची परराष्ट्र मंत्रीपदावर

नियुक्ती झाली. मेटरनिक आपल्या कर्तबगारीच्या जोरावर १८२१ मध्ये ऑस्ट्रियाचा प्रधानमंत्री बनला. यावेळी तो केवळ ३६ वर्षांचा होता. प्रधानमंत्री पदाची धुरा त्याने पुढे ४० वर्षे सांभाळली.

ऑस्ट्रीयन जनता मेटरनिकला 'राजपुत्र' असे म्हणत असे. मात्र १८४८ मध्ये लोकांनी त्याच्याविरुद्ध निदर्शने केली व कायदेमंडळात शिरून मेटरनिकला पदच्युत करा अशी मागणी केल्याने मेटरनिकल घाबरला व तो इंग्लंडला पळून गेला. तेथेच त्याने उर्वरित आयुष्य निर्वासितासारखे घालविले व अखेर १८५९ साली मरण पावला.

- **मेटरनिकची उद्दिष्टे :**

मेटरनिकने आपल्यासमोर जी उद्दिष्टे ठेवलेली होती ती मेटरनिकच्या प्रतिगामित्वाची ज्वलंत उदाहरणे होती. त्याने आपली विचारप्रणाली आयुष्यभर सांभाळून पुरोगामी विचारसरणीस पायबंद घालण्याचा नेहमी प्रयत्न केला.

**१. फ्रेंच क्रांतीस विरोध :**

फ्रेंच राज्यक्रांती ही फ्रान्समधील परंपरावादी विचारसरणीला आव्हान देणारी होती. या क्रांतीने युरोपमधील पारंपरिक समाजव्यवस्थेवर आघात करण्याचा प्रयत्न केला. या क्रांतीपासून प्रेरणा घेऊन युरोपमध्ये जवळजवळ सर्वत्र अनियंत्रित राजेशाही नष्ट करण्याचे प्रयत्न त्या-त्या देशातील जनता करू लागली होती. युरोप मधील जनता नवविचारांनी भारावली होती. त्यामुळे कित्येक ठिकाणी असणाऱ्या जुन्या राजेशाही राजवटी संपून तेथे लोकशाही तत्त्वे रुजू लागली होती. तथापि, हे लोकशाहीचे वारे ऑस्ट्रियामध्ये येऊ नयेत असा प्रयत्न मेटरनिकने सुरू केला. भिन्न भाषिक व भिन्न वर्णीय असलेले ऑस्ट्रियन साम्राज्य सांभाळणे ही सम्राटाकरिता तारेवरची कसरत होती. अशातच क्रांतीमुळे निर्माण झालेल्या नवविचारांचा प्रवाह ऑस्ट्रियात येण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे ऑस्ट्रियन साम्राज्य कोसळणार होते. मेटरनिकला ऑस्ट्रियन साम्राज्याचे अस्तित्व ठेवायचेच होते, म्हणूनच त्याने फ्रेंच क्रांतीला सतत विरोध करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते.

**२. राष्ट्रवादी विचारांना थोपविणे :**

नेपोलियनच्या कारकिर्दीत ऑस्ट्रियामधील जनतेस राष्ट्रवादी विचारसरणीला चालना मिळू लागली होती. ऑस्ट्रियामध्ये राष्ट्रवादी विचारसरणी शिरली तर ऑस्ट्रियाची अनियंत्रित सत्ता संपणार होती म्हणूनच मेटरनिक अट्टाहासाने व प्रयत्नपूर्वक राष्ट्रवादी विचारसरणीस थोपवित राहिला.

**३. लोकशाहीचा विरोधक :**

प्रतिगामी विचारसरणीत वाढलेला मेटरनिक एवढा कट्टर बनला होता की, त्याला लोकशाही राजवट अजिबात नको होती. लोकशाही म्हणजे गंभीर समस्या निर्माण करणारी, देशाच्या प्रगतीवर परिणाम करणारी आणि गोंधळाचे वातावरण निर्माण करणारी राज्यव्यवस्था होय असे तो म्हणत असे.

**४. सत्तेचे विकेंद्रीकरण :**

ऑस्ट्रियाची व संपूर्ण युरोपची सत्ता आपल्याभोवती फिरत राहावी अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती.

युरोपमध्ये ऑस्ट्रियन साम्राज्य श्रेष्ठ राहावे व एक ज्येष्ठ मुत्सद्दी म्हणून आपणाकडे सर्व युरोपने पाहावे ही त्याची उत्कट इच्छा असल्यामुळे तो सत्तेच्या केंद्रीकरणासाठी प्रयत्न करीत राहिला.

● **मेटरनिक पद्धती :**

युरोपातील जनतेच्या राष्ट्रीय आकांक्षा, लोकशाहीची मागणी, सनदशीर राज्यपद्धती करिता चाललेल्या चळवळी मेटरनिकला चिरडून टाकायच्या होत्या. यासाठी त्याने व्हिएन्ना परिषदेत फ्रेंच राज्यक्रांतीपूर्वीची व्यवस्था युरोपात निर्माण करणेचा प्रयत्न केला. वारसा हकाचे तत्व अंमलात आणून जुन्या राजवटी पुन्हा निर्माण केल्या. नेपोलियनची राज्य व्यवस्था उद्वस्थ करून टाकली. मेटरनिक केवळ व्हिएन्ना परिषदेत जुन्या व्यवस्थेचे पुनरुजीवन करून, ती व्यवस्था कशी टिकून राहील. त्यासाठी प्रयत्न करत होता. राष्ट्रवादी, लोकशाहीवादी विचारापासून तिचे संरक्षण कसे होईल याची त्याला काळजी होती. म्हणूनच त्याने संयुक्त युरोप हा संघ निर्माण केला. संयुक्त युरोपमध्ये आपला प्रभाव पाडून क्रांतिकारी घटना दडपून टाकण्यासाठी संयुक्त युरोप हे हत्यार बनविले. त्याच्यामुळेच संयुक्त युरोप हि संघटना हुकुमशाही राज्यसंघ बनला.

अशा रीतीने प्रतिगामी मार्गाचा अवलंब करून मेटरनिकने व्हिएन्ना काँग्रेसने अमलात आणलेली व्यवस्था युरोपातील प्रत्येक देशात कायम टिकवून धरण्याचा प्रयत्न केला. यालाच 'मेटरनिक व्यवस्था' किंवा 'मेटरनिक राज्यपद्धती' म्हणतात. म्हणूनच संयुक्त युरोप या संघटनेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

● **संयुक्त युरोप** (Concert of Europe) **:**

मेटारनिकच्या युगातील एक महत्त्वपूर्ण संघटना म्हणजे 'संयुक्त युरोप' होय. या संघटनेचे ध्येयही इतर संघटनांप्रमाणे क्रांती तत्त्वे नष्ट करणे आणि युरोपात शांतता प्रस्थापित करणे हेच होते. प्रथमतः या संघटनेत इंग्लंड, रशिया, ऑस्ट्रिया, प्रशिया ही चार राष्ट्रे समाविष्ट होती म्हणून त्यास 'चतुःसंघ' (Quadruple Alliance) असे म्हटले जाते. या चारही राष्ट्रांनी २० नोव्हेंबर, १८१५ रोजी संघटना स्थापन करून त्यावर स्वाक्षऱ्या केल्या.एक्सलाशापेलची काँग्रेस झाल्यानंतर या संघटनेत फ्रान्सही सहभागी झाला. त्यामुळे संघाचे चतुर्मुखी स्वरूप जाऊन त्यास संयुक्त युरोप (Concert of Europe) असे नाव देण्यात आले. फ्रेंच क्रांतीनंतर व नेपोलियनच्या पाडावानंतर राष्ट्रवादी चळवळींना पायबंद घालण्यासाठी युरोपातील राष्ट्रांनी एकत्र यावे असा प्रस्ताव ऑस्टियाचा पंतप्रधान मेटरनिक याने मांडला. त्यानुसारच या संघटनेची स्थापना झाली. अशाच पद्धतीचा प्रस्ताव पूर्वी ऑस्ट्रियन पंतप्रधान कानीटझ याने १७९१ मध्ये प्रथम मांडलेला होता परंतु कानिटझचा प्रस्ताव तत्कालीन राजकीय परिस्थितीमुळे अमलात आला नाही. मेटरनिकचा प्रभाव मुत्सद्देगिरी यामुळे 'संयुक्त युरोप' ही संघटना अस्तित्वात आली.

● **संयुक्त युरोपचे हेतू :**

१. नेपोलियनच्या काळातील युद्धामुळे युरोपच्या राजकीय परिस्थितीचा बिघडलेला समतोल पुन्हा प्रस्थापित करणे.

२. युरोपात शांतता टिकविण्यासाठी देशादेशांनी एकमेकांशी मैत्री करणे.

३. फ्रान्सला एकाकी पाडल्यास या राष्ट्राचा स्वाभिमान दुखावेल म्हणून व्हिएन्ना परिषदेव्दारे फ्रान्सवर झालेल्या प्रादेशिक अन्यायाची फेरतपासणी करणे.

४. युरोपातील इतर प्रश्न सोडविणे, इतर राष्ट्रांची प्रगती करणे व औद्योगिक क्रांतीचा प्रसार करणे हे ध्येय संघटनेने ठेवले होते.

५. आंतरराष्ट्रीय समस्या भाषिक व सांस्कृतिक समस्या युद्धाऐवजी चर्चेच्या मार्गाने सोडविणे.

६. क्रांतिकारक विचारांना दडपून टाकण्यासाठी युरोपातील देशांनी एकमेकांना सहकार्य करणे.

नेपोलियनच्या पराभवानंतर युरोपमध्ये राजकीय परिस्थिती अस्थिर बनलेली होती. विविध प्रश्न निर्माण झाले होते. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात संशयाचे वातावरण होते. म्हणूनच विविध प्रश्न सोडविणे व युरोपात राजकीय शांतता निर्माण करणे यासाठी संयुक्त युरोप ही संघटना अस्तित्वात आली. संयुक्त युरोपच्या झालेल्या चारही बैठका महत्वपूर्ण होत्या.

**१. एक्सलाशापेलची बैठक (१८१८) :**

संयुक्त युरोपचे पहिले अधिवेशन प्रशियाच्या ताब्यात असलेल्या एक्सलाशापेल येथे झाले. फ्रान्सच्या सरहद्दीवर दीड लाख सैन्य तैनात केलेले होते. फ्रान्सने मुदतीपूर्व युद्धखंडणी दिल्यामुळे व लष्करी हालचाली न केल्यामुळे हे सैन्य काढून घेण्याचा निर्णय या बैठकीत झाला. तसेच संयुक्त युरोपमध्ये फ्रान्सला सभासदत्व देण्यात आले. याशिवाय अनेक निर्णय या बैठकीत घेण्यात आले. समुद्रावरील चाचेगिरी बंद करण्यासाठी भूमध्य सागरात सर्व युरोपीय राष्ट्रांनी एक संयुक्त नाविक दल उभे करावे असा प्रस्ताव रशियाने मांडला. तथापि, इंग्लंडने यास नकार दिला. बँडेन संस्थानाच्या वारसासंबंधी ऑस्ट्रिया व रशिया येथील ज्यू जमातीसंबंधी बैठकीत चर्चा झाली. परंतु निर्णय घेतले नाहीत, या बैठकीमध्ये मोनॅकोच्या सत्ताधीशाला काही सूचना दिल्या. हेस येथील प्रमुखास 'राजा' ही पदवी पाहिजे होती. मात्र ती त्याच्या विनंतीवरूनही मिळाली नाही. दक्षिण अमेरिकेत स्पेन व इंग्लंड या देशांच्या वसाहती होत्या. याबाबतच्या प्रश्नांकडे परिषदेने लक्ष दिले नाही. नॉर्वे व डेन्मार्क या देशांशी स्वीडनने तह केले होते. त्यांचे पालन न केल्याबद्दल स्वीडनच्या राजास सूचना देण्यात आल्या. गुलामगिरीच्या उच्चाटनासाठी इंग्लंडने जास्त प्रयत्न केला तर रशियाने विरोध केला. या बैठकीमध्ये इटली व जर्मनीच्या एकीकरणाविषयी चर्चा झाली नाही. हॉलंड व बेल्जियमच्या विभाजनासाठी निर्णय घेतला नाही. ग्रीस, बल्गेरिया, रुमानिया आणि सर्बिया यांच्या स्वातंत्र्यावर चर्चा झाली नाही. बऱ्याच संदिग्ध वातावरणात ही बैठक संपली. या बैठकीत इंग्लंड एका बाजूला तर इतर युरोपीय राष्ट्रे दुसऱ्या बाजूला होती. मेटरनिकला या बैठकीत महत्त्वाचे स्थान असल्याने त्याने आपली प्रतिगामी धोरणे या बैठकीनंतर युरोपात राबविण्यास सुरुवात केली.

**२. ट्रोपुओची बैठक (१८२०) :**

झेकोस्लोव्हाकियातील ट्रोपुआ येथे संयुक्त युरोपची दुसरी बैठक भरली. ह्या बैठकीपूर्वी नेपल्स, स्पेन, पोर्तुगाल या ठिकाणी राष्ट्रवादी चळवळी झाल्या होत्या. राष्ट्रवादी चळवळींच्या विरोधात असणाऱ्या मेटरनिकला

आणि संयुक्त युरोपला अशा पद्धतीच्या चळवळी नको होत्या. त्यामुळे या चळवळींना दडपून राष्ट्रवादी विचारांना पायबंद हे या बैठकीचे प्रमुख उद्दिष्ट राहिले. तथापि, वरील देशात झालेल्या चळवळी कशा नष्ट कराव्यात याबाबत मात्र परिषदेत एकमत झाले नाही. रशियाला स्पेनला मदत करावयाची होती, तर ऑस्ट्रियाला इटलीमधील उठाव चिरडून टाकावे असे वाटत होते कारण ऑस्ट्रियाचे हितसंबंध इटलीमध्ये गुंतलेले होते. ऑस्ट्रिया, नेपल्समधील चळवळी दडपून टाकण्यासाठी उत्सुक होता. ऑस्ट्रियाचे इटलीत वर्चस्व वाढू नये म्हणून इंग्लंड प्रयत्नशील होते. या बैठकीत 'ट्रोपुआचा जाहीरनामा' प्रसिद्ध झाला. या जाहीरनाम्यानुसार युरोपात कोठेही क्रांतीची शक्यता निर्माण झाली तर संयुक्त युरोपने त्या ठिकाणी लष्करी कारवाई करावी. संयुक्त युरोपच्या सभासद राष्ट्रांमध्ये क्रांती झाल्यास त्या राष्ट्रांचे सभासदत्व रद्द करावे मात्र क्रांती नष्ट होऊन जुने सरकार अस्तित्वात आल्यास त्या राष्ट्रास पुन्हा सभासदत्व द्यावे. इंग्लंड व फ्रान्सने विरोध करूनही मेटरनिकच्या मुत्सेद्देगीरीमुळे ट्रोपुआचा जाहीरनामा या बैठकीत मंजूर करण्यात आला. मेटरनिकचे प्रतिगामी धोरण यशस्वी झाले होते. या बैठकीनंतर संयुक्त युरोपमध्ये मतभेद झाले.

ऑस्ट्रिया, प्रशिया व रशिया हे एकत्र आले तर इंग्लंड व फ्रान्स यांच्यात जवळीक निर्माण झाली. ट्रोपुआचा जाहीरनामा म्हणजे कोणत्याही देशाच्या अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप करण्याची संधीच होय असे इंग्लंडने आपले मत माडले. इंग्लंडचा परराष्ट्र मंत्री कॅसल रीघ  याने या जाहीरनाम्यावर टीका केली. हेन्री किसिन्जरच्या मते, या बैठकीमुळे युरोपीय राजकारणात मेटरनिकचे महत्त्व वाढले. फ्रान्सही मेटरनिकला विरोध करू शकला नाही.

**३. लेबॅकची बैठक (१८२१) :**

युगोस्लाव्हियातील लेबॅक येथे संयुक्त युरोपची तिसरी बैठक भरली. नेपल्स येथे झालेल्या क्रांतीमुळे आणि तेथील उदारमतवाद आणि घटनात्मक राज्यकारभारामुळे युरोपात इतर देशांना त्यापासून प्रेरणा मिळालेली होती. यामुळे नेपल्सची पुनरावृत्ती होऊ नये अशी खबरदारी घेणे गरजेचे होते. नेपल्स प्रमाणे सार्डिनिया येथेही राष्ट्रीय चळवळींना जोर चढलेला होता. लेबॅक येथील बैठकीमध्ये ऑस्ट्रियाने या दोन्ही राज्यक्रांत्या नष्ट कराव्यात असे ठरले आणि त्यानुसार ऑस्ट्रियाने ताबडतोब कृती करून नेपल्स आणि सार्डिनिया येथील क्रांती नष्ट केली. दोन्ही ठिकाणी पूर्ववत अनियंत्रित राजेशाहीस सुरुवात झाली. फ्रेंच राज्यक्रांती व नेपोलियनची कारकीर्द यामुळे युरोप फार धास्तावला होता, म्हणूनच प्रतिगामी प्रवृत्तीने राजकारण खेळण्यास सुरुवात झाली होती. इंग्लंडशिवाय सर्व युरोपने त्यास पाठिंबा दिला. फ्रान्सनेसुद्धा मेटरनिकच्या धोरणास विरोध केला नाही. त्यामुळे इंग्लंडला एकट्याला मेटरनिकशी लढणे शक्य झाले नाही.

**४. व्हेरीनाची बैठक (१८२२) :**

संयुक्त युरोपची ही शेवटची बैठक इटलीतील व्हरोना येथे संपन्न झाली. स्पेन व तुर्कस्थान येथील चळवळीबाबत आणि तुर्की साम्राज्यातील ग्रीकाच्या चळवळीबाबत या बैठकीत चर्चा झाली. ग्रीक प्रश्नाविषयी बैठकीत उघड-उघड चर्चा नको, असा रशियाचा आग्रह होता. रशियाचे हितसंबंध ग्रीकमध्ये गुंतलेले होते.

तुर्कीप्रश्न रशियास एकट्याला सोडविण्याचा अधिकार इंग्लंड व ऑस्ट्रियाने दिला नाही. कारण इंग्लंड व ऑस्ट्रियाचे संबंध तुर्कस्थानात गुंतलेले होते.

स्पेनमध्ये १८२२ साली तेथील राजाच्या विरोधात उठाव झाला. म्हणून स्पेनचा राजा सातवा फर्डिनांड याने जनतेला धार्मिक स्वातंत्र्य देऊन राज्यघटनाही दिली आणि फ्रान्सकडे मदत मागितली. फ्रान्सने स्पेनमधील उठाव चिरडून टाकावा अशी स्पेनच्या राजाची आंतरिक इच्छा होती म्हणून संयुक्त युरोपच्या या बैठकीत स्पेन येथील क्रांती दडपण्याचा अधिकार फ्रान्सला देण्यात आला. फ्रान्सने लष्कराच्या साहाय्याने स्पेनमध्ये फर्डिनंड सातवा यास पुन्हा अनियंत्रित राजेपद दिले.

अशा रीतीने संयुक्त युरोपच्या चार बैठका युरोपात वेगवेगळ्या ठिकाणी पार पडल्या. मेटरनिकने या संघटनेमार्फत प्रतिगामी विचारसरणी युरोपात रुजविण्याचा प्रयत्न केला. प्रथमतः या संघटनेस चांगले यश मिळाले परंतु युरोपचा राजकीय समतोल मात्र राखला गेला नाही. युरोपमधील क्रांतिकारक चळवळी दडपून टाकणे अशक्य होते. मेटरनिकने मात्र प्रवाहाच्या विरोधात जाऊन कार्य करण्याचा प्रयत्न केल्यामुळे फार काळ ही संघटना अस्तित्वात राहिली नाही.

**● संयुक्त युरोपचा शेवट :**

स्पेनमधील क्रांतीचा संयुक्त युरोपने बीमोड केल्यावर मेटरनिकला आनंद झाला. जगाला आता चांगले दिवस येतील, जग नष्ट होऊ नये अशी परमेश्वराचीच इच्छा दिसते. असे मेटरनिकने उदगार काढले. पण भवितव्य फार वेगळे होते. दुसऱ्या देशाच्या अंतर्गत प्रश्नात हस्तक्षेप करण्याची परवानगी दिली तेंव्हा संयुक्त युरोपातून इंग्लंडने अंग काढून घेतले. त्यामुळे संयुक्त युरोप दुबळा बनला. १८२५ साली पिट्सबर्ग येथे संयुक्त युरोपचे व ग्रीस प्रश्न सोडविण्याबाबत अधिवेशन ठरले होते. या अधिवेशनात इंग्लंड नाही हे पाहून रशियाने तुर्कस्थानचा प्रश्न आपल्या मनाप्रमाणे सोडवू असे जाहीर केले. शेवटी झारचा मृत्यू झाल्याने इ.स. १८२५ साली संयुक्त युरोप संघटनाच संपली. पुढे बेल्जिअम व फ्रान्स या देशात १८३० मध्ये क्रांत्या होऊन मेटरनिक पद्धत कोसळली.

**● संयुक्त युरोपच्या अपयशाची कारणे :**

**१) बड्या राष्ट्रातील सत्तास्पर्धा व मतभेद :**

संयुक्त युरोप या संघटनेच्या स्थापनेपासूनच सधन राष्ट्रांना स्वत:च्या हितसंबंधाचे रक्षण करून साम्राज्य वाढवावयाचे होते. ऑस्ट्रियाला तर केवळ आपले साम्राज्य टिकवायचे होते. रशियाला इंग्लंड बरोबर सागरी व्यापारात स्पर्धा करण्यासाठी समुद्रावर वर्चस्व हवे होते. इंग्लंडचा त्याला विरोध होता. ऑस्ट्रिया व रशिया यांचे बाल्कन राष्ट्रांबाबत मतभेद होते. तेंव्हा सत्तास्पर्धा व मतभेद असल्याने प्रत्येकजण साम्राज्य वाढवायचे पाहत होता. त्यांचातील सहकार्य दिखाऊपणाचे होते. त्यामुळे हा संघ दिर्घकाळ टिकणे शक्यच नव्हते.

**२) सदस्य राष्ट्रांत एकजुटीचा अभाव :**

संयुक्त युरोपमध्ये असणाऱ्या सदस्य राष्ट्रांमध्ये एकजूट होती. पण ती मर्यादित होती. नेपोलियनचा पाडाव करून फ्रान्सपासून युरोपला धोका पोहचणार नाही याची व्यवस्था करण्यापर्यंत त्यांच्यात एकजुट होती. पण नंतर त्यांच्यातील मतभेद दिसू लागले. आपला स्वार्थ साधण्याचे धोरण प्रत्येकजण अंमलात आणू लागताच संयुक्त युरोप कोलमडला.

**३) राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव :**

फ्रेंच क्रांतीतून जन्माला आलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता, राष्ट्रवाद, लोकशाहीवाद या तत्त्वांचा युरोपच्या जनतेवर इतका मोठा प्रभाव पडला होता की, युरोपातील कोणतेही राष्ट्र पारतंत्र्यात राहणे शक्य नव्हते. त्यामुळे प्रतिगामी स्वरूपाच्या या संयुक्त युरोपला लवकरच आपला गाशा गुंडाळावा लागणार होता. निरनिराळ्या राज्यांत ज्या क्रांत्या झाल्या त्या दडपण्यास संयुक्त युरोपला जे यश आले ते तात्पुरते होते.

**४) इंग्लंडची भूमिका :**

संयुक्त युरोपातील रशिया, प्रशिया, ऑस्ट्रिया व फ्रान्स या सदस्य राष्ट्रांत अनियंत्रित राजेशाही अस्तित्वात होती. तर इंग्लंड या सदस्य राष्ट्रात मात्र संसदीय राज्यपद्धती अस्तित्वात होती. संयुक्त युरोपातील सत्ताधिशानी संयुक्त युरोप या संघटनेचा वापर युरोपमधील उदारमतवादी, लोकशाहीवादी व राष्ट्रवादी चळवळ दडवून टाकण्यासाठी करावयास सुरूवात केली. त्यामुळे इंग्लंडसारख्या लोकशाही पद्धतीने राज्यकारभार करणाऱ्या राष्ट्राचे या सम्राटांबरोबर पटणे शक्य नव्हते. त्यामुळे त्याने संयुक्त युरोपमधून अंग काढून घेतले.

**५) ट्रोपेडच्या ठरावास इंग्लंडचा विरोध :**

दुसऱ्या देशातील क्रांती चिरडून टाकण्यासाठी संयुक्त युरोपने त्या देशाच्या अंतर्गत कारभारात सैन्यासह हस्तक्षेप करून त्या क्रांत्या दडपाव्यात असे मेटरनिकचे म्हणणे होते. याला रशिया व प्राशिया या देशांचा पाठींबा होता. त्यामुळेच त्यांनी ट्रोपेडचा ठराव पास करून घेतला होता, पण इंग्लंडला हा ठराव मान्य नव्हता. शेवटी याच मुद्यांवर मतभेद होऊन इंग्लंडने संयुक्त युरोपचा त्याग केला. त्यामुळे संयुक्त युरोप जवळ जवळ संपलाच.

- **मेटरनिकची कामगिरी :**

**१. मेटरनिक आणि नेपोलियन :**

युरोपात नेपोलियनचे वैभव शिखरास पोहोचले होते. अशा परिस्थितीत त्याने नेपोलियन बाबत मुत्सद्देगिरीचे धोरण स्वीकारले. नेपोलियनकडून ऑस्ट्रियाचा दुसऱ्यांदा पराभव झाला. त्याने नेपोलियनशी स्नेहाचे संबंध निर्मान केले. इतकेच नव्हे तर ऑस्ट्रियन राजकन्येचा नेपोलियनशी विवाह घडवून आणला. तसेच त्याला नेपोलियन रशियाचा पूर्ण पाडाव करू नये असे वाटत होते. कारण रशिया पराभव झाल्यास युरोपातील सत्तेचा समतोलपणा नाहीसा होईल अशी भीती त्याने व्यक्त केली होती. म्हणूनच त्याने १८१२ च्या रशियन मोहिमेत

कोणत्याही प्रकारची मदत केली नाही. केवळ त्याने मदतीचे आश्वासन दिले होते. नेपोलियनने १८१३ आणि १८१४ च्या युद्धात पाडाव करण्यात मेटरनिकचे जाणेच महत्त्वाचे ठरले. त्यामुळे त्याला पुढील युरोपच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

**२. मेटरनिक आणि व्हिएन्ना परिषद :**

नेपोलियनच्या पाडावानंतर युरोपची पुनर्रचना करण्यासाठी ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्ना येथे परिषद भरली ह्या महत्वपूर्ण ऐतिहासिक परिषदेचे अध्यक्षपद मेटरनिककडे सोपविले होते. या परिषदेमार्फत, त्याला बदललेला युरोपचा नकाशा केवळ पूर्ववत करावयाचा नव्हता, तर फ्रेंच राज्यक्रांती पूर्वीचा युरोप निर्माण करावयाचा होता. क्रांतीतून जन्मास आलेल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या महान मानवी मूल्यांना मूठमाती द्यावयाची होती. म्हणून नेपोलियनने जुन्या राज्यकर्त्यांना पुन्हा त्यांच्या राज्यावर नियुक्त केले. तसेच त्यांना भरपाई देण्यात आली. या परिषदेत जे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्याद्वारे उदारमतवाद व राष्ट्रवाद हि तत्वे नष्ट करण्याचा त्याने प्रयत्न केला.

या परिषदेच्या माध्यमातून त्याने ऑस्ट्रियाला मोठा प्रादेशिक लाभ प्राप्त करून दिला. नेदरलँडच्या मोबदल्यात बरेच प्रदेश मिळविले. यामध्ये इटलीतील लोबांर्डी आणि व्हेनेशिया उल्लेख करता येईल. त्याचप्रमाणे ऑस्ट्रियन राजघराण्यातील अनेक राजकुमारांची त्याने इटलीतील पार्मा, मोदेना आणि टस्कनी येथील राजेपदी नियुक्ती केली. जर्मन राज्य संघाचे अध्यक्ष पद ऑस्ट्रियाकडेच राहिले. फ्रान्सकडून ऑस्ट्रियाला कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण होऊ नये म्हणून ऑस्ट्रियाची फ्रान्सकडील सरहद्द अधिक भक्कम केली.

**३. मेटरनिक आणि संयुक्त युरोप :**

आपले ध्येय आणि धोरण राबविण्यासाठी मेटरनिकने संयुक्त युरोप ही संघटना उभारण्यात पुढाकार घेतला. या संघात इंग्लंड, रशिया व प्रशिया ही महत्त्वाची राष्ट्रे होती. या संघाविषयी मेटरनिक म्हणतो. with a view to discuss the problems facing them and thereby maintain the peace of Europe या संघाच्या एकूण चार बैठका झाल्या, त्यामध्ये मेटरनिकचा प्रभाव पडलेला दिसून येतो. या परिषदेमध्ये जे महत्त्वपूर्ण ठराव झाले, त्यामध्ये त्याच्या कार्याचा प्रभाव पडल्याचे दिसते. ट्रोपुओचा जाहीरनामा म्हणजे त्याच्या धोरणाचे फार मोठे यश होय. या जाहीरनाम्याद्वारे त्याने युरोपातील उदारमतवादी चळवळी दडवून टाकण्याचा प्रयत्न केला. याप्रमाणे मेटरनिकने संयुक्त युरोप या महत्त्वाच्या संघटनेद्वारा आपल्या प्रतिगामी धोरणाची अंमलबजावणी करण्याची जी चिकाटी दाखविली आणि त्यामध्ये तात्पुरते का होईना यश ही मिळविले. ते त्याच्या ध्येयधोरणा नुसार महत्त्वाचे ठरले.

**४. मेटरनिक आणि जर्मनी :**

नेपोलियनने जर्मनी संघटित करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु मेटरनिकने नेपोलियनचा पाडाव झाल्यानंतर जर्मनीत राष्ट्रवादी भावनेचा उद्रेक होऊ नये, या हेतूने जे प्रयत्न केले. त्यामुळे जर्मन राष्ट्र संघटित न करता लहान मोठ्या ३८ राज्यांचे एक संघराज्य बनले. या राज्यांना त्याने स्वायत्तता दिली, त्यामुळे या राज्यात एकमेकात

संघर्ष होऊ लागला. जर्मनीतील या वेगवेगळ्या राज्यांना स्वायत्तता देऊन आपआपसात त्यांना झुंजत ठेवून, एकत्रित राज्याच्या पयत्नांना त्याने यशस्वीपणे बगल दिली. या धोरणाचे समर्थन करण्यासाठी त्याने जर्मनीतील राष्ट्रवादी चळवळी दडपून टाकण्यासाठी कार्लसबाद जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यानुसार त्याने विद्यार्थी, शिक्षक, विद्यापीठ आणि वृत्तपत्रे यांच्यावर बंधने घातली.

मेटरनिकने प्रशिया आणि इतर जर्मन राज्यात सतत संघर्ष निर्माण व्हावा यासाठी प्रयत्न केले. कारण जर्मनीतील सर्वांत प्रबळ राज्य म्हणून प्रशियाचा उल्लेख केला जात होता. प्रशियाच्या नेतृत्वाखाली जर्मनी संघटित होईल अशी त्याला भीती वाटत होती. १८३० च्या फ्रेंच क्रांतीचे जर्मनीतील काही राज्यात पडसाद उमटले होते, परंतु मेटरनिकने येथील उठाव लागलीच मोडून काढले होते. १८४८ पर्यंत त्याचे जर्मनीवर पूर्ण नियंत्रण राहिले होते.

**५. मेटरनिक आणि इटली :**

नेपालियनच्या इटलीवरील मोहिमांमुळे इटलीत ऐक्याच्या दिशेने वाटचाल झाली होती. त्याने इटलीतील प्रदेशांचे एक स्वतंत्र असे राज्य निर्माण केले होते. परंतु मेटरनिकला इटलीचे एकीकरण नको होते. कारण ऐक्यामुळे राष्ट्रवादाची ज्वलंत भावना निर्माण होईल आणि त्यामुळे आपल्या साम्राज्यावर परिणाम होईल, हा धोका प्रतिगामी मेटरनिकने ओळखला होता. म्हणून त्याने धूर्तपणाने व्हिएन्ना परिषदेच्या माध्यमातून इटलीचे अनेक राज्यात विभाजन करण्याचे धोरण स्वीकारले.

इटलीतील लोंबार्डी व व्हेनेशिया त्याने आपल्या साम्राज्यात विलीन केले. ऑस्ट्रियन राजघराण्यातील काही व्यक्तींना पार्मा, मोदेना व टस्कनी या राज्यांचे राजेपद बहाल केले. नेपल्स व सिसली येथील राजांशी स्वतंत्रपणे करार करून त्यांना संकटाच्या वेळी मदत करण्याचे आश्वासन दिले. १८३० च्या फ्रेंच क्रांतीचा परिणाम इटलीतील अनेक राज्यावर झाला होता आणि अनेक राज्यत उठाव घडून आले होते. हे उठाव मेटरनिकने चिरडून टाकले व इटलीचे विघटन केले.

**६. मेटरनिक आणि स्पेन :**

स्पेनमधील राष्ट्रवादी चळवळीमुळे नेपोलियनच्या पतनास सुरुवात झाली. परंतु मेटरनिकने व्हिएन्ना परिषदेच्या साहाय्याने येथे लोकतंत्र राजवट निर्माण न करता सातव्या फर्डिनांडची अनियंत्रित सत्ता स्थापन केली. फर्डिनांड जुलमी असल्यामुळे तेथील जनतेने त्याच्या विरुद्ध १८२० मध्ये उठाव केला आणि उदारमतवादी घटनेची मागणी केली. उठावाची तीव्रता पाहून त्याने उदारमतवादी घटना स्पॅनिश जनतेला बहाल केली. स्पेनच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी व्हेरोना येथे संयुक्त युरोपची बैठक बोलवण्यात आली. इंग्लंडचा विरोध असतानाही स्पॅनिश लोकाचा उठाव मोडून काढण्याची जबाबदारी संघाने फ्रान्सवर सोपविली. फ्रेंच सैन्याने येथील उठाव मोडून काढला आणि फर्डिनंडची जुनी जुलमी राजवट परत चालू ठेवली. पुढे १८३० चा उठावही त्याने चिरडून टाकला होता. स्पेनमध्ये जुनी व्यवस्था निर्माण करण्यात मेटरनिकला त्याच्या डावपेचामुळे यश आले होते.

**७. मेटरनिक आणि रशिया :**

प्रारंभीच्या काळात मेटरनिकचे प्रतिगामी धोरण रशियाचा सम्राट झार अलेक्झांडर पहिला यास मान्य नव्हते. तो उदारमतवादी विचारसरणीचा होता. परंतु त्याच्या धोरणात बदल झाला, कारण या धोरणामुळे त्याच्या अंगरक्षकांनीच उठाव केला होता. तसेच चळवळीचे प्रमाणही वाढले होते. म्हणून झारने मेटरनिकच्या सल्ल्याने १८१५ पासून प्रतिगामी धोरण स्वीकारले होते. त्यामुळे रशियाचा झार मेटरनिकला राजकारणातील गुरू समजत असे. संयुक्त युरोपच्या चारही बैठकामध्ये त्याने मेटरनिकला पाठिंबा दिला होता. १८१५ ते १८२५ या काळात झारने बहुतेक महत्त्वाचे निर्णय मेटरनिकच्या सल्ल्याने घेतले होते. परंतु १८२५ साली झार अलेक्झांडरचे निधन झाले. त्याच्यानंतर झार निकोलस हा रशियाचा सम्राट झाला. तो मात्र स्वतंत्र वृत्तीचा होता, त्याने मेटरनिकचे वर्चस्व झुगारून दिले.

**८. मेटरनिक आणि पूर्वेकडील प्रश्न :**

तुर्की सुलतानाच्या विरोधात ग्रीक जनतेने उठाव केला होता. कारण त्यांना स्वतंत्र राज्याची निर्मिती करावयाची होती. ग्रीकांना रशियाची मदत मिळेल असे वाटत होते. परंतु ऑस्ट्रियाच्या विरोधामुळे रशियाने मदत केली नाही. परिणामी तुर्की सैन्याने अत्यंत निर्दयपणे ग्रीकांचा उठाव मोडून काढला. ग्रीकांनी परत १८२१ मध्ये व्यापक प्रमाणात उठाव केला होता. यावेळी देखील मेटरनिकच्या सल्ल्याने रशियाने ग्रीकांना सहकार्य केले नाही. त्यामुळे या वेळेचाही ग्रीकांचा उठाव चिरडण्यात आला.

**९. मेटरनिक आणि फ्रान्स :**

फ्रान्सच्या राज्यक्रांतीने अनेक बिकट प्रश्न निर्माण केले, असे मेटरनिकचे मत होते. या क्रांतीमुळे आणि नेपोलियनच्या युद्धामुळे ऑस्ट्रियाला धोका निर्माण झाला होता. आता नेपोलियनच्या पाडावानंतर भविष्यकाळात फ्रान्सपासून ऑस्ट्रियाला धोका पोहोचू नये, म्हणून त्याने व्हिएन्ना परिषदेत पुढाकार घेऊन, फ्रान्सभोवती प्रबळ राष्ट्रांचे कडे निर्माण केले. मेटरनिक हा फ्रेंच क्रांतीच्या तत्त्वांचा कट्टर द्वेष्टा होता. म्हणूनच त्याने फ्रान्समधून क्रांतीची तत्त्वे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. १८ व्या लुईला फ्रान्सच्या गादीवर नियुक्त करून जुन्या राजवटीचे पुनर्जीवन केले. तसेच १८१८ साली संयुक्त युरोपात फ्रान्सला सामील करून घेतले. १८३० मध्ये फ्रान्समध्ये दुसऱ्यांदा क्रांती झाली, ती दडपून टाकण्यासाठी त्याने बरेच परिश्रम घेतले होते.

**१०. मेटरनिक आणि इंग्लंड :**

मेटरनिकने इंग्लंडच्या मदतीने नेपोलियनचा पराभव करण्यात पुढाकार घेतला होता. इंग्लंडचा परराष्ट्रमंत्री कॅसलरिघच्या मदतीने त्याने व्हिएन्ना परिषद मोठ्या कौशल्याने यशस्वी केली होती. संयुक्त युरोपातही इंग्लंडने मेटरनिकला सहकार्य केले होते. परंतु ही मैत्री फार काळ टिकू शकली नाही. कारण मेटरनिकचे दुसऱ्या राष्ट्राच्या अंतर्गत धोरणात हस्तक्षेप करण्याचे धोरण इंग्लंडला मान्य झाले नाही. म्हणून इंग्लंडने ट्रोपुओच्या जाहीरनाम्याला प्रखर विरोध केला होता. त्यामुळेच इंग्लंड व ऑस्ट्रिया यांच्यात दुरावा निर्माण झाला आणि त्यांच्यातील संबंध

बिघडले. पुढे कॅसलरिघ नंतर कॅनिंग हा परराष्ट्रमंत्री झाला. त्यानेही मेटरनिकच्या दुसऱ्या देशात हस्तक्षेप करण्याच्या धोरणाला विरोध केला होता.

**११. मेटरनिक आणि ऑस्ट्रिया :**

मेटरनिक हा अनियंत्रित सत्तेचा पुरस्कर्ता होता. तो ऑस्ट्रियाचा अनियंत्रित सत्ताधीश या नात्यानेच कारभार पाहत होता. त्याला कोणतीही पुरोगामी बाब मान्य नव्हती. नवीन काही करू नये आणि जुने काही मोडू नये अशा मताचा तो होता. अशा परिस्थितीत ऑस्ट्रियाचा सम्राट अत्यंत दुबळा असल्याने मेटरनिक हाच खऱ्या अर्थाने ऑस्ट्रियाचा सत्ताधीश बनला होता.

ऑस्ट्रियाचे साम्राज्य भिन्न भाषिक व भिन्न वंशीय लोकांचे होते. त्यामुळे येथे राष्ट्रवादी व स्वातंत्र्याच्या चळवळी निर्माण होणे धोक्याचे होते, हे मेटरनिक ओळखून होता. म्हणून त्याने येथे या प्रकारच्या चळवळी होऊ नयेत, यासाठी अत्यंत सावधगिरीचे धोरण अंमलात आणले.

ऑस्ट्रियात उदारमतवादी विचाराचा प्रसार होऊ नये, यासाठी त्याने अनेक उपाय योजले. बाहेरील वृत्तपत्रे आणि अन्य लिखाण शासकीय तपासणीशिवाय येऊ दिले जात नव्हते. विद्यापीठावर कडक नियंत्रणे घातली होती, परदेशात जाण्यासाठी क्वचित प्रसंगीच नागरिकांना परवाने दिले जात असत. सर्व राजकीय संघटनांवर बंदी घालण्यात आली. विशेषतः विद्यार्थ्यांच्या  हालचालीवर कडक नजर ठेवण्यात आली. याशिवाय साम्राज्याच्या कानाकोपऱ्यात गुप्त हेरांचे जाळे विणण्यात आले होते. या हेरांच्या साहाय्याने सरकारविरोधी कारवाया नष्ट करण्यात आल्या. व्यापार वाढीच्या योजनांना देखील त्याने परवानगी दिली नाही. त्याद्वारे परकियांचा हस्तक्षेप वाढेल अशी त्याला भीती होती.

मेटरनिकने ऑस्ट्रियाच्या साम्राज्या भोवती पोलादी पडदा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु येथे मध्यमवर्गाचा उदय झाल्याने मेटरनिकच्या विचारांना विरोध होऊ लागला. येथील गुलाम स्वतंत्र होण्यासाठी प्रयत्न करू लागले होते. तसेच छोटे शेतकरी आपल्या अधिकाराबाबत जागरूक होऊ लागले होते. अशा परिस्थितीत १८४८ मध्ये फ्रान्समध्ये तिसऱ्यांदा क्रांती झाली. त्याचे पडसाद ऑस्ट्रियातही उमटले. या सुमारास ऑस्ट्रियाचा सम्राट दुबळा होता. शिवाय मेटरनिकही वयस्कर झाला होता आणि मंत्र्यांची योग्य असा निर्णय घेण्याची पात्रता नव्हती. यावेळी विद्यार्थी व शिक्षकांनी आपले आंदोलन अधिकच तीव्र केले. त्यांनी सम्राटाच्या विरोधात १२ व १३ मार्च, १८४८ रोजी दोन मोठे मोर्चे आयोजित केले. सैन्य देखील सम्राटाच्या विरोधात गेले आणि त्यांनी उठाववाल्यांना सहकार्य केले. मेटरनिकने परिस्थितीचे गांभीर्य ओळखले, त्याने चॅन्सेलर पदाचा राजीनामा दिला आणि इंग्लंडकडे पलायन केले. त्याचबरोबर मेटरनिक युगाचा अस्त युरोपमध्ये झाला.

- **मेटरनिकची योग्यता :**

आपल्या मुत्सद्देगिरीमुळे 'मेटरनिक युग' निर्माण करणाऱ्या मेटरनिकची योग्यता मध्ययुगीन युरोपच्या

इतिहासात फार प्रभावी ठरते. १८१५ ते १८४८ या काळात संपूर्ण युरोपचे राजकारण मेटरनिक व ऑस्ट्रिया यांच्याभोवती फिरत होते. ऑस्ट्रियन साम्राज्य मेटरनिकच्या कर्तृत्वामुळेच युरोपमध्ये टिकलेले होते. मेटरनिकच्या योग्यतेबाबत अनेक इतिहासकारांनी विविध मते व्यक्त केली आहेत. त्यातून मेटरनिकचे महत्त्व लक्षात येते. इतिहासकार क्रटवेल (Cruttwel) च्या मते, ''अपयश ज्यात निश्चित येणार होते. असा खेळ मेटरनिक खेळत होता.'' प्रो. फिलिप्स म्हणतात की, ''नवीन जगातल्या नवीन कल्पना लक्षात न घेता प्रतिगामी व्यवस्थेसाठी तो धडपडत राहिला.'' असे असले तरी ही मेटरनिक हुशार, बुद्धिवादी, चाणाक्ष व शांतपणे विचार करणारा होता.

**● स्वयं अध्ययन प्रश्न –१ :**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. मेटरनिकचा जन्म ------ मध्ये झाला.

अ) १७७३ ब) १७७४ क) १७७५ ड) १७७६

२. ------- च्या राजाने १८०४ मध्ये ऑस्ट्रियाचा राजदूत म्हणून मेटरनिकला फ्रान्समध्ये पाठविलेले होते.

अ) ऑस्ट्रिया ब) अमेरिका क) चीन ड) इटली

३. ऑस्ट्रीयन जनता मेटरनिकला ----------- असे म्हणत असे.

अ) राजपुत्र ब) जनक क) पिता ड) देव

४. -------- साली संयुक्त युरोपात फ्रान्सला सामील करून घेतले.

अ) १८१८ ब) १८१९ क) १८२० ड) १८२१

५. मेटरनिक हा -------- सत्तेचा पुरस्कर्ता होता

अ) अनियंत्रित ब) नियंत्रित क) ब्रिटीश ड) अमेरीका

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. मेटरनिकचा जन्म कोठे झाला?

२. मेटरनिक ऑस्ट्रियाचा प्रधानमंत्री कधी बनला ?

३. झार अलेक्झांडरचे निधन कधी झाले ?

४. फ्रांसमध्ये तिसरी राज्यक्रांती कधी झाली ?

५. मेटरनिकचा मृत्यू कधी झाला?

### ४.२.२ कार्ल मार्क्स (१८१८– १८८३) :

● **प्रस्तावना :**

जगामधील साम्यवादी विचारसरणीचा पुरस्कर्ता, एक थोर समाजशास्त्रज्ञ, अनेक समाजवादी विचारसरणीपैकी एका समाजवादी विचारसरणीचा जनक, १९१८ साली झालेल्या रशियातील साम्यवादी क्रांती आणि १९४९ मध्ये चीनमध्ये झालेल्या साम्यवादी क्रांतीच्या तत्त्वज्ञानाचा मूळ प्रणेता.

● **बालपण व शिक्षण :**

जर्मनीतील ट्रेव्हेस येथे ५ मे,१८१८ मध्ये मार्क्सचा जन्म झाला. व्यवसायाने वकील असलेल्या मार्क्सच्या वडिलांना आपला मुलगासुद्धा वकील व्हावा असे मनापासून वाटत होते. त्यामुळे मार्क्सने वडिलांच्या इच्छेसाठी कायद्याचा अभ्यास केला. पण मार्क्सचा खरा कल होता इतिहास व तत्त्वज्ञान या विषयांच्या अभ्यासाकडे. मार्क्स हा अत्यंत तल्लख बुद्धीचा होता. त्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण ट्रेव्हेस याच गावी झाले. त्याचे पुढील शिक्षण जर्मनीतील बॉन आणि मुख्यतः बर्लिन या विद्यापीठात झाले. त्याने वडिलांच्या सल्लयानुसार बॉन विद्यापीठातील विधी शाखेत प्रवेश घेतला. त्या वेळी त्याचे वय अवघे १७ वर्षांचे होते. विद्वान प्राध्यापकांचे सान्निध्य आणि हेगेलच्या तत्त्वज्ञानाने भारावलेल्या मार्क्सने १८४१ साली म्हणजे अवघ्या तेवीस वर्षांच्या आतच जेना विद्यापीठाची डॉक्टरेटसारखी उच्च पदवी प्राप्त केली. पीएच. डी. सारखी पदवी हस्तगत केल्यानंतर तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक होऊन शिक्षणक्षेत्रात कार्य करण्याची त्याची इच्छा फलद्रूप झाली नाही.

● **मार्क्सचे सुरवातीचे लेखन :**

जानेवारी, १८४२ मध्ये जर्मनीतील कोलोन या शहरातून प्रसिद्ध होणाऱ्या 'हाइनिश्ते झाइटंग' या वृत्तपत्रात मार्क्सने लेखन सुरू केले. मार्क्सने लेखन स्वातंत्र्यावर जे लिखाण केले हे ह्याच काळातील होय. १५ ऑक्टोबर, १८४२ रोजी हाइनिश्ते झाइटंग या वृत्तपत्राचा तो संपादक बनला. त्यात साम्यवादाची एका नव्या रूपात मांडणी त्याने सुरू केली. रशियन सरकारच्या दबावामुळे जर्मन सत्ताधाऱ्यांनी मार्क्सचे हे वृत्तपत्र बंद पाडले.

मार्क्सच्या चिंतनाची खरी सरूवात झाली ती पत्रकारितेतूनच. अगदी सुरुवातीला 'The Rhenish Times' या पत्रिकेत मार्क्सचे लेखन प्रसिद्ध झाले. त्याच्या संग्रही असलेल्या विविध लेखांचे संकलन आणि संपादन 'मार्क्स एंजिल्स प्रतिष्ठान' या संस्थेने केले. त्याने आपला पहिला सुप्रसिद्ध ग्रंथ 'Economics and Philosophic Manuscripts of 1844' लिहून काढला. याच वर्षी 'Towards the Critique of the Hegelian Philosophy of Right' हा निबंध प्रसिद्ध झाला. धर्म ही जनतेची अफू आहे, हा मार्क्सचा निष्कर्ष या निबंधात आला असून त्याचप्रमाणे कामगारांना उठावाचे आवाहनही यातच पहिल्यांदा आले आहे. १८४७ मध्ये The Poverty of Philosophy (तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य) हा ग्रंथ फ्रेंच भाषेत लिहिला आहे. हा ग्रंथ लिहिण्यास प्रौधन याचे 'दारिद्र्याचे तत्त्वज्ञान' हा ग्रंथ कारणीभूत ठरला. मार्क्सने त्याच्या 'तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य' या ग्रंथातून मानवी इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास आहे हे सोदाहरण पटवून दिले. दारिद्र्याच्या उत्पत्तीसंबंधीची कारणमीमांसा आणि दारिद्र्याच्या निवारणाबाबत तपशिलाने विचार प्रकट केले आहे.

'कम्युनिस्ट लीग' ह्या क्रांतीकारकांच्या संस्थेने मार्क्स आणि अन्जल्स याच्याकडे साम्यवादी क्रांतीतत्वे आणि कार्यक्रम समाविष्ट केलेला एक जाहीरनामा तयार करण्याची कामगिरी सोपविली होती. त्यानुसार त्यांनी केलेला 'साम्यवादी जाहीरनामा' (Communist Manifesto) १८४८ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला.

● **दास कॅपिटल :**

'दास कॅपिटल' (Das Capital) ही मार्क्सची अमरकृती मानली जाते. हा ग्रंथ लिहिण्यासाठी मार्क्सला तब्बल १८ वर्षे घालवावी लागली. २५०० पानांच्या या जगप्रसिद्ध ग्रंथाचा पहिला भाग १८६७ मध्ये प्रसिद्ध केला. त्याचे दोन भाग त्याच्या मृत्यूनंतर एंजल्सने १८८५ व १८९४ मध्ये प्रसिद्ध केले. प्रामुख्याने श्रमिकांचे शोषण, भांडवल प्रधान अर्थव्यवस्था आणि सामाजिक मूल्यासंबंधीच्या विचारांचे विस्तृत विवेचन मार्क्सने या ग्रंथात केले. त्याच्या या ग्रंथाचे अवलोकन केल्यानंतर मार्क्स हा एक अत्यंत प्रतिभाशाली, व्यवहारी आणि सफल अर्थशास्त्रज्ञ होता हे सहज लक्षात येते. त्याच्या कठोर परिश्रमाची, अजोड बुद्धीची अन् विचारांच्या शास्त्रशुद्ध मांडणीची म्हणूनच इतर कोणी समाजवादी अर्थशास्त्रज्ञ बरोबरी करू शकत नाही. त्याचा 'दास कॅपिटल' ग्रंथ आधुनिक समाजवादाचा बायबल समजला जातो.

● **मार्क्सचा साम्यवाद-शास्त्रीय समाजवाद (Communism-Scientific Socialism) :**

कार्ल मार्क्सपूर्वी समाजवादी विचाराचे रोपण युरोपातील सामाजिक व राजकीय व्यवस्थेत झाले होते. कार्ल मार्क्सने समाजवादाचे निश्चित शास्त्रशुद्ध तत्त्वज्ञान सांगितले; म्हणूनच कार्ल मार्क्सला समाजवादाचा प्रणेता' (Father of Socialism) असे म्हटले जाते. मार्क्स आणि एंगल्स या दोन समाजवादी विचारवंतांनी कम्युनिस्ट लीगसाठी समाजवादी विचारांचा जो एक मसुदा तयार केला होता, त्या मसुद्यास कम्युनिस्ट लीगच्या दुसऱ्या परिषदेत १८४८ साली मान्यता दिली. तो अंतिम दस्तऐवज म्हणजे 'कम्युनिस्टांचा जाहीरनामा (Communist Manifesto) होय.

'कम्युनिस्टांचा जाहीरनामा' साम्यवादाच्या इतिहासामध्ये एखाद्या पवित्र ग्रंथाप्रमाणे मानला जातो. साम्यवादाचे सर्व तत्त्वज्ञान या जाहीरनाम्यात ग्रथित केले आहे. मार्क्स आपल्या साम्यवादाला 'शास्त्रीय समाजवाद' (Scientific Socialism) असे नाव देतो. त्याची समाजवादी विचारसरणी शास्त्रशुद्ध व तर्कसंगत पद्धतीने मांडण्यात आली असून नैसर्गिक शास्त्राप्रमाणे (Natural Science) त्याची पडताळणी करणे शक्य आहे, असे मार्क्सचे म्हणणे आहे.

● **पहिला दस्तऐवज :**

'कम्युनिस्ट जाहीरनामा' हा या शास्त्रीय समाजवादातील पहिला दस्तऐवज आहे व साम्यवादी समाजरचना कशी उभी करावी याचा बारा कलमी कार्यक्रम जाहीरनाम्याच्या दुसऱ्या विभागात स्पष्टपणे दिला आहे. तो असा-

१. जमीन मालकी रद्द करून जमिनीचा सर्व खंड शासकीय खर्चासाठी वापरणे.

२. चढत्या क्रमाने प्राप्तीकर लागू करणे.

३. वडिलोपार्जित मिळकतीचे सर्व हक्क रद्द करणे.

४. परदेशात स्थलांतर केलेल्यांची व बंडखोरांची मालमत्ता जप्त करणे.

५. राष्ट्रीय बँकेच्या माध्यमाद्वारे कर्जाचे सर्व व्यवहार सरकारच्या हाती केंद्रित करणे.

६. दळणवळणाची साधने शासनाच्या हाती केंद्रित करणे.

७. शासकीय मालकीच्या कारखान्यांच्या व उत्पादन साधनांच्या संख्येत वाढ करणे.

८. पडिक जमिनी लागवडीखाली आणून तिची सुधारणा करणे.

९. काम करण्याची सर्वांवर समान जवाबदारी टाकणे.

१०. शेतीचा उद्योगधंद्याशी संयोग साधून शहरे व खेडी यातील भेद दूर करणे.

११. सर्व मुलांसाठी विनाशुल्क शिक्षणाची सोय करणे.

१२. भौतिक उत्पादनाशी शिक्षणाचा समन्वय घडवून आणणे.

● **साम्यवादाची प्रमुख तत्त्वे :**

कार्ल मार्क्स प्रणीत साम्यवादाची पाच मुख्य तत्त्वे आहेत.

१) समाजाच्या इतिहासाचा भौतिक अर्थ.

२) वर्ग कलह.

३) सामाजिक क्रांती

४) कामगारांची हुकुमशाही

५) राज्यविरहित समाज

**१. समाजाच्या इतिहासाचा भौतिक अर्थ :**

मानवजातीचा सर्व इतिहास अर्थप्रधान आहे. समाजात फक्त दोन वर्ग अस्तित्वात होते, 'आहे रे आणि नाही रे' (Haves and Have not's). ज्याच्याकडे पैसा वा जमीन वा उदरनिर्वाहाची साधने आहेत. असा एक वर्ग समाजामध्ये असतो आणि ज्याच्याकडे यापैकी काहीच नाही, केवळ दुसऱ्या वर्गाच्या दयेवर त्याला जगावे लागते, असा दुसरा वर्ग असतो.

**२. वर्गकलह :**

इतिहासकाळापासून समाजामध्ये जे दोन वर्ग आहेत, त्यातील उत्पादनाची साधने असणारा वर्ग स्वत : राज्यकर्ता असतो किंवा राज्यकर्त्यांचे साहाय्य घेतो, आणि त्याच्या मदतीने आपल्यास अनुकूल असे

कायदेकानून करून घेतो व समाजाची पिळवणूक करतो. समाजातील दुसऱ्या वर्गाकडे स्वतःच्या श्रमशक्तीशिवाय दुसरे काहीच नसते. त्यांच्यात मुख्यतःशेतमजूर, भूदास, कामगार यांचा भरणा असतो. पहिला वर्ग आपल्याकडे असलेल्या सत्तेचा व पैशाचा दरुपयोग करून दुसऱ्या वर्गाची पिळवणूक करतो. या पिळवणुकीतून कलहास प्रारंभ होतो.

**३. अटळ सामाजिक क्रांती :**

वर्गकलहास सुरुवात झाल्यानंतर, त्याची तीव्रता वाढत जाते. आणि सामाजिक क्रांती अटळ ठरते. परंतु या कलहामध्ये किंवा क्रांतीमध्ये अंतिम विजय 'नाही रे' वाल्यांचा होणार, कारण 'आहे रे' वाले संख्याबलाने अगदीच कमी व त्या तुलनेत 'नाही रे' वाले जास्त असतात.

**४. कामगारांची हुकुमशाही :**

क्रांतीमध्ये 'नाही रे' वाल्यांचा म्हणजे कामगारांचा विजय झाल्यानंतर सर्व राज्यव्यवस्था कामगारांच्या ताब्यात येणार, परंतु सामान्य कामगारांना व्यवस्थापनाचा अनुभव नसल्यामुळे व पूर्वीच्या भांडवलशाही व्यवस्थेतील दुर्गुणांचा प्रभाव त्यांच्यावर काही काळ राहिल्याने, कामगारांतील तज्ज्ञ, हुशार अशा काही कामगारांकडे राज्याची व समाजाची धुरा सोपवून काही काळ हुकुमशाही पद्धतीने शासन चालवावे लागेल. अर्थात, हा हुकुमशाहीचा काळ किती असेल हे सांगता येणार नाही.

**५. राज्यविरहित समाज :**

एकोणिसाव्या शतकातील औद्योगिक क्रांतीमळे निर्माण झालेली भांडवलशाहीची अर्थव्यवस्था हादरून गेली. मार्क्सने 'जगातील सर्व कामगारांनो एक  व्हा' असा नारा दिला .

मार्क्सचा साम्यवाद किंवा शास्त्रीय समाजवाद निर्दोष होता अशातला भाग नाही, त्याकाळातील राजकीय विचारवंतांनी साम्यवादावर खूप टीका केली होती. तरीही तत्त्वतः शास्त्रशुद्ध, तर्कसंगत वाटणाऱ्या साम्यवादाची लाट युरोपात पसरली. विसाव्या शतकात मार्क्सवादी तत्त्वज्ञानाने भारलेल्या साम्यवादी नेत्यांनी क्रांतीची हाक दिली. पूर्व युरोप, चीन इत्यादी देशात साम्यवादी राजवटी उभ्या राहिल्या. परंतु सुमारे ७०-८० वर्षे चाललेला साम्यवादी प्रयोग यशस्वी होऊ शकला नाही.

**● मार्क्सच्या साम्यवादी विचारसरणीतील दोष :**

मार्क्सच्या साम्यवादी विचारसरणीतील दोषांचा विचार करताना प्रमुख दोष दिसतात. (१) शास्त्रीय समाजवादाची तात्त्विक बैठक दिशाभूल करणारी, (२) मूलभूत साम्यवादी तत्त्वे अतिरेकी. (३) इतिहासाचे आर्थिक विश्लेषण अवास्तव. (४) द्विवर्गीयसमाजविभागणी अपुरी. (५) व्यक्तिस्वातंत्र्यास नकार, (६) स्वयंसुधारयंत्रणेचा अभाव, (७) खाजगी मालमत्तेच्या हक्कास नकार. (८) साम्यवादी प्रयोगाच्या अंमलबजावणीतील अपयश. साम्यवादी विचारसरणीतील अशा दोषांमुळे मार्क्सचा साम्यवाद आज मागे पडत चालला आहे.

● **मार्क्सच्या साम्यवादाने काय साध्य केले**

कार्ल मार्क्सने प्रतिपादन केलेल्या साम्यवादी विचारसरणीचा प्रसार हळूहळू एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस होऊ लागला होता. अठराव्या शतकात औद्योगिक क्रांती झाली, एकोणिसाव्या शतकात या क्रांतीने युरोपात चांगलेच मूळ धरले व पश्चिम युरोपीय राष्ट्रात अनेक उद्योगधंदे कारखाने सुरू होऊन उत्पादनात भरीव वाढ झाली. शहरातील कारखान्यात काम करण्यासाठी कामगारांचा शहराकडे ओघ सुरू झाला व खेडी ओस पडू लागली. कारखान्यात कामगार एकत्र येण्याने त्यांच्यात संघटनेची भावना जीव धरू लागली. त्याचवेळी एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात समाजवादाचा उदय झाला. कामगारांच्यात संघटना निर्माण करण्याचे कार्य समाजवादी नेत्यांनी हाती घेतले, कामगारांना आपल्या रास्त हक्कांची जाणीव करून देण्याचे काम समाजवादाने केले.

● **कार्ल मार्क्सचा मृत्यू :**

आयुष्यभर सावली प्रमाणे सोबत करणाऱ्या आपल्या आवडत्या पत्नीचे १८८१ साली कॅन्सरने निधन झाल्याने आणि त्यानंतर अवघ्या एका वर्षाने त्याच्या ज्येष्ठ कन्येच्या निधनामुळे मार्क्स पूर्णपणे उदध्वस्त झाला होता. या दुःखातून त्याला सावरता आल नाही. कमालीची हलाखीची आर्थिक परिस्थिती आणि पत्नी व कन्येच्या मृत्यूने खचून गेलेल्या मार्क्सचासुद्धा पत्नीनंतर अवघ्या दोन वर्षात म्हणजे २७ मार्च, १८८३ रोजी मृत्यू झाला.

● **स्वयं अध्ययन प्रश्न -२**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. कार्ल मार्क्सचा जन्म जर्मनीतील ------- येथे ५ मे, १८१८ मध्ये झाला.

अ) ट्राएर ब) बर्लिन क) म्युनिच ड) फ्रँकफुर्ट

२. मार्क्सने ------- साली जेना विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी प्राप्त केली.

अ) १८४१ ब) १८४२ क) १८४३ ड) १८४४

३. कार्ल मार्क्स १५ ऑक्टोबर, १८४२ रोजी --------- या वृत्तपत्राचा संपादक बनला.

अ) हाइनिश्ते झाइटंग ब) प्रावदा क) इस्करा ड) ट्रीब्यून

४. 'दास कॅपिटल' (Das Capital) ही मार्क्सची ---------- मानली जाते.

अ) अमरकृती ब) पाककृती क) शिलाकृती ड)आकृती

५. कार्ल मार्क्सचा ------------- रोजी मृत्यू झाला.

अ) २७ मार्च, १८८३ ब) २८ मार्च, १८८३
क) २९ मार्च, १८८३ ड) ३० मार्च, १८८३

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. कार्ल मार्क्सचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कोठे झाले?

२. कार्ल मार्क्सने The Poverty of Philosophy (तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य) हा ग्रंथ कोणत्या भाषेत लिहिला आहे?

३. कार्ल मार्क्सला 'समाजवादाचा प्रणेता' (Father of Socialism) असे का म्हटले जाते?

४. मार्क्सने आपल्या साम्यवादाला काय नाव दिलेले आहे ?

५. कार्ल मार्क्सप्रणीत साम्यवादाची किती तत्त्वे आहेत?

### ४.२.३ अब्राहम लिंकन ( १८०९–१८६५) :

**● जन्म व बालपण :**

राष्ट्रध्यक्ष अब्राहम लिंकन याचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ ला एका गरीब शेतकऱ्याच्या कुटुंबात हॉजनव्हिल (केंटकी) येथे झाला. वडील टॉमस व आई नान्सीहॅन्क्स, हे कुटुंब बॅप्टिस्ट पंथीय होते व या पंथाचा गुलामगिरीला विरोध होता. लेखन वाचन करण्याइतपत शिक्षण त्याला कसेबसे घेता आले पण अधिक रीतसर शिक्षणाची संधी त्याला लाभली नाही. लहानपणापासून अब्राहमला वाचनाचे विलक्षण वेड होते. बायबल, इसाप च्या गोष्टी, पिलग्रिम्सप्रोग्रेस, रॉबिन्सन क्रूसो, ग्रिमशॉचा अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचा इतिहास, वीमचे जॉर्ज वॉशिंग्टनचे चरित्र यांसारखे ग्रंथ परिश्रमपूर्वक मिळवून त्याने वाचून काढले.

**● इलीनॉयच्या विधानसभेत प्रवेश :**

अब्राहम यांची इलिनॉयच्या विधानसभेत जाण्याची महत्त्वाकांक्षा होती. व्हिगपक्षातर्फे तो निवडून आला (४ ऑगस्ट १८३४). जॉन स्ट्यूअर्ट या व्हिगपक्षीय वकील मित्राच्या सल्ल्यामुळे त्याने वकिली व्यवसाय करण्याचे ठरविले. लिंकनने १८३६ मध्ये कायद्याची परीक्षा देऊन सनद मिळविली. प्रारंभी स्ट्यूअर्टच्या भागीदारीत व नंतर लोगन स्टिव्हन बरोबर त्याने वकिली व्यवसाय केला. १८४४ नंतर विल्यम हर्नडन यांस त्याने आपल्या भागीदारीत घेतले. अखेरपर्यंत तो या फर्ममध्ये होता. अमेरिकेतील फिरत्या न्यायालयातून तो वकिली करीत असे. वकिलीत त्याला पैसा व प्रतिष्ठा दोन्ही लाभले. इलिनॉयच्या विधानसभेत व्हिगपक्षाचा सदस्य म्हणून १८३४ ते १८४० दरम्यान तो चार वेळा निवडून आला त्याने विधानसभेत गुलामगिरीविरुद्ध आपले मत मांडले.

लिंकन व्हिग पक्षातर्फे इलिनॉयमधून काँग्रेसमध्ये निवडून आला (१८४७–४९). या काळात त्याने राष्ट्रध्यक्ष जेम्स पॉकच्या मेक्सिकोबरोबरच्या युध्दास तीव्र विरोध केला आणि अँकरी टेलरचा अध्यक्ष पदासाठी प्रचार केला. टेलर निवडूनही आला पण लिंकनला हवे असलेले आयुक्ताचे पद त्याने दिले नाही. तेव्हा त्याची घोर निराशा झाली. सक्रिय राजकारणातून त्याने अलिप्त राहण्याचा निर्णय घेतला आणि स्प्रिंगफील्ड मध्ये वकिलीत लक्ष घातले. एक कुशल वकील, तडफदार वक्ता व राजकारणी म्हणून त्याचा लौकिक उत्तरेकडील राज्यांत वाढत होता.

● **लिंकनचा राजकारणात उदय :**

देशातील परिस्थिती चिघळत असताना उत्तरेच्या राजकीय व्यासपीठावर अब्राहम लिंकन नावाचा एक नवा नेता आघाडीला येत होता. १८५८ साली इलिनोइसच्या राज्यात सीनेटसाठी प्रतिनिधीची निवडणूक व्हावयाची होती. यासाठी डेमोक्रेटिक पक्षाने स्टीफन डग्लस याची निवड केली आणि त्याच्या विरोधात रिपब्लिकन पक्षाने अब्राहम लिंकन याला उमेदवारी दिली. डग्लस हा उत्तरेचा मान्यवर नेता होता. तो राजकारणात मुरलेला मुत्सदी होता. आर्जवी वक्तृत्वात त्याचा हात धरणारा उत्तरेत कोणीही नव्हता. यापूर्वी त्याने बरीच वर्षे राज्य विधिमंडळावर काम केले होते, आणि इलिनॉईसमधून तो १८५६ साली सीनेटवर निवडून आला होता. कॅन्ससची अन्याय्य राज्यघटना फेटाळून लावण्यात त्याने पुढाकार घेतला असल्यामुळे उत्तरेकडे त्याची लोकप्रियता वृद्धिंगत झाली होती.

● **गुलामगिरीचे विदारक दर्शन :**

जेम्स केन्ट्री हा व्यापारी पीजनक्रीक मधील आपला शेतमाल मिसिसिपी नदीतून न्यू ऑर्लीअन्सला पाठविणार होता. त्याने अब्राहम व अन्य दोन तरूण ह्यांच्याकडे ही कामगिरी सोपविली. या तीन महिन्यांच्या, प्रवासात त्याला अनेक अनुभव आले विशेषतः गुलामगिरीचे विदारक दर्शन घडले.

१८५४ च्या सुमारास स्टीफन आर्नाल्डडग्लस या लोकप्रतिनिधीने सीनेटमध्ये कायद्याचा मसुदा सादर केला. संघराज्यांत सामील होऊ पाहणारी कॅनझस व नेबॅस्का ही घटकराज्ये करारांतल्या सीमारेषेच्या उत्तरेस होती. तेथे गुलामगिरी चालू द्यावयाची की नाही, हे घटक राज्यांनी ठरवावे, हा मसुद्याचा आशय होता. प्रचाराच्या फेरीत स्पिंगफील्डमध्ये जाहीर सभेत लिंकन व डग्लसची चकमक झडली. स्वसमर्थन करणे डग्लसला अशक्य झाले. या सभेमुळे गुलामगिरीला विरोध करणाऱ्या अमेरिकन जनतेला लिंकन हा नेता मिळाला.

● **रिपब्लिकन पक्षाची स्थापना :**

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने ड्रेड स्कॉट नावाच्या गुलामाच्या बाबतीत दिलेला निर्णय गुलामगिरीच्या पुरस्कर्त्यांना अनुकूल होता. दक्षिणेकडची घटकराज्ये व उरलेली घटकराज्ये यांच्या दरम्यान धुमसणारा लढा आता तीव्र बनणार, हे अब्राहमने ओळखले. १८५८ सालच्या सीनेटच्या निवडणुकीत त्याने डग्लसला विरोध केला. १८६० साली राष्ट्रध्यक्ष होण्याची डग्लसची इच्छा आहे. त्याच्यासारखा डळमळीत अध्यक्ष राष्ट्रीय ऐक्य अभंग राखू शकणार नाही, असे अब्राहमला वाटू लागले. डग्लसला आव्हान म्हणून त्याने १८५८ साली निवडणूक लढविली. तत्पूर्वी गुलामगिरीला विरोध करणाऱ्या लोकांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली (१८५५).

● **दासप्रथाविरोधी भूमिका :**

१८५८ ची सीनेटची निवडणूक डग्लसने जिंकली. परंतु डग्लसची गुलामी संबंधीची मते ओणिबुकानन सरकारची भूमिका यातील अंतर स्पष्ट करण्याचा लिंकनचा उद्देश यामुळे साध्य झाला होता. डग्लस-लिंकन

वादविवादाने दासप्रथा हा देशातील ज्वलंत प्रश्न असल्याची जाणीव अमेरिकन नागरिकांना करून दिली. या वादविवादाने लिंकनच्या वैचारिक भूमिकेची माहिती व त्याच्या अंगच्या गुणांची प्रचिती रिपब्लिकन पक्ष नेत्यांना अधिक आली, उत्तरेकडे त्याचे नाव सर्वतोमुखी होण्यास आणि रिपब्लिकन पक्षाच्या दासप्रथाविरोधी भूमिकेचा परिचय उत्तरियाना होण्यास लिंकन-डग्लस वाद प्रामुख्याने फायद्याचा ठरला.

**● १८६० ची अध्यक्षीय निवडणूक व डेमोक्रेटिक पक्षात फूट :**

निग्रो गुलामगिरीला विरोध करणारा रिपब्लिकन पक्ष उत्तरेत प्रबळ होत असताना आणि या प्रश्नावर डेमोक्रेटिक पक्षात विभागीय स्तरावर मतभेद वाढत असताना १८६० सालच्या अध्यक्षीय निवडणुकीची वेळ आली, १८६० च्या अध्यक्षीय निवडणुकीसाठी आपला उमेदवार व कार्यक्रम निश्चित करण्यासाठी चार्लस्टन येथे डेमोक्रेटिक पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन भरले. या अधिवेशनात पक्षसदस्यात असलेले मतभेद पराकोटीला गेले. अखेरीस पक्षात फुट पडली .

**● दासप्रथाविषयक मतभेद :**

निग्रोगुलामगिरी विषयक मतभेद स्पष्ट आकार घेऊ लागला होता. वसाहतींच्या काळापासून चालत आलेली ही अनिष्ट प्रथा अमेरिकेच्या नैतिक मूल्यांना काळीमा फासणारी असल्यामुळे तिचे उच्चाटन व्हावे असे सर्वच नेत्यांना वाटत असले तरी घटनेत तशी तरतूद करणे त्यांना शक्य झाले नव्हते. स्वातंत्र्योत्तर काळात उत्तर व दक्षिणेचा आर्थिक विकास परस्परविरोधी मार्गाने होत गेल्याने या दोन प्रदेशातील दासप्रथेसंबंधी भूमिकेतील अंतर वाढत गेले. दक्षिणेच्या भरभराटीशी व समाजजीवनाशी निग्रोदास प्रथा निगडित झाल्यामुळे त्या प्रथेचे समर्थक बनले होते, तर उत्तरेकडील अर्थव्यवस्थेत व समाजरचनेत गुलामांना स्थान न मिळाल्याने उत्तरेकडील दासप्रथा विरोधी भूमिका दृढमूल बनत गेली होती. उत्तरेकडील मंडळी दासप्रथेचे तीव्र विरोधक व निषेधक बनली होती. लंडी, गॅरीसन, इत्यादींनी दासप्रथेविरुद्धच नव्हे तर निग्रो दासांच्या श्वेतवर्णीय धन्यांवरही सतत प्रखर टीकास्त्र चालविले होते. यामुळे दाक्षिणात्यांच्या मनात उत्तरेविषयी साहजिकच अढी निर्माण झाली होती. जी दासप्रथा दाक्षिणेतील लोकांच्या सर्वांगीण जीवनाचा अविभाज्य घटक बनली होती, त्या प्रथेला उत्तरीयांच्या आघातापासून वाचविण्यासाठी ते दासप्रथेचे केवळ समर्थकच नाही तर आग्रही प्रचारक बनत गेले होते.

**● दासप्रथा नष्ट करणे मुख्य प्रश्न :**

दासप्रथा नष्ट करावी की नाही या मूलभूत प्रश्नाप्रमाणेच या प्रथेची प्रादेशिक व्याप्ती वाढू द्यावयाची की नाही हाही वादाचा विषय होता. १८५० पर्यंत उपस्थित झालेले वादंग तडजोडीने शमले. परंतु त्यानंतरच्या दशकात मात्र विमोचनवाद्यांचा वाढलेला प्रचार, 'फ्युजिटिव्हस्लेव्ह' कायदा धाब्यावर बसवून उत्तरेच्या राज्यांनी केलेले व्यक्तिस्वातंत्र्याचे कायदे, भूमिगत आगगाड्यांचे वाढत गेलेले कार्य, कॅन्सस बिलावरील कटू चर्चा, कॅन्ससमधील भीषण संघर्ष, ड्रेड स्कॉट खटल्यासंबंधीचा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल, निग्रो गुलामांना मुक्त करण्यासाठी ब्राऊनने अंमलात आणलेली धाडसी योजना, इत्यादींच्या उत्तर-दक्षिणेत झालेल्या परस्पर भिन्न प्रतिक्रियामुळे या दोन प्रदेशात असलेल्या तेढीला अधिकाधिक पीळ पडत गेला होता. अखेरीस १८६० साली

दोन्ही प्रदेश आपल्या भूमिकेशी ठाम राहिल्याने संघर्ष अटळ होता.

दाहक व स्फोटक बनलेल्या दासप्रथेच्या समस्येचा परिणाम देशातील राजकीय जीवनावर होणे अपिहार्यच होते. दासप्रथेसंबंधी मवाळ व संदिग्ध पवित्रा घेतल्यामुळे १८५० नंतर पक्षाची उत्तरेकडील लोकप्रियता संपुष्टात आली. यावरून निग्रो गुलामगिरी हे उत्तर–दक्षिण संघर्षाचे मूळ कारण होते.

**● लिंकनची दासमुक्ती संबंधी नीती :**

उत्तरेकडील सर्वसाधारण लोकमत गुलामगिरीचे एका झटक्यात उच्चाटन करावे अशा मताचे नसले, तरी विमोचनवादी मात्र लिंकनला तशी मागणी करू लागले. लिंकन या बाबतीत अत्यंत सावधगिरीने वागत होता. विमोचनवाद्यांच्या मागणीप्रमाणे तत्काळ गुलामगिरी नष्ट करण्याच्या मार्गातील सर्व अडचणी तो ओळखून होता. एकतर असे करणे घटनाबाह्य ठरेल असे त्याचे ठाम मत होते. दुसरे म्हणजे असे केल्याने उत्तरेकडील डेमोक्रॅटिक पक्षसदस्य आणि विशेषतः सीमावर्ती राज्यातील नागरिक दुखावतील हेही तो जाणून होता. युद्धकाळात सीमावर्ती राज्ये संघराज्यात टिकवून धरणे अत्यंत निकडीचे व महत्त्वाचे होते. कारण या राज्यांत भरभराटलेली औद्योगिक केंद्रे होती. धान्याचा, चीज, मांस व दुधदुभत्याच्या पदार्थांचा पुरवठा याच राज्याकडून उत्तरीयांना होत होता. मेरीलँड व डीलावेअर ही संघराज्याबाहेर पडल्यास वॉशिंग्टन हे राजधानीचे शहर शत्रूच्या माऱ्याला उघडे पडणार होते. या गोष्टी ध्यानात घेऊन, सीमावर्ती राज्ये युद्धकार्यात प्रत्यक्ष मदत करीत नसली तरी, त्यांना दुखावणे सूज्ञपणाचे ठरणार नाही असे लिंकनचे मत होते. गुलामगिरीचे उच्चाटन केल्यास ही राज्ये दुखावली जाणार हे सूर्यप्रकाशा इतके स्पष्ट होते आणि संघराज्याच्या दृष्टीने ते हितावह ठरणार नाही याबद्दल त्याची पूर्ण खात्री होती. म्हणून गुलामी प्रथा नष्ट व्हावी असे त्याला स्वतःला प्रामाणिकपणे वाटत असूनही व असे केल्यास त्याच्या पक्षसदस्यांनी त्यांच्यावर चालविलेली टीका थांबेल आणि इंग्लंडमधील लोकमत संघसरकारला अनुकूल बनेल हे सर्व कळूनही केवळ सीमावर्ती राज्यांचे महत्त्व ध्यानात घेऊन त्याने दासप्रथे संबंधाने दिरंगाईचे धोरण अंगिकारले. हे त्याच्या मुत्सद्देगिरीचे द्योतक होते. विमोचनवाद्यांच्या समाधानासाठी काँग्रेसकडून त्याने ऑगस्ट १८६१ आणि जुलै १८६२ मध्ये दोन कॉन्फीस्केशन कायदे' (Confiscation Acts) पास करवून घेतले. या कायद्यांनी राज्यसंघाच्या हस्तगत झालेल्या प्रदेशातील गुलामांना आणि राज्यसंघाच्या हद्दीतून संघसरकारच्या छावणीकडे पळून आलेल्या गुलामांना मुक्त करण्याची तरतूद केली.

ऑगस्ट १८६२ मध्ये होरेसग्रीले या 'न्यूयॉर्क ट्रीब्यून' च्या संपादकाने आपल्या वृत्तपत्रात 'वीस मीलियन नागरिकांची याचना' या मथळ्याखाली एक लेख लिहून दासप्रथेचे कायदेशीररीत्या ताबडतोब उच्चाटन केले जावे अशी मागणी केली आणि असे न झाल्यास संघराज्यातील एकीला तडा जाईल असा धमकीवजा इशाराही दिला. यानंतर दोन दिवसांनी या लेखाला दिलेल्या उत्तरात लिंकनने निःसंदिग्धपणे आपली बाजू मांडतांना दासप्रथा कायम ठेवणे अगर नाहीशी करणे हा युद्धामागील आपला मूळ हेतू नसून संघराज्याची एकी व अभेद्यता अबाधित राखणे हे आपले आद्य उद्दिष्ट आहे, या उद्दिष्टाच्या सिद्धीसाठी दासप्रथापूर्णतः कायम ठेवावी लागली, किंवा काही गुलाम स्वतंत्र करून काहीच्या दास्याच्या शृंखला कायम ठेवाव्या लागल्या तरी तसे करण्यास आपण मागेपुढे पाहणार नाही असे स्पष्ट केले. संघराज्याचे ऐक्य पुन्हा प्रस्थापित करणे हे आपले एकमेव उद्दिष्ट

आहे हे तो संघर्षाला आरंभ झाल्यापासून पुन्हा पुन्हा आवर्जून सांगत होता आणि हा विचार जनतेच्या मनावर बिंबविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होता.

**● दासविमोचनाचा जाहिरनामा :**

संघराज्याच्या एकीच्या पुढे दासप्रथेचा प्रश्न लिंकनच्या लेखी गौण असला, तरी दासप्रथेचे उच्चाटन त्यालाही आवश्यक व निकडीचे वाटत होते. या प्रश्नाचा त्याने खोलवर विचारही केला होता. दासप्रथा नष्ट करण्याच्या मार्गात कायद्याची अडचण उपस्थित होऊ नये म्हणून मार्च १८६२ मध्ये संघराज्यातील गुलामाच्या धन्यांनी गुलामांना मुक्त केल्यास प्रत्येक गुलामामागे ४०० डॉलरची रक्कम मोबदल्यादाखल दिली जाईल अशी घोषणा त्याने केली. या घोषणेला सीमावर्ती राज्यांनी प्रतिसाद दिला नाही. तेव्हा डिसेंबर १८६२ मध्ये काँग्रेसला पाठविलेल्या संदेशात त्याने, १९०० सालापर्यंत संघराज्यातील गुलाम मालकांनी गुलामांना मुक्त केले तरीही त्यांना दर गुलामामागे ४०० डॉलरचा मोबदला दिला जावा असे सुचविले. काँग्रेसने याला मंजुरी दिली. परंतु यालाही सीमावर्ती राज्यांनी अनुकूल प्रतिसाद दिला नाही. अखेरीस सप्टेंबर १८६२ च्या अँटीएट्मच्या पहिल्या विजयानंतर दासविमोचनाच्या जाहिरनाम्याचा मसुदा तयार केला गेला, आणि नव्या वर्षारंभाच्या शुभमुहूर्तावर १ जानेवारी १८६३ रोजी तो जाहीर केला गेला. त्या दिवसापासून संघसरकारविरुद्ध शस्त्र उपसलेल्या राज्यातील सर्व गुलाम स्वतंत्र आहेत अशा आशयाचा हा जाहिरनामा दासविमोचनाचा जाहिरनामा म्हणून प्रसिद्ध आहे.

**● लिंकनच्या मुत्सद्देगिरीची उत्तम साक्ष**

लिंकनने काढलेला हा दासविमोचनाचा जाहिरनामा त्याच्या समंजस मुत्सद्देगिरीची उत्तम साक्ष देतो. यातील तरतूद केवळ संघराज्याविरुद्ध लढणाऱ्या राज्यांनाच लागू होणार असल्याने सीमावर्ती राज्ये याच्या कक्षेत येणार नव्हती. तेथील दासप्रथेला यामुळे धक्का लागणार नसल्याने तेथील गुलाममालक दुखावले जाणार नव्हते. ज्या राज्यांच्या संबंधात यात तरतूद होती ती राज्ये संघसरकारच्या अधिसत्तेखाली नसल्याने तेथेही या धोरणाचा अंमल होण्याचा प्रश्न उदभवत नव्हता. यामुळे केवळ दासमुक्तीचे धोरण जाहीर करण्याव्यतिरिक्त या जाहिरनाम्याला अर्थ उरत नव्हता. तरीही काही दृष्टींनी हा जाहिरनामा फायदेशीर ठरला. लिंकनने दासप्रथेबाबतची संदिग्धता सोडल्यामुळे विमोचनवाद्यांचे काही अंशी समाधान झाले. त्यांची टीका थोड्या प्रमाणात निवळली. इंग्लंडवर याचा अपेक्षित परिणाम झाला. तसेच राज्यसंघावरही याचा अप्रत्यक्ष परिणाम झाला. तेथील निग्रो गुलाम मुक्तीच्या आशेने संघसरकारच्या लष्करी छावण्याकडे धाव घेऊ लागले .

**● दासविमोचनाची घटना दुरुस्ती :**

तेराव्या संशोधनाचा प्रस्ताव काँग्रेसपुढे मांडला गेला आणि १८६५ च्या अखेरपर्यंत आवश्यक तेवढ्या राज्यांची मंजुरी मिळून दासविमोचनाचे तेरावे संशोधन घटनेला जोडले गेले.

● **लिंकनचे परराष्ट्र धोरण (१८६१–६५) :**

लिंकनचे इंग्लंडशी असलेले धोरण– इंग्लंडने दक्षिणेच्या राज्यसंघाला मदत करू नये, हे लिंकनच्या परराष्ट्र धोरणाचे सूत्र होते. म्हणून त्याने मुत्सद्दीपणे सुचविले की, यादवी म्हणजे हे काही दोन देशामधील युद्ध नव्हे. यासाठी लिंकनने चार्लस ॲडम्स याला इंग्लंडमध्ये आपले विचार पटविण्यासाठी पाठविले. योगायोगाची गोष्ट म्हणजे चार्लस लंडन येथे पोहोचला त्याच दिवशी (१३ मे १८६०) त्यांच्याशी बोलणी होण्यापूर्वीच सूचनेप्रमाणे इंग्लंडने तटस्थता जाहीर केली.

लिंकनने सेनापती बिनफिल्ड स्कॉटच्या सूचनेप्रमाणे दक्षिणेच्या राज्यसंघाच्या समुद्रतटाची नाकेबंदी केली होती. राज्यसंघाला आशा वाटत होती की, इंग्लंड ही नाकेबंदी तोडून आपणास मदत करील. या आशेचे कारण असे की, इंग्लंडला दक्षिणेचा कापुस (कच्चा माल) हवा होता. तो मिळविण्यासाठी इंग्लंड नक्कीच संघराज्याच्या विरोधात जाऊन आपणास मदत करेल. दक्षिणेच्या या आशेप्रमाणे जर इंग्लंडने संघराज्याशी संघर्ष केला असता तर संघराज्याच्या वॉशिंग्टन या राजधानीला धोका निर्माण झाला असता.

● **इंग्लंडच्या तटस्थेची कारणे :**

(१) कापसाचा प्रचंड साठा

(२) धान्याची आयात

(३)लोकमत प्रतिकूल

(४) कॅनडा धोक्यात

ट्रेंट प्रकरण–संघराज्याच्या विल्कीज या आरमार अधिकाऱ्याने इंग्लंडचे 'ट्रैट' नावाचे जहाज कॅरीबियन समुद्रात अडविले. त्यात असलेले मेसन व स्लिडेल हे राज्यसंघाचे दोन दूत उतरवून घेतले व आंतरराष्ट्रीय जहाजाला जाऊ दिले. संघराज्याने आंतरराष्ट्रीय नियम मोडला म्हणून त्याने इंग्लंडची क्षमा मागावी व दोन्ही दूतांना सोडून द्यावे अशा आशयांचा खलिता इंग्लंडच्या सरकारने तयार केला पण राणी व्हिक्टोरिया हिच्या पतीने सौम्य शब्दात दुसरा खलिता लिहिण्यास सांगितले. यात एक दीड महिना लोटला. लिंकन व सीवर्ड यांनी मुत्सद्देगिरीने खलित्यास उत्तर देऊन हे प्रकरण मिटविले. ट्रेंट जहाज अडविल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला व दोन्ही दूत सोडून दिले. दोन्ही दूत हे युद्धमान पक्षातील असल्यामुळे त्यांच्या अटकेचे समर्थन देखील करण्यात आले.

● **फ्लोरिडा व अलबामा प्रकरण :**

इंग्लंडमधील लेअर्डब्रदर्स, लिव्हरपूल या कंपनीने बांधलेले 'अलबामा' जहाज दक्षिणेला मदत करण्यास पाठविण्यात आले. यापूर्वीच 'फ्लोरिडा' हे जहाज इंग्लंडहून राज्यसंघाकडे रवाना झाले होते. ही जहाजे संघराज्याच्या व्यापारी जहाजावर मारा करून त्यांना जलसमाधी देत होती. चार्लस ॲडम्स या

संघराज्याच्या इंग्लंडमधील वकिलाने तगादा लावून जहाज अडविण्याचा प्रयत्न केला होता. हे प्रकरण इंग्लंडच्या न्यायालयात गेले होते. इंग्रज न्यायाधीशाने निर्णय दिला की इंग्लंडमधील खाजगी कंपन्या कोणासही युद्धसाहित्य देऊ शकतात.

या निर्णयाने लिंकन अस्वस्थ झाला. त्याने खंबीरपणे अमेरिकन व्यापारी जहाजांची नुकसानभरपाई इंग्लंडने द्यावी अशी मागणी केली. त्याचप्रमाणे त्याने अमेरिकन व्यापारी जहाजाना इंग्लंडच्या जहाजांवर तोफा डागण्यास प्रोत्साहन दिले. हेतू हा की इंग्लंडला शह बसावा.

इंग्लंड संघराज्यास अनुकूल बनले. इ.स.१८६३ मध्ये इंग्लंडचे संघराज्यविषयीचे प्रतिकल धोरण बदलले. याचे मुख्य कारण म्हणजे लिंकनने जाहीर केलेला 'दासमुक्ततेचा जाहीरनामा'. लिंकनचा युद्धामागील मुख्य हेतू गुलामगिरी संपावी, हा आहे असे इंग्लंडला स्पष्टपणे समजले तेव्हा इंग्लंड संघराज्यास अनुकूल झाला.

लिंकनने रशियाशी मैत्री प्रस्थापित केली होती. या सुमारास इंग्लंड-रशियामध्ये संघर्ष निर्माण होण्याची स्थिती दिसू लागली होती अशा स्थितीत संघराज्याशी मिळते घेण्यातच आपले हित आहे असा विचार इंग्लंडने केला.

इ.स.१८६३ मध्ये संघराज्याने राज्यसंघावर गेटिसबर्ग व व्हिक्सबर्ग येथे निर्णायक विजय मिळविले होते याचा परिणाम इंग्लंडवर झाला. पराभूत होण्याच्या मार्गावर असलेल्या राज्यसंघाला मदत करणे उचित नव्हे, असा निर्णय इंग्लंडने घेतला.

वरील प्रमाणे निर्णय घेऊन इंग्लंडने खाजगी कंपन्यांना गुप्त आज्ञा दिल्या की त्यांनी राज्यसंघाला युद्धनौका पुरवू नयेत (सप्टेंबर १८६३).

इ.स. १८६४ मध्ये दक्षिणेने कॅनडामधून संघराज्यावर हल्ले केले. लिंकनने मुत्सद्देगिरीचा अवलंब केला. त्याने 'रश-बेगाट करार' रद्द केला व अमेरिका आणि कॅनडा यामधील करून तेथे सुरक्षा सैनिक नेमले. यामळे इंग्लंडला भीती वाटली की संघराज्य कॅनडात सैकोत म्हणून त्याने दक्षिणेला कॅनडामधून संघराज्यावर हल्ले करण्यास मनाई केली.

वरील विविध घटनांवरून लिंकनचे इंग्लंडशी असलेले परराष्ट्र-धोरण कसे होते याची कल्पना येते.

● **लिंकनचे फ्रांस संबंधी धोरण :**

यादवीच्या काळात फ्रांसमध्ये तिसरा नेपोलियन हा सम्राट होता. दक्षिणेतून फ्रांसला कापूस निर्यात होत होता. म्हणून कापसासाठी फ्रांस आपल्याला मदत करील अशी दक्षिणेला आशा वाटत होती. पण फ्रांसने गृहयुद्धाचा फायदा घेऊन मेक्सिकोवर आपली सत्ता स्थापण्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याचे ठरविले. मेक्सिकोने फ्रान्सचे कर्ज फेडले नव्हते. येथे राजकीय गोंधळ होता. याचा फायदा घेऊन तिसरा नेपोलियन याने इंग्लंडच्या संमतीने फौजा पाठविल्या. तेथील राजधानीचा ताबा घेतला व आपला माणूस म्हणून मॅक्झीमीलियन

याला मेक्सिकोचा राजा बनविले, नेपोलियनची सामाज्य लालसा पाहून इंग्लंडने आपले अंग काढून घेतले. लिंकनच्या सल्ल्याने सीवर्ड याने 'मन्रो सिद्धांताची' आठवण नेपोलियनला करून दिली व मेक्सिकोतून बाहेर पडण्यास सांगितले.

दक्षिणेच्या राज्यसंघाला देखील फ्रांसच्या कारवाईत साम्राज्यवादी स्वरूप आढळले म्हणन त्याने देखील ठामपणे फ्रांसला कळविले की जर फ्रांसने मेक्सिको ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला तर आम्ही संघराज्याबरोबर तुमचा विरोध करू.

या सुमारास मेक्सिकन प्रजेने देखील फ्रांसचा विरोध केला. परिणामतः फ्रांसने मेक्सिकोमधून फौजा काढून घेण्याचे ठरविले. मेक्सिको ताब्यात घेऊन उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका खंडात आपले साम्राज्य पसरविण्याची महत्त्वाकांक्षा तिसरा नेपोलियन यास सोडावी लागली.

**● लिंकन–रशिया मैत्री :**

लिंकनच्या कारकीर्दीच्या वेळी रशियाचा झार अलेक्झांडर दुसरा हा होता. त्याने १८६२ मध्ये रशियातील भूदास पद्धतीचे उच्चाटन केले होते. त्यामुळे त्याला दास पद्धतीच्या विरोधात असलेल्या संघराज्याबद्दल व अध्यक्ष लिंकनबद्दल आपुलकी वाटत होती, असा समज पसरला होता. पण या मैत्रीचे स्वरूप कालांतराने उघडे पडले. रशियाचा पोलंडच्या संदर्भात इंग्लंडशी संघर्ष होणार, असे झारला वाटत होते. जर संघर्ष झाला तर इंग्लंडच्या युद्धनौका बाल्टिक समुद्रात रशियाच्या आरमाराची कोंडी करतील. म्हणून अमेरिकेच्या भेटीची बतावणी करून आपले आरमार जर बाहेर काढले तर इंग्लंडशी संघर्ष उडताच इंग्लंडच्या आरमारावर स्वारी करणे सोयीचे होईल, या दृष्टीने झारने लिंकनशी मैत्रीची बतावणी करून संघराज्याकडे आपल्या युद्धनौका पाठविल्या होत्या.

**● लिंकनचे अंतर्गत धोरण :**

निधी गोळा: लिंकनला यादवीसाठी पैशाची नितांत आवश्यकता होती. म्हणून त्याने निधी गोळा करण्याचे ठरविले. त्याने जकात कर बसविला व कागदी चलनात वाढ केली. याप्रमाणे १८० कोटी डॉलर वसूल केले तसेच कर्ज रोखे विकून १२० कोटी डॉलर गोळा केले. यादवीतील बहुतेक लढाया दक्षिणेतच झाल्यामुळे उत्तरेचे आर्थिक जीवन उद्धवस्त झाले नव्हते. म्हणन हा निधी गोळा करण्यात लिंकनला विशेष कष्ट पडले नाहीत. कारखानदारांनी देखील लिंकनला भरपूर साहाय्य केले.

**● आश्वासन पूर्ण :**

लिंकनने राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणकीच्या वेळी रिपब्लिकन पक्षातर्फे जी आश्वासने दिली होती त्याची पूर्ती करण्यासाठी त्याने खालील कायदे पास केले.

**● मॅरिल टॅरीफ ॲक्ट :**

हा कायदा १८६१ मध्ये पास करण्यात आला. यामुळे आयात मालावर जकात कर वाढविण्यात आला.

त्यामुळे पैसाही मिळाला व कारखानदारांना खूष करण्यात यश मिळाले.

**● नॅशनल बँकिंग ॲक्ट :**

हा कायदा १८६३ साली पारीत करण्यात आला. त्याद्वारे बँकेची स्थापना करण्यात आली. या बँकेने कागदी चलन काढले.

**● होमस्टीड ॲक्ट :**

हा कायदा १८६३ साली पारीत करण्यात आला. मिसिसिपीच्या पश्चिमेकडील प्रदेश ओसाड होता. या कायद्याने ओसाड प्रदेश शेतीसाठी उपयोगात आला. त्यामुळे शेतकरी वर्गाच्या मागण्या पूर्ण झाल्या. या भागात जो राहायला येईल त्याला फक्त १० डॉलर्समध्ये १६० एकर जमीन मिळेल असा या कायद्याचा आशय होता. फक्त त्याने सतत पाच वर्षे पावेतो त्यातून पीक काढावयास हवे.

**६) मॉरिललैंड ग्रँड ॲक्ट :**

हा कायदा देखील १८६३ मध्येच पारीत करण्यात आला. या कायद्याने उच्च शिक्षण संस्था निर्माण करणाऱ्या राज्याला जमीन देण्याचे ठरले. याचा फायदा अनेक संस्थांनी उचलला. त्यामुळे ओसाड प्रदेश गजबजू लागला. कृषिमंडळे स्थापन करणाऱ्या शेतकऱ्यांना शासकीय साहाय्य मिळू लागले.

**● दळणवळण :**

युनियन पॅसिफिक व सेंट्रल पॅसिफिक या नावाच्या रेल्वे कंपन्यांना जमीन देण्यात आली. उद्देश हा की रेल्वे मार्ग निर्माण व्हावे व पश्चिमेकडील भागांशी दळणवळण व्यवस्थित व्हावे.

**● खनिज संपत्ती :**

पश्चिमेकडील ज्या प्रदेशात कोळसा होता तो प्रदेश नाममात्र दराने खाजगी कपन्यांना देऊन कोळशाचे उत्पादन वाढविण्यात आले. अशाच प्रकारे अन्य खनिज संपत्ती उत्पादन प्रोत्साहकांना देण्यात आले.

**● लिंकनचा मृत्यू :**

१४ एप्रिल १८३५ रोजी रात्री फोर्ड नाटकगृहात लिंकन नाटकाचा प्रयोग पाहात बसला असता जॉन बूथ नावाच्या इसमाने त्याच्यावर गोळी झाडली. या आघाताने लिंकन जो बेशुद्ध झाला तो पुन्हा शुद्धीवर आलाच नाही. दुसऱ्या दिवशी पहाटे त्याची प्राणज्योत मावळली.

**● लिंकनच्या कामगिरीचे मूल्यमापन :**

गुलामगिरीच्या समस्येचा नैतिक, राजकीय व कायद्याच्या पातळीवरून विचार करण्यात आणि ती सोडविण्यात लिंकनच्या मुत्सद्दी धोरणीपणा स्पष्ट निदर्शनास येतो. अमेरिकेच्या दृष्टीने मौलिक अशी दोन महत्त्वाची कार्ये करून त्याने देशाच्या इतिहासात आपले नाव अजरामर केले. पहिली महत्त्वाची कामगिरी म्हणजे अविच्छिन्न संघराज्याची पुनर्स्थापना आणि दुसरी संस्मरणीय कामगिरी म्हणजे निग्रो गुलामगिरीचा अंत ही होती.

● **स्वयं अध्ययन प्रश्न -३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. अब्राहम लिंकन याचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ मध्ये --------- कुटुंबात झाला.

अ) शेतकऱ्याच्या ब) व्यापाऱ्याच्या क) उद्योजकाच्या ड) दुकानदाराच्या

२. जॉन स्टयूअर्ट या व्हिगपक्षीय वकील मित्राच्या सल्लामुळे लिंकनने --------- व्यवसाय करण्याचे ठरविले.

अ) वकिली ब) प्राध्यापक क) नेता ड) डॉक्टर

३. --------- पक्षाने अब्राहम लिंकन याला उमेदवारी दिली.

अ) रिपब्लिकन ब) डेमोक्रॅटिक क) जनता ड) काँग्रेस

४. लिंकनच्या कारकीर्दीच्या वेळी रशियाचा झार --------- हा होता.

अ) अलेक्झांडर दुसरा ब) अलेक्झांडर तिसरा क) अलेक्झांडर चौथा ड) अलेक्झांडर पाचवा

५. लिंकनचा मृत्यू --------- मध्ये झाला.

अ) १४ एप्रिल १८३५ ब) १४ एप्रिल १८३६
क) १४ एप्रिल १८३७ ड) १४ एप्रिल १८३८

**ब) एका वाक्यात उतारे लिहा.**

१. लिंकनने कायद्याची सनद कधी मिळविली?

२. दासविमोचनाचा जाहिरनामा कधी प्रसिद्ध झाला ?

३. मॅरिल टॅरीफ ॲक्ट हा कायदा कधी पास करण्यात आला?

४. कोणत्या कायद्याने उच्च शिक्षण संस्था निर्माण करणाऱ्या राज्याला जमीन देण्याचे ठरले?

५. लिंकन वर गोळी कोणी मारली ?

## ४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

● **स्वयं अध्ययन प्रश्न -१**

अ) १. अ) १७७३ २. अ) ऑस्ट्रिया

३. अ) 'राजपुत्र' ४. अ) १८१८

५. अ) अनियंत्रीत

ब) १. कांब्लेज २. १८२१

३. १८२५ ४. १८४८

५. १८५९

● **स्वयं अध्ययन प्रश्न –२**

अ) १. अ) ट्राएर २. अ) १८४१

३. अ) हाइनिश्ते झाइटंग ४. अ) अमरकृती

५. अ) २७ मार्च, १८८३

ब) १. ट्रेव्हेस

२. फ्रेंच

३. कार्ल मार्क्सने समाजवादाचे निश्चित शास्त्रशुद्ध तत्त्वज्ञान सांगितले म्हणूनच कार्ल मार्क्सला समाजवादाचा प्रणेता' (Father of Socialism) असे म्हटले जाते.

४. मार्क्स आपल्या साम्यवादाला 'शास्त्रीय समाजवाद' (Scientific Socialism) असे नाव देतो.

५. पाच तत्त्वे आहेत.

● **स्वयं अध्ययन प्रश्न –३**

अ) १. अ) शेतकऱ्याच्या २. अ) वकिली

३. अ) रिपब्लिकन ४. अ) अलेक्झेंडर दुसरा

५. अ) १४ एप्रिल १८३५

ब) १. १८३६ २. १८६३

३. १८६१ ४. मॉरिललैंड ग्रँड ॲक्ट

५. जॉन बूथ

## ४.५ सारांश :

आधुनिक जगातील ज्या व्यक्तीनी या कालखंडात छाप पाडली त्यामध्ये प्रामुख्याने आपण ऑस्ट्रियाच्या मेटरनिकचे प्रतिगामी व सनातनी धोरण बघितले ज्याने युरोपला आपल्या विचारांच्या सूत्रात बांधून व युरोपमध्ये राजेशाही टिकवण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. ज्याने पवित्र संघ व संयुक्त युरोप या संघटना निर्माण केल्या. यालाच इतिहासात मेटरनिक पध्दती असे म्हटले गेले.

जगामधील कामगारांनो, एक व्हा हा संदेश कार्ल मार्क्सने दिला आणि जर्मनीत जन्मलेल्या कार्लमार्क्सने

जगातील कामगारांचा पिता बनून भांडवलशाही अर्थव्यवस्थेला धक्का देण्याचे काम केले. साम्यवादाचा ज्याला जाहीरनामा मानतात तो म्हणजे त्याने १८४८ मध्ये प्रसिद्ध केलेला कम्युनिस्टाचा जाहीरनामा यामध्ये त्याने समाजवादी विचारसरणी शास्त्राशुद्ध पद्धतीने जगासमोर मांडली.

गुलामगिरी या जगाला लागलेली कलंक असून तो नष्ट करण्याचा प्रयत्न अब्राहम लिंकनने केला व निग्रो गुलामगिरीला मुठमाती दिली.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. मेटरनिकच्या कामगिरीबद्दल सविस्तर माहिती लिहा.

२. कार्ल मार्क्सच्या साम्यवादाची चर्चा करा.

३. अब्राहम लिंकनची दासप्रथाविरोधी भूमिका स्पष्ट करा

**ब) टिपा लिहा.**

१. मेटरनिकची उदिष्टे.

२. दास कॅपिटल

३. कम्युनिस्टांचा जाहीरनामा

४. लिंकनचे परराष्ट्र धोरण

५. लिंकनचे अंतर्गत धोरण

## ४.७ संदर्भ ग्रथ :


१. डॉ. पी. जी. जोशी. 'आधुनिक जग.'

२. डॉ. अ.रा. कुलकर्णी, डॉ. अ.म. देशपांडे, डॉ. प्र. न. देशपांडे, 'आधुनिक जगाचा इतिहास.'

३. प्रा. नी. सी. दिक्षित, 'यूरोपचा इतिहास.'

४. डॉ. श. गो. कोलारकर, 'यूरोपचा इतिहास.'

५. प्रा. य. ना. कदम, डॉ. ए एम. सुतार, 'आधुनिक यूरोपचा इतिहास.'

६. प्रा. य .ना. कदम,' 'आधुनिक जग.'

७. 'वैद्य सुमन,' 'आधुनिक जग.'

८. गायकवाड, सुर्यावशी, कदम, 'आधुनिक यूरोप.'

९. डॉ. नि. आ. वक्कांनी, 'अमेरिकेचा इतिहास.'

१०. डॉ.शांता कोठेकर, 'अमेरिकेच्या संघराज्यचा इतिहास.'

११. रमेश पतंगे, 'महामानव अब्राहम लिंकन'.

१२. डॉ. अनिल कठारे, 'जागतिक घडामोडींचा इतिहास'.

❖❖❖